# भूमी आणि स्त्री



- डॉ. शैला लोहिया

# भूमी आणि स्त्री

लेखिका

डॉ. सौ. शैला लोहिया

एम.ए., पीएच.डी.

अंबाजोगाई

गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.

BHOOMI ANI STREE
DR. SHAILA LOHIYA

©

प्रकाशक :

गोदावरी प्रकाशन,
'मंगलप्रभा', १०९, एन-५ (दक्षिण)
स्वा. सावरकर नगर, सिडको,
औरंगाबाद - ४३१ ००३.
फोन : ४८८४७९

विभागीय कार्यालय :
सोना नगर, सावेडी,
अहमदनगर.
फोन : ४२७६०९.

प्रथमावृत्ती : जुलै २०००

छाया जुळणी :
'क्रिएशन',
'जयश्री' प्लॉट नं. १-एन,
सेक्टर-ए, एन-१, सिडको,
औरंगाबाद - ४३१ ००३.
फोन : ४८६९१०.

मुद्रक :
प्रिन्टवेल
ई-१६/२/५, एम.आय.डी.सी.,
चिकलठाणा, औरंगाबाद - ४३१ २१०

किंमत : रु. दोनशे पन्नास फक्त

*माय आणि माती । दोन्हीही महान ।*
*जग हे लहान । त्यांचे पुढे ॥*

# मी कृतज्ञ आहे

माझे मार्गदर्शक आदरणीय गुरुवर्य प्रा. डॉ. प्रभाकर मांडे, सौ. मंगला वहिनी आणि परिवार, वेणुताई चव्हाण प्रतिष्ठान संचालित महिला महाविद्यालयाचा परिवार, 'मानवलोक' परिवार, श्री. प्रमोद जोशी (ग्रंथपाल).

श्रीमती गंगाबाई लोहिया आणि लोहिया परिवार, तसेच या प्रबंधासाठी ज्यांनी मला सहकार्य केले ते स्नेही, या प्रबंधाच्या अक्षर जुळणीचे काम करणारे सौ. अनिता व श्री. विनायक भालेराव. मुखपृष्ठ सजवणारे श्री. संतुक गोळेगावकर

आणि

माझे जीवनसाथी डॉ. द्वारकादास लोहिया

या सर्वांची मी कृतज्ञ आहे.

# निवेदन

लोकसाहित्याबद्दलची उत्सुकता मनात उमलत्या वयापासून होती. भुलाबाई, खानदेशात मोठ्या प्रमाणावर मांडली जाई. आमच्या घरात आजोबा असेपर्यंत सणवार नियमितपणे होत असत. पण त्या सणावारांचा भर त्या निमित्ताने करावयाच्या पदार्थांवर अधिक असे. पूजा, विधी, मांडणी यांवर नसे. धुंदुर्मासात पहाटे उठून आई साग्रसंगीत स्वयंपाक करी. वांगी, उसावरच्या शेंगा, मेथी, गाजर आदी अनेक भाज्यांची मिसळीची भाजी, तीळ लावून केलेल्या बाजरीच्या गरम भाकरी, लोणी, तुरीचा डाळ, मुगाची डाळ घालून केलेली मसालेदार खिचडी, कढी असा बेत असे. सूर्य उगवण्यापूर्वी जेवणे होत. नागपंचमीला तांदळाच्या रव्याच्या, शिऱ्याच्या वड्या-खांडवी होत. गणेश चतुर्थीला उकडीचे मोदक, संक्रान्त दहा जानेवारीलाच करावी लागे. कारण टिळक पंचांगानुसार संक्रान्त दहाला असते. त्या दिवशी स्वयंपाक करणाऱ्या महिलेची परीक्षा घेणाऱ्या गुळाच्या पोळ्या कराव्या लागत. मराठवाड्यात केल्या जाणाऱ्या तेलच्या वेगळ्या. ही सगळी मजा ते असेपर्यंत होती.

आई-पपांचे घर सर्वांसाठी खुले होते. ते नेहमीच भरलेले असे, पपांचा 'देव' या संकल्पनेवर विश्वास नव्हता. आईने त्यांचे विचार समजून घेऊन त्यांना एकरूपतेने साथ दिली. पण संध्याकाळ झाली की ती शुभंकरोती म्हणायला लावी. आजोबांनी देवघराचा आग्रह कधीच धरला नाही. मी दहावीत होते. कंठ फुटायला लागला होता. मी आजोबांना एकदा विचारलेच.

''बापूसाहेब , तुम्ही एकादशी करता, सणावाराला सर्व पदार्थांनी साग्रसंगीत भरलेले ताट समोर लागते. सर्वांच्या घरात असलेले देवघर का नाही आपल्या घरात ?''

आजोबा मिनिटभर नुसते बघत राहिले नि त्यांच्या 'शैल्लमा'ला त्यांनी जवळ बसवून घेतले आणि सांगितले, 'अम्मा देवघर, देव पूजा हे सगळे मनाचे खेळ आहेत. शेजारचे आजोबा परदेशी जाऊन आले, मडमेला घेऊन आले. तरीही भटजीबुवा त्यांच्या घरी जाऊन साग्रसंगीत श्राद्ध करतात. का? तर ते भरपूर दक्षिणा देतात. आणि तुझा बाप कॉलेजात असताना माणसांबरोबर जेवला,

समाजाच्या चौकटीत ती माणसे भलेही महार, मांग असतील पण ती माणेसच ना ? तर त्याने सहभोजन केले म्हणून आपल्या घरी तुझ्या आजीचे श्राद्ध करण्याचे भटजींनी नाकारले.आणि त्या क्षणापासून माझा देव ब्राह्मण, कर्मकांड या सर्वांवरचा विश्वास पूर्णपणे उडाला. आधी फारसा नव्हताच. अम्मा , खरे शिक्षण मनात प्रश्न निर्माण करते. ते प्रश्न मनाला खरवडतात. पण सर्व सोडून देण्याचे धाडस त्या दिवशी आले. आपल्या घरातील श्राद्ध त्या दिवसापासून मी बंद करून टाकले. ''सणाच्या निमित्ताने चवदार खाण्याची संधी ती का सोडायची ? तुझ्या आईनेही कधी देवघराविषयी विचारले नाही. घरचे देव तुझी मोठी काकू सांभाळते. तुला मांडायचे का देवघर ? आता बाजारात जाऊन चार देव आणून देतो ! जाऊ?''

माझ्या मनातले सारे प्रश्न संपले होते. भाद्रपदातील माझी भुलाबाई मांडायला ते मदत करीत. त्यांच्या खोलीतच ती मांडली जाई. रोज सकाळी प्रश्न विचारीत 'हं मग आज खाऊ कोणता ? काय आणू बाजारातून ? कणसं आणू की लाल भोपळा ?' आई काय ते समजे आणि कुणालाही ओळखता येणार नाही असा खाऊ, प्रसाद करी.


मुलाबाळांना दीर्घायुष्य देणारी जिवतीची पूजा, सद्बुद्धी देणाऱ्या बुध बृहस्पतीची पूजा, शेताचे रक्षण करणाऱ्या आणि बहिणीच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या नागोबाची पूजा श्रावणात आई आठवणीने करी. देवघर नसलेल्या घरात जिवतीचा कागद भिंतीला आदराने,श्रद्धेने चिटकवला जाई. श्रावणातल्या शुक्रवारो पुरणावरणाचा नैवेद्य दाखवून घरात धुणीभांडी करणाऱ्या विठामावशीला रांगोळी घालून ताट सजवून सवाष्ण म्हणून जेवायला घातले जाई. अशा या संगमेश्वरी घरात मी वाढले. तेव्हापासून मनात 'लोक' या शब्दाबद्दलची आत्मीय श्रद्धा रुजली. 'लोक' म्हणजे बाहेरचे असे कधी वाटलेच नाही. घरी येणाऱ्यांत पू. साने गुरूजी, एकेकदाच..... पण घरी आलेले, जवळून न्याहाळता आलेले लोकनायक जयप्रकाशजी, डॉ. राम मनोहर लोहियाजी. एसेम आणि ना.ग. गोरे जणु आमच्याच घरातले. कळू लागले तेव्हापासून या सर्वांचे साहित्य हाती आले. भारतीय संस्कृती, ललितलेणी आणि श्रवणबेळगोळच्या उभ्या डोंगरात बाहुबली स्वप्न कोरून काढणारा ना. ग. गोऱ्यांचा आरिशिनेमी यांनी मनाला संपृक्त केले. नवी दिशा दिली.

१९८७ साली एम.फिल. च्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पंचेचाळिशी ओलांडल्यावर पुन्हा एकदा 'प्रत्यक्ष विद्यार्थी' होण्याची संधी मिळाली. आणि त्यावेळी मनाचा बंद कप्पा उघडला गेला. 'लोकसाहित्य' या विषयाचा विशेष अभ्यास करण्याचे ठरवले स्वयंभू संशोधक आणि मनाने शिक्षक असलेल्या प्रा. डॉ. प्रभाकर मांडेंसारखे गुरू लाभले. 'भोंडला भुलाबाई' च्या गाण्यांवर एम.फिल. केले. त्यावेळी असे लक्षात आले की भूमीच्या सर्जनाशी जोडलेल्या उत्सवांत स्त्री-प्रधानता आहे. या सणात कुमारिकांना विशेष स्थान आहे. ही व्रते, हे उत्सव, तत्संबंधी विधी, लौकिक 'धर्म' संकल्पनेशी जोडलेले नाहीत. लोकधारणांशी त्यांचे नाते आहे. या बाबींचा शोध घ्यावा या हेतूने प्रस्तुत विषयाची निवड केली. या शोधनासाठी प्रा. डॉ. प्रभाकर मांडे सरांकडेच नाव नोंदविले. एकूण विषयाचा फलक खूपच विस्तृत होता. विषयाचे सर्वांगीण रूप समजून घेण्याची जिज्ञासा असल्याने आणि कॉलेज घर वगैरेचा व्याप यांमुळे हा शोधप्रबंध पूर्ण करण्यास परिश्रम घ्यावे लागले.

प्रत्येक क्षणी साथ देणारा साथी, त्याचा शेकडो खेड्यांशी - ग्रामीण जनतेशी असलेला संपर्क त्यातून सतत मिळत राहिलेले लोकज्ञान आणि शिष्याला सतत चेतना आणि प्रेरणा देणारे गुरू , या सर्वांच्या सहयोगातून हे स्वप्न जमिनीवर पाय टेकू शकले. गेल्या सात आठ वर्षांपासून केलेला प्रयत्न या ग्रंथाच्या रूपाने सर्वांसमोर ठेवीत आह.

**– शैला लोहिया**

'किनारा'
३२, विद्याकुंज वसाहत,
अंबेजोगाई - ४३१ ५१७.
दूरभाष : (०२४४६) ४७०१६
फॅक्स : ०२४४६-४७४९७



# भूमिका

लोकसंस्कृतीची क्षितिजे दिगंतालाही व्यापून उरली आहेत. पाताळाच्याही पल्याड तिची मुळे पोहोचली आहेत. लोकसाहित्य ही प्रवाही घटना आहे. अबोध समूहमनाच्या (Collective Unconscious) प्रेरणेतून लोकसाहित्य आकाराला येत असते. आदिम काळापासून समूहमनाचे संचित व्यक्त करणाऱ्या काही संकल्पना त्यातून दृगोचर होत असतात. त्यांनाच आपण आदिबंध (Archytype) म्हणतो. या आदिबंधाचे आविष्करण, कालप्रवाहाचे झोत सातत्याने अंगावर घेत सतेज राहणाऱ्या, शेकडो...हजारो वर्षांपासून चालत आलेल्या लोकपरंपरांतून, शिल्प, चित्र, संगीत आदिकलांतून, लोकसाहित्यातून होत असते.

सर्वसामान्य माणसाच्या भावविश्वाला सतत चेतना देणाऱ्या अनेक गोष्टी संकल्पना, श्रद्धा, परंपरा, रूढी, दैवतकल्पना, विधी, भाषा, उपासना पद्धती आदी माणसाच्या जगण्याचा अविभाज्य भाग असतात. त्यालाच आपण लोकसंस्कृती म्हणतो. ती सांगता येत नाही. दाखविता येत नाही. अशरीरिणी संस्कृती, विधी, उत्सव, व्रते, सण, तत्संबंधी गीते, शिल्प, चित्र, नृत्य, संगीतादी कला यांच्या आविष्करणातून साक्षात् होत असते.

खेड्यातील सामान्य माणसाच्या भावविश्वाचे दर्शन तसेच त्याची मातीवरील श्रद्धा पाहून लक्षात आले की, भाषा बदलली, प्रान्त बदलला, पोषाख बदलला, पदार्थांची चव बदलली तरी भारतीय माणसाच्या भूमीवरील श्रद्धा सारख्याच असतात. ज्या विधी, उत्सवांमधून त्या व्यक्त होतात, त्यांच्या भावाविष्कारातही

साम्य आहे. राजस्थानातील गणगौर, कर्नाटक, महाराष्ट्रातील चैत्रगौर यांच्या विधीत 'तृतीये' ला महत्त्व असते. राजस्थानातील तीज, महाराष्ट्रातील हरतालिका किंवा आंध्रातील अटलतद्दी ही कुमारिकाव्रते भाद्रपद तृतीयेस साजरी होतात. महाराष्ट्र, कर्नाटकातला पाडवा वा आंध्रातला 'उगादी' असो, साजरा करण्याचा दिवस चैत्रप्रतिपदेचा. नव्या वर्षाची सुरुवात शेतीच्या संदर्भातील नवे निर्णय... त्यांची सुरुवात याच दिवशी सुरू होते.

एम.फिल.साठीच्या शोधनिबंधाचा अभ्यास करताना लक्षात आले. महाराष्ट्रातील विविध खेळल्या जाणाऱ्या हादगा, भोंडला, भुलाबाई, भराडीगौर, इनाई या कुमारिकांच्या खेळोत्सवात आणि त्यांच्या गाण्यात मूलभूत साम्य आहे. अशा प्रकारचे कुमारिकांचे खेळोत्सव आषाढ ते आश्विन या काळात इतर प्रांतांत खेळले जातात. आषाढ - गुल्लवा - कर्नाटक, भाद्रपद, आश्विन - सांझी, मामुलिया - मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, भाद्रपद : आश्विन-बदकम्मा-आंध्र , आश्विन-गरबारास-गुजरात. या आणि महाराष्ट्रातील खेळोत्सवांत, त्यांच्या मांडणीत साम्य आहे. हे खेळोत्सव कुमारिकांचे असून त्यात गाणे आणि प्रसाद यांना महत्त्व असते. या सर्वांगीण एकात्मतेमागचे मूलतत्त्व शोधण्याची भूमिका या शोध प्रबंधामागे आहे.

अशा प्रकारचा अभ्यास विस्तारपूर्वक आणि सखोलपणे करण्यासाठी 'लोकांच्यात' जाणे, त्यांच्यातील होऊन राहणे, त्यांच्या मनात विश्वास निर्माण करीत त्याच्याजवळ जे 'लोकधन' आहे ते गोळा करणे, आवश्यक होते ते केले. त्यासाठी मानवलोक, मनस्विनी, जनार्थ आदी ग्रामीण भागात काम करणाऱ्या स्वंयसेवी संस्थांची मदत झाली. नागपंचमीची माहिती गोळा करीत असताना भावठाणा परिसरातील डोंगरात राहणाऱ्या मोरफळीच्या राणूबाई, सुमनबाई कापसे यांनी सांगितले की नागपंचमीचा आदला दिवस, नागपंचमी आणि नंतरचा दिवस - ज्याला पंचमीची कर म्हणतात, या तीन दिवशी जमीन नांगरायची, वखरायची नसते. जमिनीला कुदळ लावीत नाहीत. पेरीत नाहीत. स्त्रीप्रमाणे भूमी रजस्वला होते आणि त्यानंतरच तिच्यात सर्जनशक्ती येते. ती सुफल होऊ सकते. हा कल्पनाबंध भारतभर प्रस्तुत आहे. आसाम बंगालातील 'अंबुवाची', केरळातील 'उछारल', काश्मीरमधील 'राज्ञीस्नापन' हे विधिउत्सव या 'कल्पनाबंधा'तून

आकारले आहेत. नागपंचमीचे तीन दिवस या 'कल्पनाबंधा'शी जोडले असावेत असे लक्षात आले. अंबाजोगाईतील या संदर्भातील माहितीकोश असलेले कै. आबा ऊर्फ शिवाजीराव लोमटेंशी संपर्क साधला. त्यांनी ठामपणे सांगितले, 'या काळात जमिनीला दुखवायचे नसते.'

पारधे वाडीतील पेरणी करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या महिलेने पेरणी करण्याचे 'कसब' स्त्रियांच्यातच असते असे ठामपणे सांगितले. भोंडला भुलाबाईच्या विधी आणि गाण्यांचा शोध घेताना स्त्री आणि भूमी, स्त्री आणि शेती यांच्यातील अतूट नात्याचा प्रत्यय आला होता. तसेच ही व्रते भूमीच्या सुफलीकरणाशी जोडली गेली आहेत हे लक्षात आले. मोकळ्या आभाळाखाली रानात, स्त्रियांची विशेष करून कुमारिकांची लयबद्ध पावले फिरली आणि त्यांना स्वरांची साथ असेल तर पीक उत्तम येते. या खेळोत्सवांत 'मांडणी'ला महत्त्व असते. स्त्री आणि कुमारिका व्रतात झोका असतो. द्यावापृथ्वी-आकाशभूमी यांच्या मिलनातून भूमी सुफल होते. या दोहोंच्या 'एक' होण्याचा सुभग संकेत 'दोलोत्सवातून' व झोका या कृतीतून मिळतो. डॉ. प्रभाकर मांडे यांच्याशी चर्चा करून शोधप्रबंधासाठी प्रस्तुत विषय निश्चित केला.

शोधनिबंधाच्या विषयाकडे तटस्थ नजरेने पाहण्याची वृत्ती, चिकित्सक भूमिकेतून निरीक्षण करण्याची भूमिका आवश्यक असते. ही भूमिका नकळत ठसली, डॉ. राम मनोहर लोहियांच्या 'ललितलेणी'च्या वाचनातून. डॉ. राम मनोहर लोहियांची प्रतिमा,एक ओबडधोबड राजकारणी म्हणून निश्चित झाली आहे. 'भलत्या वेळी बोलायची खोड असलेला हा माणूस.' 'न ब्रुयात् सत्यमप्रियम्' चा संभावित गुळमुळीतपणा न जाणणारा रसिक आणि रांगडा माणूस म्हणजे डॉ. राम मनोहर लोहिया. १९६६ च्या जानेवारीत त्यांची काही काळ भेट घेण्याचा योग आला. मी मराठी या विषयाचा अभ्यास करते आहे हे कळताच त्यांनी विचारले, ''महाराष्ट्रात येताना मला नेहमीच चक्रधर आठवतो. माझे जेवण संपेपर्यंत मला महानुभाव संप्रदाय आणि चक्रधर यांच्या तत्त्वज्ञान व जीवनाशी संदर्भित, काही क्रान्तिकारी मुद्दे व घटना सांग'. या शोधनिबंधातून मला जे मांडायचे आहे. त्याला भलेभक्कम नैतिक आधार वरील उद्‌गार आणि ललित लेणी यातून मिळाला. डॉ. राम मनोहर लोहियांची मानसिक बैठक पूर्णपणे भारतीय होती.

सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून राजकारणाकडे पाहणारा हा माणूस म्हणे, 'देव आणि दैव हे दोन्ही दुर्बळांचे घातक असतात.' त्यांना 'रामकृष्णशिवांत' जीवनविषयक दृष्टिकोनातील विश्वात्मकता दिसली होती. भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेचे प्राणभूत तत्त्व त्यांना त्यात दिसले होते. ते स्पष्ट शब्दात लिहितात, ''रामकृष्णशिव ही भारतीयांना पडलेली परिपूर्णतेची स्वप्ने आहेत. भारतमाते आम्हाला शिवाची मती दे. कृष्णाचे अंतःकरण दे. रामाची कृती दे. अपरिमित मन देऊन आमची घडण कर. उन्मेषशाली हृदय दे, पण, जीवन मात्र संयमी कर.''

गेल्या काही वर्षांत धर्म, पंथ, जात, लिंग, भाषा यांच्या नावाने होणारी भांडणे अधिकाधिक तीव्र, छुपी आणि अनेकदा सशस्त्र होत आहेत. हजारो वर्षांपासून संघर्ष - स्वीकार - समन्वय - समरसता यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी विणलेले एकात्म संस्कृतीचे वस्त्र चिंधाटले जात आहे. त्यातील 'लोक' हा चिवट व रेशमी धागा 'कच्चा' केला जात आहे. भारतीय संस्कृती, एकात्मता हे शब्द गुळगुळीत नाण्याप्रमाणे अर्थहीन व निःस्पंद झाले आहेत. मतांच्या राजकारणासाठी भारतीय संस्कृतीला वेठीला धरले जाईल की काय असे भय संवेदनशील अभ्यासकांना अस्वस्थ करून जाते.

दुर्दैवाची गोष्ट अशी, 'हिंदू' हा जीवनप्रणाली जीवनरीती व्यक्त करणारा शब्द, धर्म, राजकारण, समाजकारण यांची समीकरणे मांडण्यासाठी वापरला जातो. त्यामुळे जीवनरहाटी... जीवनसरणी दर्शविणाऱ्या या शब्दावर दूषित आवरणे चढली. प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे भारतातील सांस्कृतिक एकात्मता हाच भारतीय राष्ट्रीयत्वाचा आधार आहे, ही भूमिका मला मांडायाची आहे. त्यासाठी 'ललितलेणी' आणि पू. सानेगुरूजींचे भारतीय संस्कृती' या दोन ग्रंथांनी भक्कम जमीन... भूमी दिली.

१३व्या शतकानंतर भारतावर झालेल्या आक्रमणात 'धर्म' ही एक महत्त्वाची प्रेरणा होती. लाखोंचे जबरदस्तीने धर्मान्तर केले गेले. काहींना नाईलाजाने स्वीकारावे लागले. काहींनी मनःपूर्वक केले. त्याकाळात धर्माबाबतची तर्कशुद्ध भूमिका घेणारे राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व लाभले असते तर आज ज्या विद्वेषाला, दुहीला तोंड द्यावे लागते ते द्यावे लागले नसते. असे असले तरी एक बाब लक्षात येते. धर्म

बदलला तरी 'लोकधारणा' एक आहेत. गोव्यातील ख्रिस्ती समाज देवीला फुलांची छत्री श्रद्धापूर्वक अर्पण करतो. त्या संदर्भात मिळालेले उत्तर असे. 'आमच्या पिढ्या याच मातीतून उगवल्या. इथेच मातीत मिळाल्या. कुणा पूर्वजाने पाव टाकलेल्या विहिरीतले पाणी प्याले म्हणून तो किरिस्ताव झाला. पुढच्या पिढ्या किरिस्ताव म्हणून जगल्या. त्यावेळी त्याच्या पाठीवर हात ठेवून, पावाचा स्पर्श झालेले पाणी धर्म बदलू शकत नाही असे 'पोथी' वाचून धर्म सांगणाऱ्यांना खडसावून सांगणारा, सहृदय धर्मपंडित भेटला असता तर आज आम्ही हिंदू असतो. मूळ धर्म कोणताही चांगलाच. माणूसपण देणारा. शेवटी या मातीतून आमच्या मनात गोंदलेल्या श्रद्धा नाहीशा कशा होणार ? आम्ही दरवर्षी ही छत्री आमच्या गावदेवीला श्रद्धेने अर्पण करतो. तीच आमची आई.

जोगाईला अनेक मुस्लिम स्त्रिया श्रद्धेने नमस्कार करतात. हळदीवाले, तडवी ही जमात अशी आहे की त्यांच्या स्त्रियांची नावे हिंदू असतात. त्यांचा पेहेराव भारतीय पद्धतीचा असत्तो. ज्यांचे धर्मांतर जबरदस्तीने झाले अशांच्या 'लोकधारणा' पूर्णपणे भारतीय आहेत. भूमीची पूजा करणारी 'येळा आवस' मुस्लिम शेतकरीही साजरी करतो.

या सर्व गोष्टींचा विस्ताराने अभ्यास करताना लक्षात आले की भारतातील विधिउत्सव, व्रते, तत्संबंधी गाणी यांच्यातील एकात्मतेचा मूलभूत आधार 'भारतीय राष्ट्रीयत्व' हा आहे. डॉ. लोहियांनी स्पष्ट बजावले होते. 'जे मन भयहीन, वासनाहीन आणि नैराश्यहीन असते तेच योग्य विचार करू शकते.'हा वारसा व भूमिका घेऊन प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

## 'जमिनीच्या सुफलीकरणाशी संबंधित विधी, उत्सव आणि गाणी' –

या विषयाच्या शोधनास प्रारंभ करताना, विधी आणि उत्सव यांची मराठवाडा पातळीवर निश्चिती केली. सुरुवातीला बीड, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यांतील गावांना भेटी दिल्या. या भागात पेरणीपूर्वी तिफणीची पूजा करतात. सुताराचा सन्मान करतात. अकोला, खामगाव भागातही ही पूजा प्रचलित आहे. तिफणीची आरती ज्ञानप्रबोधिनीच्या ग्रंथालयातून मिळाली. मराठवाड्यातील बीड, लातूर,

उस्मानाबाद या तीन जिल्ह्यांतून मार्गशीर्ष अमावास्येस 'इळाआवस' शेतात जाऊन साजरी करतात. परंतु ही पूजा औरंगाबाद, परभणी, जालना, नांदेड या परिसरात होत नाही. परभणी परिसरात तिला 'इरवण आवस ' म्हणतात. या दिवशी शेतीच्या अवजारांना धार लावतात. उमरगा परिसरात 'पोळा' आषाढ अमावास्येस करतात. उर्वरित मराठवाड्यात श्रावण अमावास्येस पोळा, बैलांच्या सन्मानाचा सण साजरा होतो. परभणी, जालना, नांदेड, औरंगाबाद परिसरास भेटी दिल्या. औरंगाबादहून फुलंब्री, सोयगावकडे जाताना आणि कन्नडच्या भागात अहिराणी भाषेचा गंध मराठवाडी भाषेस येऊ लागतो. हेल बदलतात. कन्नडमधील काही घरांतून भुलाबाई मांडली जाते. ही घरे सुमारे ५० ते ६० वर्षांपूर्वी या भागात स्थलांतरित झाली आहेत. हिंगोली, सेलू भाग विदर्भाच्या जवळचा. त्या परिसरात भुलाबाई मांडली व खेळली जाते. उदगीर, उमरगा, औरादशाहजानी, निलंगा या भागांतील मराठवाडी भाषेवर कन्नड, तेलगूचा परिणाम झालेला आहे. तीनही भाषांचे हेल एकमेकांत मिसळले आहेत. जमिनीच्या सुफलीकरणाशी जोडलेले महत्त्वाचे उत्सव म्हणजे लक्ष्म्या, नवरात्र,दिवाळी, संक्रान्त, गुढीपाडवा, होळी इत्यादी. ते सर्वच मराठवाड्यात साजरे होतात. या व्यतिरिक्त योगेश्वरी, तुळजाभवानीचे नवरात्र, खंडोबाचा षड्रात्रोत्सव, शाकंभरीचे नवरात्र अनेक घरांतून कुळाचार म्हणून मांडले जाते.

लक्ष्म्यांचा सण 'कुळाचार' म्हणून सर्व जातिजमातींतून श्रद्धापूर्वक मांडला जातो. मांग समाजात उभ्या लक्ष्म्या मांडतात. महार समाज गेल्या काही वर्षांपासून लक्ष्म्या मांडीत नाही. शेती हा प्रमुख व्यवसाय असणाऱ्या घरातून मात्र, स्त्रिया धान्याच्या राशी मांडून पूजा करतात. कोल्हापूर, रत्नागिरी परिसरात खड्यांच्या किंवा तेरड्याच्या झाडांच्या लक्ष्म्या मांडतात. मात्र त्यांना 'गौरी' म्हणतात. लक्ष्म्या वा गौरीच्या मांडणीत विविधता असली तरी मूळ हेतू धान्य लक्ष्मीच्या पूजेचा, भूमीच्या सुफलीकरणाचा आहे. ओव्या, गाणी खूप मिळाली. विदर्भात खानदेशात लक्ष्म्या मांडतात. परंतु खानदेशात लक्ष्म्यांपेक्षा 'कानबाई' फार मोठ्या प्रमाणात, अत्यन्त थाटात बसवली जाते. मराठवाड्यात लक्ष्म्या विधिपूर्वक काटेकोरपणे बसविल्या जातात. तीच विधिपूर्वकता आणि काटेकोरपणा कानबाईच्या मांडणीत असतो.

भूमीच्या सुफलनशक्तीशी जोडलेल्या सणांचे प्राचीनत्व शोधण्याच्या दृष्टीने आदिवासींमधील या संबंधीचे आचार, गाणी यांची पाहणी केली. मराठवाड्यातील किनवट परिसरात गोंड आदिवासी राहतात. नाशिक परिसरातील ठाकर, धुळे भागातील पावरा व भिल्ल, डहाणू ठाणे भागातील वारली यांना भेटून माहिती गोळा केली. सेमाडोह, गडचिरोली भागातील आदिवासींना भेटून माहिती गोळा केली. गाणी गोळा केली. मराठवाड्यातील सामुग्री उर्वरित महाराष्ट्र आणि परप्रांतांतील तत्संबंधी लोकपंरपंरा यांच्यातील साम्य पडताळून पाहणे महत्त्वाचे आहे. तद्नुसार कर्नाटक, आंध्र, मध्य प्रदेश, गुजरात व राजस्थान या प्रांतांतील तत्संबंधी लोकपरंपरांची माहिती त्या समाजातील व्यक्तीकडून व प्रत्यक्ष भेटींतून घेतली. हैदराबाद, विशाखापट्टणम् भेटीत आंध्रातील बदकम्माची अत्यन्त देखणी सजावट आणि अंगण भरून टाकणारी रांगोळीची सजावट पाहिली. जयपूर मुक्कामात गणगौरीची मांडणी, मिरवणूक यांचा अनुभव घेतला. अहमदाबादेत नवरात्रातील गरब्याचे सौंदर्य, मांडणी यांची माहिती मिळाली. कर्नाटकातील माहिती त्या परिसरातील व्यक्तींकडून मिळाली.

भूमीच्या सुफलीकरणाशी संबंधित विधी, उत्सव यांचा शोध घेताना लक्षात आले की, ज्येष्ठ ते कार्तिक या सहा महिन्यांत येणारे विधिउत्सव, भूमी, वर्षन आणि सर्जन यांच्या अनुबंधातून निर्माण झाले आहेत. मार्गशीर्ष ते फाल्गुन या काळात साजरे होणारे विधिउत्सव भूमी, सूर्य आणि सर्जन यांच्या अनुबंधातून निर्माण झाले आहेत.


प्रत्यक्ष व्यक्तींकडून, परिसरास भेट देऊन माहिती गोळा करीत असतानाच या विषयातील नामवंत आणि चिकित्सक अभ्यासक दुर्गा भागवत, देवीप्रसाद चटोपाध्याय, पं. वासुदेवशरण अग्रवाल, वि. का. राजवाडे, इरावती कर्वे, डॉ. डी. डी. कोसंबी यांच्या ग्रंथांचे वाचन केले. तसेच महाराष्ट्रातील पूर्वसुरींच्या शोधनाचा अभ्यास व ग्रंथांचे वाचन केले. त्यामुळे या शोधनाचा पाया चोख करण्यास मदत झाली.

भूमीच्या सर्जनाशी जोडलेल्या विधिउत्सवांचा शोध घेताना जाणवले की, या व्रतात स्त्रीप्रधानता आहे. त्याकाळातील स्त्रियांच्या जगण्याशी, त्यांच्या आर्थिक

सामाजिक कौटुंबिक महत्त्वाशी ती जोडलेली आहे. मानवी जीवनाच्या प्रवासात, विकास प्रक्रियेत त्यांचे महत्त्व दुय्यम होत गेले. या प्रवासाचे निखळ प्रतिबिंब या विधीउत्सवांतून व  तत्संबंधी गाण्यांतून दिसते. गेल्या दोन हजार वर्षांत तिच्या 'माणूस' म्हणून जगण्याकडे दुर्लक्ष झाले.  पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेच्या दडपणाखाली तिला जगावे लागले. राजघराण्यांतील स्त्रियांना कर्तृत्व दाखविण्याची संधी मिळाली. पण ती पतीच्या अनुपस्थितीत. या शोधनातून असे लक्षात आले की या विधिउत्सवांतील स्त्रीप्रधानतेची मुळे, पूर्व वैदिक काळातील स्त्रीप्रधान जीवन पद्धतीत आहेत. आज भारतीय स्त्रीजीवनास शक्ती द्यावयाची असेल, त्यांना मध्यवर्ती जीवन प्रवाहात सहभागी करून, भारताच्या राष्ट्रीयत्वाला बळकट करायचे असेल तर सर्वसामान्य स्त्रीच्या जगण्यात आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. स्त्री-प्रधान जीवन व्यवस्था वा पुरुषप्रधान जीवन व्यवस्थेपेक्षा प्रगतिशील भविष्याची दिशा, स्त्रीपुरुष समानतेवर, उभयतांच्या परस्पर समानधर्मी पूरकतेवर आधारलेला समाजच देऊ शकेल. त्या दृष्टीने या लोकधारणांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. त्यातूनच एकात्म भारतीय संस्कृती हीच 'भारतीय राष्ट्रीयत्वाचा ' मूलभूत आधार आहे हे सत्य समाजासमोर येईल.

डॉ. राम मनोहर लोहिया लिहितात, 'स्त्रीपुरुषांना समान न्याय असावा.  स्त्रीने भारभूत बनू नये. प्रसंगवश पुरुषाचा भार संभाळून  तिने स्वतंत्रपणे मार्ग काढावा'.

स्त्रीच्या  समर्थ भूमिकेला ऐतिहासिक संदर्भ देणारे, तिच्यातील आत्मविश्वास जागवणारे, तिने प्राचीन काळी बजावलेल्या रचनात्मक भूमिकेचे समाजाला भान देणारे हे विधिउत्सव या शोधप्रबंधाद्वारे  विस्ताराने व विश्लेषण करून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.



# लोकपरंपरा आणि सुफलीकरण विधी

*वैविध्यपूर्ण भारतीय संस्कृती, संघर्ष-समन्वय यातून नवस्वीकृती प्रक्रिया, अन्नप्राप्ती : आदिम समाजाची मूलभूत समस्या : त्यातून सर्जन शक्तीची आराधाना, भारतीय लोकपरंपरांतील प्राणभूत एकात्मता, चैत्रगौर : प्रकाशवृक्ष सूर्याशी असलेल्या धरतीच्या नात्याचा सत्कार, भाद्रपद आश्विन : सर्जन वर्धन शक्तीची आराधना, अन्ननिर्मिती : आदिजीवनाची प्रेरणा, व्रतांमधील यात्वात्मक सामर्थ्य : त्यांतील स्त्रीप्रधानता, आदिवासींच्या देवता : धरती आणि कणसरी, गोपालक वैदिकांनी कृषिजीवनाचा स्वीकार केला, भूमी सुफलित करण्याचे विधी स्त्रीकडे, संघर्ष स्वीकार आणि समन्वय, दैवी दाम्पत्ये : वैशिष्ट्ये, प्राचीन देवतांचे उन्नयन, भारतीय संस्कृतीचा इतिहास हा समाजनिर्मितीचा इतिहास, भारताची भौगोलिक रचना एकात्मतेसाठी अनुकूल, ऋतुचक्र आणि भारतीय सण, उत्सव, आदिपर्वातील यातुश्रद्धा आणि समूहश्रद्धा, लोकपरंपरा आणि समूहमन, लोकपरंपरा आणि लोकसाहित्याचा अभ्यास : प्रेरणा, कृषिलक्ष्मीशी जोडलेले रीतिरिवाज आजही हरवलेले नाहीत, अनुबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न, या शोधामागील भूमिका.*

---

'केलो के पेडमें जैसे एक के एक उपर एक चढे हुए परतों के भीतर उसका गाभा रहता है, जिसमें अनेक धर्मो के खोल एक दुसरे के उपर चढते चले गये है। वे एक दुसरे के साथ अत्यंन्त शीतलभाव से इस प्रकार मिल बैठे है, जैसे गंगाकी धारा में पडे हुऐ गंगलोढे आपस में टकराकर गोलमटोल बनते हुए एक साथ पडे रहते है और रात दिन अधिकाधिक अभेद की स्थिती प्राप्त करते हुए अंत गंगा की बालुका बन जाते है जिससे इस भूमी के मिट्टी का निर्माण हो रहा है।'

(वासुदेव शरण अग्रवाल)[१]

**वैविध्यपूर्ण भारतीय संस्कृती –**

भारतीय संस्कृती म्हणजे आर्यांची वा द्रविडांची संस्कृती असे आज कोणीही

मानत नाही. भारतीय लोकसंस्कृतीत इतके वैविध्य आहे, इतके वैचित्र्य आहे, इतक्या जटिल गुंतागुंती आहेत की त्यांचे चिकित्सक विश्लेषण करून त्याचा मूळ गाभा शोधणे कठीण व्हावे.

आज जे विधी अर्थहीन वाटतात, ज्या गाण्यातील शब्द परस्परांशी असंबद्ध वाटतात त्यात एकेकाळी जीवनाचे चैतन्य एकवटलेले होते. परंतु कालौघात विधींमागील मूळ संदर्भ तुटून जातात. कालानुरूप नवे संदर्भ चिकटवले जातात आणि त्यांचे स्वरूप गुंतागुंतीचे आणि व्यामिश्र बनत जाते. त्यामुळेच भारतीय समाजातील विधींच्या आणि आचार विचारांच्या अभ्यासात खूप अडचणी निर्माण होतात.

द्रविड, आर्य, दास, दस्यु, असुर पणिन् अशा अनेकविध टोळ्यांच्या संघर्ष - समन्वयातून..... त्या नंतरच्या समरसतेतून आगळ्यावेगळ्या पोताची भारतीय संस्कृती निर्माण झाली आहे.

**संघर्ष–समन्वय यातून नवस्वीकृती प्रक्रिया –**

अँग्लोसॅक्सन वा इंडोयुरोपीय भूमिका घेणाऱ्या विचारवंतानी सुरुवाती पासून अशी मांडणी केली की द्रविड हे भारतातील एतद्देशीय तर आर्य बाहेरुन आलेले. मोहंजोदारो, हरप्पा उत्खनानंतर भारतीय लोकसंस्कृतीतील अनेक हरवलेले दुवे हाती आले. आज इंडो युरोपियन भूमिकेचा स्वीकार गृहीततत्त्व म्हणून स्वीकारण्याची गरज नाही. वर उल्लेखिलेल्या सर्व समाजांत संघर्ष झाला. संघर्षासोबत परस्परांच्या जीवन विशेषांचा त्यांनी स्वीकारही केला. रोटीबेटी व्यवहारातून सहजीवन व समन्वय घडत गेला. ही प्रक्रिया गेल्या हजारो वर्षांपासून अव्याहतपणे सुरू आहे. 'वैदिक' आणि 'लोक' या दोन्हीही परंपरांचे प्रवाह या लोकसंस्कृतीत मिसळलेले आहेत. नंतर आलेल्या प्रवाहांनी आधीच्या परंपरांना नष्ट न करता मिळते घेतले. तर आधीच्या प्रवाहांनी नंतरच्या प्रवाहांचा स्वीकार केला. संघर्ष आणि समन्वय यातून त्यांनी एकमेकांच्या परंपरा, जीवन श्रद्धा, देवता आदींचा स्वीकार केला. या प्रक्रियांच्या संदर्भात इरावती कर्वे लिहितात – [२] " ही ऐतिहासिक घटना म्हणजे सतत स्वीकाराची प्रक्रिया आहे. कोणत्याच वेळी दोन पर्यायी गोष्टिंमध्ये एकीचा स्वीकार व दुसरीचा कायमचा त्याग असा प्रकार दिसून येत नाही." या प्रक्रियेला त्यांनी 'नवस्वीकृती' (Aglomeration) असे म्हटले आहे.

नवस्वीकृतीची ही प्रक्रिया हजारो वर्षांपासून अव्याहतपणे सुरू आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीची अभिजातता अधिकाधिक समृद्ध झाली आहे. आज जग २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे असताना या सांस्कृतिक एकात्मतेचा प्रत्यय कन्याकुमारीपासून ते काश्मीरपर्यंत आणि जगन्नाथपुरीपासून ते द्वारकेपर्यंतच्या लोकपरंपरांतून सातत्याने येत असतो. या विविधरंगी विशाल देशात वीसहून अधिक प्रमुख भाषा आणि शेकडो बोली बोलल्या जातात. त्या सलोख्याने नांदतात. ही सांस्कृतिक अंगाची एकता भाषांमधूनही जाणवते. भाषाकुळाची प्रस्थापित कुंपणे ओलांडून भाषा एकमेकींच्या शब्दवैभवात सहजपणे स्थिरावल्या आहेत केवळ भाषा नव्हे तर मिथक कथा, सण, व्रते, विधी, उत्सव, तत्संबंधी गाणी आदी लोकपरंपराही.

**अन्नप्राप्ती : आदिम समाजाची मूलभूत समस्या : त्यातून सर्जन शक्तीची आराधाना –**

जगातील सर्व आदिम, अर्धसंस्कृत व सुसंस्कृत धर्मांमध्ये प्रजा, पशू , धान्य यांच्या समृद्धीसाठी सुफलीकरण विधी करणे आवश्यक मानले जात असे. अन्नप्राप्ती ही आदिम समाजाची अत्यंत मूलभूत समस्या होती. विश्वात मृत्यूचे म्हणजे भुकेचे साम्राज्य होते. अन्नप्राप्तीसाठी आदिम समाजाने सामूहिक प्रार्थना केल्या, उपासना केली. अन्न ही समस्या केवळ मानवाचीच नव्हे तर मानवाने स्वतःपेक्षा श्रेष्ठ मानलेल्या देवांसमोरही होती. ही समस्या देवांनी छंद, वाणी, समूहगान याद्वारे दूर केली व मृत्यूचे भय नाहीसे केले. छंद वाणी, सामगानात यात्वात्मक सामर्थ्य असते व त्यातून विपुल प्रमाणात अन्नप्राप्ती होते अशी श्रद्धा मानवात निर्माण झाली. सर्जनाच्या, अन्ननिर्मितीच्या समस्येतून त्यांच्या दैवत कल्पना, श्रद्धा साकारत गेल्या. आदिम संस्कृतीच्या अध्ययनातून सिद्ध झाले आहे की, त्या काळात योनी, लिंग, स्तन हे मानवी अवयव सुफलताविधीची प्रतीके मानली जात. आजच्या अर्थाने धर्म ही संकल्पना मानवी मनात रूजली नव्हती. साकारलेली नव्हती. त्याकाळात लोक समूहांच्या मनांत सर्जनाशी जोडलेल्या या मानवी अवयवांबद्दल भीतीयुक्त श्रद्धा होत्या. मानव जन्मास पुरुषही कारण असतो या बाबत आदिम लोक समूहांच्या मनात जोपर्यंत सांशकता होती, अज्ञान होते, तोपर्यंत विश्वाच्या आणि जगातील जीवन उपयोगी पदार्थांच्या उत्पतीचे कारण मातृत्वात पाहिले गेले. मातृत्वातील सर्जनशक्तीचे उन्नयन होऊन 'आदिमातेची' संकल्पना निर्माण झाली. मातृसत्ताक

जीवन व्यवस्थेचे केंद्र सर्जन करणारे 'मातृत्व' हे होते. आदिम मानवाची मातृत्वावर अपार श्रद्धा होती. ज्यावेळेस समाजाची बांधणी झाली, समाजाचे नियमन सुरू झाले त्यावेळी सर्जन करणारी स्त्री ही समाजाचा प्रमुख घटक बनली. तिची सत्ता समाजाने स्वीकारली. त्यातून मातृसत्ताक जीवनव्यवस्था निर्माण झाली. संपूर्ण जगात प्रारंभीच्या काळात ईश्वाराचे पूजन आदिमातेच्या रूपात केलेले आढळते. इजिप्तमधील इसिस, ग्रीकमधील डिमिटर, रोममधील व्हिनस या स्त्रीदेवतांची पूजा त्या त्या देशात खिस्तपूर्व काळांत प्रचलित होती. या देवता समृद्धीचे प्रतीक होत्या. त्यांच्या पूजेशी संबंधित असलेले विधी प्रामुख्याने धान्य, पशु, प्रजा यांच्या विपुलतेसाठी असत.

**भारतीय लोक परंपरांतील प्राणभूत एकात्मता –**

भारतीय संस्कृती जगातील अतिप्राचीन संस्कृतींपैकी एक. येथेही मातृसत्ताक जीवनव्यवस्था आणि योनिपूजेचे प्रचलन होते. सर्जनाच्या प्रक्रियेत 'स्त्री तत्त्व' प्रत्यक्षपणे क्रियाशील असले तरी अप्रत्यक्षरीत्या 'पुरुष तत्त्व' बीज व सलिल रूपाने सर्जनात सहभागी असते, याची जाणीव झाल्यावर पुरुष तत्त्वांचे पूजन लिंग स्वरूपात होऊ लागले. दैवी दाम्पत्यांची निर्मिती झाली. उदा. – गौरी आणि शंकर. लक्ष्मी आणि विष्णु, इजिप्तमधील 'इसिस आणि होरस' इत्यादी. अतिविशाल आणि प्राचीन अशा या देशाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. भारतीय लोकजीवन विविध उत्सव, सण, व्रते, यात्रा, विधी, तत्संबंधी गाणी यांनी समृद्ध झालेले आहे. हजारो वर्षांपूर्वीपासूनच्या सांस्कृतिक हालचाली व प्रवासाच्या नोंदी आणि खुणा त्यातून प्रतिबिंबित होतात. प्रत्येक प्रान्तातील भाषा, वेषभूषा, रीतीरिवाज जरी भिन्न असले तरी त्यात प्राणभूत एकात्मता आहे.

**चैत्रगौर : प्रकाशवृक्ष सूर्याशी असलेल्या धरतीच्या नात्याचा सत्कार –**

लोकपरंपरांशी जोडलेले उत्सव, सण, व्रते, विधी, तत्संबंधी गाणी, लोककथा, लोकनाट्य आदीतून परस्परांतील साधर्म्य सतत जाणवते. उदा. – रबीची पिके माघ, फाल्गुनात हाती येऊ लागतात. सर्जनाच्या वेदनांनी श्रमलेली धरती विसाव्यासाठी माहेरी येते ती चैत्रात, चैत्र गौरीचे पूजन थोड्या फार फरकाने सर्वत्र साजरे होतो. महाराष्ट्रात चैत्रगौर वद्य तृतीयेला विराजते ती अक्षय्य तृतीयेपर्यंत. राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशांत गणगौर अत्यंन्त थाटात पूजिली जाते.

मातीच्या सुगड्याला रंगवून त्यात माती घालतात. विहिरीचे पाणी समूहाने गाणी म्हणत आणतात आणि त्या सुगड्यात बीज पेरून त्यात ते पाणी विधिपूर्वक शिंपडतात. या कुंड्यांची रोज पूजा केली जाते. समूहाने गाणी गातात. यात विशेषत्वाने सहभाग कुमारिकांचा, नवविवाहित तरुणींचा असतो. उगवत्या धान्याची ही पूजा मातीची सुफलनशक्ती वाढावी यासाठीच असली पाहिजे. ही पूजा महिला एकत्र येऊन करतात. महाराष्ट्रात गौर पाळण्यात बसते. सुगड वा पसरट वेळणीत माती पसरून त्यात बीज पेरतात. अक्षय्यतृतीयेला अंकुरलेल्या धान्याची पाण्यात विधिपूर्वक बोळवण करतात. या काळात स्त्रिया हळदीकुंकवाचा समारंभ करून कैरीचे पन्हे, हरभऱ्याची ओली डाळ प्रसाद म्हणून देतात. चैत्रात उन्हे प्रखर होऊ लागतात. नंतर येणाऱ्या ग्रीष्म वैशाखाच्या कहारात धरती भाजून निघते. पिकांना त्रासदायक असणारे जीवजंतू नष्ट होतात. जमीन भाजल्यामुळे तिची पाणी साठवण्याची क्षमता वाढते. सूर्याला वैश्विक अश्व मानले जाते. सूर्य हा प्रकाशवृक्ष आहे. संसारवृक्षाची निर्मिती त्याच्यामुळेच होते. सूर्यकिरणांतून जणु चैतन्याचे बीज भूमीत पेरले जाते. [3] विश्वातील सर्व रस सूर्य शोषून घेतो. हे रस सूर्यस्थ झाल्यावर तेथील उष्णतेने त्यांचा मधु-पाक होतो. तो वृष्टीच्या रूपाने पृथ्वीवर येतो आणि सर्व धान्य पोसतो, जीवसृष्टीला जीवन देतो. गौरीच्या प्रतीकाद्वारे जणु भूमी, जलतत्त्व आणि सूर्यरूपी बीज तत्त्व या तिहींचा पूजा केली जाते.

**भाद्रपद आश्विन : सर्जनवर्षन शक्तीची आराधना –**

भाद्रपद आश्विनात खरिपाची पिके.... पावसावर पोसली जाणारी पिके तरारून वर आलेली असतात. तर रबीच्या पिकांच्या पेरणीची तयारी सुरू असते. आश्विनात खरिपाचे पीक दुधात येते आणि याच काळात हादगा भुलाबाई, सांझी, नवरात्र, बदकम्मा आदी कुमारिकांचे उत्सव भारतभर साजरे होतात. हे उत्सवही सर्जनशक्तीची आराधना करण्याच्या भूमिकेतून साजरे होत असावेत. जमिनीची उर्वराशक्ती वाढून धान्यलक्ष्मीची वृद्धी व्हावी यासाठी हे उत्सव साजरे केले जातात.

**अन्ननिर्मिती आदिजीवनाची प्रेरणा –**

भारतातील मूळ आदिकालीन संस्कृती शिकार आणि शेतीशी निगडित होती. प्राथमिक अवस्थेतील कृषिजीवी समाजाला भूमी आणि यांच्यातील निर्मिती करणाऱ्या सर्जनशक्तीविषयी, या सामर्थ्याविषयी अपार आकर्षण होते. स्त्री हे

विश्वनिर्मितीचे, सृजनाचे केंद्र आहे. उगम स्थान आहे. तिच्यात अलौकिक आणि विलक्षण यातुशक्ती आहे अशी त्यांची श्रद्धा होती. या विश्वात प्रथम मृत्यूचे साम्राज्य होते. म्हणजे भुकेचे साम्राज्य होते. देवांनाही भुकेचे भय असे. अन्न निर्मिती ही महत्त्वाची प्रेरणा आणि समस्या होती. देवांनी त्रयीविद्येच्या छंद, लय व तालबद्ध साममंत्रांच्या आश्रयाने अन्न प्राप्त करून घेतले. ऐतरेय ब्राह्मणात याची विस्तृत माहिती मिळते. भूक म्हणजेच मृत्यू.

'' न एव इह किचिनाग्र आसीत् मृत्यूना एव इदं

आवृतं आसीत्। अशनायया अशनाया हि मृत्युः''

त्यांनी छंदोगानाने अन्न प्राप्ती करून घेतली व मृत्यूचे भय नष्ट केले. विशिष्ट कामनांच्या परिपूर्तीसाठी कोणत्या छंदाची योजना करावी याची विस्तृत माहिती ऐतरेय ब्राह्मणग्रंथात दिली आहे. या छंदांचा निरनिराळ्या कामनापूर्तीसाठी विनियोग सांगण्यात आला आहे. उदा. बौद्धिक तेज प्राप्तीसाठी गायत्री, पशुधन प्राप्तीसाठी जगती आणि अन्नप्राप्तीसाठी विराज छंदाची योजना आहे. यावरून असे लक्षात येईल की वाणी, छंद, सामगान यात यात्वात्मक सामर्थ्य असते, अशी वैदिकांची श्रद्धा असावी. वैदिकांचे पूर्वजही ईहलोकपर कामनांच्या परिपूर्तीसाठी मंत्रगान करीत.

**व्रतांमधील यात्वात्मक सामर्थ्य : त्यांतील स्त्रीप्रधानता –**

येथील लोकसंस्कृतीचे वैशिष्ट्य हे आहे की, ईहलोकपर कामनांच्या पूर्तीसाठी व्रताचरण करणे. चैत्र, श्रावण, भाद्रपद, आश्विन, पौष आदी महिन्यांतील व्रतांचे सूक्ष्म अवलोकन केल्यास असे लक्षात येते की वरील विधान यथार्थ आहे. रवीन्द्रनाथांचे बंधू अवनीन्द्रनाथ ठाकूर [४] यांनी बंगालमधील व्रतांचे सूक्ष्म निरीक्षण करून अभ्यास केला होता. व्रतांचे वैशिष्ट्य ते पुढील शब्दांत सांगतात.

A Vrata is a just desire. We see it represented in the pictures, listen to its echo in the songs and rhymes, witness it's reactions in the dramas and dances, in short, the Vratas are but desires as sung, the painted desires, desires as among and living.

यात्वात्मक सामर्थ्याने कामनापूर्ती करण्याचे माध्यम म्हणजे व्रत. त्यातील प्रार्थनांत ईश्वरीकृपेचा संबंध नसतो. व्रताचरण हे सामूहिक कर्म असते. प्रार्थनेचे

सामर्थ्य ईश्वर कल्पनेवर अधिष्ठित असते तर व्रतांचे सामर्थ्य हे यात्वात्मक असते. या संदर्भात [५]अवनीन्द्रनाथ नोंदवितात -

The desires of male and desires of female - the vedic Rituals of male and Vratas of the women - that is all the difference of the two.

वैदिक आर्यांचे सामगानयुक्त विधी पुरुषप्रधान आहेत. तर बहुतेक व्रते स्त्रियांनी आचारावयाची असतात. व्रते वेदकालाइतकी प्राचीन असली तरी त्यांचा उगम वैदिक वाङ्मयात आढळत नाही. वैदिक संस्कृतीहून भिन्न अशा लोकसंस्कृतीचे अंतरंग व्रताचरणात प्रतिबिंबित झालेले दिसते.

भारतातील आदिकालीन संस्कृती शिकारीशी आणि शेतीशी निगडित असल्याने प्राथमिक अवस्थेतील कृषिजीवी समाजात भूमी आणि स्त्री यांच्यातील सर्जन करण्याच्या सामर्थ्याविषयी विलक्षण आकर्षण होते आणि या गूढाबद्दल सुप्त भयही होते. स्त्री हे विश्वनिर्मितीचे केन्द्र असून सर्जन करण्याची अलौकिक यातुशक्ती तिच्यातच असते अशी त्यांची धारणा होती. भूमीतून निर्माण होणाऱ्या धान्य व वनस्पतींच्या सर्जनाची प्रक्रिया मंत्रतंत्राच्या आणि सामूहिक विधीच्या सामर्थ्यावर अवलंबून असते असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यातूनच भूमीच्या सुफलीकरणाचे विविध तांत्रिक विधी निर्माण झाले.

शहरी आणि यांत्रिक जीवनापासून दूर असलेल्या आदिवासींच्या उत्सवांचा शोध घेतल्यास वरील विधानातील सत्यता आजमावता येईल.

**आदिवासींच्या देवता : धरती आणि कणसरी –**

आजही आदिवासींच्या उत्सवांचा शोध घेतला असता लक्षात येते की, ते मूलतः सुफलीकरणाशी जोडलेले असतात. कंदमुळे, धान्य देऊन आपली उपजीविका करण्यास मदत करणाऱ्या भूमीबद्दल आणि धान्याबद्दल त्यांच्या मनात कृतज्ञतेची पवित्र भावना असते. धरित्री आणि कणसरी म्हणजे धान्य देवता यांची उपासना बहुतेक आदिवासी जमातीत करतात. नारनदेव म्हणजे पाऊस देव त्याची प्रार्थना करतात. त्यावेळी म्हटले जाणारे नृत्यमय गीत -

६ घेना गायल्यारे आप धरातरी देवा ऽऽ

घेना गायल्यारे आप धरातरे ऽऽ

घेना गायल्यारे आप कणसरी देवा ऽऽ

घेंना गायल्यारे आप कणसरे ऽऽ

महाराष्ट्रातील आदिवासींचे सण भाद्रपद आणि चैत्रात येतात. ते सुफलीकरणाशी जोडलेले असतात. त्या संदर्भात आवश्यकतेनुसार विवेचन पुढे येईलच. भारतातील 'हो' आदिवासी शेतीच्या सुफलीकरणाशी जोडलेले सात धार्मिक सण पाळतात. संथाळांतील हरियारसिम् हा सण याच हेतूने साजरा केला जातो. उत्तर प्रदेशातील भुंइया, कोल, भिंड हे आदिवासी बैगा जातीच्या उपाध्यांकडून शेतीच्या सुफलीकरणाचे विधी करून घेतात. आदिम काळात निसर्गातील विविध चमत्कारांची आव्हाने सामूहिक आराधनेतून स्वीकारली गेली. उदा. - पावसाचे धुवाँधार कोसळणे. पाऊस न पडल्याने पडणारा दुष्काळ, जीव घेणारी तुफानी वादळे असे अनेक निसर्गातील चमत्कार. त्यांचे निराकरण सामूहिक आराधनेतून करण्याचा पायंडा पडला. लौकिक जीवनात या यातुविधींना महत्त्वाचे स्थान होते. त्यात ईश्वर या संकल्पनेला स्थान नव्हते. तर सामूहिक श्रमातून तत्संबंधी विधी करणे व अधकिाधिक फलाची आशा करणे हा यातुविधीमागचा हेतू असे.

७ "Enacting in fantacy the fulfillment of the desired reality"

इष्ट कामनेचे कल्पना सृष्टीत साक्षातीकरण करून, फळ मिळविण्याच्या दृष्टीने वातावरण निर्मिती करणे हे यातुविधींमागील तत्त्व होते. 'सामूहिक कर्म' हे दुसरे तत्त्व. सामूहिक कर्मातून निर्माण होणारा भावनात्मक आवेग यात्वात्मक विधीच्या यशस्वितेमागे असावा. आजही आदिवासी समाजात 'सामूहिक कर्मा' चे अस्तित्त्व आहे. यातुविधींना सुफलीकरण विधींचे रूप प्राप्त झाले ते याच काळात. कुमारिका वा पुत्रवती स्त्रीकडून पेरणी करून घेणे वा झाडे लावून घेणे. पाऊस पडावा यासाठी रात्री शेतात जाऊन नग्न होऊन नृत्य करणे आदी रिवाजांतून अनेक बाबी लक्षात येतात. प्रथमावस्थेतील मानवाने स्त्री आणि भूमी यांच्यातील साधर्म्य आणि साहचर्य याबाबत केलेल्या निरीक्षणाचा अंदाज या वर्षानुवर्षे चालत आलेल्या लोकपरंपरांतून आपल्याला येतो.

### गोपालक वैदिकांनी कृषिजीवनाचा स्वीकार केला –

वैदिकांनी त्यांच्या रीतिरिवाजांचे रोपण भारतात स्थिरावताना केले. मुळात ते गोपालक असले तरी त्यांनीही कृषिजीवनाचा स्वीकार केला. त्यांना कृषिविद्या अवगत होती. ऋग्वेद, अथर्ववेद, यांत कृषिविषयक उल्लेख मोठ्या प्रमाणावर आढळतात. पावसाच्या पाण्यावरची शेती आणि नद्यांना पाट, कालवे काढून केली जाणारी शेती त्यांना माहीत होती. शेती प्रामुख्याने पाण्यावर, पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते याची जाण त्यांना होती. या वास्तवाचे त्यांना भान होते. ऋग्वेद, अर्थर्ववेदात कृषिविषयक उल्लेख आहेत. नांगरलेल्या जमिनीस उर्वरा म्हणत. (मराठी लोकभाषेत भाजीपाला ज्या जमिनीच्या तुकड्यात केला जोतो त्याला 'वावर' म्हणतात.) खणणे, शिंपणे या कर्मांनीयुक्त अशा सुपीक जमिनीस अप्नस्वती म्हणत. सीता, शुनासीर, क्षेत्रपती या शेतीच्या देवतांना उद्देशून ऋग्वेदात सूत्र आहे. तसेच जुगाऱ्यास सल्ला दिला आहे, की फाशांनी द्यूत खेळू नकोस शेती कर.

८ अक्षैर्मा दीव्यःकृषिमित् कृशस्व। (ऋ.१०.३४.१३)

अश्वमेधाच्या वेळी गायल्या जाणाऱ्या वेदगीतातून पुढील आकांक्षा व्यक्त केली आहे.

कृषिर्वृष्टिर्यजमानाय कल्पताम्। (तै.ब्रा.३.१.२)

(अर्थ : यजमानाची शेती सुफल होवो. शेतीस आवश्यक असा पाऊस पडो)

ऋग्वेदात 'यव' या ध्यान्याचा उल्लेख आहे. पुढील संहितातून मात्र व्रीही (तांदूळ), माष (उडिद), मुदग (मूग), तिल (तीळ), गोधूम (गहू), नीवर (तृणधान्ये) यांचा उल्लेख आहे. वैदिक आर्यांची शेती मुख्यत्वे पावसावर अवलंबून होती. ऋग्वेदात पावसाच्या प्रार्थना आहेत. वसिष्ठांचे पर्जन्यसूक्त –

पर्जन्याय प्रगायत दिवस्पुत्राय मिळहुषे।

स नो यवसन्निच्छितु। (७.१०२.१)

(अर्थ : आकाशपुत्रांनो जलवर्षक पर्जन्याची प्रर्थना करा. त्याची स्तुती करा. आम्हाला विपुल धान्य देण्याची त्याला इच्छा होवो.)

### भूमी सुफलित करण्याचे विधी स्त्रीकडे –

भारतातील आदिम समाजाचाही शेती हा प्रमुख उद्योग वा जीवनवृत्ती होती. मात्र जीवनाच्या प्रथमावस्थेत असलेल्या माणसाला निसर्गक्रियांमागचा कार्यकारण भाव उमजलेला नव्हता. निसर्गशक्तींच्या मुळाशी ईश्वरी प्रेरणा असल्याची कल्पना त्याच्या मनात स्फुरलेली नव्हती. मात्र पाऊस पडल्यावर मातीतून हिरवाई बहरते तसेच स्त्रीलाच मूल होते हे त्याला निरीक्षणातून उमजले होते. निश्चित रूपाने लक्षात आले होते. प्राचीन काळी सर्वच देशांतील संस्कृतींत शेतीविषयक विधिविधानात स्त्रीला विशेष महत्त्व होते. 'वेदांतील स्त्रिया' या ग्रंथात डॉ. मधुकर आष्टीकर नमूद करतात की अगस्ती ऋषी हे आळशी होते. त्यांची पत्नी लोपामुद्रा हिने पतीच्या हातात फावडे देऊन त्यांना शेतातील कामात गुंतवले. मुदगलानी ही उत्तम नांगर चालवीत असे. बैलाच्या जागी स्वतःला गुंतवून ती नांगर चालवी. ऋग्वेदातील कृषीशी निगडित देवता 'स्त्री देवता' आहेत. पूर्व वैदिक काळात भूमी सुफलित करण्याचे विधी स्त्रीकडे होते. ज्या स्त्रीत संतती निर्माण करण्याची क्षमता आधिक तिला शेतीच्या कामात विशेष महत्त्व असे. समाजातही ती महत्त्वाची मानली जाई. श्रावण शुक्रवारी पूजिली जाणारी जीवंतिका उर्फ जिवती हे त्याचेच प्रतीक. प्रख्यात मानववंशशास्त्रज्ञ फ्रेझरने अशी अनेक उदाहरणे दिली आहेत उदा. – स्त्रियांनी नग्नावस्थेत नांगरणी, पेरणी करण्याची प्रथा अनेक देशांत होती. पावसाने भूमी सुफलित होते तशी स्त्रीही सुफलित होते अशी श्रद्धा होती. वंध्या स्त्री उघड्यावर पावसात न्हायली तर तिला गर्भधारणा होते असा समज आजही रुढ आहे. प्राथमिक कृषिसमाजात भूमी सुफलित करण्याचे विधी प्रायः स्त्रीकडेच असत. आजही काही ग्रामदेवतांचे पुजारीपण स्त्रीकडे असते. पुरुषाकडे असल्यास त्याला स्त्रीवेश धारण करावा लागतो. आर्यांच्या कृषिदेवता स्त्रीरूपीच आहेत. उदा. – उर्वरा, सीता, यजा, अनघा, अरदा, भूती, समा इत्यादी. या कृषिदेवता गोभिल व पारस्कर सूत्रात सांगितल्या आहेत. वास्तविक पाहता वैदिक आर्यांची जीवन पद्धती पुरुषप्रधान होती. त्यांच्या जीवनपद्धतीत पुरुष या संकल्पनेला विशेष महत्त्व होते. वैदिकांच्या कृषिदेवता स्त्रीरूपी असल्या तरी उषस्‌चा अपवाद वगळता महत्त्वाच्या सर्व देवता पुरुषरूपी होत्या. मात्र कृषिदेवता स्त्रीरूपी होत्या. आजही काही शेतकरी शेताचा एक तुकडा कापणी न करता ठेवतात. त्याचा उपयोग वाटेचा वाटसरू, गुरे यांच्यासाठी केला जातो. त्या तुकड्यात कोकणात सीतादेवी किंवा शीतलादेवी म्हणतात. कापणी

करताना शेवटच्या पेंढीस लक्ष्मी मानले जाते. शेतकरी समाजाची श्रद्धा आहे की शेवटच्या मुठीत धान्यलक्ष्मीचे सार असते. खळे केल्यावर खाली उरलेल्या धान्यास 'मातर' म्हणतात. ते फेकत नाहीत त्यातही लक्ष्मी असते. शेवटच्या पेंढीला सीतादेवी म्हणतात.

ऋग्वेदात भूमीरूपी देवता सीता हिची प्रार्थना केली आहे.

अर्वाची सुभगे भव सीते वन्दामहे

यथा नः सुभगाससि यथा नः सुफलाससि ॥

(अर्थ : भाग्यशालिनी सीते इकडे आगमन कर. आम्ही तुला वंदन करतो. कारण तेणे करून तू आम्हाला भाग्यदायिनी होतेस.)

**संघर्ष स्वीकार आणि समन्वय –**

बीजाचे महत्त्व कळल्यानंतर पितृपूजेला सुरूवात झाली असावी. एका विशिष्ट काळानंतर जगभरच्या प्राचीन संस्कृतीत दैवी दाम्पत्ये निर्माण झालेली दिसतात. इजिप्तमधील इसिस आणि होरस, ग्रीसमधील ही आणि इयुस, आशिया मायनरमधील सिबिली आणि अँटिस भारतातील शिव आणि गौरी तसेच विष्णु आणि लक्ष्मी. आर्यांपूर्वीचे एतद्देशीय लिंग व योनिपूजक होते. आर्यांना लिंगपूजा मान्य नव्हती. ते त्यांची 'शिश्नपूजक' म्हणून हेटाळणी करीत. लिंग हे सर्जनाचे व सुफलीकरणाचे महत्त्वाचे प्रतीक मानले जाई. विष्णु ही देवतासुद्धा लिंगस्वरूपी असावी असे मानले जाते. विष्णु हे वृषाणिन्‌चे रूप असावे असे रा.द.रानडे 'वैदिक देवतांचे अभिनव दर्शन' यात मांडतात. लिंग आणि योनी संभोगाशिवाय सर्जन अशक्य आहे. हे लक्षात घेऊन वैदिकांनी शिवलिंग पूजेचा स्वीकार केला. भारताची सांस्कृतिक वाटचाल पाहता असे लक्षात येते की, संघर्ष, स्वीकार आणि समन्वय या तीन प्रक्रियांच्या अव्याहत चलनातून येथील संस्कृतीची जडणघडण झालेली आहे. काही देवतांचे रूपान्तर झाले. तर काहीचे उन्नयन झाले व त्या जनमानसात स्थिरावल्या. वृषाणिन् या लिंगरूप असलेल्या विष्णूचे आजच्या विष्णूत रूपान्तर झाले. लोक संस्कृतीतील रूद्र देवता जी गुप्तपणे चोरी करणारी, वाटसरूंना लुटणारी, शत्रूवर बाण टाकणारी अशी, तर कधी 'दिशांचा अधिपती', पशूंचे पालन करणारी, यज्ञोपवित धारण करून गुणसंपन्न लोकांचे प्रतिपालन करणारी. अशी परस्परविरोधी सूक्ते यजुर्वेदात आहेत. या रुद्राचे पुढे उन्नयन होउन तो शिवात परिवर्तीत झाला।

असे मानले जाते. या बदलाचे मुख्य कारण हे आहे की, यजुर्वेदकाळातील समाजरचना कृषिव्यवसायाच्या वृद्धीबरोबर टोळीसंघ (ट्रायबल) व्यवस्थेपासून स्थायिक समाजपद्धतीकडे (सेडेंटरी) वेगाने वाटचाल करीत होती. आर्य, आर्येतर लौकिक समूहांचे संकर वाढत होते. संघर्षाबरोबर स्वीकार आणि समन्वयाची प्रक्रिया सुरू होती. या समन्वयातून एकात्म भारतीयत्वाची जडणघडण होत गेली. आजही ही प्रक्रिया अव्याहतपणे सुरू असून यातूनच भारतीयांची 'एकात्मता' आधिकाधिक दृढ होत जाते.

**दैवी दाम्पत्ये : वैशिष्ट्ये –**

वैदिक धर्म पुरुषप्रधान असल्याने प्रत्येक क्षेत्रात पुरुषांचे महत्त्व वाढत गेले. आज या धर्मात देवीची उपासना पुरुषदैवताची पत्नी म्हणून केली जाते. भारतीय संस्कृतीत शिव आणि गौरी, विष्णू आणि लक्ष्मी ही दोन मान्यवर मिथुने आहेत. मात्र सूक्ष्म निरीक्षणांती असे लक्षात येते की, शिव आणि गौरी यांचा दर्जा समान आहे. ते एकमेकांचे सहकारी आणि सहयोगी आहेत . न पटणाऱ्या बाबीबद्दल निषेध नोंदविण्याचे सामर्थ्य गौरीत आहे. तसेच निर्णयप्रक्रियेत ती सहभागी असल्याचे अनेक मिथक्कथातूंन जाणवते. म्हणूनच पुढे सांख्य तत्त्वज्ञान सांगते 'शक्तीशिवाय शिव हा शवासमान आहे ' तर 'शिवाशिवायची शक्ती अघोरी बनते' अर्थात् नंतरच्या पुराणकाळात उमा किंवा गौरीला दुय्यम स्थान देणाऱ्या कथा रचल्या गेल्या. विष्णुपत्नी लक्ष्मीची मूर्ती कायम त्याचे पाय चुरत असते. दिवाळी दसऱ्यास पूजिल्या जाणाऱ्या श्री किंवा जया यांच्यातील परिपूर्ण सामर्थ्य, पाय चुरणाऱ्या लक्ष्मीत नसते. गणेश वा गणपतीची पत्नी म्हणून सरस्वतीची निश्चिती कालौघात झाली. मात्र समाजाने या संकल्पनेला फारसे स्वीकारले नाही. या दोघांना स्वतंत्र महत्त्व आहे. गणेशोत्सवात सरस्वतीचे पूजन करण्याचा संकेत निर्माण झाला नाही. सरस्वतीला समाजात विद्येची, कलेची देवता म्हणून मान्यता आहे. गणेश हा नर्तक आहे तर सरस्वती ही वादक आहे. या दोन्ही देवता विद्या आणि कलेच्या मानल्या जातात.

**प्राचीन देवतांचे उन्नयन –**

मातृसत्ताक जीवनपद्धतीकडून पितृसत्ताक जीवनपद्धतीकडे समाजाची वाटचाल होत असताना आजच्या पूजनीय देवतांचा जन्म झाला. प्राचीन देवतांचे

उन्नयन झाले. काही देवतांचे एकत्रीकरण होऊन त्यांचे नवे स्वरूप समाजात स्थिर झाले. पूजनीय झाले. आर्यपूर्वांची देवता रूद्र, सिंधु - संस्कृतीत पूजनीय असलेला लिंगस्वरूपी शिश्नदेव, यांच्यातून आजची शिव ऊर्फ शंकर देवता साकारली. मात्र या पूजनीय देवतांचा जन्म स्वयंभू, अयोनिज मानला गेला. सीता नांगराच्या फाळातून तर द्रौपदी यज्ञाच्या वेदीतून निर्माण झाल्या. जी योनी सर्जनाचे उगमस्थान म्हणून सन्माननीय मानली गेली ती पाळीच्या काळात, रजोदर्शनाच्या काळात अपवित्र होते असे मानले जाऊ लागले. जिच्यात यातुशक्ती असते अशी श्रद्धा होती, विश्व सर्जनाची देवता म्हणून पुरातन काळापासून जिची उपासना केली जाई, जिच्यातील सुफलनशक्ती जीवनाला चैतन्य देते, जीवनाचे चक्र प्रवाहित ठेवते अशी धारणा होती त्या योनीरूप देवतेची प्रतिष्ठा समाजातून हळूहळू कमी होत गेली.

विश्वाचा विस्तार, त्यात सातत्याने होणारे परिवर्तन हा कुतुहलाचा प्रश्न मानवी मनासमोर आदिम काळापासून होता, आहे आणि पुढेही राहील. आपल्या बुद्धीनुसार आणि अनुभवानुसार या विश्वाचे कोडे उलगडण्याचा प्रयत्न तो सातत्याने करीत आहे. कधी कधी ही उत्तरे आपल्याला सापडली असे त्यास वाटते. लिंगपूजा हे जगाच्या प्राथमिक अवस्थेतील माणसाने जगाचे कोडे सोडविण्याच्या प्रयत्नात शोधलेले एक उत्तर आहे. ज्या क्रियेतून यच्चयावत् प्राणिमात्रांची उत्पत्ती होते त्या मैथुनक्रियेला आदिम माणसाने गर्ह्य मानले नाही. जननेंद्रियाला घृणास्पद वा वासनेने लडबडलेले इन्द्रिय मानले नाही. जगत् निर्माण करणाऱ्या सृजनाची प्रेरणा असणाऱ्या जगत्-पितरांची [१] लिंग व योनीच्या स्वरूपात त्याने पूजा केली. महाशाक्त कवी कालिदासाच्या शब्दात सांगायचे तर असे -

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थ प्रतिपत्तये ।

जगतः पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ ॥

शिवलिंग हे योनी व लिंग यांच्या संपृक्ततेचे..... एकात्मतेचे प्रतीक आहे. ते आजही सन्मानपूर्वक पूजिले जाते. शिवलिंग हे सुफलतेचे प्रतीक आहे. हा मूलबंध लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**भारतीय संस्कृतीचा इतिहास हा समाजनिर्मितीचा इतिहास –**

भारतीय संस्कृतीचा इतिहास हा समाजनिर्मितीचा इतिहास आहे. दास, दस्यू, पणीन्, आर्य, द्रविड, नाग आदी अनेक टोळ्यांच्या संघर्ष-समन्वयातून येथील समाज सुसंघटित होत गेला. ज्यांचे जवळ आधिक चांगली शस्त्रे होती ते जेते बनले. शस्त्र, शास्त्र, धर्म, तराजू यांच्या बळावर भारतात स्थिर झालेली ही सारी माणसेच होती. भारताच्या भौगोलिक रचनेने त्यांच्यातील माणुसकी सतत जपली. वैदिक आणि लौकिक या दोन धारा समान्तरपणे समाजाला कवेत घेऊन वाहत राहिल्या. वैदिकांचे देव निसर्गातील श्रेष्ठ शक्तींची प्रतीके आहेत. उदा. – वरुण, अग्नी, उषस् इत्यादी निसर्गातील श्रेष्ठ शक्ती पाहून त्यांच्याबद्दल भीती आश्चर्य, आदर, कृतज्ञता इत्यादी भावना त्यांच्या मनात निर्माण झाल्या असाव्यात. त्यातून त्या श्रेष्ठ शक्तीला 'हवी ' देऊन प्रसन्न करता येते ही कल्पना स्फुरली. तीच वैदिकांच्या देवता आणि पूजा पद्धतीच्या मुळाशी आहे. लौकिकांची दैवतकल्पना अधिक आदिम आणि निसर्गात आढळून येणाऱ्या प्रजनन वा सर्जन प्रक्रियेशी जोडलेली आहे. कारण त्यातून 'वृद्धी' होते. या दोन्ही धारांनी एकमेकांच्या दैवतांचा, विधींचा कालौघात स्वीकार केला. या धारांच्या दोनही अनुबंधातून एक नवी संस्कृती निर्माण झाली. काही देवता समाजातून लोप पावल्या, काहीचे रूपान्तर झाले, काहीचे उन्नयन होऊन नव्या स्वरूपात स्थिरावल्या. एकाहून अधिक देवतांचे एकत्रीकरण होऊन काही दैवते स्थिरावली. उदा. दत्तात्रय. या दोनही धारांतले अनुबंधात्मक नाते लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**भारताची भौगोलिक रचना एकात्मतेसाठी अनुकूल –**

भारताची भौगोलिक रचना एकात्मतेच्या वाढील नेहमीच अनुकूल राहिली. पूर्व, पश्चिम आणि दक्षिणेला सागारांची सीमा तर उत्तरेला पूर्व पश्चिम पसरलेला महाकाय हिमालय, अशा नैसर्गिकदृष्ट्या सुरक्षित अशा सीमा भारताला लाभलेल्या आहेत. निसर्गाच्या विविधतेने आणि समृद्धीने नटलेल्या या महाकाय देशाबद्दल मानवाला नेहमीच आकर्षण वाटले. येथील समृद्धीच्या आकर्षणाने आलेल्या टोळ्या इथेच स्थिरावल्या. या भौगोलिक विशिष्ट वास्तवामुळे या भूभागात राहणारा मानवसमूह सांस्कृतिकदृष्ट्या एकात्म राहू शकला. आजही भारताच्या विविध प्रान्तांतून साजरे होणारे लोकोत्सव मग ते आदिवासी, नागर, ग्रामीण समाजातील लोकसमूहांचे असोत, त्यांचे स्वरूप वरपांगी आणि तपशिलांबाबत काहीसे वेगळे असले तरी

त्यात अंगभूत साम्य आहे. विलक्षण एकात्मता आहे. चारही दिशांनी नैसर्गिक सीमा रेषांनी बंदिस्त असलेल्या या देशातील महाकाय भूभागातील एकात्मता अभूतपूर्व आहे. चकित करणारी आहे. तसेच 'राष्ट्र' या संकल्पनेला चैतन्य देणारी आहे.

**ऋतुचक्र आणि भारतीय सण, उत्सव –**

ऋतुचक्र, त्यानुसार नक्षत्रांची बदलती स्थाने, निसर्गाच्या क्षणोक्षणी बदलणाऱ्या स्वरूपाचे सूक्ष्म आणि सर्वांगीण निरीक्षण करून , तसेच ऋतुचक्राचा मानवी जीवनावर होणारा प्रभाव लक्षात घेऊन विकसित झालेले सण, उत्सव, व्रते, तत्संबंधी गीते त्याचे स्वरूप समानधर्मी राहिले आहे. उदा. - चैत्रातील पाडवा भारतभर साजरा होतो. 'गौरी' चे व्रत सर्वत्र पाळले जाते. बंगालात घर नव्या कोवळ्या पानाफुलांनी सजवितात. सुंदर रांगोळ्या काढतात. देवीचा पाठ वाचला जातो. नवीन तांदळाचे पदार्थ केले जातात. आंध्रात याला 'उगादी' म्हणतात. हा सण जणु नव्याने बहरणाऱ्या निसर्गाच्या स्वागताचाच ! चैत्रात बहरणारा निंबाचा मोहोर, चिंचा आंब्याचा मोहोर वगैरेत गूळ घालून केलेली चटणी, त्यादिवशी सर्व जण खातातच. मध्य प्रदेशातील ठाकूर समाजात चैत्रातही नवरात्र बसविले जाते. पाटावर नऊ धान्याचे नऊ ढीग मांडतात. कलशाची पूजा करतात. नऊ दिवस अखंड ज्योत असते. नव ज्योतींनी देवीची आरती होते. प्रसाद म्हणून साजूक तुपातला शिरा करतात. त्यात काळी मिरी टाकतात. सायंकाळी कुमारिकांची त्यांचे पाय धुऊन पूजा करतात. सिंधी मंडळी या दिवसाला 'चेट्टीचांद' म्हणतात. महाराष्ट्रात गुढी उभारली जाते. कर्नाटकात लिंबाची पाने गरम पाण्यात घालून स्नान करतात. या दिवशी भारद्वाज पक्षी पाहणे शुभ मानले जाते. राजस्थानात कुमारिका गणगौर मांडतात. विवाहानंतर या व्रताचे उद्यापन पाडव्यानंतर केले जाते. गणगौरीतही लिंमडीच्या फांदीला विशेष महत्त्व. चैत्रानंतर सहा महिन्यांनी आश्विन अंगणात येतो. तो थंडीची दुलई घेऊन. आश्विनातले नवरात्र भारतभर साजरे होते. चैत्रात देवीच्या पूजेला महत्त्व तसेच आश्विनातही देवीपूजेला महत्त्व. आश्विन महिन्याला 'क्वार का महिना' म्हणतात. भाद्रपद, आश्विनातील सारे उत्सव आणि व्रते जमिनीची सुफलता वाढावी यासाठी असतात. जमिनीला आकंठ भिजवून टाकणारा, तिला आर्द्रा करणारा पाऊस पडावा, जमिनीत पेरलेले बीज रुजून तरारलेल्या कणसांच्या दाण्यांमधून मधुर अन्नरस पूर्णत्वाने भरावेत ही कामना या सणांच्या व व्रतांच्या मुळाशी असते. अन्न ही जीवनाची प्रेरणा आहे, मूलभूत गरज आहे. म्हणून

कालप्रवाहाच्या ओघात जमिनीच्या सुफलतेशी जोडलेले उत्सव, विधी, व्रते यांचे अवशेष विविध रूपांत अस्तित्त्वात आहेत.

**आदिपर्वातील यातुश्रद्धा आणि समूहश्रद्धा –**

यातुश्रद्धा ही मानवी संस्कृतीची आदिपर्वातील समूह श्रद्धा आहे. जगणे ही सर्वच प्राणिमात्रांची आद्य आणि महत्त्वाची प्रेरणा असते. शरीरधारणेसाठी, जगण्यासाठी अन्न हे आवश्यकच असते. आदिमानवाला अन्नप्राप्तीसाठी, जगण्यासाठी निसर्गाशी सातत्याने झगडावे लागले. स्वतःचे रक्षण करण्यासाठी संघर्ष करावा लागला. त्या गरजेतून संघर्षमय वृत्ती तयार झाली. टोळीअवस्थेत राहणाऱ्या माणसांचे प्रश्न समूहाचे होते. व्यक्तीचे नव्हते. सभोवतालच्या परिस्थितीशी संघर्ष करून तर कधी विविध मार्गांनी त्याला काबूत ठेवून त्याने भौतिक प्रश्नांशी संवाद साधला. वास्तवावर पकड ठेवण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे यातुविधी. जे घडणे वा घडविणे आपल्या हाती नसते. जे घडल्याचे व घडण्यातून झालेल्या आनंदाचे आपण फक्त स्वप्नच पाहू शकतो. त्याहीपेक्षा ते कसे घडेल याचे नाट्यीकरण करून त्यातून होणाऱ्या आनंदाचे प्रत्यक्ष समाधान घेऊ शकतो. अशा कृतीतून ते घडण्याची शक्यता वाढते, अशी श्रद्धा आदिमानवात निर्माण झाली. त्यातूनच यातुविधींचा जन्म झाला. जीवनाकडे सकारात्कम दृष्टिकोनातून पाहण्याची भूमिका आदिम लोकसमूहाने सुरूवातीपासूनच घेतली. प्राथमिक अवस्थेतील कृषिसमाजात निसर्गातील घडामोडीमागील कार्यकारणभाव समजण्याची बौद्धिक झेप नव्हती. त्याकाळात या यातुविधींनाच अपार महत्त्व होते यातुविधींचा समूहमनांवर अपार पगडा होता. समूहजीवनात त्यांचे महत्त्व होते. ते यातुविधी नेमके कसे होते. त्यांचे स्वरूप कसे होते याचे निश्चित ज्ञान होणे आज हजारो वर्षांनंतर अवघड आहे. परंतु जगभराच्या आदीवासींच्या जीवनाचा सूक्ष्म अभ्यास आज केला जातो. त्यातून स्वरूप थोडे फार लक्षात येते. काही निष्कर्ष काढता येतात.

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे माणसाचे मन ! मानवी मन हे एक चमत्कारिक प्रकरण आहे. एकीकडे भविष्यात धाव घेताना ते कुठे तरी मनाच्या तळाशी भूताचे भूत जपत असते आणि वर्तमानावर ते छाया धरून असते. आजही मानवाची प्राथमिक गरज असलेल्या अन्नसमृद्धीशी वर्षनसर्जनाशी जोडलेल्या व्रतोत्सवात

यातुविधींच्या खुणा आढळतात. या खुणांच्या साहाय्याने भारतातील लोकधर्मी संस्कृतीतील प्राणभूत एकात्मतेचा शोध घ्यायचा असेल तर, लोकपंरपरांचे चिकित्सक दृष्टीने निरीक्षण करणे आवश्यक ठरते.

**लोकपरंपरा आणि समूहमन –**

लोकपरंपरेच्या अभ्यासातून प्राचीन काळातील जनसामान्यांच्या जीवनरीतीचा, समूहमनाचा, त्यांच्या मूलभूत भूमिकेचा शोध घेता येतो. लोककथा, लोकगीते आदी लोकसाहित्याची निर्मिती करणारी एक व्यक्ती नसते, विशिष्ट काळ नसतो. ही निर्मिती समष्टीने केलेली असते. त्यात असंख्य अनामिकांनी वेळोवेळी भर घातलेली असते. या वाङ्मयात त्या त्या काळचा ठसा नकळत उमटलेला असतो. लोकसमूहाच्या जगण्याच्या रीतीचा इतिहासच जणु त्यांत नोंदविलेला –गोंदविलेला असतो.

**लोकपरंपरा आणि लोकसाहित्याचा अभ्यास : प्रेरणा –**

लोकपरंपरा आणि लोकसाहित्याच्या अभ्यासाची प्रेरणा गेल्या दीडशे वर्षांपासूनची आहे. कवी रविन्द्रनाथ टागोरांनी जनसामान्यांच्या ओठात आणि हृदयांत परंपरेने गोंदविलेल्या लोकगीतांचा, लोकनाट्याचा, तसेच लोकसंगीतांचा जाणीवपूर्वक अभ्यास करण्याचा पायंडा घातला. जात्रा, कविगान, कीर्तन, पांचाली, कथाकली यांसारख्या लोककलांतून सरलपणे व्यक्त होणाऱ्या आविष्कारांचा शोधक दृष्टीतून सन्मान केला. त्यातील स्वयंभू सौंदर्य समाजासमोर ठेवले. लोककलांतील समूह मनाची शक्ती त्यांना जाणवली होती. रविबाबूंच्या काव्याचा आत्मा लोकसंस्कृतीच्या अभिजात रंगाने रंगला आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

महाराष्ट्रात वि.का. राजवाडे यांनी शंभर वर्षांपूर्वी लोकगीते व लोकपरंपरांचा चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची परंपरा निर्माण केली. भाद्रपद, आश्विनात, हस्त नक्षत्राच्या काळात खेळल्या जाणाऱ्या भोंडला वा हादगा या कुमारिकांच्या उत्सवाचा आणि त्या निमित्ताने गायल्या जाणाऱ्या पारंपरिक लोकगीतांचा शोधक अभ्यास केला. त्यानंतर लोकसाहित्याच्या अभ्यासाची परंपरा निर्माण झाली. अनंत आबाजी देवधरांनी वऱ्हाड... खानदेशात भाद्रपद पौर्णिमेपासून ते आश्विन पौर्णिमेपर्यंत.... कोजागिरी पौर्णिमेपर्यंत मांडल्या जाणाऱ्या भुलाबाईवर

आणि पश्चिम महाराष्ट्रात हस्तनक्षत्राचे सोळा दिवस खेळल्या व मांडल्या जाणाऱ्या हादगा, या कुमारिकांच्या खेळोत्सवावर टिपण लिहिले. गाणी संकलित करून गाण्यांतील शब्दांचा शोध घेतला. मराठी लोकसाहित्याचा आणि लोकपरंपरांचा चिकित्सक आणि मूलभूत दृष्किोनातून अभ्यास करण्याची, विश्वात्मक आणि तुलनात्मक दृष्टीने या परंपरेचा शोध घेण्याची दिशा महाराष्ट्रातील विदुषी मा. दुर्गाताई भागवत यांनी दिली. पुण्याचे डॉ. रा. चिं. ढेरे, मराठवाड्यातील डॉ. प्रभाकर मांडे, खानदेशातील दा. गो. बोरसे, विदर्भातील भाऊ मांडवकर, डॉ. मधुकर वाकोडे, सांगलीच्या डॉ. तारा भवाळकर, नांदेडच्या डॉ. तारा परांजपे, अहमदनगरचे डॉ. गंगाधर मोरजे यांनी ही परंपरा परिपुष्ट केली. लोकसंचिताच्या अभ्यासाला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. लोकसाहित्य मंडळाच्या अध्यक्षा डॉ. सरोजिनी बाबर यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक लोकसाहित्य गोळा करून, अस्सल रूपात संग्रहित करून लोकसाहित्य मंडळामार्फत प्रकाशित केले. अभ्यासासाठी संदर्भ साहित्याचा फार मोठा ठेवा उपलब्ध करून दिला. अनुताई लिमये यांनी लोकगीतांचे संकलन खेड्यापाड्यांत हिंडून केले. सानेगुरूजींनी लोकसाहित्याचे मोल ओळखले होते. आज विधी, विधिगीते, ग्रामपरंपरा, ग्रामदेवता, लोककथांचे, लोकगीतांचे विविध प्रकार, विधी-नाट्य, अभिजात वाङ्मयातून घडणारे लोकसाहित्याचे दर्शन आदी अनेकविध विषयांवर सापेक्ष पद्धतीने विचार करण्याची वृत्ती विकसित होत आहे.

### कृषिलक्ष्मीशी जोडलेले रीतिरिवाज आजही हरवलेले नाहीत –

मानवी संस्कृतीच्या प्रथमावस्थेत कृषिजीवी समाजाने जमिनीची सुफलन शक्ती वाढावी, धनधान्य समृद्धी विपुल प्रमाणात निर्माण व्हावी यासाठी जे विधी, उत्सव, व्रते, सण, रीतीरिवाज निर्माण केले. ते आज २१व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भारतीयांच्या कृषिजीवनातून हरवलेले नाहीत. भूमीची सृजनशक्ती, आकाशातून बरसणारी वर्षनशक्ती, सूर्यापासून मिळणारे तेजोमय चैतन्य या तिन्हीच्या सहयोगातून निर्माण होणारी कृषिलक्ष्मी या सर्वांबद्दलची जवळीक आणि कृतज्ञता, त्या त्या ऋतूंचे संदर्भ, आकाशातील ताऱ्यांची नक्षत्रांची बदलती स्थाने त्यांच्या गणितावर आधारलेल्या लोकपरंपरांतून जाणवते. त्यातील एकात्मतेचा चिकित्सक नजरेने शोध घेण्याची भूमिका या अभ्यासामागे आहे. या लोकपरंपरा केवळ महाराष्ट्रापुरत्या मर्यादित नसून त्या सर्व भारतभर आढळतात. त्यांची

तुलनात्मक पाहणी, तसेच मराठवाड्यातील पाहणीशी उर्वरित महाराष्ट्रातील समानधर्मी लोकपरंपरांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

**अनुबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न –**

जमिनीची सुफलनशक्ती वाढावी यासाठी महाराष्ट्रात विशेष करून मराठवाड्यात साजरे होणारे विधी, सण, व्रते, उत्सव, तत्संबंधी गाणी आदींचे शोधन करून भारतातील उर्वरित प्रांतांतून याच भूमिकेतून साजऱ्या होणारे विधी, सण, उत्सव, व्रते, तत्संबंधी गाणी यांच्यातील अनुबंध शोधण्याचा प्रयत्न या प्रबंधाद्वारे केला जात आहे.


**या शोधामागील भूमिका –**


लोकसाहित्य ही एक स्वतंत्र अभ्यास शाखा आहे. ती समन्वित (Interdisciplinary) आहे. लोकसंस्कृतीशी जोडलेल्या विषयांचा अभ्यास करताना लोकपरंपरेतील सर्व मौखिक वाङ्मय (कथा, गीते, म्हणी, उखाणे इत्यादी) धर्मश्रद्धा, विधी विधाने, लोकभ्रम, रूढी, चालीरीती आदी सर्व घटकांचा त्यात समावेश करावा लागतो. आणि या अभ्यासाला प्रसंगपरत्वे मानववंशशास्त्र, इतिहास, पुरातत्वशास्त्र, भूगोल, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र आदी शास्त्रांची मदत घ्यावी लागते. लोकसाहित्याबद्दलची - Folklore संबंधीची ही व्यापक भूमिका घेऊन हा शोधनिबंध लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भारताला विघटित करणाऱ्या विविध शक्ती बळावत आहेत. अशा वेळी भारतातील अन्नधान्य समृद्धीशी जोडलेल्या विधी व्रतादींमधून जाणवणाऱ्या प्राणभूत एकात्मतेचा शोध घेणे अपरंपार महत्त्वाचे ठरते. भाषा हे एक आत्मप्रगटीकरणाचे प्रभावी माध्यम आहे. परस्पर संवादाचे माध्यम आहे. विविध भाषा बोलता येणे, त्यांचे ज्ञान असणे हे विद्वत्तेचे गमक मानले जाते.

साहित्य, मग ते कोणत्याही भाषेतील असो, समकालीन असो वा लोकसाहित्य असो. साहित्याचा आत्मा एकच. मानवी मनाचे परस्पर भावबंधाचे ते प्रकटन असते. या भाषेविषयींच्या मूलबंधातून आजवर विविध भाषांमधील सामंजस्य जपले गेले. आज मात्र भाषेच्या आधाराने देशाच्या विघटनाचे खेळ मांडले जात आहेत. या भूमीत वाढलेल्या रूजलेल्या विविध धर्मांनी, पंथांनी एकमेकांचा सामंजस्याने

स्वीकार केला. 'समन्वय आणि स्वीकारातून समरसत्व', याचे अद्वितीय उदाहरण म्हणजे भारतीय संस्कृती. विविध टोळ्यांचा संघर्ष जरूर झाला, रक्ताचे पाट वाहिले पण त्यातून समन्वय झाला. पस्परांनी एकमेकांना स्वीकारले, रोटी बेटी व्यवहार झाले आणि एक समिश्र इंद्रधनुषी संस्कृती सतत आकारत गेली. आज मात्र धर्म पंथाच्या नावाने माणसामाणसांत दुही माजवली जात आहे. धर्मांच्या, पंथाच्या, नावाने रक्ताचे पाट वाहत आहेत. अशा वेळी भारतातील सांस्कृतिक एकात्मतेमागील विविध कारणांचा शोध घ्यावा. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या लोकपरंपरांमागची कृतिशील भूमिका शोधावी हा एक हेतू शोधनाच्या मागे आहेच. ही एकात्मता विधी, व्रते, उत्सवांशी संबंधित गीतांतून, प्रतिमांतून, कृतीतून, त्यामागील धारणांतून व्यक्त होते. या शोधनाला त्यांचा आधार आहे.





# सुफलीकरण विधी आणि लोकदेवता

*अन्न : आदिमानवाची समस्या आणि प्रेरणा , आदिमानवाची यातुश्रद्धा समूह जीवनातून, शेतीशी जोडलेल्या आदिम श्रद्धा आजही मनातून जाग्या , सुफलीकरणाशी निगडित दैवते,सुफलीकरणाशी निगडित स्त्री देवता, सुफलीकरणाशी संबंधित पुरुष देवता, आदिमानवाने भूदेवी मातृस्वरूपात पाहिली , भूमीची पूजा, कुंभ : पृथ्वीचे प्रतीक , जिवती : सर्जनशक्ती : जगन्माता, भारतातील देवी उपासनेचे आद्यकेंद्र सिंधू संस्कृती, स्त्री आणि भूमी - (जागतिक अनुबंध), कृषियातुविज्ञान आणि स्त्रीमाहात्म्य , गौरीपूजा : सर्जनाची पूजा , धरणीच्या तीन रूपांची पूजा : नवरात्र, कानबाई , आसरा, धुरपता, काही देवता रानातच राहणाऱ्या, सूर्य आणि पृथ्वी : आदिम युगल , सर्जनप्रक्रियेत बीजाचे महत्त्व, भुलोबा : भांगलोबा : शिराळशेठ, गणपती : सुफलतेचे दैवत, गणपती : एक प्रवास : विघ्नकर्ता ते विघ्नहर्ता, गणसमाज : समूह जीवनाचा पाठ, गणसमाज आणि लोकसत्तेचा अंत : राजसत्तेस प्रारंभ, गणसमाज : मातृसत्ताक ,संघर्ष, समन्वय आणि स्वीकार यातून , एकात्म संस्कृती , मुंजा : शेतीचे रक्षण करणारा जागल्या, सुफलनशक्तीशी जोडलेली दैवते ही ग्रामदैवते.*

---

ग्रामदेवतांच्या संदर्भात मार्शल याने केलेले विवेचन अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते.

[१]She is 'the mother' or 'Great mother' and prototype of power (Prakriti) which developed in to that of shakti. Her representatives are the Gramadevatas, the village goddesses whose names are legion and whose local attributes may vary, but who one and all are personifications of the same power...

Who is the mother of fertility.... There can be no question that they held a pre-eminent position among the national deities, of non Aryan population'.

भूमीच्या सुफलीकरणाशी निगडित व्रते, सण, उत्सव, विधी यांचा अभ्यास करताना वरील विधानाची यथार्थता प्रत्ययाला येते. या संदर्भात भारतीय लोकसंस्कृतीचे मान्यवर अभ्यासक देवीप्रसाद चटर्जी [२] म्हणतात -

More significant is the fact that among the vast masses of the Indian peasantry - that is among those that are no longer living in the tribal society male deities have only secondary position. The deities that have only real grip on the lives of the masses are mostly females... Survival of the tribal past has indeed been an important characteristics of the traditional Indian society.

लोक परंपरांच्या वरील दोन्ही ही अभ्यासकांची मते अत्यंत मूलभूत आणि महत्त्वाची आहेत. सुफलीकरणाशी संबंधित विधीव्रतांचा अभ्यास करताना वरील विधानांची यथार्थता सतत जाणवते.

**अन्न : आदिमानवाची समस्या आणि प्रेरणा -**

धान्यबीज पेरल्यापासून ते कणसातील बीज पक्व होईपर्यंत त्या बीजावर कोणकोणत्या प्रक्रिया होतात याचे कुतूहल आदिम मानवी मनाला जरूर होते. परंतु त्यातील कार्यकारणभाव उलगडून पाहण्याची झेप मानवी बुद्धीने घेतलेली नव्हती. जमीन, पाणी, सूर्य, बीज यांच्यातील अनुक्रमात्मक अनुबंध त्याच्या मनासमोर उलगडलेला नव्हता. अशा काळात मानवी मनाचा भरवसा मंत्र तंत्र सामर्थ्यावर विशेष करून होता. भोवतालच्या वास्तवावर पकड मिळविण्यासाठी समूहमनाची शक्ती, माध्यम म्हणून आदिमानवाने स्वीकारली. समूहमनाची शक्ती, विश्वात्मक यातुशक्ती आपल्या देह माध्यमातून कृतिशील करणे आणि इष्ट सिद्धी घडवून आणणे यावर आदिमानवाची श्रद्धा होती. यातूनच सर्व यातुविधी निर्माण झाले. अन्न ही आदिमानवाची महत्त्वाची समस्या व प्रेरणा असल्यामुळे आदिम काळातील यातुविधी कृषी विधानाशी जोडलेले आहेत.

'सुफलीकरण' संकल्पनेशी निगडित लोकदेवतांचा शोध घेण्यापूर्वी ही लोकदैवते ज्या कथांच्या माध्यमातून आपल्यापर्यंत येतात त्यामागील परंपरेचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरेल. भाषेचा शोध लागल्यानंतर माणूस स्वतःला अभिव्यक्त करू लागला. त्यातूनच त्याला ज्या नैसर्गिक घडामोडींबद्दल विलक्षण आणि अपार कुतुहल होते, त्यांचे वर्णन.... व्याख्या करण्यास समर्थ झाला आणि हे वर्णन आणि व्याख्या 'दैवतकथां' च्या रूपात व्यक्त झाल्या. [३]ऐण्ड्र्यूलँग च्या मते दैवतकथांमधून मानवी विकासाच्या इतिहासाचा आलेख कळतो. किंबहुना तो मानवी विकासाचा इतिहासच आहे.

जेव्हा प्राचीन जीवनव्यवस्था वा धर्म जीर्णशीर्ण होऊन, नवीन नियमांवर आधारित धर्म त्याची जागा घेऊ लागतो तेव्हा आदिम दैवतकथा या परिकथा आणि दन्तकथा बनतात. सर्वात जुन्या आणि महत्त्वाच्या दैवतकथा सृष्टिउत्पत्ती, नक्षत्रे यांच्याशी संबंधित आहेत.

अन्न ही मानवी जीवनातील सर्वात महत्त्वाची समस्या आणि गरज होती. अन्नाची निर्मिती सृष्टीतून... धरणीतून होते. तर त्या निर्मितीसाठी पाऊस आवश्यक. तसेच सूर्याची ऊर्जा जीवनावश्यक. त्यामुळे या तीन निसर्ग शक्तींवरील दैवतकथा आधिक्याने आहेत. या संदर्भात भारतीय लोकसाहित्याच्या मान्यवर अभ्यासक [४]दुर्गा भागवत म्हणतात, अतिप्राचीन नक्षत्रकथांचा शोध घेताना असे लक्षात येते की जगात 'कृत्तिका' या वर्षाऋतुशी निगडित नक्षत्राच्या कथाच उपलब्ध आहेत. वर्षनाशिवाय सर्जन संभवत नाही याची खात्री आदिमलोकसमूहाला झाली होती. हे यातून लक्षात येते.

**आदिमानवाची यातुश्रद्धा समूह जीवनातून –**

जीवननिर्वाहासाठी सातत्याने झगडणारा माणूस बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत होता. विविध तऱ्हेचे शोध लावून त्याने निसर्गातील शक्तींवर मात करण्याचा सतत प्रयत्न केला. शत्रूंवर मात करण्यासाठी अधिकाधिक वेगवान आणि तीक्ष्ण हत्यारे, रोगांवर मात करणारी औषधे इत्यादी नवनवीन शोध त्याने लावले. मात्र निसर्गावर पूर्ण ताबा मिळविणे त्याला शक्य झाले नाही. अनपेक्षित अशा संकटांनी तो चक्रावून जाई. या सर्वांचे निरीक्षण करून त्याची दृढ श्रद्धा झाली की, मानवी जीवनात आणि निसर्गात ज्या अनपेक्षित, अनाकलनीय, संहारक वा सुखकर घटना

घडतात, त्याचा कर्ता करविता कोणी तरी असला पाहिजे. मानवाच्या संपूर्ण व्यवहारावर नियंत्रण ठेवणारी, चराचरावर स्वामित्त्व गाजविणारी एक अद्‌भुत आणि विराट अशी शक्ती असली पाहिजे अशी प्रगाढ श्रद्धा त्याच्या मनात आकारली. मुळात मानवी प्रवृत्ती समन्वय साधण्याची. त्यामुळे या दिव्य शक्तीशी तडजोड साधली पाहिजे असे त्याला वाटू लागले आणि त्यातूनच धर्म ही संकल्पना उदयाला आली.

प्रोफेसर बॅलार्ड म्हणतात -

Religion is a process of adjustment to the intangible, unseen, unknown and uncontrolled forces believed to be present in social situation.

अशी ही धर्मसंकल्पना निर्माण होण्यापूर्वीची अवस्था ही यातुश्रद्धेची (Magical faith) होती. यातुश्रद्धा ही मानवी संस्कृतीच्या आदिपर्वातील समूहश्रद्धा आहे. या समग्र सृष्टीत एक यातु (जादू).... एक अनाकलनीय शक्ती व्यापून राहिली आहे. समूहाने विशिष्ट पद्धतीने या शक्तीस आव्हान केले तर, ती शक्ती, ते द्रव्य शरीराश्रयी होऊन इष्ट कार्य घडवून आणते, अशी आदिकालीन समूहमनाची ठाम श्रद्धा होती. तो काळ असा होता की ज्यात 'मी' जन्माला आलेला नव्हता.

५ सं गच्छध्वं, सं वदध्वं, सं वो मनांसि जानताम्<br>
देवा भागं यथापूर्वे संजनाना उपासते ॥<br>
समानी व आकूती समाना हृदयानिव<br>
समानमस्तु वो मनो यथा वा सुसहासती....॥ (१०.१९१.२-४)

ही समूह भावना व्यक्ती मनातून होती. समूह कर्मातून निर्माण होणारा भावनात्मक आवेग यात्वात्मक विधीच्या यशस्वितेचे कारण असावा असे आदिमानवास वाटत असावे.

**शेतीशी जोडलेल्या आदिम श्रद्धा आजही मनातून जाग्या -**

शेतीच्या विकासाबरोबर शेतीतून अधिकाधिक पीक काढण्यासाठी त्याने तंत्र विकसित केले. पाण्याचा योग्य वापर व विविध प्रकारची खते वापरल्यास शेतात भरपूर पीक येते हे त्यांच्या लक्षात आले होते. तरीही वेळेवर पडणारा पाऊस,

सूर्याचे तेज आणि भूमीतील उर्वराशक्ती यांच्यावर आपण ताबा मिळवू शकत नाही हे त्याने अनुभवातून जाणले होते. कौटिल्याने त्याच्या ग्रंथात खतांचे विविध प्रकार वर्णिले आहेत. तरीही पेरणी समंत्रक करावी असे तो ठासून सांगतो. शेती हा व्यवसाय अन्नाशी, उपजीविकेशी जोडलेला आहे. आदिमानवाने अन्नाला अपार महत्त्व दिले. कारण ते त्यांचे जगणे होते. त्यामुळे हा व्यवसाय लोक संस्कृतीचा अंगभूत घटक आहे. आदिम काळात निर्माण झालेल्या श्रद्धा बदलत्या काळातही पूर्णपणे नाहीशा झाल्या नाहीत. आज २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भारतीय कृषिसमाजात या श्रद्धेचे अस्तित्त्व विविध सण उत्सव विधी, व्रते तत्संबंधी गाणी यात दडले असल्याचे सतत जाणवत राहते.

महाराष्ट्रातील भिल्ल, ठाकूर, पावरा आदिवासी जमाती पेरणीपूर्वी विधी करतात. शेतकरी समाजातही पेरणी, काढणीपूर्वी म्हसोबाला वा आसरांना मद्यमांसांचा नैवेद्य दिला जातो. किमान नारळ फोडला जातो. मंत्रतंत्रात्मक आचरण केले जाते. भारतातील नागर आणि ग्रामीण,उच्चवर्णीय समजल्या जाणाऱ्या समाजात श्रद्धापूर्वक साजऱ्या केल्या जाणाऱ्या गौरीगणपती, चैत्रगौर, हरितालिका, लक्ष्म्या, शाकंभरी नवरात्र, ऋषिपंचमी, चंपाषष्ठी आदी व्रतांचा संबंध वनस्पतीसृष्टीच्या सुफलीकरणाशी आहे. प्राचीन वाङ्मयात याला भरपूर आधार सापडतात.

**सुफलीकरणाशी निगडित दैवते –**

सुफलीकरणाशी संबंधित विधीव्रते सण उत्सव यांचे शोधन करताना त्यांच्याशी निगडित दैवतांचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरते. ही दैवते का, कशी व केव्हा निर्माण झाली, त्यांच्यात काळानुरूप कसे बदल घडत गेले ते का घडत गेले, या बाबींचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

भारतात दास, दस्यु, पणिन्, द्रविड, आर्य, असुर आदी अनेक टोळ्या स्थिरावल्या. भारतात स्थिर झालेल्या सर्वच समाजांना रानटी अवस्थेचा भूतकाळ होता. त्यांचे स्वतःचे असे आचार विचार होते. दैवतकल्पना होत्या. अर्थात हे सर्व प्राथमिक स्वरूपात होते. त्यातून पुढे वैदिक आणि लोक या संस्कृती निर्माण झाल्या. सर्वांच्या संयोगातून एक वैविध्यपूर्ण, आगळीवेगळी परंतु एकसंध अशी भारतीय संस्कृती निर्माण झाली. सुफलीकरणाशी निगडित अशी व्रते, विधी, आचार, दैवते, उत्सव यांचे दर्शन आजही या संस्कृतीतून आपल्याला दृगोचर होते. भारतीय समाज

कृषिजीवी होता आजही आहे. आजही मराठवाड्यातील ८०% टक्के समाज शेतीवर अवलंबून असलेला आहे. ही टक्केवारी उर्वरित महाराष्ट्रापेक्षा आधिक आहे. मराठवाड्यात कृषिजीवनाशी एकरूप झालेले, सुफलीकरण करण्याच्या भूमिकेतून निर्माण झालेले विधी, व्रते, सण, अधिक श्रद्धेने पाळले जातात.

**अ) सुफलीकरणाशी निगडित स्त्री देवता –**

गौरी, पृथ्वी, लक्ष्मी, इला, इनाई, भुलाबाई, धुरपा, जिवंतिका, सप्तमातृका, आसरा, कानबाई आदी अनेक. ही सर्व मूलतः भूदेवीची रूपे आहेत.

**ब) सुफलीकरणाशी संबंधित पुरुष देवता –**

म्हसोबा, भुलोबा, भांगलोबा, नागोबा, शिराळशेठ, गणपती, शिव, मुंजा, सविता उर्फ सूर्य.

**आदिमानवाने भूदेवी मातृस्वरूपात पाहिली –**

प्राचीन मानवाने विश्वजननीची विविध रूपे कल्पिली. ती निसर्गाच्या निरीक्षणांतूनच. जी शक्ती अर्भकाला जन्म देते तीच शक्ती भूमीतून नवा अंकुर निर्माण करते हे त्याने निरीक्षिले. या निरीक्षणातून त्याने भूमी व स्त्री यांना वंद्य आणि एकरूप मानले. भूदेवीची विविध रूपातून, विविध प्रसंगाने जी पूजा केली जाते, त्या मागे तिच्यातील सर्जन क्षमता वाढावी ही कामना असते. आदिमानवाने भूदेवीचे रूप मातृस्वरूपात पाहिले. मात्र हे मातृस्वरूप त्याने तीन रूपात कल्पिले.

१. जगाला जन्म देणारी जगन्माता,

२. अन्नौषधी निर्माण करून संपूर्ण जगावर ममत्वाचा हात फिरवणारी गौरी उर्फ लक्ष्मी,

३. दुष्ट शक्तींचा संहार करणारी परंतु प्रसंगी विविध रोग, दुष्काळ पसरवून प्रजेचा संहार करणारी उग्रचंडिका वा काली.

भूदेवीची विविध रूपे सुफलीकरणाशी निगडित अशा व्रतांतून येतात. उदा. - गौरी, लक्ष्मी, जिवती, कानबाई, शीतलादेवी, धुरपा, यल्लम्मा, इला आसरा इत्यादी अनेक. ही दैवते शेतीनिष्ठ समाजात..... (महाराष्टातील ६५% समाज शेतीशी जोडलेला आहे, आज विसाव्या शतकाच्या अखेरीस मराठवाड्यात हे प्रमाण ८०% आहे) विशेष श्रद्धेने पूजिली जातात.

**भूमीची पूजा –**

मानवी जीवनाचा विकास शेतीच्या जोडीने झाला. अन्न ही जीवनाची महत्त्वाची प्रेरणा होती. अन्न निर्माण करणाऱ्या भूमीची उपासना आणि पूजा प्राचीन कृषिजीवी समाजाने विविध रूपांतून केली. मृदुमुलायम रेणूंनी बनलेले वारूळ हे भूमीची योनी मानले जाते. रेणू म्हणजे मातीचा कण. मातीच्या कणांतून साकारलेली 'रेणुका' म्हणजे भूमी वा पृथ्वी. वारूळाच्या मातीला कोरी-भूमी [६]म्हणजे कुमारी भूमी असे म्हटले जाते. वारूळाची माती अत्यंत सुफल असते अशी श्रद्धा आजही शेतकरी समाजात आहे.

नवरात्रात वारूळाची माती दुसऱ्या मातीत मिसळून त्यात बीज पेरले जाते. पेरणीपूर्वी वारूळाची माती आणून ती शेतात शिंपडण्याचा रिवाज आहे. शेतातील वारूळे सहसा मोडीत नाहीत. वारूळात नाग राहतात. नाग हा भूमीचा रक्षक मानला जातो. नागपंचमीला वारूळाची म्हणजेच भूमीची पूजा केली जाते. भूमीची गर्भधारणेची आणि जीवनसर्जनाची अपार क्षमता ध्यानी घेऊन तिला 'उत्तानामही' या शब्दांनी गौरविले आहे. सर्जनाच्या सोहळ्यात साथीदार म्हणून पृथ्वीने पुरुषतत्त्वाला कधी सूर्य म्हणून, कधी अश्व म्हणून, कधी नाग म्हणून, कधी वृषभ म्हणून तर कधी गजाकार मेघ म्हणून स्वीकारले. भारतीय संस्कृतीने या क्षमेला आदिकालापासून वंदनीय मानले आहे. सकाळी उठल्यावर धरणीला पदस्पर्श करताना भारतीय मन सहजपणे म्हणते –

> समुद्रवसने पृथ्वी पर्वतःस्तन मंडले।
> विष्णुपत्नी नमःस्तुभ्यं पाद स्पर्श क्षमस्व में।

भारतात, महाराष्ट्रात पृथ्वीची..... अनेक स्थाने आहे. माहूर[७] झरी हे वाकाटक राजांच्या काळात मातृपूर आणि पृथ्वीपूर या नावाने प्रसिद्ध असून ते पृथ्वी मातेच्या अथवा रेणुकेच्या उपासनेचे जागते केंद्र होते. भारतभर नागपंचमीला नागपूजा केली जाते. मात्र महाराष्ट्रात नागपंचमीस शेतात जाऊन स्त्रिया वारूळाची सामूहिक पूजा करतात. नाग हा पुरुषतत्त्वाचा प्रतिनिधी आहे. मूळ पूजा भूमीचीच. गोव्यातील सांतेरी ही भूमिका या पर्यायी नावाने ओळखली जाते. वारूळाची माती सर्वात सुफल.... कोरीभूमी..... कुमारी भूमी मानतात. कुमारिका, जिच्यात बीज अद्याप पेरलेले नाही, ती सुफल होण्याच्या शक्तीने ओतप्रोत भारलेली असते ही श्रद्धा मानवी विकासक्रमात दृढ झाली. आज सुफलीकरणाशी जोडलेल्या व्रतांत

कुमारिकांना विशेष महत्त्व असते. नवरात्रात कुमारिकांची पूजा केली जाते. सवाष्णीबरोबर एक कुमारिका सन्मानित करण्याची परंपरा अनेक व्रतांतून असते.

**कुंभ : पृथ्वीचे प्रतीक –**

भूमीच्या सुफलन शक्तीच्या वृद्धीसाठी केल्या जाणाऱ्या व्रतांत, दैवतांच्या पूजेत कुंभाला विशेष स्थान असते. भारतीय संस्कारात कुंभाचे स्थान महत्त्वाचे आहे. जन्म, विवाह, मृत्यू यांचेशी जोडलेल्या संस्कारात कुंभ महत्त्वाचा असतो. कुंभ[८] ही संज्ञा पृथ्वीशी संबंधित आहे. कुं म्हणजे पृथ्वी. पृथ्वी द्रव्याने युक्त तो कुंभ. इळा आवसेला खास करून केली जाणारी आंबील विधिपूर्वक रंगवलेल्या मडक्यातून शेतात नेतात. भारतीय परंपरेत पूर्णकुंभ वा पूर्णघट या प्रतीकाला सर्जकता, समृद्धी आणि शुभता यांचा कारक असल्याची प्रतिष्ठा लाभली आहे. कुंभ हा मातृरूप.... भूमीरूप मानला जातो.

**जिवती : सर्जनशक्ती : जगन्माता –**

जगाची निर्मिती करणारी शक्ती. साक्षात सर्जनशक्ती ती जगन्माता. श्रावणात दर शुक्रवारी जिवंतिकेची पूजा केली जाते. जिवती हे भूमीचे सर्जक रूप आहे. अन्नधान्य, पशुसमृद्धी देणारी देवता गौरी आणि लक्ष्मी. दोघी एकरूपच आहेत. त्या अन्नसमृद्धी निर्माण करतात. त्या भूमातेचे रूप आहेत. विश्वाचा संहार करणारी ती रोग देवता. काली वा चंडिका. अर्थात् ही विश्वाचा संहार करणाऱ्या दृढ शक्तींचाही संहार करते. काली ही तिचे उन्नयन झालेले रूप आहे. मुळात महामाता निर्ऋती ही सर्जन आणि मरण दोहोंची देवता आहे. वैदिकांची धारणा होती की, या दोनही अदभुत घटनांचा तिच्या उदराशी संबंध आहे. त्यावर तिची अधिसत्ता आहे.

'इयं पृथ्वी वै निर्ऋतीः '[९]

'पुनरपि जननं पुनरपि मरणं, पुनरपि जननी जठरे शयनम्।' ही सृष्टी मातृरूप आणि मृत्युरूप पृथ्वीच्या गर्भाशयात येरझारा घालीत राहते. तिचे सर्जक रूप गौरीच्या रूपात पूजिले जाते, तर संहाररूप कालीच्या रूपात पूजिले जाते. या विविध रूपातील मातृपूजा जगाच्या पाठीवर प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे.

**भारतातील देवी उपासनेचे आद्य केंद्र सिंधू संस्कृती –**

भारतातील देवी उपासनेचे आद्य केन्द्र सिंधू संस्कृती हे होते. हा समाज देवी

उपासक होता. तो लिंगयोनी रूपाने देवतांची पूजा करी. तेथील उत्खननात सापडलेली एक महत्त्वाची मुद्रा अशी, खाली डोके, वर फाकलेले पाय, अशा स्त्रीच्या योनीतून एक वनस्पती उगवली आहे. विश्वातील जिवांचे भरणपोषण करणारी वनस्पतीसृष्टी भूमातेच्या.... जगन्मातेच्या देहातूनच संभवते हे या प्रतिमेतून सूचित होते. मार्कंडेय पुराणातील देवीमाहात्म्यात देवी पुढील उद्गार काढते - 'हे देव हो जीवनावश्यक अशा वनस्पतीसृष्टीच्या साहाय्याने मी सर्व विश्वाचे धारण-पोषण करीन, पर्जन्यकालात ही वनस्पतीसृष्टी माझ्या देहातून उत्पन्न होईल 'आत्मदेह समुद्भव' त्यामुळे मला शाकांबरी हे नाव प्राप्त होईल या उद्गारातून भूमाता आणि जगन्माता यांच्यातील साम्य नेमकेपणाने व्यक्त होते.

प्राचीन काळी जेव्हा भौतिक ज्ञानाचा पूर्णपणे अभाव होता तेव्हा निसर्ग आणि स्त्री यांच्या सुफलीकरण प्रक्रियेचे प्राथमिक मानवाने जे मंत्रतंत्रात्मक शास्त्र तयार केले, ते त्याच्या प्राथमिक अवस्थेतील अप्रगल्भ अशा विचार शक्तीशी सुसंगत असे आहे. स्त्री आणि भूमी यांच्या साधर्म्यातून कृषि यातुविज्ञान निर्माण झाले. या यातुविज्ञानाने मानवी संस्कृतीच्या इतिहासातील फारमोठा कालखंड व्यापून टाकला आहे. भारतातील मातृदेवतांचा, तसेच आजच्या कृषिधर्मातील विविध व्रते, सण, उत्सव आदींचा विचार करताना यातुविज्ञानाचा स्वतंत्रपणे विचार करावा लागतो. कारण जगभरच्या मानवी कल्पनासृष्टीत, श्रद्धाविश्वात स्त्री आणि भूमी यांचे साम्य सुनिश्चित आहे. स्त्रीला 'क्षेत्र' ही संज्ञा दिली जाते.

क्षेत्रभूता स्मृता नारी बीजभूतः स्मृतः पुंमान्।

**स्त्री आणि भूमी – (जागतिक अनुबंध)**

निरनिराळ्या धार्मिक विधींत, विशेषतः सुफलीकरण विधींत भूमी आणि भूमीतून उगवणाऱ्या वनस्पती यांचा स्त्रीशी संबंध येऊ दिला जातो. विविध धान्ये तऱ्हेतऱ्हेच्या पत्री, फुले, दुर्वांकुर हरितवस्त्र हे सुफलीकरण विधीचे घटक आहेत. भूमीच्या सर्जनक्षमतेचे स्त्रीवर केलेले प्रोक्षेपण या विधीतून जाणवते. उदा. - मंगळागौरीसाठी २१ प्रकारची पाने तऱ्हेतऱ्हेची फुले लागतात, लक्ष्म्यांसाठी धान्याच्या राशी मांडतात. हादग्यात रोज धान्यानी हत्ती रेखाटला जातो. श्रावण सोमवारी शिवामूठ दरवेळी वेगळ्या धान्याची वाहतात. नवरात्र, चैत्रात भूमीत मिश्रित धान्य पेरून अंकुरांची पूजा केली जाते. यातून असे लक्षांत येते की विविध विधींच्या माध्यमातून

आदिमानवाने स्त्रीरूपी-भूरूपी विश्वजननीची पूजा केली. अन्नधान्याची विपुलता, भरपूर धनधान्य निर्मिती, भरपूर व सदृढ संतती, हेच सर्व धर्मांतील देवी उपासनेचे प्रमुख प्रयोजन होते. जगातील सामान्यपणे सर्व समाजात भूमी देवता महामातेच्या, जगन्मातेच्या रूपात अवतरतांना दिसते. इंग्लंडमधील समाजव्यवस्था पुरुषप्रधान आहे. परंतु एकेकाळी तेथेही दैवतविकल्पनात महामातेला महत्त्व होते. गॅलिक लोक, सर्व देवता 'दानु' नामक भूमातेपासून निर्माण झाल्या असे मानतात. हिचाच दुसरा अवतार म्हणजे ब्रिटिश लोकांची महान भूमाता डॉन ही होय. एस्टोनियन धर्मानुसार भूमाता ही जन्म आणि मृत्यूवर सत्ता चालविते. चीन मध्ये भूमातेचा संप्रदाय वृक्षदेवतांशी संबंधित आहे. सी वँगमू ही त्यांची प्राचीन काळातील भूमाता. टाओ संप्रदायातील येन हे स्त्रीतत्त्व भूमीचे रूप म्हणून होते. ग्रीस व क्रीटमध्येही भूमातेची पूजा होई. भारतातील नवरात्र पूजा ही भूमातेची पूजाच आहे.

फिनिश दैवतकथांत अक्का (Akka) ही भूमाता मानली जाते. मेक्सिकोमध्ये सेंटिऑटल आणि पेरु मध्ये ममा, पाचा या भूदेवता मानल्या गेल्या.

देवीच्या नवरात्र महोत्सवात करावयाच्या धान्याच्या पुर्ननिर्मितीसाठीचा हा विधी जगभर याच स्वरूपात आढळतो. मातीच्या थाळीत पेरलेल्या धान्याला फ्रेजर 'गार्डन ऑफ ॲडोनिस' असे नाव देतो. नवरात्रातील 'घटस्थापना' ही भूमी आणि स्त्री यांची जननक्षमता-सुफलन शक्ती वाढविण्यासाठी केलेला यातुविधी आहे. या बाबतची चर्चा विस्तृतपणे पुढे केली आहे.

**कृषियातुविज्ञान आणि स्त्रीमाहात्म्य -**

सुफलीकरणाशी निगडित स्त्रीदेवतांचा शोध घेताना कृषियातुविज्ञान आणि स्त्री माहात्म्य यांचा अन्योन्य संबंध पाहणे महत्त्वाचे ठरते. कृषिजीवी अवस्थेचे दोन कालखंड कल्पावे लागतात. १. नांगराचा शोध लागण्यापूर्वीची प्राथमिक शेती, २. बैल, घोडा यांच्या साहाय्याने ओढल्या जाणाऱ्या नांगराची शेती. आज भारतात असलेल्या तोडा आणि खासी या जमातींच्या अवलोकनावरून लक्षात येते, तोडा ही जमात पशुपालनाचा व्यवसाय करणारी असून ती पुरुषप्रधान आहे तर खासी जमातीत शेती व्यवसाय प्राथमिक अवस्थेत आहे. ती जमात पूर्णपणे मातृसत्ताक आहे. बिफ्रॉ, बॅकोफेन या सारख्या संशोधकांनी असंख्य पुरावे देऊन सिद्ध केले आहे की, भटके व पशुपालन अवस्थेतील लोकांची समाज रचना पुरुषसत्ताक असते

तर प्राथमिक कृषिजीवी समाजाची रचना मातृसत्ताक, स्त्रीप्रधान असते. नांगराचा शोध लागून शेती प्रगतावस्थेत गेली, त्याला पशुव्यवसायाची जोड मिळाली आणि स्त्रीसत्ताक समाज व्यवस्था लुप्त होऊन पुन्हा पुरुषप्रधान व्यवस्था निर्माण झाली. अगदी प्राथमिक अवस्थेत पुरुषांकडे विशिष्ट काम नव्हते. पण स्त्रीकडे मात्र मुलांच्या संगोपनाची जबाबदारी नैसर्गिकपणे आली होती. या श्रमविभागपूर्व अवस्थेत, सामाजिक संघटनेत स्त्रीचे स्थान अधिक महत्त्वाचे होते. कारण रति (Sex) आणि वात्सल्य या दोन नैसर्गिक नात्यांत वात्सल्याला अधिक महत्त्व होते. जनन प्रक्रियेतील पुरुषाचे स्थान समाजाला अज्ञात होते आणि माता मात्र प्रत्यक्ष दिसे. साक्षात असे. स्त्रीच्यात भूमीप्रमाणे यात्वात्मक सामर्थ्य आहे असे आदिमानवाने कल्पिले. त्यातून स्त्रीमाहात्म्याचा काळ सुरू झाला. नांगराने शेती सुरू झाल्यावर ते लुप्त होत गेले. या संदर्भात डॉ. कोसंबी[१०] ऐतिहासिक सत्य मांडतात.

'Matriarchal institutions still survive in these parts of the country that took last to the plough economy.'

प्राथमिक अवस्थेतील कृषिव्यवसाय स्त्रीनेच, तिच्या ठिकाणी असलेल्या 'यात्वात्मक सामर्थ्याच्या साहाय्याने' विकसित केला. त्यामुळे कृषिप्रधान समाजव्यवस्थेत मातृसत्ता रूढ झाली. नांगराचा शोध लागल्यानंतरही कृषिदेवता स्त्रीरूप-भूमीस्वरूप राहिल्या. आजही ज्या ज्या ठिकाणी भूमीच्या सुफलीकरणाची व्रते आणि यातुविधी आचरले जातात. त्या ठिकाणी त्या व्रताचरणांत स्त्रीलाच प्राधान्य असते. आजही ही श्रद्धा कृषिजीवी समाजात आहे. या संदर्भात ब्रिफॉ लिहितो -

[११]'The fecundity of the earth and the fecundity of women are viewed as one and the same quality.'

या संदर्भातील विस्तृत चर्चा 'भूमीच्या सुफलीकरणाशी निगडित विधी उत्सवातील स्त्री प्रधानता' या प्रकरणात केली आहे.

**गौरीपूजा : सर्जनाची पूजा –**

महाराष्ट्रात पूजिले जाणारे गौरी हे दैवत भूमीच्या सर्जनक्षमतेचे प्रतीक आहे. केवळ महाराष्ट्रात नव्हे तर राजस्थान, उत्तर भारत, मध्य प्रदेशातही गौरीची पूजा भाद्रपदात आणि चैत्रात होते. हे स्त्रियांनी करावयाचे व्रत आहे. भाद्रपदात येणाऱ्या गौरींना मराठवाड्यात लक्ष्म्या असे म्हणतात. गणेशचतुर्थीनंतर ४ दिवसांनी लक्ष्म्या

सायंकाळी घरी येतात. अष्टमीला मिष्टान्नाचा पाहुणचार घेऊन नवमीस परततात. कनिष्ठा आणि जेष्ठा अशा दोघींची पूजा केली जाते. काही घरात उभ्या लक्ष्म्या असतात. लक्ष्म्यांचे मुखवटे त्या त्या कुळातील परंपरेनुसार असतात. लक्ष्म्या मांडणे शक्य नसेल तर धान्याच्या राशी मांडाव्याच लागतात. कोकणात याच काळात गौरी घरी येतात. कोकण, कोल्हापूर परिसरात गौरी खड्यांच्या व तेरड्याच्या झाडांच्या असतात. अष्टमीस पुरणावरणाचा नैवेद्य मराठवाड्यात असतो. कोकणात घावन घाटले असते. या पूजाविधीत फुलापानांना आणि नैवेद्यात शाकभाज्यांना विशेष महत्त्व असते. या दिवशी उरलेले अन्न आणि खरकटे शेतात पुरले जाते. दोन लक्ष्म्यांपैकी अलक्ष्मी ज्येष्ठा असते. कनिष्ठा - लक्ष्मी असते. भारतीय संस्कृतीत अशुभाला शुभकारक बरून त्याला समाजमनात सन्मानाने सामावून घेण्याची ही प्रक्रिया सुरुवातीपासून आढळते. अशिवाचा शिव होतो. अलक्ष्मीची लक्ष्मी होते. विघ्नकर्त्याचा विघ्नहर्ता होतो. प्रारंभी भयानक वाटणारी शक्ती अशुभाचे निवारण होऊन शुभ होते. या भूमिकेची विस्तृत चर्चा, त्या त्या व्रतांच्या निमित्ताने येईलच.

चैत्रात वसन्तगौर घरी येते. अक्षय्यतृतीयेपर्यंत गौर माहेरी असते. चैत्रात झाडे मोहरतात. उन्हे तापू लागतात. धरती.... भूमाता याकाळात निवान्त असते. राने मोकळी असतात. सूर्याच्या ऊर्जेने जमिनीतील सुफलन शक्ती वाढत असते.

**धरणीच्या तीन रूपांची पूजा : नवरात्र –**

नवरात्रात धरणीच्या तीनही रूपांची पूजा होते. पहिल्या दिवशी घटस्थापना होते. पत्रावळीवर माती पसरुन त्यात नऊ, सात वा पाच प्रकारची धान्ये पेरुन त्यावर घट बसवतात. कुमारिकांची पूजा केली जाते. अष्टमीला सुवासिनींची पूजा करतात. नवमीला कालिमातेची पूजा होते. नऊ दिवस अखंडदीप तेवतात. दिवा हे सूर्याचे प्रतीक, घटात पंचनद्यांचे पाणी असते. घट हे पृथ्वीचे प्रतीक असते. नवरात्र व्रताची सविस्तर चर्चा पुढे केली आहे.

**कानबाई –**

हे दैवत नाशिकचा काही भाग आणि खानदेशात विशेष करून पूजिले जाते. तपती उर्फ तापी नदी ही सूर्यकन्या मानली जाते. तिचा उगम मध्य प्रदेशातील निमाड भागात झाला असून ती सातपुडा, अजिंठ्याच्या डोंगरांतून वाहत गुजरातमध्ये प्रवेशते. तिच्या परिसरात कानबाई या लोकदेवतेचे विशेष प्रचलन

आहे. मराठवाड्यात कानबाई पूजिली जात नाही. हिला कानबाई रानबाई असे म्हणतात. कानबाई ही वेदोत्तरकालीन देवता असली तरी ती मूलतः पृथ्वीचे आदिमायेचे रूप आहे. कानबाई ही सूर्यपत्नी मानली जाते. वेदोत्तर काळात पृथ्वी सूर्यपत्नी म्हणून मान्यता पावली. गुजरात सौराष्ट्रात राणलदे - रन्नादेवी - रांदल या नावाने सूर्यपत्नी म्हणून ती पूजिली जाते. महाराष्ट्र भारताच्या दक्षिण उत्तरेच्या मध्यावर आहे. भारतात स्थिर झालेल्या द्रविड आणि वैदिक आर्य या दोनही टोळ्यांचे संस्कार महाराष्ट्रातील उत्तर व दक्षिणेतील सांस्कृतिक जीवनावर आढळतात. महाराष्ट्रातील उत्तर भागात म्हणजेच खानदेशाने आर्यांचे संस्कार तर दक्षिण भागाने द्रविडांचे संस्कार स्वाभाविकपणे आपलेसे करून घेतले आहेत.

नागपंचमीनंतर येणाऱ्या रविवारी कानबाईची प्रतिष्ठा केली जाते. तिला रोटाचा नैवेद्य दाखवतात. कानबाईचे रोट असे म्हटले जाते. काही घरांतून पुरणाचे रोट करतात. सव्वाच्या मापाने रोट केले जातात. उदा. - सव्वा पावशेर, सव्वाशेर, सव्वामण. भारतीय विधीविधानात सव्वा या आकड्याला विशेष महत्त्व आहे. सव्वा हे सतत वाढणाऱ्या.... निरंतर वाढणाऱ्या समृद्धीचे प्रतीक आहे. हे रोट कुळातील व्यक्तींनीच खायचे असतात. कानबाईच्या जोडीने रानबाईची पूजा होते. दोघींचा जोडीने उल्लेख असतो. धुळ्याचे इतिहास संशोधक [१२]भा. रं. कुळकर्णी यांच्या मते या दोघी वेदात उल्लेखिलेल्या रण्णा-सण्णा देवता होत. कानबाईच्या स्थापनेसाठी १०८ वनस्पतींची पाने, पाच ते सात नद्यांचे पाणी, शिवेची वा नदीकाठची माती जिला ते कस्तुरी म्हणतात लागते. ही माती पत्रावळीवर पसरून त्यांत सात प्रकारची धान्ये पेरतात. कानबाईसमोरील नैवेद्य घरच्यांनीच खावयाचा असतो. तो संपला नाही तर त्याला बरकत असे म्हणतात. ते बरकत अन्न घरात खड्डा खणून त्यात टाकतात. स्वयंपाकात उरलेले पाणी त्या खड्ड्यात टाकतात. त्या खड्ड्याला 'संमिंदर' म्हणतात. या पद्धतीत आणि मराठवाड्यात लक्ष्म्याच्या वेळेस अन्न शेतात पुरण्याच्या पद्धतीत खूप साम्य आहे, ही बरकत समृद्धी भूमीत पुरायची म्हणजेच भूमीची सुफळ होण्याची शक्ती वाढविण्याचाच एक विधी. हे व्रत मराठवाड्यात पाळले जात नसले तरी ते भूमीच्या सुफलीकरणाशी संबंधित आहे.

**आसरा -**

मराठवाड्यातील ग्रामीण भागात आसरा हे दैवतही महत्त्वाचे मानले जाते. विहीर, डोह किंवा हिरवे विशाल वृक्ष यांच्या आश्रयाने आसरा राहतात अशी ग्रामीणांची

श्रद्धा आहे. अप्सरा पासून आसरा हा शब्द तयार झाला असावा. या कुमारिका असतात. तसेच विघ्नकर्त्या असतात. त्यांना संतुष्ट ठेवले तर त्या विघ्ने हरण करतात आणि धनधान्य पशु आदींची समृद्धी देतात असा समज आहे. शंकराच्या वराने सिद्धी प्राप्त करून घेतलेल्या व त्या सिद्धीने मातलेल्या, आंधकासुरला ठार मारण्यासाठी १९० मातृका निर्माण केल्या. पण तरीही त्याचा नाश झाला नाही. म्हणून विष्णूने शुष्क देवता नावाची मातृका निर्माण केली. तिने अंधकाच्या शरीरात घुसून त्याचे रक्त प्राशन करून त्याला ठार मारले. नंतर या मातृका दिसेल त्या माणसाचे रक्त पिऊ लागल्या. नंतर शिव आणि विष्णु यांनी दुसऱ्या अघोर मातृका पाठवून त्यांचा नाश केला. तेंव्हा पासून त्या मातृका रानावनात शेता भातात राहतात अशी आख्यायिका आहे. ग्रामीण भागात भरघोस पीक यावे, विहिरीचे पाणी आटू नये, पिकावर रोगपडू नये म्हणून त्यांची पूजा करतात. अमावास्येला नारळ फोडतात.

आसरा या पाण्याजवळ राहतात. त्यांना 'सात आसरा' वा 'सात माऊल्या' असेही म्हणतात. सर्वसाधारणपणे असा समज आहे की त्या पिशाच्च योनीतील असून ते स्त्रियांचे अतृप्त आत्मे असतात. अजूनही मराठवाड्यातील ग्रामीण भागात असा समज आहे की नदीत, विहिरीत वा डोहात आसरा राहतात. त्या ठिकाणी जीव दिलेल्या स्त्रियांचे ते पिशाच्च असते. त्यांना 'पऱ्या' असेही म्हणले जाते. या तीन नावांतून त्यांच्यातील 'यातुसामर्थ्य' व्यक्त होते. त्या त्या भागात, त्या त्या ठिकाणी प्रसिद्ध असलेल्या आसरांची पूजा केली जाते. फार मोठ्या यात्रा भरविल्या जात नाहीत. अर्थात काही अपवाद असतात. जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील नेरखेड खेड्याजवळच्या जीवराखी नदीत असलेल्या सकल डोहातील आसरांची यात्रा भरते. औरंगाबादजवळील कचनेर येथे विहिरीतील आसरांची यात्रा भरते. प्रत्येक नदीच्या नावाने एक देवी मानली जाते. जणू नदी हीच देवी मग ती चन्द्रभागा असो, कृष्णा असो वा गोदावरी असो. या देवींच्या नावाने यात्रा भरतात. महाराष्ट्रातील नद्यांचे धार्मिक माहात्म्य या विषयाच्या अभ्यासक [१३]ॲने फेल्डहाऊस, नोंदवतात, 'Rivers in India are commonly associated with certain worldly religious values - wealth, beauty, long life, good health, food, love and the birth of children. Represented by such goddesses as श्री, लक्ष्मी and जया, these values often find expression in feminine immagery. However, such 'domestic' ideals have been relatively neglected by

Indologists, who have tented to view India and Hinduism through the prism of asceticism and themes of purity or pollution.'

धुरपता –

भूमातेच्या संहारक रूपाला आंध्रात वा महाराष्ट्राच्या काही भागांत धुरपता असे म्हणतात. ही देवी ग्रमादेवतेच्या स्वरूपात पूजली जाते. दक्षिण भारतात ज्या अष्टशक्ती मानल्या जातात त्यापैकी ही एक आहे. या देवीचे रूप विक्राळ असते. तिला मद्य मांसांचा नैवेद्य लागतो. या धुरपतेचा सबंध महाभारतातील द्रौपदीशी जोडला जातो. मराठवाड्यात इळा आवस शेतकरी समाजात विधिपूर्वक पाळली जाते. इळा आवसेच्या विधीत तुरांट्या वा धान्याच्या कडब्याची कोप करतात. त्यांत पाच दगडांना चुना लावून पांडव म्हणून स्थापन करतात. कोपीबाहेर दोन दगड मांडतात. त्यांना धुरपता उर्फ द्रौपदी आणि कुंती असे म्हणतात. पांड हे जमीन मोजण्याचे एक माप आहे. या अवसेला अंबिलीचा नैवेद्य लागतो. इळा आवसेच्या विधीचा विचार करताना त्या बाबत खोलात जाऊन विचार करता येईल. इळा म्हणजे पृथ्वी भूमाता भूमातेची सर्जन क्षमता वाढावी, तिच्या सुफल होण्याच्या प्रक्रियेस मारक असणारे घटक नष्ट व्हावेत यासाठी ही पूजा. घातक घटकांचा संहार करणारी दैवी धुरापदा. मराठी ओव्यांत धुरपदा भेटते. मराठवाडा, महाराष्ट्रात श्रद्धेने ठेवले जाणारे हे स्त्रीचे नाव आहे.

**काही देवता रानातच राहणाऱ्या –**

जमिनीची सुफलनशक्ती वाढावी या हेतूने केल्या जाणाऱ्या सण व्रतवैकल्ये, उत्सव यांच्याशी संबंधित देवतांचा विचार करताना एक बाब लक्षात येते की, काही देवता गावात येत नाहीत. त्यांचे स्थान रानात, झाडाखालीच असते. त्या अनघड देवता असतात. त्यांचे मूर्तिरूप सहसा सापडत नाही. त्या दगड, वारूळ, झाड या रूपांत असतात. त्यांचे रूपवर्णन करता येत नाही. त्या स्वयंभू असतात. मानवनिर्मित नसतात. पारधी कैकाडी जमातीतील सात देवता रानात राहणाऱ्या असतात. त्या गावात येत नाहीत. लोककथांतून क्षेत्रदेवता, वनदेवता, पाण्याच्या जवळ राहणाऱ्या आसरा यांचे संदर्भ येतात. मरी आई, यल्लमा या मातृका लहान मुलांच्या संरक्षणासाठी पूजिल्या जातात. त्यांच्या नावे दगड असतात. त्यांची वस्ती वृक्षाखाली असते. तेलंगणात चिंचेच्या, तामिळनाडूत आंब्याच्या, तर महाराष्ट्रात बाभळीखाली त्यांचा निवास असतो. या देवता लावलेल्या झाडाखाली राहत नाहीत तर आपोआप

उगवलेल्या झाडाखाली राहतात. या देवता संहारकर्त्या असल्या तरी त्यांचे रूप संरक्षक बनविण्याची परंपरा भारतीय दैवतशास्त्रात सुरुवातीपासून आहे. सटवाई बाळाच्या कपाळावर त्याचे भविष्य लिहिते अशी कल्पना आहे.

सटवाई माये। बाभुळवनी नांद।
आउखाचा नाडा बांध। बाळ माझ्या राजसाला ॥

महाराष्ट्रात आषाढात बाभळी पूजण्याची प्रथा सर्व जातिजमातीत पाळली जाते. आषाढ तळण्याचाही रिवाज आहे.

सर्वसाधारणपणे भूमातेचे रूप म्हणून पूजिल्या जाणाऱ्या देवतांची पूजा निमित्ताने होते. तात्पुरत्या केलेल्या मातीच्या मूर्ती वा खडे वा वनस्पती यांच्या रूपात ती होते. त्यांचे विसर्जन जलाशयात होते.

**सूर्य आणि पृथ्वी : आदिम युगल –**

ऋग्वेदात भूमीला महानग्नी म्हटले आहे. आणि पृथ्वीच्या सदैव वर असणारा देव म्हणजे सूर्य. 'अश्व' या शब्दाचा मूळ अर्थ व्यापनशील. व्यापनशील सूर्याचे प्रतीक म्हणजे अश्व. सूर्य आणि पृथ्वी हे आदिम सांकेतिक युगल आहे. अश्वमेघ यज्ञात अग्निमंथन करताना खालील आरणीत लाकडी दंडगोल ठेवून तो जोरजोरात हलवितात व अग्निरूपी शिशु निर्माण करतात. स्त्री पुरुष घर्षणातून नवनिर्मिती, शिशु वा फळ निर्मिती ही संकल्पना वैदिकांनीही महत्त्वाची मानली. [१४]सूर्य पृथ्वी यांचा हा उघडपणे पवित्र संबंध रोजच येत असतो. तो वर्षातून एकदा तरी अश्वमेध यज्ञाच्या रूपाने साजरा होत असावा. परंतु पुढे समाजाचे स्वरूप पालटले. राज्य आणि राजा ही शासन यंत्रणा आली आणि अश्वमेधाचे रूप पालटले. अश्वमेध यज्ञात स्त्री आणि अश्व यांच्या समागमाचे विधिनाट्य केले जाते. अश्व म्हणजे सूर्य आणि स्त्री वा राणी म्हणजे भूमी. सूर्य आणि भूमी संबंध आल्याने जमीन उत्तम रीतीने खणली जाते व सुपे भरभरुन फळे देते. मुळात जमिनीची पीक उत्पन्न करण्याची शक्ती वाढून तिला सफळ करण्यासाठी व गाईना भरपूर वेत येण्यासाठी हा सांकेतिक विधी असावा. विवाहापूर्वी वधूचे शुद्धीकरण करताना, महानग्नीचे जघन जसे शुद्ध केले तसे हिचेही करा असे अथर्ववेदात म्हटले आहे. महानग्नी ही खोदल्या जाणाऱ्या जमिनीची आणि सफळ होऊ घातलेल्या स्त्रीजातीचे प्रतीक आहे.

**सर्जनप्रक्रियेत बीजाचे महत्त्व –**

सर्जन प्रक्रियेत बीज आणि पाण्याची भूमिका अत्यन्त महत्त्वाची असते याची जाणीव झाल्यावर स्त्रीदेवतांच्या जोडीला पुरुषदेवतांची पूजा होऊ लागली. मात्र सर्जनातील पुरुषाची भूमिका तटस्थ असते याचे भान आदिम कृषिजीवी समाजाला असल्याने पुरुषदेवता क्षेत्रपालाच्या रूपात पुढे आल्या. योनिपूजेप्रमाणेच लिंगपूजा होऊ लागली. मोहंजोदारो, हरप्पाच्या उत्खननात लिंगाच्या आकाराचे अनेक दगड सापडले आहेत. सैधव संस्कृतीतील मातृसत्ताक समाज लिंगपूजक होता. वैदिक आर्य लिंगपूजेस हीन मानीत ते आपल्या शत्रूंना 'शिश्नदेवाः'[१५] या अत्यन्त हीनत्वदर्शक नावाने संबोधत. लिंगपूजेच्या अनुशंगाने वृषभ आणि बोकड वीर्यसिंचनाने श्रेष्ठ प्रतीक म्हणून पूजिले जात. आजही शेतीतील धान्य घरी नेण्यापूर्वी शेतात ढवारा केला जातो. मराठवाड्यात ही प्रथा श्रद्धेने पाळली जाते. त्यावेळी म्हसोबा या क्षेत्रपाळाला बोकडाचा बळी चढवितात. त्याचे रक्त सर्वत्र शिंपडतात. पोळ्याला बैलाचा सन्मान करतात . त्याला न्हाऊमाखू घालताना त्याचे मूत्र, शेण, शेतात पडावे ही भावना शेतकऱ्याची असते. कृषिव्यवसायाशी निगडित लोकदैवते, म्हसोबा, भुलोबा, भांगलोबा, शिराळशेठ, नागोबा आदी क्षेत्रपाळाच्या रूपात आणि दगडाच्या वा मातीच्या मूर्तीच्या रूपांत पूजिली जातात.

लिंगयोनिपूजा,नदीला महामाता मानून दिलेले पूज्यत्व, बैलांबद्दलचा आदर, वृक्षांचे पावित्र्य या बाबी सिंधू संस्कृतीत प्रामुख्याने आढळून येतात. वैदिकांनी या सर्वांचा स्वीकार केला. याचे प्रत्यन्तर ऋचांतून डोकावताना दिसते. असे मत म.म.पां. वा. काणे यांनी मांडले आहे. सुफलीकरणाशी संबंधित पुरुषदैवतांचे शोधन करताना हे मत लक्षात घेणे आवश्यक ठरते.

**भुलोबा : भांगलोबा : शिराळशेठ –**

नाग हा क्षेत्रपाळ मानला जातो. नागपंचमीस केली जाणारी नागपूजा सुफलीकरण विधीचाच एक भाग आहे. नागपंचमीची कथा शेतीशी निगडित आहे. नागपंचमी हा स्त्रियांचा सण आहे. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी मराठवाड्यात चौरस्त्यावर भुलोबा मांडला जातो. पुणे भागात त्याला शिराळशेट म्हणतात. चिखलाच्या चकत्या एकावर एक ठेवून लिंगाकार रूप देऊन त्याची पूजा केली जाते. त्या दिवशी अनेक ठिकाणी जत्रा भरते. तरुण सुवासिनी आणि कुमारिकांचा

हा उत्सव असतो. आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन या चारही महिन्यांत जमिनीच्या सुफलीकरणाशी जोडलेली व्रते केली जातात. खरिपाची – पावसाच्या पाण्यावरची पिके आश्विनात भराला येतात आणि रब्बीच्या पेरणीचीही त्याच काळात घाई असते. सर्जन आणि वर्षनाशी संबंधित उत्सव – विशेष करून कुमारिकांचे उत्सव या काळात साजरे होतात. विदर्भ खानदेशात भुलाबाई भाद्रपद पौर्णिमेस बाळंतपणासाठी माहेरी येते. तिच्यासोबत भुलोबाची मातीची जोडमूर्ती मांडतात. तिच्या मांडीवर गणेश बाळ असते . हा भुलोबा म्हणजे शिवाचे रूप. विदर्भात दसऱ्याच्या आदल्या दिवशी इनाई या देवतेची स्थापना होते. शेतातील चिक्कण माती आणून तिची मूर्ती करतात. तिच्याबरोबर पती शंकर आणि दीर भांगलोबा असे दोघेही असतात. तसेच चिलया बाळ बरोबर असते. तिचे वाहन हत्ती असते. दीर भांगलोबा हा फार खोड्याळ आहे. तो मिरच्यांची, दवन्याची रोपे तुडवतो. फुलवंता माळीण गौरा उर्फ इनाईकडे तक्रार करते.

भांगुलजी देर चाले रप रप
मोडयलं रोप दवन्याचं
फुलवंता माळीण आली घरावरी
किती अर्जी करी भांगुलबाची

दसऱ्याला सोने प्रथम इनाईला देतात. नंतर सर्वांना. सायंकाळी इनाईला कोतवालाच्या डोक्यावर ठेवून मिरवत जोंधळ्याच्या शेतात खड्डा करून त्यात ठेवले जाते. बरोबर शंकर असतो. विदर्भात श्रावणात भराडीगौर मांडतात. गौर मांडल्यावर दुसऱ्या दिवशी नदीवर जाऊन वाळूचा महादेव करतात.

'खडक फोडू, माती काढू, निघा निघा गौराई' असे पाच वेळा वाळू काढताना म्हणतात. भुलाबाई, भराडी गौर, इनाई यांचे सोबत असणारे भुलोबा हे शिवाचे रूप असते. मूळ गौरव गौराईचा असतो. सर्जनात शिवाची भूमिका तटस्थ तरीही महत्त्वाची असते.

प्रत्येक शेताच्या बांधावर म्हसोबा असतो, अर्थात दगडाच्या स्वरूपात. नांगरणी, पेरणी आदी महत्त्वाच्या कृषिप्रक्रिया सुरू करताना, तसेच अमावास्या पौर्णिमेस म्हसोबाला नारळ फोडला जातो. ढवारा म्हसोबासमोर केला जातो. म्हसोबा हा 'कुमार' असतो. मराठीत एक म्हण आहे – 'म्हसोबाला नाही बायको आसरांना

नाही घो'. 'घो' म्हणजे नवरा.

**गणपती : सुफलतेचे दैवत –**

गणपती हे शिवाप्रमाणेच सुफलन प्रक्रियेशी संबंधित दैवत आहे. गणपती भाद्रपदात येतो. आषाढाच्या सुरुवातीस वा ज्येष्ठाच्या अखेरीस पेरलेले धान्य पणात येत असते. गणपतीपाठोपाठ गौरी येतात. [१६]गणपती या लोकदैवताचा प्रवास पाहणे महत्त्वाचे आहे. गण + पती या दोन शब्दांचा मिळून हा शब्द तयार होतो. गण म्हणजे लोकसमूह त्याचा पालनकर्ता वा प्रमुख म्हणजे गणपती. गणपती या देवतेला तंत्रवाङ्मयात विषेश स्थान आहे. ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडलात बृहस्पतीला उद्देशून गणपती असे म्हटले आहे. ऐतरेय ब्राह्मणांत 'गणानाम् त्वा गणपते' हा मंत्र बृहस्पतीस उद्देशून म्हटला आहे. लोकायताचा प्रणेता बृहस्पती होता म्हणून त्यास 'बार्हस्पत्यमत' असेही म्हणत. या वरून गणपती हा शब्द लोकायताशी निगडित आहे असे अनुमान काढता येते. गणपती म्हणजे लोकांचा नायक हा अर्थ मान्य करण्यास प्रत्यवाय नसावा या डॉ. देवीप्रसादांच्या मतास डॉ. स. रा. गाडगीळ आग्रहपूर्वक अनुमोदन देतात.

आजही कर्नाटकात गणेशचतुर्थीचे आदले दिवशी तृतीयेला घुगऱ्या करतात. त्या उंदरांसाठी शेतात जाऊन टाकतात.

**गणपती : एक प्रवास : विघ्नकर्ता ते विघ्नहर्ता –**

गणपती या दैवतास आपण विघ्नहर्ता, सुखकर्ता, सिद्धिदाता, बुद्धिदाता मानतो. प्रत्येक धर्मकार्यात त्याला प्रथम वंदन केले जाते. वगनाट्यातही पहिले नमन गणरायाला असते. गणेश हा शिवपार्वतीचा पुत्र मानला जातो. गौरी आणि शिव या अतिप्राचीन देवता असून दोहोंचे नाते सुफलीकरणाशी आहे. त्या दृष्टीने त्यांचा पुत्र मानलेल्या गणपतीचा प्रवास पाहणे महत्त्वाचे ठरते.

इ.स. पूर्वी लिहिल्या गेलेल्या मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती, मानवगृह्यसूत्र या ग्रंथांचा गणपती बद्दलचा अभिप्राय वेगळा आहे. त्या काळातील गणपती एक नसून तो समूह आहे. गणपतींनी पछाडलेल्या माणसांना भयानक स्वप्ने पडतात, ती वेडी होतात, स्त्रियांना संतती होत नाही, झाल्यास मृत्युमुखी पडते असे मानले जाई. ते रूप विघ्नकर्त्याचे होते. हे तपशील मानवगृह्य सूत्रात दिले आहेत. गणपतीचे एक नाव विनायक. याज्ञवल्क्य स्मृती म्हणते की विनायकाची योजना महारुद्राने

संकटनिर्मितीसाठीच केली आहे. मनूनेही गणरायाची निंदा केली होती. स्मृतिकारांनी केलेल्या निंदेवरून देवी प्रशाद चटोपाध्याय आदी विद्वान असे अनुमान काढतात की, गणपतीचा संबंध लोकायतिकांशी असावा. कात्यायनाने असे म्हटले आहे की, गणेशयाग हा समाजातील स्त्री व पुरुषांनी एकत्र येऊन करावयाचा विधी आहे. सर्व वैदिक स्मृतिकारांची भूमिका पाहता गणपतीला विघ्नेश, विघ्नराज ही नावे मिळाली हे लक्षात येते. गणपती 'एक दंत' आहे. ब्रह्मवैवर्तक पुराणात परशुरामाने गणपतीवर परशू फेकून त्याचा दात तोडल्याचा उल्लेख केला आहे. परशुराम हा वैदिकमताचा कडवा पुरस्कर्ता होता. क्षत्रियांचा त्याने अनेकदा संहार केला होता. बौद्ध, हिंदूशिल्पातही गणेशाचे स्थान खूप खालचे होते. मात्र इसवीसनाच्या पाचव्या शतकात......गुप्तकाळात त्याच्या स्थानाचे उन्नयन झाले. विघ्नकर्ता गणपती विघ्नहर्ता तसेच सिद्धीविनायक झाला. तो गजमुख आणि मूषक हे वाहन असलेला झाला.

**गणसमाज : समूह जीवनाचा पाठ –**

पूर्वीचा समाज गणसत्ताक होता. प्रत्येक गणाचे एक कुललक्षण चिन्ह असे. ही कुललक्षण चिन्हे गज, नाग, वृषभ, मूषक, श्वान अशी असत. तसे पुरावे शिलालेखांतून मिळतात. स्मृतिकारांनी गणविरोधी भूमिका घेतली असली तरी वैदिक ऋषी स्वतः गणप्रधान समाजातले होते. त्यांनी गणपतीला विघ्नकर्ता वा विघ्नहर्ता मानले नाही. त्यांच्या दृष्टीने तो गणसमाजाचा नायक म्हणून वंदनीय आहे. मात्र त्यांना गजमुखी गणपती अज्ञात आहे.

गणसमाज सामूहिक जीवन जगत असे. अन्नाचे उत्पादन, विभाजन सामूहिक रूपात केले जाई. समता आणि सामूहिक जीवन ही गणसमाजाची वैशिष्ट्ये होती. श्री. भांडारकर यांच्या मते गणकल्पना आर्यपूर्वांकडून आली आहे. हेच मत श्री. सेन, श्री. मित्र यांनी मांडले. डॉ. स. रा. गाडगीळ लिहितात की, 'ऋग्वेदाप्रमाणे अन्य ग्रंथातही गणसमाजाची स्मृती आढळते. प्राचीन वैदिक ऋषी ज्या समाजव्यवस्थेत राहत, ज्या समाजव्यवस्थेतील समता आणि सामूहिकतेमुळे त्यांच्या जीवनाला संपन्नता लाभली होती. त्या गणसमाजव्यवस्थेचा त्यांनी गौरव केला तर त्यात नवल नाही.'

वैदिक वाङ्मयात व्रात म्हणजे गण. विशिष्ट सामाजिक संबंधांनी घटित असा समूह म्हणजे व्रात किंवा गण. गणसमाज हा अत्यंत संघटित आणि एकात्मतेने

सामूहिक जीवन जगणारा होता. त्या काळात व्यक्तिगत मालकीची प्रथा नव्हती. स्मृतिकाळात या दोन शब्दांना चुकीचे अर्थ जोडले गेले. लोकपरंपरांचे पालन करणारा, उपनयन न झालेला तो व्रात असा अर्थ घेतला जाऊ लागला. आजही व्रात्य या शब्दाच्या अर्थावरून तसा संकेत मिळतो.

**गणसमाज आणि लोकसत्तेचा अंत : राजसत्तेस प्रारंभ –**

गुप्तकाळापासून लोकसत्ता हळूहळू नाहीशी होऊ लागली. परकीय आक्रमण थोपवण्यासाठी कौटिल्याने लहान लहान गणराज्यांना एकत्र आणून एक महासत्ता निर्माण केली. त्या महासत्तेचा शासक म्हणून चंद्रगुप्तास घडविले. या काळापासून गणसत्तेतील संघबळ उत्तरोत्तर लयाला गेले. गणजीवी समाज शेती आणि सैनिक या व्यवसायात गुंतला. स्वयंपूर्ण गाव हे 'एकक' झाले. कृषिनिर्भर व्यवसायात समाजाचा काही भाग गुंतला. गणाचे अधिपत्य त्या त्या कुलात, वंशातच ठेवले जाऊ लागले. नेतृत्व आनुवंशिक बनल्याने गणराज्य आणि राजेशाही यांच्यातील भेद वा वेगळेपण लोपले असावे. गणराज्यातील सद्गुणांचा ऱ्हास होऊन तेथील जीवन असुरक्षित बनले. रुढीप्रियता, दंभ, अनुवांशिकता आदींची वाढ झाली. त्यातून गणराज्यांचा ऱ्हास झाला असावा.

एकूण समाजच या प्रक्रियेद्वारे दुबळा आणि विखुरलेला होत गेला. अशा सोशिक समाजाला देशाच्या मध्यवर्ती सत्तेवर कोण आरूढ आहे हे जाणण्याची गरज भासली नाही.

**गणसमाज मातृसत्ताक –**

गणसमाजाचा मातृसत्ताकहा विशेष होता. व्यक्तीचे अधिकार, व्यक्तीची कुटुंब व समाजविषयक कर्तव्ये, त्यावरील सामाजिक बंधने या सर्वांचे नियमन स्त्रीकडून येणाऱ्या वारसापद्धतीने केले जाई. आजही स्त्रीव्रतांचे प्राबल्य, रेणुका, जगदंबा आदी स्त्री देवतांचे माहात्म्य यातून आजच्या समाजाचा प्राचीन काळाच्या मातृसत्ताक जीवनपद्धतीशी असलेला अनुबंध लक्षात येतो. शक्तीशिवाय शिव हा शवासमान असतो असे सांख्य तत्त्वज्ञान सांगते. पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीतत्त्वाचे एवढे महत्त्व कसे याचा शोध घेताना अभ्यासकांना वैदिक संस्कृतीच्या कक्षेबाहेर जाण्याची गरज भासली आणि सिंधूसंस्कृतीच्या उत्खननामुळे या प्रश्नाचा मागोवा घेणे व निर्णय घेणे सुकर झाले. सिंधू नदीच्या खोऱ्यापासून ते नाईल नदीपर्यंत प्राचीन स्त्री देवतांचे

अवशेष उत्खननातून उपलब्ध झाले आहेत.

**संघर्ष, समन्वय आणि स्वीकार यातून एकात्म संस्कृती –**

संघर्ष, समन्वय आणि स्वीकार या तीन प्रक्रिया भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत सातत्याने आहेत. ६व्या शतकानंतर गणपतीच्या स्वरूपात बदल झाला. तरीही आज म्हणताना आपण 'गौरी गणपती' हा वाक्प्रचार वापरतो. गौरी ही गणपतीची माता आहे. गणपती खरे तर दीड वा अडीच दिवसांचा असतो. गणपती बोळवतात आणि गौरी घरी आणतात. गौरी, ज्यांना मराठवाड्यात लक्ष्म्या म्हणतात त्यांचे महत्त्व अधिक असते. श्रावण, भाद्रपद, आश्विन या काळात आचरावयाच्या स्त्रीव्रतांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास असे लक्षात येते की स्त्रीमाहात्म्य आणि कृषिविषयक समृद्धी यांचा अन्योन्य संबंध आहे. ऋषिपंचमी, हरितालिका, गौरी वा लक्ष्म्या, नवरात्र आदी व्रते वनस्पती समृद्धीशी जोडलेली आहेत. या व्रतांमधील शिव वा गणपती या पुरुषदेवता अध्याहृत असतात, गौण असतात. म्हसोबा, भुलोबा, साकरोबा आदी क्षेत्रपाळांची रूपे मुळात शिवाची, शंकराची आहेत. या सर्वांचा अधिपती असा महादेव आहे.

**मुंजा : शेतीचे रक्षण करणारा जागल्या –**

सुफलीकरणाशी संबंधित असे आणखीन एक महत्त्वाचे कृषिदैवत म्हणजे मुंजा. मुंजा हा क्षेत्रपाळापेक्षा विघ्नहर्त्याची भूमिका पार पाडत असतो. त्याचा निवास वड, पिंपळ अशा झाडांवर असतो. मुंजा हा मौंज झालेल्या ब्रह्मचारी मृताचा आत्मा असतो. तो अत्यंत शक्तिशाली आणि ज्याच्यात अपरंपार यातुशक्ती आहे असा मृतात्मा असतो. अशी लोकसामान्यांची श्रद्धा असते. शेताचे, पिकाचे, शेतातील जनावरांचे तो रोगराई आणि दुष्ट शक्तींपासून रक्षण करतो असा समज रुढ आहे. यालाच वीरोबा असेही म्हणतात. गावाच्या शिवेवर या वीरोबाचे ठाणे असते. ग्रामदैवतांच्या आणि वीरोबाच्या रूपात एक प्रकारे ही यक्षपूजाच प्रचलित आहे असे लोकसाहित्याच्या अभ्यासकांना वाटते. द. ग. गोडसे यांच्या मते यक्षपूजा ही आर्यपूर्व असून तेथील समाजजीवनात ओतप्रोत रुजली आहे. ही उपासना शैव उपासनेच्या पूर्वीपासून रुढ असावी. कालौघात नंतर त्यावर शैवउपासनेचे संस्कार झाले. या संदर्भात द. ग. गोडसे लिहितात 'कोणत्याही संकटापासून गावाचे रक्षण करणाऱ्या ग्रामस्थांचे प्राकृतिक स्वास्थ्य सांभाळणाऱ्या गावातील नैतिक आणि नैष्ठिक

व्यवहारांचे नियंत्रण करणाऱ्या गावकीचे एकमेव श्रद्धास्थान व निष्ठास्थान असलेल्या स्थळीय जनपद देवतांची उपासना सर्वस्वी ऐहिक स्वरूपाची आहे. ही पूजा वैदिकांना प्रारंभी अप्रिय वाटली तरी त्यांनी त्याचा कालौघात स्वीकार केला.' या प्रकारच्या दैवतांची उत्पत्ती कशी झाली या विषयी विवेचन करताना ते लिहितात, 'निसर्गातील प्रबळ, सुष्ट, दुष्ट शक्तींची प्रचीती व या शक्तींच्या सावटाने झाकोळलेल्या जीवनाची अनिश्चितता यांच्या द्वंद्वातून यक्षदेवदेवतांची कल्पना निर्माण झाली.' वीरमरण प्राप्त झालेले, मौंजीबंधन झालेले परंतु बालवयात मृत झालेले ब्रह्मचारी हे मृत्यूनंतर यक्षरूप होतात असा समज सर्वत्र रुढ आहे. या ठिकाणी एक स्मरण होते -

१९८७ च्या मे महिन्यात आंतरराष्ट्रीय महिला परिषदेच्या निमित्ताने जर्मनीस भेट देण्याचा योग आला. परिषद फ्रँकफुर्टपासून २५/३० किलोमीटर्स दूर असलेल्या मौलोफ नावाच्या खेड्यातील वृद्धाश्रम केंद्रात होती. गावात घरे ४२ आणि गावात राहणारी माणसे जोमतेम वीस पंचवीस. प्रत्येक घरासमोरच्या अंगणात चिमुकली बाग, एखादा छोटासा किल्ला असायचा आणि त्यात दाढीवाल्या, बुटक्या, डोक्याला विदूषकी लांब टोपी घातलेल्या हसऱ्या वयस्क यक्षाचा चिमुकला रंगीत पुतळा उभा असायचा. मी उत्सुकतेने चौकशी केली असता कळले की त्या देशातही ते पुतळे रक्षणकर्ते, मदतकर्ते आणि दुष्टांना त्रास देणारे असे असतात अशी श्रद्धा आहे. यक्ष ही संकल्पना जगभर रुढ असावी का ? नव्हे आहेच.

आपल्या घरात पिंपळ असू नये अशी समजूत आहे. कारण मुंजा पिंपळावर असतो. महाराष्ट्रात डहाकाची गाणी गायिली जातात, त्यात मुंजोबाचे गाणे असते. त्यात लहान बाळाच्या अंताची कहाणी आहे.

आदिवासींच्या पाड्यावरील एखादी प्रतिष्ठित व्यक्ती मरण पावली तर त्याच्या नावाने एखाद्या दगडाला वा खांबाला शेंदूर लावून ठेवतात. त्याला वीर म्हणतात. काही आदिवासी जमातीत खंबदेव असतात ते याच प्रकारचे असतात.

### सुफलनशक्तीशी जोडलेली दैवते ही ग्रामदैवते -

जमिनीची सुफलनशक्ती वाढावी यासाठी केल्या जाणाऱ्या विधी, सण, उत्सव यांच्याशी संबंधित दैवते ही ग्रामदैवते आहेत. या दैवतांशी संबंधित मूळ स्वरूपातील गाणी पूर्वी सामाजिकदृष्ट्या तळागाळातील स्तरावरचे मानल्या जाणाऱ्या समाजात अत्यंत श्रद्धेने गायिली जातात. धनगर, कुंभार, वसुदेव, महार, मांग आदी समाजात

आजही ही गाणी प्रचलित आहेत. महाराष्ट्रातील गोंधळी, पांगुळ, वासुदेव, डहाक, पोतराज, धनगर, नागमंत्री, सहदेवभाडळी, आदींची गाणी पाहिल्यास असे लक्षात येते की ही गाणी वृक्ष, जमीन, पाऊस, वारे आदी निसर्ग आणि या निसर्गाचे मानवी जीवनाशी असलेले नाते यावर आधारलेली असतात. आजही कोकणात फळे देणाऱ्या झाडांचा स्त्रीलिंगी उल्लेख होतो. उदा. - फणशिणीला फळे आली किंवा पेरवीण म्हणजे फळे येणारे पेरुचे झाड. याला अपवाद आंबा. नांदेड जिल्ह्यात आंबा आणि जांभूळ यांचा विवाह साजरा करण्याची प्रथा होती. (डॉ. प्रभाकर देव - कंधारचा इतिहास). या लोकदैवतांचे कालौघात उन्नयन झाले तर काहींचे रूपांतर झाले. वैदिकांनी या दैवतांचा स्वीकार करताना त्यांना नवे अनुबंध दिले. आज उच्चभ्रू मध्यमवर्गीय समाजात महाराष्ट्रातील बहुजन समाजात, ज्यात मराठा, माळी, कुणबी, वंजारी, वाणी, ब्राह्मण आदी अनेकविध पुढारलेल्या जातिजमाती येतात. त्यांच्यात गौरीगणपती, लक्ष्म्या, नवरात्र, शाकंभरी, चंपाषष्ठी, ऋषिपंचमी, नागपंचमी, कानबाई आदी अनेक व्रते व सण साजरे केले जातात. परंतु मूलतः हे सण, व्रते, उत्सव आणि तत्संबंधी दैवते कृषिपरंपरेशी, कृषिसमृद्धीशी जोडलेली आहेत.



# पारंपरिक लोकोत्सव आणि कुमारिका

*स्त्री आणि भूमी यांच्यांतील सर्जनक्षमतेबद्दल आदिमानवाला कुतूहल, मानवाचे प्राथमिक विज्ञान, विश्वातील 'असु' शक्ती आणि कृषिविधी, विधी : प्रतीकरूपात आराधना, श्रद्धांतील सारखेपणा, भूमी आणि स्त्रीची विविध रूपे, कुमारिकेची तीन रूपे, उत्सव न्हाणुलीचा, ऋतु प्राप्त झाला, न्हाणुली विवाहिता असे, नहाण, गोरी मालन, ऋतुशांती, धर्म, विज्ञान यांचे मूळ 'जादू', अंबुवाची उत्सव : पृथ्वीची रजस्वला अवस्था, कौमार्य अनाघ्रात असते, कन्या शब्दाची व्याप्ती, स्त्रियः पवित्रमतुलम्, कन्याराशी : एका हातात धान्याचा अंकुर दुसऱ्या अग्नी, हिंदुस्तानचे बदलते रूप आणि स्त्री, लिंग-निसर्गनिर्मित तर, लिंगभाव-समाजनिर्मित, स्त्रीच्या स्थानातील परिवर्तन : त्याचा व्रत, विधी, उत्सव यांवर परिणाम, भारतीय व्रतोत्सवांत कुमारिकांना विशेष स्थान, आठव्या वर्षीच विवाह का ?, गौरी : अष्टवर्षा कन्या, कोकणस्थ ब्राह्मण समाजातील 'बोडण', कुवांरभूमीची पूजा : कुमारीपूजा, अन्नसमृद्धीशी जोडलेल्या यातुविधींचे कालौघात उन्नय, भाद्रपद, आश्विन सर्जन वर्षनाचे महिने, भोंडला वा हादगा, इंद्रपूजेचा संकेत : हादगा, कुमारिकांचे उत्सव भारतभर, वृक्षपूजा : भारतीय जीवन पद्धतीचे वैशिष्ट्य, भुलाबाई, भराडी गौर : कुमारिकांचा कलात्मक उत्सव, इनाई : सरस्वती, बीज : शंकर : क्षेत्रपाळ, खेळणे, मांडणे आणि गाणे, साँझी : मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशातील देखणा, कुमारिकोत्सव, देखणे अंगण दूर चाललेय का ?, कुमारिकांच्या उत्सवातील मूलबंध, समाजव्यवस्थेच्या मुळाशी अर्थव्यवस्था, कन्येचा कृषियातुविधीत महत्त्वाचा सहभाग,*

---

अष्टवर्षा भवेत् गौरी दशवर्षाच कन्यका ।
सम्प्राप्ते द्वादशेवर्षे कुमारीत्यभिधीयते ॥

(कन्या आठ वर्षांची झाली की ती 'गौरी' होते. दहाव्या वर्षी कन्यका होते आणि बाराव्या वर्षी ती कुमारिका होते.)

**स्त्री आणि भूमी यांच्यातील सर्जनक्षमतेबद्दल आदिमानवाला कुतूहल –**

स्त्रीत असणाऱ्या सर्जनशक्तीबद्दल आदिमानवाला नेहमीच उत्सुकता, आकर्षण, भय आणि विलक्षण आदर वाटला आहे. आदिकाळापासून जगण्याचा केंद्रबिंदू जमिनीतून निर्माण होणारे धान्य, कंदमुळे, फळे, पशुधन हा होता. भूमीची सर्जनक्षमता म्हणजेच सुफलनशक्ती वाढली तर धनधान्य समृद्धी निर्माण होते आणि माणसाचे जगणे सुखकर होते. ही समृद्धी निर्माण करण्यासाठी मानवी श्रमाची, हातांची गरज असते याची जाण आदिमानवाला होती आणि मानवी धन निर्माण करण्याची क्षमता, शक्ती स्त्रीत असते. भूमी आणि स्त्री यांच्यातील सर्जनक्षमतेत असणारे साम्य हा मानवाच्या कुतुहलाचा आणि निरीक्षणाचा विषय होता. त्याने या दोहोंच्यातील सर्जनक्षमता वाढवण्यासाठी विविध प्रयोग केले. त्यातूनच मानवाचा प्राथमिक यातुप्रधान धर्म निर्माण झाला.

**मानवाचे प्राथमिक विज्ञान –**

आदिम मानवाचा धर्म केवळ भ्रांतीने भारलेला आहे असे अनेकांना वाटते. पण ते खरे नव्हे. वन्य लोकांच्या धर्मात भ्रांती जरूर आहे पण तिला वास्तवाचा आधार असतो. प्रतीकाचा वापर करून ते सामाजिक गरजा व सामुदायिक हितसंबंध व्यक्त करतात. यातुविद्येचे शास्त्र बुद्धिवादाला पटण्यासारखे नसले तरी ते बिनतोड असते. त्यात संभवनीय गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. [१]दुर्गा भागवत या संदर्भात लिहितात, 'संभवनीयता हे जादूविद्येचे प्रमुख उद्दिष्ट. जादूविद्येचे मुख्य प्रकार दोन. या दोनही प्रकारात क्रिया व क्रियेमागचे तत्त्व यांना प्राधान्य असते.' पहिल्या प्रकाराला Sympathetic - सहानुभावात्मक जादूविद्या म्हणता येईल. दुसरा प्रकार Homeopathic जादूविद्या, या शब्दाचे भाषांतर करणे कठीण आहे असे सांगून दुर्गाबाई त्यासाठी 'समानोत्पत्तिक' जादूविद्या हा शब्द वापरतात. जादू हे मानवाचे प्राथमिक विज्ञान होते असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

**विश्वातील 'असु' शक्ती आणि कृषिविधी –**

स्त्री आणि भूमी यांच्यातील नवनिर्मिती करण्याचे सामर्थ्य जाणून यांच्यातील साधर्म्य आणि सहचर्य यावर निश्चित स्वरूपाचे ठोकताळे त्याने बांधले. यालाच फ्रेझर स्युडोसायन्स (Psudoscience) म्हणतो. या दोनही प्रकारच्या जादूविद्येवर

आधारित असे विधी भूमीची सुफलनशक्ती वाढावी यासाठी कृषिकर्मात निर्माण केले. उदा. पावसाळ्यातले नाच, वाढून डोलणाऱ्या पिकांची नक्कल असते. दुर्गाताई नोंदवतात की झिम्मा, फुगडी ह्या खेळांचे मूळ असेच असले पाहिजे. विश्वातील सर्व वस्तूंमध्ये 'असु' शक्ती असते. ती भूमी व स्त्रीत विशेष करून असते. हे सामर्थ्य विशिष्ट वा विशिष्ट सामूहिक कृतीतून, सामूहिक मंत्रगानातून वाढविता येते वा कमीही करता येते अशी श्रद्धा प्राथमिक कृषिजीवन जगणाऱ्या मानवसमूहात होती. 'भारतीय संस्कृती' चे विवेचन करताना [२] विल ड्युरांट, येथील लोकजीवनाबद्दल नोंदवतात, 'छोटा नागपूरमध्ये कापणीचा हंगाम सार्वत्रिक उच्छृंखल वर्तनाद्वारे एक प्रकारे इशारतच असे. पुरुष सारी सभ्यता व स्त्रिया सारी लज्जा गुंडाळून ठेवीत. आणि तरूण मुलींना स्वाभाविक संपूर्ण मोकळीक असे. राजमहल टेकड्यात परगणाईत नावाची एक शेतकरी जमात असून ते दरसाल शेतकी उत्सव साजरा करीत. या उत्सवात अविवाहितांना संपूर्ण संभोग स्वातंत्र्य मिळे'. शेत आणि कुटुंब सुपीक व्हावे या हेतूने हे उत्सव साजरे केले जात. हे नोंदवताना विल ड्युरांट लिहितात, 'ते प्राचीन जादूटोण्याचे अवशेष होते'.

**विधी : प्रतीकरूपात आराधना –**

पाऊस पडावा म्हणून विवस्त्र स्त्रीच्या देहाभोवती लतावेली गुंडाळून, तिच्या माथ्यावर सच्छिद्र जलकुंभ देऊन तिची मिरवणूक काढतात. या विधीत स्त्रीला भूमीस्वरूप दिले आहे आणि कुंभरूप नभातून तिच्या अंगावर पाऊस पडून वनस्पतीसृष्टी उगवते असे कल्पिले आहे. अशाच एका यात्त्वात्मक सुफलीकरण विधीचे वर्णन [3]बाणभट्टाच्या हर्षचरित्रात आहे. राणी विलासवती पुत्रप्राप्तीसाठी विविध प्रकारे साधना करीत असते. त्यात कृष्ण चतुर्दशीच्या दिवशी रात्री सार्वजनीक चौकात यंत्रपूजा करून नग्न स्नान केल्याचा उल्लेख आहे. स्नान चौरस्त्यावर आणि नग्न होऊन करणे म्हणजे पर्जन्यदेवाने भूमीप्रमाणेच स्त्रीचेही सुफलीकरण करावे ही श्रद्धा या विधीमागे असावी. जलवर्षाव, सूर्यकिरणांचा स्पर्श यामुळे स्त्रिया सुफलित होतात अशी श्रद्धा आजही वन्य समाजातून आढळते. सर्वसाधारण लोकांना लिंग आणि योनी यात अश्लील असे काही वाटत नाही. मॅडोना आपल्या बालकाला स्तनपान देत आहे या चित्राचे चिंतन करताना ख्रिस्ती माणसाच्या मनात आश्लील विचार येत नाहीत तसेच हे आहे. एखादी गोष्ट रुढ झाली की ती उचित मानली जाऊ लागते. तिला कालौघात पावित्र्यही लाभते.

**श्रद्धांतील सारखेपणा –**

अशा तऱ्हेचे समज ऑस्ट्रेलिया, मंगोलिया आदी देशांतही होते. एकूण मानवी संस्कृतीच्या इतिहासातील फार मोठा कालखंड कृषिविषयक यातुविज्ञानाने भारलेला आहे. ऋग्वेद, अथर्ववेद यात वर्णिलेले यातुविधी आजही वन्य समाजात, आदिवासी जीवनात जिवंत स्वरूपात आढळतात. धर्म, जात, वंश, राष्ट्र यात माणूस विभागला गेला असला तरी, प्राथमिक कृषिजीवनात निर्माण झालेल्या भूमीशी निगडित श्रद्धा, आजही सर्वांच्या अंतरंगात सारख्याच आहेत.

**भूमी आणि स्त्रीची विविध रूपे –**

भूमी आणि स्त्री यांच्यातील सर्जनक्षमतेचे साधर्म्य लक्षात घेऊन कृषिविधानाशी संबंधित यातुविधी निर्माण झाले. कालौघात त्यांचे रूपांतर सण, व्रते, उत्सव यात झालेले दिसते. भूमी आणि स्त्री यांची विविध रूपे मानवाने निरीक्षिली. पेरणीसाठी उत्सुक असलेली ग्रीष्माच्या उन्हात....... सूर्यकिरणांत आकंठ न्हाताना सुखावणारी संगमोत्सुक धरणी, पावसाच्या धारात चिंब भिजताना हिरवाईची स्वप्ने रेखाटणारी धरणी, वेली वनस्पती, फुलेफळे यांनी बहारून गेलेली सुफलाम् तृप्त धरणी. अशीच स्त्रीचीही विविध रूपे आहेत.

**कुमारिकेची तीन रूपे –**

कुमारी स्त्रीच्या तीन अवस्था महत्त्वाच्या मानल्या जातात. आठ वर्षांची कन्या 'गौरी' होते. दहाव्या वर्षी ती 'कन्यका' होते. तर बाराव्या वर्षी तिचे 'कुमारिकेत' रूपांतर होते. जन्मापासून ते आठ वर्षापर्यन्त मुलगा आणि मुलगी यांच्यातील नैसर्गिक वेगळेपण दर्शविणारे बदल सुरू झालेले नसतात. आठव्या वर्षापासून सर्वसाधारणपणे ते होऊ लागतात. हे बदल एकूण शरीरात होतात. परंतु विशेषकरून ते सर्जनेन्द्रियात होतात. हे बदल, त्यांना निसर्गाने दिलेले पुरुषत्व वा स्त्रीत्व पूर्णत्वाने सिद्ध करण्यासाठीचे असतात. आठव्या वर्षी दुधाचे दात पडण्यास सुरुवात होते. कुंभार मातीला कुंडीचा आकार देतो. परंतु जोवर ती कुंडी भाजून सर्वांगाने पक्व आणि परिपूर्ण होत नाही तोवर तिच्यात बीज, पाणी, माती यांना धारण करून त्यातून नवनिर्मिती करण्याची क्षमता येत नाही. गौरी, कन्यका या भूमिकातून ती कुमारिका या परिपूर्ण भूमिकेत जाते, तेव्हा तिची सर्जन करण्याची क्षमता पूर्णत्वाला पोहोचते.

**उत्सव न्हाणुलीचा –**

गौरी, कन्या या अवस्थेतून कन्या 'कुमारिका' या अवस्थेपर्यन्त पोहोचताच ती ऋतुमती होते. रजस्वला होते. महाराष्ट्रात विशेष करून मराठवाड्यात या अवस्थेला 'मुलगी शहाणी झाली' हा वाक्‌प्रचार वापरतात. या साठी 'वयात येणे', बाजूला बसणे, 'न्हाण येणे' 'पाळी येणे' हे शब्दप्रयोगही केले जातात. 'मुका नातू' झाला हा वाक्‌प्रयोगही केला जातो. मुलीला पहिल्यांदा न्हाण येते तेव्हा घरात आनंदोत्सव साजरा केला जातो. तिला सन्मानाने मखरात बसविले जाते. तिची फळांनी ओटी भरतात. घरात पक्वान्न करतात. आसपासच्या महिला, नातलग नववयसा मुलीसाठी गोडाधोडाची शिदोरी पाठवितात. घरात 'कानोले' तळतात. ही पद्धत खास मराठवाड्यातील आहे. कानोले म्हणजे करंजीमध्ये गोडाचे सारण भरून तिला, दोन्ही पदर एकत्र करून मुरड घालून बंद केलेली असते. स्त्रियांच्या व्रतांत कानोल्यांना महत्त्व आहे. या संदर्भात मिळालेले उत्तर असे. मुलीने सतत मागे वळून पाहावे माहेरी मुरडून... वळून पाहावे यासाठी कानोले करतात.

पाचव्या दिवशी तिच्या डोक्यावर पाणी घालून मगच तिला स्पर्श करतात आणि सुगंधी तेल उटणे लावून तिला न्हाऊ घालतात. ऋतुमती झाल्यानंतरचे चार दिवस तिला बाजूला बसवले जाते. तिला कोणीही स्पर्श करीत नाहीत. काही कारणांनी स्पर्श करावा लागला वा चुकून स्पर्श झाला तरी स्पर्श करणाऱ्या व्यक्तीला डोक्यावरून आंघोळ करावी लागते. कर्नाटकात, मराठवाड्यात महाराष्ट्रात पूर्वी वाजंत्री लावून, घरोघर साखर वाटून 'मुका नातू' झाल्याचे सांगितले जाई. पाचव्या दिवशी सवाष्णी व कुमारिकांना जेवणास बोलावून सन्मान केला जाई. हळदीकुंकू समारंभ करीत. शिदोरी घेऊन येणाऱ्या महिला तिची खण व पाच फळांनी ओटी भरतात. पूर्वी मुलीचा विवाह न्हाण येण्यापूर्वी होत असे. त्यामुळे नहाण आल्यावर पाचव्या दिवशी तिच्या माहेराहून पलंग, गादी, जोड आहेर, चांदीचा ग्लास अशा वस्तूंचा साग्रसंगीत आहेर केला जाई. या दिवशी मुलीची पतीबरोबर पहिली भेट होत असे.

कन्या साधरणतः वयाच्या १२ व्या वर्षी ऋतुमती होते. 'संप्राप्तेद्वादशेवर्षे कुमारित्यभिधीयते' ते यामुळेच म्हटले आहे. हा आनंद ती 'पूर्ण स्त्री' झाल्याचा असतो. तिच्यातील सुफलित होण्याची क्षमता पूर्णत्वाला पोहोचते. बीज धारण करून त्याला अंकुरित करण्यासाठी लागणारी चेतस्‌शक्ती म्हणजेच सुफलित

करण्याची शक्ती तिला प्राप्त झालेली असते.

कन्या रजस्वला झाली तरच ती 'फळ' धारण करू शकते. म्हणूनच कन्येच्या 'रजस्वला' होण्याचा सन्मान केला जातो. महाराष्ट्रात देवी चे रूप कुमारिकेचे आहे. अंबाजोगाईच्या योगेश्वरीने तर विवाह आवर्जून टाळलेला आहे. कुमारिका ही परिपूर्ण तेजाचे प्रतीक मानली आहे. देवीच्या उत्सवांत, श्रावणात सवाष्णीबरोबर कुमारिकेचा सन्मान जेवण, दक्षिणा देऊन केला जातो. राजस्थानी समाजातही ऋतुमती झाली की गोड जेवण करतात. गाणी म्हणतात.

स्त्रियांच्या उत्सवात गाण्यांना महत्त्व असतेच. काही ओव्या या ठिकाणी दिल्या आहेत.

**ऋतु प्राप्त झाला –**

आज सुदिन उगवला तिला ऋतु प्राप्त झाला
ऋतू प्राप्त झाला ॥
लाजूनी उभी एकीकडे, शिंपी केशराचे सडे
पाट रांगोळ्या तबकी विडे, तिला बसविले ॥
मखरी सोनियाचे खांब आरसे लाविले रुंद रुंद
काचेचे जडित भिंग, वरती राघू कोकिळा ॥
पाची पक्वान्नांचा थाट, अडणीवरी शोभे ताट
भाज्या, चटण्या , कोशिंबिरी, खावे ना तिला ॥
पिवळे पातळ केशरी, चोळी जरी बुट्टेदारी
शोभे दागिने नानापरी, बिंदी बिजवरा ॥
न्हाऊ घातले चतुरदिनी बहुत सुवासिनी
फळांनी ओटी भरुनी, ऋतू प्राप्त झाला ।

**न्हाणुली विवाहिता असे –**

पूर्वीपासून मुलीचा विवाह आठव्या वर्षी होत असे. आजही ग्रामीण भागात पहिल्यांदा नहाण येताच मुलीच्या लग्नाची घाई केली जाते. न्हाणुलीला गायिली जाणारी गाणी परंपरेने चालत आलेली आहेत. यापूर्वी नमूद केले आहे की, पूर्वी

'न्हाणुली' विवाहिता असे व पहिल्या न्हाणानंतर काही दिवसांतच पती पत्नींची पहिली भेट घडविण्याचा विधी केला जाई. या विधीशी संबंधित गाण्यातही तसे संदर्भ आहेत.

**नहाण –**

वेणीमधे हिरवाची मरवा
की आणू केवडा सांग सखे
तू बनलीस मृगनयनी ।।
हिरवा करुनिया साज
नेसलीस पैठणी
अंगी तंग चोळी
तू माझी मृगनयनी ।।
पाचूची अंगठी,
हिरव्या जडिताची चिंचपेटी
गोठ पाटल्यांची दाटी
असे तू मृगनयनी ।।
हिरवे पानदान
पानपुडा चुना बरवा
अडकित्त्याचा रंग हिरवा ।।
हिरव्या जडिताचा पलंग करवा
हिरव्याच गाद्या हिरव्याच उशा
छतावरी रंग हिरवा ।।

**गोरी मालन –**

गोरी मालन : अशी कौतुकाची वेळ
पहिल्या दिवशी पुसावी चौकट
दुसऱ्या दिवशी गोऱ्या मालनीला मांडावा चौरंगपाट

तिसऱ्या दिशी सोनाराला गेली चिठ्ठी
गोऱ्या मालनीला चांदीची ताट वाटी
चौथ्या दिशी सासू करते चौरंगपाणी
गोऱ्या मालनीची माता तिची वंटी आणी
पाचव्या दिशी कासाराला गेल पत्र
गोऱ्या मालनीच्या चुड्याला झाली रात्र
सहाव्या दिवशी अंगणी उभे माळी
मालनीच्या मखराला कंबळ सरश्या केळी
सातव्या दिशी होमाचा होतो धूर
देवकृष्ण नाथ कोमेजला चंद्र नूर
आठव्या दिशी आठ आठ गोळा करा
गोऱ्या मालनीच्या गोताला मूळ धाडा
नवव्या दिवशी सई माडीवर जाते
गोरी मालन गोताची वाट पाहती
दहाव्या दिशी सरी कंठ लेप लेयीली
गोऱ्या मालनीला कुणाची ग दृष्ट झाली
गोरी मालन कृष्णाला देते विडा
अशी कौतुकाची वेळ कृष्णनाथ वंटी घालतो नारळ
वंटी घालतो नारळ ॥

**ऋतुशांती –**

अलीकडे ग्रामीण भागातील मुलींचे विवाह ऋतुमती झाल्यावर दोनतीन वर्षांनी होतात. ऋतुमती झालेल्या मुलीच्या विवाहानंतर सासरी गेल्यावर तिची ऋतुशांती केली जाते आणि त्यानंतर पती पत्नीच्या मिलनास संमती मिळे.

**धर्म, विज्ञान यांचे मूळ ' जादू' –**

[४]डॉक्टर रा.ना. दांडेकर म्हणतात ''देव, मानव, पशु आणि विश्वातील इतर वस्तू या सर्वात यात्वात्मक रज जेवढे जास्त तेवढे त्या वस्तूत बदल अधिक. असु ही शक्ती सर्वव्यापी मानली जात असे. याच शक्तीला वैदिक 'माया ' म्हणतात. [५]फ्रेझर हा लोकविद्या, मानवविकाससंबंधीत शास्त्रांचा थोर अभ्यासक म्हणतो की

'जादू ही धर्माची प्राथमिक अवस्था आहे.' तर्कतीर्थ[५] लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, 'जादू धर्म, विज्ञान यांचे पौर्वापर्य वा साम्य वैषम्य याबाबत पंडीतांत मतभेद असले तरी त्यांची मुळे एकत्रित आढळतात.''

स्त्री ऋतुस्नात झाल्याशिवाय गर्भधारण करण्यास योग्य होऊ शकत नाही तद्वत ग्रीष्म ऋतूत शुष्क झालेली धरणी अंतर्यामी ओलावल्याशिवाय, आर्द्रा झाल्याशिवाय नवसृष्टीचा गर्भ वाहण्यास सक्षम बनत नाही. अशी श्रद्धा आदिमानव समूहात होती. गर्भधारणेपूर्वी स्त्री रजस्वला होते तशीच धरणीही रजस्वला होते अशी आदिमानवाची धारणा होती.

**अंबुवाची उत्सव : पृथ्वीची रजस्वला अवस्था –**

कृषिपराशर या कृषिशास्त्रीय ग्रंथात (रचनाकार सुमारे इ.स. ६ ते ८ वे शतक) पृथ्वीच्या रजस्वला अवस्थेचा काळ आणि त्या काळात वर्ज्य क्रिया यांचा उल्लेख आहे. स्त्रीच्या रजस्वला अवस्थेत पुरुष समागम वर्ज्य मानला आहे. तसेच पृथ्वीच्या रजस्वला अवस्थेत नांगर चालविणे वर्ज्य मानले आहे. नांगर हे पुरुष जननेंद्रियाचे प्रतीक मानलेले आहे. आसामात आषाढ महिन्यात अमती हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. सामान्यतः प्रतिवर्षी मृगशीर्ष नक्षत्राचा चतुर्थ चरण आणि आर्द्रा नक्षत्राचा प्रथण चरण या तुफान वृष्टीच्या काळात कामाख्या ही रजस्वला आहे असे मानले जाते. [७]कामाख्या पीठ भारतातील महत्त्वाचे शक्तिपीठ आहे. येथे सतीची योनी गळून पडली अशी कथा आहे. ही देवी योनीरूप आहे. प्रतिवर्षी आषाढ शुक्ल ६ अथवा ७ पासून १० अथवा ११ पर्यंत अंबुवाचीचा काळ मानला जातो. या काळात आसामातील काही ठिकाणी मातीच्या घटात धान्यबीज आणि पाणी घालून ठेवतात. अंबुवाचीचा काळ संपताच बीजांकुरानी भरलेला घट नदीच्या प्रवाहात सोडून देतात. काश्मिरात हा काळ फाल्गुन पंचमी ते अष्टमी मानला जातो. यास राज्ञीस्नापन म्हणतात. माळवा गुजरातेत तसेच महाराष्ट्रातील काही भागांत राणूबाई रांदल देवी या सूर्यपत्नीची पूजा केली जाते. चैत्रकृष्ण अष्टमी ते पंचमी हा काळ या व्रताचा असतो. महाराष्ट्रात जेथे भातशेती होते तेथे लावणीपूर्वी 'सात' नावाचा विधी केला जातो. नागपंचमीच्या काळातील तीन दिवस शेत नांगरीत वा उकरीत नाहीत असा रिवाज आहे. केरळात उछारल या उत्सवाची माहिती [८]श्री पद्मनाभ मेनन यांनी केरळच्या इतिहासावरील ग्रंथात दिली आहे.

केरळात हा उत्सव शेतीचा हंगाम संपल्यावर मकरम महिन्याच्या अखेरीस (जानेवारी - फेब्रुवारी) साजरा करतात. पहिल्या दिवशी धान्यागारांच्या दारांना काटे व केरसुणीचे फड लावून ती बंद करतात. तीन दिवस ती उघडत नाहीत. या काळात धान्य विकत नाहीत. घर, अंगण, बागा यांची झाडझूड करीत नाही. सारवण वा शिंपण करीत नाहीत. शेतीच्या अवजारांना स्पर्श करीत नाहीत. चौथ्या दिवशी दारे उघडतात. त्यानंतर टोपलीभर पाने शेतात नेऊन खतात मिसळतात. शेताची भाजणी करतात.

बंगालात हा उत्सव आषाढ शुक्ल सप्तमी ते दशमी करतात. या काळात दूधात आमरस मिसळून ते पितात. असे केल्यास वर्षभर सर्पदंशाचे भय राहत नाही अशी श्रद्धा आहे. सर्प हे पुरुषेंद्रियाचे प्रतीक आहे. रजस्वला अवस्थेत पुरुष समागम करीत नाहीत. नाग स्वतः पुरुषाचे प्रतीक असल्यामुळे तो रजोद्रव्य पिणाऱ्यांना स्पर्श करणारा नाही अशी यातूश्रद्धा या दुग्ध आमरस मिश्रित पेयामागे असावी.

ओरिसातील रजउत्सव ज्येष्ठाचा अखेरचा दिवस आणि आषाढातील दोन दिवस अशा तीन दिवसांचा मानला आहे. या काळात नांगर धरणे, पेरणी करणे, खोदणे कुटणे या क्रिया बंद ठेवतात विशेषतः कुमारी मुली आणि नववधू अनवाणी पायांनी भूमीला स्पर्श करीत नाहीत. केवळ फळे खाऊन राहतात. हिंदोळ्यावर झुलत गाणी म्हणतात. महाराष्ट्रातही नागपंचमीच्या काळात झुला अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. नागपंचमीच्या आदल्या दिवसापासून तीन दिवस जमिनीला दुखवीत नाहीत याची चर्चा नागपंचमी उत्सवाच्या वेळी विस्ताराने केली आहे.

**कौमार्य अनाघ्रात असते -**

[१]कौमार्याची कल्पना अतिशय मधुर आणि सुंदर आहे. कौमार्य हे अनाघ्रात असते. स्त्रीजातीची सुकुमारता आणि सर्जन क्षमता त्यातून व्यक्त होते. कौमार्य हे विकासोन्मुख असते. तुळस, जाईची वेल, केळी-कर्दळी, रुई यांची तुलना कुमारिकेशी केली जाते. कवि कालिदासाच्या 'शाकुन्तलम्' मध्ये शकुन्तला जेव्हा दुष्यन्ताकडे जाण्यास निघते तेव्हा जाईच्या वेलीत तिच्या उत्तरीयाचे.... ओढणीचे टोक अडकते. जणु जाईची वेल तिला प्रेमाने अडवीत असते. छिंदवाड्यातील भारिया आदिवासी कुमारिकेला रुईच्या झाडाची उपमा देतात. व्यवहारात सर्वसाधारणपणे ज्या स्त्रीशी पुरुषाचा शारीरिक संबंध आलेला नसतो अशा स्त्रीस कुमारिका म्हटले

जाते. स्त्रीचा पुरुषाशी समागम होऊन ती सुफलित होते व तिच्या गर्भात नवा जीव वाढू लागतो तेव्हा ती गर्भवती होते. तिची कुमारिका अवस्था संपून ती मातृत्वाच्या दिशेने विकसू लागते. बालक जन्माला घातल्यावर ती माता होते.

**कन्या शब्दाची व्याप्ती –**

महाभारतातील वनपर्वाच्या ३०७ व्या अध्यायात सूर्य कुंतीला म्हणतो, ' हे कुंती कन्या शब्दाची उत्पत्ती 'कम्' धातूपासून झाली असून त्याचा अर्थ हव्या त्या पुरुषाची इच्छा करणारी असा आहे. कन्या स्वतंत्र आहे. स्त्रिया व पुरुष यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा आडपडदा असणे ही लोकांची स्वाभाविक स्थिती नसून विवाहादिक संस्कार सर्व कृत्रिम आहेत. यास्तव तू माझ्याशी समागम कर, समागम केल्यावरही तू पुनरपि कुमारिकाच म्हणजे अक्षतयोनी राहशील आणि हा प्राचीन सनातन धर्म आहे.' आदिपर्वाच्या ११२ व्या अध्यायात कुंतीचे व पंडूचे संभाषण दिले आहे. त्यात प्राचीनकालीन स्त्रीधर्माचे निरुपण करताना पंडू म्हणतो, 'अतिप्राचीनकाळी कन्या कौमार्यावस्थेपासून पतिमर्यादेचा अतिक्रम करीत व तो अतिक्रम अधर्म समजला जात नसे. हे सारे तत्कालीन समाजाला संमत होते. पुढे तो सांगतो की, हे सनातन धर्मतत्त्व स्त्रियांना सुखप्रद असल्यामुळे उत्तर कुरु क्षेत्रात हा व्यवहार आजही (महाभारत काळात) आहे.'

यु म्हणजे जुडणे. युवक म्हणजे जुडणारा वा समागम करणारा. अतिप्राचीन आर्षसमाजात समागम करण्यास योग्य अशा युवक, युवतीना संभोग करू देत.

**स्त्रियः पवित्रमतुलम् –**

यावरून असे लक्षात येते की, 'कुमारिका ही सुफलित होण्यासाठी सर्वांगाने उत्सुक आणि उत्फुल्ल अशी, जिच्यातील उर्वरा शक्ती वा सर्जनक्षमता पूर्णत्वाला पोहोचलेली आहे, यातुशक्तीने अपरंपार भारलेली जणु भूमीच, अशी श्रद्धा अतिप्राचीन काळी असावी. वराहमिहीर बृहत्संहितेमध्ये लिहितो –

स्त्रियः पवित्रमतुलं नैना दुष्यन्ति कर्हिचित्।
मासि मासि रजोह्यासां दुष्कृतान्यपकर्षति ॥
(वराहमिहिर इ.स. पूर्व ३३)

अतुलनीय शुद्ध स्त्री जीवन कशामुळेही डागाळले जात नाही. कोणत्याही कलंकांचा निरास दर महिन्याला करणारी शक्ती निसर्गतःच त्यांच्या ठायी आहे.

**कन्याराशी : एका हातात धान्याचा अंकुर दुसऱ्या अग्नी –**

अतिप्राचीन समाजात 'स्त्री' ही सर्जनाचा केन्द्रबिंदू मानल्याने त्यांच्या सर्व रु पांना समाजात सन्मान होता. निर्णयाचे स्वातंत्र्य होते. त्या करारी, शेतीउत्पादन करणाऱ्या, उत्पादनाचे कुलात योग्य रीतीने वाटप करणाऱ्या, वस्त्र विणणाऱ्या, कुल-वा त्या वसाहतीचे व्यवस्थापन करणाऱ्या असत. त्यामुळे आजही प्राचीन देवींची रूपे पाहिली तर त्यांच्या एका हातात धान्याचे कणीस तर दुसऱ्यात परशु वा शस्त्र दिसते. कन्या रास ही बारा राशीपैकी सहावी. दीपिका या ग्रंथात तिचे वर्णन, 'तिच्या एका हातात धान्याचा अंकुर व दुसऱ्या हातात अग्नी असून, तिचे नौकेत उभी असलेली स्त्री' असे केले आहे. ती अग्नीसमान तेजस्वी आणि पृथ्वीसमान नवनिर्मिती करणारी असते असा समज समाजात होता. जिथे संवेदना असते तिथेच निर्मितीची शक्ती असते. व्यास महर्षिनी द्रौपदीचे व्यक्तिचित्र रंगवताना भाविनी, मनस्विनी, अग्निकन्या ही तीन विशेषणे वापरली त्या मागे हीच भूमिका असावी.

सातपुड्यातील देवीमोगऱ्याची याहामोगी देवता समृद्धीची देवता आहे. तिला नैवेद्य अर्पण केल्याशिवाय ते नवे धान्य घरात आणत नाहीत. असाच रिवाज महाबळेश्वर परिसरातील ठाकर समाजात आहे. योगेश्वरीच्या हातातही धान्याचे कणीस आहे आणि ती कुमारिका आहे.

**हिंदुस्तानचे बदलते रूप आणि स्त्री –**

सर्वसाधारणपणे महाभारत काळापासून, अतिप्राचीन काळात स्त्रीचे समाजात असलेले स्थान आणि रूप बदलत गेले. पूर्ववैदिककाळात स्त्रीला नंतरच्या मानाने अधिक स्वातंत्र्य होते. ती वेदान्तचर्चेत गार्गीप्रमाणे भाग घेऊ शके. कुटुंबसंस्था उत्तरोत्तर पुरुषकेन्द्री झाली. तरीही पुनर्विवाह करण्यास तिला कसलीही आडकाठी नसे. मात्र शौर्ययुगात स्त्रीचे स्वातंत्र्य काहीसे हिरावले गेले. 'स्त्रीने वेदाध्ययन करणे हे देशात बजबजपुरी माजल्याचे लक्षण आहे' असे सांगून तिला अध्ययनापासून परावृत्त केले गेले.

[१०]विल ड्युरांटच्या मते वैदिक हिंदुस्तानने (ख्रि.पू. २००० ते १०००)

शौर्ययुगात (खि.पू. १००० ते ५००) प्रवेश केला. वेदांत वर्णिलेल्या परिस्थितीतून रामायण, महाभारत या महाकाव्यात चित्रित केलेल्या परिस्थितीत प्रवेश केला. व्यावसायिक चौकटी कठोर होत गेल्या. आनुवंशिकता आणि जातिभेद कडक होत गेले. स्त्रियांभोवतीची बंधने अधिक कठोर होत गेली आणि पुढे मध्ययुगात त्याची परिसीमा झाली. कारण भारतावरील परकियांची आक्रमणे वाढली.

**लिंग–निसर्गनिर्मित तर, लिंगभाव–समाजनिर्मित –**

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. अतिप्राचीन काळात स्त्रीच्या सर्जनक्षमतेबद्दल मानवसमूहात गूढतामिश्रित कुतुहल आणि भययुक्त आदर असल्याने, स्त्री आणि पुरुष या दोनही लिंगांना – ही लिंगे धारण करणाऱ्यांना समान मानले होते. किंबहुना स्त्री बद्दल विषेश आदराची भावना होती. 'मदर गॉडेस' – आदिमाता – आदिशक्तीची संकल्पना त्यातून आली. ही दोनही लिंगे समर्पित भावनेने एकत्र आल्याशिवाय सर्जन होत नाही याची जाणीव त्यांना झाली. योनिपूजा आणि लिंगपूजा अतिप्राचीन काळापासून भारतात रुढ आहे. 'बीजा' चे महत्त्व जाणल्यावर दैवी दाम्पत्याची संकल्पना निर्माण झाली. सुरुवातीस या दांपत्यातील उभयतांचे स्थान बरोबरीचे...समान होते. उत्तरोत्तर त्यात परिवर्तन होत गेले. शिव आणि पार्वती हे आदिदाम्पत्य सोडल्यास इतर दाम्पत्यांत 'स्त्री'ला दुय्यमत्व येत गेले. ज्या देशात.....मानव समूहांत कृषिजीवींचे स्थान मध्यवर्ती वा महत्त्वाचे होते तेथे मातृसत्ताक समाजव्यवस्था होती. भारतातील अतिप्राचीन समाज कृषिजीवी होता. मातृसत्तेचे अंधुक अवशेष केरळातील नायर, हिमालयातील खासी जमातीत सापडतात. भारताचा इतिहास द्रविड, आर्य, दस्यु, नाग, असुर, पणिन्,दास अशा अनेकविध टोळ्यांच्या आगमनातून, त्यांच्यातील संघर्ष, समन्वय आणि स्वीकार प्रक्रियांतून घडत गेला आहे. मात्र आजही अतिप्राचीन काळापासून भारतीय लोकजीवनाचे कृषिजीवनाशी असलेले.....जडलेले अतूट नाते, भारतभरच्या विविध सणांतून, व्रतांतून, वीधीतून आणि त्यांच्याशी जोडलेल्या गीतांतून दृगोचर होते आणि त्यातून प्रथमावस्थेतील कृषिजीवनात स्त्रीच्या विविध रूपांना समाजात असलेले महत्त्वाचे स्थान आणि त्यांची समाजातील तसेच कुटुंबातील सन्माननीयत्व जाणवते. जोवर कृषि आणि कृषिनिर्भर (वस्त्र इ. व्यवसाय) व्यवसायातून स्त्रियांचा उत्पादक म्हणून सहभाग होता तोवर त्यांना निर्णयात सहभागी होता येत होते. चाक, नांगर आदी यंत्रांचा शोध, तसेच टोळ्यांत सातत्याने होणारे संघर्ष, गणसत्ताक

व्यवस्थेतून राजसत्ताक व्यवस्थेत होत जाणारे परिवर्तन त्यातून निर्माण हाणारी अस्थिरता यामुळे मानवी विकासाच्या एका टप्प्यावर स्त्रियांचे समाजातील व कुटुंबातील स्थान दुय्यम होत गेले. घराच्या चौकटीत त्यांचे व्यक्तिमत्त्व बंदिस्त झाले. त्यांनी अध्ययन करू नये, प्रश्न विचारू नयेत, वाट्याला आलेले जिणे जगावे असे संकेत निर्माण झाले.

**स्त्रीच्या स्थानातील परिवर्तन : त्याचा व्रत, विधी, उत्सव यांवर परिणाम –**

पुरुष आणि स्त्री यांना निसर्गाने समान बुद्धी दिली, स्वरयंत्र दिले, विचार करण्याची शक्ती दिली, परंतु समाजाने त्यांच्यात हीनभाव निर्माण केला. सामाजिक न्यायापासून त्यांना वंचित ठेवण्याचा पायंडा पडला. त्यांचा समाजातील वावर बंदिस्त झाला. भूमी आणि स्त्री यांच्यातील सर्जनक्षमतेचे सामर्थ्य लक्षात घेऊन निर्माण झालेल्या प्राथमिक कृषिजीवनात निर्माण झालेल्या विधींमध्ये, उत्सवांमध्ये बदल होत गेले. या उत्सवात गायले जाणारे मूळ मंत्र, वा गाणी यांच्या आशयात व अभिव्यक्तीत बदल होत गेले. उदा. भोंडला भुलाबाई सारख्या वर्षनसर्जनशी जोडलेल्या कुमारिकाच्या उत्सवातील मूळ गाणी लोप पावून, त्यात सासरी होणाऱ्या छळाचे वा गुदमरलेल्या श्वासाचे चित्र रेखाटले जाऊ लागले. मानवी विकासाच्या प्रवासात कुमारिकेला विवाहाच्या संदर्भात असलेले स्वातंत्र्य वा मोकळीक संपली. १५-१६ वर्षांच्या युवतीला सद्योतवधू..... गृहिणी व्हायचे की साधना करणारी ब्रह्मवादिनी व्हायचे याचा निर्णय घेण्याची सुविधा नष्ट झाली. आठ वर्षांच्या कन्येचा विवाह झालाच पाहिजे. ही प्रथा रुढ झाली. अर्थातच त्याचा परिणाम, या विधी, उत्सव, व्रतांवर झाला. श्रावणातील विविध व्रते व सण, भाद्रपदातील गौरीगणपती, भुलाबाई, आश्विनातील नवरात्र, इनाई, हादगा वा भोंडला, भराडी गौर, मार्गशीर्ष, पौषातील सटीचे नवरात्र, शाकंभरी, संक्रान्त, फाल्गुनातील वसंतोत्सव, चैत्रातील गौर, वैशाखातील अक्षय्यतृतीया, कानबाई इत्यादी सणव्रतोत्सवांच्या खोलात शिरल्यास आदिमकाळातील प्राथमिक कृषिप्रधान संस्कृतीत निर्माण झालेल्या या व्रत, सण, विधी व उत्सवांमागील, कृषिउत्पादनांच्या समृद्धीसाठी, जमिनीची सुफलन शक्ती वाढावी यासाठीची श्रद्धा स्पष्टपणे जाणवते. त्या संकेतातून एकात्म भारतीय संस्कृतीच्या विकासातील काही महत्त्वाची पाने हाती लागतात त्यातून भिन्न भाषा, भिन्न वेश, भिन्न रीतीरिवाज यांनी नटलेल्या भारतीय जीवन पद्धतीतील सर्वांगीण एकात्मतेचे, कृषिविकासातील स्त्रियांच्या कृतिशील सहभागाचे आणि

समाजातील स्त्रियांबद्दलच्या विश्वासार्हतेचे काही मुद्दे हाती येतात.

**भारतीय व्रतोत्सवांत कुमारिकांना विशेष स्थान –**

विवाह न झालेल्या, पुरुषांशी संबंध न आलेल्या, अनाघ्रात स्त्रीस कुमारिका म्हणतात. प्राचीन काळी स्त्रिया आजन्म अविवाहित राहत, त्यांना वृद्धकुमारी, जरत्कुमारी, ब्रह्मकुमारी असे म्हणत. असे अष्टाध्याईवरून कळते (अष्टा. २.२५) तुळस ही कुमारिकेचे प्रतीक असून कार्तिकात तिचा बाळकृष्णाशी विवाह झाल्यानंतरच विवाहमुहूर्त काढण्याची प्रथा आहे. मध्य प्रदेशातील एका ब्राह्मण जातीत वयात येणाऱ्या कुमारिकेच्या चोळीवर तुळसमंजिरी, रुईफुले यांचा कशिदा काढण्याची प्रथा आहे. भारतीय व्रतोत्सवांत कुमारिकांना विषेश महत्त्व असते. भारतातील वस्त्र विणण्याची कला स्त्रियांनी विकसित केली. 'वयन्ति' या शब्दाला पुल्लिंग नाही. पूर्वी विणण्याचा व्यवसाय स्त्रियाच करीत असाव्यात. भरतकाम आणि विणकामात रुईचे फुल, तुळसमंजिरी, वृंदावन, मोर यांना विषेश महत्त्व आहे. धनधान्य समृद्धीशी संबंधित व्रते कुमारिकांच्या सहभागाशिवाय पूर्णत्वाला जात नाहीत. कुमारिकांमधील सुफलनशक्ती पूर्णत्वाला पोहोचलेली असते ही श्रद्धा जगभरच्या संस्कृतींमध्ये होती. म्हणूनच त्या कृषिसंबंधित विधींमध्ये-सणांमध्ये अत्यन्त महत्त्वाच्या पूजनीय अशा मानल्या जातात. अंबाजागाईची योगेश्वरी-जोगाई, कन्याकुमारी या कुमारीमाता आहेत. 'कुमारी पुत्र' या संकल्पनेलाही समाजात विषेश स्थान मिळाले. दैवीप्रसादामुळे कुमारिकांना झालेले पुत्र दैवी शक्तीने भारलेले असतात, असा कथाबंध सर्वत्र आढळतो. एखाद्या वस्तूच्या स्पर्शाने, सूर्यकिरण स्पर्शाने वा एखाद्या सरोवरात स्नान केल्याने गर्भधारणा झाल्याच्या कथा लोकसाहित्यात आढळतात. कुंतीला कौमार्यभंग न होता 'कर्णा' सारखा तेजस्वी पुत्र झाला. महात्मा येशु ख्रिस्त हे 'कुमारीपुत्र' होते.

**आठव्या वर्षीच विवाह का ? –**

आठ वर्षे, दहा वर्षे आणि बारा वर्षे हे कुमारी अवस्थेचे तीन महत्त्वाचे टप्पे. सोम, गंधर्व आणि अग्री हे कन्येचे दैवीपालक मानले आहेत. सोम तिचा प्रथम उपभोग घेतो, १०व्या वर्षी तिचे स्तन पुष्ट होऊ लागल्यावर गंधर्व तिचा उपभोग घेतो आणि रजोदर्शन झाल्यावर अग्री तिचा उपभोग घेतो. म्हणून तिघांनी उपभोग घेण्यापूर्वीच

वयाच्या ८ व्या वर्षी तिचा विवाह करण्याची रुढी पडली असावी. 'भारतीय विवाह संस्थेचा इतिहास' या शोधग्रंथात इतिहासाचार्य [११]कै. वि. का. राजवाडे नोंदवितात की, अग्नी आणि प्रजोत्पादन यांचा नित्य संबंध दाखवणारी अनेक वाक्ये ऋग्वेद आणि यजुर्वेदात आहेत. 'प्रजनन ज्योतिः' (तै.सं. कांड ७, प्रपाठक, अनुवाद) या वाक्यात पुरुष जननेन्द्रियाला अग्नीची ज्योत म्हटले आहे. सुमारे बावीसशे वर्षांपूर्वी मनुस्मृती लिहिली गेली. त्यावेळीही ८ व्या वर्षी मुलीचा विवाह करावाच हा सामाजिक संकेत होता. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' म्हणणारा मनुही, गर्भवती स्त्रिया, वधू आणि युवती यांना पाहुण्यांच्या अगोदर जेवण द्यावे' असे म्हणतो. राजस्थानी समाजात, विवाहप्रसंगी देवक मांडताना जेथे अग्नी पेटविला जातो तेथेच पहिली रात्र नववधूवरांना काढावी लागते. अतिप्राचीन समाजात अग्निकुंडाजवळ, अग्नीच्या साक्षीने समागम केल्यास प्रजावृद्धी होऊन मनुष्यबळ वाढते अशी समजूत होती.

**गौरी : अष्टवर्षा कन्या –**

काळाच्या ओघात, स्त्री ही भूमीस्वरूप असून तिच्यावर विशिष्ट पुरुषाची मालकी असली पाहिजे, त्याने बीज पेरावे आणि उगवलेले पीकही घ्यावे ही रूढी निर्माण झाली. त्यातूनच तिच्यात स्त्रीत्वाची वैशिष्ट्ये निर्माण होण्यापूर्वी, सोम गंधर्व अग्नी यांनी तिचा उपभोग घेण्यापूर्वीच तिचा नियंता, मालक ठरविला जाऊ लागला.

वा. शि. आपट्यांच्या संस्कृत शब्दकोशातील अर्थानुसार 'गौरी' म्हणजे आठ वर्षांची, अनाघ्रात - Virgin अशी पवित्र कन्या तसेच गौरी म्हणजे पृथ्वी (The Earth) वरुण पत्नी (Wife of Varuna), तुळशीचे झाड, माल्लिका उर्फ जाईची वेल हे होत.

महाराष्ट्रात गौरीचे व्रत भाद्रपदात विविध प्रकारे पाळले जाते. गौरी म्हणजे अनाघ्रात अष्टवर्षा कन्या. कोकणातील चान्द्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या समाजात अष्टवर्षा अनाघ्रात कुमारिका तेरड्याची झाडे एका नव्या कापडात गोळा करून आणते. त्यालाच 'गौरी' म्हणतात. ही झाडे एखाद्या तांब्यात एकत्र ठेवून त्यांना 'गौर' म्हणून वस्त्रे दागिने घालून मांडतात. अष्टवर्षा कन्या ती झाडे घेऊन संपूर्ण घरातून फिरते. प्रत्येक खोलीत प्रवेश करताना तिला विचारतात -

गौराई गौराई काय दिसतय?
हिरामाणक्यांनी भरलेल घर दिसतय,
गौराई गौराई काय पाहतेस?
घरभर भरलेली समृद्धी पाहतेय.

गौर आणतानाची गाणीही अशीच असतात.

''गवराय आली गवराय आली''
''कोणत्या पावलान?''
''हळदी कुंकवाच्या''
''हिऱ्या माणकांच्या...''


गौर ही समृद्धी देणाऱ्या भूमीचे, सुफलनशक्तीने परिपूर्ण असलेल्या पवित्र अशा भूमीचे रूप असावे. 'गौर' म्हणजे तुळस. गौरीच्या काळात गायल्या जाणाऱ्या गीतात तुळशीचे संदर्भ विपुल प्रमाणात येतात.

रानामागली तुळस पानाफुलांनी भरली
जोडव्याच्या नादी गौर माझी लावली.....
बरवे रान कशाचे?
बरवे रान तुळशीचे
तुळस गुंफा जाळी लंका
जाळी जळो काजळ पडो
ते बाई काजळ आम्ही दोघी लावू
गौराईच्या माहेरी तांब्याच्या चुली.....

गौरी म्हणजे पृथ्वी. आठ वर्षांच्या मुलीत, स्त्रीत्वदर्शक बदल होण्यास सुरुवात होत असावी असा समज प्राचीन कृषिसमाजात असावा. हे व्रत भाद्रपदात येते. तेव्हा पिके बाळरूप असतात परंतु निसवण्याअगोदरची झळाळी त्यावर पसरलेली असते. पिके आणि समृद्धी, 'गौरी' रूपात असतात. तिची केली जाणारी ही पूजा असेल का ? लक्ष्म्या वा गौरी व्रतात 'कुमारिके'स सन्मानपूर्वक भोजन दिले जाते. सवाष्णीही अर्थात असतातच.

**कोकणस्थ ब्राह्मण समाजातील 'बोडण' –**

सुमारे ऐंशी टक्के कोकणस्थ ब्राह्मण समाजाची कुलदेवता अंबाजोगाईची योगेश्वरीदेवी आहे. ही देवी कुमारी आहे. या समाजात विवाह, मौंज, वास्तुशांत या सारखे महत्त्वाचे विधी घरात संपन्न झाल्यानंतर, तसेच नवस बोलल्यास बोडण भरण्याचा विधी केला जातो. त्यात 'कुमारिका' महत्त्वाची असते. बोडण शुक्रवारी वा मंगळवारी-देवीच्या वारी भरतात. ज्या घरी बोडण भरायचे त्या घरी तीन सवाष्णी



**बोडणाची रांगोळी**

बाहेरच्या, एक सवाष्ण घरची आणि एक कुमारिका बाहेरची म्हणजे दुसऱ्या घरची बोलावतात. त्या घरी आल्यावर तुळशीला पाणी घालून, तुळशीजवळ त्यांचे पाय धुतात. हळदीकुंकू देऊन ओटी भरतात. प्रथम पाय धुऊन ओटी भरतात ती कुमारिकेची. त्यानंतर सवाष्णींची. त्या घरात आल्यानंतर बोडण भरण्यास सुरुवात होते. परातीत अन्नपूर्णा मधोमध ठेवतात. त्यावर कणकेचे पाच दिवे लावतात. कुमारिका महत्त्वाची असते. या परातीत एकेक वाटी दूध, दही, तूप, साखर आणि मध ओततात. घरची प्रमुख सुवासिनी अत्यन्त नम्रतेने कुमारिकेस विचारते 'देवी, आणखीन काय पाहिजे?' ती या पाच पदार्थांपैकी मागेल तो पदार्थ त्यात-परातीत टाकायचा. मग सगळ्या जणी पदार्थ एकत्र करून कालवायला लागतात. मायलेक, सासूसून सवाष्णी म्हणून एकत्र बसत नाहीत. तसेच कुमारिका दुसऱ्या घरचीच

बोलावतात. बोडण भरताना एखादीच्या अंगात संचार होतो. तिला मग प्रश्न विचारतात. शकुन विचारतात. बोडणातील अन्नपूर्णेला वाहण्यासाठी कणकेचे दागिने करतात. त्यात बांगड्या, मंगळसूत्र, कुंकवाचा करंडा असतोच. तसेच कणकेची घागर लहानशी वा कुंभ करून त्यात थेंबभर दूध घालून तो कुंभ कणकेच्या झाकणाने बंद करतात. हे दागिने कुंभ देवीसमोर ठेवतात. आधी गणपतीची पूजा होते. नंतर अन्नपूर्णेची पूजा करतात. आरती केल्यानंतर बोडण कालवण्यास सुरुवात होते.

मराठवाड्यात कोकणस्थ समाज मोठ्या प्रमाणावर स्थिरावला आहे. विवाहात मुलीला अन्नपूर्णा आणि बाळकृष्ण देण्याची परंपरा आहे.

बोडणाचे ताम्हण वा परात ठेवतात, त्या खाली विशिष्ट रांगोळी काढतात. ती बोडणाचे वेळी काढावीच लागते.

**कुवांरभूमीची पूजा : कुमारीपूजा –**

श्रावण शुक्रवारी जिवतीची पूजा केली जाते. घरातील मुले निरोगी राहावीत, घर मुलाबाळांनी भरलेले राहावे यासाठी शुक्रवारी पुरणाचा नैवेद्य करतात. लेकुरवाळ्या स्त्रीस जेवण्यास बोलावून तिचा सन्मान करतात. त्या दिवशी सवाष्णीबरोबर कुमारिकेस बोलविले जाते. कुमारीपूजेचे विशेष महत्त्व नवरात्रात असते. नऊ दिवस कुमारिकेस जेवण्यास बोलवतात. हे शक्य नसेल तर तिला दूधसाखर तरी देतात. काही घरांतून पहिल्या दिवशी एक दुसऱ्या दिवशी दोन अशा चढत्याक्रमांनी नवमीस नऊ कुमारिकांची सन्मानपूर्वक पूजा करतात. त्यांचे पाय धुतात. त्यावर हळदकुंकू चढवतात. दूध वा खिरीचा प्रसाद देतात. काही घरी रोज एक नवा पदार्थ वाढवतात. त्यात फळांचाही समावेश असतो. गणेश ही प्राचीन लोक देवता असून तिच्या हातात विविध फळे आणि तांदळाच्या ओंब्या आहेत. लक्ष्मी, गणेशाच्या हातात कमळ आणि डाळिंब आहे. ग्रीक स्त्री देवतांच्या हातात डाळिंब असते. डाळिंबाचा रंग लाल, मासिक पाळीचा रजस्वल रंग लाल. म्हणून या रंगाचा संबंध सुपीकतेशी जोडला असावा. नर्मदेत सापडणाऱ्या लाल गोट्यांना गणेश दगड म्हणतात. गणेशफुलांचा रंगही लाल. सरस्वती ही कौमार्याचे प्रतीक मानली जाते. तिच्या संदर्भातला एक श्लोक असा –

१२ तव करकमलस्था स्फाटिकिंमक्षमाला
नरवकिरणविभिन्ना दाडिमीबीजबुद्धया
प्रतिखलुमनुकर्षन् ये न कीरो निशिद्धः
सभवतु मम भुत्यै वाणी ते मंदहासा ॥

गणेश आणि सरस्वती या ज्ञानदायक देवता मानल्या जातात. चान्द्रसेनी कायस्थ प्रभूंमध्ये नवरात्रात कुमारिकांना दिल्या जाणाऱ्या प्रसादात डाळिंबाच्या दाण्यांचा आवर्जून समावेश असतो.

१३ ही कुमारिका निरोगी, अव्यंग, निर्दोष, परिपूर्णा असावी असा संकेत असतो. ती साधारणपणे दोन ते दहा वर्षांची असावी असा प्रघात आहे. कुमारी पूजा करताना पुढील मंत्राने तिचे आवाहन करतात –

मंत्राक्षरमयी लक्ष्मीं मातृणाम् रूपधारिणीम् ।
नवदुर्गात्मिका साक्षात् कन्यामावाहयाम्यहम् ॥

(मंत्रक्षरमय, लक्ष्मीस्वरूप, मातृकांचे रूप धारण करणारी व साक्षात नवदुर्गात्मिका अशा कन्येचे मी आवाहन करतो.)

लक्ष्मी वा समृद्धीची सर्व रूपे मूलतः कुमारिका असणाऱ्या कन्येने धारण केली आहेत. आदिमाया वा प्रकृती ही कुमारिका आहे. नवरात्रीची पूजा ही सुफलनशक्तीची पूजा आहे. धनधान्य समृद्धीचे कारण असणाऱ्या उर्वरा वा सर्जनशक्तीने परिपूर्ण असलेल्या अनंत, अक्षय, अभंग असणाऱ्या 'कुमारिका' भूमीची ती पूजा आहे.

**अन्नसमृद्धीशी जोडलेल्या यातुविधींचे कालौघात उन्नयन –**

प्राथमिक अवस्थेतील कृषिप्रधान मानवसमूहाने, सुफलीकरणासाठी यातुविधी करण्याची परंपरा निर्माण केली असावी. सर्जन आणि वर्षन या दोन्ही क्रिया सर्वसाधारणपणे आषाढ, श्रावण, भाद्रपद आणि आश्विन या महिन्यांत कृतिशील असतात. पाऊस पडला तर धरणीच्या गर्भात बियाणे रुजून धान्य हाती येणार. भारतातील सुमारे ७० टक्के समाज आजही शेतीवर अवलंबून आहे. प्राचीन काळी अन्न हेच जीवन असल्याने आदिमानवाचे आर्थिक, सामाजिक आणि मानसिक व्यवहार 'शेती' वर केंद्रित झालेले असत. एकूणच लोकधर्म कृषिप्रधान होता. कृषिकर्माशी संबंधित यातुविधींची परंपरा अत्यन्त प्राचीन आहे. निसर्गात सातत्याने

घडणारे बदल-ऊन, पाऊस, जनन, मरण, वनस्पती जीवन, बदलणारे ऋतू - आदिमानवाला अद्भुत वाटत. या क्रियांवर नियंत्रण करण्याची शक्ती मिळविणाच्या दुर्दम्य आकांक्षेतून सामूहिक यातुविधींची निर्मिती झाली असावी. जमिनीची सुफलनशक्ती वाढून अपरंपार धान्य निर्माण व्हावे, वेळवर पाऊस पडावा इत्यादी कृषीशी जोडलेल्या घटनांसाठी सामूहिक यातुविधी केले जात. आदिम मानवसमूहाची एकूण जीवनपद्धती 'यातु' विधींनी नियंत्रित होती असे मानले जाते. या यातुविधींचे सामर्थ्य समूहाच्या, मानसिकेत होते. वेद काळतही अन्नसमृद्धीसाठी सामूहिक प्रार्थना म्हटल्या जात. छांदोग्य उपनिषदात [१४] 'उद्गीथ' आहे 'उद्गीथ' म्हणजे अन्नसमृद्धीसाठी गायलेली गाणी. उद् म्हणजे श्वसन, गी म्हणजे वाणी आणि थ म्हणजे अन्न. संपूर्ण जगाचे जीवन अन्नावर निर्भर आहे याची जाणीव प्राचीन मानवाला होती. श्रम सुकर व्हावेत यासाठीही सामूहिक गीते गायिली जात असावीत. सामूहिक स्वरांमध्ये एक झपाटलेली लय असते. त्या लयीचा परिणाम परिसरावर, वातावरणावर होत असतो. या सामूहिक मंत्रात्मक गीतांचे कालौघात उन्नयन झाले असावे. हे यातुविधी सणांच्या, व्रतांच्या, उत्सवांच्या माध्यमातून तत्संबंधी गीतांतून जतन केले गेले.

**भाद्रपद, आश्विन सर्जन वर्षनाचे महिने –**

पाऊस यावा, सुफलनशक्ती वाढावी, भूमीचे रक्षण करणाऱ्यांची आराधना करावी या उद्देशाने केले जाणारे यातुविधी सामूहिक रूपात आणि प्रत्यक्ष नाट्याच्या स्वरूपात भूमीवर, उघड्यावर केले जात असावेत. आजही चांदण्या रात्री आदिवासी स्त्री पुरुष...तरूण म्हातारे, सारेच एकत्र येऊन मध्यात भाताची रास ठेवून, जवळ दिवा लावून 'घेना'...नमन गातात.

घेना गायल्या रे आप धरतारी देवा
घेना गायल्या रे आप घरतरे
घेना गायल्या रे आप कणसरी देवा
घेना गायल्या रे आप कणसरे....

हा 'नारन' देवाचा धावा पिकाच्या समृद्धीशी असून भाद्रपदात नवे धान्य खाण्यापूर्वी केला जातो. महाराष्ट्रात भाद्रपद, आश्विनात कुमारिकांचे खेळोत्सव सामूहिक रीतीने साजरे होतात.

विदर्भ खानदेशात भुलाबाई हा कुमारिकांचा खेळोत्सव साजरा करण्याची परंपरा आहे. तर कोकण पश्चिम महाराष्ट्रात हादगा व भोंडला मांडला जातो. भुलाबाई भाद्रपद पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमेपर्यंत बसवली जाते. हादगा हस्त नक्षत्रात मांडतात तर भोंडला नवरात्राचे १० दिवस खेळला जातो. विदर्भात याच काळात भराडी गौर आणि इनाई हे उत्सव कुमारिका साजरे करतात. आश्विन महिन्याला उत्तरेत 'क्वारका महिना' असे म्हटले जाते. खरिपाची...पाऊस काळात पेरलेली पिके या काळात निसवून त्यात अन्नरस भरले जातात. बीजाचे बाळपण जाऊन पुनर्निर्मिती करण्याची क्षमता, शक्ती त्यांच्यात येते. धरणीच जणु या काळात भराला येते. धरणीची सुफलनशक्ती पूर्णत्वाला पोहोचण्याचे हे दिवस. जणु या काळात ज्यांच्यातील असुशक्ती पूर्णत्वला पोहोचलेली आहे अशा कुमारिकांनी धरतीवर फेर धरावेत, मंत्रात्मक स्वर समूहाने गावेत, त्यामुळे भूमीची सुफलन शक्ती वाढून अन्नसमृद्धी आसंडून निर्माण होईल अशी धारणा या उत्सवांमागे असेल का ?

या विश्वाचे व्यवहार सुरळीतपणे चालविणारी एक अद्‌भुत शक्ती आहे, ती सृजन करते, संवर्धन करते, तशीच ती संहारक आहे. ही शक्ती कल्पनारूप, अमूर्त आहे. तसेच ती रसमय आहे. विश्वातील सर्व वस्तूंमध्ये [१५]'असु' नामक यात्वात्मक शक्ती असते. ती निरनिराळ्या वस्तू वा व्यक्तीच्या ठिकाणी कमीअधिक प्रमाणात असते. ही शक्ती विशिष्ट मंत्र वा विधींच्या साहाय्याने वाढविता वा कमी करता येते. वरुण ही पर्जन्य देवता तिला 'असुर' म्हणत. 'असु' शक्तीने भारलेला तो असुर. भाद्रपद, आश्विन हे दोन महिने वर्षनसर्जनाच्या कळा पूर्णत्वाला पोहोचण्याचे महिने. त्या काळात भोंडला, हादगा, भुलाबाई हे कुमारिकांचे खेळोत्सव साजरे होतात ही बाब महत्त्वाची आहे.

**भोंडला वा हादगा –**

वर्षाकाळाचे चारही महिने भूमीची सुफलनशक्ती वाढण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे. भारतीय सण, व्रते, उत्सव आदींचा आढावा घेतल्यास लक्षात येते की, या काळात पूजली जाणारी दैवते, पाऊस आणि भूमी यांच्याशी निगडित आहेत.

भोंडला या शब्दाची व्युत्पत्ती लोकवाङ्मयाच्या अभ्यासक दुर्गाबाई भागवत[१६] यांनी चार प्रकारे मांडली. ती खालीलप्रमाणे –

१. भूमंडल - भोवंडल - भोंडला

२. कोकणात उंडणीची फुले, ज्याला पुन्नागाची फुले म्हणतात. ती विपुल असतात. ही झाडे अतिशय शोभिवंत असतात. या फुलापानांचा हा उत्सव असावा.

बहू + उंडल - भोंडल -भोंडला


३. कोकण हा भात शेतीचा भाग तेच महत्त्वाचे अन्न

बहू + तेंडूल - तेंडूल - भोंडला

४. भोवंडल हा प्राकृत शब्द आहे. भोवंड म्हणजे गरगर फिरणे. फेर धरून नाचण्याशी या शब्दाचा संबंध असावा. ही गाणी फेराची असतात. हादगा कोकण व पश्चिम महाराष्ट्रात खेळला जातो.

[१७]कै. वि. का. राजवाडे यांनी शतकापूर्वी हादगा उर्फ भोंडल्याच्या एकोणवीस गाण्यांचे संकलन केले. भोंडल्याच्या गाण्यांची ती पहिली संहिता होय. या लोकोत्सवामागचा ते केवळ हेतू शोधत नाही तर, या गाण्यातील शब्दाची व्युत्पत्ती शोधून, ते शब्द गाण्यात का आले असतील याचाही मागोवा घेतला आहे. कै. राजवाडे यांनी या खेळोत्सवांचा संबंध हस्तनक्षत्राशी जोडला आहे. मात्र घाटावरच्या कुमारिका पाटावर डाळतांदुळाचा हत्ती मांडून, त्याभोवती फेर धरून गाणी म्हणून पूजा करतात हे त्यांना माहीत नसावे. त्यांनी मुली खडे वेचून आणून ते मांडतात. त्यांची पानाफुलांनी पूजा करतात व गाणी म्हणतात. असे नोंदवून ठेवले आहे. राजवाडे हे कोकणातले. चितपावन ब्राह्मणांत अनेक कुटुंबांतून खड्यांच्या गौरी मांडण्याची प्रथा आहे. गणपती विसर्जनाच्या वेळी गौरीचे खडे आणतात. त्यावरून असे लक्षात येते की, कोकणातील मुली हादगा म्हणून खडे मांडत असाव्यात. 'भोंडला या शब्दाचा अर्थ माझ्या ध्यानात येत नाही. हातग्यालाच भोंडले म्हणत असावेत. परंतु निश्चित काही सांगता येत नाही'. असे ते प्रांजलपणे कबूल करतात. [१८]श्री. अनंत आबाजी देवधर यांनीही भोंडल्याच्या गाण्यांचा व उत्सव करण्याच्या रीतीचा शोध घेतला आहे. मात्र त्यांनी वर्णिलेली हादगा मांडण्याची रीत कै. राजवाडे यांनी वर्णिलेल्या रीतीपेक्षा वेगळी आहे. कागदावर हत्ती काढून तो भिंतीला चिटकवतात. असे त्यांनी नमूद केले आहे. या कागदासमोर फळफळावळ मांडतात. जिच्या घरी भोंडला मांडतात, तिच्याकडे इतर कुमारिका-मुली डाळतांदूळ घेऊन जातात. ते एकत्र करून जमिनीवर, त्याच्यातून एका पुरुषाचे व बाईचे चित्र काढले

जाते. काढलेल्या चित्रास बहिलोबा आणि बहिलोबाई असे म्हणतात. रोज एक प्रकारच्या फुलांची वा धान्याच्या कणसांची माळ त्यावर बांधली जाते. 'बहिलोबा' या शब्दाची व्युत्पत्ती लावाताना ते नमूद करतात की, 'बहुलता' या समृद्धीवाचक



शब्दापासून 'बहिलोबा वा बहिलोबाबाई' ही अपभ्रंश रूपे झाली असावीत. मुली फेर धरून गाणी म्हणत असताना, पुढे मागे झुकून, डुलत आणि लयीत फिरतात असे त्यांनी नोंदवून ठेवले आहे. या लोकोत्सवामागील कृषिसमृद्धीसाठीच्या पूजनाची दखल त्यांनी घेतली आहे. भोंडल्याची अनेक गाणी असतात हे नोंदवून त्यातील सात लोकप्रिय गाण्यांचे त्यांनी संकलन केले आहे. कै. राजवाडे आणि श्री. देवधर यांच्या गाण्यात साम्य असले तरी पाठभेद आहेत.

**इंद्रपूजेचा संकेत : हादगा –**

महाराष्ट्र लोकसाहित्य मंडळाच्या अध्यक्षा आणि लोकसाहित्याच्या जाणकार डॉ. सरोजिनी बाबर यांनी लोकसाहित्याच्या २२ व्या खंडात - 'भोंडलाभुलाबाई' या ग्रंथात, महाराष्ट्राच्या विविध भागांत परंपरेने म्हटल्या जाणाऱ्या गाण्यांचे, जनसामान्यांपर्यन्त जाऊन संकलन करविले. तसेच या लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक [१९]श्री. मधुकर वाकोडे या संदर्भात नोंदवतात की 'हादगा' ही केवळ

नक्षत्रपूजा नसून ती पावसाची, पर्यायाने इंद्राची पूजा असावी.

'हस्त आणि शेतकरी झाला मस्त' अशी एक म्हण आहे. शेतीच्या दृष्टीने हस्त नक्षत्र अत्यन्त महत्त्वाचे मानले जाते. ते पहिल्या १४ देव नक्षत्रांपैकी एक आहे. खरिपाची पिके हाताशी आलेली असतात. त्या काळात पेरलेल्या धान्याची कणसे पक्व होत असतात. तर, रबीच्या पेरणीची तयारी सुरू झालेली असते. हस्ताचा पाऊस आणि ऊन भूमीला सुफलित करीत असतात. 'हादगा' ही सांकेतिक पूजा असून, ती हत्ती या मेघाचे प्रतीक असलेल्या चिन्हाभोवती गुंफलेली असावी. महाराष्ट्रात मेघपूजेची परंपरा फार जुनी आहे. 'ढगोमेघो' हा पाणदेवाची पूजा करणारा संप्रदाय महाराष्ट्रात आहे. पुरुषाच्या ठिकाणी असणारे वीर्य हे जलतत्त्व मानले जाते. हादग्यातील 'गज' हे जलतत्त्वाचे प्रतीक आहे. लक्ष्मी वा गौरी ही धरणीचे प्रतीक असून पावसाशिवाय मातीची कूस उजवत नाही. मेघाला हत्ती कल्पून केलेली ही पूजा 'पुरुषतत्त्वाची' असून भविष्यात फलित होणाऱ्या कुमारिका ही पूजा करतात असे श्री. वाकोडे नोंदवितात. त्यांच्या मते हादगा हा सुफलीकरणाची विधी आहे. गज-हत्ती हे जलतत्त्वाचे प्रतीक आहे. हत्तीच्या नावासाठी अमरकोशात चार पर्यायी नावाने जलतत्त्वाचा संकेत आहे. इरा म्हणजे जल. इराचा भरपूर साठा असलेला 'इरावान्'. 'इरावान्' मध्ये जन्मतो तो ऐरावत - हत्ती. अभ्रतांग, अभ्रवल्लभ ही दोन्ही नामे मेघसूचक आहेत. मेघाला मातंग, ऐरावत, हत्ती या संज्ञा दिलेल्या आढळतात. हादगा ही जलतत्त्वाची हत्तीच्या प्रतीकाद्वारे केलेली पूजा असून तो वीर्योत्पादक मेघ वा जलतत्त्वाचा सन्मान आहे. 'मेघदूत' या महाकाव्यात कालिदासने मेघाला 'कामतत्त्वा'चे प्रतीक मानले आहे. पुरुषाच्या ठिकाणी असलेले 'वीर्य' हे जलतत्त्व पौरुषाची खूण मानली जाते. हत्ती इंद्राला प्रिय असतो. हत्तीला जलक्रीडा अत्यन्त आवडते.

गणपती, शिव आणि पार्वती या तीनही देवता अतिप्राचीन असून कालौघात वैदिकांनी त्यांचा नव्या स्वरूपात स्वीकार केला. गणपतीचे तोंड हत्तीसारखे असते. हस्ताच्या कृपेने लक्ष्मी.... धनसमृद्धी प्राप्त होते. म्हणजेच लक्ष्मी प्राप्त होते या जाणीवेतून 'गजलक्ष्मी' ची कल्पना निर्माण झाली असावी उदा. वेरूळच्या गजलक्ष्मीच्या चित्रशिल्पात हत्ती सोंडने पाण्याचा वर्षाव करीत आहे.

भुलाबाई ही धरणीची, 'सर्जना'ची पूजा आहे. ती 'वर्षनाचे' प्रतीक असलेल्या

हादगा उर्फ भोंडल्याच्या पूजेच्याही प्राचीन असावी. डॉ. मधुकर वाकोडे या संदर्भात नोंदवितात 'हादगा हा लौकिक स्वरूपाचा पर्जन्यविधी आहे तर भुलाबाई हा सुफलन विधी आहे. हादगा वर्षनशील तर भुलाबाई सर्जनशील आहे. अर्थातच नवनिर्मितीच्या क्षमता दोन्ही विधीत दिसून येतात.'

वऱ्हाड, खानदेश, नासिक-मालेगावचा भाग, हिंगोलीजवळचा परिसर- या भागात भाद्रपद पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यन्त भुलाबाई मांडली जाते. भुलाबाई म्हणजे पार्वतीबरोबर भुलोबा म्हणजे 'शिव' असतो. ही शिवशक्तीची पूजा आहे. सर्जनाचे प्रतीक पार्वती तर, शिव म्हणजे 'बीज'. ही पूजाही सुफलीकरणाचाच एक विधी आहे. या कुमारिकाच्या लोकोत्सवांचा चिकित्सक शोध 'हणमंताची निळी घोडी' या टिपणात डॉ. मधुकर वाकोडेंनी घेतला आहे. त्यांच्या मते, वरवर पाहता निरर्थक वाटणाऱ्या भुलाबाई वा भोंडल्याच्या गाण्यांत अप्रगत अवस्थेतील मानवी मनाचा आविष्कार आहे.

स्त्री ही सर्जनाचे प्रतीक आहे. तारुण्यात प्रवेश करण्यास उत्सुक अशा मुलींत सर्जनशक्तीचा विकास व्हावा हा हेतू या उत्सवामागे असावा. स्कंद हा शंकाराच्या परिवारातला आणि आश्विन महिना हा स्कंदाचा. १६ वर्षांच्या खालील मुलामुलींना पीडा देण्याचा अधिकार स्कंदाने आपल्या अनुयायांना दिला आहे अशी कल्पना आहे.

**कुमारिकांचे उत्सव भारतभर –**

हस्त हे १३ वे नक्षत्र असून, ते कन्या राशीत येते. हे स्त्री नक्षत्र आहे. हा सहा तारकांचा पुंज असतो. आश्विन हा स्कंदपूजेचा महिना असून स्कंद ऊर्फ कार्तिकेयाची शक्ती 'कौमारी' ही मानली जाते. म्हणूनच या महिन्याला 'क्वारका महिना' म्हटले जाते. भोंडला, भुलाबाई, हादगा हे महाराष्ट्रातले आणि सांझी, मामुलिया हे मध्य प्रदेशातले कुमारिकांचे उत्सव याच काळात का येतात याचे रहस्य कळते. रसपूर्णतेला पोहोचणाऱ्या आणि उद्याची निर्मिती करण्यास सक्षम बनवणाऱ्या कुमारिकांना असुशक्ती प्राप्त व्हावी यासाठी केले जाणारे हे कुमारिकांचे उत्सव भारतभर साजरे केले जातात.

उत्तर प्रदेश, पंजाब, मध्य प्रदेशात सांझी उर्फ सांजाबाई याच काळात मांडली जाते. गुजरातेत कुमारिका गरबा खेळतात. उत्तर प्रदेशात नवरात्रात कुमारीपूजा

करतात. तामिळनाडूत कोलवू हा उत्सव नववधू आणि कुमारिकांचा. धातूच्या वा मातीच्या बाहुल्यांची आरास मांडून मध्यभागी कलश ठेवून त्यावर सरस्वतीची स्थापना करतात. सरस्वती ही कुमारिकेचे प्रतीक आहे. हा उत्सव नवरात्रातील नऊ दिवस असतो. हा उत्सव आंध्रातही होतो. बंगालमध्येही नवरात्रात कुमारीपूजा केली जाते. उत्तर प्रदेशात नऊ दिवस कुमारिकांनी ..... ज्यांना कंचिकांअे म्हणतात, त्यांची आणि एका लौंगड्याची.... लौंगडा म्हणजे कुमार, यांची पूजा करतात. अष्टमीला मोठी पूजा असते. जेवणात चण्याची उसळ, हलवा आणि पुरी असा प्रसाद असतो. तो नऊ दिवस करतात. शेवटच्या दिवशी कुमारिकांना कपडे करतात. किमान चुन्नी.... ओढणी तरी दिलीच जाते. ज्या परिसरात भातशेती मोठ्या प्रमाणावर केली जाते किंवा जेथे आघाताचे (आषाढाचे....) म्हणजेच खरिपाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते तेथे सर्जन आणि वर्षन शक्तीची पूजा होते.

**वृक्षपूजा : भारतीय जीवन पद्धतीचे वैशिष्ट्य –**

झाडांची पूजा करण्याची प्रथा प्राचीन काळापासून भारतात आहे. हादगा हे झाड कोकणात फार उपयोगाचे मानले जाते. पाऊस काळात त्याला बहर येतो. या फुलांची भाजी व पिठात फुले घालून भाकरीही करतात. कोवळ्या शेंगाची भाजीही करतात. झाडाच्या उपयुक्ततेतून त्याची पूजा केली जात असावी असे दुर्गाताई भागवताना वाटते. भारतीय जीवनपद्धतीत वड, पिंपळ, आवळी, तुळस आदींची पूजा होते. छत्तीसगढ भागातील कर्मानृत्य, ज्याला करमराही म्हणतात, झाडाभोवती फेर धरून केले जाते. आदिमानवाने निसर्गाशी आपेल नाते जीवन जगण्याच्या रीतीतून जडवले होते. देणारा आणि घेणारा तो. त्यामुळे निसर्गाच्या लीलांबद्दल कुतुहल होते तसेच भयही होते. या जाणीवेतून निसर्गाचे रक्षण करण्याची त्यांच्या लीलांचा सत्कार करण्याची, निसर्गसंकेतांना जपण्याची परंपरा मानवाने निर्माण केली. त्याचे दर्शन सण, उत्सव, व्रते, तत्संबंधी गीतांतून होते.

**भुलाबाई –**

भाद्रपदाचा महिना आला
आम्हा मुलींना आनंद झाला
पार्वती बोले शंकराला

चला हो माझ्या माहेरा, माहेरा.....
गेल्याबरोबर पाट बसायला
विनंती करू यशोदेला
टिपऱ्या खेळू, गाणी गाऊ प्रसाद घेऊन घरी
जाऊ, घरी जाऊ

विदर्भ, खानदेशात भाद्रपदातील सायंकाळी घराघरातून टिपऱ्यांचे गाण्यांचे आवाज घुमू लागत. तरुणाईत प्रवेश करणाऱ्या किशोरींचे घोळके गल्लीबोळांतून उत्साहाने एकमेकींच्या घरांतून भुलाबाईची गाणी म्हणण्यासाठी रात्र होईपर्यन्त फिरतात. भुलाबाई आणि भुलोबाची मातीची जोडमूर्ती, भुलाबाईच्या मांडीवर गणेशबाळ. ही मूर्ती बाहेरच्या खोलीत वा ओसरीत, कोनाड्यात मांडली जाई. त्याला मखराने सजवले जाई. शेजारी तांब्यात नारळ ठेवला जात असे. भुलाबाईची अनेक गाणी आहेत. त्यापैकी किमान ३/४ गाणी प्रत्येक घरी गायिली जात. भोंडला वा हादग्यातही हीच प्रथा आहे. गाणी झाल्यावर प्रसाद ओळखण्याचा विधी असतो. प्रसाद तऱ्हेतऱ्हेच्या पदार्थांपासून करतात. तो गोडच असला पाहिजे असा संकेत नाही. भोंडला वा हादग्यात मात्र रोज एक खाऊचा प्रसाद वाढत जातो. हादगा हस्तनक्षत्रात खेळतात. अलीकडे भोंडला वा हादगा नवरात्रात खेळण्याचा प्रघात पडला आहे. भुलाबाईत मात्र एकच प्रसाद असतो. कोजागिरीच्या रात्री मुली एकत्र जमून जागरण करतात. रात्रभर खेळ, गाणी चालतात. प्रत्येक जण सर्वांसाठी वेगवेगळा खाऊ वा प्रसाद आणतात.

भुलाबाई म्हणजे पार्वती, जगन्माता. भूमीसारखी सर्जनशील. हा खेळोत्सव म्हणजे भूमीचा पार्वतीचा सर्जनोत्सवच. शिवशक्तीची पूजा. एक प्रकारचा सुफलन विधी, शिव म्हणजे बीज तर शक्ती म्हणजे भूमी. भुलोबा हे शंकराचे प्रतीक या पूजेत खेळोत्सवात शंकराची फक्त हजेरी असते. या संदर्भात एक महत्त्वाचा संकेत लक्षात येतो तो असा की, स्त्री-माहात्म्य आणि कृषिविषयक समृद्धी यांचा अन्योन्य संबंध आहे. भूमीची उर्वराशक्ती, सुफलन शक्ती ज्या काळात वाढते त्या काळात स्त्रीप्रधान व्रते येतात. त्यात 'बीज' अध्याहृत असते. भुलाबाईच्या पूजनात श्री. वाकोडे यांना यक्ष संप्रदाय, शक्तिसंप्रदाय यांच्या खुणा दिसतात.

**भराडी गौर : कुमारिकांचा कलात्मक उत्सव –**

वऱ्हाडात भराडीगौर मांडली जाते. ती श्रावणात. सर्वसाधारणपणे हा उत्सव श्रावण पौर्णिमेपर्यन्त असतो. तो कुमारिकांचा असतो. जिच्या घरी गौर बसविली जाते तिला मुखरिण म्हणतात. नदी वा तलावावर जाऊन वाळूचा महादेव करतात. नदीतून वाळू काढताना,

'खडक फोडू माती काढू
निघा निघा गवराई '

असे पाच वेळा म्हणतात. वाळूचा महादेव पार्वतीचा जोडा परडीवर बसवून मुखरिणीच्या घरी थाटामाटाने मिरवत आणून प्रतिष्ठा करतात.

खणखण कुदळी मण मण माती
देऊळ खचलं चांदण्याराती
चांदण्यारातीचे माणिकमोती
घाल घाल गौराई आपुल्या नाकी ...
अंगणी दूध तापे
त्यावरी पिवळी साय
गवराई लेकी
आज राहून जाय

या सारखी अनेक गाणी मुली म्हणतात. गौरीचे विसर्जन पाण्यात करतात. विसर्जनाच्या दिवशी मुलींना जेवण दिले जाते. निमंत्रित मुली मुखरिणीला आहेर करतात. परड्या, पानांनी सुरेख सजवतात.

**इनाई : सरस्वती –**

हादगा, भुलाबाई, भोंडला, भराडी गौर आणि विदर्भातील महार समाजात दसऱ्याच्या वेळी इनाई बसवतात. दसऱ्याच्या आदल्या दिवशी दुपारी बारा वाजता जोड्याने रानात जातात. पाटीभर काळी माती पूजा करून वाजत गाजत घरी आणतात. दसरा सण चित्रा नक्षत्रात असेल तर मातीचा घोडा बनवून त्यावर इनाई सरस्वतीची मूर्ती घडवतात. हस्त नक्षत्र असेल तर हत्ती बनवून त्यावर इनाईची मूर्ती घडवतात. शेजारी तिचा सुकदेव आणि बाळ असते. मातीच्या मूर्तीची मांडणी झाली की समोर कणकेचे पाच गोळे ठेवतात. त्याला फळ म्हणतात. पाचदहा लिंबे,

मातीच्या पणत्या, फुले असा आरतीचा थाट असतो. त्याला फुलोरा म्हणतात. भराडी गौरव्रतातही परडीवर फुलांची सजावट असते. रात्री इनाईच्या पुढे हल्या मारण्याची प्रथा काही ठिकाणी आहे. दुसऱ्या दिवशी इनाईला पाटीत बसवून शेतात वाजत गाजत नेतात. तिथे तिला जिरवून टाकतात. मातीत माती मिसळवून टाकतात. गेल्या काही वर्षांत ही प्रथा नष्ट झाली आहे.

वाजतगाजत गेले वरल्या राना
वरल्या रानाची आणली माती
चिकण माती थेंब थेंब पाणी
आधी घडवा पुढचा हत्ती
मंग घडवा सकुपती
मंग घडवा इनाई सरोसती
मंग घडवा अडचं बाय...

अशा तऱ्हेची अनेक गीते स्त्रिया गातात. इनाईत सकु बाबा म्हणजे शंकर आणि इनाई ही सरस्वती आहे. सरस्वती कुमारिकेचे प्रतीक आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. याठिकाणी सरस्वती आणि पार्वती यांना एकरूप मानले दिसते. यांचे बरोबर बाळ असते. भुलाबाईतही भुलोबा आणि चिलया वा गणेश बाळ असते.

**बीज : शंकर : क्षेत्रपाळ –**

श्रावण, भाद्रपदातील बहुतेक व्रते, उत्सव स्त्रीप्रधान आहेत. शंकर आणि पार्वती या देवता अतिप्राचीन काळातील असून काळाच्या ओघात वैदिक आर्यांनी त्यांचा स्वीकार केला. स्वीकारताना त्यांच्यावर आर्यकल्पनांची संस्करणेही झाली. गणसत्ताक समाज स्त्रीप्रधान - मातृसत्ताक होता. बीजाचे महत्त्व जाणल्यावर बीजाला.... शंकराच्या, क्षेत्रपाळाच्या रूपात स्वीकारले गेले. शंकराच्या पिंडीचा आकार पाहता असे लक्षात येते की, योनी आणि लिंग यांच्या समागमाचे, ज्यातून सर्जन होते, नवनिर्मिती होते, याचे ते प्रतीक आहे. आज त्यांची मंदिरे झाली तरी खरी मंदिरे सामान्य माणसांच्या जीवनातील विधी, उत्सव, सण, व्रते आणि तत्संबंधी गीते यांत आहेत. यातुशक्तीच्या संदर्भातील श्रद्धा आणि संकल्पना थेट मातीशी, तिच्यातील सर्जनतेशी जोडलेल्या आहेत.

**खेळणे, मांडणे आणि गाणे –**

कुमारिकांच्या उत्सवात 'मांडणे' आणि 'खेळणे' या शब्दांना विशेष महत्त्व आहे. हे उत्सव सामूहिकपणे 'खेळले' जातात आणि आराध्य दैवतांची 'मांडणी' केली जाते. ही देवते मातीत पाण्यात बोळविली जातात. या उत्सवांत कर्मकांडांची कठोरता नाही. ते क्रीडा स्वरूपी असतात. आणि ते मोकळ्या रानात, अंगणात खेळले जातात. उत्सवात कृषिकर्मे, बीरपूजा, गणदेवता यासंबंधीचे संदर्भ असतात.

उदा. भुलाबाईच्या गाण्यात,

हणमंताची निळी घोडी
येता जाता कंबळ तोडी

अशी ओळ आहे. यातील हनुमंत हा क्षेत्रपाळ आहे. सात चिरंजीवांपैकी एक आहे. या वीरदेवतेचा दगड प्रत्येक गावांत शिवारात असतो. तो भूमीची उर्वराशक्ती सतत जागती ठेवतो. हा हनुमंत शिवाच्या परिवारीतील, भैरव स्वरूप आहे. त्यातून तो भुलाबाईच्या गाण्यात शिरला असावा. 'यक्ष' हे सकाम आराधनेत महत्त्वाचे मानले जातात. 'निळी घोडी' यातील निळा रंग भारतीय परंपरेनुसार कामतत्त्वाचे प्रतीक मानला जातो. भारतीय परंपरा बैल, नाग आणि घोडा यांना पुरुषतत्त्वाच्या शक्तीची प्रतीके मानते. अश्वशक्तीप्रमाणेच 'अश्विनी' शक्तिरूप सर्जनतेचे प्रतीक आहे. अश्विनात करावयाची पूजा कातमतत्त्वातून निर्माण होणाऱ्या सर्जनशक्तीची आहे. 'कंबळ' हा 'कमल' या शब्दाचा अपभ्रंश, ते स्त्रीत्त्वाचे प्रतीक असून, भूमी, योनी व स्त्री सूचक असते.

माळी गेला शेताभाता
पाऊस पडीला येताजाता
पडपड पावसा थेंबोथेंबी
थेंबोथेंबी आलव्या लोंबी
आलव्या लोंबती अंकणा
अंकणा तुझी सात कणसं
भोंडला तुझी सोळा वर्स....

भोंडल्याच्या ''ऐलमा पैलमा गणेशदेवा' या नमन गीतातून पाऊस, विश्वाला फुलविणारा माळी, भातांच्या ओंब्या यांचे अंधुक संदर्भ सापडतात. तीळ, तांदळाचे उल्लेख येतात. भारतीय संस्कृतीमधील अनेक सणव्रते यांत तिळाला विशेष महत्त्व असते. तीळ हे मांगल्यदर्शक आहेत. समर्पणाचे प्रतीक म्हणून तिळाची अंजुली वाहण्याचा प्रघात आहे. तांदूळ हे 'अक्षत' तेचे-Virgin- प्रतीक आहेत. विवाहात अक्षदा म्हणून तांदळाचा उपयोग करतात. तीळ हे गळीत धान्य आणि तांदुळ प्राचीन काळापासून ज्ञात आहेत. एखाद्या उपवर मुलीस आई म्हणते, 'कुण्या घरचे तीळ तांदूळ तुझ्या नशिबात आहेत ?' वरील ओळीतून धान्यलक्ष्मीचे ध्वनिचित्र प्रतीत होते. अन्नोत्पादनासाठी गायल्या जाणाऱ्या सामूहिक गीतांत.... स्वरसमूहांत एक मंत्रात्मकता असते आणि भोवंडून टाकणारी लय असते.

भोंडला वा हादगा, भुलाबाई, भराडीगौर या मुलींच्या.... कुमारिकांच्या उत्सवांतील गाणी शिवेच्या आत नव्हे तर शिवेच्या पैल, मोकळ्या शेतात गायिली जात असावीत. ही गाणी समूहात गायिली जात असल्याने त्यातील स्वर अतिशय सुलभ आणि शुद्ध असतात. त्यांत हजारो वर्षांपासून पिढ्यानपिढ्या वाहत आलेली एकसुरात्मक अशी लय असते. त्या लयीतून त्यांचे पुरातणत्व जाणवते.


कुमारिकांच्या व्रतात मांडणीला खूप महत्त्व असते. भुलाबाईचे मखर फुलांनी, रंगीत कागदांनी सजवले जाते. त्यांत कोवळी कणसे, धान्याची ताटे, फळे, उसाचे तुरे यांचा उपयोग केला जातो. विदर्भातील भराडी गौर मांडताना विविधरंगी फुलांनी झेले मांडले जातात. हादगा व भोंडल्यात पाटावर डाळ तांदूळ वा रांगोळीचा हत्ती काढला जातो. भोवताली फुलापानांची सजावट केली जाते. हत्तीच्या खाली पहिल्या दिवशी एक ठिपका काढला जातो. रोज एक एक ठिपका वाढवितात.

**साँझी : मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशातील देखणा कुमारिकोत्सव –**

मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशात 'साँझी' [२०] मांडताना विविध रंगी सजावट केली जाते. हिरवेगार शेण घेऊन ते मातीत कालवून त्याचे विविध लोकप्रिय आकार भिंतीवर चितारले जातात. या सजावटीला 'सांझीका खिल जाना' असे म्हणतात. डॉ. श्याम परमार त्यांच्या 'मालवी लोकसाहित्य का अध्ययन' या ग्रंथात ते लिहितात, 'सांझी कुंवारी कन्याओंका एक अनुष्ठानिका व्रत है। राजस्थान, पंजाब

और व्रजके व्रतमें किंचित हेरफेर के साथ वही रूप लक्षित होता है, जो मालवजन पदमें विद्यमान है। महाराष्ट्र में 'भुलाबाई' और बुंदेल खंडमें 'मामुलिया' का स्वरूप इसके अनुरूप है।'

हयों ह्यों सो गोबर
पीली पीलीसी माला
करों संजा की आरती
पान्या फूलां भरीरे चंगेर
केशर भरिये बाटको
संजाबाई की मां
तम भेजो संजाने
हम करा संजाकी आरती



संजाबाई

**देखणे अंगण दूर चाललेय का ? –**

'सांझी' आदिवासी भागातही सजवली जाते. आदिमानवाच्या जीवनाची बैठक बव्हंशी समुदायानिष्ठ होती. त्यांच्या सणउत्सवांतून ती प्रतिबिबिंत होत असे. मध्य प्रदेशात आजही सांझीचे सौंदर्य जपलेले दिसते. कर्नाटक वा तेलंगणातील रंगावलीचे सौंदर्य आजही मनाला थक्क करते. राजस्थानातली गणगौरीची सजावट वा आंध्रातील बदकम्माची सजावट पारंपरिक सौंदर्याचा अनमोल ठेवा जपून केलेली दिसते. मात्र महाराष्ट्रातील या कुमारिकांच्या खेळोत्सवांतून ही सौंदर्य दृष्टी कमी होतेय की काय असा संभ्रम पडतो. रीत म्हणून चार रेषा ओढल्या जातात पण नाजूक रेषांनी नटूनथटून बसणारे देखणे अंगण दूरदूर चालले आहे.

वात्स्यायनाच्या 'कामसूत्रात' उल्लेखिलेल्या ६४ कलांमध्ये रांगोळीचा उल्लेख आहे. रांगोळीसाठी सुरुवातीस धान्याचा उपयोग करीत. ते सुफलनशक्तीचे, कृषिसमृद्धीचे प्रतीक मानीत. आजही विशिष्टप्रसंगी, पूजेच्या वेळी तांदळाचा वा धान्याचा चौक मांडण्याची प्रथा आहे. सरस्वती, शिवलिंग, कामदेव यांच्या पूजनासाठी फुलांच्या आकृती काढीत. ७ व्या शतकातील 'वरांग चरित्रात' पंचरंगी चूर्ण, धान्य, फुले यांच्या रांगोळ्यांचे उल्लेख आहेत. १० व्या शतकातील 'नलचंपू' या ग्रंथात उत्सवप्रसंगी घरापुढे रांगोळ्या काढल्याचे लिहिले आहे. १२ व्या शतकातील सोमेश्वराने लिहिलेल्या 'मानसोल्लासात' धूलिचित्र या नावाने रांगोळी

आली आहे. श्रीकुमाराने 'शिल्परत्नात' क्षणिकचित्र असा उल्लेख केला आहे. भारतीय संस्कृतीत रांगोळी अशुभनिवारक मानली जाते.

आदिमानवाने अन्नसमृद्धीसाठी यातुविधी केले. त्यावेळीही मांडणी, विशिष्ट क्रिया यांना विशेष महत्त्व असावे. त्यातून ही कला विकसित झाली असावी. ज्यांच्यावर गर्भधारणा, मातृत्व या नैसर्गिक जबाबदाऱ्या पडलेल्या नाहीत, अशा कुमारिकांनी या कलेला योगदान दिले असावे, समृद्ध केले असावे. आजही अंगणात सडा घालून रांगोळी काढण्याचे मंगलागौर, हरतालका आदिपूजेच्या वेळी चौरंग पानाफुलांनी सजवण्याचे काम मुलीच करतात. श्रावणाच्या सदाप्रसन्न वातावणाचे वर्णन करताना बालकवी लिहितात -

सुंदरबाला या फुलमाला
रम्य फुले पत्री खुडती....

ही अभिव्यक्ती भारतीय जीवनपद्धती मधील कुमारिकांचे प्रसन्न आणि महत्त्वाचे स्थान सहजपणे व्यक्त करते. कवीच्या प्रतिमांतून लोकमनाच्या अंतरंगातील आदिबंध सहजपणे व्यक्त होतात. हे खरेच.

**कुमारिकांच्या उत्सवांतील मूलबंध -**

गणगौर, तीज, भोंडला, भुलाबाई, भराडी गौर, सांझी, मामुलिया बदकम्मा, कोलवू ही सर्व भारतीय व्रते कुमारिकांची आहेत. व्रते म्हणण्यापेक्षा कुमारिकाउत्सव म्हणणे अधिक योग्य होईल. व्रत कल्पना ऋग्वेदात आढळते. वृ म्हणजे निवडणे या धातूपासून व्रत शब्द तयार झाला. व्रत म्हणजे विशिष्ट काळासाठी वा आमरण आचारावयाचा नेमधर्म. अमरकोशात व्रत आणि नियम हे शब्द समानार्थी आहेत तर 'मिताक्षरा' नुसार व्रत म्हणजे काही आचरण्याचा व काही न आचरण्याचा निश्चय. व्रतात आरंभ, संकल्प, पूजा, उपास, दान, जागरण यांना महत्त्व असते. राजस्थानात तीज, गणगौर या कुमारिकाउत्सवाचे उद्यापन केले जाते. त्यानंतर त्याची सांगता होते. तसे भोंडलाभुलाबाईच्या बाबतीत आज तरी सांगता समारंभ अस्तित्वात नाही. परंतु

अंकणा तुझी सात वर्षे
भोंडल्या तुझी सोळा वर्षे

या ओळीवरून या उत्सवाचे पूर्वी व्रतस्वरूप असावे असे वाटते. भोंडलाभुलाबाईची

आजतरी साचेबंद चौकट नाही. किंबहुना कुमारिकाउत्सवात ती जाणवत नाही. वेदकाळात अन्नसमृद्धीसाठी सामूहिक प्रार्थना गायिल्या जात. उपनिषदातच 'उदगीथ' अन्नसमृद्धीची गाणी आहेत. या प्रार्थना प्राथमिक अवस्थेतील मानवाने यातुविधींच्यावेळी म्हटल्या जाणाऱ्या स्वरसमूहांचे उन्नयन झालेले रूप असावे असे मानले जाते.

**समाजव्यवस्थेच्या मुळाशी अर्थव्यवस्था –**

धर्मानंद कोसंबींच्या मते शेतीचा शोध आणि मातृसत्ताक समाजव्यवस्था यांची निर्मिती प्रथम भारतात आली. प्रो. ऱ्हेनेफेल यांच्या मते मातृसत्ताक जीवनपद्धती भारतात होती. मातृसत्ताक वा पितृसत्ताक समाजव्यवस्थेच्या मुळाशी त्या समाजाची अर्थव्यवस्था असते. मातृसत्ताक जीवनपद्धती अस्तित्त्वात असताना स्त्री ही अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग होती. जीवनव्यवस्था कृषिप्रधान होती. 'दुहिता' या शब्दाचा दोहन करणारी ती. या शब्दाला पुल्लिंग नाही. असाच आणखीन एक शब्द म्हणजे 'वयन्ति' म्हणजे विणणारी. महाभारतात धर्मराजाने राजूसय यज्ञ केला तेव्हा गावातील लोकांनी यज्ञात सहभागी व्हावे यासाठी फतवा काढला. सैनिक पाठविले. त्यावेळी जरद्गवा नावाची स्त्री यज्ञात सहभागी होण्यास नकार देताना सांगते की, ' माझी गव्हाची शेते भरात आली आहेत. घरात लोणी साठले आहे. ते मला विकण्यास जावयाचे आहे. ते अधिक महत्त्वाचे आहे'. यावरून असे लक्षात येते की स्त्रियांचा उत्पादनात, अर्थव्यवस्थेत जोवर सहभाग होता तोवर समाजातही त्यांना महत्त्व होते. नांगर, चाक आदी यंत्रांचा शोधा लागला, भारतावर होणारी आक्रमणे वाढली, पितृसत्ताक जीवनपद्धती दृढ होऊ लागली आणि आमूलाग्र बदल झाले. स्त्रीचे मौंजीबंधन होऊन त्यांनतर दिले जाणारे शिक्षण थांबले. उत्पादनातील तिचा प्रत्यक्ष सहभाग थांबला. पैतृक वारशाचे नियम स्थिर झाले. जातीय व्यवस्था दृढ होताना मातृसत्तेची पाळेमुळे निर्घृणपणे खणून काढली गेली असावीत. ती नष्ट करण्यासाठी ठोस प्रयत्न केले असावेत. त्यातूनच बालविवाह बहुपत्नित्व सतीची चाल यासारख्या दृष्ट रूढी आल्या असाव्यात. प्रो. ऱ्हेनफेल यांच्या मते हा संघर्ष एकूण जगातील मानवी संस्कृतीत आढळून येतो.

पूर्ववैदिकांच्या काळातील स्त्रियांबद्दल असलेली सन्माननीयता नाहीशी झाली. स्त्रीला सर्वाधिकारांपासून वंचित करण्याचे काम नियमबद्धपणे केले गेले असावे. कारण

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता ।

असे म्हणणारा मनू

'न स्त्री स्वांतत्र्यमर्हति । ' असे म्हणतो.

मैत्रायणी संहिता म्हणते, 'स्त्री ही असत्य आहे. 'तैत्तरीय संहिता म्हणते' हीन पुरुषापेक्षा चांगली स्त्रीही वाईट असते. कठ संहिता म्हणते, ' रात्री खुशामत करून नवऱ्याकडून मागण्या पूर्ण करून घेण्याची पात्रता स्त्रीत असते.'

वरील विधाने स्त्रीच्या माणूस म्हणून जगण्याच्या प्रेरणाच कशा नष्ट केल्या गेल्या, होत गेल्या याची साक्ष देतात. मोहंजोंदारो, हरप्पाची अत्यन्त प्रगत संस्कृती मातृसत्ताक होती असे प्रो. मार्शल म्हणतात. नायर, खासी समाजात आजही मातृसत्ता आहे. आजही शेतीव्यवसायात स्त्रियांचे योगदान अत्यन्त महत्त्वाचे असते. कालौघात अनेक आघात होऊनही, पुरुषसत्ताक जीवनव्यवथा स्वीकारूनही, भूमीशी निगडित अशा लोकाचांरातून, विधीतून स्त्रीचे.... कुमारिकेचे महत्त्व कमी झालेले नाही. समृद्धी, पीकपाणी सुपीकता यांच्या देवता स्त्रीरूपीच आहेत.


**कन्येचा कृषियातुविधीत महत्त्वाचा सहभाग –**

वैदिक परंपरेपूर्वी स्त्री, कुमारिका आणि कृषिसमृद्धी, त्यासाठी आवश्यक वर्षावृष्टी, सूर्यप्रकाश यांच्यातील अनुबंधाबाबत काही 'आदिबंध' लोकमनात स्थिर झाले. आज ते आपल्याला काहीसे अव्यवहार्य किंवा चमत्कारिक वाटतात. उदा. प्रजापती आपल्या मुलीच्या मागे कामेच्छेने धावतो, या संबंधात नैसर्गिक घटनांचे विवरण केले तरी या चमत्कारिक समागमाची उपपत्ती लागत नाही. या संदर्भात 'अश्वत्थाची पाने' या ग्रंथात प्रा. सदाशिव अंबादास डांगे मांडतात. मुळात प्रजापती नसून प्रजापिता आणि दुहिता हे शब्द आहेत. ही दुहिता म्हणजे साक्षात मुलगी नसून धर्मदोग्ध्री म्हणजे जलवृष्टी करण्यास साहाय्य करणारी विधी कन्यका (Ritual-Girl) आहे. हे ध्यानात घेतल्याशिवाय या चमत्कारिक वाटणाऱ्या दन्तकथेचा अर्थ उलगडत नाही. सूर्य किंवा अंतरीक्ष हे धर्म होय. त्यातून स्त्राव करायचा म्हणजे जलवृष्टी करावयाची त्यासाठी समागमाचे हे विधीकृत्य करावयाचे. आणि अशा प्राचीन वैदिक आणि अवैदिक परंपरांना उद्देशून 'इति-ह-आस', अशी वहिवाट होती असे म्हणत. अशा तऱ्हेच्या अतर्क्य कथांचे संदर्भ महाभारतातही सापडतात. कन्या अर्पण करून जलवृष्टी विधी संपन्न करण्याची ही परंपरा भोंडला भुलाबाई या कुमारिका उत्सवांचा, त्यांतील सर्जन वर्षनाबद्दलच्या संदर्भाचा,

त्यातील फेर धरून गाण्यांचा उलगडा करण्यास मदत करू शकते. कन्या ही अत्यन्त महत्त्वाची. तिच्यातील सुफलन शक्ती परमपदाला पोहोचलेली असते. तिचा कृषिविषयक यातुविधीत अत्यन्त महत्त्वाचा सहभाग होता. तिला समाजव्यवस्थेत जीवन जगण्याच्या परंपरेत अत्यंत महत्त्वाचे स्थान होते हे या कुमारिकांच्या उत्सवांचा शोध घेताना जाणवते.

मूलतः कृषिसंलग्न यातुविधींच्या स्वरूपात निर्माण झालेल्या खेळोत्सवांचे स्वरूप कालौघात बदलत गेले. काही भागातील त्यांचे अस्तित्व नष्ट झाले. मराठवाड्यातील सात जिल्हे वर्षानुवर्षे निझामाच्या अमलाखाली होते. या भागात भोंडला व भुलाबाई मांडण्याचा वा खेळण्याचा रिवाज लुप्त झाला आहे. हिंगोली परिसरातला जो भाग विदर्भाच्या सीमेला लागटून आहे तेथे मात्र भुलाबाई काही घरांतून मांडली जाते. मराठवाड्यातील नामवंत चित्रकार भ.मा. पसरवाळे यांनी ही माहिती दिली. भुलाबाईत पूर्ववैदिक काळातील लोकधर्मी संस्कृतीच्या खुणा अधिक स्पष्ट रूपात दृगोचार होतात. खानदेशात वा विदर्भात भुलाबाई सर्व जातिजमातीत मांडली जाते. दलित समाजातही ती खेळली जाई. भोंडला वा हादगा मात्र उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या जातींत खेळला जाई. मात्र दोन्ही खेळोत्सवांतील गाणी सारखी आहेत. एवढेच नाही तर भराडी गौर, इनाई यांची गाणीही त्याच प्रकारची आहेत.

भोंडला, भुलाबाई, इनाई, भराडी गौर, यांच्या गाण्यांसबंधीचा विशेष शोध पुढील प्रकरणात घेतला आहे.





# काही खेळ-गाण्यांचा शोध - भोंडला, भुलाबाई

*भोंडला भुलाबाई मांडतात आणि खेळतात, स्त्रिया परंपरेने शिकतात, हे कुमारिकांचे लोकोत्सव, भोंडला भुलाबाईत जातीची चौकट नसते, व्रताभोवती एक चौकट असते, मूळ गाणी सोळा, गाण्यांचे पर्याय : कारणांचा मागोवा, लोकगीतांत समूहमनाचे प्रतिबिंब, गाण्यांचा शोध, ऐलमा-पैलमा : ऐल-पैल, हा संदर्भ शिवकाळातील असावा, उंडे आणि तीळ - तांदूळ, हा माळी कोण ?, गीतातील नादमयता : ध्वनिचित्रे, गाणे - २ आला चेंडू गेला चेंडू, गाण्यातील राम आणि सीतेचा संदर्भ, कृषिजीवनाशी निगडित, गीतातील राम डोंगरांत लपणारा का ?, पुरुषप्रधान आर्य संस्कृतीचा संस्कार, मुंजक बाळ : ग्रामरक्षक वीरदेवता, एक मोहक प्रतिमा, गाणे ३ - अतूला मातूला चरणी चतूला, मावल्या : सात मातृका : सात घरच्या पाहुण्या, लोक लक्ष्मीचे रूप, भुलाबाई : गुलाबाई : संजाबाई, उमेचे माहेरपण आणि बाळंतपण, भुलाबाईचे नमन-गीत, खेळ खेळणारा खंडोबा, हनुमंत बाळ : वीरदेवता, गीतातील सीता : भूमीस्वरूपात, लोकगीत प्रक्रियांद्वारे बदलत राहते, राणूबाई : रण्णा सण्णा, भुलाबाईचे माहेर सोनारवाड्यात कसे ?, खडतर नाती, माहूर गडाचा संदर्भ, नथीचा नखरा, पेराल तसे उगवते, बाज आणि पाळणा, आम्हा मुलींना आनंद झाला, एक लिंबू झेलू बाई, लिंबू : जारण-मारण विधीतील महत्त्वाचे फळ, वीर हनुमान आणि दास हनुमान, पाण्याच्या शोधात वणवणणारी राणी, गाणे २ - काळा कोळसा झिक झिक वाणा, स्वरसमूहांचे आणि त्यांच्याशी जोडलेल्या, विधीस्वरूपाचे प्राचीनत्व, भाद्रपद आश्विनातील कुमारिकांचे उत्सव आणि त्यांतील कलात्मक अविष्कार, सांझी उर्फ संजाबाईची सजावट, रंगवल्ली : एककला, रांगोळीचे दोन प्रकार , रांगोळी : ऐतिहासिक उल्लेख, सांस्कृतिक देवाणघेवाण, सांजीची आरती, भुलाबाईच्या गाण्यांतील काही विधीसंबद्ध कृती, गीतांचा ठेका आणि पावली, भोंडल्याच्या गाण्यांची : झिम्म्याची लय, भोंडल्याची गाणी : शिवकाळातील आश्वासक, वातावरण, भारतीय संगीत परंपरा, या गाण्यांची छंदोरचना.*

हादगा उर्फ भोंडला आणि भुलाबाई या कुमारिकांच्या लोकोत्सवांविषयी इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, श्री. अनंत बाबाजी देवधर, महाराष्ट्रातील मान्यवर समाजशास्त्रज्ञ दुर्गा भागवत, विदर्भातील लोकसाहित्याचे मान्यवर संशोधक डॉ. मधुकर वाकोडे, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीच्या अध्यक्षा डॉ. सरोजिनी बाबर इत्यादी लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लिहिलेल्या शोधटिपणांचा आढावा यापूर्वी घेतला आहेच.

**भोंडला भुलाबाई मांडतात आणि खेळतात –**

हादगा व भोंडला अनुक्रमे सोळा व दहा दिवस खेळतात. भुलाबाई एक महिनाभर बसवतात. मुळातला हादगा हा उत्सव हस्तनक्षत्रात सोळा दिवस खेळला जात असावा. परंतु काळाच्या ओघात कदाचित सोय म्हणून त्याचे रूपांतर नवरात्रात दहा दिवस खेळावयाच्या भोंडला या उत्सवात झाले असावे. या संदर्भात पुणे, पंढरपूर, अहमदनगर, नाशिक येथील काही मुली व स्त्रियांकडून माहिती घेतली असता वरील विधानास पुष्टी मिळते. पंढरपूरच्या कै. श्रीमती घळसाची या ऐंशी वर्षांच्या आजींचे माहेर तासगावकडचे. त्यांच्या आठवणीनुसार हस्तातील सोळा दिवस त्या आठ नऊ वर्षांच्या असताना हादगा मांडीत असत. अहमदनगरची अजया पंचपोर सोळा वर्षांपर्यंत भोंडला खेळली. आश्विनप्रतिपदा ते दसऱ्यापर्यंत ती भोंडला खेळत असे. पुण्याच्या श्रीमती महाजन या साठीच्या भगिनींना भोंडल्याची गाणी फार आवडतात. त्यांची चार वर्षांची चिमुरडी नात सायली हिला भोंडल्याची सर्व गाणी पाठ आहेत. त्यांचे बालपण पुण्यात गेले. त्यांनी, नवरात्रातील दहा दिवस भोंडला खेळतात असे सांगितले व कोकणातील 'हादगा' हस्ताच्या काळांत सोळा दिवस चालतो असे सांगितले. हस्त नक्षत्र आश्विनात येते. हस्त नक्षत्राचा काळ आणि नवरात्राचे दिवस हे एकाच सुमारास असतात. गुजरातेत नवरात्रात 'गरबा' खेळला जातो तर आंध्रात 'बदकम्मा' नवरात्रातच मांडली जाते. वर्षनाचा सत्कार करणारा हा उत्सव हस्ताच्या मुहूर्तावर साजरा होणे स्वाभाविकच आहे.

**स्त्रिया परंपरेने शिकतात –**

राजस्थानात रांगोळीला [१]'मांडणा' असे म्हणतात. दिवाळीच्या निमित्ताने सारवलेल्या जमिनीवर अंगणात आणि घरातही काव आणि चुनखडीच्या साहाय्याने

लालपांढऱ्या रंगात विशिष्ट आकृती पारंपरिक शैलीने काढल्या जातात. चौपट, पगल्या लक्ष्मीची पावले, चोपडा (हळद कुंकवाचा चौफुला) इत्यादी आकार काढतात. बंगालात अल्पना मांडली जाते. कर्नाटक, आंध्र, तामिळनाडूतही रांगोळीचे प्रस्थ आहे. सुने अंगण क्वचितच आढळणार. या वैशिष्ट्यपूर्ण रांगोळ्या ठराविक पद्धतीने काढण्याचे ज्ञान आणि कसब स्त्रिया परंपरेने आत्मसात करतात.

भोंडला वा हादगा मांडतात. पाटावर रांगोळीचा हत्ती काढतात. पाट मधोमध ठेवून भोवताली रांगोळी व फुलांची सजावट करतात. भुलाबाई मांडताना कोनाड्याच्या मखराच्या सजावटीला विशेष महत्त्व दिले जाते. श्री. अनंत देवधरांच्या शोधटिपणात डाळ तांदूळ एकत्र करून त्याच्या बहिलोबा व बहिलोबाईच्या आकृती काढतात असा उल्लेख आहे. मध्य प्रदेशात संजाबाई नावाचा उत्सव भाद्रपद पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमेपर्यंत मुली खेळतात. ही संजाबाई, हिरव्यागार शेणाच्या आकृती भिंतीवर लिंपून त्यावर बेगड आणि फुलांच्या पाकळ्या चिटकवून मांडली जाते.

आश्विन भाद्रपदातील वर्षनसर्जनाच्या उत्सवात मांडणी व नंतर खेळ या दोन्ही क्रिया महत्त्वाच्या असाव्यात. गौरी, ज्याला घाटावर लक्ष्म्या किंवा महालक्ष्मी असे संबोधिले जाते, त्याची सजावटही अतिशय काटेकोरपणे आणि विधिपूर्वक केली जाते. घाटावर लक्ष्म्यांची गाणी ऐकिवात नाहीत. परंतु कोकणात गौरीची गाणी आणि भोंडला भुलाबाईची गाणी यांत एक आंतरिक साम्य आहे. विदर्भातील भराडी गौर वा इनाईची गाणीही त्याच वाणाची असतात. ही गाणीही स्त्रिया परंपरेने शिकतात.

**उदा.** आचे दूध तापे
त्यावर पिवळी साय
लेकी भुलाबाई साखळ्या लेऊन जाय (भुलाबाई)

अंगणी तापतंय दूध
दूधा पिवळी साय
ये ग गवरी बाई
एवढं पिऊनी जाय

(गौरी : संकलक - डॉ. चारुशीला गुप्ते)

आंगनी दुदुलं तपते महया लाडाचे गवरा
दूध घेऊनी जाय

(इनाई :संकलक - वसंत गिरटकर)

'मांडणे आणि खेळणे' या संकेतांतून कुमारिकांच्या किंवा नवतरुणींच्या उत्सवांपाठच्या मूळ हेतूपर्यंत आणि त्या उत्सवाच्या प्राचीन परंपरेपर्यंत जाण्यास मदत होते. या खेळसंगीताचे विध्यंगरूप पाहताना या बाबतीत अधिक सखोल विचार करता येईल.

**हे कुमारिकांचे लोकोत्सव –**

भोंडला, हादगा आणि भुलाबाई हे लोकोत्सव आहेत. उत्सव सामान्यतः वीरपूजा, नांगरणी-पेरणी आदी कृषिकर्मे, गणदेवता ऋतू इत्यादीसंबंधी असतात. ऋग्वेदात अशा उत्सवांना 'समन' असे म्हणत. उत्सवात नृत्यनाट्य, भोजन असे. उत्सव आमजनतेचे असत. हे साधे सरळ उत्सव कृषिकर्माशी आणि ऋतूंशी निगडित होते. ज्या उत्सवांचा आणि त्या प्रसंगी गायल्या जाणाऱ्या काही गाण्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे, ते उत्सव मूलतः कृषिकर्माशी संबंधित आहेत. त्यात सामूहिक गीतगायन, नृत्य, प्रसाद यांना महत्त्व आहे. त्यातून आनंदाची निर्मिती होते. त्यांचे स्वरूप क्रीडेचे आहे. त्यात कर्मकांडांची कठोरता नाही.

**भोंडला भुलाबाईत जातीची चौकट नसते –**

हे खेळ सर्व जातिजमातीत खेळले जातात. कै. श्रीमती घळसासी, आळीतील ब्राह्मण मुलींबरोबर हादगा खेळल्या आहेत. परंतु आज भोंडल्यासाठी सर्व जातींच्या मुली येतात. या उत्सवात जातीची चौकट कठोर नसते. खानदेशात दलित समाजातील मुलीही भुलाबाई खेळायला जात असत. त्या भुलाबाई मांडत असत. असे श्रीमती ज्योत्स्ना खैरनार यांनी सांगितले. भोंडला वा भुलाबाई मांडण्याची जागा बहुधा अंगण वा ओसरीवर असते. ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे. भारतीय संस्कृतिकोशात उत्सवाची व्याख्या पुढीलप्रमाणे संकलित केली आहे. [२]'नियताल्हादजनक व्यापार'. निश्चितपणे आल्हाद निर्माण करण्याचा उद्योग म्हणजे उत्सव.

**व्रताभोवती एक चौकट असते –**

[३]'व्रत' म्हणजे विशिष्ट काळासाठी वा आमरण केला जाणारा विशिष्ट नेमधर्म. व्रत कल्पना ऋग्वेदात आढळते. व्रत हा शब्द 'वृ' म्हणजे निवडणे या धातूपासून तयार झाला. अमरकोशात व्रत आणि नियम हे शब्द समानार्थी धरले आहेत. 'मिताक्षरा' नुसार व्रत म्हणजे काही करण्याचा व काही न करण्याचा निश्चय.

कोणत्याही व्रतात आरंभ, संकल्प, पूजा, होम, उपवास, दान, अन्नदान, पारणे, जागरण व उद्यापन या गोष्टी येतात. भोंडला-भुलाबाई उत्सवात नियमांची साचेबंद चौकट नाही. होमहवन, पारणे, उपवास, दान आदी त्यात नसते. ते कुमारिकांचे लोकोत्सव आहेत, हे म्हणण्यामागची भूमिका वरील विवेचनात मांडली आहे.

**मूळ गाणी सोळा –**

या उत्सवप्रसंगी गायल्या जाणाऱ्या गाण्यांची मूळ संख्या किती हे सांगणे कठीण आहे. इतिहासचार्य वि. का. राजवाडेंनी अठरा गाणी संकलित केली आहेत. तर अनंत देवधरांनी सात महत्त्वाची गाणी लेखात समाविष्ट केली आहेत. डॉ सरोजिनी बाबरांनी संपादित केलेल्या 'भोंडला-भुलाबाई' या लोकसाहित्यमालेच्या बाविसाव्या भागांत विविध विभागात गायिली जाणारी भोंडला -हादग्याची ९६ गाणी आणि भुलाबाईंची ५६ गाणी संकलित केली आहेत.

आज या गाण्यांची सरमिसळ सर्व विभागांतील गाण्यांतून आढळते. पुष्कळदा दोन गाण्यांचे तुकडे जोडून एक गाणे बनलेले दिसते. या तुकडेजोडीतून अनेक गाणी तयार झालेली असली तरी दोनही उत्सवांची मूळ गाणी सोळाच असावीत. हादगा मांडल्यावर पहिल्या दिवशी एक गाणे व एक खाऊ असे समीकरण असे. सोळाव्या दिवशी सोळा खिरापती वाटीत आणि सोळा गाणी म्हणली जात. भारतीय जीवनपद्धतीत सोळा हा अंक शुभ आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. गौरीसाठी सोळा भाज्या जेवणात लागतात तर मंगळा गौरीसाठी सोळा प्रकारच्या पत्री गोळा केल्या जातात. दुर्गाताई भागवतांच्या मते मूळ गाणी सोळाच असावीत. त्यात गौरी वा तत्सम उत्सवांतून काही गाणी दाखल झाली असावीत.

महाराष्ट्रातील सर्व भागांत प्रचलित असलेली सर्व गाणी लोकसाहित्यमालेच्या २२ व्या भागात संकलित केलेली आहेत. या शोधनिबंधासाठी वऱ्हाड, खानदेश, पंढरपूर, पुणे, शहादा, हिंगोली, रत्नागिरी, नाशिक, नगर इत्यादी परिसरातून गाणी गोळा करताना सतत जाणावले की उपलब्ध होणारे प्रत्येक गाणे पर्यासभेदासह वरील ग्रंथात आहे. आणि म्हणूनच या शोधनिबंधासाठी शोधनार्थ निवडलेली गाणी प्रामुख्याने 'भोंडला-भुलाबाई' या ग्रंथातून निवडली आहेत. भोंडला आणि भुलाबाईचे नमन गीत आणि प्रत्येकी इतर दोन गीते अशा एकूण सहा गाण्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### गाण्यांचे पर्याय : कारणांचा मागोवा –

ही सारीच गाणी मुळात मौखिक स्वरूपाची असून ती पिढ्यान्‌पिढ्या विविध काळातून वाहत आली आहेत. ही गाणी कुमारिकांच्या – नवतरुणींच्या म्हणजेच स्त्रियांच्या उत्सवांची आहेत. स्त्रियांना धर्माने ज्ञानसाधनेचा अधिकार दिलेला नव्हता. त्या शिक्षणापासून वंचित होत्या. मोठ्या घराण्यांतील आणि उच्चवर्णातील स्त्रियांना व्यवहारापुरते शिक्षण दिले जाई. संस्कृत नाटकातील दास आणि स्त्रिया यांची भाषा 'प्राकृत' असे. ते संस्कृतमधून बोलत नसत. स्त्रिया अडाणी असल्याने अशुद्ध बोलतात, हे समाज गृहीत धरीत असतो. निरक्षरतेमुळे त्यांना शब्दांचे उच्चार नेमके करता येत नाहीत हेही गृहीत धरलेले असते. भाषाशास्त्राच्या अभ्यासात उच्चारप्रक्रियेत होणाऱ्या बदलाची कारणमीमांसा करताना स्त्रियांमुळे उच्चारात बदल होतात असे मानले जाते. स्त्रीजीवनाशी संबंधित गाणी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाताना, एका समूहाकडून दुसऱ्या समूहाकडे प्रवाहित होताना त्यात बदल होणे स्वाभाविकच आहे. शब्दात आणि त्यामुळे आशयात बदल झाले असावेत.

ही लोकगीते शेकडो वर्षांपासून विविध काळातून प्रवाहित होत असताना त्या त्या काळाचे संदर्भ त्यांना जोडले जातात. ज्या श्रद्धा वा संकल्पना, समाजाला फारशा महत्त्वाच्या वाटेनाशा होतात. त्या गीतातून गळून नामशेष होतात. काळानुरूप नव्या संकल्पना त्यात दाखल होतात. अशा रीतीने लोकगीत सतत बदलत राहते.

स्त्रियांचे जीवन दोन अंगणातून फुलते. घरातल्या लेकी-सुना लोकगीतांचे अनमोल धन गावोगाव पसरवतात. बारा गावच्या बारा जणी एका जागी जमतात तेव्हा एकमेकींची गाणीच नव्हे तर उत्सवांतील विविध कृतींचे तपशील, आराध्यदैवते यांचीही देवाणघेवाण होते. या प्रक्रियेतून गाण्यांची सरमिसळ होते. पर्याय निर्माण होतात.

### लोकगीतांत समूहमनाचे प्रतिबिंब –

भोंडला भुलाबाईची गाणी परंपरेने चालत आलेली लोकगीते आहेत. त्यांचे मर्म उकलताना, त्यातील अर्थसंदर्भांचा वा कालसंदर्भांचा मागोवा घेताना, कवितेच्या आस्वादनाची रीत वापरता येत नाही. या गीतांत समूहमनाचे प्रतिबिंब असते. या गीतांचा कर्ता केवळ 'अनाम' असतो. असे नाही तर या गीतांत अनेक अनामिकांनी आपापल्या काळाचे आणि मनाचे रंग मिसळवलेले असतात. मानवी मनाच्या

एकात्मतेचे अनोखे दर्शन त्यातून घडते.

हादगा भोंडल्याच्या प्रातिनिधिक गाण्यांचा अर्थान्वयी शोध घेण्याचा प्रयत्न इतिहासाचार्य राजवाड्यांनी केला होता. परंतु त्यातून गाण्याचे एकसंध चित्र स्वरूप उलगडत नाही. त्यातील तुटकपणा सांधता येत नाही. शब्दांच्या पाठी असलेले काळाचे संदर्भ, सांस्कृतिक परंपरा, संकेत, घटनांचे संदर्भ इत्यादींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तरच गाण्याचे अंधुकसे रूप एकसंधपणे डोळ्यांसमोर उभे राहू शकते.

**गाण्यांचा शोध –**

भोंडला वा हादग्याचे नमन गीत : **ऐलमा पैलमा गणेश देवा**

ऐलमा पैलमा गणेश देवा
माझा खेळ मांडून दे, करीन तुझी सेवा
माझा खेळ मांडिला वेशिच्या दारी
पारवळ घुमते गिरिजा कपारी
पारवणी बाळाचे गुंजावणी डोळे
गुंजावणी डोळ्यांच्या सारविल्या टिक्का
आमच्या गावच्या भुलोजी नायका
एविन गा तेविन गा .... ( चाल बदल )
कांडा तिळ बाई तांदूळ घ्या
आमच्या आया तुमच्या आया
खातील काय दुधोंडे
दुधोंड्याची लागली टाळी... (चाल बदल)
आयुष्य दे रे बा माळी
माळी गेला शेता भाता.... (चाल बदल)
पाऊस पडला येताजाता
पडपड पावसा थेंबाथेंबी
थेंबाथेंबी आळव्या लोंबी
आळव्या लोंबती अंकणा (चाल बदल)
अंकणा तुझी सात कणसं
भोंडल्या तुझी सोळा वर्षं

भोंडला वा हादगा मांडल्यावर पहिल्या दिवशीचे पहिले गाणे म्हणून ऐलमा पैलमा या गाण्याला मान दिला जातो, 'ऐलमा पैलमा' या नमनगीताला. हे गीत रोजच म्हटले जाते.

भारतात विशेषकरून महाराष्ट्रात कोणतेही शुभकार्य गणेशपूजनाने सुरू होते. त्यामुळे सुरुवातीचे हे नमन गणेशदेवाला गायले आहे. हे परंपरेला धरून आहे.

**ऐलमा–पैलमा : ऐल–पैल –**

ऐलमा पैलमा या शब्दांची व्युत्पत्ती इतिहासाचार्य राजवाडेंनी,

ऐलमा = अथलम् → अहलम् → अअलम् → अयलम्

पैलमा = प्रथलम् → प्रहलम् → प्रअलम् → पयलम्

अशी मांडली आहे.

ऐल पैल या दोन शब्दांना मराठी भाषेत विशिष्ट अर्थ आहे. त्यातून विशिष्ट संकेत मिळतो. ऐल म्हणजे अलीकडचे. पैल म्हणजे पलीकडचे. परंतु ऐल म्हणजे ईहलोक तर पैल म्हणजे परलोक असा संकेत त्यातून दर्शविला जातो. माणसाला ईहलोकीचे जीवन जगत असताना परलोकाविषयी नेहमीच आकर्षण असते. ऐल आणि पैल यांच्यामध्ये वेस असते. या वेशीच्या दारांतला खेळ प्रपंचाचा तर नसेल ना ? या गीतातला खेळ लुटुपुटुचा असला तरी तो प्रतीकात्मक असावा. तो जगरहाटीचा असावा. आपल्याकडे दिवाळीत वसुबारसेला शेणामातीचे गोकुळ मांडून खेळण्याची प्रथा आहे.

हे उत्सव वर्षनसर्जनाचे आहेत. कृषिजीवनाशी निगडित विधी मुळातून वेशीच्या आत होत नसावेत. उदा. नागपंचमीची पूजा रानात जाऊन वारूळ पुजून केली जायची. काळाच्या ओघात बदलत्या जीवनपद्धतीमुळे ही पूजा पाटावर नागकुळे काढून केली जाऊ लागली. कृषिजीवनाशी संबंधित अशा या उत्सवांचे मूळ रूप वेशीच्या दारात, मोकळ्या आभाळाखाली, साजरे होत असले पाहिजे.

या गाण्यात पारव्याच्या घुमण्याचा उल्लेख आहे. हे 'पारव'[४] कबुतर की आणखी काही? पारवं या शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक अर्थ 'जंगली कबुतर' असा तर दुसरा 'रंगदर्शक' आहे. 'काळे पांढरे मेळविता, पारवे होते तत्त्वता', असे म्हटले आहेच. एक पाठमेद पारवळ असाही आहे 'पारवळ' म्हणजे लुगड-पातळ. परंतु

पुढच्या ओळीत 'पारवणी बाळाचे गुंजावणी डोळे' असे शब्द आहेत. त्यावरून 'पारवं' म्हणजे कबुतर असा अर्थ घेणेच योग्य ठरते.

**हा संदर्भ शिवकाळातील असावा –**

या जंगली कबुतराचे गुंजांसारखे लालभेदक, विखारी डोळे नायकाने नष्ट केल्याचा संदर्भ इतिहासाचार्य राजवाडे यांना शिवकाळातील वाटतो. दुर्गा भागवतही त्याला दुजोरा देतात. इतिहासाचार्य विवेचन करतात. वेशीच्या बुरूजावर पारवा घुमत होता. तो फकिरासारखा एकटाच होता. त्याचे डोळे गुंजेप्रमाणे लालभडक... विखारी होते. त्याच्या दृष्ट डोळ्यांच्या टिका गावच्या भुलोजी नायकाने काढून टाकल्यानंतर, वेशीच्या दारात मुली पुन्हा खेळ खेळू लागल्या. त्यांच्या मते गाण्यातील हा संदर्भ शिवकाळातील असावा. मुस्लिम फकिरांचा लेकीबाळींना, स्त्रियांना होणारा त्रास भुलोजी नायकाने... पाटलाने दूर केला असावा. मुसलमानी अम्मल ढिला होण्याच्या काळातील हा संदर्भ असावा. या गाण्यातील 'भुलोजी' चा शोध घेताना दुर्गाताई भागवतांना तो अग्निदेवाचे प्रतीक वाटतो. 'हादगा किंवा भोंडला' या पुल्लिंगीनामावरून ही सर्वच गाणी पुरुषदेवाला उद्देशून म्हटली असावीत असे त्यांना वाटते. आदिम लोकजीवनात अग्नीला अनन्यसाधारण महत्त्व होते. [५]'अग्नी' चोरण्याच्या कथा जगभर प्रसृत आहेत. भुलाबाई हे पार्वतीचे रूप तर भुलोजी हा शंकराचे रूप. शिव, रूद्र या देवता 'अग्नी'ची रूपे आहेत असे मानले जाते.

**उंडे आणि तीळ – तांदूळ –**

या गाण्यात 'दूधोंडे' या तत्कालीन पक्वान्नाचा उल्लेख येतो. 'उंडे' हे महाराष्ट्रातले लोकप्रिय पक्वान्न असावे. महानुभावकालीन वाङ्मयात उंड्यांचा उल्लेख येतो. तसेच लोकप्रिय गाण्यांतूनही येतो.

**उदा. –** मला करून दे साखर उंडा
पिठी साखर आणिक मांडा, मला जेवू घाल
यशवदे धरासी चाल, मला जेऊ घाल –

या गीतात तीळ आणि तांदळाचाही उल्लेख आहे. धार्मिक संस्कारांत तीळ–तांदळाचे महत्त्व असते. सणातही तीळ तांदळाला शुभ म्हणून मान असतो. तांदळाचा उपयोग 'अक्षत' म्हणून विशेष सन्मानपूर्वकपणे धार्मिक कार्यात आणि सणात केला जातो. 'तंडुल' हे तृणधान्य आणि तीळ हे गळीत धान्य प्राचीन काळापासून माणसाच्या

उपयोगात आहे. ही धान्ये समृद्धीचे प्रतीक आहेत.

तीळ मांगल्यदर्शक आहेत. नारळ हे आत्मसमर्पणाचे प्रतीक आहे. नारळ फोडणे म्हणजे सर्वस्व अर्पण करण्याची भावना व्यक्त करणे. समर्पणाचे प्रतीक म्हणून तिळाची अंजुली टाकण्याची पद्धत रूढ आहे. तीळ हे चरबीचे (फॅटस्चे ) प्रतीक आहे. 'देवाल तेल वाहणे' या प्रवृत्तीमागेही जीवनातील जे जे स्निग्ध आहे ते परमेश्वराला देण्याची भावना असते. भारतीय संस्कृतीमध्ये जेवढे सण आणि उत्सव आहेत त्यांचा धर्मभावनेशी संबंध नाही. 'हिंदू' ही एक जीवनपद्धती आहे. संस्कृती आहे. ती भारतात राहणाऱ्या माणसांच्या जगण्याचा एक अविभाज्य घटक आहे. तीळ हे औषधीही आहेत. तिळाचे त्रिविध महत्त्व प्राचीन काळापासून येथील समाजाला जाणवले होते. त्यामुळेच या लोकोत्सव गीतांतून तीळ आणि तांदळाचा उल्लेख आवर्जून येतो.

**हा माळी कोण ?**

या गाण्यात माळ्याचा संदर्भ आहे. हा माळी कोण ? इतिहासाचार्यांनी संकलित केलेल्या हादग्याच्या नमनगीतात 'औषध देरे बा माळी' अशी ओळ आहे. परंतु दुसरा, अधिक प्रचलित पर्याय 'आयुष्य दे रे बा माळी' हा आहे आणि तो अधिक अर्थगर्भ वाटतो. या ओळीतील 'माळी' ही संकल्पना संकुचित अर्थाने वापरली नसावी. हे आयुष्य केवळ स्वतःला वा घरादाराला मागितले नसावे. ते शेताभाताला मागितले असले पाहिजे.

माळी गेला शेताभाता
पाऊस पडला येताजाता

या ओळींमधून विश्वाला फुलविणाऱ्या विश्वातील पंचमहाभुतांना नियंत्रित करणाऱ्या 'परमेश्वर रूपी' माळ्याची प्रतिमा डोळ्यासमोर येते. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत जगंनियंत्यास 'माळी' म्हटले आहे.

६ माळिये जेऊ ते नेले । तेउते निवांत चि गेले ।
तेया पणिया ऐसे जाले । नाठवे हे ।। १२० ।।

(अध्याय १२ वा ज्ञानेश्वरी)

(माळी ज्या पाटाला पाणी लावतो त्या पाटाने ते पाणी निवांत वाहत जाते. त्या पाटाविषयी ते पाणी काहीच चिंता करीत नाही).

या गाण्यातील विविध संकेतांवरून ही गाणी कृषिधर्मी जीवनाशी निगडित असावीत असे वाटते. शेतातील धनधान्य पीक भराला आल्यावर, राखणीसाठी जे बाहुले तयार केले जाते त्यास 'भुलोबा' म्हणतात. तो शेताचा संरक्षक असतो. या कृषिसंबंधित गाण्यात मारूती, यक्ष, भुलोबा इत्यादी 'ग्रामरक्षक' देवतांचे उल्लेख वारंवार येतात असे दिसते. भुलोबा वीरशैव शंकराचे प्रतीक तर भुलाबाई हे पार्वतीचे रूप. भूदेवी ही गाव आणि शेतकऱ्याची संरक्षक देवता मानली जाते.

**गीतातील नादमयता : ध्वनिचित्रे –**

पडपड पावसा थेंबो थेंबी
थेंबोथेंबी आळव्या लोंबी
आळव्या लोंबती अंकणा
अंकणा तुझी सात कणसं
भोंडल्या तुझी सोळा वर्षे

या ओळीमधुन धनलक्ष्मीचे ध्वनिचित्र चित्रित झाले आहे. लोकगीतांत मंत्रात्मकता असते. [७]लोकगीत म्हणजे आदिकालीन स्वयंस्फूर्त संगीत. त्यांत शब्दापेक्षा स्वर आणि लय यांच्या अदभुत मिश्रणातून तयार झालेल्या मंत्रात्मकतेवर भर आधिक असतो.

मणिपूर, त्रिपुरा, मध्य प्रदेश येथील काही आदिम जमातीमध्ये काही लोकगीते अशी आहेत ज्यात शब्द नाहीत. केवळ लयप्रधान स्वररचना आहे. लोकगीतांचा संभव स्वरांपासूनच होतो. मनुष्य काही भावनापूर्ण क्षणांमध्ये स्वरांची एक सृष्टी निर्माण करतो आणि त्यालाच गुणगुणतो. काही काळानंतर याच स्वरसृष्टीमध्ये उपयुक्त शब्द योजिले जातात. अशी अनेक गाणी रचनाकारच्या व्यक्तिकतेच्या बाहेर येऊन सामाजिक बनतात आणि व्यक्तिकत्वाला त्यात जिरवून टाकतात. या प्रचलित गीतांतील शब्द काळानुरूप दुबळे होऊन विस्मृतीत जातात. त्या जागी नवे शब्द येतात. समूहजीवनाच्या संदर्भात त्या शब्दांची अन्वर्थकता नाहीशी होते आणि मग या शब्दांना अनाकलनीय असे स्वरूप प्राप्त होते. मूळ शब्द कोणते ते ओळखणेही अशक्य होते. गाणी निरर्थक वाटू लागतात. तरीही त्या गीतांतील मूळ स्वरसमूह आणि लय तालतत्त्व यामुळे ही वरवर निरर्थक वाटणारी गीते लोकसमूहात शतकानुशतके टिकून राहतात.

पैंजणातून ओघळणाऱ्या घुंगराप्रमाणे बरसणाऱ्या पाऊसधारा, तोरड्यांच्या घुंगराप्रमाणे झिळमिळणाऱ्या परिपुष्ट भातपिकाच्या ओंब्या याचे ध्वनिचित्र वरील ओळीतून प्रतीत होते.

सात, सोळा हे आकडे लोकसाहित्यात वारंवार येतात. त्या आकड्यातून मांगल्य, समृद्धी, शुभ इ.चे सूचन होते. या गाण्यातून सलग असा अर्थ काढण्याचा प्रयास अप्रस्तुत ठरतो. लोकगीतांत स्वरमाध्यम आणि लय महत्त्वाची असल्याने केवळ शब्दरचनेचा विचार अपुरा ठरतो. या गाण्यांतून प्राथमिक, कृषिधर्मी जीवन जगणाऱ्या लोकसमूहांनी कृषिसमृद्धीसाठी सुफलीकरण यातुविधींच्या वेळी गायलेल्या मंत्रात्मक प्रार्थनांचे अंधुक संकेत मिळतात.

**गाणे – २ : आला चेंडू गेला चेंडू**

आला चेंडू गेला चेंडू
राया चेंडू झुगारिला
आपण चाले हत्ती घोडे
राम चाले पायी
एवढा डोंगर शोधिला
रामाचा पत्ता कुठं नाही
राम ग वेचितो कळ्या
सीता ग गुंफिते जाळ्या
आली ग लगिन वेळा
जरतारी घातिलं बोहल
नवरा नवरी बसली पाटी
पाटी पाटी तिरु तिरू राळा
तिरु बाई राळा मुंजक वाळा
मुंजक बाळाची मुंज दोरी
तीच दोरी सावध करी
सावध सावध सर्वत काळ
सर्वत काळचा उत्तम दोर

दोर बांधला झाडासी
झाड झबका फुल टपका
ते बाई फुल तोंडावं
बहिणीमाथा खोवावं
बहिणी तुझा भांग ग
मोतियाचा चांद ग
बहिणी तुझी वेणी ग
मोतियाची फणी ग
बहिणी तुझा खोपा ग
चंद्रफुल घेते झोपा ग

**या गाण्यातील राम आणि सीतेचा संदर्भ कृषिजीवनाशी निगडित –**

या गाण्याचेही विविध पर्याय सापडतात. भोंडला वा भुलाबाईच्या एकूणच गाण्यातून सीतेचा आणि रामाचा संदर्भ येतो. डोंगरात शोधूनही न सापडणारा आणि पायी चालणारा, कळ्या वेचणारा, राम या गाण्यात आहे. रामाने वेचलेल्या कळ्यांच्या फुलजाळ्या विणणारी सीता आहे. ही गीते कृषि संबंधित विधींचे अंग असलेल्या स्वरसमूहांशी, निगडित असावीत हे लक्षात घेतल्यावर त्यातील शब्दांचे संदर्भही अधिक खोलवर जाऊन पाहावे लागतात. सीता या शब्दाचा अर्थ कृषिधर्मी आदी जीवन व्यवस्थेत कोणता होता ? जमीन उकरण्याच्या एका उपकरणास सीता म्हणतात. सीतेची व्याख्या कौटिल्य खालीलप्रमाणे करतो (२.३१) –सीताध्यक्षाने शेतातून राजकोठागारात आणलेले धान्य म्हणजे सीता होय. सीता ही येथे केवळ राजाच्या शेतीचीच संज्ञा नसून तिच्यातून पिकणाऱ्या धान्याची असावी. 'सीता' या शब्दाचा अर्थ राजाची खाजगी जमीन असा होतो. भारतीय इतिहासाची पाने चाळताना लक्षात येते की या संस्कृतीने अनेकविध वळणे घेतली आहेत. विविध रूपे बदललेली आहेत. दशरथ जातकातील राम आणि सीता यांच्यातील नाते रामायणातील रामसीतेच्या नात्यापेक्षा वेगळे आहे. जगातील सर्व संस्कृतींचा इतिहास पाहता असे लक्षात येते की मातृसत्ताक राज्य पद्धतीच्या उत्तर काळात सपिंड विवाह ही जागतिक स्वरूपाची घटना होती. भाऊ आणि बहीण यांचा विवाह होऊन भाऊ राज्याचा प्रमुख होत असे. आज सपिंड-विवाह कालबाह्य आणि

दुराचारात जमा झाला असला तरी यम आणि यमीची वेदकालीन कथा काय सांगते ? यमी यमाशी समागम करण्यास उत्सुक होती. परंतु यम हा तिचा सहोदर असल्याने त्याने तिला झिडकारले. त्यावेळी यमी त्याला दाखला देते की आकाश व पृथ्वी सहोदर बंधुभगिनी आहेत, तरी ते पतिपत्नी झालेले आहेत.

रामायणातील राम आणि सीता यांचे नाते सपिंडविवाहाचे नसून पुरुषप्रधान संस्कृतीतील भिन्नगोत्रिय विवाहांतून निर्माण झालेले आहे. ते पितृसत्ताक जीवनपद्धती स्थिरावल्यानंतरचे आहे.

**या गीतातील राम डोंगरात लपणारा का ? –**

या गीतातील राम पायी चालणारा आणि डोंगरात नाहीसा होणारा असा का आहे? डोंगर शोधूनही रामाचा पत्ता लागला नाही असा उल्लेख का येतो ? या ठिकाणी विवाहास पूर्वरूढीनुसार उत्सुक असणारी यमी आणि तिला झिडकारून बहीणभावाच्या नात्याचे आज अस्तित्वात असलेले रूप प्रस्थापित करू पाहणारा यम यांची आठवण येते.

सीता ही भूमिकन्या असून धरतीचे रूप मानली जाते. तर सावळा राम निळ्या आकाशाचे प्रतीक मानला जातो. आकाशातून कोसळणारा पाऊस आणि माती यांच्या संयोगातून बीज रुजते. कृषिसंपत्ती निर्माण होते. या गीतातील रामसीतेचा संदर्भ कृषिजीवनाच्या दृष्टीतून येतात. या गीतात विवाहाचा उल्लेख आहे. जरतारी बोहोलं आहे आणि नवरानवरी पाटावर बसले आहेत. हे नवरा नवरी कोण ? आकाश आणि भूमी ? म्हणजेच राम आणि सीता का ?

**पुरुषप्रधान आर्य संस्कृतीचा संस्कार –**

भोंडला आणि हादगा हे 'वर्षना'चा सत्कार करणारे उत्सव आहेत. वर्षनातून सर्जन घडत असते. वर्षा हे समृद्धीचे मूळ आहे असे मानणाऱ्या बीजप्रधान अथवा पुरुषप्रधान संस्कृतीचे संस्कार या उत्सवातून अधिक्याने जाणवतात. या गाण्यातील प्रत्येक ओळ जणु वेगवेगळ्या काळाचा रंग धारण करणारी असते. या गीतातील पुढील ओळी वेगळीच कलाटणी घेतात.

पाटी पाटी तिरूबाई राळा
तिरू तिरू राळा मुंजक बाळा

मुंजक बाळाची मुंजदोरी
तीच दोरी सावध करी
सावध सावध सर्वत काळ
सर्वत काळचा उत्तम दोर....

राळ्याचा भात किंवा राळ्याची भाकरी हे पूर्वीच्या काळी समान्यजनांचे पूर्णान्न होते. राळा हे कृषिजीवनाच्या आरंभकाळातील प्रमुख धान्य होते. राळ्याचे उल्लेख भोंडल्याच्या अनेक गाण्यांतून येतात. मानवजीवनाच्या सुरुवातीच्या काळात, ज्या वनस्पती माणसास अधिक उपयोगी असत, अशांचे उत्सव वा पूजन करण्याची प्रथा होती. भारतीय संस्कृतीत झाडापानांची पूजा प्राचीन काळापासून प्रचलित आहे. (उदा. पिंपळाची पूजा, वटवृक्षपूजा, आवळीखाली भोजन करण्याची प्रथा, आषाढात हिरव्या झाडांची पूजा इ.)

**मुंजक बाळ : ग्रामरक्षक वीरदेवता –**

'तिरूबाई' या शब्दाचा संदर्भ शोधण्यासाठी दाक्षिणात्य भाषांचा शोध घ्यावा लागतो. तिरू म्हणजे शिव किंवा श्री... समृद्धी, तिरू हा शब्द येथे समृद्धी या अर्थाने आला असावा. ' मुंजक बाळ' म्हणजे मुंजा. मुंजा हे ब्रह्मचाऱ्याचे कडक भूत असते असे मानले जाते. 'मुंजा' हा ग्रामरक्षक तसेच क्षेत्र रक्षक असतो. कृषिविधींशी संबंधित गीतांतून मारूती, यक्ष, मुंजा या क्षेत्ररक्षक वीरांचे उल्लेख वारंवार येतात. मुंजक बाळाची दोरी म्हणजे त्याच्या जवळचे सामर्थ्य. मुंजा जानवे घालतो आणि जानव्यात संरक्षक शक्ती असते असे मानले जाते. भीती वाटली की जानव्याची गाठ हातात धरून रामनाम घेतले तर भय नाहीसे होते असा समज रूढ आहेच. दोरीमुळे मुंजकबाळाला जादू प्राप्त झाली आहे असा संकेत या ओळीतून मिळतो. तिच्यायोगाने तो सर्वकाळ क्षेत्राचे, क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या धनधान्याचे रक्षण करतो.

**एक मोहक प्रतिमा –**

या गीताचा शेवटचा भाग अलीकडच्या काळात जोडला असावा असे. त्या ओळींच्या सुसंगत रचनेवरून आणि अर्थावरून लक्षात येते. ही गीते नववयसा म्हणजेच तरुणाईच्या उंबरठ्यावर वा थोडे अल्याड असलेल्या मुली म्हणतात. त्या मुलींच्या भावजीवनांतील कोमल धागे या गीतांना सहजपणे जोडले गेले आहेत. बहिणीविषयींची अपार प्रीती त्या ओळीतून दृगोचर होते. बहिणीचा भांग 'मोतियाचा

चांद' वाटतो. तर तिची वेणी मोत्याची फणी वाटते. ही दोन्ही चित्रे सर्वसामान्य असली तरी

बहिणी तुझा खोपा गऽ
चंद्रफूल घेते झोपा गऽ

या ओळीतून नाचून खेळून दमताना सैलावलेला खोपा आणि त्यात खोचलेला आकडा ढिला होऊन सैल पडलेले सोन्याचे चंद्रफूल नाचताना वरखाली होणाऱ्या चंद्रफुलाला पाहून ते जणू डुलक्या घेतेय असे वाटणे. हे चित्र विलक्षण मोहक वाटते.

**गाणे – ३ : अतूला मातूला चरणी चतूला –**

अतूला मातूला चरणी चतूला (हातूका मातूका चरणी चतूका)
चरणीचे सोंडे हातपाय सणसणित गोंडे (चरणीच्या सोंडेवरी खुळखुळ बाळा सोंडेवरी)

एक एक गोंडा विसाचा
नागर साडे नेसायचा
नेसा नेसा ग भावल्यांनो (मावल्यांनी)
सात घरच्या पावण्यांनो
पावण्या गेल्या खोली
चितांग टाकलं डोली
चिटक्या मिटक्या करडंफूल
ते बाई फूल मी तोडील
हादगा देवा वाहिल
हादग्या तुझा तुरारा
मोतीयाचा भरारा
बाईच्या परसांत लिंबारा
लिंबारा खाल्ला गाईनं
गाई गाई दूध ग
दूध दिलं बापाला
बाप्पा बाप्पा अंगारा

अंगारा दिला आईला
आई आई लुगड ग
लुगड दिलं बहिणीला
बहिणी बहिणी धोतर ग
धोतर दिलं भावाला
भावा भावा गोंडे दे
माळावरचे धोंडे घे

'अतुला मातुला चरणी चतुला' या ओळीचा एक पर्याय 'हातुका मातुका चरणी चतूका' असाही आहे. तसेच दुसऱ्या ओळीचा पर्याय 'चरणीच्या सोंडेवरी बाळा खुळखुळ गोंडेवरी' असाही आहे. गीतातील शब्द प्रतिमा यातून मिळणाऱ्या संकेतांची संगती लावणे अतिशय कठीण काम आहे.

'आतुला मातुला' या ओळीवरून आणि त्या ओळींच्या लयीच्या वजनावरून मराठी कहाण्यांमधील शेवटची ओळ आठवते. 'उतु नकोस मातु नकोस घेतला वसा टाकू नकोस'. व्रत पाळताना वा त्या व्रताचे फळ मिळाल्यावर उत्तान होऊ नकोस किंवा ते व्रत अर्ध्यावर सोडू नकोस अशी सज्जड समज त्यातून दिलेली असे. तसेच उतण्यामातण्यापासून दूर राहिलास तर समृद्धी प्राप्त होईल अशी ग्वाही त्यातून ध्वनित होत असते.

भोंडला-भुलाबाईच्या गाण्यातून 'बाळा' चे उल्लेख वारंवार येत असतात. भुलाबाईच्या मातीच्या मूर्तीच्या मांडीवर वा समोर पाळण्यात बाळ असतेच. भुलाबाईच्या गाण्यात तिच्या बाळंतपणाच्या सोहळ्याचा उल्लेख असतो. भुलाबाईच्या उत्सवाच्या गाण्यातून हा संदर्भ या गाण्यात दाखल झाला असावा. भुलाबाईचे बाळ हे गणेश बाळच असते. आणि गणेशबाळाचे तोंड हत्तीसारखे असते हे सर्वज्ञात आहे. हत्तीने सोंडेने बाळ उचलून वाचविण्याच्या अनेक गोष्टी लोककथांतून विपुल प्रमाणात सापडतात.

'गोंड्या' चा उल्लेखही या गीतातून अनेकदा येतो. आपल्या बंधुरायाकडे गोंडे मागणाऱ्या बहिणी लोकगीतातून भेटत असतात. गोंडे हे थाटाचे, समृद्धीचे दर्शक असतात. म्हणूनच लोकजीवनात गोंड्याची गाडी, शिंगांना गोंडेफूल बांधलेले बैल, वेणीला बांधलेले गोंडे यांना समृद्धीदर्शक महत्त्व असते.

सात, सोळा, वीस हे संख्यावाचक शब्दही लोकसाहित्यातून मांगल्याचे धनसंपन्नतेचे प्रतीक म्हणून येतात. 'वीस' हा आकडा गणनपद्धतीत अत्यन्त महत्त्वाचा आहे. खेड्यातील अडाणी महिला 'दोन विसा' ४० तीन विसा ६० असा वापर करते. अशा रीतीने गणन करण्याची ही पद्धत पुरातन आहे.

**मावल्या : सात मृतका : सात घरच्या पाहुण्या –**

पौर अथवा नागर आणि जनपद असे दोन भाग राज्यांचे असत. नगरांत उच्चभ्रू, सरदार, व्यापारी, अधिकारी यांची वसाहत असे. तर जनपदांत लहान लहान ग्रामांचा अंतर्भाव असे. त्यात मुख्यतः शेतकरी, शेतीचे जोड व्यवसाय करणारे कारागीर राहत असत. ग्रामीण भागात राहणाऱ्यांना नगराबद्दल नेहमीच उत्सुकता आणि आकर्षण असते. विशेषतः नगरातील आधुनिक, चमकदार वस्तूंबद्दल विलक्षण आकर्षण असते. 'नागर साड्यां' चा उल्लेख त्याच भावनेतून आलेला आहे. साडी नेसविणे हे सन्मानाचे आणि प्रतिष्ठेचे मानले जाते. ही गाणी लेकीबाळींच्या ओठी असतात. त्यांतील साडे, गोंडे यांचे उल्लेख माहेरपणातून माहेरवशिणीस मिळणाऱ्या हक्काच्या आहेराचे आहेत. माहेरची श्रीमंती वा समृद्धी हा स्त्रीच्या मनातील नाजूक भावबंध आहे.

> नेसा नेसा ग मावल्यांनो (भावल्यांनो)
> सात घरच्या पावण्यांनो
> पावण्या गेल्या खोली
> चितांग टाकलं डोली

या ओळीतील सात घरच्या पाहुण्या कोणत्या ? त्या मावल्या की भावल्या ? कृषिप्रधान संस्कृती मातृपूजक होती. भारतात सप्तमातृकांची पूजा सर्वच प्रांतांतून होत असे. त्यांना सात बहिणी असेही म्हणतात. या सातमाता धनधान्याची समृद्धी देतात, संकटे आणतात, रोगराई दूर करतात अशी समजूत आहे. प्राचीन वाङ्मयातून, लेण्यांतून, सप्तमातृकांचे उल्लेख वा मूर्ती आढळतात. आंध्र - कर्नाटक-तामिळनाडूत आजही सप्तमातृकांची पूजा होते.

लोक लक्ष्मीचे रूप –

आपल्याकडे लेकीलाही 'लक्ष्मी' मानले जाते. विवाहानंतर घरी येणारी लेक 'सवाष्ण' म्हणून सन्मानित केली जाते. सवाष्ण ही मांगल्य, समृद्धी, निरंतर सौभाग्याचे प्रतीक असते. आजही शुक्रवारचे बोडण, गौरी यासाठी सवाष्ण म्हणून माहेरवाशिणीचा मान केला जातो. कुमारिकांची, सप्तमातृकांची पूजा करण्याचा आचार मातृसत्ताक कृषिसंस्कृतीतून आजच्या प्रचलित व्रतवैकल्यांत समाविष्ट झाला असावा. या सातमातृका म्हणजेच सातघरच्या पाहुण्या. त्या माहेरपणाला आल्या आहेत. त्यांना नागरसाडे नेसवून ओटी भरून सन्मानित केले. त्यानंतर त्या सात जणी घराच्या खोल्यांतून गेल्या. खोलीत 'चितांग' टाकले. चितांग हा सोन्याचा दागिना आहे. खोलीत चितांग टाकतात म्हणजेच घर धनधान्य दुभत्याने भरून टाकतात. असा संकेत या ओळीतून मिळतो. या ओळी वाचताना गौरीगणपती विसर्जनानंतरची प्रथा आठवते. गौरी गणपती विसर्जनानंतर ताम्हणातून नदीतील वाळूखडे आणतात आणि ते घरातील प्रत्येक खोलीतून टाकतात. विशेषतः कोठीच्या खोलीत टाकतात. असे केल्याने घराला नेहमीच भरभराट लाभते अशी कल्पना आहे.

स्त्रीगीतात निरर्थक शब्द पादपूरके म्हणून वारंवार येतात. त्यातून प्रासही साधला जातो. 'चिटक्या मिटक्या' हा शब्द गीतात असाच आलेला आहे. करडफूल म्हणजे करडईचे फूल. हे फूल लाल पिवळे असते. शुभता आणि मांगल्याचे प्रतीक हळदीकुंकू. निरंतर समृद्धी सौभाग्याचे प्रतीक हळदीकुंकू तेही लाल पिवळे. ते फूल हादगा देवास वाहिल्याचा उल्लेख येतो. काही भागांत हे गाणे इथेच समाप्त होते. तर काही ठिकाणी त्याच्या पुढे आधुनिक काळात जोडलेला तुकडा आढळतो. लोककथांतील एक लोकप्रिय कथाबंध आहे. एक वस्तू देऊन दुसरी घेणे ती देऊन तिसरी घेणे. या गाण्यातील शेवटचा तुकडा अशाच आशयाचा आहे. बाईच्या परसातला लिंबारा खाऊन गाय भरपूर दूध देईल. ते दूध बापाला देऊन त्याच्याकडला अंगारा घेऊन आईला दिला जाईल. तिच्याकडचं लुगडं बहिणीला. लुगड्याबदली धोतर घेऊन ते भावाला आणि त्या बदली गोंडे घेण्याचे एक स्वप्न इथे रेखाटले आहे. या गीतातील सामाजिक व्यवस्थेचा अतिशय तरल धागा

उकलायचा झाला तर

दूध दिलं बापाला
बाप्पा बाप्पा अंगारा
अंगारा दिला आईला.....

या ओळीतील मिळणारा संकेत अभ्यासण्याजोगा आहे. 'अंगारा' हे जादूमय शक्तीचे प्रतीक आहे आणि तो अंगारा आईला देण्याची मनीषा लेकीने केली आहे. समाज आणि कुटुंब यातील नातेसंबंधांच्या अतिशय तरल भावछटा या गीतातून आढळतात. ही गीते कृषिप्रधान जीवनव्यवस्थेच्या काळात निर्माण झाली असली तरी कालप्रवाहात त्यांचे जतन करताना महाराष्ट्राच्या लेकीसुनांनी आपल्या कुचंबलेल्या मनाचा हळवेपणा, त्या मनानी रंगवलेली स्वप्ने... त्यांचे रंग या गीतात भरून दिले आहेत. स्त्री सासरी लडिवाळ हट्ट करू शकत नाही. हक्काने काही मागायचे ते भावाकडेच. ही मनोवृत्ती या ओळीतून व्यक्त होते. अर्थात स्वतः माळावरचे धोंडे वेचून कष्टणारा भाऊ आपल्या बहिणीसाठी रेशमाचे गोंडे मायेने आणतो म्हणूनच बहीणही आपला हक्क सांगते. ही सामाजिक बाब नजरेआड करून चालणार नाही.

**भुलाबाई : गुलाबाई : संजाबाई –**

भुलाबाई ऊर्फ गुलाबाई या विदर्भ-खानदेशात अत्यन्त लोकप्रिय असलेल्या कुमारिका-उत्सवाचा प्रारंभ भाद्रपद पौर्णिमेस होतो. उत्तरेकडे महिना पौर्णिमेपासून बदलतो. त्यानुसार आश्विन महिन्याच्या प्रारंभापासून भुलाबाई सुरू होते. मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, उत्तरप्रदेश, पंजाब, हरयाणा या भागात याच काळात सांझी नावाचा कुमारिकांचा उत्सव साजरा केला जातो. भुलाबाईची गाणी गोळा करीत असताना धुळे येथील पुनम परदेशी यांनी भुलाबाईची पारंपरिक आरती सांगितली. ही आरती खूप काही सुचवून जाणारी आहे. ती आरती अशी :

सांजी अे आरती
बे सांजी पार्वती
पहिला मुलगा न्हाऊन धुऊन
गुलाल नाही तो छडी लागाऊ
कैसरियामाँ भांग पाडऊ ( ५ वेळा आरती म्हणतात)

वरील आरती पाच वेळा म्हणण्याची पद्धत आहे. पूनमताईना मध्य प्रदेशांत

सांजाबाईच्या चालणाऱ्या प्रथेबाबत माहिती नव्हती. सांझी या व्रताच्या मूळ कल्पनेबद्दल डॉ. कुलदीप लिहितात, 'ब्रज की सांझी एक प्रसिद्ध कला है। जिसका प्रारंभ पौराणिक दृष्टीसे राधारानीको प्रसन्न करने के लिओ श्रीकृष्ण ने किया था। सबसे पहिले शरद ऋतु की संध्या को यह फुलों से बनाई गई थी. इसीलिए इसका नाम साँझी पडा। '

सातत्य राखून बदल स्वीकारणे, तो अंतरात एकरूप करून घेणे हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. सार्वत्रिक होणे (प्रिव्हेलेन्स) प्रतिकूल परिस्थितीतही टिकून राहणे (सर्वाव्हयल) अवशेष रूपाने राहणे आणि लुप्त होणे (ॲबसोलेट) या प्रक्रियांद्वारे (प्रोसेस) बदल घडत असतात. ही गाणी कोणे एके काळी सार्वत्रिकपणे प्रचलित असतील. त्यामुळेच काळाच्या ओघात प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली तरीही ती चिवटपणे टिकून राहिली. मात्र त्यातील कालबाह्य, काळास महत्त्वपूर्ण न वाटणारा भाग लुप्त झाला आणि त्यांचे अवशेष पूर्वेतिहासाची साक्ष देत जिवंत राहिले. आज गाण्यांमध्ये वरवर पाहता वाटणारी निरर्थकता या चारही प्रक्रियांनी नीट समजून घेतल्यास सहजपणे लक्षात येते. निरर्थकतेतील 'अर्थ' उलगडण्यास मदत होते.

'सांझी' मध्य प्रदेश, राजस्थान, व्रजभूमी, बंगालचा काही भाग इ. भागांत विविध रूपातूंन साजरी केली जाते. भुलाबाईच्या गाण्यात शिरलेली ही 'आरती' बाहेरून भुलाबाई या व्रतात दाखल झाली असावी की 'सांझी' चे मराठी रूप 'भुलाबाई' उत्सव हे असावे ? भुलाबाईच्या गाण्यांचा शोध घेत असताना 'सांझी'च्या गाण्यांचा आशय पडताळून पाहणेही महत्त्वाचे ठरणारे होईल. परंतु प्रस्तुत अभ्यासाच्या कक्षेत हा विषय येत नसल्याने इथे केवळ दिशासूचन केले आहे. भुलाबाईचे नमनगीत 'पहिली ग भुलाबाई' हे आहे. ते रोज म्हटलेच जाते. भोंडला आणि भुलाबाईची नमनगीते सोडल्यास, इतर गाणी दोनही उत्सवांत म्हटली जातात. भुलाबाईचे नमनगीत तीन तुकड्यांचे असून येथे त्याचा सलगपणे शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उमेचे माहेरपण आणि बाळंतपण –**

भुलाबाई उत्सवांत उमेचे ऊर्फ पार्वतीचे केवळ माहेरपण अभिप्रेत नसून हे दिवस तिच्या बाळंतपणाचे आहेत. भुलाबाई हा 'सृजना' च्या सत्काराचा उत्सव आहे.

पहिले अकरा दिवस भुलाबाईच्या बाळाची बाज, टिपऱ्यांच्या साहाय्याने अभिनित केली जाते. त्यावर बाळ झोपवले जाते. अखंड सुपारीस कुंकवाचा ठिपका देऊन त्यालाच बाळ केले जाते. बाराव्या दिवशी बाळाचे नाव ठेवण्याचा विधी केला जातो. त्या दिवशी टिपऱ्यांची बाज न करता टिपऱ्यांचा चौफुला मांडून पाळणा केला जातो.

आकाश बाई आकाश अस्स कस्स आकाश

भुलोजीला लेक झाला नाव ठेवा प्रकाश ।।

अशा रीतीने यमक जुळवून बरीच नावे घेतली जातात व शेवटी गणेश, विनायक असे गणपतीचे नाव ठेवले जाते. नाव ठेवण्याचा विधी रोजच केला जातो. भोंडला वा हादगा फेरात टाळ्यांच्या तालावर खेळतात. तर भुलाबाई मात्र टिपऱ्यांचा तालावर फेरात खेळली जाते.

**भुलाबाईचे नमन–गीत –**

पहिली ग भुलाबाई
घातिली मंडपा
खंडोबाच्या नारीबाई
आवष्णीचं पाणी जसं
गंगेच्या पाण्याला
ठोकिला राळा
हनुमंत बाळाचे
सीताबाई शोभे
भाऊ भाऊ पिकती

झळकतीचं एकच पान
एवढीशिशी गंगा
तांब्या पितळी
तांब्या पितळी
हिरवी टोपी
हिरवी टोपी हरपली
सरपदादा एकला

देव देव सादेव
खेळखेळे खंडोबा
वसावसा आवष्णी
गंगेच पाणी
वेळीला भात
हनुमंत बाळा
लांब लांब झोके
अस्तुरी पुढे
माता पुढे झळकती
(मातापूर झयकती)
दुरून भुलाबाई नमस्कार
झुळझुळ व्हाय
झळकत जाय
नायगो
बायको
सर्पाआड लपली
जाई आंबा पिकला

जाईनाही जुई नाही
चिंचेखालची राणूबाई
चिंचा तोडित जाय ग
पालखीतली भुलाबाई
शोपा मिरवीत जाय ग
शोपा शोपा पेटोरा
भुलाबाई जाते माहेरा
जाते तशी जाऊद्या
तांब्याभर पाण्याने न्हाऊ द्या
बोटभर मेण लावू या
बोटभर कुंकू लावू या
निळ्या घोड्यावर बसू द्या
निळ्या घोड्याचे उलटे पाय
आऊल पाऊल धुळे गाव
धुळेगावचे ठसेठुसे
भुलाबाई म्हणते माहेर जसे
माझे माहेर सोनारवाडा
भुलाबाई म्हणते बिंदी तोडा
आचे दूध तापे
त्यावर पिवळी साय

(चाल बदल)

लेकी गुलाबाई
साखळ्या लेऊन जाय
कशी लेऊ दादा
घरी नंदा जावा
करतील माझा हेवा
हेवा परोपरी - नंदा घरोघरी
पार्वती चाले पायी
शंकर घोड्यावरी
आडवी गंगाजमुना
कशी उतरू बाई

(चाल बदल)

गडावर गड बाई माहुर गड
तिथला सोनार कारागीर
त्याने आणला साखळ्यांचा जोड
घ्या घ्या भुलाबाई साखळ्यांचा जोड
घेता घेता सजशी पती गेले वंजोशी
एवढा शृंगार कोणाशी ? भुलोजीच्या राणीशी

(चाल बदल)

डोला बाई डोला
डोल्याची काडी
भोळा शंकर
बांधितो माडी

माडी बांधुनी श्रीमंती केली
चला चला भुलाबाई मंदिरी जाऊ
नथ नाही तर कशी येऊ ?
नथीसाठी वंजिस गेले
सोन्याचं कारलं फेकीत आले
एक गेला जिरिया एक गेला मिरिया
एक गेला खारीका एक गेला खोबरा
खारीक खोबऱ्याचं आलं, जिऱ्यामिऱ्याच काही नाही आलं
पड पड पापडी
चल ग सई, जागरणाला
सीतेच्या माहेरी तांब्याची चूल
मखर घातलं जाई फूल
झाल झाली देवापाशी
सुनमुख झालं तुळशीपाशी
हंडा घंगाळ पाणी तापलं
बाळ न्हाऊन पाळण्यात निजलं
भुलाबाई भुलाबाई आपल्या मुलाची बाज/पाळणा पाहा
बाज/पाळणा पाहा
साखरेच्या गोणीबाई लोटविल्या अंगणी
आज आमच्या भुलाबाईला पहिला दिवस, पहिला दिवस
परहिल्या दिवसी बाळाला टोपी, मोत्यानं गुंफली,
जो जो रे जो जो रे

**खेळ खेळणारा खंडोबा –**

हे नमनगीत मुळातच खूप लांबलचक आहे. त्यामुळे तुकडे करून म्हटले जाते. या गीतांत मंडप घातल्याचा उल्लेख असून खंडोबा तेथे खेळ खेळत असल्याचे सांगितले आहे. 'खेळ खेळे खंडोबा' या ओळीतून काय ध्वनित होते ? मराठी भाषेत 'खेळ खंडोबा होणे' या म्हणीचा अर्थ वेगळ्या अर्थाने वापरला जातो. खंडोबा[८] हे महाराष्ट्राचे लोकदैवत आहे. खंडोबाची पत्नी म्हाळसा. धनगरकन्या बाणाई हिच्या अलौकिक सौंदर्याने मोहित होऊन त्याने बाणाईशी विवाह केल्याची

कथा सर्वश्रुत आहे. त्यामुळेच धनगर समाज खंडोबास जावई मानतो. तो त्यांचे दैवत आहे. खंडोबाची अनेकविध गीते महाराष्ट्राच्या विविध भागांत प्रचलित आहेत. म्हाळसा आणि बाणाई यांच्या सवती मत्सराची कथा आणि त्यात खंडोबाची होणारी ओढाताण हा कथाबंध मराठी लोकजीवनात रुजलेला आहे. खेळ खंडोबा होणे म्हणजे संसाराची वासलात लागणे असा अर्थ का लावला जातो याचे इंगित वरील कथाबंधाशी निगडित आहे. भोंडला वा हादग्याच्या नमनगीतात खेळाचा उल्लेख आहे. भुलाबाईच्या नमनगीतातही 'खेळ खेळणारा खंडोबा येतो' हा खेळ संसाराचा असावा आणि हा खेळ अखंडपणे खेळला जाणार आहे. ही क्रीडा जगरहाटीची आहे. सृजनाची आहे. मराठवाड्यात, ग्रामीण भागात जुन्या स्त्रियांच्या बोलण्यात स्त्रीपुरुष समागमासाठी 'खेळणे' हा शब्द वापरला जातो.

या गीतांत खंडोबाच्या नारी बाई वसा वसा आवष्णी
आवष्णींच पाणी जसं गंगेच पाणी ।।

अशा ओळी आहेत. खंडोबाच्या नारींचा येथे आवर्जून उल्लेख का आला असावा ?

खंडोबा हे महाराष्ट्राचे कुलदैवत आहे. महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजापासून ते कोळी, सुतार भटके समाजातील विविध जातींचे लोक या दैवताची श्रद्धेने पूजा करतात. महाराष्ट्रातील लोकसाहित्याचे आणि लोकसंस्कृतीचे सन्माननीय अभ्यासक श्री. डॉ. रा. चिं. ढेरे खंडोबाला लोकदेव म्हणतात. खंडोबाला शिवाचा अवतार मानतात. मणिमल्लासुरांचा वध करण्यासाठी शिवाने शक्ती निर्माण केली आणि स्वतः मार्तण्डभैरवाचे रूप धारण केले. ही शक्ती म्हणजेच म्हाळसा .... महालया. खंडोबाच्या म्हाळसा, बाणाई या नारींव्यतिरिक्त पालाई ही पाली गावची गवळण त्याची भक्त होती. तिच्यासाठी तो पालीस प्रकटला अशी आख्यायिका आहे. खंडोबाला नवस बोलून मुली वाहण्याची प्रथा महाराष्ट्र कर्नाटकात अलीकडच्या काळापर्यंत चालू होती. खंडोबाला अर्पण केलेल्या या मुरळ्यांचा खंडोबाशी विवाह लावून देत.

गंगा आणि उमा यांच्यात सवतीमत्सर उत्पन्न झाल्याने शंकराने त्यांना एकत्व दिल्याची कथा सर्वश्रुत आहे. कर्नाटकात म्हाळसेला माळव्व नावाने ओळखतात. तिला गंगी माळव्व आणि तुप्पद माळव्व अशी नावे आहेत. गंगा उमेच्या भांडणाची व नंतरच्या एकत्वाची लोककथा बीजभूत मानून तशीच कथा म्हाळसा व गंगेच्या एकत्वाची सांगितली जाते.

आवष्णीचं पाणी जसं गंगेचे पाणी या ओळीतील गंगेच्या पाण्याचा संदर्भ खंडोबाच्या कथेतून तर आला नसेल ?

राळ्याचा उल्लेख या गीतात आहे. राळा हे प्राचीन काळातले महत्त्वाचे अन्न होते. राळा हे अग्नितत्त्व आहे. राळ उडविणे हा वाक्‌प्रचार मराठीत रूढ आहेच. राळ्याचा भात आजही कोकणातल्या गरिबाचे महत्त्वाचे अन्न आहे. वसुबारसेस राळ्याचा भात करून खाण्याची रूढी महाराष्ट्रात प्रचलित आहे.

**हनुमंत बाळ : वीरदेवता –**

हा गाण्यातील 'हनुमंत बाळ' ही वीरदेवता आहे. महाराष्ट्रात दोन प्रकारच्या हनुमंताच्या प्रतिमा आहेत. भक्त हनुमान हा रामाच्या सेवकाच्या रूपात असतो. त्यालाच दास हनुमान वा दास मारूती म्हणतात. वीर मारूती वा वीर हनुमान ही क्षेत्रपालक देवता आहे. आर्यपूर्व संस्कृती, आर्येतर समाज यक्षपूजक होते. वैदिकांच्या मते यक्षासारख्या अद्‌भुत देवांवर विश्वास ठेवणारे लोक अविकसित बुद्धीचे होते. यक्ष ही लोक-देवता मानली जाते. एकेकाळी यक्षपूजा सर्वत्र प्रचलित असावी. कारण वेदोत्तर साहित्यात, बौद्ध, जैन साहित्यात यक्षांचे उल्लेख विपुल प्रमाणात येतात. वैदिक देवदेवतांचे महत्त्व समाजात वाढू लागले तरी 'यक्ष' कल्पनेचे समूळ उच्चाटन झाले नाही. [१]'वीरपूजा' ही प्राचीन यक्षपूजेचाच अवशेष आहे. आपण मारूतीला 'महावीर' म्हणतो. तो यक्षनियंत्रक आहे असे मानले जाते. आश्विनात होणाऱ्या वर्षन सर्जनाच्या उत्सवांच्या विधिगीतांतून येणारे हनुमान, खंडोबा, मुंजा, भुलोबा यांचे उल्लेख क्षेत्रपाळ यक्षपूजेचे अवशेष आहेत. भुलाबाईचे हे नमनगीत अतिशय जुने असले पाहिजे. कारण त्यातील शब्दांशब्दांत संगती लावताना त्यात पडलेले अंतर जाणवते.

**या गीतातील सीता : भूमिस्वरूपात –**

खंडोबा त्यांच्या नारी, हनुमंतबाळ यांच्या पाठोपाठ सीतेचा संदर्भ येतो. अर्थात या गीतांतील सीता केवळ सती आणि रामपत्नी म्हणून या गीतांत येत नाही. सीतेचा रामपत्नी म्हणून लोकगीतांतून स्वतंत्रपणे उल्लेख येतो, तेव्हा तिच्या वनवासाचे किंवा वनवासी मातृत्वाचे संदर्भ येतात. उदा. ---

१. सीतेच्या हाती फुलाच्या गजरा
   रामाच्या हाती बाण

धाडु नको वनी राम, कैकयी बाई ....
सीता निघाली वनवासाला
म्होरं लागलं अशुकवन
धाडु नको, वनी राम, कैकयी बाई ....

२. अंगणी खेळी सीता
जनकाला पडली चिंता
सीता--- माईला, रामाला द्यावी आता ....
चांदीच्या ताटामंदी
ठेविले मंगळसूत्र
सीतामाईचा पती ओवीतो रामचंद्र ....

मात्र भुलाबाईच्या गीतातून येणारे उल्लेख भूमिस्वरूप, भूदेवी सीतेचे आहेत. तसेच 'माता वा माऊल्या' यांचे उल्लेखही सप्तमातृकांचे असावेत.

भाऊ भाऊ पिकती (टिकती) मातापुढे झळकती
झळकतीचं एकच पान दुरून गुलाबाई नमस्कार

या ओळीतील शब्दांतून कोणते संकेत मिळतात ? पिकणे ही अवस्था तेजाचा एक भाग आहे. परिपक्वता ही नेहमीच तेजस्वी असते.

**लोकगीत प्रक्रियांद्वारे बदलत राहते –**

वरील ओळ म्हणताना मुली भुलाबाईच्या मूर्तीकडे पाहून नमस्कार करतात. नमनगीताचा पहिला भाग इथे संपतो. या गीतांत संगती नाही हे सतत जाणवत राहते. सार्वत्रिकता, लागून राहण्याची चिवट प्रकृती, अवशेषरूपाने राहणे आणि लुप्त होणे या प्रक्रियांतून टिकलेल्या गाण्यांतून येणारे शब्द, मौखिक गाण्याच्या स्वरूपात जेव्हा आपल्यासमोर येतात, तेव्हा त्यातील असंबद्धता आपल्याला जाणवते. पण तरीही त्या शब्दापाठचा क्षीण आणि सूक्ष्म असा संदर्भ मनाला जाणवतो, तो शब्दात पकडणे शक्य होत नाही.

या गाण्यात 'टोपी' हा शब्द अतिशय मजेशीरपणे येतो. उदा.:

तांब्यापितळी नाय गो हिरवी टोपी बायको
हिरवी टोपी हरपली सर्पाआडे लपली

सरपदादा एकला जाई आंबा पिकला

जाई नाही जुई नाही चिंचाखालची राणूबाई

चिंचा तोडित जाय गो ...

पालखीतली भुलाबाई शोपा भिरवीत जाय गो ..

'टोपी ' हे मांगल्याचे प्रतीक मानले जाते. आजही शुभगोष्टींसाठी, विधीसाठी डोक्यावर टोपी आवश्यक मानतात. वरील ओळीत सर्प आणि आंबा यांचा उल्लेख एकत्र येतो. सर्प आणि आंबा यांचे साहचर्य कोठून आले असावे? सर्प आणि भूमी व सर्प आणि रजोद्रव्य यांचा अन्योन्य संबंध पुरातन काळापासून कल्पिलेला आहे. सर्प हा भूमिरक्षक आहे, तो पिकाचे रक्षण करतो, सर्पाच्या फणीवर पृथ्वी तोललेली आहे असे परंपरेने मानले जाते. सर्पामुळे उंदीर घुशी या धान्य नष्ट करणाऱ्या प्राण्यांचा नायनाट होतो. त्यामुळे त्याला कृषिजीवनात सन्मानाचे स्थान आहे. नागपूजा आजही नागपंचमीच्या सणाद्वारे केली जाते. नागपूजा, विविध दैवतांसोबत नागाचे साहचर्य इ. संकल्पना सार्वत्रिकपणे आस्तित्वात होत्या आणि त्यांचे अवशेष आजही भारतीय संस्कृतीत आढळतात.

सर्प हे पुरुषयोनीचे प्रतीक मानले जाते. सर्प स्वप्नात येणे हे 'कामेच्छे'चे प्रतीक मानतात. जगातील अनेक मानवसमूहांत सर्पाचा आणि स्त्रीच्या रजस्त्रावाचा संबंध कल्पिलेला आहे. स्त्री वयात आल्यावरच मातृत्व धारण करू शकते. तद्वत् धरणीही रजस्वला झाल्यावरच धनधान्याची विपुल निर्मिती करू शकते. अशी कल्पना भारतातील सर्व भागांत अस्तित्वात आहे. 'अंबूवाची' हा उत्सव सर्वत्र साजरा होतो. रा. चिं. ढेरे यांनी 'लज्जागौरी' या संशोधनापर ग्रंथात 'अंबुवाची' उत्सवाचे विस्तृत विवेचन केले आहे. त्यात ते नमूद करतात की सर्प हा स्त्रीच्या रजःस्त्रावाला कारणीभूत असल्याची समजूत जगातील अनेक समाजात आहे.

'बंगालमधील अंबुवाची'[१०] उत्सवातील एका यात्वात्म क्रियेत रजःस्त्राव आणि सर्प यांचा संबंध अगदी वेगळ्या स्वरूपात प्रतीत होतो. बंगलामधील लोक अंबुवाची त्या काळात (आषाढ शुक्ल सप्तमी ते दशमी) दूधात आंबरस मिसळून ते पेय पितात. हे पेय प्यायल्यामुळे वर्षभर सर्पदंशाचे भय उरत नाही असा तेथील लोकांचा विश्वास आहे. अंबरसयुक्त दूधाचे पान आणि सर्पदंश भयातून मुक्ती यातील संबंधाचे रहस्य शोधताना ते नमूद करतात की स्त्री रजस्वला असताना वा ती गर्भिणी असताना

तिच्याशी पुरुषसंबंध निषिद्ध मानला आहे. गर्भिणी स्त्री व नाग यांची नुसती दृष्टादृष्ट झाली तरी निषेधभंगाच्या अपराधामुळे त्याची दृष्टी जाते व ती स्त्री प्रसूत झाल्यावर तिच्या न्हाणीतल्या पाण्याच्या स्पर्शाने त्याला पुनःदृष्टी प्राप्त होते. हा कल्पनाबंध सर्वत्र प्रचलित आहे. नागसर्प व पुरुष यांची एकरूपता आणि पृथ्वी व स्त्री यांची एकरूपता ध्यानी घेता स्त्रीरूप पृथ्वीच्या रजोद्रव्यात पुरुषरूप नागाचा संपर्क टाळण्याचे सामर्थ्य आहे, ही यातुगर्भ धारणा दृढावणे अगदी स्वाभाविक ठरते. दूधात अंबरस मिसळून ते रक्तवर्णी पेय पिण्याची कल्पना ही प्रतीकात्मक रजोद्रव्याचे पान करण्याची कल्पना आहे. त्यामुळे सर्प दंशाचे भय उरणार नाही अशी या क्रियेमागील मानसिक बैठक आहे. सर्प आणि आंबा यांच्या साहचार्याचा अनुबंध वरील यातुकल्पनेतून या गीतात दाखल झाला असावा.

**राणूबाई : रण्णा सण्णा –**

'चिंचेखालची राणूबाई'[११] असा उल्लेख येतो. राणूबाई ही अग्निदेवता, सूर्यदेवता आहे. ऋग्वेदात रण्णा सण्णा देवीचे वर्णन आले आहे. कहाणी वाङ्मयातही आदित्यराणूबाईची कथा येते. भुलाबाई खानदेशांतही मांडली जाते. खानदेश, बागलाणात कानबाई या देवतेची पूजा केली जाते. 'कानबाई' देवता खानदेशातील सुप्रसिद्ध संशोधक श्री. भा. रं. कुलकर्णी यांना वैदिक देवता रण्णा सण्णा देवी असावी असे वाटते. खानदेशांतील लोकप्रिय देवतेचे रूप भुलाबाईच्या गाण्यांत दाखल झाले असावे.

'शोपा' या जिरे बडिशेप सदृश पदार्थाचा उल्लेख भुलाबाईच्या गाण्यातून बऱ्याचदा येतो. 'शेपा' बाळंतिणीस खोबऱ्याबरोबर खाण्यास देतात.त्या दुग्धवर्धक असतात असे मानले जाते. या उत्सवात भुलाबाई ही बाळंतपणासाठी माहेरी आलेली असल्याने 'शोपा'चा उल्लेख त्यात आला असावा.

या गीतात भुलाबाई माहेरी निघाल्याचे चित्र रेखाटलेले आहे. ती निळ्या किंवा जांभळ्या क्वचित हिरव्या घोड्यावर आरूढ आहे. खानदेशात ती निळ्या घोड्यावर बसल्याचा उल्लेख येतो. तसेच लोककथांमधील वेगवान घोड्याचे पाय उलटे असतात. तांब्याभर पाण्याने न्हाऊन, बोटभर मेण आणि बोटभर कुंकू लेवून भुलाबाई माहेरी निघाली आहे. तिचे माहेर 'सोनारवाडा' आहे.

**भुलाबाईचे माहेर सोनारवाड्यात कसे ? –**

या ठिकाणी एक बाब मनात येते, शंकर हा सर्वसामान्यांचा देव आहे. खंडोबा, भैरोबा, भुलोबा ही शंकराचीच रूपे. त्यांच्या कृपेचा कळवळा सर्व स्तरांत पोहोचलेला असतो. खंडोबाची म्हाळसा 'वाणीण' आहे, तर बाणाई 'धनगरीण' आहे. 'पालाई' ही गवळण आहे. शंकर आणि भिल्लीणरूपी उमेच्या प्रेमाची कथा सर्वश्रुत आहेच. भुलाबाईच्या गाण्यातून येणारे दागिन्यांचे संदर्भ, सोनारवाड्याचे उल्लेख, भुलाबाईचे माहेर सोनारवाडा यातून काही नवा संकेत मिळू शकतो.

**खडतर नाती –**

माहेरी आलेल्या भुलाबाईच्या चित्रानंतर आंचेवर तापणाऱ्या दूधाचे आणि पिवळ्या सायीचे चित्र गाण्यातून येते. दूधावरची पिवळी साय, सुखसमृद्धी ओतप्रोत भरल्याचे सुचवते. भुलाबाई लेकीला साखळ्या लेवून जाण्याचा आग्रह होतो. पण ती म्हणते –

कशी लेऊ दादा ?
घरी नंदा जावा
करतील माझा हेवा
नंदा घरोघरी

नणंद-भावजय, सासूसून, जावाजावा ही नाती 'खडतर' म्हणून ओळखली जातात. भावाबहिणीच्या निर्मळ प्रेमाचे प्रतिबिंब लोकसाहित्यात पाहावयास मिळते तसेच सासू नणंद यांच्या बद्दलच्या भावनांचे चित्र अत्यंत संयमाने रेखाटलेले दिसते.

उदा. –

१. सासरी वस वस नका करू सासूबाई
दारींच्या चाफ्यापाई दूर देशाची आली जाई

२. सासू हाय रागीट भारी
परपंचाची करती वडी
इथून करी लई तातडी
पल्याड मूळ धाडा .. मी जाती बगा म्हायाराला
नंदा दुष्ट आठजनी

काय सांगू मी त्येंची करनी
वडून माझी वेनी बालंट घाली – मी जाती आपल्या म्हायाराला

३. नाकातली नथ कशी हालं कशी डुलं
सावळे भावजायी जरा बेतानेच बोल

**माहूर गडाचा संदर्भ –**

भुलाबाईच्या या गीतांत [१२]माहूरगडाचा उल्लेख येतो. 'गडावर गड बाई माहूर गड. तिथला सोनार कारागीर' या ओळींच्या वेळी मुली टिपरीवर टिपरी उभी करून गड उभा करतात. माहूरगडाबाबत डॉ. रा.चिं. ढेरे यांनी लज्जागौरी या संशोधनपर ग्रंथात विस्तृत विवेचन केले आहे. आर्यपूर्व भारतात योनिपूजा आस्तित्वात होती. माहूरची देवी रेणुका आहे. ही भूमिस्वरूप आहे. रेणुका म्हणजे कुमारी भूमी–कोरी भूमी. वारूळातील माती कोरी असते असे मानतात. वारुळ, भूमीच्या उपासनेत महत्त्वाचे मानले जाते. ब्राह्मण काळापासून वारूळाची माती सुफलनकारक म्हणून वापरली जाई. रेणुकेला अखंड कुमारी मानले जाते. ती पुरुषतत्त्वाला अनेक रूपांत सांभाळते, परंतु तिचे कौमार्य भंग पावत नाही अशी समजूत आहे. भूमीचे रक्षण करणारे क्षेत्रपाळ नागस्वरूपात मानले गेले आहेत. भुलाबाईच्या नमनगीतातील सर्पांचे संदर्भ तसेच माहूरगडाचे संदर्भ, हा लोकोत्सव भूमीच्या सृजनाशी जोडलेला आहे याची जाणीव करून देतात.

**नथीचा नखरा –**

भुलाबाईच्या गाण्यांतून येणारे दागिन्यांचे संदर्भ अलीकडचे असावेत. स्त्रियांना विशेषकरून तरुण नववयसा मुलींना दागिन्यांची हौस असतेच. त्यामुळे खालील ओळीतील वनिताभाव अतिशय मनोरम वाटतो.

चला चला भुलाबाई मंदिरी जाऊ
नथ नाही तर कशी येऊ

मंगळसूत्राप्रमाणेच नथ हे सौभाग्याचे प्रतीक मानली जाते. नथीत नाजूक शृंगाराची, समृद्धीची अभिव्यक्ती असते. स्त्रीत्वाचा नखरा नथीत गुंफलेला असतो. जुन्या स्त्रिया म्हणतात की सतरा दागिन्यांपरीस एक गरक्याची नथ नाकात घातली की बाई सजते.

नथीसाठी वंजिस गेले
सोन्याचं कारलं फेकीत आले

या ओळीतील सोन्याच कारल हा संकेत सूचक आहे. सोन्याच असल तरी ते कारल आहे. मानापानाची बुजुर्ग माणस हात हलवीत परत येतात, अशा वेळी दुसरे काय म्हणणार ?

**पेराल तसे उगवते –**

जिरे, मिरे, खारीक, खोबरे या मसाल्यांच्या जिनसांचा उल्लेख काय दर्शवितो ? जिरेमिरे फेकणाऱ्यांच्या हाती काही येत नाही तर खारीकखोबर फेकीत जाणाऱ्यांना मात्र फळ मिळत.

खारीक खोबऱ्याचं आलं
जिऱ्यामिऱ्याचं काही नाही आलं

जिरेमिरे हे खारे... तिखट चवीचे प्रतीक तर खारीक खोबरे हे मधुर स्वादाचे आणि चवीचे प्रतीक. पेरावे तसे उगवते हे तर या ओळीतून सुचवायचे नसेल ?

**बाज आणि पाळणा –**

या गाण्याच्या अखेरच्या तुकड्यात भुलाबाईच्या बाळाचा संदर्भ येतो. भुलाबाईच बाळ पहिले अकरा दिवस बाजेवर झोपवलं जाते. टिपरीशेजारी टिपरी जोडून बाज केली जाते. त्यावर सुपारी ठेवतात. सर्व जणी उजवा हात त्या टिपऱ्यांना लावतात आणि म्हणतात –

साखरेच्या गोणीबाई लोटविल्या अंगणी
आज आमच्या भुलाबाईला पहिला दिवस .... पहिला दिवस
पहिल्या दिवशी बाळाला टोपी मोत्यानं गुंफली
जो जो रे जो जो रे

बाराव्या दिवसापासून बाळाच नाव ठेवण्याचा विधी केला जातो. नाव ठेवताना गाणे म्हणतात.

अळकीत जाऊ की खिळकीत जाऊ
खिळकीत ठेवली माती
भुलोजीला लेक झाला नाव ठेवा गणपती

**आम्हा मुलींना आनंद झाला –**

भुलाबाईची गाणी म्हणून झाल्यावर शेवटचा मुखडा प्रत्येक घरी म्हटला जातो.

भाद्रपदाचा महिना आला
आम्हा मुलींना आनंद झाला
पार्वती बोले शंकराला
चला हो माझ्या माहेरा, माहेरा
गेल्याबरोबर पाट बसायला
विनंती करू यशोदेला
टिपऱ्या खेळू गाणी गाऊ प्रसाद घेऊन घरी जाऊ
घरी जाऊ .....

या गाण्यात पार्वती यशोदेची माहेरवाशीण झालेली दिसते. भुलाबाई खानदेशात घरोघरी खेळली जाते. खानदेश, महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेवरचा भाग आहे. गुजरातेत नवरात्रात गरबा खेळतात. गरब्यातून यशोदा भुलाबाईच्या या गाण्यात दाखल झाली असावी.

**एक लिंबू झेलू बाई –**

भोंडला आणि भुलाबाई या दोनही लोकव्रतांत सर्वत्र गायले जाणारे एक गाणे म्हणजे 'एक लिंबू झेलू बाई '

**गाणे – एक लिंबू झेलू बाई –**

एक लिंबू झेलू बाई दोन लिंब झेलू
दोन लिंब झेलू बाई तीन लिंब झेलू
तीन लिंब झेलू बाई चार लिंब झेलू
चार लिंब झेलू बाई पाच लिंब झेलू
पाचाचा पानोडा माळ घाली हनमंता
हनमंताची निळी घोडी येता जाता कंबळ तोडी
कमळाच्या पाठीमागे लागली राणी
अग अग राणी इथे काय पाणी
पाणी नव्हे जमनागिरी जमनागिरीची बारीक वाळू

तेथे होते चिलार बाळ चिलार बाळाला भूक लागली
चांदीच्या चमच्याने दूध पाजीयले
मोत्याच्या गादीवर बाळ निजविले
निजरे निजरे तान्ह्या बाळा (तान्हन बाळा)
मी तर जाते सोनारवाडा
सोनारवाड्याचे दिवे जळे
लेकराची हसळी गळे...

**लिंबू : जारण–मारण विधीतील एक महत्त्वाचे फळ –**

या गाण्यातून लिंब झेलण्याचा संकेत मिळतो. [१३]लिंबू हे फळ जारणमारण वगैरे काळ्या जादूच्या विधीत विशेष महत्त्वाचे मानले जाते. त्याचा औषधी उपयोगही प्राचीन काळापासून केला जातो. लिंब आणि निंब या दोनही झाडांना लोकगीतांत मानाचे स्थान आहे. वसंतात कोवळ्या पानांनी आणि तवराने फुलून येणारे निंबाचे झाड गारवा देणारे असते. सावली देणारे असते. या गीतात लिंबू या फळाचा उल्लेख आहे. दृष्ट लागू नये म्हणून लिंबलोण उतरवून टाकण्याची लोकप्रथा आजही खेड्यातून दैनंदिन जीवनात पाळली जाते. परंतु लिंब आणि कुंवारकन्या यांच्या साहचर्याचा कल्पनाबंध अस्तित्वात आहे. लिंबविधी हा एक खास विधी आहे. कुमारिकेस नहाण आल्यावर करावयाचा विधी आहे. ही चाल पूर्वी कोकणपट्टीतील काही जातीत रुढ होती. त्याला [१४]'कुवाराचा लिंब' असेही म्हणत. मुलगी रजस्वला झाली की तिची लिंबांनी ओटी भरीत. हातात निंबाच्या डहाळ्या देऊन मामा तिला खांद्यावर बसवून नदीवर नेई. मामा तोरणीची काठी हातात घेऊन नग्न होऊन भाचीला मांडीवर घेई. नंतर त्या दोघांना घोंगडीने झाकत. नंतर त्या लिंबाचे आणि तोरणीच्या काठीचे नदीत विसर्जन करीत. कर्नाटकात आजही मामाभाचीचा विवाह धर्मसंमत मानला जातो. लोकसाहित्याच्या अभ्यासक दुर्गा भागवत यांच्या मते या प्रथेतून मामाने कुमारिकेचा कौमार्यभंग करायचा असतो असे सुचवायचे असावे. भारताच्या इतर भागांत ही प्रथा आढळत नाही. मात्र ग्रीक परंपरेत भूमध्यसंस्कृतीत आणि आफ्रिकन जमातीत लिंबविधी आढळतो. कुंवारलिंबाची प्रथा लुप्त झाली तरी त्या विषयीची गाणी कोकणात सापडतात. भारतीय संस्कृतिकोशात लिंबविधीची विस्तृत माहिती देताना काही गाण्यांच्या ओळी उद्‌धृत केल्या आहेत. या गीतात आर्तवाला मृगसरींची उपमा दिली आहे. मृगनक्षत्र लागल्यावर भूमीतून लाल इन्द्रगोप किडे

बाहेर पडतात. ते फिरू लागले की पृथ्वी ऋतुस्नात होते अशी शेतकऱ्यांची समजूत आहे.

या लिंबविधीचा संबंध सुफलीकरणाच्या विधीशी आहे. भुलाबाईच्या गाण्यातून येणाऱ्या विविध संदर्भावरून या गाण्यांचे मूळ आर्यपूर्व काळातील भूमीच्या सुफलीकरणासाठी केल्या जाणाऱ्या यातुविधींच्या गाण्यात असावे असे वाटते. लिंब झेलण्याचे हे गाणे सुफलीकरण विधीतून, लिंबविधीतून भुलाबाई आणि हादग्याच्या गाण्यात समाविष्ट झाले असावे.

**वीर हनुमान आणि दास हनुमान –**

याच गाण्यात हनुमंताचा संदर्भ आहे. भोंडला भुलाबाईच्या गाण्यातील हनुमंताच्या संदर्भाचे विवेचन यापूर्वी केले आहेत. दास मारूती आणि वीर मारूती असे दोन प्रकारचे मारूती वा हनुमान असतात. आर्यपूर्वकाळापासून क्षेत्रपाळ देवतांचे महत्त्व सकाम साधनेत होते. गाण्यातील हनुमान 'वीर' आहे. हनुमंताची निळी घोडी या टिपणात अनेक मारूतीभक्त मुस्लिमांचा दाखला डॉ. वाकोडे[१५] देतात. अनेक मुस्लिमांना हनुमानाबद्दल पूजाभाव होता. असे आढळते. डॉ. वाकोडे यांना निळ्या घोड्याचा संकेत कामदर्शक वाटतो. निळा जांभळा हे रंग कामतत्त्वाचे प्रतीक मानले जातात. इंद्र मोरपंखी निळ्या रंगाचा आहे असे मानले आहे. भारतीय परंपरेने बैल, नाग आणि घोडा यांना शक्तीसामर्थ्याची पुरुषतत्त्वे मानली आहेत.

कंबळ म्हणजे कमळ. कमळ हे स्त्रीतत्त्व असून ते जीवनोत्पादक आहे. पं. महादेवशास्त्री जोशींच्या मते कमळ म्हणजे भूमी, योनी आणि चित्शक्ती. स्त्रियांच्या पोटावरील परवंटाला केळ किंवा कमळ म्हणतात. या गाण्यातील कमळ, भूमिपूजा आणि योनिपूजेचा संकेत देते. कमळ तोडणारी, कमळांच्या पाठी लागणारी राणी, भूदेवीचे रूप आहे.

**पाण्याच्या शोधात वणवणणारी राणी –**

मराठवाडा, विदर्भ-खानदेशात पाण्याच्या दुष्काळाच्या अनेक क्षेत्रकथा प्रसृत आहेत. या गीतातील राणी पाणी शोधते आहे. परंतु नदीचे पात्र कोरड्या वाळूने भरले आहे. या कोरड्या पात्रातील वाळूत चिलार बाळ खेळते आहे. लोकमानसात काही दृढ संकेत कालौघात तयार होतात. उदा. आई कशी तर यशोदेसारखी, कौसल्येसारखी. बाळ कसे तर कृष्णासारखे किंवा चिलया

बाळासारखे. चिलया चांगुणाच्या कथेतील कर्तव्यपरायणता, वात्सल्यावर मात करते असा संकेत देणारी आहे. या तान्हुल्या बाळाला सोन्याच्या चमच्याने दूध पाजवून मोत्याच्या गादीवर निजवून ही राणी बाळाला अंगाई गाते.

निजरे निजरे तान्हन बाळा
मी तर जाते सोनारवाडा
सोनारवाड्याचे दिवे जळे
लेकराची हसली गळे

बाळ हसळी गळेपर्यंत रडते आहे. पाण्याच्या शोधात हिंडणारी राणी सोनारवाड्यात का जाते ? सोनारवाड्याचे दिवे रात्रभर का जळत आहेत ? तळ्याला पाणी लागावे, नदीला झरे फुटावेत म्हणून महाराष्ट्रातील अनेक आयांनी आपली तान्हुली तळ्यात, डोहात, विहिरीत अर्पण केली आहेत. काही कथांतून बाळबाळंतीण पाण्यासाठी बळी दिल्याच्या दंतकथा सापडतात.

**गाणे ४ –**

काळा कोळसा झिक झिक वाणा
आंत बसला गुलोजी राणा
घाल घाल भुलाबाई विंझण वारा
घालता घालता लागला वेळ
आम्हाला द्या मांडुन खेळ
खेळात सापडली अधेली
अधेली देऊ वाण्याला
वाण्या वाण्या शोभा दे
शोभा माझ्या गाईला
गाई गाई दूध दे
दूध माझ्या बगळ्याला
बगळ्या बगळ्या पंख दे
पंख माझ्या राजाला
राजा राजा घोडा दे
घोडे माझ्या बापाला
बापा बापा साडी दे

साडी माझ्या आईला
आई आई चोळ्या शिव
चोळ्या माझ्या बहिणीला
बहिणी बहिणी भातकुल दे
भातकुल माझ्या भावाला
भावा भावा गोंडे दे
ते गोंडे घेऊ सासरी जाऊ
सासराच्या वाटे कुचूकुचू काटे
माहेरीच्या वाटे गुलालबुक्का दाटे

फुललेला निखारा त्यात भुलोजी राणा बसला आहे आणि वारा घालून भुलाबाईला तो निखारा फुलविण्याची आज्ञा दिली जात आहे. गाण्याच्या पहिल्या तीन ओळी वाचताना दुर्गाताई भागवतांनी भुलोजीबाबत केलेले विवेचन सार्थ वाटते. अग्नीसाठी प्राग्इतिहासात काळात साहस करावे लागे. अशा साहसी वीरांविषयी समाजाला विशेषतः स्त्री समाजाला वाटणारी कृतज्ञता 'झिग झिगवाणा' या शब्दातून फुललेल्या निखाऱ्याचे चित्र रंगरूपासह समोर येते. मात्र या तीन ओळीनंतर या गाण्याचे रूपांतर मालागीतात होते. या मालागीतात हे देऊन ते मग ते देऊन आणखी काही अशी मालिका असते. या गीतामागील मानसिकताही खास स्त्रीमनाचे चित्र रेखाटणारी असते. सर्वसामान्य स्त्रीवर्ग हा भारतीय जीवनपद्धतीत शोषित म्हणूनच आजवर जगत आला. छोट्या छोट्या सुखांसाठी इच्छापूर्तीसाठी खूप मोठी तडजोड करावी लागे. ते सुख हाती येण्यासाठी दहा ठिकाणी होणारी वणवण त्यातून व्यक्त होते. अधेली कोणाकडे हक्काने मागता येत नाही . तीही खेळातच सापडते.

या गीतातही 'शोभा' गाईला देऊ नि मग गाय भरपूर दूध देईल असा उल्लेख आहे. भुलाबाईची गाणी सर्जनाच्या सत्काराची गाणी असल्याने दुधासाठी शोभा या पदार्थाचे उल्लेख अनेकदा येतात. शोभा म्हणजे जे सर्वात चांगले शुभ आहे ते. लोकसाहित्य आणि संत साहित्य यांचे आपल्याला जे सहज दर्शन घडते त्यातून मनाला सतत जाणवत राहते की त्या साहित्यातून येणारे माहेर हे लौकिक माहेर या संकल्पनेपेक्षा आधिक आगळेवेगळे आहे. त्या माहेराला परातत्त्वाचा स्पर्श झालेला आहे. तसेच आमच्या लोकसाहित्यातील माहेर, स्त्री मनातील सुखाचे, तृप्तीचे, मुक्तीचे प्रतीक आहे. ते जणु 'स्वप्नभूमी' आहे. आमच्या महाराष्ट्र संतांनीही म्हटले आहे.

उदा. कन्या सासुरासी जाये, मागे परतोनी पाहे

तैसे झाले माझ्या जिवा, केव्हा भेटसी केशवा - तुकाराम

माझे माहेर पंढरी आहे भीवरेच्या तिरी - जनाबाई

या गीतातील स्त्री बगळ्याला दूध देते. त्याचेकडून पंख घेते. पंख राजाला देते आणि त्याच्या कडून घोडे घेते. दूध हे गाईचे सत्त्व. तर पंख हे बगळ्याचे सत्त्व आणि उत्तम घोडे हे राजाच्या मर्मस्थानापैकी एक. हे घोडे ती बापाला देते त्याच्याकडून साडी घेऊन ती आईला देते. तिच्याकडून चोळ्या शिवून घेते नि त्या बहिणीला देते, त्या बदल्यात भातकुल घेऊन ते भातकुल भावाला देते आणि त्याच्याकडून गोंडे घेते. हे गोंडे घेऊन ती सासरी जाऊ असे म्हणते. इतक्या परिश्रमाने गोंडे घेऊन सासरी जातानाही सासरबद्दल विश्वास नाही. सासर आणि माहेर या विषयीची तिची प्रतिक्रिया अशी,

सासरच्या वाटे कुचूकुचू काटे
माहेरीच्या वाटे गुलालाबुक्का वाटे

या ओळी म्हणजे हजारो वर्षांच्या संसारयात्रेबद्दल स्त्री मनाने तटस्थपणे नोंदवलेली प्रतिक्रिया आहे.

स्त्री जणू एक गोंडा. गोंडा कशाचे प्रतीक ? समृद्धीचे की शृंगारकेंद्री जीवनाचे ? एक म्हण या ठिकाणी आठवते.

लेक गेली तर नाकाचा शेंडा गेला
बायको गेली तर पायताणाचा गोंडा गेला

भोंडलाभुलाबाईची अनेक गाणी आहेत. त्यातील काही गाण्यांचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. भोंडला भुलाबाईच्या गाण्यांतून सासरबद्दल नवविवाहित आणि कुमारी मुलींच्या मनात असलेल्या भावना विपुल प्रमाणात व्यक्त होताना दिसतात.

**स्वरसमूहांचे आणि त्यांच्याशी जोडलेल्या विधिस्वरूपाचे प्राचीनत्व -**

वेदपूर्वकाळांत निसर्गातील निर्मितीतत्त्वांची पूजा करताना किंवा धनधान्य निर्मितीसाठी त्या तत्त्वांची कृपा व्हावी यासाठी विधियुक्त आराधना करताना म्हटल्या जाणाऱ्या स्वरसंघाचे बदलत आलेले रूप आजच्या भोंडला भुलाबाईचा

गाण्यांतून अवशेष स्वरूपात सापडते. विविध कालखंडातून प्रवास करताना त्या स्वरसमूहात शब्दांची वीण जुळवली गेली. शब्दांच्या माध्यमातून काळानुरूप अर्थ त्या स्वरांत भरले गेले. काळाच्या ओघात ते शब्द अर्थ उसवले गेले वा विस्कटले गेले तरीही त्या स्वरसंघाचा मूळ सांगाडा विशेष करून, त्यातील समूहमनाची आणि समूह गानाची मंत्रात्मकता प्राचीनत्वाची साक्ष देत आजही मागे उरली आहे. त्या स्वरसमूहांशी संबंधित असलेले विधिस्वरूप बदलत गेले तरी, त्यांच्याशी जोडलेले आस्तित्त्व दाखवीत क्षीणपणे टिकून आहे.

**भाद्रपद–आश्विनातील कुमारिकांचे उत्सव आणि त्यांतील कलात्मक आविष्कार –**

भोंडला भुलाबाईशी समान्तर असणारे मध्य प्रदेशातील सांझी, गुजरातेतील नवरात्र, कर्नाटक – आंध्रातील कोलवू आणि बदकम्मा या कुमारिकांच्या उत्सवांत फुलापानांची सजावट आणि फेरातील नृत्यगाणी हे स्वरूप असते. विदर्भातील भराडी – गौर मांडताना फुलांचे विविध आकाराचे झेले कलात्मकरीतीने सजवतात. श्रावणांत जिवतीच्या दुसऱ्या दिवशी या गौरीची स्थापना होते तर ललितापंचमीस विसर्जन केले जाते. या उत्सवाची गाणी भुलाबाईच्या गाण्यांशी खूप साम्य असणारी आहेत.

उदा. –

भराडी गौर — अंगणी दूध तापे त्यावर पिवळी साय
गवराई बाई लेकी .... राहून जाय....


भुलाबाई — आंचे दूध तापे त्यावर पिवळी साय
लेकी भुलाबाई साखळ्या लेऊन जाय

भराडी गौर — अरडी परडी घसरडा
परडीएवढ फूल वो
तेही फुल तोडाना
गौराबाई गुंफाना

भुलाबाई — अरडीएवढी परडी ग
दारी मूल कोण ग
दारी मूल सासरा ग
सासऱ्यान काय आणलन् ग ...

भोंडला वा हादगा मांडताना पाटावर रांगोळीचा हत्ती काढून त्याभोवती रांगोळीची सजावट करतात. फुलापानांचीही सजावट केली जाते. हत्तीच्या खाली पहिल्या दिवशी रांगोळीचा एक ठिपका देतात. रोज एक ठिपका वाढवतात. मी लहान असताना पुण्याहून बदली झालेल्या मैत्रिणीकडे आम्हाला भोंडला खेळायला बोलवीत. त्यांच्याकडे मूगडाळ व तांदळाचा हत्ती मांडीत असत असे मला स्मरते. भुलाबाई घरी येण्यापूर्वी कोनाडा मखराने सजवीत. पुठ्ठयाचे वळणदार मखर कापून त्यावर गुलाबी कागदाची फुले आणि हिरव्या कागदाची पाने चिटकवीत. भुलाबाईची मांडणी करताना कोवळी कणसे, धान्याची ताटे, फळे यांच्या माळांचा उपयोग केला जाई. मखराला फुलवरा बांधत.

**सांझी उर्फ संजाबाईची सजावट –**


संजाबाई

मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेशात सांझी मांडताना अशीच विविधरंगी सजावट केली जाते. हिरवेगार शेण घेऊन ते मातीत कालवून त्यापासून विविध लोकप्रिय आकार भिंतीवर चितारले जातात. त्यावर फुलांच्या पाकळ्या, बेगडाचे झगमगीत कागद चिटकवून सजावट केली जाते. सांझी उर्फ संजाबाई (संध्या हा मूळ शब्द आसावा) हा कुमारिकांचा उत्सव आश्विन प्रतिपदेस म्हणजेच महाराष्ट्रातील कालगणनेनुसार भाद्रपद कृष्ण प्रतिपदेस सुरू होतो. महाराष्ट्रात भुलाबाई याच दिवशी मांडतात.

सांझी विविध पारंपरिक आकृत्यांनी सजविली जाते. या सजावटीला सांझी का खिल जाना असे म्हटले जाते. रोज नवनवी आकृती मांडली जाते.

त्यामुळे लहान लहान मुलींना रंगसंगती तसेच रंगरेखांचे ज्ञान होऊन त्यांतील सौंदर्याची जाणीव होते. मुली आपापल्या प्रतिभेनुसार रोज सांझीला नवनवीन रीतीने सजवतात. त्यांच्यात चढाओढ लागते.

भुलाबाईचे मखर सुंदर रीतीने सजवण्यातही अशीच चढाओढ लागते. परंतु सांझीच्या सजावटीतील जिवंतपणा भुलाबाईच्या सजावटीतून हरवलेला दिसतो. एकदा का मखर मढवले की संपले. भोंडल्याभोवती रांगोळ्या काढतात पण त्यात पारंपरिकता असते. नवीनता किंवा अुन्मेष नसतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक

जीवनातली सौंदर्यदृष्टी गेल्या काही दशकांत हरवत चालली आहे का ? राजस्थानात गणगौरीची सजावट वा आंध्रातील बदकम्माची सजावट पारंपरिक अंगाने केली जाते. परंतु तिच्यातील ताजेपणा आजही टिकून आहे. आम्ही दारापुढे रोज जी रांगोळी काढतो, ती केवळ रीत म्हणून. दोन रेषा देवांच्या नावाने ओढायच्या इतकेच. परंतु आंध्र कर्नाटक वा तामिळनाडूत सकाळी अंगण अक्षरशः नाजूकपणे नटूनथटून बसते. अंगणाचे देखणेपण डोळ्यात मावत नाही. त्यामुळेच आजही या प्रदेशातील रांगोळ्यांनी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व टिकवले आहे. त्यात नावीन्य सहजपणे भरले आहे. दिवाळी दसरा आदी सणांना महाराष्ट्रात नवनवीन रांगोळ्या काढतात. पण सकाळी सजणारे अंगण हरवत चाललेय असे भासते.

**रंगवल्ली : एककला –**


भोंडला भुलाबाई या उत्सवात रांगोळीला असलेले महत्त्व लक्षात घेता रंगवल्ली या पुरातन कलेबाबत थोडा विचार केल्यास वावगे होणार नाही.

रंगवल्ली ही एक चौसष्ट कलांपैकी महत्त्वाची कला आहे. ती केव्हा अस्तित्वात आली हे सांगणे कठीण असले तरी तिचा उगम धर्माच्या अनुबंधाने झाला असावा. ती मूर्तिकला वा चित्रकलेच्याही आधीची आहे असे मानले जाते. कोणत्याही धार्मिक वा मांगलिक कृत्यात रंगवल्ली ही आवश्यक आणि प्राथमिक गोष्ट आहे आणि ही प्रथा भारतभर आहे. दैनंदिन जीवनात सडा संमार्जनानंतर अंगणात रांगोळी शुभंकर लक्षण म्हणून रेखली जाते. आजकाल मूलतः भोजनाची तृप्ती वाढावी म्हणून वातावरण निर्मितीचा एक भाग म्हणून रांगोळी काढली जात असली तरी रांगोळीमागची भूमिका वेगळी होती. अतिथीला देव मानून त्याची देवासमान यथोचित पूजा करण्याचा अवशेषरूप भाग समाजाने कायम टिकविला आहे. सौंदर्याचा साक्षात्कार आणि मांगल्याची सिद्धी हे रंगवल्लीचे महत्त्वाचे उद्देश आहेत. प्रतीके हा रांगोळ्यांचा आधार आहे. रांगोळी ही जणू सांकेतिक भाषाच होती. स्वस्तिक, सूर्य, चंद्र, नागयुग्म अशा आकृती विविध भावबंध भाग दर्शविणाऱ्या असतात. रंगवल्लीसाठी तांदळाचे पीठ, गारगोटीचे पीठ यांचा वापर केला जातो. मात्र रांगोळी केवळ पांढऱ्या रंगाने काढणे अशुभ मानले जाते. त्यात गुलाल वा कुंकवाचा वापर आवश्यक असतो.


### रांगोळीचे दोन प्रकार –

रांगोळीचे आकृतिप्रधान आणि वल्लरीप्रधान असे दोन महत्त्वाचे भेद आहेत. राजस्थान, उत्तर प्रदेश, महाराष्ट्रात आकृतिप्रधान रांगोळ्यांचे प्रकार आढळतात तर भारताच्या पूर्व भागात - आसाम बंगालात वल्लरीप्रधान रांगोळ्या लोकप्रिय आहेत. प्रत्येक प्रांतात रांगोळीला विशिष्ट नाव आहे. तिच्या आकारचाही विशिष्ट प्रकार आहे.

| | | |
|---|---|---|
| राजस्थान - मांडना | गुजरात - साथिया | बंगाल - अलिपना |
| महाराष्ट्र - रांगोळी | मध्य प्रदेश - चौक पूरना | आंध्र - मुग्गू |
| केरळ - पुडिवाल | तामिळनाडू - कोलम | कर्नाटक - रंगोली |




राजस्थान – मांडना




गुजरात – साथिया




बंगाल – अलिपना




महाराष्ट्र – रांगोळी




मध्य प्रदेश – चौक पूरना




आंध्र – मुग्गू




केरळ – पुडिवाल



तामिळनाडू – कोलम



कर्नाटक – रंगोली



आसाम – अलिपना

## रांगोळी : ऐतिहासिक उल्लेख –

१०व्या शतकातील नलचंपू या ग्रंथात उत्सवप्रसंगी घरापुढे रांगोळ्या काढीत असा उल्लेख आहे. १२ व्या शतकात लिहिल्या गेलेल्या हेमचंद्राच्या 'देशीनाम माले' त तांदळाच्या पिठाची रांगोळी काढल्याचा उल्लेख आहे. १२ व्या शतकातील 'मानसोल्लासा' त सोमेश्वराने धुलिचित्र या नावाने आणि श्रीकुमाराने 'शील्परत्ना'त क्षणिकचित्र या नावाने रांगोळीचा उल्लेख केला आहे. भास्करभट्टाच्या शिशुपाल वधात रांगोळीचा उल्लेख आढळतो. ही कला किमान २००० वर्षांपूर्वीची असावी. जैन-पारशी धर्मांतही रांगोळी अशुभनिवारक मानली जाते.

भुलाबाई हादग्याप्रमाणे सांझीभोवती आकृत्या काढल्या जातात. मात्र सांझीच्या आकृत्यांची विशिष्ट परंपरा आहे. उदा. पहिल्या दिवशी पाच बिंदिया आणि चन्द्रसूर्य रेखाटतात. स्वस्तिक (सांत्या) सप्तऋषी, अष्टपाकळ्यांचे कमळ, म्हातारा म्हातारी, केळीचे झाड वगैरे आकृती पारंपरिक शैलीत काढल्या जातात.

## सांस्कृतिक देवाणघेवाण –

अशा प्रकारची सजावटीतील वैशिष्ट्ये भुलाबाईच्या सजावटीत वा भोंडल्याच्या वेळी काढल्या जाणाऱ्या हत्तीच्या आकृतीत जोपासलेली आढळत नाही. कदाचित ती काळाच्या ओघात लुप्त झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. भुलाबाई उर्फ गुलाबाई खानदेश, विदर्भात मांडली जाते. हा प्रदेश महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर असून त्याला लागूनच मध्य प्रदेश आहे. अर्थातच सांस्कृतिक देवाणघेवाण झाली असणारच. त्यामुळेच डॉ. श्याम परमारांना सांझी आणि गुलाबई या कुमारिकांच्या उत्सवांत साम्य जाणवले आहे.

पुनम परदेशी-शहा यांना सांगितलेल्या आरतीचा उल्लेख यापूर्वी आला आहे. त्या जन्माने गुर्जर. ६ व्या वर्षापासून भुलाबाई खेळल्या. या आरतीत गुजरात, महाराष्ट्र व मध्य प्रदेश यांचा अपूर्व सांस्कृतिक संगम आढळतो.

## आरती –

सांजी ये आरती
बे सांजी पारबती
पहिला मुलगा न्हाऊन धुऊन
गुलाल नाही तो छडी लागाऊ
केसरियामां भांग पडाऊ (असे पाच वेळा म्हणायचे)

ही पार्वती म्हणजे मऱ्हाटी गौराई तर मध्य प्रदेशाची सांजी. बे, केसरियामा भांग पडाऊ हे शब्द गुजरातीतले. या आरतीतून अर्थबोध काहीच होत नाही. पणा तरीही काही प्रश्न मनात उभे राहतात. पहिला मुलगा न्हाऊन धुऊन ही ओळ काय दर्शविते? जमनागिरीच्या वाळूत एकाकीपणे रडणारे 'चिलयाबाळ' आणि 'न्हाऊन धुऊन तयार झालेला पहिला मुलगा' हे 'संकेत' एकाच वळणाने जाणारे आहेत. शिवाय गुलाल नाही तो छडी लगाऊ ही जबरदस्ती का? राजस्थान, गुजरातेत समर्पणाच्या वेळी केशरी वस्त्र परिधान करीत असत. पाण्यासाठी पहिले मूल बळी दिल्याचा कथाबंध लोकसाहित्यात क्षेत्रकथांमध्ये बाहुल्याने आढळतो. या आरतीतही असाच काही संकेत असेल का ?

भोंडला भुलाबाई संग्रहातील भुलाबाईच्या गाण्यांमध्ये प्रा. गजमल माळी यांनी संकलित केलेल्या गाण्यांपैकी एक गाणे सांझीच्या भुलाबाईवर झालेल्या संस्काराचे स्वरूप स्पष्टपणे दाखविते. ते गाणे असे -

सांजी सांजी दिवा लगाव
दिवा लगाव
दिवा नेला चोरानं
बत्ती लावली मोरानं
मोरानं
मोरानं दिल्या पाच कवड्या
पाच कवड्या
त्याच्या आणु रेवड्या
रेवड्या देऊ भाचीला
भाचीला
आपण जाऊ काशीला
काशीला
काशीहून आणली वायकं
वायकं
फोडा सांजीच टायकं
टायकं

**भुलाबाईच्या गाण्यातील काही विधिसंबद्ध कृती –**

काही नमनगीतात, काही सामूहिक कृती मुली करतात. 'दुरून भुलाबाई नमस्कार' या ओळीला सर्व जणी भुलाबाईकडे तोंड करून नमस्कार करतात. तर पुढील ओळींच्या वेळी टिपरीवर टिपरी चढवून माहूरगड अभिनित केला जातो.

एका टिपरीवर उभे राहू
अस्मानीचा गड पाहू
गडावर गड बाई माहूर गड
तिथला सोनार कारागीर

या काही जागा सोडल्यास या गाण्यांतील विधिरूप शिल्लक राहिलेले दिसत नाही. भोंडला टिपऱ्यांवर खेळला जात नाही. भुलाबाई टिपऱ्यांवरच खेळली जाते. अक्षय्यतृतीयेला खानदेशात मुली टिपऱ्या खेळतात. टिपऱ्या गुजरातेतून इकडे आल्या असाव्यात. भिल्लनृत्यातही टिपरीनृत्य असते. भिल्ल ही आदिवासी जमात सातपुड्यात विशेषकरून आहे. भिल्ल आणि आहिराणी बोलीवर गुजरातीचा मोठाच प्रभाव आहे, हे सर्वज्ञात आहे.

**गीतांचा ठेका आणि पावली –**

भोंडला भुलाबाईची रचना, त्यातील आवर्तने म्हणण्याची विशिष्ट लय या बाबी वैशिष्ट्यपूर्ण असतात. या गीतांतील केवळ आशय महत्त्वाचा नसतो तर त्याचे आविष्कृत रूपदेखील लक्षणीय असते. त्याच्या आकलनासाठी ज्या नृत्याच्या अंगाने ही गाणी म्हटली जातात त्या संबंधीचा ऊहापोह करणे आवश्यक ठरते. त्याशिवाय भोंडला भुलाबाईच्या गाण्याच्या स्वरूपाने आकलन होऊ शकणार नाही. ही गाणी फेरात गायिली जातात. फेरात फिरताना मुली ठेक्याने पावली घेतात. ही पावली ४ मात्रांची असून २ ठेके येतात. १ आणि ३ मात्रांना ठेका येतो. १ ल्या मात्रेला उजव्या पायाच्या पंजाने ठेका देतात. हा पंजा डाव्या पावलाजवळ नेत ठेका दिला जातो. पायाचा ठेका आणि टिपरीचा ठेका एकाच वेळी दिला जातो.

या गीतातील ठेका आणि गीतातील आवर्तने जुळणारी आहेत. नृत्य आणि गीत यांच्या एकरूपतेचे हे निदर्शक आहे.

मात्र गुजराती गरब्यात टिपऱ्यांच्या ठेक्यांची जी विलक्षण धुंद लय आहे किंवा हालचालींमध्ये खटके घेण्याची जी पारंपरिक पद्धत आहे ती भुलाबाईच्या गाण्यात आढळत नाही. भुलाबाईच्या गाण्यांचा ठेका अतिशय संथ आणि ठाय आहे.

**भोंडल्याच्या गाण्यांची : झिम्म्याची लय –**

भोंडला वा हादग्याची गाणी टाळ्यांच्या तालावर झिम्म्याच्या अंगानी खेळली जातात. टिपऱ्यांचा वापर केला जात नाही. तसेच चालीमध्ये विविधता आणि वेग आहे. ती भुलाबाईच्या गाण्यांसारखी संथ नाहीत. ही गाणी झिम्म्याच्या पद्धतीने गायिली जातात. एकमेकींकडे तोंड करून व दुहेरी फेरातही गाणी गायिली जातात. ही गाणी केरव्याच्या लयीत आहेत.

संगीताच्या भाषेत बोलायचे तर भुलाबाईची गाणी ठाय लयीत असून त्यांची मूळ प्रकृतीच अत्यंत संथ आणि गंभीर आहे.

भुलाबाईची गाणी ज्या प्रदेशांत गायिली जातात तो प्रदेश पश्चिम महाराष्ट्राच्या मानाने मागास राहिला. या भागावर सतत आक्रमणे होत. खानदेश हे महाराष्ट्राचे उत्तरद्वारच होते. सततच्या लढाया, परकीय राजवटींचा अंमल यामुळे हे उत्सव साजरे करताना गेल्या ३-४ शतकांत फारसा मोकळेपणा मिळाला नाही आणि त्यामुळे मोकळेपणातून निर्माण होणारी विविधता, मुक्त चंचलतेचा स्पर्श यापासून ही गाणी दूर राहिली. ग्रामीण भागातील स्त्रियांनी ही गाणी मूळ लयी सुरांसह जपली. नमनगीतातील अतिशय संथ आणि गंभीर लय, सुरांमधील एकसुरीपणा त्यांच्या प्राचीनतत्वाचे गमक आहेत.

**भोंडल्याची गाणी : शिवकाळातील आश्वासक वातावरण –**

हादगा हा भोंडला उत्सव सांगली, सातारा, पुणे, कोकण या भागात साजरा केला जातो. कोकणात गौरीचा सण अत्यंत थाटात आणि घराघरांतून साजरा होतो. गौरी गणपतीपाठोपाठ येतात. स्त्री, पुरुष या दोन्ही ऊत्सवांत पूर्णपणे सहभागी होतात. या सणांना सामूहिक उत्सवाचे रूप आहे. गौरीच्या सणांची गाणी घाटावरच्या हादगा भोंडल्यात शिरली असावीत. श्रीमती दुर्गा भागवत हे मत व्यक्त करतात. झिम्मा हा नृत्यखेळ, जो महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैशिष्ट्य आहे, तोही कोकणांतून देशावर आला असावा. झिम्मा खेळताना जे पूर्वसूत्र गायले जाते. त्यातील संदर्भ बोलका आहे.

आंबा पिकतो रस गळतो
कोकणाचा राजा माझा , झिम्मा खेळतो..

झिम्म्याच्या उडत्या तालावर म्हटली जाणारी अनेक गाणी भोंडल्यात आणि तिथून काही गाणी भुलाबाईत दाखल झाली असावीत.

पुणे - सातारा परिसरात शिवछत्रपतींच्या स्वराज्य स्थापनेमुळे सामान्य माणसांना नवी प्रेरणा मिळीली. घरातल्या पुरुषांचा मुलुखगिरी हा महत्त्वाचा व्यवसाय बनल्याने घरातील जबाबदाऱ्या स्त्रियांना सांभाळण्याची जिम्मेदारी घ्यावी लागली. पारंपरिक सण वा उत्सव मोकळपणाने साजरे करण्याचे धैर्य वा हिंमत समाजात निर्माण झाली. भोंडल्याच्या गाण्यांतील उत्साहाची नवी लय याच काळात गुंफली गेली असावी असे वाटते. मात्र तसा गेय पुरावा देता येत नाही. ह्या गाण्यात या वेगवेगळ्या लयी कशा दाखल झाल्या हे पुरावा देऊन सांगणे शक्य नाही. तरीही या गाण्यांची वेगवान लय झिम्म्याच्या ठेक्यातून उचलली गेली असे वाटते. तसेच सासरमाहेरच्या नात्यांचा नाजूक तरीही धीट अशा अभिव्यक्तीचा धागा या गाण्यात गुंफला गेला असावा.

**भारतीय संगीत परंपरा –**

या गीतांतील स्वर प्राथमिक अवस्थेतील आणि खर्जातील आहेत. आज प्रचलित असलेल्या शास्त्रीय संगीताचे मूळ लोकसंगीतात आहे, हे संगीत शास्त्रज्ञांना आणि कलावंत गायकांना मान्य असलेले तथ्य आहे. सुप्रसिद्ध गायक कलावंत श्री. कुमार गंधर्व यांनी लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीत यांचा अनुबंध समर्पक रीतीने सोदाहरण स्पष्ट केला आहे. प्राचीन परंपरा असलेल्या भारतीय संगीतातून तो स्पष्ट होतो. पितामह ब्रह्मदेवाने सामवेदापासून संगीत निर्माण केले असे मानतात. सामवेदात ऋग्वेदाच्या ऋचा स्वरालापात गायल्या जात. यज्ञसमारंभांतून देवांना अर्पण करताना त्यांच्या मनोरंजनार्थ ऋचा मधुरस्वरात म्हणत. या ऋचांच्या क्रियेतून सुबद्ध संगीताची उत्पत्ती आली असावी असे मानले जाते. साम म्हणजे गायन, यज्ञाच्या निमित्ताने संगीत शास्त्राचा पाया घातला जात असतानाच लौकिक संगीतही अस्तित्वात असले पाहिजे. कारण श्रम हलके करण्यासाठी स्वरसमूहांचा आधार घेण्याची प्रथा आदिम असून, आदिवासी समाजात आजही देवतांची आराधना, तसेच विवाहगीते इ. गाणी परंपरेने चालत आलेली दिसतात. श्रमपरिहार करणारी भलरी, ओव्यांसारखी गीते ग्रामीणजनांत परंपरेने चालत आली आहे. ती आजही आवडीने गायिली जातात. या स्वररचनांचा स्वतंत्रपणे शोध घेण्याच्या प्रेरणेतून संगीत शास्त्राचा आरंभ झाला असावा.

भोंडला भुलाबाईची गाणी समूहाने गायिली जातात. त्यातील स्वर तारसप्तकातील नसून मध्यसप्तक आणि खर्जातले आहेत. षड्ज, रिषभ, गंधार,

मध्यम, क्वचित् कोमल गंधार अशा पाच - सहा शुद्धस्वरांचे प्राबल्य या गाण्यांतून जाणवते.

आज जे भारतीय संगीत आहे ते मुस्लिम गायकीचा प्रभाव पडून विकसित झालेले संगीत आहे. परंतु प्राचीन भारतीय संगीत दोन स्वरांमधील अंतर मोजण्याचे परिमाण श्रृती याला केन्द्रस्थानी मानून विकसित झालेले आहे. श्रृतींच्या ध्वन्यन्तरावरून भारतीय संगीतशास्त्रांत मतमतान्तरे आहेत. त्यात खोल शिरण्याचे काही कारण नाही.

भोंडला भुलाबाईची गाणी या परिभाषेत बसविणे अवघड आहे. तरीही एवढे म्हणता येईल की ही गाणी मंद्र आणि मध्य सप्तकात आहेत. त्यातील स्वरांवरून ती प्राचीनतम असावीत. भुलाबाईच्या गाण्यांची ठाय, गंभीर लय आणि भोंडल्याच्या गाण्यांतील मंत्रात्मक लय पाहता, त्या लयींचे नाते प्राचीन उदगीथा पूर्वीच्या अन्नासाठीच्या समूह प्रार्थनांशी असावे असे वाटते, असे जे प्रारंभी म्हटले आहे त्याचे कारण हेच होय. ही गाणी समूहाने गायिली असल्याने त्यात अनवट स्वर नाहीत. स्वर अतिशय सुलभ आणि शुद्ध स्वरूपातील आहेत.


**या गाण्यांची छंदोरचना -**


ऋग्वेद ही जगातील सर्वात जुनी छंदोमय रचना मानली जाते. ज्या रचनांच्या गायनाने मनास आल्हाद होतो, चितवृत्ती उल्हसित होतात त्या रचना छंद या नावाने उल्लेखिल्या जात. 'छंदयति आल्हदयति इति छंदः' प्रसिद्ध गुर्जर पंडित केशव हर्षद् धृव यांनी असे प्रतिपादिले आहे की ऋग्वेदरचनेपूर्वीही छंदोमय रचना, यज्ञाव्यतिरिक्त, दैनंदिन जीवनातील भावप्रकटनाच्या निमित्ताने होत होती. या रचनांसाठी त्यांनी युजुस् ही संज्ञा वापरली आहे. देवतांच्या स्तुतीसाठी, आनंदासाठी काव्यमय ऋचांची निर्मिती झाली. वैदिक छंदोरचनेत संवादिता आणि मेघगंभीर माधुर्य आहे.

भोंडला भुलाबाईच्या गीतांच्या छंदोरचनेच्या दृष्टीने शोध घेताना मराठी छंदोरचना या ग्रंथाचे लेखक श्री. ना. ग. जोशी यांनी काही गीताच्या छंदाबाबत चर्चा केली आहे. प्राकृत अपभ्रंश रचनेत परिलीना जातीवृत महत्त्वाचे आहे. परिलीना जातीच्या प्रत्यक्ष उपयोगात शेवटची २ अक्षरे गुरु असतात.

ऐलमा पैलमा या हादग्याच्या नमनगीतावर परिलीनाची छांदस छाया आहे असे ते म्हणतात. तर पहिली ग भुलाबाई या छंदोरचनेत छांदस वैकुंठ आहे. श्री. ना. ग. जोशींना ही पद्मावर्तनी रचना वाटते.

भोंडला भुलाबाईच्या गाण्यांचे विधी, स्वर लय आणि छंद अंगांनी शोधन करणे अतिशय कठीण असले तरी तसा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. कारण त्यावरून या गाण्यांच्या प्राचीनत्वाची साक्ष मिळते.





# वर्षन, भूमी आणि सर्जन

*पाऊस आणि भूमी : सूर्य आणि भूमी : यांच्यातील नाते, मानवी संस्कृतीच्या विकासाची दिशा, सण व्रतोत्सव आणि आजचा धर्म, वर्षाकाळाशी जोडलेले व्रतोत्सव : ज्येष्ठ ते कार्तिक मासांत, सूर्यऊर्जेशी जोडलेले व्रतोत्सव : मार्गशीर्ष ते वैशाख मासांत, वर्षन - भूमी - सर्जन, वृक्षपूजा : समृद्धीसाठीचा यातुविधी, तिफण ऊर्फ पाभरीची पूजा, तिफणीची पूजा, तिफणीला नवरी बनवून शेतात नेले जाते, निर्जीव वस्तूंचे मानुषीकरण : भारतीय मानसिकता, पाच पांडव : शेतीच्या सुफलीकरणाचे प्रतीक, कुरी नव्हे तर काशीच, जयजय गणपती, तिफण उतरविताना, सौभागीण शेती, स्त्रिया आणि पेरणी, नागपंचमी : नागपूजेचे प्राचीनत्व, भारतभर नागपूजा प्रचलित, महाराष्ट्रातील नागपूजा, नागपंचमी : सुफलीकरणाशी जोडलेला सण, सर्प आणि कामवासना : भारत आणि भारताबाहेरील संकल्पना, महाराष्ट्रात नाग 'बंधू' च्या रूपात, वारूळाची पूजा सामूहिक : अठरापगड जातींच्या स्त्रियांचे एकात्म मन, नागपंचमीची कथा, नागपंचमी की नागरपंचमी ?, कालियामर्दनाची आठवण करून देणारा दिवस , 'सर्पबंध' अनेक संदभ, भूकंपाचे कारण सर्प, महाराष्ट्रातील नागपंचमी सण आणि अंबुवाची, ज्या काळात पृथ्वी रजस्वला होते त्याकाळात भूमी उकरीत नाहीत वा नांगरीतही नाहीत, इतर प्रांतांतील अंबुवाची उत्सव, महाराष्ट्रातही नाग संस्कृती होती, नागबंधाचा सांस्कृतिक प्रवास, कासईचे गाणे : मराठी आणि तेलगू , कुटुंबसंस्था स्थिर होताना, नागचौथीचा उपास भावासाठी, भावाच्या कृषिसमृद्धीसाठी, फेरावरच्या गाण्यातील आगळा कथाबंध, फेराची गाणी : पावसासाठीच्या समूहप्रार्थनांचा अवशेष, उत्तरेकडे नाग, पती, प्रियकर पुत्राच्या*

रूपातून येतो. महाराष्ट्रात मात्र नाग बंधूंच्या रूपातच येतो, पोळा : बैलांच्या श्रमांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा सण, पोळ्याचा सण आला, आदले दिवशी खांदे मळणी, पोळ्याच्या दिवशी सालदार कष्टकऱ्यांना मिष्टान्न, नवरदेव बैल, चौर चौर चांग भला ... पाऊस आला घरात चला, पंचपल्लवांनी पूजा, श्रमाची प्रतिष्ठा, आदिवासींचा पोळा, सातपुड्यातील निळीचारीची पूजा, ऋषिपंचमी, मातृहक्क : नैसर्गिक जीवन व्यवस्था, वृषीपंचमी की ऋषिपंचमी, परिवर्तनाच्या काळातील संघर्ष : तरीही 'आदिबंध' बोलके, गौरी लक्ष्म्यांचा सण, स्त्री सुपीकतेचे प्रतीक, गौरी वा लक्ष्म्यांचा सण शेतीच्या समृद्धीसाठी, लक्ष्मीचे आगमन आणि मांडणीतील विविधता, लक्ष्मी आली सोन्यांच्या पावलांनी, लक्ष्म्या जेवतात त्या दिवशी, पोवते ऊर्फ दोरे घेणे, जेवणाच्या दिवशी घरच्या लक्ष्म्यांना सन्मान, सुगड्याचे मुखवटे तयार करण्याची रीत, अमराठी घरांतूनही लक्ष्म्या उभ्या करतात, लक्ष्म्या मांडल्या जातात, मातंग-चर्मकार समाजातही लक्ष्म्या, राणी सावरगावचे आश्चर्य, असेही वेगळेपण, तेरड्याच्या.... गौरीफुलांच्या लक्ष्म्या, गौर कुठे आली?, कोकणातील गौराई, स्त्रियांना पर्यावरणाची जाण मुळात असते, वऱ्हाडातल्या महालक्ष्म्यांचे वेगळेपण, गौरी वा महालक्ष्म्यांच्या सणात सोळा या आकड्याचे महत्त्व, खानदेशातली कानबाई, दिवा सुफलीकरणाचे प्रतीक, स्त्रीची विविध रूपे : महालक्ष्मीत.... देवीरूपात, सृष्टीजीवनाची सुफल संपूर्णता : शिवशक्तीच्या स्वतंत्र अस्तित्वात आणि एकरूपतेत, कुलस्वामिनींच्या मंदिरांचे वेगळेपण, ज्येष्ठेच्या घरी कनिष्ठा का आली ?, आद्यपूजेचा मान ज्येष्ठेला का ? , ज्येष्ठेच्या घरी कनिष्ठा दोन दिवसांची पाहुणी, लक्ष्मी या कल्पनाबंधाकडे समाजाची पाहण्याची दृष्टी, भादव्यातील समृद्धी, जमीन आणि पाणी यांच्या एकरूपतेतून, ज्येष्ठाकल्पातील ज्येष्ठेचे रूप, प्राचीन भारतातील लोकजीवनाचे वैशिष्ट्य... मातृसत्ता, मातृसत्तेचा लोप, नवरात्र, मराठवाड्यातील व्रतांवर दक्षिणेचा प्रभाव, मराठवाड्यात चार नवरात्रे, आईचा जोगवा मागीन, कोजागिरी : कोण आहे जागे ?, दिवाळी - धनतेरस, नर्कचतुर्दशी, दिवाळीची अमावास्या ऊर्फ लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, भाऊबीज ऊर्फ यमद्वितीया, माती आणि माहेर यांच्याशी दृढ नाते, भारतीय सण : ऋतुचक्राशी जोडलेल आणि ऋतुचक्र कृषीशी, इतर प्रांतांतील सणांवर ओझरता दृष्टिक्षेप : मूलभूत साम्य.

**पाऊस आणि भूमी : सूर्य आणि भूमी यांच्यातील नाते –**

भारतातील बहुतेक सण व्रते, विधी, उत्सव हे कृषिजीवनाशी जोडलेले आहेत. आणि ते मूलतः जमिनीची सुफलनशक्ती वाढावी, जीवन सर्वार्थाने सुखकर व समृद्ध व्हावे या मूलभूत मानवी जाणीवेतून निर्माण झाले आहेत. एकूण जीवनचक्र सुरळीतपणे प्रवाही राहावे यासाठी अन्न व पाणी यांची प्राण्यांना गरज असते. त्यानंतर वस्त्र आणि निवारा यांचे महत्त्व. अन्न निर्माण करते भूमी. पाणी देते आभाळ. या दोहोंच्या जोडीला निर्मितीसाठी वा सर्जनासाठी आवश्यक असते ऊर्जा. ती सूर्यापासून मिळते. निसर्गाचे चक्र सतत फिरत असते. त्याचे निरीक्षण मानवाने हजारो.. लाखो वर्षांपासून केले. त्या निरीक्षणातून त्याने निसर्गातील घडामोडीबद्दल काही ठोकताळे बांधले. या निरीक्षणातून त्याला वर्षन – भूमी – सर्जन तसेच सूर्य – भूमी – सर्जन यांच्यातील अनुबंध उलगडला गेला.

भूमी ही जणू विश्वाचा .. जगाचा गर्भाशय आहे. बीज पेरणारा सूर्य असतो. वर्षन झाले नाही तर बीज कोरडे राहते. भूमीचा गर्भाशय वांझ राहतो. वर्षन, भूमी आणि सूर्य यांच्या समागमातून वनस्पतीसृष्टी निर्माण होते. या तिहींतील कार्यकारणभाव समजून घेण्याचा प्रयत्न आदिकाळापासून मानवाने केला. कोणत्या काळात विशिष्ट वनस्पतींची वाढ जोमाने होते, वनस्पतींचे रूप, रंग, स्पर्श, गंध, चव यांच्यात बदल कसे घडतात. इत्यादीबाबतचे बारकावे, निरीक्षणांतून त्याने नोंदवून घेतले. जमिनीची सुफलता कोणत्या काळात भराला पोहोचलेली असते. कोणत्या काळात वाढते या बाबतचे आडाखे त्याने बांधले. अवघे जीवन अन्नावर आधारित असल्याने जमिनीच्या सुफलन शक्तीशी जोडलेले विविध प्रकारचे यातु विधी त्याने रचले. त्या यातुविधींचे परिणाम अजमावून ते विधी निश्चित केले. त्यातून जमिनीच्या सुफलनतेशी निगडित परंपरा निर्माण झाल्या.

**मानवी संस्कृतीच्या विकासाची दिशा –**

सुरुवातीच्या काळात सर्जन ही विश्वातील एक अनाकलनीय, गूढ पण जगण्यासाठी आवश्यक आणि निसर्गनियमानुसार घडणारी घटना होती. वर्षानुवर्षांच्या अव्याहत निरीक्षणांतून मानवाने भूमी आणि स्त्री यांच्यातील सर्जनक्षमतेचे सारखेपण बुद्धीत नोंदवले. भौतिक विश्वातील घटना आणि मानवाचा आत्मिक आणि बौद्धिक विकास यांचा परस्परांवर सतत परिणाम होत असतो त्यातून

मानवी संस्कृतीचा विकास होत गेला. मानवाच्या कल्पनासृष्टीत त्या कल्पनांतून निर्माण झालेल्या दैवतविषयक कल्पनात, सृष्टीचे प्रतिबिंब उमटले आहे. या निरीक्षणातून त्याने विधी, उत्सव, सण, व्रते, यांची रचना केली, परंपरा निर्माण केल्या. तत्संबंधी गीतांतून आपले, निसर्गाचे आणि जीवनातील सुखःदुखांचे भौतिक व भावनिक नाते प्रगट केले.

प्रारंभीच्या काळातील मानवी जीवन अन्न म्हणजेच जगणे या कृतीशी बांधलेले होते. प्राथमिक कृषिपद्धतीतून मानवाची यातुप्रधान जीवनपद्धती विकसित झाली. त्या त्या लोकसमूहाचे दैवत विकल्पन आणि तत्त्वचिंतन यांचा, त्या त्या लोक समूहाच्या सामाजिक आर्थिक जीवनाशी आंतारिक व अतूट अनुबंध असतो.

**सण व्रतोत्सव आणि आजचा धर्म –**

नागपंचमी, नारळी पौर्णिमा, पोळा, घटस्थापना , गौरीगणपती, हरितालिका, चंपाषष्ठी, सटीचे नवरात्र, चैत्रगौर, पौषातील रविवारचे व्रत इत्यादी व्रतोत्सवांचे - विशेषकरून स्त्रिया करीत असलेल्या व्रतोत्सवांचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की, आज ज्या धर्माशी त्यांचे नाते जोडले जाते त्या धर्माशी त्यांचा काहीही संबंध नाही. आज अस्तित्वात असलेला धर्म सुघटित होण्यापूर्वीच्या प्राथमिक कृषिप्रधान जीवनपद्धतीशी ते जोडलेले आहेत. त्या काळच्या यातुप्रधान विधियुक्त जीवनपद्धतीतून ते कालौघात निर्माण झाले. तत्कालीन बहुजनांच्या जीवन जगण्याचा एक भाग बनले. ज्यांना आदिबंध म्हणता येईल अशा स्वरूपात ते भारतीयांच्या जीवन पद्धतीत गोंदले गेले. काळानुरूप सामाजिक, राजकीय धार्मिक बदलांबरोबर त्यांचे उन्नयन झाले. तेव्हाचे स्वरूप बदलून आजच्या रूपात परिवर्तन झाले.

**वर्षाकाळाशी जोडलेले व्रतोत्सव : ज्येष्ठ ते कार्तिक मासांत –**

या कृषिसंबंद्ध विधिउत्सव सण व्रतांचा शोध घेताना असे लक्षात येते की, वर्षन आणि भूमी यांच्या संयोगातून बहराला येणाऱ्या सर्जनाशी जोडलेले विधी, उत्सव, सण, व्रते ही ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन कार्तिक या महिन्यांतून विशेषत्वाने येतात. सूर्य, भूमी यांच्या संयोगातून सर्जनाला चेतना मिळते. याची जाण आदिमानवाला निरीक्षणातून झाली होती. सूर्याची ऊर्जा भूमी आपल्या उदरात साठवून घेते. त्यामुळे मातीची फलित होण्याची शक्ती तर आधिक वाढतेच

परंतु पावसाचे पाणी उदरात आकंठ साठवून घेण्याची क्षमता पुनः पुन्हा वाढत राहते. त्या पाण्याचे बळ वर्षाऋतू संपल्यानंतरही भूमी सर्जनासाठी पुरवते.

**सूर्यऊर्जेशी जोडलेले व्रतोत्सव : मार्गशीर्ष ते वैशाख मासांत –**

सूर्याची उष्णता मार्गशीर्ष, पौष महिन्यापासून वाढत जाते. थंडीचाही जोर वाढतो. सूर्याच्या शक्तीची जगण्यासाठी असणारी गरज जाणवत जाते. त्याची नोंद आदिमानवाने घेतली. सूर्य,भूमी यांच्या संयोगातून सर्जनाला मिळणाऱ्या ऊर्जेशी जोडलेले सण, विधी, व्रते, उत्सव, हे मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन, चैत्र, वैशाखात येतात. उदा. चंपाषष्ठी, धुंदुर्मास, शाकंभरी नवरात्र, देवदिवाळी, पौर्णिमा, मकरसंक्रांत, भोगी, होळी, रंगपंचमी, धुळवड, वसंतपंचमी, गुढीपाडवा, चैत्र नवरात्र, बैसाखी, अक्षय्य तृतीया, इत्यादी.

**वर्षन – भूमी – सर्जन –**

या प्रकरणात वर्षन आणि भूमीच्या संयोगातून निर्माण होणाऱ्या सर्जनाशी जोडलेल्या महत्त्वाच्या व्रतोत्सव सण विधींचा व तत्सबंधी लोकगीतांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ज्येष्ठात दक्षिणेतून येणाऱ्या मृदगंधी वाऱ्याचे भोवरे आसमंतात भरारू लागतात. वावटळींचे फेरे धावू लागतात. जणु येणाऱ्या पावसाची चाहूल भूमीला लागते. उन्हाने शुष्क झालेल्या झाडांच्या मनात आशा पालवतात. अशा काळात वृक्षांची पूजा सामूहिकपणे बांधण्याची चाल पुरातन असावी. आजही वटवृक्षाची पूजा सामूहिकपणे केली जाते. काळाच्या ओघात त्या कथेला काळानुरूप कथांची पुटे चढविली गेली असतील. मुळात ती वर्षनाच्या स्वागताची पूजा आहे.

**वृक्षपूजा : समृद्धीसाठीचा यातुविधी –**

वटवृक्षाच्या पारंब्या जमिनीत घुसतात, तेथून नवे झाड उगवते. झाडांची मुळे पावसाचे पाणी साठवून ठेवतात. पारंब्या अत्यन्त उपयुक्त असतात. त्या आमच्या लोकजीवनात घट्ट रूजून गेल्या आहेत. सूरपारंब्यांचा खेळ अजून खेड्यांत लोकप्रिय आहे. वटवृक्ष पुरातनतेचे, विशालतेचे , सुरक्षिततेचे प्रतीक आहे. वावटळींना अडविण्याचे काम हा घेरदार वृक्ष करीत असतो. या वटवृक्षाची पूजा ज्येष्ठात तर, बाभळींची वा रानातल्या झाडांची पूजा आषाढात करतात. आषाढ तळण्याची खास प्रथा मराठवाड्यात आहे. कोंडोळी, गोड भजी... गुलगुले तळून 'आषाढ तळला आहे, खायला या' असे निमंत्रण दिले जाते. आषाढातील झाडांची

पूजा लेकरंबाळं नेऊन केली जाते. झाडाखालील दगडांना लक्ष्मी मानून पूजा करतात. कणकेत गूळ घालून त्यांचे लहानलहान मुटके करून शिजवतात. त्यांना फळ म्हणतात. ही फळे झाडाखालील लक्ष्मीला वाहतात. वृक्षवल्ली वनस्पती, आणि कुळातील मुले हे समाजाचे घन आहे. याची जाण आदिमानवाला होती. त्या घनाची वृद्धी व्हावी, ही वृद्धी ज्या पर्जन्यामुळे होते तो पाऊस वेळेवर व योग्या प्रमाणात व्हावा, ज्या पर्जन्यामुळे वनस्पतीसृष्टी पुनश्च नव्याने बहरते, त्या पर्जन्याचे वनस्पतीसृष्टीचे तसेच कुलातील नव्या पिढीचे त्या ऋतूचे स्वागत करण्याची भूमिका या पूजेमागे असावी. तसेच भविष्यातील समृद्धीसाठी हा यातुविधी केला जात असावा.

ज्येष्ठ आषाढात पेरणीपूर्वी पेरणीचे साधन, तिफण उर्फ पाभर हिची विधिपूर्वक पूजा केली जाते. तिफणीची आरती प्रसिद्ध आहे. तिफण आणि शेतकरी शेतकरणीचे रक्ताचे भावबंध, वऱ्हाडातील कवी विठ्ठल वाघ यांनी हळुवारपणे उलगडून दाखवल्याने ही शेतातील 'तिफण' शहरातल्या घराघरातूनही पोहोचली आहे.

**तिफण उर्फ पांभरीची पूजा –**

पेरणीची तयारी ज्येष्ठापासूनच सुरू होते. वैशाखाच्या उन्हात जमीन भाजून निघते. त्यानंतर जमिनीची मशागत करण्यास शेतकरी सुरुवात करतो. वळीवाच्या सरींनी जमीन भिजते. पुन्हा ज्येष्ठाच्या धगीने भाजून निघते. या सरींमुळे आणि उन्हाच्या धगीमुळे जमिनीतील ऊर्जा वाढते. शेतात पाणी घालून शेतकरी शेत पेरणीसाठी सज्ज करतो. मृगाचा पाऊस पडताच शेतकऱ्याची पेरणीची धांदल उडते.

**तिफणीची पूजा –** मराठवाड्यात पेरणीपूर्वी तिफण ऊर्फ पाभर या पेरणीच्या पारंपरिक यंत्राची पूजा केली जाते. तिफण ऊर्फ पाभर म्हणजे पेरणी करतांना ज्यातून दाणे पेरले जातात ते साधन. तिफणीला तीन पोकळ नळे असतात. ते चाडाला म्हणजेच कुरीला जोडलेले असतात. पेरणीच्या वेळी तिफण औताला जोडतात.

तिफणीचे तीन दाते नांगरलेल्या जमिनीत घुसतात. त्यातून बियाण्याची बोळवण केली जाते. चाड ऊर्फ कुरीतून दाणे टाकले जातात.

शेतकरी समाजाच्या मनात हजारो वर्षांपासन रुजलेल्या श्रद्धा यंत्रयुगातही कमी झालेल्या नाहीत. पेरणीपूर्वी जमिनीच्या संदभृत काहीना काही विधी केल्या शिवाय पेरणी करीत नाहीत. पाऊस झाल्यावर पेरणी करण्यापूर्वी शेतकरी सुताराचे घरी

तिफण घेऊन जातो. तिफणीची डागडुजी करून तिला उत्तम रीतीने पेरणी करण्यास योग्य करण्याचे काम सुताराचे. सुतारही या कामात गर्क असतात. पेरणीपूर्वी सुताराला गंधाक्षता लावून त्याचा सन्मान केला जातो. सुताराचे घर म्हणजे जणु तिफणीचे.... कुरीचे माहेरच असते.

पेरणीचे दिवसांत सुताराला रात्रंदिवस काम असते. त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करताना शेतात राबणारी शेतकरीण म्हणते,

सुतार मेटावरी दिवा लावूनी काय केले ?
ताईता बंधूजींनी चाड सोन्याचे घडविले

सुतार हा पांढरीतला महत्त्वाचा बलुतेदार. बलुतेदांरापैकी अनेक जण कलाकारही आहेत. त्या कलेची कदर शेतकरी समाजाला होती.

सुतारीणबाई कुठे गेला तुझा दीर
भाऊच्या चाड्यावरी काढीले कींर मोर
सुतारीण बाई कुठे गेला तुझा पती ?
भाऊच्या चाड्यावर कुणी काढीला गणपती ?

तिफणीच्या चाडातून बियाणे व्यवस्थित खाली पडते की नाही याची चाचणी सुतार करतो. अवघ्या मानवसमूहाचे जगणे धनधान्याच्या निर्मितीवर अवलंबून असते. कृषि समृद्धीवर अवलंबून असते. धान्यनिर्मितीत सुताराचा महत्त्वाचा सहभाग असो.

**तिफणीला नवरी बनवून शेतात नेले जाते –**

सुताराचे घर तिफणीचे माहेर. तिथून तिफणीला नवरी बनवून शेतात नेले जाते. पाऊस पडताच कुरीबाईला... तिफणीला चिठ्ठी पाठवून, मुऱ्हाळी पाठवून सन्मानाने बोलावले जाते. शेतकरणीचा बंधू वा पुत्र मुऱ्हाळी म्हणून पाठविला जातो.

पडतो पाऊस चिमणीबाईचा गलबला
धरतीबाईचा कंथ आला
सुताराच्या मेटावरी टिपणीबाईचे माहेर
राजसबाळ माझा मुऱ्हाळी झाला स्वार

पाऊस लागलाया कुरीबाईला धाडा चिठ्ठी
सोन्याचा चाबूक दीर दाजीच्या पाठी

सुताराच्या घरी गोल लाकडाचा मेट असतो. त्यावर तिफण ठेवून धान्याचे दाणे तिफणीतून नीट पडतात की नाही ते सुतार पाहतो. पेरणीचे धान्य सुताराला सुपाने भरभरून देण्याची प्रथा होती. सव्वा रुपया, नारळही दिला जाई.

**निर्जीव वस्तूंचे मानुषीकरण : भारतीय मानसिकता –**

जीवनात उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचे मानुषीकरण करून त्यांच्याविषयीच्या सद्भावना व्यक्त करण्याची मानसिकता भारतीयांची आहे. मग ते मुसळ असो वा तिफण असो. जणु त्यातून भारतीय मनाची मानवतावादी भूमिकाच व्यक्त होत असते. तिफणीला नवरी बनवून सन्मानाने शेतात घेऊन जाण्यामागे हीच भावना आहे. पतिपत्नीचे नाते भारतीय संस्कृतीने केवळ शरीराचे मानले नाही. ते आत्मबंधन आहे. शतपथ ब्राह्मणात पतिपत्नीला द्विदल डाळीप्रमाणे समान मानले आहे. तैत्तिरीय ब्राह्मणात (३.३.३.५) म्हटले आहे.

''अर्धो वा एष आत्मनो यत् पत्नी'

पाणिग्रहणामुळे कर्माच्या ठिकाणी सहभाव येतो व कर्म उत्तम घेते. 'पाणिग्रहणाद्धि सहत्वं कर्मसु।'

पतिपत्नी या नात्याविषयी भारतीय भूमिका पाहता तिफण वा पाभर हीस नवरी बनवून शेतात पेरणीसाठी नेण्यामागचे कारण लक्षात येते.

ज्येष्ठाच्या महिन्यात ईज झालिया कावरी
बंधू राजाच्या हातात कुरी झालिया नवरी ...
माळ्याच्या मळ्यामंदी येसबंदाची काकयिरी
ताईता बंधूजीची कुरी झालिया नवरी ...
मेघराजा की नवरा वीजबाई करवली
माझ्या बंधूच्या शेतात राती वरात मिरवली...

### पाच पांडव : शेतीच्या सुफलीकरणाचे प्रतीक –

मंगळवारी आणि शनिवारी पेरणी करीत नाहीत. हे दोनही वार शनी आणि मंगळ या तापग्रहांचे आहेत. त्यांची पीडा होऊ नये म्हणून हे वार टाळतात. मराठवाड्यात अनेक ठिकाणी पेरणीच्या वेळी पाच दगडांना चुना लावून, लिंबाची वा तुरांट्याची छोटीशी कोपी करून त्यात ते मांडतात. त्यांना पाच पांडव म्हणतात. पांडवांबरोबर कुंती आणि द्रौपदीचा असे दोन दगडही मांडतात. शेतीच्या एकूणच विंधींमध्ये या पांडवांना महत्त्व असते. दिवाळीत बलिप्रतिपदेसही शेणाचे पाच पांडव, द्रौपदी, कुंतीसह अंगणात मांडतात. इळा आवसेसही पाच पांडवांची पूजा असते. हे पाच पांडव शेतीला ऊर्जा देणारे, शेती सुफलित करणारे, शेतीचे अनिष्टापासून रक्षण करणारे असावेत. पाच पांडव, कृषिविधानातील त्यांच्या महत्त्व हे दैवतशास्त्रा समोरचे एक आव्हान आहे असे म्हटल्यास वावगे होऊ नये.

नाशिक भागात, आदिवासी समाजात पेरणीपूर्वी कोंबडे म्हसोबापुढे मारून त्याच्या रक्तात पेरावयाचे बीज भिजवून मग पेरणी करतात. तर कोल्हापूर, कोकण भागात पेरणीपूर्वी 'सात' नावाचा विधी केला जातो. हा विधी म्हणजे भूमीची शांती करणे होय.

### कुरी नव्हे तर काशीच –

शेतकरी स्त्री कुरीला 'काशी'ची उपमा देते. मातेला जशी तिच्या मुलांच्या संगोपनाची काळजी असते, तशी पेरणी करणाऱ्या कुरीलाही आपल्या लेकरांच्या पोटाची काळजी असते. भरपूर अन्नधान्य निर्माण करणारा पेरा व्हावा ही तिची सदिच्छा असते. कुरी वा तिफणीच्या संदर्भातील ओव्यांतून असे लक्षात येते की बहिणीने भावाच्या शेतांत पेरा करणाऱ्या कुरीसाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत.

चुड्याचे हात माझे कुरीबाई चाड्यावरी
बंधूंची नजर भैणाबाईच्या पेऱ्यावरी....
वळीव पाऊस लागून गेला राती
बंधूजीचा शाळू पेराया दिली घाती.....
चाड्यावरी मूठ घेतो बहिणीच नाव
बंधवाला माझ्या दुनीनं दैव द्याव.....

माहेरवाशीण ही सर्वश्रेष्ठ सवाष्ण मानली जाते. सवाष्णीने केलेला पेरा भरपूर पीक देतो अशी लोकमनातील श्रद्धा आहे. ती वरील ओव्यांतून व्यक्त होते. आजही मराठवाड्यात आणि महाराष्ट्रातही स्त्रियांकडून पेरणी करवून घेण्याची परंपरा अनेक ठिकाणी पाळली जाते. उत्तम पेरा करणाऱ्या स्त्रियांना पेरणीसाठी सन्मानाने बोलावले जाते. लातूर जिल्ह्यातील पारधेवाडी या गावच्या कडाबाई कवे या उत्तम पेरा करणाऱ्या म्हणून त्या परिसरात ख्यातनाम आहेत.

**जयजय गणपती –**

तिफण नवी असेल तर मात्र सुतार स्वतः शेतात जाऊन तिफण भरतो. शेतातच सुताराला गंधाक्षता लावून ज्या धान्याचा पेरा करायचा ते धान्य त्याला सुपाने दिले जाते. सूप हे सुबत्तेचे, लक्ष्मीचे प्रतीक आहे. तिफणीच्या चाडाला जो दोर बांधला जातो त्याची विशिष्ट प्रकारची गाठ असते. ती काही जणांनाच घालता येते. या चाडगाठीसाठी बैलांच्या वा जनावरांच्या केसा पासून दोर तयार करतात. पोळ्याच्या आदल्या दिवशी खांदेमळणी करताना त्यांची वाळव काढली जातात. ते केस पिंजून त्याचा दोर तयार करतात. ही गाठ अशा खुबीने मारली जाते की, तिफण फिरत असताना जमिनीच्या पातळीनुसार ती गाठ मागे वा पुढे व्हावी, तसेच घट्ट वा सैल व्हावी. या गाठीनुसार पेरा नीट होतो. तिफण पुढे झुकली तर 'शाव' आली म्हणतात आणि थोडी मागे झुकली तर 'करळ' आली म्हणतात. ती मधोमध राहावी ही अपेक्षा. या गाठीमुळे ती मधोमध राहते व चाड नळ्यावर व्यवस्थित बसते. तिफणीत धान्य भरताना सुतार मंत्र म्हणतो –

जय जय गणपती काम लागू दे सुती
जयजय माते लक्ष्मी जय दे
पिकू दे पिकू दे उदंड पिकू दे

या मंत्रातील आधुनिकता कोणाच्याही लक्षात येण्यासारखी आहे. मंत्रातील अक्षरे कालानुरूप बदलत असतात. परंतु ती विशिष्ट लयीत विशिष्ट पद्धतीने तीनदा वा सातदा उच्चारली जातात. गणपती आणि लक्ष्मी कृषिसमृद्धीच्या देवता आहेत.

**तिफण उतरविताना –**

खरिपाची पेरणी झाल्यावर तिफण खाली उतरवीत नाहीत. ती वरचेवर ठेवतात. रबीची पेरणी झाल्यानंतर तिफण खाली उतरवतात. तिफण उतरविण्यापूर्वी तिची ओटी भरून चाडे उतरवितात. ओटी भरल्याशिवाय तिफण जमिनीवर टेकवीत नाहीत. वर्षातील सर्व पेरण्या झाल्यानंतर चाड उतरवून म्हसोबा वा मारूतीला नारळ फोडतात. नैवैद्य दाखवितात. गड्यांना जेवण करतात. काही जण खारा नैवेद्य.. मटनाचा वा कोंबड्याचा दाखवितात. मात्र शेतातल्या जेवणात आंबिल असतेच.

पूर्वी पेरणीच्या वेळी गाणी म्हटली जात. आजकाल ही प्रथा कमी होत चालली आहे. स्त्रिया मुक्याने काम करीत नाहीत. त्यामुळे पेरणीच्या संदर्भात ओव्या खूप मिळतात. या गाण्यांतून धरणी सुफलित व्हावी, घर धान्याने भरून जावे ही भावना ओतप्रोत भरलेली असते.

**सौभागीण शेती –**

तिफणीच्या संदर्भात विविध भागांत सुताराच्या पूजेच्या विविध रीती जोपासलेल्या दिसतात. हिरकणबाई तोडकर या वयस्कर शेतकरणीने सांगितेली तूर, उडीद, तीळ, साळ, भुईमूग अशी धान्ये एक एक माप घेतात. या वस्तू हव्यातच. पानसुपारी, हळदकुंकू घेऊन सुताराचे घरी जातात. बरोबर चाड, नळे, नेतात. सुताराच्या तिफणीचे लग्न चाड्याबरोबर लागते. तिफण, चाड, नळे यांची एकत्र पूजा करतात सुताराला सर्व धान्य वस्तू गंध लावून देतात. त्याचा सन्मान करून तिफण शेतात नेतात.

सुताराच्या न्हयावरी, तिफण झाली नवरी
दिली सख्याच्या वावरी ...
नांगरिल शेत, घेतिला उभा माळ,
रासन्याची तारांबळ...
नांगरिल शेत, तिफणीनं निगा केली
सौभागिण शेता गेली...

तिफणीनं पेरा केला, बांधावरी डेरा दिला....
पड पड मेघराजा, माझं माहेर धरुनी
गवळी निघाले पेरूनी....
पडपड पावसा, पड तू आतीरीती
कुणबी आले काकुळती...
पड पड पावसा, होऊंदे वली माती
गाईच्या चाऱ्यासाठी, कुणबी आले काकुळती...

मानवाच्या सांस्कृतिक प्रवासातील महत्त्वाच्या टप्प्यांपैकी शिकारी अवस्था, प्राथमिक स्वरूपाची शेती आणि पशुपालन हे तीन महत्त्वाचे टप्पे आहेत. या अवस्था एकाच वेळी कमी अधिक प्रमाणात अस्तित्वात होत्या, त्यात कालक्रमानुसार संगती लावणे कठीण आहे. एक अंदाज मात्र बांधता येतो तो असा. शेती आणि पशुपालन या दोन्हीची जुळणी होऊन ते परस्परपूरक व्यवसाय झाले. भारतीय संस्कृतीच्या विकासाचा मागोवा घेताना दोन मूलभूत प्रवाहांकडे वैदिक, अवैदिक वा लौकिक प्रवाहांकडे सखोल आणि पारदर्शी नजरेने पाहणे गरजेचे ठरते. शिकारी अवस्थेतून माणूस शेती आणि पशुपालन या दोन व्यवसायांकडे वळला. या दोहोंची समान्तरपणे प्रगती होताना दिसते. या दोहोंचा जीवनवृत्ती म्हणून स्वीकार करणाऱ्या समाजांनी परस्परांचे आचार विचार स्वीकारत एकमेकांचे व्यवसाय स्वीकारले. हे दोनही परस्परपूरक व्यवसाय बनले. त्याचे भावचित्र वरील ओव्यांतून प्रतिबिंबित झाले आहे.

**स्त्रिया आणि पेरणी –**

धरणी समान सर्जन क्षमता असणाऱ्या स्त्रीला पूर्ववैदिक काळापर्यन्त अनन्यसाधारण महत्त्व होते. तिला येणारी मासिक पाळी सौभाग्याचे लक्षण मानले जाई. माहेरवशिणीने पहिला पेरा पेरावा अशी रीत होती. या आशयाच्या अनेक ओव्या आहेत. तसेच पेरणीशी संबंधित ओव्यांतून भावाचे शेतात पाऊस पडावा, त्याचे शेतात भरपूर धान्य व्हावे अशा शुभेच्छा बहिणीने मनापासून भावाला दिल्या आहेत.

काया वावरमा धवया नंदीनं आऊत
भाऊना सारिखा कुनबी नही शे गावात ....

ती भावाला रीतीभाती शिकविते. नागपंचमीला औत जुंपू नकोस सांगताना म्हणते -

पंचमीच्या दिशी देती नागाला पऊतं
दादा माझ्या सोयऱ्या सोड कुणब्या आऊत...

संस्कृतीच्या, कुटुंब बांधणीच्या प्रवासात मातृसत्ताक जीवनव्यवस्थेतील, जमिनीची मालकीण 'स्त्री' चा मोहरा, पितृसत्ताक कुटुंबसंस्थेचा स्वीकार करताना, पतीच्या घरात हलविला गेला. परंतु भावाची कन्या सून म्हणून स्वीकारून, तिने स्वतःचा अधिकार आईच्या घरात ठेवला. ती भावाला प्रेमाने नागाची आणि शेताची बांधीलकी सांगते. परंतु सोयऱ्याच्या नात्याने औत सोड अशी आज्ञाही देते.

नागंरणीनंतर पेरणीपूर्वी शेताच्या देवता सप्तमातृका सात दगड मांडून, प्रतीकाद्वारे पूजतात. तसेच पाच पांडव आणि कुंती आणि द्रौपदी दगडाच्या रूपाने पूजतात. त्यांचा संदर्भ ओव्यांतून येतो.

शेतीच्या मावल्या या कुणी पूजिल्या गंधवानी
ताईता बंधूजीची सीमा सांडली जुंधळ्यांनी...

ज्वारी, बाजरी, सांडेस्तो, भरभरून पिकू दे, हे मनचे गुज सांगतांना बहीण म्हणते -

जवारी बाजरीची सोय मनी सांडायनी
खाल्ताना बांधले पांभेर भाऊ पांडवांनी...

सात माऊल्या आणि पाच पांडव, दोघी सासूसुना- कुंती,द्रौपदी यांचे शेतीच्या विधींतील महत्त्व हा अभ्यासकांना चकित करणारा विचारांना चालना देणारा असा मुद्दा आहे. इळा आवसेच्या पूजेच्या संदर्भात त्याचा विशेष विचार केला आहे.

शेतात पेरणी करायचा मान काही भागात मांगिणीला दिला जातो. विशेष करून शेतातले गडी मांग समाजाचे असावेत, त्यांनी केलेल्या कामात लक्ष्मी वसते अशी

श्रद्धा जुन्या शेतकरी समाजाला होती. या संदर्भात श्रीमती माई पांडे यांनी सांगितले की पूर्वी सुईण मांग समाजाची असे. त्या काळात तिचा विटाळ नसे. रेणुकेचा परशुरामाने शिरच्छेद केल्यावर तिला जिवंत करतांना चुकीने आईऐवजी मांग स्त्रीचे शिर आणले अशी मिथक कथा आहे.

ज्या जोडप्याला जुंळे आहे अशा स्त्रीकडून पेरणी करायाची चाल आफ्रिकेच्या मध्याभागात होती फ्रेझर म्हणतो - 'A fruitful women makes plants fruitful and a barren women makes them barren' अशी समूह श्रद्धा ऑस्ट्रिया, बव्हेरिया होती. धान्योत्पादनाचा शोध स्त्रीने लावला. 'स्त्रीला शेतात पुरा, त्यातून धान्य येईल' ही Myth जगभर आहे.

**नागपंचमी : नागपूजेचे प्राचीनत्व –**

श्रावण शुद्ध पंचमीस महाराष्ट्रभर नागपंचमीचा सण सामूहिक उत्साहाने साजरा होतो. नागपूजा ही अत्यंत प्राचीन आहे. तैत्तिरीय संहितेत नागपूजेचा निर्देश आहे. ऋग्वेदात मात्र नागपूजेचा उल्लेख नाही. पुराणात विष्णु व शिवाच्या बरोबर नागाचा उल्लेख आहे. विष्णु शेषशाई आहे. तर शिवाच्या गळ्यात नाग आहेत. बौद्ध धर्मातही नागांचा उल्लेख आहे. जैन धर्मातही नागाचा उल्लेख आहे. बुद्धाच्या जन्मानंतर नंदउपनंद या नागांनी त्याला स्नान घातले असा उल्लेख आहे. बौद्ध काळात ब्राह्मण नागपूजा करीत असे चिनी प्रवाशाने लिहून ठेवले आहे.

सिंधू नदीच्या परिसरातील प्रत्येक गावात नागाची मंदिरे वा मूर्ती असतात अशी नोंद ह्युएनत्संगने केली आहे. तक्षशीलेचे राजे नागपूजक होते. त्यांनी आपल्या चिन्हावर नागप्रतिमा मुद्रित केल्या होत्या. अश्वमेघ यज्ञप्रसंगी लोहितादी आणि बायस या नागांचे पूजन करावे असे सांगितले आहे.

**भारतभर नागपूजा[१] प्रचलित –**

सौराष्ट्रात प्रत्येक गावात वेशीवर सर्पमंदिर आहे. उत्तर हिंदुस्थानात चंबा, कांगडा खोऱ्यात आणि काश्मीरमध्ये कैक ठिकाणी नागमंदिरे आहेत. काश्मीरमध्ये ७०० ठिकाणी नागाकृती कोरल्या असून त्यांची आजही पूजा केली जाते. शेषनाग, इन्द्रनाग, संतनाग अशी अनेक देवळे प्रसिद्ध असून चिनाब नदीच्या तीरावर वासुकीचे मंदिर

आहे. राजतरंगिणी हा काश्मीरच्या इतिहासाची प्रत्यक्ष नोंद असलेला ग्रंथ असे दाखवितो की काश्मीरचे राजे कर्कोटकाच्या वंशातले आहेत. केरळ प्रान्तातील प्रत्येक नायर हिंदूच्या घरी काऊस नावाचे छोटेस सर्प मंदिर असते. त्याची पूजा केल्यास घरात लक्ष्मी वास करते अशी श्रद्धा आहे. नाग हे त्यांचे कुलदैवत आहे. बंगालच्या काही भागांत नागमंडल हा नृत्य प्रकार प्रचलित आहे. तेथील वैद्य जातीचे लोक नागावतार शुभराय याच्या वंदनेसाठी हे नृत्य करतात. छत्तीसगडमध्ये श्रावण महिन्यात नागराजाची पूजा होते. कर्नाटकात नागपूजा करतात. पंजाबमध्ये सफदोन या गावी नागपूजा विशेष करून असते. जनमेजयाचे सर्पसत्र याच गावी झाले असे मानतात. महाराष्ट्रात नागपंचमी अत्यन्त उत्साहाने साजरी होते.

महाराष्ट्रातील नागपूजा –

महाराष्ट्रातील नागपंचमीचे नाते रोज रात्री गायिल्या जाणाऱ्या भुलईच्या गाण्यांशी, आकाशाला भिडणाऱ्या उंच झोक्यांशी, अठरापगड जातिजमातीच्या मैत्रिणीसह रानात जाऊन केलेल्या वारूळाच्या पूजेशी, ज्वारीच्या लाह्या आणि नागपूजेशी आहे.

नागपंचमीचा भावबंध अतूटपणे जोडला आहे, माहेरपणाशी आणि भावाबहिणीतील प्रेमाशी. नागपंचमीसाठी माहेरचा मुऱ्हाळी न्यायला येतो. त्याची वाट पाहणारी बहीण म्हणते.

पंचमीचा सण नागोबा वेगीला
मुऱ्हाळी यावा मला पाठी भाऊ मागितला...
वेडा बागडा भाऊ बहिणीला असावा
चार आण्याची चोळी, एका रात्रीचा विसावा....

नागपंचमीला माहेरवाशिणीस बांगड्या चढविण्याची पद्धत आहे. नागपंचमी येण्यापूर्वी दुपारी वा रात्री गल्लीतील, वाडीतील महिला भुलई खेळण्यास एकत्र येतात. फेरात भुलईची गाणी उंच किनाऱ्या आवाजात गातात. पंचमीच्या निमित्ताने अनेक फेरावरची कथागीते गायिली जातात. ही गीतें स्त्रीजीवनातील विविध भावबंध उकलणारी असतात.

**नागपंचमी : सुफलीकरणाशी जोडलेला सण –**

नागाला क्षेत्ररक्षक मानले जाते. तो भूमीचा रक्षणकर्ता मानला जातो. शेतात वारूळ असणे हे शुभलक्षण मानले आहे. वारुळाची माती ही सर्वात सुफल माती मानली जाते. वारूळ हे भूमीच्या सर्जनेन्द्रियाचे प्रतीक मानले आहे. तर नाग हा पुरुष तत्त्वाचे.... पुरुषत्वाचे प्रतीक मानला जातो. नाग क्षेत्रपती असून त्याचे भूमीशी साहचर्य असते. त्याच्या अस्तित्वामुळे भूमी सुफलित होते. रेणुका, मातंगी, सांतेरी, दक्षिणेतील एल्लम्मा या समाजात मान्यता असलेल्या भूदेवींच्या उपासनेत नागचिन्हाला विशेष महत्त्व आहे. वारुळातील मातीला मूलमृत्तिका असे म्हणतात. नाग ही संतानदेवता असून ज्यांना मूलबाळ नाही अशा स्त्रिया नागपूजा करतात. नागबलीचे व्रत यासाठी प्रसिद्ध आहे. विजेची तेजाने सळसळणारी गती, नागाची नागमोडी चाल, विजेनंतर येणारा सहस्रधारांनी जमिनीला चिंब भिजवणारा पाऊस आणि त्यानंतर फुलणारी हिरवी किमया. म्हणून तो सुफलीकरणाचे प्रतीक मानला जातो. जणु धरतीला सुफलित करणारे ते पुरुषतत्त्व असते.

**सर्प आणि कामवासना : भारत आणि भारताबाहेरील संकल्पना –**

अनेक भारतीय लोककथांतून पुराणकथांतून नागलोक भूमी मानली आहे. पृथ्वीवरच्या सुंदर आणि पराक्रमी पुरुषांवर नागकन्या भाळतात व त्यांना नागलोकात नेतात असा कल्पनाबंध अनेक लोककथांतून येतो. अर्जुनाची एक पत्नी, उलूपी ही नागकन्या होती. भारतीय धारणेनुसार पृथ्वीला शेषनागाने मस्तकावर तोलले आहे. २ शेषनाग हे वासनेचे प्रतीक म्हणून संपूर्ण पृथ्वीच वासनामय आहे. भारतीय तत्त्वज्ञानानुसार प्रकृती वासनामय असल्याचे सांगितले आहे.

शेषनाग हा कामवासनेचा प्रतीक मानला जातो. या संदर्भात एक लोककथा अशी. द्रौपदी ही पाच भावांची पत्नी होती. तिला आळीपाळीने एकेका पतीजवळ जावे लागे. या गोष्टीचे दुःख स्त्री म्हणून तिच्या मनात असणारच. तिच्या या असहाय परिस्थितीवर नेमके बोट ठेवून दुर्योधन तिला आजूबाजूला कोणी नाही असे पाहून विचारी 'आज पाळी कुणाची ?' आणि हसे. हे दुःख हा अपमान द्रौपदी सांगणार तरी कोणाजवळ ? द्रौपदीने आपले मन श्रीकृष्णाजवळ मोकळे केले. तेव्हा श्रीकृष्णाने सांगितले की 'आज शेषाची नव्हती' एवढेच उत्तर दे. द्रौपदीने हे उत्तर दिले आणि

तेव्हापासून दुर्योधनाने हा प्रश्न पुन्हा कधीही विचारला नाही. दुर्योधनाच्या पत्नीचा उपभोग घेण्यासाठी शेष येत असे. जांभूळ आख्यानासारखी ही कथासुद्धा लोकवाङ्मयातून मिळते.

[३] बाबिलोनियात अस्वार्ती नावाची एक कामदेवता असे. तिचे वाहन सर्प होते. कटनर नामक मानववंश शास्त्रज्ञाने सर्प हे सुफलीकरणाचे प्रतीक असल्याचे सांगितले आहे. सर्पदंश हा वासनादंशाचे प्रतिरूप म्हणून सर्व धर्म वाङ्मयातून येतो. बायबलमधील आद्य जोडपे ॲडम आणि इव्ह यांच्या कहाणीत सर्प कामविकाराचे प्रतीक म्हणून येतो असे दैवतविषयक प्रतिकांचा अभ्यास करणाऱ्या विद्वानांचे मत आहे असे डॉ. तारा भवाळकर 'लोकसंचित' या ग्रंथातील नागबंध या टिपणात नोंदवतात.

**महाराष्ट्रात नाग 'बंधू' च्या रूपात –**

वैशाख, जेष्ठ, आषाढात शेतीच्या मशागतीत आणि पेरणीच्या धांदलीत शेतकरी कुटुंब आकंठ बुडालेले असते. शेतकरी कुटुंबातील स्त्रियांना शेतात राबावे लागते. पेरण्या संपल्यानंतर त्यांना थोडी उसंत मिळते. अशा वेळी मन मोकळ करायला, थकवा घालवायला दोन दिवस तरी माहेरी जावे असे त्यांना वाटतेच. खेड्यातील प्रत्येक स्त्री मनापासून नागपंचमीची वाट पाहत असते. प्रत्येक आईचे मन लेकीला भेटायला आसुसलेले असते. आपला लेक बहिणीला आणायला जाण्याचे नाव काढीनासा झाला तर ती मनोमन दुखावते आणि लेकाला म्हणते–

आली बाई वर्साची पंचमी
आली वर्साची पंचमी
अरे सुभाना बाळा
जा रे बाळाई बोलावू
लोकाच्या लेकी माहेरात
आमची बाळाई सासऱ्यात

नाग वा सर्पाबद्दल प्रत्येकाच्याच मनात भय असतं, विशेषतः शेतात काम करणाऱ्यांशी तर त्याची नेहमीच गाठ पडते. नागामुळे शेतकऱ्याचे बियाणे, धान्य उंदरापासून वाचते. अशा क्षेत्ररक्षक नागाला महाराष्ट्रातील स्त्रीने बंधू मानले आहे.

आदल्या दिवशी म्हणजे चौथीला प्रत्येक बहीण भावाच्या उत्कर्षासाठी, सुफल भवितव्यासाठी उपवास करते. नागपंचमीस चुलीवर तवा ठेवणे, चिरणे, जमीन उकरणे या गोष्टी करणे निषिद्ध मानले जाते. पंचमीस देशावर पुरणाचे उकडलेले दिंड करतात तर कोकणात तांदळाच्या रव्याची खांडवी करतात. नागपंचमीच्या दुसरे दिवशी कर असते. या दिवशी भुलोबा मांडून त्याची पूजा करतात. काही भागांत शिराळशेठ मांडतात. मराठवाड्यातील गावांतून भुलोबा मांडण्याचा मान आळीपाळीने एकेका घराकडे असतो. भुलोबाची माहिती स्वतंत्रपणे दिली आहे.

**वारूळाची पूजा सामूहिक : अठरापगड जातींच्या स्त्रियांचे एकात्म मन –**

नागपंचमीच्या दिवशी पाटावर नागोबाच्या आणि त्यांच्या पिल्लांच्या आकृत्यांची पूजा घरात केली जाते. परंतु या दिवशी खेड्यातील महिला वारूळाला जाऊन वारूळाची पूजा करतात. ही पूजा आळीतील सर्व जातिजमातीच्या महिला एकत्र येऊन करतात. यंत्रयुगाच्या रेट्यात या सणातील सामूहिक अभिव्यक्ती वरचेवर कमी होत चालली आहे. तरीही मराठवाड्यातील खेड्यांतून स्त्रिया वारूळ पूजण्यासाठी एकत्र जमून जातात. त्या निमित्ताने ५/६ दिवस फेरावरची गाणी, फुगड्या, झिम्मा यांनी रात्र रंगून जाते. झाडा झाडांवर झोके बांधले जातातच. उंचउंच झोक्यांच्या तालावर गाणीही. त्या गाण्यांतून मोकळे होणारे स्त्रीसमूहाचे एकात्म मन जणु आभाळाला आपल्या जीवनाची गाथा सांगत असते.

आली वर्षाची पंचीम
आत्या मी जाऊ का वारुळाला ?
वेडी झालीस भारजा
मणभर साळी सडायच्या...

तरीही भारजाने मणभर साळीचा एकच घाणा केला. खाष्ट सासूने सणाच्या उत्साहात मणभर गव्हातांदळाचा घातलेला अडसर दूर करून ती न्हायली. शृंगार केला आणि गावात गेली. गावातील लेकीसुनांना साद घातली.

वाण्या बामणाच्या मुली
वारूळाला येता का कुणी?
साळ्या कोष्ट्याच्या मुली

वारूळाला येता का कुणी ?
साऱ्या सयांत मिळवून आणल्या
आली आपल्या वाड्याला....

मग सगळ्यांनी वारूळ पुजले. फेर धरला. पण चौथ्या पाचव्या फेराला भारजाचा हार तुटला. हाराचे मोती वेचता वेचता संध्याकाळ झाली. वाड्यावर आली तर कोणींही दार उघडेना. ज्याचे त्याचे एकच उत्तर. सासूचे, दीराचे, जावेचे आणि शेवटी पतीचेही उत्तर असे -

आमची कवाड सायाची (सागवानाची)
कुलपं निघना तांब्याची
एवढ्या रातच काय ग काज ?
जा माहेरी कर जा राज !

सासरचे काटेकुटे, त्यातही कधीमधी लाभणारी माया, पतीचे प्रेम या साऱ्याच अनुभवांचे आर्त स्वर ... समूहमनाचे आर्त स्वर पंचमीच्या सामूहिक उत्सवातून दरवळत असतात. ही कहाणी फक्त भारजाची नसते. तेल्यातांबोळ्यांच्या, ब्राह्मण, मराठा, दलित घरांतील सासुरवाशिणीची असते. तिच्या हृदयात रेंगाळणाऱ्या माहेरच्या ओढीबद्दलचा, सासरच्यांबद्दलचा, मनातला कांगावाही त्यात असतो. महाराष्ट्रातील नवविवाहित स्त्री मनोमन भावाला विनवीत असते.

बारा सणाला नेऊ नकोस
पंचमीला रे ठेवू नको ....

**नागपंचमीची कथा -**

एक कथाबंध असा. एका घरात चार सुना असतात. तिघींना माहेर असते .एकीला मात्र माहेरची सावलीच नसते. या साय सावलीला आसावलेले तिचे मन पंचमी आली की खिन्न होई. शेषनागाच्या हे लक्षात आले. तो भाऊ होऊन या बहिणीकडे आला व तिला पंचमीस माहेरी चार दिवस आणले. तिचे माहरेपण केले. त्याकाळातच नागिणीला प्रसववेदना सुरू झाल्या. माहरेपणाला आलेल्या नणंदेने हातात दिवा धरला. परंतु त्या प्रसव वेदना आणि जन्म देतानाची तिची अवस्था पाहून नणंदेच्या

हातातून दिवा पडला. तोही नेमका पिल्लांच्या शेपटावर. पिल्लं मोठी झाल्यावर त्याना शेपूट तुटले कसे ते कळले. जिच्या घाबरटपणामुळे आपली शेपटे तुटली तिचा वंश नष्ट करण्याच्या हेतूने नाग त्या मुलीच्या घरी आले. त्या दिवशी नागपंचमी होती. बहिणीने पाटावर नाग रेखाटले होते. त्यांना दूध व लाह्यांचा नैवेद्य दाखवून ती त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी, सुरक्षिततेसाठी प्रार्थना करीत होती. ''परमेश्वरा माझे लांड्यापुड्या नागबंधू जेथे असतील तिथे त्यांना सुखी ठेव. त्यांचे जीवन सुरक्षित ठेव'' तिची प्रार्थना ऐकून नागांना पश्चाताप होतो. ते बहिणीस शुभेच्छा देऊन परततात.

दुसऱ्या कथाबंधात शेतात नांगराचा फाळ लागून वारुळातील नागाची पिल्लं दुखावली. संतापलेल्या नाग व नागिणीने शेतकऱ्याच्या घरातील सर्वांना दंश करून निर्वंश केले. मुलगी सासरी होती. तिला मारण्यासाठी तिथे पोहोचले. तो दिवस नागपंचमीचा होता. शेतकऱ्याच्या मुलीने पाटावर नागकुटुंब रेखले होते. त्यांची ती पूजा करीत होती आणि ईश्वराजवळ नागवंशाला दीर्घायुष्य आणि समृद्धी मागत होती. तिची प्रार्थना ऐकून नागांना पश्चाताप झाला व त्यांनी तिचे माहेर जिवंत केले. बहिणीला शुभाशीर्वाद दिले.

**नागपंचमी की नागरपंचमी ? –**

श्री. गं. बा. ऊर्फ आबासाहेब मुजुमदारांच्या दृष्टीने ही नागाची पंचमी नसून नागरपंचमी आहे. आदिमायेच्या शक्तीस नाथपंथियांनी वेगवेगळी नागकुलदर्शक नावे दिली होती. उदा, नागिणी, सर्पिणी इत्यादी. ही सर्व नावे सांकेतिक असून योगपरिभाषेतील आहेत. नागर या शब्दाचा मूळ अर्थ नगरात राहणारा. परंतु नाथपंथी संकेतानुसार विरुद्ध अर्थ करण्याची प्रथा मुळारंभी असल्याने नाग म्हणजे पर्वत त्यात राहणारे ते नागर. ही नाथपंथी योग्यांची नागरपंचमी आहे. ते नागरकुळ ज्या वारुळात अधिष्ठित झाले त्या वारुळाची म्हणजे आदिशंकराची ती पंचमी आहे. असे म्हणावे लागते. श्री. मुजुमदार म्हणतात, त्या वारुळाप्रीत्यर्थ जो सण सुरू झाला तो आजही घरोघर पाळण्यात येतो.

**कालियामर्दनाची आठवण करून देणारा दिवस –**

श्रीकृष्ण यमुनातीरी खेळत असताना चेंडू डोहात पडला. तो डोह कालिया नागाने

विषारी करून टाकला होता. त्याच्याशी युद्ध खेळून त्याला नामोहरम करून कालियाला वठणीवर आणले. कालियाच्या फडेवर उभ्या राहिलेल्या कृष्णाला पाहून गोकुळातल्या लोकांना वाटले की डोहात बुडणाऱ्या कृष्णाला कालियाने वाचवले. त्यांनी कालियाला दूध पाजून त्याची पूजा केली. हा दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. म्हणून त्यास नागपंचमी म्हणू लागले व त्या दिवशी जिवंत नागाची हळद, कुंकू, केशर वाहून पूजा करण्याची पद्धत पडली.

अशा विविध कथा नागपंचमीभोवती गुंफलेल्या असल्या तरी एकमात्र खरे की नागपूजा जगभर प्रचलित आहे. हजारो वर्षांपासून प्रचलित आहे.

**'सर्पबंध' अनेक संदर्भ –**

[४]नागमाता कद्रु ही पृथ्वीचे प्रतीक असून तिची पूजा करावी असे शतपथ ब्राह्मण सांगते. केवळ नागाचीच पूजा का केली जाते याचा इतिहास सांगताना श्री. शरद जोगळेकर नोंदवितात की नऊ नागराजांची पूजा सायंकाळी व प्रातःकाळी अनेक हिंदू करतात. कारण त्यामुळे विषबाधा होत नाही व सर्व क्षेत्रांत विजय मिळतो. या व्रताची प्रार्थना पुढीलप्रमाणे आहे.

[५] अनंत वासुकी शेषं पदमानभंच कंबलम,
शंखपालं धृतराष्ट्रं तक्षकं कालिया, तथा
एतानि नवनामानि, नागानांच महात्मना
सायंकाले पठेत् नित्यं प्रातःकाले विशेषतः
तस्य विषभयंनास्ति, सर्वत्र विजयी भवेत्।

महाभारतात बलराम हा शेषाचा अवतार मानला आहे. रामायणामध्ये सुखा नावाच्या राक्षसीचे वर्णन आहे. ती नागमाता होती. सुप्रसिद्ध वैय्याकरणी पाणिनी याचाही नागराजाशी संबंध जोडला जातो. सारनाथाच्या स्तंभावर भगवान बुद्धांना भेटण्यास आलेल्या प्राण्यांत नागाचे चित्र आहे. चीनच्या सेनानीच्या झेंड्यावर इगनेचे चित्र असते. तिबेटच्या सुनाग नावाच्या राजाचा निवास पाटली नावाच्या सरोवरात असे अशी श्रद्धा आहे. जपान, इंडोनेशिया, कोरिया, कंबोडिया या देशांत सर्पपूजा होती. सरपटणाऱ्या जातीच्या सर्पांचा उगम आणि निवास डोंगर कपारीतून

किंवा जलाशयातून दिसून येतो. त्यामुळे त्यांचा संबंध पाणी, वीज, ढग यांच्याशी जोडला जातो. सर्पाचा आशीर्वाद लाभला तर सर्व मनोकामना पूर्ण होतात अशी श्रद्धा अनेक वर्षांपासून आहे. पुष्कळ ठिकाणी पिंपळाच्या झाडाखाली दगडात कोरलेल्या सर्पमूर्ती ठेवलेल्या आढळतात.

**भूकंपाचे कारण सर्प –**

भूकंपाचे कारण सर्पच आहे अशीही समजूत आहे. कारण सर्प हा पृथ्वीच्या चोहो बांजूनी विळखा घालून बसला आहे व तो हलला की भूकंप होतात अशी समजूत आहे. या संदर्भात १९९४ साली लातूर, उस्मानाबाद भूकंपाच्या वेळची आठवण. किल्लारी भागात भूकंपग्रस्तांच्या साहाय्यासाठी हिंडत असतानाचा अनुभव. या भागात द्राक्षांच्या बागा खूप असून मोठ्या प्रमाणावर कूपनलिका आहेत. भूकंपापूर्वी काही कूपनलिकांतून धूरही येत होता. त्याची फारशी दखल घेतली गेली नाही. किल्लारीच्या नीलकंठेश्वर मंदिराची पडझड पाहण्यास गेले असताना एक वयस्क बाई अत्यंन्त त्राग्याने बोलल्या. ''काय सांगावं ताई ? या धरणीमायन तरी किती सोसावं ? तिला भोकं पाडूपाडू पानी काढलं. ती एक सोशिक. तिनं तर तक्रार केली न्हाई. पन शेवटी तुमची मशिनं थेट शेषाच्या मस्तकाला भिडली. तो तर पुरुष. तो काय गप्प राहतो काय ? त्यान दाखवला इंगा. फणा हलवून सगळ्यांनाच मातीत गाडून टाकलं. पण वाईटांसोबत चांगलेही गाडले गेले हो !'' साप हे पृथ्वीचे कारण मानले जाते. एक अशीही समजूत आहे की सापाने आकाशाला पृथ्वीपासून दूर केले. त्यात त्याचे तुकडे झाले. त्यातील एक भाग म्हणजे तारांगण. आकाशातील व्याधालाही सर्प मानतात. सर्प मरत नाहीत, म्हातारे होत नाहीत, ते कात टाकून तरूण होतात अशीही श्रद्धा आहे. सर्प संपत्तीचे रक्षण करतो जादूटोणा करतो अशीही समजूत आहे. नाग, सूर्य आणि अग्नीचे प्रतीक मानला जातो. युफरेट्समधल्या तोरोनियम लोकांच्यात सर्पपूजा प्रथम सुरू झाली व तेथून जगभर पसरली असे मत काही अभ्यासक मांडतात. प्राचीन काळी मध्य अमेरिकेत जिवंत सापांची पूजा केली जाई.

**महाराष्ट्रातील नागपंचमी सण आणि अंबुवाची –**

रसरंगगंधाच्या विविधतेने नटलेली अनेकविध वनस्पतींचा गर्भ वाहणारी पृथ्वी आणि नाना विचार-विकार संकल्प विकल्पांनी भारलेल्या मानवाचा गर्भ वाहणारी

स्त्री यांच्यातील एकरूपत्व मानवाने आदिम काळापासून स्वीकारले आहे. स्त्रीचे देहधर्म, स्त्रीच्या सुफलन प्रक्रियेतील संज्ञा - रजोदर्शन, पुष्पितावस्था, फलशोभन, ऋतू इत्यादी आहेत. पृथ्वीही रजस्वला झाल्याशिवाय सुफलित होत नाही अशी धारणा भारतीय संस्कृतीने आदिम काळापासून जोपासलेली आहे.

**ज्या काळात पृथ्वी रजस्वला होते त्याकाळात भूमी उकरीत नाहीत वा नांगरीतही नाहीत–**

अन्नाचे मूळ पाणी म्हणूनच जलतत्त्वाला जीवन म्हणतात 'वृष्टिमूलं कृषिः सर्वा वृष्टिमूलंच जीवनम्' ही जाणीव कृषिशास्त्रीय ग्रंथातून सतत राखली आहे. पहिला पाऊस पडून गेल्यावर पृथ्वी रजस्वला होते. स्त्रीच्या रजस्वला असण्याच्या काळात पुरुष समागम निषिद्ध मानला जातो. तद्वत भूमीच्या रजस्वल काळात भूमीचा लांगलाशी म्हणजे नांगराशी संबंध येता कामा नये. तसेच त्या काळात बीजवपन करू नये असेही सांगितले आहे. कृषिपराशर या कृषिग्रंथात पृथ्वीच्या रजस्वलावस्थेचा काळ मगृनक्षत्राची अखेर आणि आर्द्रा नक्षत्राची सुरुवात हा सांगितला आहे. त्याकाळाला अंबुवाची असे म्हणतात.

पृथ्वीच्या रजोदर्शनाचा काळ त्या त्या प्रान्तातील कृषिपद्धतीनुसार वेगवेगळा असला तरी पृथ्वी रजस्वला.. आर्द्रा होण्याची संकल्पना मात्र सर्वत्र प्रचलित आहे. महाराष्ट्रात नागचौथीला स्त्रिया उपवास करतात. चौथ, पंचमी आणि सटीची कर या तीनही दिवशी औत हाकीत नाहीत, जमीन उकरीत नाहीत. या काळात चिरणे, कापणे या क्रिया वर्ज्य मानल्या आहेत. तसेच स्त्रिया झोक्यावर बसतात. किमान पाच झोके तरी घ्यायचेच असा रिवाज आहे. ओरिसात रजउत्सवात स्त्रिया पायांनी भूमीला स्पर्श करीत नाहीत. झोक्यावरच बसतात. तीन दिवस फळे खातात. तसेच गल्लीतील स्त्रिया एकत्र येऊन दिवसभर गाणी म्हणतात. खेळ खेळतात. महाराष्ट्रात भुलईतली फेराची गाणी, झोके यांमागील कल्पनाबंध लक्षात येतो. मराठवाडा परिसरातील अनेक वयोवृद्ध शेतकरी कुटुंबांना भेटून माहिती गोळा केली. या तीन दिवसांत जमीन उकरणे अशुभ मानले जाते. तिसऱ्या दिवशी भुलोबाची पूजा करतात. त्या संदर्भात पुढे टिपण जोडले आहे.

## इतर प्रांतांतील अंबुवाची उत्सव –

वरील माहितीवरून असे लक्षात येते की पंचमीचा काळ हा महाराष्ट्रात पाळला जाणारा भूमीचा रजउत्सव असावा. कारण तिसऱ्या दिवशी भुलोबा उभा करतात. त्याचा आकार पुरुष लिंगासारखा असतो. तो मातीचा करतात. त्याला धान्य लावून सजवतात व पूजा करतात. स्त्री रजस्वला झाल्यानंतर पुरुष समागम फलदायी असतो. काश्मीरमध्ये चैत्र कृष्णपंचमी ते अष्टमीपर्यंत पृथ्वी रजस्वला असते. अष्टमीला चौथ्या दिवशी ती शुद्ध होते. या व्रतास 'राज्ञीस्नापन' म्हणजेच 'राणीचे न्हाण' असे म्हणतात. केरळमध्ये या उत्सवास 'उछारल' असे म्हणतात. हा उत्सव जानेवारी-फेब्रुवारीत मकरम् महिन्यात पाळला जातो. शेतीचा हंगाम संपलेला असतो. धान्यागरांना केरसुणीचे फडे लावून बंद करतात. तीन दिवस दार उघडत नाहीत. धान्य विकणे, अंगण, बागांची झाडझूड करणे, सारवणे, झाडे शिंपणे आदी क्रिया बंद ठेवतात. केरसुणी हे लक्ष्मीचे प्रतीक आहे. शेतीची अवजारेही धान्यगारांजवळ बंद करतात. त्यांना स्पर्श करीत नाहीत. चौथ्या दिवशी भूमी शुद्ध झाल्यावर टोपलीभर पाने शेतात नेऊन खतात मिसळतात व शेताची भाजणी करतात. कामरूप ऊर्फ आसामात हा उत्सव अत्यन्त थाटात साजरा होतो. मातीच्या घटात धान्यबीज आणि पाणी घालून ठेवतात. अंबुवाची काळ संपताच तो घट नदीत सोडतात. आज हा उत्सव कामाख्या देवीच्या उपासनेशी जोडलेला असला तरी, त्याचे मूळ रूप कृषिसंबद्ध आहे. ते आजही टिकून आहे. ओरिसात तर या सणाला सार्वत्रिक सुट्टी असते. पहिल्या दिवसाला पहलिरज म्हणतात. यादिवशी नववधू, कुमारिका पहाटे उठून स्नान करतात. पायात खडावा घालतात. तीन दिवस रजस्वला.. शिवायचे नसलेल्या धरणीला स्पर्श करीत नाही. गल्ली वाडीतील स्त्रिया एकत्र जमून हिंदोळ्यावर झुलत गाणी म्हणतात. तीन दिवस फलाहार करतात. या काळात नववधूंना माहेरचे लोक भेटवस्तू देतात. कुमारिकांना नवे कपडे आणतात. पाला नामक लोकनृत्याने गाव रुमझुमत असते. केरळ, आसाम, ओरिसा, बंगाल या प्रान्ताप्रमाणे हा उत्सव साजरा करण्याची पद्धत महाराष्ट्रात मराठवाड्यात नसली तरी नागपंचमी सण साजरा करण्याच्या पद्धतीवरून हा सण जमिनीच्या सुफलीकरणाशी अत्यंत जवळिकेने जोडला असल्याचे जाणवते. कोकण, कोल्हापूर भागात भाताच्या लावणीपूर्वी सात नावाचा विधी साजरा केला जातो. सात म्हणजे शांत जणु पृथ्वीची शान्ती केली जाते.

**महाराष्ट्रातही नाग संस्कृती होती –**

महाराष्ट्राच्या समाजमनातील नागप्रतिमेचा विचार करताना येथील सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. भारतात नागा हा मानवसमूह होता. आजही नागालँडमध्ये नागजमातीचे लोक राहतात. महाराष्ट्रातही नागांची वस्ती असावी. पैठण, नागपूर, नाशिक, कोल्हापूर परिसरात या जमातीच्या लोकांच्या वसाहतीच्या खुणा सापडतात. पन्हाळा- पन्नगालय, नागांचे वसतिस्थान होते. महाराष्ट्रात जी चार प्रमुख राजघराणी होती त्यातील एक सातवाहनांचे. ज्यांची राजधानी प्रतिष्ठान (पैठण) तर उपराजधानी कोल्हापूर होती. हे राजघराणे नागकुलीन होते. त्यांचा एक प्रमुख राजा शेष हा होता. हा नागराज होता. सातवाहन हा शेषाचा पुत्र होता अशी कथा लोककथेत शिरली. श्री. व्यं. केतकरांच्या 'प्राचीन महाराष्ट्र, सातवाहन पर्वः विभाग दोन' मध्ये ते नोंदवतात की सातवाहन घराण्याच्या संस्थापकाची आई भावाजवळ राहत असे. ती कुमारी असताना माता झाली. ती ब्राह्मण होती. नाग जमाती मातृसत्ताक असल्यामुळे तीत पुरुषाला गौणत्व असते. पुरुषाचा संबंध फक्त वंशसातत्यापुरता असे. नाथपंथाच्या तत्त्वज्ञानात कुंडलिनीला नागीण स्वरूप मानले आहे. कुंडलिनी शक्तीचे वर्णन करताना ज्ञानदेवांनी, नुकतीच कात टाकलेली, साडेतीन वेटोळे असलेली, कुंकुमाने न्हालेली नागीण असे म्हटले आहे. इथे ती ऊर्जा म्हणून येते. तेजाचे, प्रकाशाचे प्रतिनिधित्व करते.

**नागबंधाचा सांस्कृतिक प्रवास –**

नागजमातींचे मातृसत्ताक रूप, नागाचे क्षेत्रपालकत्व, नागाचे संतान दायित्व, नागाचे ऊर्जा वा तेजाचे प्रतीकरूप यांतून नाग या कल्पनाबंधाचे रूप मातृसत्ताक जीवन व्यवस्थेकडून पुरुषसत्ताक व्यवस्थेकडे जाताना कसे बदलत गेले याचा अंधुक आलेख आपल्याला जाणवतो.

या सांस्कृतिक उन्नयनाच्या काळात नाग महाराष्ट्रात बंधूचे प्रतीक म्हणून स्थिर झाला असेल का असा विचार मनात येत राहतो. दक्षिणेकडे मातृसत्ताक द्रविड संस्कृती स्थिर होती. उत्तरेकडून पुरुषसत्ताक आर्य संस्कृती भारतात पसरली. महाराष्ट्र प्रान्त उत्तर दक्षिणेच्या मध्यावरचा आहे. मातृसत्ताक कुटुंबात प्रमुखत्व स्त्रीकडे असे.

पुरुषाचा संबंध केवळ वंशसातत्यापुरताच असे. या अवस्थेपूर्वी जमिनीचे विभाजन होऊ नये या भूमिकेतून बहीण भावांनी संतती उत्पन्न करण्याची प्रथा असावी. यमयमीच्या कथेतून त्याचा संकेत आपल्याला मिळतो. पुरुषसत्ताक जीवन पद्धतीतून स्त्रीपुरुष नात्यांची निश्चिती झाली असावी. पुरुषसत्ताक आर्यांच्या संपर्कातून थरवाडमध्ये भावाचे महत्त्व वाढले असावे. दक्षिणेत मामाभाचीचा विवाह आजही समाज मान्य आहे. सख्ख्या भावाकडून वंश निर्मिती करण्याला निषिद्ध मानून आईच्या,मातेच्या भावाशी,मामाशी विवाह करून वंशसातत्य टिकविण्यास समाज मान्यता मिळाली. या प्रवासातून पुरुषाचे कुटुंबातील प्रमुखत्व स्थिर झाले असावे. या सांस्कृतिक परिवर्तनाच्या प्रवासात नाग महाराष्ट्रातील कृषिकन्यांचा बंधू झाला असावा.

**कासईचे गाणे : मराठी आणि तेलगू –**

नागपंचमीचे एक अत्यन्त भावार्ततेने आणि आवडीने गायले जाणारे गीत कासईचे. पंचमीसाठी माहेरी आलेली बहीण भावजयीची कासई.. साडी नेसते. वारूळाची पूजा करताना कासई कुंकवाने खराब होते. नणंदेने आपली साडी नेसावी हेच वहिनीला आवडलेले नाही. त्यातून ती खराब झाली. वहिनी नवऱ्याजवळ हट्ट धरते की साडी नणंदेच्या रक्तात रंगवून आणून द्यावी. पत्नीच्या हट्टाखातर भाऊ बहिणीला मारून तिच्या रक्ताने रंगवलेली साडी पत्नीला देतो. बहीण फुलाच्या रूपात आपल्या पतीला सारी कहाणी सांगते. दुसऱ्या गाण्यात सासू वारूळ पुजायला जाणाऱ्या सुनेला सापाची भाजी करून खाऊ घालते. सून मेल्यावर तिचे प्रेत धान्याच्या उतरंडीतील सर्वात खालच्या डेऱ्यात भरून ठेवते. मुलगा घरी आल्यावर पत्नीची चौकशी करतो. परंतु सासू ... मुलाची आई आपणास काहीच माहिती नसल्याची बतावणी करते. शेवटी मेलेली सून पतीच्या स्वप्नात जाऊन खरी गोष्ट सांगते. असाच कथाबंध तेलगू लोकगीतात आहे. मात्र मुलीची काही वार्ता नाही म्हणून माहेरची माणसे लेकीकडे जातात. तिच्या सासरच्या शिवारात मातीचा ढीग दिसतो. त्यावर अतिशय सुंदर फुलाचे झाडे दिसते. मुलीची धाकटी बहीण बैलगाडी थांबवून फूल तोडण्यासाठी जाते तर तिला ढिगाऱ्यातून गाणे ऐकू येते.

मुट्टकु मुट्टकु ओ येह्ले । मुहिना चेत्रकु यलाले
पद्दीना चेतिकी पवडालू । पाकरी मा अत्ता
पामु ओंडी पेट्टिंदी

या गाण्यातून आपल्याला सासूने कसे मारले ते बहिणीला बहीण सांगते.

**कुटुंबसंस्था स्थिर होताना –**

कन्नड गीतातील आणि मराठी गीतातील सासू नाग खाऊ घालून सुनेला धान्याच्या डेऱ्यात ठेवते. कासईच्या गाण्यातील भाऊ पत्नीच्या आग्रहाखातर बहिणीच्या रक्ताने पत्नीची कासई रंगवून देतो. कुटुंबसंस्था स्थिर होताना स्त्रीपुरुषांतील नात्यांचे बंध नियमित केले गेले. स्त्रीचे सासर आणि माहेरातील स्थान, कुटुंबातील व समाजातील स्त्रीचे स्थान, पतिपत्नींचे शारीरिक, भावनिक, धार्मिक, सामाजिक अनुबंध यांचीही निश्चिती झाली.

जमिनीची मशागत करून धान्याचे उत्पादन घेणारी थरवाडमधील सत्ताधारी स्त्री कुटुंबसंस्थेच्या जडणीच्या काळात 'पत्नी' म्हणून पतीच्या कुटुंबात स्थलांतरित होऊ लागली. तिथे तिचे स्थान दुय्यम झाले. स्त्रीचे माहेरच्या भूमीशी असलेले 'जोडलेपण' कुटुंबसंस्था स्थिर होऊन हजारो वर्षे झाली तरी कमी होत नाही. या सांस्कृतिक परिवर्तनाचा प्रवास स्त्रीच्या मनावर उमटलेल्या लहरी, गाण्यांतून प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. या मन्वन्तराच्या काळात विधी , व्रते, उत्सव, तत्संबंधी गीते, कथा यांत बदल घडत गेले. भूमीच्या सुफलीकरणाशी जोडलेली व्रते, कृषिदेवता, उत्सव यांचा नव्या स्वरूपात स्वीकार केला गेला. मात्र भारतात झालेल्या सांस्कृतिक आक्रमणांना अन्न आणि पाणी या जीवनावश्यक गोष्टींशी जोडलेले विधी उत्सव, व्रते पुसून टाकता आली नाहीत.

**नागचौथीचा उपास भावासाठी.... भावाच्या कृषिसमृद्धीसाठी –**

जी जमीन कसताना स्त्रीने तनमनधनाने समर्पण केले, ती जमीन बंधूच्या स्वाधीन करताना तिचे मन त्या जमिनीच्या सुफलतेसाठी सदिच्छा करीत राहिले. त्यातूनच नागपंचमीच्या आदल्या दिवशी भावासाठी उपवास आला असावा. कुरी, तिफण वा टिपणीच्या ओव्यांत, पेरणीच्या गाण्यांतून असे लक्षात येते की, या ओव्या भावाच्या

शेतासाठी, जमिनीसाठी गायल्या आहेत.

कन्या सासुराशी जाये मागे परतोनी पाहे
तैसे झाले माझ्या जिवा ....

असे म्हणणाऱ्या तुकारामालाही परमेश्वराविषयीची निष्ठा सांगताना माहेरच्या अंगणात गुंतलेले स्त्रीचे मन आठवावे लागले.

**फेरावरच्या गाण्यांतील आगळा कथाबंध –**

महाराष्ट्रातील पंचमीच्या फेरावरील गीतांत सासूसून, नणंद भावजय, यांच्यातील भावसंघर्ष रेखाटलेला आढळतो. मात्र प्रा. मंदा धर्मापुरीकर यांच्या एम.फिल.च्या प्रबंधात बहीण भावाच्या विवाहाचा संकेत देणारे गीत आहे. हे गीत मराठवाडा आणि तेलंगणाच्या सरहद्दीवरील भागांत प्रचलित असून 'सीमाप्रदेशातील भावगंगा' या पुस्तकात ग्रंथित केले आहे. गोविंदा नावाचा भाऊ शेतात काकडीचा वेल लावतो. वेल मोठा होऊन काकड्या येतात. पहिली काकडी खाण्यासाठी, काकडी तोडून ती देवळीत-कोनाड्यात ठेवतो. त्याची बहीण सोमू ती काकडी खाऊन टाकते. बहिणीने काकडी खाल्ल्याचे समजताच गोविंदा रागवतो आणि आईला म्हणतो- सोमूने खाल्लेले वाळूक तरी परत कर नाही तर तिने माझी नवरी तरी व्हावे. मुलाची ही विपरीत मागणी एकून आई रागवते आणि ती शाप देते. ऋषीचे झाड हो. ऋषीची झाड म्हणजे हादग्याचे झाड. हे झाड अगस्ती ऋषींनी दक्षिणेत आणले. अगस्तींच्या आगमनापूर्वी दक्षिणेत बहीण भावाचा विवाह रुढ असावा. आर्यांच्या आगमनानंतर ही रुढी लुप्त झाली. 'ऋषीचे झाड हो' म्हणजे बहीण भावाचा विवाह न होण्याची प्रथा वाढो.

**फेराची गाणी : पावसासाठीच्या समूहप्रार्थनांचा अवशेष –**

भुलई खेळताना एक फेर पूर्ण झाला की स्त्रिया एकात एक गुंफलेले हात क्षणभर जमिनीला टेकवतात आणि पुन्हा फेरात फिरू लागतात. झिम्म्याप्रमाणे या फेरगीतांची लय द्रुतगतीत नसते. अत्यन्त संथ लय असते. भूमी आणि स्त्री यांच्यातील एकरूपता आणि भूमीबद्दलची कृतज्ञता या कृतीतून व्यक्त होते. लोकगीतांचे प्राचीनत्व अपार असते. हजारो वर्षांचे, अनेक शतकांचे संदर्भ त्यात दडलेले असतात नागपंचमी हा श्रावणाच्या सुरुवातीचा सण. पेरण्या पूर्ण होऊन रोपे भुईतून वर आलेली असतात शेतीच्या कामात सुरुवातीपासूनच स्त्रियांचे योगदान मोठे असते. तृणधान्ये

भाजीपाला, कंदमुळे पिकविण्याचे प्रयोग त्यांनीच केले. पाऊस येण्यासाठी भूमीची उर्वराशक्ती वाढण्यासाठी, स्त्रिया सामूहिक प्रार्थना, विधी, प्रत्यक्ष जाऊन करीत. त्याचे अवशेष नागपंचमीच्या फेराच्या गीतांतून जाणवतात.

**उत्तरेकडे नाग, पती, प्रियकर पुत्राच्या रूपातून येतो. महाराष्ट्रात मात्र नाग बंधूंच्या रूपातच येतो –**

आदिम काळात मानवाचे जीवन प्राणिमात्रांप्रमाणे होते. प्राणिमात्रांत वंश पोटात असेपर्यंत व नंतर ते पिल्लू मातेचे दूध पिऊन स्वतःचे खाद्य स्वतः मिळवेपर्यंत त्याचे आणि मातेचे नाते असते. ते पिल्लू वयात आल्यावर ज्या मातेच्या उदरातून जन्म घेतला तिच्याशीही रत होते. माणूसही सुरुवातीच्या काळात असेच पशुवत जीवन जगला. इडिपस कॉम्प्लेक्समधून आई मुलाचे शारीरिक संबंध असण्याचा संकेत मिळतो. तर यमयमीच्या गोष्टीतून बहीणभावाचे शारीरिक संबंध वैध असण्याचा संकेत मिळतो. जैन रामायणानुसार राम आणि सीता बहीणभाऊ होते. मातृसत्ताक समाजव्यवस्तेत कोणत्या पुरुषाकडून संतती मिळवायची हे स्त्री ठरवीत असे. नागकन्या उलुपीने अर्जुनासारखा बलदंड व देखणा पुत्र मिळावा म्हणून अर्जुनाशी संग केला. ती अर्जुनाबरोबर श्वसुरगृही गेली नाही. सत्यकाम जबालीला मातेचे नाव माहीत होते. परंतु पित्याचे नाव मात्र माहीत नव्हते. या सर्व बाबींचे निरीक्षण करता असे लक्षात येते की स्त्री आणि पुरुष यांच्यातील अत्यन्त पवित्र नात्याची निर्मिती 'बंधू.... भ्राता' या नावे निश्चित झाली. हे नाते केवळ रक्ताचेच नसते तर हृदयस्थ भावनेचेही असते याची साक्ष द्रौपदी आणि श्रीकृष्ण, नाग आणि मऱ्हाटी स्त्री यांच्या कथाबंधांतून मिळते. नागाला कृषिकन्येने भाऊ मानले आहे. भाऊबीजही महाराष्ट्रात अत्यन्त भावपूर्णतेने साजरी होते. गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या उत्तरेकडील प्रान्तात विवाहनांतर माहेरचा संबंध जवळजवळ तुटतो. लेकीच्या घरी वडीलबंधू, बहीण, आईवडील पाणीही पीत नसत. जेवले तरी ताटाखाली चांदीचे नाणे ठेवीत. 'कन्यादान' पुरुषप्रधान जीवन व्यवस्थेतून आले. महाराष्ट्रात मात्र मुलीकडे जेवायचे नाही, मुलीने आईला लुगडे नेसवायचे नाही अशा प्रथा नाहीत. उलट मंगळागौरीच्या ५ व्या वर्षी तांब्यात सोन्याचा नाग ठेवून त्याचे तोंड खणाने बांधून तो तांब्या आईला वायन म्हणून देतात. सुखाचा संसार झाल्यावर माहेर पूजण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. माहेरच्या सर्वांना स्त्री समाधानाने आहेर करते व

माहेरबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. उत्तरेत धाकटी नणंद, धाकटी बहीण, लेक यांच्याकडचा आहेर स्वीकारणे निषिद्ध मानेले आहे. वरील बार्बींचा विचार करता असे लक्षात येते की द्रविड आणि आर्य संस्कृती.... मातृसत्ताक आणि पितृसत्ताक संस्कृतीचा संगम मऱ्हाटी संस्कृतीत झाला आहे.

**पोळा : बैलांच्या श्रमांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा सण –**

शेतीच्या कामात बैलाला फार महत्त्व आहे. भर उन्हाळ्यात, पावसात, काकडणाऱ्या थंडीत शेतीची मशागत करण्यासाठी बैल सतत श्रमत असतात. बैलांशिवाय शेतीची मशागत होत नाही. आज यंत्रयुग आले आहे. ट्रॅक्टरच्या काळातही बैलांविषयीची कृतज्ञता सर्वसामान्य समाजात, विशेष करून कृषिसमाजात असतेच. जे आपल्या उपयोगी पडते, किंवा ज्यांचा आपल्यावर उपकार होतो, त्यांची मनोभावे पूजा करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे ही भारतीय लोकमनाची विशेषता आहे. उपयोगी पडणाऱ्या गोष्टी सजीव असोत वा निर्जीव त्यांचे ऋण भारतीय मन मानते. पूजा, कृतज्ञता, झाडांची असते, प्राणिमात्रांची असते, शस्त्रांची असते, साधनांची असते.

विविध टोळ्या भारतात येण्यापूर्वीपासून भारतीयांना कृषिविद्या अवगत होती. ऋग्वेद आणि अथर्ववेदात कृषिविषयी अनेक उल्लेख आढळतात. शेतीसाठी बैल व नांगराचा उपयोग त्यांना माहीत असावा. क्षेत्रपती, सीता व शुनासीर यांना उद्देशून रचलेले एक सूक्त ऋग्वेदात आहे. त्यातून आर्यांचे कृषिविषयक विचार व्यक्त होतात.

६ शुनं वाहाः शुनं नरः शुनं कृषतु लाङ्गल् ।
शुनं वस्त्रा वध्यन्तां शुनमष्ट्रामुदिङःगय ॥
शुनासीराविमां वाचं जुषेथां यद्दिवी चक्रयुःपयः ।
तेनामुप सियतम ॥
अर्वाची सुभगे भव सीते वन्दामहे त्वा ।
यथा नः सुभगासासि यथा नः सुफलाससि ॥

**अर्थ** – बैल आनंदाने, लोक मजेने आणि नांगर सहज रीतीने नांगरोत. त्यांच्या जुंपण्या घट्ट बांधा. पुढे सुखोत्पती व्हावी म्हणून आता आसूड चालवा. शुनासीर हो

(शुनासीर कृषिकर्माला सफल करणाऱ्या विभूती) आम्ही केलेली स्तुती ग्रहण करा, आकाशमंडलात तुम्ही जे उदक उत्पन्न केलेत त्यानेच ही जमीन भिजवा. भाग्यशालिनी सीते, इकडे आगमन कर. तुला आम्ही वंदन करतो.

बैलांच्या श्रमातूनच धनधान्याची विपुल निर्मिती करता येते याची जाणीव प्राचीन समाजाला होती. ज्या हातांनी बैलाला आसूड मारायचा, मानेला जू घट्ट बांधायचा त्याच हातांनी त्या बैलांच्या खांद्याना लोणी हळद मळून त्यांच्यावर माया करायची ही परंपरा पूर्वजांनी निर्माण केली. बैलांच्या श्रमाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणारा सण म्हणजे पोळा.

**पोळ्याच सण आला –**

श्रावण अमावास्येस मराठवाडा परिसरात पोळ्याचा सण अत्यन्त श्रद्धेने साजरा केला जातो. काही भागात याला बैलपोळा असे म्हणतात. तर काही भागात बेंदूर असे म्हणतात. बैल नांगर ओढतात. रात्रंदिवस श्रम करतात.अन्ननिर्मितीत त्यांचा महत्त्वाचा सहभाग असतो. त्यांनी केलेल्या श्रमांबद्दलची कृतज्ञता महाराष्ट्र आणि भारतातील इतर भागांतही सणाच्या माध्यमातून व्यक्त केली जाते. सर्वसाधारणपणे श्रावण अमावास्येस पोळ्याचा सण साजरा केला जातो. विभागपरत्वे आषाढ, भाद्रपद अमावास्येसही पोळा साजरा करतात.

**आदले दिवशी खांदे मळणी –**

पोळ्याच्या आदल्या दिवशी शेतकरी जोडीने, शेतकरणीसह बैलांजवळ येतो आणि त्याच्या खांद्यावर मायेची थाप मारतो. शेतकऱ्याच्या डोळ्यांत या मुक्या कष्टकऱ्याविषयीची अपार कृतज्ञता दाटलेली असते. त्या स्नेहल स्पर्शाने बैलही सुखावतात. वर्षभर जू वाहून पराणीचे फटके खाऊन, श्रमलेल्या खांद्यांना शेतकरी हळद आणि लोणी लावून मळतो, धान्याच्या घुगऱ्या त्याला प्रमाने खाऊ घालतो. तसेच बैलांना दुसरे दिवशी जेवायला येण्याचे आवतण देतो. मराठवाड्यात पूर्वी शेतकरी गाणी म्हणत, बैलांची खांदेमळणी करीत. आज मात्र ही गाणी हरवत चालली आहेत. तरीहो

आज आवतण घ्या
उद्या जेवायला या

असे आवतण देऊन त्यांना मानाने जेवायला बोलावतात. पोळ्याच्या दिवशी दाराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधतात. ज्वारीच्या पिठाची उकडून वा तळून कडोळी तयार करतात. ती बैलाच्या शिंगात अडकवतात. जू, फास, आळंद, टोपलं ही शेतीची अवजारे गेरू आणि चुन्याने कलात्मक रीतीने रंगवतात. बैलांची जिथे पूजा होते ती जागा शेणाने सारवून घेतात आणि रांगोळीचे झाड काढतात. जवळ भिंत असेल तर त्यावर झाड काढतात. घराला आंब्याच्या पानांचे घनदाट तोरण करून बांधण्याचा मान गावातील मांग समाजाच्या व्यक्तीस असे. तर काही ठिकाणी हा मान वारकाचा असे. त्या मोबदल्यात शेतकरी कुवतीनुसार धान्य देत असे. पोळ्याच्या दिवशी जेवणात पुरणपोळी असते. घरमालकीण बैलांच्या पायावर गरमपाणी दूध टाकून हळदकुंकू, अक्षता वाहून पूजा करते. मराठवाड्यात जेवणाचा कार्यक्रम काही ठिकाणी सायंकाळी असतो.

**पोळ्याच्या दिवशी सालदार कष्टकऱ्यांना मिष्टान्न –**

पुरणपोळीचा नैवेद्य कौतुकाने बैलांना भरवला जातो. तुपात बुडालेली पोळी बैलांच्या मुखात घालताना मालकीण जणु त्यांना सांगत असते, मनभरून, पोटभरून जेवा. तुमच्या मेहनतीतूनचं हे वैभव आम्हाला प्राप्त झाले आहे.

तूप दूध आणा ओता पोळ्यावरी
माझे राजे राबले लई सेतावरी
खारे माझ्या सोन्यांनो खारे माझ्या हिऱ्यांनो
प्वाट भरुदे तुमचं पुरनपोळ्यांनी.....

या दिवशी शेतात काम करणाऱ्या सालदारांना सन्मानाने जेवायला बोलावले जाते. सकाळी बैलांना नदीला घेऊन जातात. त्यांना भरपूर पाण्याने स्वच्छ धुतात. त्यांच्या अंगावर कावेने ठसे उमटवतात. गळ्यात घुंगरमाळा घालतात. अंगावर देखण्या झुली घालतात. या झुलींना इन्द्रधनुषी रंगांचे भिंगाचे भरतकाम करून सजवले जाते. या दिवशी बैलांचा विवाह होतो. बाशिंग बांधून नवरदेव सजवला जातो. या दिवशी खेड्यातून वेशीला तोरण बांधतात. गावातील सर्व बैल मिरवत

मिरवत वेशीपाशी नेतात. वेशीतून बैल गावात येतात तेव्हा नारळ फोडला जातो.

नवरदेव बैल –

नवरदेव जसा मारुतीच्या पारापाशी आला की नारळ फोडतात. त्याप्रमाणे कोपऱ्याकोपऱ्यावर त्यांच्यावरून नारळ ओवाळून टाकतात. किमान सात आठ नारळ तरी बैलांवरून ओवाळून टाकतात.

पोळियाचे दिशी, येशीबाईला तोरण
नंदी चालले भारानं, बसू राजाचं लगीन
पोळियाचे दिशी

या दिवशी बैलांना बाशिंग का बांधले जात असावे याचा एक संदर्भ सिंधूसंस्कृतीत सापडतो. 'श्रावणाच्या अमावास्येला भारताच्या काही भागांत पोळा नावाचा बैलाचा सण साजरा करतात. त्याचे महत्त्व द्रविडप्रचुर भागात जास्त आहे. हा सण प्राचीन लिंगपूजकांचा असावा असे दर्शविणाऱ्या बऱ्याच गोष्टी आहेत. वृषभपूजा ही आर्यांपूर्वीची आहे. ती आर्यांमध्ये नव्हती. आज हिंदूधर्मात वृषभपूजा शिवाच्या अनुषंगाने होते. प्राचीन सिंधू संस्कृतीत [७]वृषभ ही स्वतंत्र देवता होती. त्या संस्कृतीतील वृषभाचे चित्र असलेल्या ज्या प्रतिमा उपलब्ध आहेत त्यात शिवाचे अथवा शिवलिंगाचे चित्र नाही. प्राचीन काळी लिंगपूजेचे प्रतीक म्हणून वृषभाची पूजा होई. डोक्यावर शिंगे असणे हे आर्यपूर्वीच्या देवाचे व्यवच्छेदक लक्षण होते. या दिवशी बैलाला देवत्व आणण्यासाठी बैलाला बाशिंग बांधतात. या बाशिंगामुळे हा सण आर्यापूर्वांशी संबंध दाखवतो. पोळा हा बहुजन समाजाचा मोठा सण आहे. या दिवशी सायंकाळी बैलांचे लग्न लागते. लग्न, मंगलाष्टका गाऊन, ब्राह्मण बोलावून लावले जाते.

पोळियाच्या दिशी गाई झाल्याती वरमाया
भाईराजाचे माझ्या नंदी गेले मिरवाया ....
पोळ्याच्या दिशी नंदी झाल्याती नवरं
हौश्या त्येला बांधावी चवरं ....

या दिवशी सायंकाळी बैल वाजंत्री ताशांच्या तालात परणायला निघतात, दुसऱ्या घरची गाय बोलावून तिच्याशी लगीन लावले जाते. मराठवाड्यात सर्वसाधारणपणे लग्न तुळशी वृंदावनाजवळ लावले जाते. या दिवशी जेवताना बैल रुसतात असा समज आहे. पोळ्याचे दोन दिवस मालक बैलांची मन लावून खातिरदारी, सेवा, पाहुणचार करीत असतो.

माज्या रं मायबापा
तूले मारलं झोडलं
आभाळाचं मन तुझं
इसरं झालं गेलं ....

बैलाच्या मानेवरून हाताने खाजवून पाठीवर थाप मारून प्रेमाने पुरणपोळी त्यांना चारतो. शेतकऱ्यांच्या दृष्टीने तो साक्षात बळीराजाच असतो.

**चौर चौर चांग भला ... पाऊस आला घरात चला –**

पूजा करण्यापूर्वी एका रंगवलेल्या मोठ्या टोपल्यात पेरणीचे धान्य ठेवतात. सूप, फास, नाडा, आळंद ठेवतात. आळंद म्हणजे मध्यम आकाराचे मडके, तेही गेरू चुन्याने सुरेख रंगवतात. त्यांत गहू , ज्वारी, धणे, हळकुंड, सुपारी ठेवतात. बैलांसमोर जू ठेवतात. जूच्या दोन्ही टोकांच्या शिवळात आपटा रुचकी वा आंब्याच्या फांद्या खोचतात. दोन्ही टोके सुताने सुतवितात. आळंद्यात ५ तेलच्या, ५ कानवले, ५ पुरणाचे दिवे ठेवतात. पुरणाच्या मोठ्या दिव्यात तूप टाकून काळ्या कपड्याची जाड वात करून त्यात ती भिजवतात व तेववतात. शेताचा मालक व मालकीण बैलांची पूजा करतात. पूजा झाल्यावर मालक वा सालदार आळंद ठेवलेले मोठे टोपले डोक्यावर घेतो. चाडनळे गळ्यात अडकवतो. एक जण खांदे मळणीच्या वेळी ज्या मोळ वनस्पतीने खांदे मळलेले असतात तो मोळ काशाच्या वा पितळेच्या ताटावर बडवीत पुढे होतो आणि बैलाला पाच प्रदक्षिणा घालतात. मालकाच्या मागे घरातील सुवासिनी पाणी शिंपडीत जातात. प्रदक्षिणा घालताना ताट वाजविणारा ओरडून म्हणतो -

चहूर चहूर चांऽऽग भला

मागील लोक म्हणतात,

पाऊस आला घरात चला

'चहूर चहूर चांग भला' म्हणजे चोहोकडून सर्व दिशांनी सर्वांचे चांगले व्हावे. पाऊस येतोय. धरणीला त्यात आकंठ भिजू द्या. धरणी आणि पावसाच्या मिलनातून उद्याची समृद्धी बहरणार आहे. त्यांच्या एक होण्याला आपला अडथळा नको. चला घरात चला. स्त्रीपुरुष समागमातून, निसर्गशक्तींच्या समागमातून नवनिर्मिती होते. समृद्धी येते. ही प्राचीन समाजात श्रद्धा होती. त्यामुळे स्त्रीपुरुष समागमाबाबत अनैतिक घृणास्पद अशी भावना त्यांच्यात नव्हती. विवाह ही कल्याणकारी संकल्पना होती.

तुळसाबाई देवकाते या भावठाणा या ग्रामीण भागात शेती करणाऱ्या महिलेने सांगितले की बैलाला 'बसवराज' म्हणतात. त्याचा विवाह नवरी बरोबर न होता करवलीबरोबर झाला. त्या संदर्भातील त्यांनी सांगितलेल्या ओव्या अशा -

दळण दळिते एका मांडिनं म्हनंऽऽ
आला पोळ्याच सण सौराज्याचं लगीन...
बसवराजाच्या लगनाची ब्रह्मदेवानं केली चोरी
नवरी ठिवली घरी करवली नेली म्होरी
पाचव्या सोमवारी आला पोळा कारभारी
बसव्याचं लगन लावी मारवती ब्रह्मचारी
बैलामंदी ग बैल बैल हिऱ्या ग चंचल
माज्या राघोबाची झाली पेरणी पातळ

नव्या नवऱ्याप्रमाणे बैलही रुसतात. तेलपीठाला शिवत नाहीत.

बैलामंदी ग बैल बैल बड्या रुसला
शिवीना तेल मीठ मांडी घालून बसला

शेतकरीण पोळ्याला बैलांना ओवाळते. तिच्या बैलासंबंधीच्या भावना व्यक्त करताना ती म्हणते -

पोळ्याच्या दिशी बलाला तेलमीठ
दावन दावा त्याला सूर्व्या नीट

बैलाला सूर्याच्या दिशेने, पूर्वेकडे तोंड करून बांधा, सूर्य, वृषभ हे पौरूषाचे प्रतीक आहेत.

हौस मला मोठी कमानी दरवाजाची
हाईत उंचउंच शिंग माज्या बडूद्याची
बैला माज्या बडूद्यानं, इळाचं काय केलं
शेल्याला तास नेल, काळ्या मातीच सोन झाल
बैला माज्या बडूद्यानं, डरकी फोडली पेवात
धनी सावध वाड्यात
पोळ्याच्या दिशी चिरा पाडिला पाराचा
माज्या राघूबाचा नंदा जहागीरदाराचा

बैल जसे कष्ट करून मातीतून सोनं काढतात, तसाच धनीही त्याच्या बरोबरीने कष्ट करतो. याविषयीची कृतज्ञता, प्रेम व्यक्त करताना पोळ्याच्या ओव्यांतून ती सांगते -

| | |
|---|---|
| गाडीमंदी पोती | नंदी आले अंबाराला |
| किसन बाळाच्या | किल्ल्या गेल्या कंबराला |
| पाऊस राजान | पडून बरे केले |
| माज्या राघूबाचे | नंदी तासाला पाणी पेले |
| पाऊस पान्याच्या | अंगनी उतरल्या धारा |
| माज्या राघूबानं | जिमिनी केल्या तारा |
| गाडीमंदी पोती | नंदी आले पेवादारी |
| ववाळिते नंदी चारी | माझा पाचवा गल्ला करी |

हा पाचवा म्हणजे शेतकरणीचा धनी. त्यातल्या 'माझा पाचवा' या शब्दाचे भावसौंदर्य शब्दातीत आहे.

**पंचपल्लवांनी पूजा -**

बैलांच्या पूजेत पंचपल्लव असतात. दुर्वा, आपटा, बेल, रुचकी, आंबा यांची पाने लागतातच. श्रावण, भाद्रपदातील सणांमधून माणसाचे निसर्गाशी असलेले

नाते सतत जाणवते. पोळ्याच्या दिवशी मराठवाड्यात सालदारांना, शेतात राबणाऱ्या गड्यांना, त्यांच्या लेकरांना, घरधनीण आग्रहपूर्वक जेवू घालते.

**श्रमाची प्रतिष्ठा –**

पोळ्याच्या सणाच्या निमित्ताने श्रमाची प्रतिष्ठा समाजमनात रुजवली जाते. श्रमाशिवाय शेती फुलत नाही. शेतात कष्ट करणाऱ्याचे जमिनीशी घामाचे नाते असते. जमीन जणु त्याच्याशी बोलते. जनावरांच्या डोळ्यांतील भाव, त्यांच्या हंबरण्यामागील सांगावा, शेतकऱ्याला, कष्टकऱ्याला समजतो. पाऊस पाणी चांगले असेल तर पोळ्याचा सण थाटात साजरा होतो. त्या निमित्ताने अनेक गावांत बैलगाडीच्या शर्यती असतात. मिरवणुकीत कोणाच्या बैलाचा मान पुढे राहायचा, यावरूनही भांडणे होतात. पाऊस पाणी फारसे बरे नसले तरी हा सण सुना जात नाही. कारण तो जमिनीच्या सुफलीकरणाशी, धनधान्य समृद्धीशी जोडलेला आहे. विवाह हा सुफलीकरणाचा पाया असल्याने गायबैलांचे लग्न लावले जाते. या दिवशी किमान पाच बैल पूजतात. लग्नासाठीची गाय एकच असते. ती घरोघर नेतात. विवाह ही संकल्पना केवळ सुफलीकरणाचे प्रतीक म्हणून येथे विधिरूपाने साजरी होते.

या पूजेत पेरणीचे धान्य, पेरणी व शेतीची आवजारे, सूप, टोपली, विविध प्रकारची पाने, पानांची तोरणे, झाडांच्या फांद्या यांना महत्त्व असते. अंबाडीपासून निघणाऱ्या सेलम या धाग्याची सुतळी करून ती, जाते, मुसळ, दाराच्या कड्या, चूल, धान्याच्या कोठ्या आणि कणग्या यांना बांधतात. अबांडी वाढत जाणारी तिचा धागा लांबत जाणारा. जमीन, श्रम आणि पाणी यातून निर्माण होणारी सुफलता अशीच वाढत जावो असे यांतून सूचित होत असावे.

मातीचे बैल कुंभार करतो. घरोघर देतो. त्यांचीही पूजा करतात. कुंभार हा गावगाड्यातील महत्त्वाचा बलुतेदार आहे. त्यालाही जेवणाचे आमंत्रण व वाढण असते. खेड्यांमध्ये हा विधी साजरा होतोच.

**आदिवासींचा पोळा –**

आदिवासी समाजातील अनेक सण आणि विधी पाऊस काळात आषाढ श्रावणात साजरे होतात. ते जमिनीतील सुफलनशक्तीशी जोडलेले असतात.

महाराष्ट्रातील अनेक अदिवासींच्या देवता-प्रमुख देवता, धरित्री[८] आणि कणसरी या आहेत. विदर्भाच्या उत्तरेकडील डोंगर पठारांवर राहणारे कोर्कू पोळा साजरा करतात. बैलांना या दिवशी भरपूर पाण्यात नेऊन स्वच्छ धुतात. त्यांच्या शिंगांना बाशिंगे बांधून सजवतात आणि त्यांना भरपूर पळायला लावतात. चरायला नेतात.

**सातपुड्यातील निळीचारीची पूजा –**

सातपुड्यात राहणारे वळवी, गवित, वडवी, वसावे या कुळातील भिल्ल [९]निळीचारीची पूजा करतात. ती पोळ्यासारखीच असते. ही पूजा मृग नक्षत्राचा पाऊस पडल्यानंतर रानभर गवताची दाट झूल बहरल्यावरच करतात. पूजेच्या आदल्या दिवशी बैलांना स्वच्छ धुतात. शेतात नेऊन चारतात. सायंकाळी गावातील सर्वपुरुष औत हाकायची काठी पराणी घेऊन एकत्र जमतात. सर्व पराण्या एकत्र करून त्यांची पूजा करतात. ही पूजा केल्याशिवाय जनावरे हिरव्या रानात गवतात चारीत नाहीत. तसे केल्यास अघटित घडते अशी त्यांची समजूत असते.

पर्जन्य वर्तविणाऱ्या पक्षांपैकी एक भोज़ा. त्याने पोळ्याच्या आधी आठदहा दिवस मौन पाळले तर पिकांना अखेरच्या पावसाचे पाणी मिळणार नाही असा समज आहे. तर पोळ्याच्या सणानंतर हे मौन घडले तर मात्र भरपूर पाऊस पडेल असे मानतात.

**ऋषिपंचमी –**

**मातृहक्क : नैसर्गिक जीवन व्यवस्था –**

सर्व मानववंशशास्त्रज्ञांचे एकमत आहे की 'मातृहक्क' ही सर्वात जुनी आणि मानवी जीवनाच्या सुरुवातीच्या काळातली नैसर्गिक व्यवस्था होती. उत्पादन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर, नातेसंबंधाचे निश्चितीकरण त्यातून आकारास आलेली कुटुंबसंस्था यांच्याबरोबर मातृसत्तेचे रूपान्तर पितृसत्तेत झाले. वस्त्र विणण्याची, धागा तयार करण्याची कला, चिखलाचे मडके तयार करण्याची कला स्त्रीने निर्माण केली. परंपरेने पुढील पिढ्यांना दिली. धर्मानंद कोसंबी म्हणतात की शेतीचा शोध आणि मातृसत्ताक समाजव्यवस्था यांची निर्मिती भारतात प्रथम झाली. पूर्व वैदिक काळात पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेच्या सुरुवातीच्या काळात

स्त्रीला महत्त्वाचे स्थान होते. पुरुरव्याशी विशिष्ट अटींवर विवाह केलेल्या उर्वशीने आपल्या सासऱ्यास [१०] 'मी तुम्हाला अन्न आणि वस्त्र पुरवीन' असे आश्वासन दिले होते. शेती करणे, वस्त्र विणणे, घट तयार करणे यात ती कुशल होती. भूमी सर्जनशील तशीच स्त्रीही सर्जनशील, मानवास जन्म देणारी, तसेच विविध वस्तूंच्या संगमातून नवनिर्मिती करणारी. सर्व उद्योग - कृषि, पशूंवर आधारित गृहोद्योग होते. ते स्त्रीने विकसित केले. तिचे तत्कालीन अर्थव्यवस्थेला महत्त्वाचे योगदान होते म्हणूनच सर्व प्राचीन देवता स्त्रीरूपी आहेत. झाडांचा आत्मा स्त्रीला नेहमीच आशीर्वाद देतो अशी Myth आहे. स्त्रीचे अधिकार नदीच्या माध्यमातून सांगितले गेले आहेत. तिला लोकमाता म्हटले जाते. शेतीची अर्थव्यवस्था हाच 'स्त्रीतत्त्वा'चा भौतिक पाया होता. समृद्धी, पीकपाणी, सुपीकता, मुलाबाळांची समृद्धी यांचे प्रतीक स्त्रीदेवता होत्या. दुर्गा ही निसर्ग आणि नवजीवनाचे प्रतीक. तर काली (लक्ष्मी) विपुलता, समृद्धी आणि ऐहिकतेचे प्रतीक. शक्ती ऊर्फ उमा ऊर्फ गौरी ही सर्व निर्मितीचे मूळ. सरस्वती ही बुद्धी आणि कलेची देवता. चंडीचे व्यक्तिमत्त्व उग्र विक्राळ. तीसुद्धा प्रिय देवता होती.

स्त्रिया शारीरिकदृष्ट्या पुरुषांइतक्याच विकसित होत्या. त्या युद्धातही सहभागी होत. विश्पला ही स्त्री-सेनापती होती. त्या अधिक क्रूरपणे वागत. पुरुषांचे युद्धावर जाणे केवळ शारीरिक सुदृढतेमुळे नसून त्याकाळच्या आर्थिक गरजा मुख्यत्त्वे करून स्त्रिया भागवीत असल्याने त्यांना लढाईवर जाणे शक्य झाले नसावे असे बिफॉ या मानववंशशास्त्रज्ञास वाटते.

**वृषीपंचमी की ऋषिपंचमी -**

मोहंजोदारो आणि हरप्पा येथील ५ ते ७ हजार वर्षांपूर्वीची संस्कृती मातृसत्ताक होती. आर्यांची पितृसत्ताक जीवनव्यवस्था भारतात स्थिरावण्यापूर्वीची होती. या संस्कृतीचा आधार शेतीव्यवसाय होता. हा समाज लिंगपूजक होता. बैलांना - वृषभांना हा समाज पूज्य मानीत असे. वृषभाला ठेचून प्रजननासाठी निरूपयोगी करणे, त्याला शेतीला जुंपणे, गाडी ओढण्यास लावणे हे लिंगपूजेच्या विरुद्ध आहे. असे असले तरी सिंधू संस्कृतीत शेतीसाठी व्यापारासाठी बैलांचा उपयोग केला

जाई. 'वृषं लुनाति स वृषलः' बैल – वृष फोडण्याचे गर्ह्य काम करणारा तो वृषल. वृषल हा शब्द शूद्रांसाठी मन्वादिस्मृतींतून वापरला आहे. स्त्रिया सर तयार करून कुदळ फावड्याच्या साहाय्याने शेती करीत.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की ऋषिपंचमीचा संबंध 'ऋषी' या शब्दाशी वा संकल्पनेशी नसून [११] 'वृषी' या संकल्पनेशी असावा 'वृष' ह्या शब्दाचा अर्थ कल्याणकारक गोष्टींचा वर्षाव करणारा असा धर्मवाचकही झाला. या व्रताचा मूलबंध लिंगपूजक, मातृसत्ताक समाजाशी असावा. या दिवशी स्त्रिया बैलांच्या श्रमाने निर्माण झालेले धान्य वा कंदमुळे खात नाहीत. 'मुळात वृषिपंचमी असून त्या मागील कल्पनेचा व त्या संबंधीच्या माहितीचा कालांतराने लोप होऊन तिची जागा ऋषिपंचमीने घेतली असावी.'

**परिवर्तनाच्या काळातील संघर्ष : तरीही 'आदिबंध' बोलके –**

[१२] मार्शलच्या मते मातृसत्ताक संस्कृतीचे अवशेष आजच्या भारतीय जीवन पद्धतीतून दिसतात. [१३] स्टारबकला वाटते की 'स्त्री' ला मिळालेला सन्मान शेतीप्रधान अर्थ व समाजव्यवस्थेतून मिळाला आहे. पूर्व वैदिक काळात शेतीबद्दलचे, त्यातून मिळणाऱ्या शाकभाज्यांचे महत्त्व समाजास मान्य होते. शेतीशी निगडित देवतांना महत्त्व होते. बैलांचा नांगर वापरात येईपर्यंत स्त्री समाजाचे केन्द्रस्थानी होती. शेती आणि स्त्रिया यांच्या संदर्भात काही उल्लेख ऋग्वेद, अथर्ववेदात सापडतात. मुदगलानी ही स्वतः नांगर चालवणारी, शेती करणारी स्त्री होती. अगस्ती ऋषीची पत्नी लोपामुद्रा हिने आपल्या आळशी पतीच्या हातात फावडे देऊन शेतीकामाला लावले. वैदिकांची संस्कृती आणि पुरुषप्रधान अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था दृढ होतांना, समाजाला स्मृतींच्या... नियामांच्या माध्यमातून नियंत्रित करताना मातृसत्ताक गणसमाज आणि पुरुषसत्ताक समाज यांत संघर्ष झाला असावा. त्यातून स्त्रियांना सर्वार्थाने दुय्यम करणाऱ्या तीन दुष्ट प्रथा आस्तित्वात आल्या. १.बहुपत्नित्व, २.बालविवाह, ३.सतीची प्रथा. ब्राह्मणी काळात स्त्रीला सर्वाधिकारांपासून वंचित करण्याचे काम नियमबद्धपणे केले गेले. रेनफेलच्या मते हे काम ब्राह्मण काळात झाले. ऋग्वेद, अथर्ववेदात पुरुषमेध,

अनुमरण या बाबी प्रतोकात्मक होत्या. पूर्व वैदिकांत सती प्रथा नव्हती. उत्तरोत्तर स्त्रीविषयीचे हीनत्वाचे उल्लेख वाढत गेले.

या परिवर्तनाच्या काळात 'ऋषिपंचमी' चे आजचे रूप स्थिर झाले असावे. नांगराचा शोध लागण्यापूर्वीचे स्त्री आणि शेती यांचे मूलभूत नाते या व्रतातून दृगोचर होते. आदिमकाळापासून स्त्री आणि निसर्ग यांच्यात निर्माण झालेला 'आदिबंध' किती मूलभूत आहे हे या व्रतातून लक्षात येते.

## गौरी लक्ष्म्यांचा सण –

### स्त्री सुपीकतेचे प्रतीक –

मानव शेती करू लागल्यावर त्याला जमिनीतील उत्पादन शक्ती आणि स्त्रीतील जननक्षमता यांत विलक्षण साम्य जाणवले. त्यामुळे स्त्रीत यातुशक्ती... एक गूढ शक्ती आहे असे त्याला वाटे. त्यातूनच स्त्रीविषयी भययुक्त आदराची भावना त्यांच्या मनांत... लोकसमूहाच्या मनात निर्माण झाली. स्त्रिया उत्पादनाचे काम करीत असत. शेतीचा, तृणधान्ये, कंदमुळे यांचा शोध त्यांनीच लावला. यांतून ती सुपीकतेचे प्रतीक बनली. धनधान्याची समृद्धी व्हावी म्हणून करावयाच्या कृतींमध्ये स्त्रियांना महत्त्वाचे स्थान असते. मराठवाड्यात बाजरीवर रोग पडला तर रजस्वला स्त्रीकडून शेताची पूजा करून घेण्याची प्रथा होती.

### गौरी वा लक्ष्म्यांचा सण शेतीच्या समृद्धीसाठी –

महाराष्ट्रात हा सण अत्यन्त महत्त्वाचा मानतात. मराठवाड्यातील घराघरातून हा सण अत्यन्त श्रद्धेने साजरा होतो. मराठवाड्यातील सातही जिल्ह्यांतून सर्व जातिजमातींत हा सण पाळला जातो. मराठवाड्यात गौरींनाच लक्ष्म्या म्हणतात. भाद्रपद शुद्ध अष्टमीला त्या जेवतात, त्या दिवशी अनेक जिल्ह्यांतून जिल्हाधिकारी सार्वजनिक सुट्टी देतात. हा एक महत्त्वाचा कुळाचार आहे. सर्वसाधारणपणे ज्येष्ठ मुलाकाडे वा कर्त्या मुलाकडे लक्ष्म्या बसविण्याचा मान जातो. घरातील सर्व मुले व सुना या सणासाठी एकत्र जमतात. लक्ष्म्यांच्या सणाला सुना माहेरी जात नाहीत. एखाद्या मुलास लक्ष्म्यांना मूळ घरी येणे शक्य नसेल तर त्यांच्या घरी धान्याच्या

राशींची लक्ष्मी म्हणून पूजा केली जाते. एखाद्या मधल्या वा धाकट्या सुनेस लक्ष्म्या मांडण्याची इच्छा झाली तर तिच्या आईने लक्ष्म्या घेऊन मुलीकडे यायचे असते. आई नसेल तर वडील बहीण वा इतर कोणी मैत्रीण लक्ष्म्या देते. जी व्यक्ती लक्ष्म्या देते तिला आहेर केला जातो.

मृगाच्या पावसात पेरलेले धान्य भाद्रपदात भराला येते. मूग, उडदाचे दाणे भरले जातात. परसबाग हिरव्या पालेभाज्यांनी, फुलांनी बहारून जाते. मातीची सुफलनशक्ती वाढून, उद्या घरा घरात येणाऱ्या धान्याचे पीक भरभरून यावे अशी शुभकामना व्यक्त करणारा हा सण. ही पूजा हरित लक्ष्मीची असते. म्हणूनच लक्ष्म्यांच्या समोर धान्याच्या राशी घालून त्यांची पूजा करतात. पूजणारी स्त्री आपले मन ओवीतून व्यक्त करते.

लक्ष्मी आई आली शेताच्या बांधासडी
सावळा बाळराजा हाती गोफण पाया पडी
माझ्या हे ग शेतात
हाल्या बैलाचं आऊत
माझ्या हे ग घरी
लक्ष्मी येती ग धावत

**लक्ष्मीचे आगमन आणि मांडणीतील विविधता –**

भाद्रपद सप्तमीला लक्ष्म्या बसवतात, अष्टमीला त्या जेवतात आणि नवमीला परततात. मराठवाड्यातील बहुतेक घरांतून मुखवटे असलेल्या उंभ्या लक्ष्म्या मांडतात. मुखवटे घरांतील परंपरेनुसार वेगळे असतात. पण सर्वसाधारणपणे शाडूचे तयार मुखवटे असतात. काहींच्या घरी सुगडी रंगवून त्याचे मुखवटे तयार करतात. काही घरांत पितळेचे मुखवटे असतात. धडाची रचना कुलरीतीनुसार वा सोयीनुसार करतात. १. मडक्यांची उतरंड मांडून सर्वात वरच्या मडक्यावर मुखवटा मांडतात. २. घरातील डबे, घागरीचा वापर करून त्यावर मुखवटा ठेवतात. ३. अलीकडे पत्र्याचे साचे विकत मिळतात.

या धडाला कापडात कापूस भरलेले वा शाडूचे हात जोडतात. या धडाला साड्या नेसवून दागिन्यांनी सजवतात. सर्वात शेवटी मुहूर्तावर मुखवट्याची धडावर प्रतिष्ठा करतात. उभ्या लक्ष्म्या अत्यन्त काळजीपूर्वक रीतीने नियमानुसार, प्रत्येक कृती नेटकेपणाने करून उभ्या करतात. जराशी जरी त्रुटी राहिली वा पडझड झाली तर लक्ष्म्या रुसून निघून जातात. घरात अनिष्ट घडते वा घरातील सुबत्ता लयाला जाते असे भय लक्ष्म्या मांडताना मनात असते.

लक्ष्म्या मांडण्यासाठी साड्यांची मंडपी तयार करतात. समोर साड्यांचे, शोभेच्या वस्तू वापरून मखर तयार करतात. उजवीकडे ज्येष्ठा आणि डावीकडे कनिष्ठा उभ्या करतात. समोर धान्याच्या राशी घालतात. काहींकडे ज्येष्ठेसमोर तांदळाची तर कनिष्ठेसमोर गव्हाची रास घालतात. ब्राह्मणेत्तर समाजात पाच धान्य डाळींच्या राशी मांडतात. लक्ष्म्यांसमोर पिलावळ असते. त्यात एक मुलगी व एक मुलगा असतो. सुरूवातीस मोठी सून मुलाचा मुखवटा घेऊन येते. नवसानंतर मुले वाढवतात. मुलींचेही मुखवटे असतात. गौरी वा लक्ष्म्या ज्या डब्यांवर वा सुगड्यांवर बसवतात त्यांत करंज्या, अनारसे, लाडू असे फराळाचे भरतात. समोर चौक असतो. काहींच्या कडे तो अनारशांचा तर काहींकडे नागवेलीच्या पानांचा अशी विविधता असते. त्यातच धान्याच्या राशी मांडतात. मंडपीच्यावर पापड्यांचा वा फराळाचा फुलवरा करून बांधतात. काही घरांतून धान्याच्या भरलेल्या कोठ्यांवर लक्ष्म्याचे मुखवटे बसवतात. यातून धान्य आणि लक्ष्मी यांतील अनुबंध लक्षात येतो.

**लक्ष्मी आली सोन्यांच्या पावलांनी –**

सर्व सजावट झाल्यावर लक्ष्म्यांचे मुखवटे सुपात ठेवतात. त्यावर रेशमी कोरे वस्त्र ठेवतात. तुळशीसमोर सूप ठेवतात. तिथून पुढील दाराने त्या घरात येतात. एक जण घंटा वाजवीत पुढे असते. लक्ष्मीची पावले पुढील दरवाज्यापासून घरापर्यंत, घराच्या मध्ये जिथे लक्ष्मी जाते तेथे रेखतात. त्यावर हळदकुंकू भरतात. ती प्रथम देवघरात जाते. तिथून दोघी मंडपीत येतात. तिथे त्यांची प्रतिष्ठा झाल्यावर घरात येताना मंत्र म्हटला जातो तो असा –

लक्ष्मी आली सोन्याच्या पावलांनी
ज्येष्ठेच्या घरी कनिष्ठा आली
मालकाच्या घरी लक्ष्मी आली

सर्वांना आनंदाचे प्रतीक म्हणून साखर वाटली जाते. लक्ष्म्यांच्या डोक्यावर पडवळ, भोपळा वा केवडा ठेवतात. देशमुख समाजात काही घरांतून त्यांना मूळ पाठविले जाते. मूळ पाठविताना गोड दशम्या, गुळाचा खडा तुळशीसमोर बांधून ठेवतात. तिथून लक्ष्म्या घरात येतात. सूप हे समृद्धीचे आणि शुद्धीचे प्रतीक आहेच. मूळ पाठविताना हळदकुंकवाच्या पुड्या, खोबऱ्याची वाटी शिदोरीत ठेवतात.

लक्ष्मी घरभर हिंडते, अंगण, ओसरी,माडी, गुरांचा गोठा सगळीकडे जाते.

लक्ष्मीबाई आली आली
वसरी चढून माडी गेली
भक्ताला हाक दिली
लक्ष्मीबाई आली आली

**लक्ष्म्या जेवतात त्या दिवशी –**

लक्ष्मी सायंकाळी येते. त्या रात्री तिला भाजीभाकरी आणि ठेच्याचा नैवेद्य असतो. अनेक शेतकरी घरांतून ज्वारी बाजरीच्या मिसळ पिठाची भाकरी व ठेचा करतात.

सरीला सरावन भादवा आनंदाचा
आशा पाठमोरी मुऱ्हाळी सुखाचा...
पाऊस पडला चिकूल झाला
वहात आली गंगा...
पेरिला मका धान्य लाल तूरी
पावनीला वाढा भाजी ठेचा भाकरी....

दुसरा दिवस सर्वांत महत्त्वाचा. लक्ष्म्या जेऊ घालणे महत्त्वाचे . सर्वसाधारणपणे लक्ष्म्यांचे जेवण सायंकाळी वा दुपारनंतर असते. या दिवशी सकाळी काहींच्या घरी

खिचडी, सार, भाजी व लाडू, करंज्या आदी फराळाचा एक नैवेद्य असतो. सायंकाळी पुरणपोळी आणि पंचपक्वान्नांचे जेवण असते. पुरणावरणाचे महत्त्व असतेच. जेवणात सोळा भाज्या, सोळा चटण्या, कोशिंबिरी, कढी, भात असतो. साखरभातही करतात. ही लक्ष्मी अन्नदा, अन्नाची विपुलता देणारी म्हणून भरपूर पदार्थ करतात.

आली आली लक्ष्मी
आली तशी जाऊ नको
बाळाला सांगते
धरला हात सोडू नको
मला आहे हौस
चांदीच्या ताटाची
लक्ष्मीच्या नैवेद्याला
मूद साखरभाताची

लक्ष्म्यांसमोर दिवे असतात. ज्वारीची उकड काढून दिवे करतात. काहींकडे कणकेचे वा पुरणाचे करतात. बहुतेक घरांतून ज्येष्ठेपुढे सोळा दिव्यांची तर कनिष्ठेपुढे आठ दिव्यांची आरती असते. ब्राह्मणेतर घरांतून दोघीपुढे सारख्याच पोळ्यांचा, ५ वा ८ पोळ्यांचा नैवेद्य असतो. कुसुमताई देशमुख, औरंगाबाद यांच्या घरी ज्येष्ठेपुढे दोन आणि कनिष्ठेपुढे १ पोळीचा नैवेद्य असतो. काही घरांतून आंबिल करतातच. ज्वारी हे मराठवाड्यातील महत्त्वाचे धान्य. त्याचे पीठ शिजवून ते ताकाला लावतात. मीठ लसूण वाटून त्यात घालतात. शेतीशी संबंधित विधींत आंबिल करण्याची प्रथा आहे. आंबिल अतिशय चविष्ट असते.

### पोवते ऊर्फ दोरे घेणे –

लक्ष्म्यांची आरती करताना दुसऱ्या दिवशी दोरा हळदीच्या पाण्यात भिजवून त्याचे १६ पदरी व ८ पदरी पोवते तयार करतात. ते लक्ष्म्यांना वाहतात. १६ पदरी पोवते लक्ष्म्यांना व ८ पदरी पुढील मुलांना वाहतात. घरात जेवढी माणसे तेवढे पोवते तयार करतात. त्याला गाठी देतात. ते तिसऱ्या दिवशी गळ्यात घालतात. मराठा समाजात दोरे गळ्यात घालीत नाहीत. दुसरे दिवशी हळदकुंकवाच्या पाण्यात

हात उमटवून ते घरभर उमटवतात. त्या पाण्यात १६,११, ९, ७, ५ पदरी दोरे बुडवून पोवते तयार करतात. दोघींच्या नावे करतात. पैकी एक समोरील पिलाच्या डोक्यावर, तर उरलेले चार लक्ष्मीच्या डोक्यावर ठेवतात. दुसऱ्या दिवशी या पोवत्यांना गाठी मारतात. त्या गाठीत पुढील वस्तूंचा तुकडा बांधतात. खारीक , लवंग, हळदकुंकू, धोतऱ्याचे फूल, नागवेलीचे पान, हरळी, आखाडा, झेंडूचे पान, रेशीम धागा, घोंगडीचा धागा, ते दोरे लक्ष्म्यांपुढील धान्याच्या राशीत पुरतात. तिसरे दिवशी सकाळी हळदीकुंकू वाहताना ते दोरे बाहेर काढतात. लक्ष्म्यांची ओटी भरतात. ते दोरे, निर्माल्य आदी शेतात नेऊन पुरतात. उरलेले अन्न दुसऱ्यास देत नाहीत. ते शेतात नेऊन पुरतात. भूमीची सुफलनशक्ती वाढावी या साठीचा हा विधी (Ritual) असावा. हा रिवाज काटेकोरपणे पाळला जातो.

**जेवणाच्या दिवशी घरच्या लक्ष्म्यांना सन्मान –**

जेवणाच्या दिवशी ब्राह्मण समाजात सवाष्णीला जेवणाचे निमंत्रण असते. तिला सन्मानाने जेवू घातले जाते. खणानारळाने ओटी भरतात. दक्षिणा देतात. अनेक ब्राह्मण घरांतून दोन सवाष्णी जेवणास आमंत्रित करतात. पैकी एक ब्राह्मण तर दुसरी मराठा वा माळी समाजातील असते. ती शेतकरी समाजातील म्हणून सन्मानित केली जाते. मराठा समाजातील स्त्री या सणासाठी सवाष्ण म्हणून जाण्यात सन्मान मानीत असे.

मात्र ब्राह्मणेतर समाजात (सोनार, मराठा आदी) या दिवशी घरातील स्त्रिया प्रथम जेवतात. नंतर पुरुष जेवतात. कामाच्या रेट्यामुळे सर्व महिला आधी जेवू शकल्या नाहीत तर घरातील एक सून आधी जेवते. मग मुलेबाळे पुरुष जेवतात. लक्ष्म्या घरात आणताना अक्षत टाकीत आणतात. सवाष्णीला अक्षत टाकून कुंकू लावतात.

**सुगड्याचे मुखवटे तयार करण्याची रीत –**

खास काळी सुगडी आणून त्यावर बेलाची पाने घासून मऊ करतात. शिरगोळ्याच्या सहाणेवर हळकुंड उगाळून रंग तयार करतात. हिंगुळाचा लाल रंग घेतात. सुगड्यावर नाक डोळे काढून मुखवटा तयार करतात. त्याला सजवतात. एकावर एक चारपाच घागरी वा मडकी मांडून त्यावर मुखवटा बसवतात.

**अमराठी घरांतूनही लक्ष्म्या उभ्या करतात –**

श्री. श्रीनिवास लोहिया , मुक्काम पाटोदा, जि. बीड यांचे शेत नांगरते वेळी लक्ष्मीचा मुखवटा सापडला. तेव्हापासून त्यांच्या घरी लक्ष्म्या बसवितात. काही घरांतून नवसाद्वारे मागून घेतात. रेड्डी समाज तेलंगणातला. अनेक कुटुंबे मराठवाड्यात स्थिर झाली. हा समाज विशेष करून स्त्रिया शेतात अपार कष्ट करतात. अनेक घरी धान्यराशींची पूजा होते. रेड्डी समाजाचे श्री. प्रशांत बडगिरे यांची आई धुणे धुण्यास नदीवर गेली असता मुखवटा सापडला. त्यांच्या घरीही लक्ष्म्या उभ्या मांडतात. कोमटी, मारवाडी, रेड्डी, वडार या समाजातही लक्ष्म्या मांडतात. महाराष्ट्रात स्थायिक झालेले लिंगायत, गुरव समाज लक्ष्म्या बसवतात.

याकाळात जर घरच्या कर्त्या स्त्रीची मासिक पाळी असेल तर नवरात्राच्या सप्तमीस त्यांची मांडणी केली जाते. हा सण सुना ठेवीत नाहीत. घरात अघटित घडले तर त्या हिबाळून टाकतात. त्या शेतात पुरून टाकतात. १९९३ साली लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यांत भूकंप झाला तो याच काळात. अनंत चतुर्दशी होती. घरातील कर्ते पुरुष भूकंपात गाडले गेले. अशा घरात नवी सून येईपर्यंत लक्ष्म्या मांडीत नाहीत. पत्नी मरण पावली तर नवी लक्ष्मी.... नवी पत्नी घरात आणून लक्ष्म्या मांडल्या जातात.

**लक्ष्म्या मांडल्या जातात –**

नवमीला सकाळी शेवायाची खीर आणि मुरुड कानोल्याचा नैवेद्य असतो. पूजा करून गाठी घेतात. संध्याकाळी हळदीकुंकू असते. लक्ष्म्यांसमोरची आरास देखणी असते. ती पाहण्यासाठी रात्री नऊपर्यंत महिला घरोघर हळदीकुंकवाला जातात. पाठवणीसाठी मुरुड कानोले करतात. कारण तिने मागे मुरडून नेहमीच घरावर लक्ष द्यावे. घरात शेताभातात समृद्धी नांदावी.

आली आली लक्ष्मीबाई
आली तशी जाऊ नको
बाळाला सांगते
धरला हात सोडू नको....

शेतकरी कुटुंबात तिला निरोप देताना ओटी भरतात. दशम्यांची शिदोरी बांधून देतात. घंटा वाजवीत तिला तुळशीपर्यंत पोहोचवतात. रात्री मुखवटे उतरवून नीट ठेवतात. सजावट, मांडणी आवरून ठेवतात.

**मातंग चर्मकार समाजातही लक्ष्म्या –**

हा सण महाराष्ट्रातील अठरापगड जातिजमातीत एकाच उत्साहाने आणि श्रद्धेने पाळला जातो. लक्ष्म्या उभ्या करणे, राशींची पूजा, पुरणावरणाचा व १६ भाज्या चटण्यांचा नैवेद्य, फराळाचे जिन्नस आदी सर्व बाबी समान पद्धतीने पाळल्या जातात. मांग समाजात लक्ष्म्या श्रद्धापूर्वक आणि विधिपूर्वक मांडल्या जातात. महार समाजातही लक्ष्म्या मांडल्या जात. मात्र नवबौद्ध धर्म स्वीकारल्यावर अनेकांनी हिंदू सण त्यागले. त्यात लक्ष्म्याही आल्या. मात्र ज्यांचा उदरनिर्वाह स्वतःच्या शेतीवर आहे. अशा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या घरी धान्याच्या राशी मांडून त्यांची पूजा केली जाते. लक्ष्म्यांची मांडणी धनधान्याच्या समृद्धीसाठी, जमिनीची सुफलनशक्ती भरारून वाढावी यासाठी असतो. हा कल्पनाबंध शेतकरी समाजाच्या मनांत रुजल्यामुळे हा सण त्यागणे मनाला डाचते. प्रतीकात्मक पद्धतीने श्रद्धा व्यक्त केल्या जातातच.

**राणी सावरगावचे आश्चर्य –**

राणी सावरंगावच्या रेणुकेचे पुजारी श्री. सावरगावकर यांच्याकडील लक्ष्म्यांपुढे पिलावळीत दोनही मुली आहेत. पिलावळीत मुलगे वा एक मुलगा व एक मुलगी असते. दोनही मुलीच असणे व मुलगा नसणे हे एक आश्चर्यच आहे. हे मंदिर रेणुकेचे आहे.

दैवतशास्त्र असे सांगते की ग्रामदेवता सर्वात प्राचीन असतात. त्या कृषिदेवतांतून निर्माण झाल्या. त्यांच्या घडीव मूर्ती नसतात. तर तांदळे असतात. दगड असतात. त्यांच्या सहचराचे ठाणे त्यांच्यापासून दूर असते. त्या स्वयंभू, स्वप्रतिष्ठित असतात. काळाच्या प्रवाहात त्यांचे उन्नयन करण्याच्या मानसिकतेतून देवळे बांधली वा मूर्ती बसविल्या. जुन्या परंपरांचे अवशेष वा संकेत अशा वेगळेपणातून व्यक्त होत असतील का?

**असेही वेगळेपण –**

कमलताई तांबे (१९९२ साली वय ८१) यांचे माहेर धारवाड तर सासर सांगली. यांच्याकडे श्रावणातील पहिल्या शुक्रवारी तांब्याच्या लोट्यावर हळदकुंकवाने चन्द्रसूर्य, जिवतीचा पाळणा अशी चित्रे काढतात. तांब्यात तांदूळ, हळकुंड, सुपारी हळदकुंकवाच्या पुड्या, बांगड्या पैसा या वस्तू ठेवतात. गंध उगाळण्याची सहाण त्यावर ठेवून त्यावर गौरीचा चेहरा रेखतात. काजळकुंकू लावतात. पुरणावरणाचा नैवेद्य करून सवाष्णीस जेवू घालतात. देवीची आरती केल्यावर घरातील लेकरांना ओवाळतात, दर शुक्रवारी सवाष्ण जेवू घालतात.

श्रावणात शुक्रवारी मांडलेली गौर म्हणजे ज्येष्ठा, जिवती-विघ्नहारी देवी असावी. महाराष्ट्रात श्रावण शुक्रवारी मुलाबाळांच्या आरोग्यासाठी जिवतीचा पूजा केली जातेच. भाद्रपद शुद्ध सप्तमीस येणाऱ्या गौरीबरोबर नवमीस हिचेही विसर्जन होते. कोकण, कोल्हापूर भागात खड्याच्या वा तेरड्याच्या झाडांच्या गौरी मांडतात. कोकणात वा सांगली कोल्हापूर भागात या विविधरंगी फुलांना गौरीची फुले असेच नाव आहे. सप्तमीच्या दिवशी नदी वा पाणवठ्यावर एखाद्या कुमारिकेला घेऊन जातात. तिथून सातखडे पाण्यात धुऊन ताम्हणात ठेवून ते पुढील दाराने घराजवळ आणतात. त्या कुमारिकेचे दूध,पाण्याने पाय धुतात. तिला ओवाळतात. घराच्या दिशेने, घरात हळदीकुंकवाची पावले रेखतात. त्या पावलांवर पाऊल ठेवून कुमारिका घरभर हिंडते. घरातील प्रमुख स्त्री त्या कुमारिकेला विचारते 'इथे काय आहे?' ती उत्तरते 'इथे उदंड आहे' शेवटी मुलगी देवघरात जाते. या खड्यांच्या गौरीची प्रतिष्ठा, तांब्याच्या गौरीजवळ केली जाते.

**तेरड्याच्या.... गौरीफुलांच्या लक्ष्म्या –**

कोल्हापूर भागात तेरड्याच्या झाडांच्या लक्ष्म्या मांडतात. महालक्ष्मी उभी करतात. तिच्या शेजारी गणपती ठेवतात. अष्टमीला दुसरे दिवशी अनेक जणींच्या अंगात येते. अंगात आलेली बाई जिच्या ओटीत गणपती टाकील तिला मूल होते अशी श्रद्धा आहे. या परिसरात नवमीला सकाळीच लक्ष्मी उठते. जमलेल्या महिला एकमेकींची गहू आणि काकडीने ओटी भरतात.

चान्द्रसेनीय कायस्थ प्रभू समाजात दुर्वा वा तेरड्याच्या झाडांच्या गौरी असतात. परसातली तेरड्याची झाडे काढून ती सुपात ठेवतात. त्यावर खण वा रेशमी सोवळे पांघरतात. पुढील दाराने गौरी म्हणून घरात आणतात. प्रवेश दारात पाट मांडून त्यावर गौरीचे सूप ठेवतात. तिथे तिची पूजा होते. नथ, एकसरी, बांगड्या वगैरे दागिने त्यावर ठेवतात. घरातील प्रमुख स्त्री गौरीचे सूप हातात घेऊन घराच्या प्रत्येक खोलीत जाते. तिला एक जण विचारते.

'गौर कुठे आली ?'

त्या खोलीचे वर्णन करून 'गौर अमक्या खोलीत आली' असे उत्तर स्त्री देते. गौर ओसरीत मांडतात. रात्री तिला दूधभात, माठाच्या भाजीचा नैवेद्य असतो. दुसरे दिवशी मोठी पूजा असते. सुपात नारळ, सुपारी, हळकुंड आदी ठेवून सूप गौरीला वाहतात. या दिवशी गौरीला घावन घाटल्याचा नैवेद्य असतो. सीकेपी लोकांकडे मटनवडे करतात. गौरींच्या सणाला माहेरवाशीण घरी येते. तिला देवीला वाहिलेले सूप खणासकट देतात. गौरी घरी येतात त्या रात्री तेरड्याची झाडे मोडून त्यांची देवी तयार करून तिला साडी, दागिन्यांनी सजवतात. कागदाचा मुखवटा करून वर बसवतात. नवमीला सायंकाळी गौर नदीला नेऊन सोडतात. महाराष्ट्र मराठवाड्यात लक्ष्म्यांना मुलीस माहेरी आणत नाहीत.

**कोकणांतील गौराई –**

कोकणवासीयांचा लाडका सण म्हणजे गौरीगणपतीचा. मुंबईत आलेले कोकणवासी गौरीगणपतीला कोकणात जाणारच. कोकणाचा शेतकरी कवळकाळी, पालापाचोळा वगैरे जाळून राब करतो. गुडघाभर चिखलात नांगरणी करून भात नागलीची लावणी व पेरणी करतो. श्रावणापर्यंत ही कामे संपतात आणि गौरी गणपतीची तयारी सुरू होते. गणपती आल्यापासून रोज रात्री गाणी, नृत्य, फुगड्या, लेझीम यांची सामूहिक धमाल असते. कोकणातील अनेक घरी खड्यांच्या गौरी असतात. गौरीच्या जेवणाला 'गौरी हसवणे' असे म्हणतात. गौरीची विपुल गाणी खेड्या खेड्यांतून वस्तीवस्तीतून मुली, स्त्रिया गातात. झिम्मा, फुगड्या, उखाणे यांना ऊत येतो. माहेर दुबळे असले तरी स्त्रीला तिथली ममतेची, मायेची श्रीमंती अधिक प्रिय असते. गौरीचे माहेरही दुबळे आहे. ती शंकराला विनवते.

चिव्याच्या हंसा देतो माझा बंधु
जाईन मी दुबळ्या माहेरा
श्रावण संपला भादवा आला
शिवशंकरा जाऊ द्या मला माहेरा

शंकर म्हणतो -

सोन्याचा नारळ देतो
नको तू जाऊ दुबळ्या माहेरा
नारळीचा नारळ देतो माझा बंधु
जाईन मी दुबळ्या माहेरा

सोन्याच्या नारळापेक्षा नारळीच्या झाडाचा, ममतेचा पाण्याने भरलेला, आपुलकीच्या गोड गराने रुचकर असा नारळ अधिक अस्सल असतो ना ?

**स्त्रियांना पर्यावरणाची जाण मुळात असते -**

गौरी वा लक्ष्म्यांच्या गाण्यांतून स्त्रियांच्यात निसर्गाबद्दल विशेष करून पर्यावरणाबद्दल असलेली स्वयंभू जाणीव व्यक्त होते. जीव जन्माला घालताना सोसाव्या लागणाऱ्या वेदना आणि तो जीव बीजापासून परिपक्व होऊन पूर्णावस्थेत येण्यासाठी लागणारा काळ, त्यासाठी त्याचे स्वतःचे रक्त,श्वास, अन्न यातून करावे लागणारे पोषण या गोष्टींचा तिला प्रत्यक्ष अनुभव असतो. म्हणूनच ती सोन्याच्या नारळावर वा पोफळीवर भाळत नाही. शेताच्या बांधाने फिरताना तिला पिकांची जिवंत सळसळ जमिनीशी बांधून ठेवते. जणु तिचे या विश्वाशी अतूट आणि जिवंत नाते असते. ते गाण्यांतून जाणवते.

आज गौरी जाशील ती कधी गौरी येशील ?
पाऊस पडे, गंगा भरे येईन मी भादव्यात ....
पडवळीच्या फुलावरनं येईन मी तळपत
पाच पडवळं काढा माझ्या हौशाकरवी ....

## वऱ्हाडातल्या महालक्ष्म्यांचे वेगळेपण –

वऱ्हाडातही महालक्ष्म्या बसवणे हा वाक्प्रचार आहे. महालक्ष्म्यांच्या डोक्यावर १६ पदरी पोवती आणि मुलांसाठी ८ पदरी पोवती हळदीमध्ये भिजवून ठेवतात. दुसऱ्या दिवशी महालक्ष्म्या सुतवतात. सुतवणे म्हणजे एकत्र बांधणे. महालक्ष्म्या आठआठ पदरांनी तर मुले चारचार पदरांनी सुतवतात. डाळीचे वडे, कचोरी, बोंडे असे तळणाचे सोळा प्रकार करतात. कथली म्हणजे पडवळ टाकून कढी करतात. आंबिल आणि पुरणपोळी हे मुख्य पदार्थ असतात.

वऱ्हाडात भाद्रपद, आश्विनात गौरीची पूजा विविध प्रकारांनी होते. इनाई, भराडी गौर, भुलाबाई हे कुमारिकांचे वा नवविवाहितांचे खेळोत्सव वऱ्हाडात उत्साहाने साजरे होतात. भुलाबाईशी सारखेपणा असलेला हादगा भोंडला पश्चिम महाराष्ट्रात खेळला जातो. तर खानदेशात भुलाबाई मांडली जाते. या चारही खेळोत्सवाचा विचार स्वतंत्रपणे मांडला आहे.

वऱ्हाडातही लक्ष्म्यांची तयारी साग्रसंगीत होते. कनिष्ठा पूर्वेकडील दारातून येते. ती विचारते मी आत येऊ ? दारातील सुवासिनी तिला 'यावे यावे' असे म्हणत घरात नेतात. जणु साक्षात् लक्ष्मी म्हणते मी येऊ का ? लक्ष्मीच्या रूपाने चैतन्यच विचारते की मी येऊ का ? जणु हा चैतन्याच्या स्वागताचा सोहळा असतो. दोन्ही महालक्ष्म्या माप ओलांडून त्यांच्या जागी विराजमान होतात. रात्री या दोन्ही जगन्मातांना सुतवतात. प्रा. वामन चोरघडे यासंदर्भात नोंदवितात की पूर्वी हाताने काढलेल्या सुताने सुतवणे होई.

स्त्रिया महालक्ष्मीसाठी सूतबिंडा करून ठेवत. कापूस पिंजून सुरेख सूत काढण्याची, त्याच्या तऱ्हेतऱ्हेने वाती करण्याची कला त्यांच्याजवळ होती. वऱ्हाडातही १६ भाज्या, १६ पक्वान्ने जेवणात नैवेद्य म्हणून करतात. पूजेसाठी १६ प्रकारची पत्री लागतात.

## गौरी वा महालक्ष्म्यांच्या सणात सोळा या आकड्याचे महत्त्व –

या सणात १६ आकड्याला विशेष महत्त्व आहे.ज्यांच्याकडे हा सण साजरा होतो त्यांना या संदर्भात विचारले असता वडिलोपर्जित चालत आलेली परंपरा हे

उत्तर मिळते. भारतीय संस्कृति कोशातील या शब्दाला आधार देणारे विवेचन असे ज्यांची व्रतपूर्वक पूजा केली जाते. त्या चन्द्राच्या सोळा कळा या प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. शंखिनी | २. पद्मिनी | ३. लक्ष्मी | ४. कामिनी |
| ५.व्यपिनी | ६. ऐश्वर्यवर्धिनी | ७. मोंदा | ८. आश्चर्यदा |
| ९. आल्हादिनी | १०.व्यापिनी | ११. मोहिनी | १२. प्रभाप्रदा |
| १३. क्षीरवर्धिनी | १४.वेगवर्धिनी | १५.विकासिनी | १६. सौमिनी |

आपण लक्ष्मी पार्वतीला बोलावतो त्या आपल्या परिवारासह येतात म्हणून १६ चा महिमा असावा. २७ नक्षत्रांपैकी १६ नक्षत्रे संपूर्ण १७ वे नक्षत्र अनुराधा. या मोसमात पिके घराला येतात. शेतातील धान्यलक्ष्मी घरी येऊ लागते. भाज्या फळभाज्यांची रेलचेल असते. जणु १६ नक्षत्रांचे फलित म्हणजे धान्यलक्ष्मी. म्हणून 'सोळा' या आकड्याला महत्त्व.

१६ पक्वान्ने, १६ भाज्या, १६ पत्री या कुलाचारासाठी असतात. मात्र महत्त्वाचे पदार्थ वऱ्हाडात आंबिल व कथली असतात. प्रा. वामनराव चोरघडे म्हणतात. हा सण बहुजन समाजाचा असल्यामुळे आंबिल आणि कथलीशिवाय नैवेद्य पूर्ण होत नाही. आंबिल ज्वारीचे पीठ शिजवून करतात तर कथली म्हणजे पडवळ घालून केलेली कढी. जे सहज उपलब्ध होते ते मनोभावे रांधून घातले तर ही महालक्ष्मी गरिबाला पावते. मनोमन तृप्त होते.

तिसऱ्या दिवशी रात्री उत्तरपूजा करून दहीभाताचा आणि लक्ष्म्यांनी मुरडून यावे म्हणून कानोल्याचा नैवेद्य पुढे ठेवायचा. आता घर सुने होणार म्हणून भरल्या डोळ्यांनी लक्ष्म्यांच्या डोक्यावर अक्षत टाकून 'पुनरागमनायच' असे म्हणत मुखवटे उतरवायचे.

### खानदेशातली कानबाई –

वऱ्हाड कोकण, मराठवाडा, पुणे, कोल्हापूर या भागात गौरी महालक्ष्मीचा थाट तसा खानदेशात कानबाईचा डौल असतो. कानबाई श्रावणातच दीड दिवसाच्या माहेरपणाला येते. ती महादेवी पार्वतीचे रूप मानले जाते. श्रावण महिन्यात नागपंचमीनंतरच्या रविवारी [१४]कानबाईची स्थापना करतात. कानबाईचेही धातूचे

वा लाकडी मुखवटे असतात. धुळ्याचे जुने जाणते अभ्यासक श्री. भा. रं, कुळकर्णीच्या मते कानबाई म्हणजे वेदात उल्लेख असलेली रण्णासण्णा देवता असावी. कानबाईची गाणी म्हणणारे शाहीर वा भाट असतात. कानबाईची गाणी हिंदोळ्यावर बसून स्त्रिया गातात. कानबाई ही साक्षात लक्ष्मी आहे मानले जाते. या काळात सुनेला घरी आणतात. कानबाईचे रोट शेतातील हिरव्या पोकळ्याची हिरवी पालेभाजी व इतर पालेभाज्या आणून त्याचा तेल तूप न घालता करतात. हे रोट कानबाईची स्थापना करण्यापूर्वी करतात. हा रोट सव्वापाव सव्वा किलो अशा मापाने असतो. असा हा रोट दुपार पर्यन्त घरातील सर्वांनी संपवायचा असतो. हा कोरडा रोट व भाजी संपल्यावर कानबाईची स्थापना होते. नंतर पुरणाचे रोट करतात. पुरणपोळ्या करून दोन मोठे दिवे एक कानबाईसाठी व एक घरातील सर्वांना प्रसादासाठी करतात. घरातील सर्व स्वयंपाक सायंकाळी कानबाईसमोर ठेवतात. नैवेद्य दाखवून घरातील सर्व मंडळी एकाच वेळी जेवायला बसतात. पाहुण्यांसाठी वेगळा स्वयंपाक करावा लागतो. पुरणाचा रोट फक्त घरच्यांनीच खायचा असतो. कानबाई समोरचा दिवा वाढवू नये म्हणून सतत काळजी घेतली जाते. कानबाईचा हा सण देशावरील महालक्ष्म्या व कोकण कोल्हापुराकडील गौरींसारखा आहे. कानबाई ही लक्ष्मीचे रूप असते.

**दिवा सुफलीकरणाचे प्रतीक –**

महालक्ष्मी, कानबाई, गौरी, नवरात्र या कुलाचारात सतत तेवत्या दिव्याला अपार महत्त्व असते. दिवा हे सुफलीकरणाचे प्रतीक मानले जाते. घरातील प्रमुख स्त्री हा दिवा सतत तेवत राहावा यासाठी सतत जागरूक असते. दिवा जणु साक्षात चैतन्य आणि जमिनीतील उर्वराशक्ती उत्तम पिकांच्या रूपाने तिच्यातील चैतन्याची साक्ष देत असते. कानबाईची प्रतिष्ठा रविवारी होते. या देवीचे साम्य वेदकालीन रण्णासण्णाशी जाणवते. आदितवारी पौष महिन्यात आदित्यराणूबाईची पूजा केली जाते. त्यावरून या व्रताचा संबंध सूर्याशी असावा असे मानले जाते.

श्रावण भाद्रपदातील देवीव्रते धान्यसमृद्धीसाठी असतात. त्यात स्त्रीच्या मातृत्वाची, सुफलनशक्तीची उपासना असते. अपत्यसंभव, अपत्याचे पोषण, पर्यायाने मानवाच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाची सुरक्षितता

देण्याची हमी मातृत्वात असल्याने, जगातील सर्व प्राचीन संस्कृतीतील आद्य देवता या स्त्री देवता आहेत. भूमी अन्नधान्याची निर्मिती करून, वनस्पतींची निर्मिती करून सृष्टीतील मानव समूहाच्या शारीरिक, मानसिक बौद्धिक विकासाची आणि सुरक्षिततेची हमी देते. भूमीचे रूप स्त्री देवतांत आद्य मानवाने पाहिले.

**स्त्रीची विविध रूपे : महालक्ष्मीत.... देवीरूपात –**

अशी श्रद्धा आहे की महालक्ष्मीचे रूप सकाळी कुमारिकेचे दुपारी सुवासिनीचे तर सायंकाळी प्रौढेचे होते. कर्नाटकातील [१५]यल्लम्मा चैत्री पौर्णिमेला सुवासिनी होते, तर मार्गशीर्ष अमावास्येला विधवा होते.

चैत्रात वसंतऋतूची चाहूल लागते. फुलांना बहार येतो. झाडांना कोवळी पाने फुटू लागतात. चैत्र पाडव्याला शेतीत काम करणाऱ्या सालदारांचे वर्ष सुरू होते. वैशाख ज्येष्ठात जमीन भाजली जाते. या भाजण्यातून तिची उर्वराशक्ती वाढते. पेरणीसाठी जमिनीची मशागत याच काळात शेतकरी करतो. मृगाचा, वळिवाचा पाऊस पडला की पेरणी करतो. भाद्रपद, आश्विनात पीक परिपक्व होते. कार्तिक मार्गशीर्षात ते हाती येते. मार्गशीर्षात पानगळ सुरू होते. थंडीने जणु अवघी सृष्टी काकडून जाते. तीन महिन्यांचा काळ पौष, माघ व फाल्गुन हा काळ सृष्टीच्या भूमीच्या दृष्टीने वैधव्याचा, भाग्यहीनतेचा वाटला असेल का ?

आपले सण, व्रते, उत्सव, दैवत कल्पना भूमीशी किती जोडलेली आहेत याची जाणीव तसेच आपल्या सांस्कृतिक वैभवाची संपन्नता या व्रतांमागील भूमिकेतून आपल्या लक्षात येते.

**सृष्टीजीवनाची सुफल संपूर्णता : शिवशक्तीच्या स्वंतत्र अस्तित्वात आणि एकरूपतेत –**

स्त्रीतील सर्जन सामर्थ्याचे गूढ तिच्या योनीत आहे हे जाणल्यावर योनिपूजा रुढ झाली. पुरुषलिंगातील सर्जन सामर्थ्याचे ज्ञान झाल्यावर लिंगपूजा श्रद्धेय झाली. जगभरच्या अति प्राचीन संस्कृतीत लिंगयोनिपूजा रुढ होती. मोहंजोदारोच्या उत्खनात सापडलेल्या योनी मूर्ती सुफलीकरणाच्या देवता होत्या. भारतात आर्य येण्यापूर्वी एतद्देशीय आर्येत्तर समाज सुफलीकरणाच्या देवता म्हणून

योनी व लिंगपूजक होता. त्यांना आर्य हेटाळणीने शिश्नपूजक असे म्हणत. आर्य आणि आर्येतरांच्या संघर्षातून, देवाणघेवाणीच्या प्रक्रियेतून आर्यांचा रूद्र आणि आर्येतरांचा शिश्नदेव यांच्या संकरातून शिवशंकर अस्तित्वात आला. महादेवी, भूदेवी, लक्ष्मी या देवता योनिपूजेच्या उन्नयनातून अस्तित्वात आल्या. शंकराची सहचारिणी गौरी. ती महादेवी भूदेवीचे रूप. महालक्ष्मीच्या सणाच्या निमित्ताने गायिल्या जाणाऱ्या गाण्यांत ओव्यांत तिचा सहचर म्हणून शंकराचा उल्लेख आहे. कारण ही महालक्ष्मी म्हणजे गणपतीची आई, महादेवी गौरी ऊर्फ पार्वती आहे. मात्र या शंकराच्या सहचारिणीचे अस्तित्व सहचराइतकेच स्वतंत्र आणि स्वयंभू आहे. शिवलिंग आणि योनी विश्वसर्जनाचे महालय[१६] आहे. शिवात शक्ती आहे तर शक्तीत शिव समाविष्ट आहे. सृष्टीजीवनाची सुफल संपूर्णता त्यांच्या एकरूपत्वात आहे आणि याचा प्रत्यय धरणीच्या सुफलीकरणाशी निगडित व्रतसण, उत्सवांतून पदोपदी जाणवतो.

एषा भगवती देवी सर्वेषां कारणं हि नः
महाविद्या महामाया पूर्ण प्रकृतिर्व्ययया !!

असे पोथीपुराणांतून म्हटले आहे ते तिच्या स्वतंत्र अस्तित्वाचा प्रत्यय येतो म्हणून.

**कुलस्वामिनींच्या मंदिरांचे वेगळेपण –**

कुलस्वामिनींची मूळ ठाणी वा मंदिरे वा शक्तिपीठे यांच्या बाह्य स्वरूपात आजवर बरेच बदल झाले तरी एक अत्यन्त महत्त्वाची गोष्ट कायम आहे. लोकसाहित्य आणि लोकपरंपरांच्या चिकित्सक अभ्यासक डॉ. तारा भवाळकर 'लोकसंचित' मध्ये नोंदवतात. सर्व आदिशक्तिपीठे ही फक्त स्त्रीदेवतांतीच मंदिरे आहेत. कोणताही पुरुषदेव वा सहचर त्यांच्या शेजारी नाही. पुरुष देव असला तर तो काही अंतरावर दूर स्वतंत्रपणे उभा आहे. स्त्रीदेवता स्वंतत्र आहे आणि तरीही ती माता आहे. आई आहे आणि पुरुषदेवनिरपेक्ष असलेले तिचे हे मातृरूप पूजनीय आहे. यातला गूढार्थ अत्यन्त क्रान्तिकारक असा आहे.

मानवाने स्त्रीरूप आणि भूमिरूप परस्पर रूपात पाहिले. स्त्रीरूपाच्या विविध अवस्था कुमारिकेपासून वृद्धेपर्यंत त्याला लक्ष्मीरूपीच वाटल्या.

मनुष्य हा मूलतः प्राणीच. 'आहार निद्रा भय मैथुनंच' या मूलभूत प्रेरणा त्यालाही

असतातच. संस्कृतीच्या विकासात या मूलभूत प्रेरणांचे शमन करीत उदात्तीकरण करण्याची प्रक्रिया सुरू झाली. निसर्गातील अनाकलनीय घटनांबद्दलचे भय आणि म्हणून त्यापासून सुरक्षितता. या दोन भावनांच्या ताण प्रतिताणांतून देवकल्पनांचा उदय झाला. स्त्रीत निर्मिती करण्याची यातुशक्ती असते, या कल्पनेतून मानवाला स्त्रीबद्दल भय वाटले. पण त्याच वेळी स्तन्य पाजणारी, बालकांची काळजी घेणारी, त्याच्यावर कोसळणाऱ्या अशुभाचा संहार करण्यासाठी जागरुक असलेली स्त्री सुरक्षितता देणारी आहे याचा प्रत्यय आला. त्यातूनच तिची विविध रूपे पूजनीय ठरली. अन्न,वस्त्र, निवारा यांसाठी सुरुवातीला निकराचा संघर्ष करावा लागे. तेव्हा स्त्रीपुरुष दोघेही समान स्थितीत होते. विविध साधनांच्या शोधांमुळे हा संघर्ष कमी होऊन त्याबाबतची शाश्वती वाढली. ज्ञानाच्या जाणीवेच्या कक्षा रुंदावत असताना. निर्मितीत असलेल्या पुरुष सहयोगाची कल्पना त्याला आली. निर्मिती आणि नंतरची अपत्याची काळजी यात गुंतलेल्या स्त्रीला नव्या साधनांची कळ हस्तगत करणे शक्य झाले नाही. एकीकडे अन्न,वस्त्र, निवाऱ्यासाठी मनुष्यबळ निर्माण करणारी तीच होती. त्याची गरज होतीच. यांतून स्त्रीवर स्वामित्व असेल तरच आपण सुरक्षित राहू याची जाण पुरुषाला आली आणि प्रारंभी स्त्रीच्या पूजनीय असलेल्या निखळ मातृत्वाविषयीची धारणा बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली. स्त्रीचे पुरुषनिरपेक्ष मातृत्व त्याला जाचक वाटू लागले. स्वामित्वाची संकल्पना त्यातून आली. अपत्यावर त्याच्या जन्माला कारणीभूत असलेल्या पुरुषाच्या, पित्याच्या नावाचे शिक्कामोर्तब होऊ लागले. ती स्त्री कुणाच्या स्वामित्वाखाली आहे त्याला महत्त्व आले. म्हणजेच पितृप्रधान वा पुरुषप्रधान व्यवस्था आली. देवता मंडलात पुरुषदेवांचा शिरकाव होऊन त्यांचे महत्त्व वाढले. तरीही मातृदेवांचे महत्त्व मात्र कमी झाले नाही.

समाजातील स्त्रीभोवती पावित्र्य-अपावित्र्य, सातित्व-पातिव्रत्य या कल्पनांचे जाळे वेढले गेले. ती पुरुषाश्रयी आणि अपत्य निर्मितीचे व मैथुनसुख घेण्याचे एक साधन बनली.

असे असले तरी बुद्धीचा विकास करणारी सरस्वती, दुष्ट व अशुभाचा संहार करणारी दुर्गा, समृद्धी देणारी लक्ष्मी, निर्मिती व पोषण करणारी धरणी, यांच्याबद्दलची श्रद्धा मानवी मनात मूळ धरून राहिली. ती या व्रतांतून जाणवते.

**ज्येष्ठेच्या घरी कनिष्ठा का आली ? –**

लक्ष्म्या वा गौरीच्या कुलाचाराचा, सणाचा शोध घेताना ज्येष्ठा[१७] आणि कनिष्ठा यांचा मूळ रूपबंध पाहणे महत्त्वाचे ठरते. अमृत प्राप्तीसाठी देवासुरांनी समुद्रमंथन केले. तेव्हा समुद्रातून लक्ष्मीच्या जन्माआधी अलक्ष्मीचा जन्म झाला. समुद्रातून प्रगट होताच तिने ' किं कर्तव्यं मया?' असा प्रश्न केला त्यावर देवांनी तिला तिच्या दृष्टीने योग्य अशा अशुभ, अनिष्ट, दुःखमय अशा ठिकाणी संचार करण्यास सांगितले. हे सांगत असताना तिचा उल्लेख ज्येष्ठा, पापदारिद्य दायिनी, कलुषदायिनी शुभा असा केला. ती लक्ष्मीपूर्वी जन्मली म्हणून ज्येष्ठा. शुभा हे तिचे शोभन नाव. शुभा याचा अर्थ शेण असाही आहे.

अलक्ष्मीनंतर लक्ष्मी बाहेर आली. तिच्यावर विष्णु भाळले. त्यांनी विवाहाचा प्रस्ताव मांडला. परंतु ज्येष्ठे आधी कनिष्ठेचा विवाह सन्मान्य नव्हता. म्हणून लक्ष्मीच्या आग्रहाखातर विष्णूने अलक्ष्मीचा विवाह उद्दालक मुनींशी लावला. परंतु आश्रमातील सात्विक वातावरणात तिची घुसमट होऊ लागली. तिला ते वातावरण सोसेना. तिने उद्दालकाला आपल्या आवडी निवडी सांगितल्या. त्या ऐकून उद्दालकमुनी अस्वस्थ झाला. त्याने तिला एका अश्वत्थवृक्षाखाली बसविले आणि तुझ्या योग्य जागा शोधून तुला घेऊन जातो. असे सांगून गेला तो पुन्हा आलाच नाही. पिंपळाखाली बसलेली ज्येष्ठा पतीची वाट पाहून थकली व आक्रोश करू लागली. तिचा आक्रोश ऐकून लक्ष्मी व विष्णू भेटण्यास आले. विष्णूने तिला सांगितले की तू याच झाडाखाली स्थिर हो. प्रती शनिवारी लक्ष्मी तुला भेटण्यास येईल त्या दिवशी हा वृक्ष पूज्य मानला जाईल. जे गृहस्थ तुझी नित्य पूजा करतील त्यांचे ठायी तुझी बहीण लक्ष्मी स्थिर होईल. अशीच कथा लिंग पुराणातही आहे. त्यात पतीचे नाव मात्र दुःसह आहे.

**आद्यपूजेचा मान ज्येष्ठेला का ? –**

'दुर्जनं प्रथमं वन्दे' ही मानवी प्रवृत्ती आहे. त्यातूनच विघ्नदेवतांची पूजा प्रथम करून त्यांना संतुष्ट करून त्यांनी आपल्यावर वक्रदृष्टी होऊ नये याची काळजी घेण्याची परंपरा निर्माण झाली. ज्येष्ठेचे रूप अलक्ष्मीला तिच्या विघ्नस्वरूपात

लाभले आहे. बौधायनगृह्य सूक्तातील तिचे रूप 'कुंभिनी हस्तिमुखा विघ्नपार्षदा' असे आहे. हे रूप गणेशाशी जुळणारे आहे. दैवत शास्त्राचे मान्यवर अभ्यासक श्री. रा. चिं. ढेरे लिहितात श्रीसूक्तानुसार लक्ष्मी हस्तिनादप्रबोधिनी असून गजलक्ष्मीच्या रूपात आहे. गज हे पुरुषत्वाचे प्रतीक आहे. कनिष्ठ लक्ष्मीचा सहचर म्हणून गज समृद्धीकारक ठरला. तर ज्येष्ठा अलक्ष्मी आणि कनिष्ठा लक्ष्मी एकाच देवी संकल्पनेची द्वंद्वात्मक रूपे आहेत. यातून दैवत कल्पनांचा विकासक्रम जाणवतो. तसेच परस्परसंबंधीची कूटे उलगडण्यास मदत होते.

**ज्येष्ठेच्या घरी कनिष्ठा दोन दिवसांची पाहुणी –**

लक्ष्म म्हणजे शुभ. शुभगुणांनी युक्त ती लक्ष्मी.

ज्येष्ठेच्या कथाबंधानुसार 'भर्तृत्यागेन दुःखिता' अशा अलक्ष्मीकडे, ज्येष्ठेकडे कनिष्ठा लक्ष्मी येते. लक्ष्म्या घरी आणताना 'ज्येष्ठेच्या घरी कनिष्ठा आली' 'सोन्याच्या पावलांनी आली' असा मंत्र म्हटला जातो. पाहुणी आलेली माहेरवाशीण लक्ष्मी दोन दिवसांची पाहुणी असते. मोठ्या बहिणीकडे आलेली धाकटी बहीण माहेरवाशीण असते. लक्ष्मी दोन दिवस येते. घराघरात शेताभातात हिंडून समृद्धी देऊन स्वतःच्या घरी निघून जाते.

**लक्ष्मी या कल्पनाबंधाकडे समाजाची पाहण्याची दृष्टी –**

लक्ष्मी या कल्पनाबंधाकडे सामाजिकदृष्ट्या... आर्थिकदृष्ट्या शेवटच्या स्तरातला समाज 'संहारक देवता' म्हणून पाहतो. तिचा कोप होऊन घरात, शेताभातात अनिष्ट होऊ नये या भूमिकेतून पूजा होते.

मध्यमवर्गीय समाज तिच्याकडे शुद्धीची देवता म्हणून पाहतो. केरसुणीला लक्ष्मी मानले जाते. विवाह पूजा यांत सूप महत्त्वाचे असते. सूप समृद्धीचे प्रतीक . ते कचरा आणि धान्य यांना वेगळे करते. दृष्ट आणि अनिष्ट यांना वेगळे करून इष्टाकडे नेते ती लक्ष्मी. शुभा म्हणजे शेणाची गोवरी. घर गाईचे शेणाने घर सारवतात. शुद्ध करतात. गोवरीच्या धुराने घर शुद्ध होते. किडामुंगी नष्ट होतात. आर्थिकदृष्ट्या वरचा थर तिला समृद्धीची देवता मानतो. या तीनही रूपांत लक्ष्मी सर्वत्र पूजनीय असते.

**भादव्यातील समृद्धी –**

आषाढात पेरलेली पिके भाद्रपदात दाण्यात भरू लागतात. उडीद मूग, मका, भात या पिकांचा बहार शिगेला पोहोचलेला असतो. चैत्रापासून ते आषाढापर्यंत शेतकरी शेतीच्या मशागतीत, पेरणीत गुंतलेला असतो. कामात आकंठ बुडालेल्या शेतकऱ्याला श्रावणात क्षणाचा विसावा मिळतो. तरीही त्याचे मन शेतात गुंतलेले असते जणु भूमी त्याच्याशी बोलते. पुढे काय पेरायचे याचा मन कौल घेत असते. आषाढात पेरलेल्या धान्याला बरकत यावी आणि भाद्रपद अखेर आणि आश्विनात पेरावयाच्या हरभरा, करडई, गहू , ज्वारी आदी बियाणांचा पेरा उत्तम व्हावा यासाठी भूमीची सुफलनशक्ती वाढावी अशी मंगलकामना या पूजेच्या पाठीशी असते. पिकांना कीड न लागता, काही अनिष्ट न घडता उत्तम पैदास व्हावी यासाठीच्या शुभेच्छा लक्ष्म्यांच्या मांडणीतून, नैवेद्यातून व्यक्त होतात. उदा. –

१. लक्ष्म्यांचे धड म्हणून धान्याच्या कोठ्या, घागरी, डबे यांचा वापर. त्यात फराळाचे पदार्थ भरण्याचा रिवाज.

२. लक्ष्म्यांसमोरच्या चौकात धान्याच्या राशी घालून त्या पूजतात.

३. लक्ष्म्यांच्या डोक्यावर भोपळा, पडवळ, केवडा, ठेवतात. भोपळा रुंदावणारा, पडवळ लाबंणारे, दोन्ही समृद्धीदर्शक. केवडा सुगंधी. धरेचा गुणधर्म सुगंध. 'गंधवती धरा' असे म्हटले जाते.

४. दोन वेगळे पदार्थ एकत्र आले तर वृद्धी होते ही संकल्पना प्राचीन समाजातही होती. आदल्या सायंकाळी मिसळीची भाकरी, दुसरे दिवशी खिचडी, सार हे पदार्थ नैवेद्यात असतात. या काळात भाज्या विपुल येतात. त्यातून भरपूर भाज्या करण्याची प्रथा.

५. ब्राह्मण समाजात अनेक घरांतून लक्ष्म्यांच्या जेवणाच्या दिवशी दोन सवाष्णी बोलावतात. त्यातील एक शेतकरी समाजातील असते. ही भूमीची पूजा असल्याने त्या निमित्ताने शेतात श्रमणाऱ्या स्त्रीचा लक्ष्मी म्हणून सन्मान केला जातो.

६. सायंकाळी येणारा पाहुणा मुक्कामाला येतो. लक्ष्मी सायंकाळी येते. पुढच्या दाराने येऊन घरात थेट गोठ्यापर्यंत फिरते.

आली आली लक्ष्मीबाई चालली गाईच्या गोठा
दिली भक्ताला हाक सोन्याचं तेच फाकं
माझी लक्ष्मीबाई....

ती जिथे जिथे फिरते तिथे तिची पावले रेखतात. पावलांचे रेखाटन सर्वसाधारणपणे असे असते.



या तीनही आकृतीत भरलेले मापटे, त्यातील धान्य, दिवा असे संकेत मिळतात.

७. लक्ष्म्यांच्या पोवत्यात गाठी मारताना ज्या वस्तू बांधतात त्यांत रेशीम, घोंगडीचा लोकर धागा, हरळी,आघाडा, धोतऱ्याचे फूल, झेंडूचे पान, लवंग, खोबर, आदींचा समावेश असतो. आघाडा, हरळी जमिनीत रुजल्या की वाढतच जातात. जमिनीचा कस वाढविणाऱ्या या वनस्पती. रेशीम आणि लोकर चिवट आणि लांबत जाणारे धागे. ८. लक्ष्म्यांचे निर्माल्य, उरलेले अन्न, पोवते शेतात नेऊन पुरतात. या जणु सुबत्तेच्या खुणा. त्या शेतात पुरून शेताची सुफलन शक्ती वाढवावी ही त्या मागची सद्भावना.

**जमीन आणि पाणी यांच्या एकरूपततेतून –**

पाणी असेल तरच जमिनीची उर्वराशक्ती सुफलित होणार. कोकणात, वऱ्हाड, खानदेशात गौर पाण्याजवळ नेऊन विसर्जित केली जाते. मराठवाड्यात मात्र मुखवटे सन्मानाने उतरवून तुळशीपर्यन्त नेतात. मराठवाडा तसा नेहमीच दुष्काळाच्या छायेखाली. त्यातही शेकडो वर्षे निझामशाहीच्या अमलाखाली असणारा भूभाग. त्यामुळे काही रीतीत फरक आहे. कोकण, वऱ्हाड, कोल्हापूर या प्रदेशातील स्त्रिया गौर मिरवीत पाण्यापर्यंत नेतात.

**ज्येष्ठाकल्पातील ज्येष्ठेचे रूप –**

विघ्न देवतांचे विश्व या टिपणांत रा.चिं. ढेरे नोंदवितात की मध्ययुगात सारा

दक्षिण भारत ज्येष्ठा या विघ्न देवतेच्या उपासनेने भारलेला होता. प्राचीन तामिळ निघंटूत तिच्यासाठी मुगडी, भूदेवी, केद्वाई अशी नावे आहेत. तिला 'खरारुढा' मानले असून तिचे आयुध 'मार्जना' म्हणजे केरसुणी हे असे निघंटू सांगतो.

ज्येष्ठाकल्पातील तिचे रूप पुराणकाळापेक्षाही प्राचीन आहे -

यस्यास्सिंहा रथे युक्ता व्याघ्राश्चाप्यनुगामिनः ।
तामिमां पुंडरीकाक्षी ज्येष्ठामावाह्याम्यहम ॥

तिची कुंभी, प्रकुंभी ही नावे विश्वाचा गर्भ उदरी वाहणाऱ्या महामातृत्वाचा संकेत देणारी आहे. म्हणून तिचे उदर लांब आहे. ती विघ्नपार्षदा कपिलमुनींची पत्नी आहे. तिला श्री, वरदा, सत्या असेही म्हटले आहे. ज्येष्ठेच्या या रूपाशी आणि कार्याशी विघ्नहर्त्या विनायकाचे साम्य आहे. गणेशचतुर्थीनंतर लगेच गौरी वा लक्ष्म्यांचा सण येतो. ज्येष्ठेचा सण येतो. यांतील अनुबंध महत्त्वाचा आहे. या अनुबंधावर श्रीमती स्टेला क्रामरिश यांनी 'भारतीय महादेवी' या बृहत् लेखात अलक्ष्मी निऋक्तीच्या वर्णनप्रसंगी सूचक टीप लिहिली आहे. ती पुढील प्रमाणे -

The dread name of Nirrti also carried by Jyeshtha, the inauspicious, pot-bellied goddess with an elephant face whose retinue are obstacles. In this respect she prefigures Ganesa the lord and remover of obstacles. How ever, the chariot of Jyeshtha, drawn by lions and follows by figers, is proper to the great goddess. (लोक दैवतांचे विश्व : रा. चिं. ढेरे पान ३१).

गणेश आणि ज्येष्ठा यांच्यातील साम्यावर श्रीमती क्रामरिश यांनी नेमके बोट ठेवले आहे.

**प्राचीन भारतातील लोकजीवनाचे वैशिष्ट्य मातृसत्ता -**

वैदिक आर्य भारतात स्थिर होण्यापूर्वी भारतात मातृसत्ताक समाज होता. विशिष्ट सामाजिक आर्थिक स्थितीत वाढलेल्या गणसमाजांचा मातृसत्ता हा विशेष होता. स्त्रियांचे उत्पादन व्यवस्थेत अर्थपूर्ण योगदान होते.

हळूहळू गणराज्यांचा लोप होऊन राजाला प्रमुख प्रशासक मानणारी शासन व्यवस्था अस्तित्वात आली. महाभारतकाळात ही शासन व्यवस्था स्थिर होत गेली. काही गणसमाज अस्तित्वात होते. महाभारतातील एक प्रसंग असा -

युधिष्ठिराने केलेल्या यज्ञात सहभागी होण्याचे जरद्‌गवा या महिलेने नाकारले. तेथे जाण्यासाठी युवाश्व राजाने बळजबरी केली. फुलावर आलेली शेते आणि विक्रीसाठी तयार असलेले लोणी वाऱ्यावर सोडून जाणे तिला मान्य नव्हते. यावर डॉ. गणेश शिटे लिहितात, शेतातील भराला आलेल्या गव्हाचा आणि साठलेल्या लोण्याचा नाश होऊ नये. अशी तिची स्वाभाविक इच्छा आहे. त्यावरून तिचे शेती व व्यापार यांकडे असलेले लक्ष जाणवते. मातृसत्ताक समाजात स्त्रीचे स्थान का श्रेष्ठ होते हे या उदाहरणावरून जाणवते.

**मातृसत्तेचा लोप -**

गण हा सामूहिक जीवन जगणारा समाज होता. गणातील लोक गणसभेत नियमितपणे एकत्र येत. विचारविनिमय करून एकत्रितपणे व्यवहार पार पाडीत. ही गणनीती जोवर अबाधित होती तोवर त्यांचा पराभव झाला नाही. कालौघात राजाला सार्वभौम मानणारी राजसत्ता विकसित होत गेली. उत्पादन साधनांचा विकास होत गेला. त्यातूनच मातृसत्ताक समाज व्यवस्था, जी प्राचीन गणजीवी समाजाचा एक विशेष होती, ती लोप पावली. असे असले तरीही पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीदेवतांचे माहात्म्य टिकून राहिले. त्यांचे चिवटपणे टिकून राहण्याचे महत्त्वाचे कारण हेच असावे की बहुसंख्य भारतीय समाज कृषिजीवी होता. कृषिसमृद्धी, जमिनीचे सुफलीकरण आणि भूमीरूप स्त्री देवता यांच्यातील अतूट एकतेच्या कल्पनेचा आदिबंध समाजमनातून नाहीसा होऊ शकला नाही त्याचा प्रत्यय या सणांतून येतो.

आर्य येण्यापूर्वी भारतात मातृसत्ताक समाज व्यवस्था होती हे अनुमान सिंधू संस्कृतीच्या उत्खननातून सिद्ध झाले आहे. या व्यवस्थेतच स्त्री देवतांचा संप्रदाय निर्माण झाला असावा. सिंधूच्या खोऱ्यापासून ते नाईल नदीच्या खोऱ्यापर्यंत स्त्रीदेवतांचे अवशेष सापडतात. मध्य आशियातील देवी संप्रदाय आणि भारतातील शक्तीसंप्रदाय यात साम्य आहे. हे दोन्ही संप्रदाय एकाच आर्थिक व सामाजिक

परिस्थितीत उदयाला आले असावेत असे मत 'लोकायत' या ग्रंथात लोकायत दर्शनाचे थोर अभ्यासक डॉ. स. रा. गाडगीळ नोंदवितात.

आपल्याकडील श्रावण भाद्रपदात आचरावयाच्या व्रतांचे सूक्ष्म अवलोकन केल्यास स्त्रीमाहात्म्य आणि कृषिसमृद्धी यांचा अन्योन्य संबंध लक्षात येतो. गणेशचतुर्थी व्रतात गणेश या पुरुष देवतेला स्थान असले तरी खरे महत्त्व गौरींना असते. कुलाचार लक्ष्म्यांचा निमित्ताने साजरा होतो. कोकणांत दीड दिवसांचा गणपती असतो. गणपतीला निरोप देतात आणि गौर आणतात. गौरीची काही गीते अशी...

गणोबा आला आला
गवर का ग नाही?
साखळ्या लेती लेती
पाठीमागून येती
गवर आली शेतापाशी गवर ऽऽ

शेतवाला विचारतो

''का ग गौराई एकली
का ग हुईन एकली
मी का हुईन एकली
पुढं हाय गणेश बाळ मागं शंकर भ्रतार''

कोकण-कोल्हापूरकडे गौरी गणपतीला जायचे असा वाक्प्रचार आहे. तर मराठवाड्यातही लक्ष्म्यांसाठी घरी जायचे असे म्हणतात. अवघे घर एकत्र जमते. या स्त्रीप्रधान व्रताचे वैशिष्ट्य श्री. गुप्ते[१८] यांनी नमूद केले आहे ते असे -

In regard to chief Goddess Gauri, the Goddes of harvest, one great peculiarity remains to be mentioned. She supposed to have been followed by her husband shiva, secretly, who remains hidden under the outer fold of her sari and is represented by Lota (Pot) covered by coconut and filed with rice.

या स्त्रीप्रधान व्रतात गणेश आणि शिव अनुपस्थित असतात. या व्रतातून वनस्पतीसृष्टीची समृद्धी अभिप्रेत आहे. लक्ष्मी वा गौरीच्या मांडणीतून त्या निमित्ताने केल्या जाणाऱ्या पदार्थातून हे जाणवते. कोल्हापूर, कोकण भागात गौरच तेरड्याची, गौरीफुलांच्या झाडांची असते. हे वनस्पतींबद्दलचे प्रेम गौरी वा लक्ष्मीच्या गाण्यांतून सतत प्रगटते.

लक्ष्मी आई आली शेता नि शिवारात
लाडक्या बाळा माझ्या पाणी तुज्या घागरीत

शेत आणि पाणी यांतूनच लक्ष्मी.... समृद्धी फुलणार

लक्ष्मी आई आली शेताच्या बांधासाठी
सावळा बाळराजा हाती गोफण पाया पडी

बांधासडीला उभी राहून भराला आलेल्या शेताकडे कौतुक भरल्या डोळ्यांनी पाहणारी लक्ष्मी आणि पिकांच रक्षण करण्यासाठी गोफण हाती घेऊन पाया पडणारा बाळराजा, यातून स्त्रीमनाच्या प्रतिमासृष्टीचे वैशिष्ट्य लक्षात येते.

माज्या हे गऽ शेतात
हाल्या बैलाचं आऊत
माझ्या हे गऽ घरी
लक्ष्मी येती धावत

बैलांच औत ज्याच्या शेतात त्याच्या घरी लक्ष्मी धावतच जाणार ना ?

पाऊस पडला चिखल झाला
व्हात आली गंगा
गौराय पावनीला जेवायला
भाजी भाकरी सांगा .

शेतातील भाकरी आणि भाजी हाच खरा लक्ष्मीचा नैवेद्य. तिचे स्वागत मराठवाडा, कोकण, वऱ्हाड, पश्चिम महाराष्ट्रात भाजी भाकरीनेच होते.

शेताची सुफलशक्ती वाढवणाऱ्या या गौरीला निरोप देतांना शेतकरी म्हणतो –

आज गौरी जाशील ती परत कधी येशील ?
पाऊस पडे गंगा भरे येईन मी भादव्यात
नारळीच्या फुलावरनं येईन थाटात

स्त्री आणि प्राथमिक अवस्थेतील कृषिकर्म यांतील नैसर्गिक नाते, भूमीच्या सर्जनशीलतेचा सन्मान, लक्ष्म्या, गौरी यांसारख्या व्रतातून आपले आदिम आणि मनोहारी अस्तित्व दाखवते.

**नवरात्र :**

आश्विनातले नवरात्र मराठवाड्यात सर्व जातिजमातीतून साजरे होते. हा उत्सव मूलतः जमिनीच्या सुफलीकरणाशी संबंधित आहे. शेतातील माती, गोठा, तबेला, वारूळ, चौरस्ता या ठिकाणांची माती एकत्र मिसळतात. ती पत्रावळीवर गोलाकार पसरतात. त्यात सात वा नऊ प्रकारचे धान्य मिसळतात. ज्यांचे घरी शेत नाही अशांना नवरात्रात पत्रावळीवरील मातीत मिसळण्यासाठी मिसळाचे धान्य बीज म्हणून देणे शुभ मानले जाते. पूर्वी देशमुख, पाटील यांच्या घरातील प्रमुख स्त्री नवरात्रापूर्वी मिसळीचे बीजकरण एकत्र करून ठेवी. मधोमध मृत्तिकेचा कलश मांडतात. त्यात सप्तसरितांचे पाणी ठेवतात. विविध विहिरींचे पाणी ठेवतात. त्या मातीवर पाणी शिंपडतात. या कलशात विड्याची पाने आणि नारळ ठेवतात. माती व पाणी विविध ठिकाणची असावी असा संकेत आहे. विविधता एकत्र आली तर त्यातील सुफलन शक्ती वाढते अशी लोकमनाची श्रद्धा हजारो वर्षांपासून आहे. याची प्रचीती त्यातून मिळते. मृत्तिका म्हणजेच माती. ती ब्रह्मदेवाने निर्माण केली. कश्यपमुनींनी तिला अभिमंत्रित केले .हत्तीघोडे यांच्या पायाखालचा रस्ता, वारुळ, संगम, डोह, गाईचा गोठा येथील मातीला सप्तमृत्तिका म्हणतात. तिच्यात चव्हाट्यावरची माती मिसळली की ती 'अष्टमृद्' होते. माती चार प्रकारची असते. पांढरी, पिवळी, लाल व काळी. पांढरी माती घरासाठी चांगली. ती फुटत नाही व तिच्यावर अग्नीचा परिणाम होत नाही. भृगू कश्यप मुनींनी वास्तु ग्रंथात मातीचा विचार मांडला.

मंगलकार्यासाठी सुवासिनी रानात जाऊन माती आणून चूल घालतात. तिला

'मृत्तिका मंगल' म्हणतात. माती सुवर्णाइतकीच महत्त्वाची असते. म्हणूनच धर्मकृत्यांत मातीच्या कलशाला महत्त्व असते.

घट बसविणे असे लोकभाषेत नवरात्राविषयी बोलले जाते. घट हे गर्भाशयाचे प्रतीक आहे. हे व्रत स्त्रियांचे आहे नवरात्रात विशेष करून कुमारिकांची पूजा केली जाते. भूमीच्या स्त्रीरूपांची आराधना या काळात करतात. कुमारिकांचे प्रतीक सरस्वती, लक्ष्मी ही सुवासिनी आणि अनिष्टापासून रक्षण करणारी काली. ज्येष्ठ आषाढात पेरलेले धान्य भाद्रपदात सतेज होऊ लागते. जणु त्याची कौमार्यावस्था संपून ते पणात येऊ लागते. आश्विनात दाण्यातले दूध पक्व होऊ लागते आणि दिवाळीत धान्यलक्ष्मी दाराशी येते. कौमार्यवस्थेतील धान्यलक्ष्मी, धान्याने शेतेभाते बहरलेली असतात, अशी सुवासिनी मातृरूपा धान्यलक्ष्मी या धान्याचे अनिष्टापासून रोगापासून रक्षण करणारी विघ्नहर्ती भवानी. ही तीन रूपे नवरात्रात पूजिली जातात. घटाचे वर नागवेलीच्या पानांची वा फुलांची माळ बंधतात. रोज एक नवी माळ असते. लोकभाषेत नवरात्राचा तिसरा वा सहावा दिवस असे म्हणण्या ऐवजी आज चौथी माळ पाचवी माळ आहे असे म्हणतात. काहींच्या घरी फक्त विड्याच्या पानांचीच माळ असते.

### मराठवाड्यातील व्रतांवर दक्षिणेचा प्रभाव –

मराठवाड्यात देवीच्या साडेतीन पीठांपैकी तुळजापूर आणि योगेश्वरी ही पीठे आहेत. त्यामुळे नवरात्रोत्सव थाटात होतो. मात्र तुळजाभवानीचे मूळ नवरात्र शाकंभरीचे. चंपाषष्ठीपासून सुरू होणारे तर योगेश्वरी चे नवरात्र मार्गशीर्ष पौर्णिमेस संपणारे. असे असले तरी आश्विनातील नवरात्र या देवळांतूनही थाटात बसते.

मुळात देवी हे पार्वतीचे रूप. भव म्हणजे शंकर आणि भवानी म्हणजे पार्वती. ही दोनही लोकदैवते आहेत. विंध्यपर्वताने भारताचे उत्तर आणि दक्षिण असे निसर्गतः दोन भाग पाडले आहेत. विंध्य पर्वताच्या अलीकडे महाराष्ट्र आहे.

कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू आणि केरळ हे दाक्षिणात्य प्रदेश. या दक्षिणात्य प्रदेशांच्या आणि गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, ओरिसा बंगाल आदि उत्तरेकडील प्रान्त यांच्या मध्यात महाराष्ट्र येतो. महाराष्ट्रातील सांस्कृतिक

जीवनावर या दोनही भागांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा प्रभाव पडलेला आहे. जळगाव, धुळे जिल्हे जे पूर्वी खानदेश या नावाने ओळखले जातात, त्यावर उत्तरेच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा प्रभाव आहे. उदा. खानदेशातील कानबाईचा कुलाचार, उत्सव जो रण्णा सण्णा या सूर्यदेवतांशी संबंधित आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात एकूण सात जिल्हे , लातूरमधील उदगीर - निलंगा हे तालुके, उस्मानाबादेतील उमरगा हा तालुका, तसेच नांदेडमधील देगलूर व किनवट हे तालुके कर्नाटक व आंध्राला लागून आहेत. मराठवाड्यातील भूमीशी निगडित व्रते, सण, उत्सव तत्संबंधी गाण्यांवर तेलंगण, आंध्र कर्नाटक या दाक्षिणात्य संस्कृतीचा प्रभाव असल्याचे जाणवते. या संदर्भात नांदेडच्या डॉ. ताराबाई परांजपे यांच्या 'आंध्र महाराष्ट्र सांस्कृतिक अनुबंध' या संशोधन प्रबंधाच्या प्रस्तावनेत लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासक दुर्गा भागवत नोंदवतात, महाराष्ट्र - आंध्र - कर्नाटक हा दख्खनच्या अखंड पठाराचाच एक सलग भूभाग आहे. त्या तीन प्रांतांच्या भाषा भिन्न असून संस्कृती एकात्म आहे. जगाच्या कुठल्याही खंडात जा युरोपात, अमेरिकेत कुठेही जा, भाषा बदलली की संस्कृती बदलते. म्हणजे संस्कृतीचे मूळ भाषा असते. पण या विस्तीर्ण भूभागात तीन भिन्न भाषा असून संस्कृती एकरूपच आहे. [१९]पोचम्मा ही देवी तेलंगणातून मराठवाड्यात आली आहे. धुरपतामाय हे तिचे दुसरे नाव. धुरपता हा द्रौपदीचा अपभ्रंश, मराठवाड्यात जमिनीची उर्वराशक्ती म्हणजेच सुफलन शक्ती वाढण्याशी संबंधित विधीत दगडांचे पाच पांडव आणि कुंती, द्रौपदी करून मांडणे हे फार महत्त्वाचे आहे. त्या संदर्भात विषयानुरूप चर्चा पुढे येईलच.

आंध्र कर्नाटकातील लिंगायत, रेड्डी, वडार, कोमटी आदी अनेक जातिजमाती महाराष्ट्रात येऊन स्थिरावल्या आहेत. अंबाजोगाईजवळील धर्मापुरी येथील शिलालेख कन्नड भाषेतील आहेत. या सातही जिल्ह्यांवर शेकडो वर्षे निजामाची सत्ता होती. त्यामुळे हैदराबाद तेलंगणाशी राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शासकीय संबंध अनेक वर्षांपासून आहेत. तेलंगणातील जमिनीशी निगडित चळवळ, आर्यसमाजी चळवळ या भागातही होत्या. जिल्ह्यांच्या वेगळपणावर मात करणारे आगळे असे मराठवाडीपण या सातही जिल्ह्यांतील लोकमानसात सतत जागे असते. त्यातून सण उत्सव व्रते विधी विशेषकरून शेतीशी संबंधित विधींत

एकता आहे. उदा. मार्गशीर्ष महिन्यात येणारी इळा आवस. त्याची चर्चा पुढे केलेली आहेच.

**मराठवाड्यात चार नवरात्रे –**

मराठवाड्यात चार नवरात्रे मांडतात. १. चैत्री नवरात्र प्रतिपदा ते नवमी, २. आश्विन-नवरात्र प्रतिपदा ते नवमी , ३. मार्गशीर्ष चंपाषष्ठी ते पौर्णिमा, ४. शाकंभरी नवरात्र - पौष महिन्यात पौर्णिमेपर्यंत या ठिकाणी फक्त आश्विनातील नवरात्राची नोंद घेतली आहे.

दसरा दिवाळी माझ्या जिवाला आसरा
माय माऊली बाई मूळ धाडू नगं उशिरा
नऊ दिसांच्या नऊ माळा अंबा बसली नऊ चंडी
तिच्या नंदादीपासाठी तेल जळलं सवाखंडी

**आईचा जोगवा मागीन –**

अशा शेकडो ओव्या स्त्रियांच्या ओठावर असतात. देवीच्या नावाने जोगवा मागितला जातो. दसऱ्याच्या दिवशी योगेश्वरीची पालखी निघते. त्यात आराधनी हातात दिवटे घेऊन पुढ्यात असतात त्या जोगतिनी जोगवा मागणाऱ्या असतात. जोगवा मागणाऱ्यात सवर्ण वा उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या समाजातल्या स्त्रिया अभावानेच असतात. मांग, महार, ढोर या दलित समाजातल्या तसेच रंगारी, वंजारी, गुरव आदी समाजातील स्त्रिया जोगवा मागणाऱ्यात असतात. नवस बोलल्यामुळे एखाद दुसरी उच्चभ्रू स्त्री पाच घरी जोगवा मागताना दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावाने नवबौद्ध झालेल्या कुटुंबातील स्त्रियांनी जोगवा मागणे सोडून दिले आहे. डॉ. सुभाष खंडारे लोकसाहित्य माला पुष्प २८ मध्ये इनाई या व्रतोत्सवाची माहिती देत असताना नोंदवतात की, इतिहास काळात दसरा हा सण पूर्णपणे दलित आणि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाचा होता. खालील गाणे पाहता वरील मताला पुष्टी मिळते.

देवीतुळजा
भावई तुळजा
देवाच्या मागती
गोंधळ घालती
आई बसली नवरात्री
दहा दिवसांची भरती
दहा दिवसांची भरती
आल्या आल्या मांगनी जोगनी
हाती कुक्कांचं करंड
भांग भरीला मोत्यानं
पाटील पांड्या मिळोनी
शिलंगणा जाती
धानाचे तुरे नेती
म्होर मशाली जळती

नवरात्र खरिपाच्या पिकांचे स्वागत आणि रबीच्या बियाण्याची उगवणशक्ती मोजणारी प्रयोगशाळा आहे. पूर्वी शेतातील परिपुष्ट निरोगी कणसे पक्व झाल्यावर फडक्यात अलगद बांधून आढ्याला अधांतरी बांधून ठेवीत. अशा कणासांचे दाणे काढून ते नवरात्रात मातीत मिसळून त्यावर मातीचा घट मांडतात. मृत्तिकेच्या घटातून योग्य तऱ्हेने बियाण्याला पाणी मिळते. घटातून ते झिरपते. नऊ दिवसांत त्यातून अंकूर फुटतात. ज्या बियाण्याचे अंकुर रसरशीत, जोमदार असतील ते पीक त्यावर्षी चांगले येणार असा आडाखा बांधला जातो. अशी श्रद्धा लोकमानसात आहे. हे अंकुर डोक्यात खोवून सायंकाळी शिलंगणाला जातात. ते प्रसाद म्हणून खातातही.

**कोजागिरी : कोण आहे जागे ? –**

दसऱ्यानंतरची पौर्णिमा कोजागिरीची. या दिवशी पार्वती घरादारातून हिंडते, शेताभातातून हिंडते आणि विचारते, कोजागर्ती ? कोण जागे आहे ?

आई लक्ष्मी आली
सोन्याच्या पावलानं
कणगी पेवाला लागुनिया
जोतं चढली डवलानं....
आई तू लक्ष्मी
इथं काय उभी
चल वाड्यात जाऊ दोघी
माझ्या बाळ राजसाच्या ....
आई तू लक्ष्मी
आली तशी जाऊ नको
धरला पदर सोडू नको
बाळ राजसाचा.....

आश्विनी पौर्णिमा चांदण्यासारखीच धनसमृद्धीची पौर्णिमा समजली जाते. प्राकृतिक सौंदर्य पूर्णत्वाला पोहोचलेले असते. शेते भराला आली असतात. दूधदुभते भरपूर असते. गुरांना चरण्यासाठी उदंड हिरवे... कडबा असतो. ही समृद्धी टिकवायची असेल तर घरातील माणसांनी जागे राहायला हवे. त्या सुबत्तेचे रक्षण करीत, स्वैरतेने उपभोग न घेता सुजाणपणे तिचा उपयोग वा उपभोग घेतला पाहिजे, हा संस्कार कोजागिरी देते. श्रमातून धनलक्ष्मी निर्माण होते. तिचे रक्षण केले पाहिजे.

कोजागिरीला ज्येष्ठ अपत्याला औक्षण करतात. ती मुलगी असली तरी तिला सन्मानाने ओवाळतात.

**दिवाळी –**

मराठवाड्यातील किंबहुना महाराष्ट्रातील दिवाळी शेतीभातीशी जोडलेली आहे. दिवाळी आली की, खेड्यातील मुलांच्या ओठावर गाणे नाचू लागते.

दिन् दिन् दिवाऽऽळी
गाई म्हशी ओवाऽऽळी

गाई म्हशी कोणाच्या ?
लक्ष्मणाच्या
लक्ष्मण कुणाचा ?
आई बापाचा

शेतीतून निघणारे धान्य आणि पशुधन या दोहोंच्या एकात्म समृद्धतेचे प्रतीक म्हणजे दिवाळी.

इ.स. १ ते ४०० या काळात हा सण यक्षरात्री म्हणून रुढ होता. वात्स्यायनाने कामसूत्रात या सणासाठी हे नाव वापरले आहे. कनोजचा राजा हर्षवर्धनाने नागानंद नाटकात या सणाला 'दीपप्रतिपदुत्सव' असे नाव दिले आहे. हा काळ इ.स.६०० चा. नीलमत पुराणात या सणास दीपमाला असे संबोधले असून त्याचे विस्तृत वर्णन आहे. या पुराणाचा प्रचार काश्मीरमध्ये होता. नवी वस्त्रे परिधान करणे, घर स्वच्छ आणि सुशोभित करणे, देवळे घरे दिव्यांनी सजवणे, द्यूत खेळणे आणि भाईबंदांनी एकत्र येऊन मिष्टान्न सेवन करणे ही या सणाची वैशिष्ट्ये वर्णिली आहेत. अल्बेरुनीने प्रवासवर्णनात या सणाचा उल्लेख केला आहे. कन्नड शिलालेखात या सणाचा उल्लेख आहे. महमद गझनी व अफगाण राजेही हा लोकोत्सव साजरा करीत असा उल्लेख आहेत.

अबुद फाजल याच्या 'ऐने अकबरीत' या इतिहास ग्रंथात लिहिले आहे की दिवाळी हा देशातील सर्वात मोठा सण, वैश्य समाज हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा करी. घरोघरी दिवे लावीत. दिवाळीचे महत्त्वाचे सहा दिवस असतात. वसुबारस, धनतेरस, नरकचतुदर्शी, अमावास्या-दीपपूजन, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज. वसुबारसेला गाईंची पूजा करतात. गायवासरांना स्वच्छ करतात. गोठा स्वच्छा करतात. गुरांना पंचारतीने ओवाळतात. पुरणावरणाचा नैवेद्य करतात. गोठ्यातील मोकळ्या जागेत शेणाचा सडा घालून त्यावर शेणाचे गोकुळ उभे करतात. त्यात गौळणी तयार करून त्यांना सजवून मांडतात. या गोकुळाला वेस असते. शेतात जाणारी, पाणी भरणारी, स्वयंपाक करणारी, बाजार मांडून बसणारी अशा गौळणी त्यात असतात. त्यांत पेंद्या असतो आणि शेणाचा बळिराजा असतो. खेड्यातील शेतकऱ्यांच्या घरात शेणाचे गोकुळ मांडून त्यात पेंद्या व बळिराजा

मांडणे शुभ मानले जाते. मराठवाड्यात हे गोकुळ विधिपूर्वक मांडले जाते.

गाई म्हशीने भरले वाडे
दह्या दुधानं भरले डेरे
बळीचं राज्य येवो.

एकूण स्त्रियांच्या सणांत शेणाचे महत्त्व आढळून येतें. शेण हे सुफलनासाठी अत्यन्त प्रभावी खत होते. याची जाण स्त्रीला अनुभवातून आली होती. खेड्यातल्या शेणाच्या गोकुळाची जागा शहरात किल्ल्याने घेतली आहे.

**धनतेरस –**

धनत्रयोदशीला स्त्रियांची न्हाणी असतात. शेताशी, सर्जनाशी जोडलेल्या सर्व सणांत स्त्रियांचा सहभाग विशेषत्वाने असतो. त्या निमित्ताने घरातील सगेसोयरे एकत्र येतात. स्त्रिया आपले मन दगडी जात्याजवळ ओवीरूपाने मोकळे करतात. दिवाळीचे पदार्थ बनवायचे म्हणजे जात्याशी पहाटेपासून बसावे लागते. लेकीची वाट पाहणारी आई म्हणते –

जवारीपरीस तुरीचं पीक भारी
लेकापरीस लेक प्यारी ...

पहाटेच्या वेळी पहिला दिवा लावून लेकीसुनांना तेल उटण्याने नाहू घालताना घरातील वडीलधारी स्त्री म्हणते –

दिवाळीचा दिवा, दिवा ठिवा दिवठणी
हिरवी नेसली पैठणी माय माझ्या लक्ष्मीनं....

ही माय म्हणजे धरित्री. तिच्यातून निर्माण होणाऱ्या धनाचा सन्मान स्त्रीला नहाण्याचा पहिला मान देण्यातून व्यक्त होत असेल का ? नक्कीच होत असेल !

**नर्कचतुर्दशी –**

दिवाळी दिवाळी
आंघुळीची जल्दी करा
आज मारील नरकासुरा
किसन देव –

धनत्रयोदशीचा दिवा नर्कचतुर्दशीला घरातून फिरतो या दिवशी पुरुषांच्या आंघोळी असतात. त्यांना तेल चोळून, उटणं लावून, सुंगधी आंघोळ घालून ओवाळतात. या दिवशी घरातील घाण, दुर्गंधी दूर होवो अशी प्रार्थना करतात.

**दिवाळीची अमावास्या ऊर्फ लक्ष्मीपूजन –**

लक्ष्मीपूजनाचा दिवस सर्वात महत्त्वाचा या दिवशी खरी दिवाळी. लक्ष्मीचे.... सुबत्तेचे पूजन. पण ही सुबत्ता येते कुठून ?

लक्ष्मी आई आली शेताच्या बंधाऱ्यानं
शालू भिजला दवरांन माय माझ्या लक्ष्मीचा....
आई लक्ष्मी आली बैलाच्या खालती
माज्या बाळाला बोलती अवंदा माल झाला किती ?
आई लक्ष्मी आली सोन्याच्या पावलानं
वाडा चढे डौलानं, माझ्या राजसाचा:..
आई लक्ष्मी आली, वाडा सोडून दुकानाला
सोनं मागे काकणाला, बाळ राजसाला

अमावास्येला लक्ष्मीपूजन असते. घर पणत्यांनी सजवतात. रांगोळ्यांनी अंगण सजते. रांगोळ्यांच्या संदर्भातील विवेचन भोंडला भुलाबाई या प्रकरणात सविस्तरपणे आले आहे. या दिवशी सायंकाळी दिव्यांची पूजा असते. ताट भरून मातीच्या पणत्या चेतवून देवासमोर वा बैठकीत लक्ष्मीची प्रतिमा ठेवून तिच्यासमोर खाली तांदूळ गहू ठेवून त्यावर पणत्यांचे ताट ठेवतात. ताटात ७,११,१५ अशा पणत्या स्वस्तिक काढून त्यावर मांडतात. पणत्यांची पूजा फक्त स्त्रियाच करतात. तसेच दौत, वही यांची पूजा करतात. वहीवर श्री लिहून नव्या वर्षाचे हिशेब लिहिण्यास प्रारंभ करतात. वैश्य... व्यापारी समाजाचे वर्ष कार्तिक प्रतिपदेपासून सुरू होते. प्रसाद म्हणून साळीच्या लाह्या, बत्तासे, खडीसाखर वाटतात. पूजेत धने, मूग, गूळ यांचा समावेश असतो.

**बलिप्रतिपदा –**

बळी हा भक्त प्रल्हादाचा नातू. तो सत्तेने माजला त्याने देवांना जिंकून लक्ष्मीला दासी केले. तेव्हा विष्णूने वामनाचा अवतार घऊन त्याचा नाश केला. बळीकडे तो

यज्ञात याचक म्हणून गेला व तीन पावले जमीन मागितली. एक पाऊल स्वर्गात दुसरे मृत्युलोकात तर तिसरे बळीच्या डोक्यावर ठेवले. त्याला पाताळात पाठवले. कार्तिक शुद्ध प्रतिपदेला समाज तुझे स्मरण करील असा वर दिला. परंतु बळीचे राज्य येवो अशी शुभेच्छा शेतकरी समाज विविध विधींतून सतत करत असतो. कारण बळी हा शेतकरी होता. आपल्याकडे शेतकऱ्याला बळिराजा म्हणत. केरळात श्रावणात ओणम् हा सण दिवाळी इतक्या थाटात साजरा होतो. अंगणात बळीचे प्रतीक म्हणून मातीचा ओटा तयार करतात. त्याभोवती रांगोळी घालतात. फुलांनी सजवतात. रात्री फेर धरुन कैकद्विकळी हे नृत्य करतात. घरापर्यंत मातीची फुलांची पावले काढतात. या दिवशी पाताळात ढकलला गेलेला बळिराजा भेटायला येतो अशी समजूत आहे. पूर्वी बाली बेट भारताला लागून होते त्याला पाताळ म्हणत. बाहेरुन आलेल्या टोळ्यांनी बळिराजाला रेटत रेटत बाली बेटांत नेले. थर्स्टन नावाच्या शास्त्रज्ञाने तर ऑस्ट्रेलियातील लोकांचे व वनस्पतीचे दक्षिण भारतातील लोकांशी साम्य असल्याचे दाखवून दिले आहे.

बळिराजा शेणाचा करतात. शेणाला शुभा म्हणतात. शेण हे सर्वात उत्तम खत. या सर्व बाबींचा अनुबंध महत्त्वाचा आहे.

भाऊबीज ऊर्फ यमद्वितीया –

जी स्त्री भूमीस्वरूपा सर्जनतेचे प्रतीक मानली गेली. सन्माननीय मानली गेली ती काळाच्या प्रवासात दुय्यम दासीसमान झाली. तिचे जगणे अत्यन्त दुःखमय झाले. रात्रंदिवस कष्ट करणे आणि खाली मान घालून समाजात व कुटुंबात दुय्यम दर्जाचे जिणे जगणे एवढाच तिच्या जीवनाला अर्थ उरला. निदान प्रत्यक्षात तरी तिने आपले दुःख दगडी जात्याजवळ मोकळे केले. तेवढाच तिला आधार होता.

ती स्त्रीचा जन्म दिल्याबद्दल परमेश्वराला म्हणते –

बाईचा जलम कुनी घातला येड्यानं
बैल राबतो भाड्यानं, परक्याचे दारी ....
लेकीचा जलम नको घालू श्रीहरी
मोठी कठीन चाकरी परक्याचे दारी ....

पण माहेर म्हटले की तिचा जीव गलबलून जातो. भाऊबीज आली की तिचे डोळे भावाच्या वाटेकडे लागतात.

दिवाळीच्या दिशी ओवाळित बंधु तुला
तुज्या शेल्याची चोळी मला ....
सोनसळे गहू रवा काढते दाणेदार
धाकला बंधुराया आज फेण्या जेवनार ....
पिंपळपानांची सावली पडे जोत्यावरी
भाचा मामाचे कडेवरी ....

भाऊबीज महाराष्ट्रात अत्यन्त भावुकतेने साजरी होते. राजस्थान, उत्तर, मध्य प्रदेशात राखीपौर्णिमेचे वा भाई पांचचे महत्त्व ते महाराष्ट्रात भाऊबीजेचे. धावतपळत भाऊ भाऊबीजेला बहिणीचे घर गाठतोच. न आला तरी ती रागवत नाही. चंद्राला ओवाळते व भावाला आयुष्य चिंतिते.

भाऊबीजेच्या दिशी ओवाळीलं चांदाला
दूरदेसीच्या बंधवाला आयुख चिंतिते ....

हे खरे असले तरी तिला जाणीव असते.

माय तो माहेर, बाप तो येऊजाऊ
पुढे नेतील ग भाऊ, लोकलाजे ...
आई बापाच्या राज्यात खाल्ल्या दुधावरच्या सायी
भावजयींच्या राज्यात ताक घेण्याची सत्ता नाही.

बहीण भावाचे नाते नितान्त निरामय आणि आंतरिक नात्याने ओलावलेले असते.

बहीण भावाचे प्रेम ते शुद्धबुद्ध
अपुरे होती शब्द वर्णावया
दुबळा पाबळा भाऊ बहिणीला न्यारा
पुनवेच्या दिशी चंद्र मोहरला प्यारा
बहिणीला भाऊ कसा रागावेल ?
चंद्र आग का ओकेल काही केल्या ....

भाऊ बहिणीच्या नात्यांचा ओलावा सांगणाऱ्या हजारो ओव्या महाराष्ट्रातील स्त्रियांनी रचल्या आहेत.

यमद्वितीयेच्या कथेचे विवेचन यापूर्वी केलेच आहे.

**माती आणि माहेर यांच्याशी दृढ नाते –**

मानवी विकासाच्या प्रवासात नात्यांचे निश्चितीकरण, त्यांना दिलेली भावनिक प्रतीकात्मकता हा टप्पा अत्यन्त महत्त्वाचा आहे. मानसिक संवेदन शक्तीची आणि स्वरयंत्राच्या साहाय्याने निर्माण केलेल्या भाषेची स्पंदने माणसाला निसर्गाने दिली. त्याद्वारे त्याने इतर प्राणिमात्रांपेक्षा आपले वेगळेपण सिद्ध केले.

मानवी संस्कृतीच्या आदिपर्वातील यातुश्रद्धा ही समूह श्रद्धा होती. जीवनातील सारेच प्रश्न समूहाचे होते. 'मी' जन्माला आलेला नव्हता. मानवी जीवनाचे अस्तित्व 'आम्ही' त सामावलेले होते. जीवनाला सुख देणारे सुलभ करणारे अन्न देऊन मृत्यूचे भय नाहीसे करणारे तीन महत्त्वाचे आधार होते – एक वनस्पती शेती, दुसरा पशुधनाचा आणि तिसरा अग्नीचा. या तिहींचा संगम दिवाळीत आहे.

निसर्गाशी त्याच्या संहारक रूपाशी संघर्ष करून उरण्याची दुर्दम्य प्रेरणा यातुश्रद्धेने मिळाली आणि यातुश्रद्धा या समूहप्रधान असतात. स्त्रियांची बहुतेक व्रते, विधी, उत्सव हे समूहाने साजरे केले जातात.

स्त्री ही सर्वार्थाने सृजनशक्ती होती. धान्य पेरणारी, काढणारी, ते जास्तीतजास्त दिवस टिकवण्यासाठी विविध प्रयोग करणारी आणि त्याचे अग्नीच्या साहाय्याने पूर्णान्न बनवणारी तीच. दूधभत्याची निर्मिती त्यापासून विविध पदार्थ तयार करणारी तीच. वस्त्र विणणारी तीच. त्यामुळे जमिनीची सुफलता वाढविण्यासाठी केल्या जाणाऱ्या यातुश्रद्धा तिच्याशी जोडलेल्या दिसतात. या विधींशी जोडलेली गीते स्वरसमूह तिनेच निर्माण केले असावेत. तिचे भावविश्व जसजसे बदलत गेले तसतसे त्या गाण्यांतील संदर्भ बदलत गेले. पण माती आणि माहेर यांच्याशी असलेले तिचे अतूटपण गींतामधून सतत जाणवते. काळाच्या ओघात मातृसत्तेची जागा पितृसत्तेने घेतली. स्त्री घर सोडून पतीच्या घरी कायमची

आली. पण या घरी तिला तिचे अवकाश मिळाले नाही. त्यामुळे तिच्या ओव्यांत माती आणि माहेर सतत डोकावते.

पड पड मेघराजा बंधवाच्या शेतावरी

आलिया दिवाळी भयनीचा खर्च भारी

जोंधळ्या बरुबरी किती वाढशील उसा

आस दिवाळीची माले बंधू संगे भासा....

सासरी डोक्यावरचा पदर कपाळ झाकेपर्यंत घ्यायला हवा. ती तिची मर्यादा. पण माहेर म्हणजे मोकळपणा. भाऊबीजेसाठी येणारा भाऊ पाहून ती म्हणते –

खांद्यावरचा पदर डोकीवर मी झोकीला
शेताच्या बांधाला बंधुराजा मी देखीला ....
दिल्या घेतल्यानं नाही पुरत एरावती
बंधूराजाची ग्वाड बोलांची रसवंती ....

**भारतीय सण : ऋतुचक्राशी जोडलेले आणि ऋतुचक्र कृषिशी –**

ज्येष्ठ,आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक या सहा महिन्यांत भूमी-वर्षन यांच्या संयोगातून होणारे, सर्जन या अनुबंधाशी जोडलेले सण, व्रते, उत्सव येतात. ज्येष्ठी पौर्णिमेला नांगर शेतात घालायचा. आषाढ़ात पेरणी आणि वृक्षपूजा. श्रावणात वारुळाची, शेताची संरक्षक नागदेवता आणि मांगल्याची पानाफुलांच्या माध्यमातून पूजा. भाद्रपदात धान्य कणसे निसवतात. धान्यलक्ष्मीची चाहूल स्पष्ट होते. म्हणून गौरीगणपती, लक्ष्म्या यांची पूजा. आश्विनात या धान्यात... दाण्यांत दूध भरू लागते आणि रब्बीच्या पेरणीची तयारी सुरू होते. लक्ष्मीच्या त्रिरूपांची पूजा आश्विन नवरात्रात. आश्विनाच्या अखेरी व कार्तिकात धान्य घरात येते. ज्या धान्याचा विनिमय पैशाने होतो असे पीक म्हणजे कापूस (कपाशी, शेंगदाणे इ.) त्यामुळे लक्ष्मीपूजनास रूपयाची पूजा होते. कृषिवर आधारित व्यवहार या काळात होऊन पैसे घरात येतात. व्यापाराला चालना मिळते. म्हणून धनलक्ष्मीचे पूजन.

एकूण भारतीय सण ऋतुचक्राशी जोडलेले आहेत आणि ऋतुचक्र कृषीशी जोडलेले आहे. काळाच्या विकासात या सणांना नवे आयाम दिले गेले. श्रावण पौर्णिमा उत्तरेत राखी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. भाऊबहीण या नात्याला धर्म, जात या पलीकडचा संदर्भ मिळाला. दर्यावर्दी जीवन जगणाऱ्यांच्या दृष्टीने महाराष्ट्रात ती नारळी पौर्णिमा झाली परंतु उत्तर भारतातून आलेली राखी पौर्णिमा आज मराठवाडा, महाराष्ट्रात रुजली आहे.

**इतर प्रांतांतील सणांवर ओझरता दृष्टिक्षेप : मूलभूत साम्य –**

भूमी वर्षन आणि सर्जन यांच्याशी जोडलेल्या मराठवाडा व महाराष्ट्रातील महत्त्वाच्या व्रतोत्सवविधी, सणांचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. भारतातील भूमीच्या सुफलतेशी जोडलेल्या सणांत मूलभूत एकात्मता असल्याचा प्रत्यय पदोपदी येतो. त्या दृष्टीने या अनुबंधाशी जोडलेल्या या काळात येणाऱ्या इतर प्रांतांतील सणांवर दृष्टिक्षेप टाकणेही महत्त्वाचे ठरेल. कर्नाटकात ज्येष्ठी पौर्णिमेला वटवृक्षाची पूजा केली जाते. दक्षिणेत ज्येष्ठी पौर्णिमा हा शेतकऱ्यांचा महत्त्वाचा दिवस असतो. आंध्रात या दिवशी जमिनीत प्रथम नांगर घालतात. सायंकाळी बैल सजवून शेतात नेतात. शेत चांगले पिकावे, वर्षभर शेतावर संकटे येऊ नयेत म्हणून मातीची प्रार्थना करतात. उमरगा, सोलापूर भागातील शेतकरी, विशेष करून लिंगायत समाजातील शेतकरी हा रिवाज पाळतात. श्रावणातील पंचमीच्या आदल्या दिवशी स्त्रिया वारूळाला जातात.

सांतेरीचे मंदिर वारुळाचे असल्याचे पूर्वी नोंदविले आहे. श्रावण शुक्रवारी स्त्रिया मातीच्या घटांची पूजा करतात. ही गौरीपूजा असते. आंध्रात श्रावण अष्टमीस मातीच्या घड्यात निंबाची पाने ठेवून त्यावर लहान गाडगे ठेवतात. त्यात दिवा लावून त्याची मिरवणूक काढतात. नागपंचमीला वारूळाची पूजा होते. भाद्रपद शुद्ध तृतीयेस महाराष्ट्रात हरितालिका साजरी करतात. आंध्रातही कुमारिका हे व्रत पाळतात. त्याला अटलतद्द किंवा सोळा गौरीनामू असे म्हणतात. आंध्रात गणेशचतुर्थीला विनायक चौथ म्हणतात. दुसऱ्या दिवशी नंदादीपाजवळ ठेवलेली ही

मूर्ती जवळच्या विहिरीत विसर्जित करतात. जेथे मूर्ती विसर्जित केली जाते तेथील थोडी रेती आणून ती सर्वत्र शिंपडतात. धान्याच्या कोठीत ठेवतात. त्यामुळे धान्य सुबत्ता वाढते अशी श्रद्धा आहे. ती मराठवाडा वा महाराष्ट्रातही आहे.

नवरात्राला 'नाडहब्बे' म्हणतात. या उत्सवास दक्षिणेत राष्ट्रीय उत्सव मानले जाते. तामिळनाडूत आषाढ कृष्णाष्टमीपासून तिरुकल्याणपर्व सुरू होते. हा सोहळा १७ दिवसांचा असतो. त्यात स्त्रिया तैवारम ही गाणी गातात. समूहाने गातात. आंध्रातील गणेश चवथीस मुगाची डाळ व गुळाचे पाणी हा प्रसाद असतो तर कर्नाटकात गणेशचतुर्थीचे आदले दिवशी तृतीयेला घुगऱ्या करतात. त्या उंदरांसाठी शेतात जाऊन टाकतात. नवरात्र दसरा हे उत्सवही स्त्रियांचे असतात. दहा दिवस हळदीकुंकू असते. बोम्मल कोलुकु म्हणजे नवरात्र. आंध्रातील तेलंगणात नवरात्रात खास मुलींचा उत्सव साजरा करतात. त्याला बदकम्मा म्हणतात. या उत्सवाचे नाते महाराष्ट्रात खेळल्या जाणाऱ्या भोंडला, हादगा, भुलाबाई यांच्याशी फार जवळचे आहे. तेलंगणात दिवाळी हा उत्सव धान्यलक्ष्मीचा. भाताची कापणी या काळात झालेली असते. धान्याच्या लोंब्या आणून त्यांचा कुंचला करून तो झुलता कुंचला दारावर तोरण म्हणून लावतात. त्यातील दाणे चिमण्यांनी खावेत व धान्याची आबादी आबाद व्हावी ही इच्छा या मागे असते. कर्नाटकात दसऱ्यानंतरच्या अमावास्येस, आश्विन अमावास्येस बुक्कव्वाची पूजा करतात. पुरणाचा नैवेद्य करून तो शेतात नेतात. घरातील सर्वांनी शेतात जायचे असते. झाडाखाली पाट, दगड स्वच्छ करून मांडतात. चण्याच्या डाळीचे मुटके करून ते त्यांना वाहतात. हळदकुंकू कापसाची माळ घालतात. या दिवशी शेताची ओटी भरण्याचा कार्यक्रम असतो.

या काळातील सर्व भारतीय व्रते, उत्सव, सण शेताच्या सुफलीकरणाशी जोडलेले आहेत याचा प्रत्यय या सणांतून, विधींतून मिळतो.



# भूमी, सूर्य आणि सर्जन

*भारताची सांस्कृतिक एकात्मता : जागतिक वैशिष्ट्ये, भूमी आणि भाकरीला नसते जात नसतो धर्म, सांस्कृतिक विकासक्रमातील 'वर्षगणना' हा महत्त्वाचा टप्पा, सर्जनासाठी वर्षनाइतकेच सूर्यबीजाला महत्त्व, महत्त्वाचे विधी, व्रते, सण, उत्सव, सूर्योपासनेची प्राचीन परंपरा, वेदकाळात कृषीचा विकास : नांगराचा उपयोग, अपागर्भ सूर्य, नांगराचा उपयोग : पुरुषप्रधान जीवन व्यवस्था समाजात रुजू लागली, सूर्याची उत्पत्ती, सूर्य अपाद, सूर्यबिंबाचे संकेत, द्यावा पृथ्वीचा विवाह कोल्ह्याने मोडला, सूर्योपासना जगभर, आपल्याकडची लावणी पीक वृद्धीसाठी, सूर्यपूजा कोणाच्यात ?, खंडोबाचा षड्रात्रोत्सव : सटीचे नवरात्र, इळा + कोट : येळकोट, मल्हारी : विविध रूपे, वाघ्या व मुरळी, महाप्रभू चैतन्य आणि इंदिरा, लावणी आणि मुरळीची गाणी यातील साम्य : एक अंदाज, मल्लूखान मल्हारी, येळा आवस : मराठवाड्यात विशेष महत्त्व, आंबिलीचा मान, द्रौपदी आणि कुंती कोपीबाहेर, तेलंगणातील धुरपता आणि इळाआवसेतील द्रौपदी, मातृसत्ताक व्यवस्था ते पुरुषसत्ताक व्यवस्था : काही दुवे, चेटकीण आणि बुद्धिमान स्त्री, कर्नाटकातील करगा उत्सव, पौषातील रविवारी सूर्यपूजन : संपूर्ण मराठवाड्यातील स्त्रियांचे व्रत, पौषातील महत्त्वाचा सण मकरसंक्रात, होळी : हुताशनी पौर्णिमा - फाल्गुनातील वसंतोत्सव, धुळवडीमागील भूमिका, होळीची राख आणि बीजातील सुफलता, होळी भारतभर साजरी होते, चैत्र : चैत्रगौर, गणगौर.... राजस्थानातली, भारतातील चैत्रपाडवा, अक्षय्य तृतीया : अक्षय्य आनंदाची ग्वाही, ऋतुचक्राशी जोडलेले उत्सव, शाकंभरी : वनशंकरी, कानबाई : लोकदेवता खानदेशची, दिवा : अग्नी सूर्यपूजेचे प्रतीक, आवढिशी कानबाई ठुमकती, ठळकपणे जाणवलेल्या गोष्टी.*

---

## भारताची सांस्कृतिक एकात्मता : जागतिक वैशिष्ट्य –

भारताचे भौगोलिकदृष्ट्या उत्तर भारत आणि दक्षिण भारत असे. दोन भाग आहेत. दक्षिण भारतात बोलल्या जाणाऱ्या तेलगु, तामिळ, कन्नड, मल्याळम् या चारही

भाषा द्रविड भाषावंशातील असल्याने त्यांच्यात आंतरिक साम्य आहे. उत्तरेतील राजस्थानी, गुजराती, हिंदी, बंगाली, बिहारी, काश्मीरी, मराठी, उडिया, पंजाबी या भाषा एका भाषावंशातील आहेत. त्यांच्यातही आंतरिक साम्य आहे. या दोन भागांच्या मध्यावर, या दोहोंना जोडणारा महाराष्ट्र आहे.

आसाम, अरुणाचल, मणिपूर, नागालँड, त्रिपुरा, मिझोराम, उदयाचल ही सात पूर्वेकडील अति लहान राज्ये. यांनाच 'सात बहिणी' 'सेव्हन सिस्टर्स' म्हटले जाते. यांतील आसाम व त्रिपुरा या राज्यांत बंगाली लोक फार पूर्वी गेले, त्यामुळे या दोन राज्यांच्या नागर भागात बंगाली भाषा बोलली जाते. मात्र डोंगर भागातील आदिवासी आपापली भाषा बोलतात. मणिपूर, मिझोराम, नागालँड, अरुणाचल, उदयाचल हे भाग डोंगरांचे, घनदाट झाडीचे, परस्पर संवादासाठी रस्ते नाहीत. कोणतीही विज्ञानसाधने नाहीत. प्रत्येक लोकवस्तीची भाषा वेगळी हा अपवाद सोडला तर उत्तरेत व दक्षिणेत एकेका भाषावंशातील भाषा नांदतात. दोहोंच्या मध्यावर महाराष्ट्र आहे. महाराष्ट्रातील कर्नाटक, आंध्राच्या जवळच्या भागावर दाक्षिणात्य परंपरांचा प्रभाव आहे. तर मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान या प्रांताजवळील जिल्ह्यांवर उत्तरेतील लोकपरंपरांचा प्रभाव आहे.

महाराष्ट्रावर दक्षिणेतील आंध्र, कर्नाटक, तामिळ संस्कृतीचा प्रभाव पडलेला आहे. केवळ या प्रांतातील तेलगु, कानडी, तामिळ भाषांतील अनेक शब्द, त्यांची रूपे मराठीने उचलली आहेत असे नाही, तर त्यांच्या भाषिक विशेषांमध्येही साम्य आहे. महाराष्ट्रातील अनेक संप्रदाय व देवता कर्नाटकातून आल्या आहेत. कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्या सांस्कृतिक अनुबंधाविषयी 'मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या ' या ग्रंथात शं. वा. जोशी यांनी विस्ताराने चर्चा केली आहे. तामिळ आणि मराठी यांच्या परस्पर संबंधांची चर्चा करताना, त्याचप्रमाणे, तामिळनाडू आणि महाराष्ट्र यांच्यातील सांस्कृतिक संबंधाची मीमांसा करताना श्री. विश्वनाथ खैरे यांची 'तामिळ महाराष्ट्र' व 'अडगुल मडगुल' ही २ पुस्तके दक्षिण भारतातील निरनिराळ्या भाषांचा परस्परांवर प्रभाव कसा पडला आहे, हे जाणून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. जिज्ञासूंनी ती मुळातून पाहावीत असे सुचवावेसे वाटते.

''आंध्र - महाराष्ट्र सांस्कृतिक अनुबंध'' या [१]डॉ. ताराबाई परांजपेंनी लिहिलेल्या

पुस्तकाची प्रस्तावना लिहिताना दुर्गाबाई भागवत लिहितात, ''जगाच्या कुठल्याही खंडात जा, युरोपात, अमेरिकेत कुठेही जा, भाषा बदलली की संस्कृती बदलते. म्हणजेच संस्कृतीचे मूळ भाषा असते. पण या विस्तीर्ण भूभागात तीन भिन्न भाषा असूनही संस्कृती एकरूपच आहे.'' (महाराष्ट्र, आध्रं, कर्नाटक, तमिळनाडू हे तीन भूभाग) भारतीय संस्कृतीत भाषा 'गौण' आहे. तिच्यातील विविध प्रांतांतील लोकपरंपरांत भाषा वेगळ्या असल्या तरी चकित करणारी एकात्मता आहे. या संदर्भात दुर्गाताई स्पष्टपणे नोंदवितात की ''आमच्याकडचे समाजशास्त्रज्ञ बहुशः पाश्चात्य सरणीचे समाजशास्त्र मानीत आले आहेत. त्यामुळे भाषा भिन्न असूनही संस्कृती समरूप असू शकते हे प्रमेय या तीन प्रांतांच्या आधारे अजून कुणी मांडायला धजत नाही' आणि म्हणूनच ताराबाईंनी 'अनुबंध' च्या रूपाने योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे असे त्यांना वाटते. डॉ. ताराबाईंचे हे पाऊल किती योग्य दिशेने आहे याची जाणीव भूमीच्या सुफलनशक्तीच्या वाढीशी जोडलेल्या विधी, सण, उत्सव, व्रते आदींचा अभ्यास करताना सतत होत राहते. महाराष्ट्रातील, कर्नाटकातील चैत्रीगौर तृतीयेला विराजमान होते तर राजस्थानातली चैत्रगौर चैत्रतृतीयेला विसर्जित होते. त्यामागील हेतूही समान आहेत. चैत्रातील विधी, उत्सवांच्या चर्चेच्या वेळी त्यांचा साकल्याने विचार होईलच.

**भूमी आणि भाकरीला नसते जात नसतो धर्म –**

गेल्या हजारो वर्षांपासून भारतात, संस्कृति प्रधान असून भाषा गौण आहे. समन्वय हा या संस्कृतीचा आत्मा आहे. या दोनही भागांत... उत्तर दक्षिण भारतात भाषिक वेगळेपणा असला तरी लोकपरंपरांत अंगभूत सारखेपणा... साम्य आहे. या देशावर हजारो वर्षांपासून अनेक टोळ्यांनी आक्रमण केले. द्रविड, पणिन, दास, दस्यू, आर्य, शक, हूण, कुशाण... अनेक. गेल्या हजार वर्षांत मुस्लिम, ख्रिस्ती आले. परंतु आलेले समाज या भूभागातच स्थिरावले. या भूभागातील नैसर्गिक समृद्धी हे यामागचे कारण आहे. तसेच भारताच्या तीन बाजूंनी विशाल सागर आणि उत्तरेकडे पूर्वपश्चिम पसरलेल्या उत्तुंग हिमालयाच्या घनदाट रांगा, या सीमा पार करणे आलेल्या टोळ्यांना दुरापास्त होते. या नैसर्गिक एकसंधतेमुळे या भूमीत स्थिरावलेल्या टोळ्यांतील संघर्ष, स्वीकृती, समन्वय, समरसता यातून सातत्याने सुरू असलेल्या नवस्वीकृती (Agglomeration) प्रक्रियेतून सांस्कृतिक एकात्मता निर्माण झाली. इस्लाम,

ख्रिश्चन लोक आपला धर्म घेऊन भारतात स्थिरावले. त्यांनी आपले धार्मिक आणि सांस्कृतिक वेगळेपण टिकविण्याचा सतत प्रयत्न केला. तरीही ही माणसे मुळची इथलीच. त्यामुळे येथील लोक परंपरेचा स्वीकार अपवादाने केला. उदा. मराठवाड्यावर निझामाचे राज्य शेकडो वर्षे होते. येथील काही जिल्ह्यांत मार्गशीर्ष अमावास्येला 'इळाआवस' साजरी होते. ती शेतीची पूजा असते. जमिनीची सुफलनशक्ती वाढावी. यासाठीचा हा विधी मुस्लिम शेतकरीही पाळतात. भूमी आणि भाकरीला नसतो धर्म आणि नसते जात.

**सांस्कृतिक विकास क्रमातील 'वर्षगणना' हा महत्त्वाचा टप्पा –**

भारतीय विधी, व्रते, सण, उत्सव निसर्ग नियमांशी, ऋतुचक्राशी जोडलेले आहेत. उत्तरभारतात महिन्याची सुरुवात पौर्णिमेनंतरच्या कृष्णप्रतिपदेपासून सुरू होते. महिन्याचा शेवटचा दिवस पौर्णिमा असतो. दक्षिण भारतात-महाराष्ट्रात महिन्यांची सुरुवात अमावास्येनंतरच्या शुद्धप्रतिपदेपासून होते. शेवटचा दिवस अमावास्या हा असतो. मानवाच्या सांस्कृतिक विकासात वर्षगणना हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. वर्षाचे सर्वसाधारणपणे दोन भाग पाडले जातात. एक उत्तरायण आणि दुसरा दक्षिणायन. आषाढ महिन्यात सूर्य कर्क राशीत प्रवेश करतो. तेव्हापासून दक्षिणायन सुरू होते. पौष महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो तेव्हापासून उत्तरायण सुरू होते. गीतेते म्हटंले आहे. 'मासानां मार्गशीर्षोहम् ' बारा महिन्यांत श्रेष्ठ पवित्र मार्गशीर्ष महिना. पाऊसकाळ संपतो. थंडीला सुरुवात होते. महाभारत काळात मार्गशीर्ष महिना पहिला धरून वर्ष मोजण्याची प्रथा असावी. मार्गशीर्ष प्रतिपदेस देवदिवाळी असते. पौषात उत्तरायण सुरू होते.

**सर्जनासाठी वर्षनाइतकेच सूर्यबीजाला महत्त्व –**

जमिनीची सुफलनशक्ती वाढावी यासाठी केले जाणारे विधी, व्रते, सण, उत्सवांचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की, जमिनीची सुफलनशक्ती वाढण्यास सूर्याचीही मदत होते. सूर्याला बीजस्वरूप मानले आहे. सर्जनासाठी पाऊस जसा महत्त्वाचा तसेच सूर्याची ऊर्जाही महत्त्वाची. सूर्य आणि भूमी यांच्या समागमातून वाढणाऱ्या उर्वराशक्तीशी जोडलेले विधी, सण, व्रते, उत्सव हे मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन, चैत्र,वैशाख याकाळात येतात. मराठवाड्यात विशेषत्वाने साजऱ्या केल्या जाणाऱ्या

या काळातील महत्त्वाचे विधी, व्रते, सण, उत्सव आणि तत्संबंधी गाण्यांचा विचार या प्रकरणात केला आहे.

**महत्त्वाचे विधी, व्रते, सण, उत्सव –**

१. खंडोबा ऊर्फ मार्तंडभैरवाचा षड्रसोत्सव, २.नागदिवे पूजन, ३. पौषी रविवारी केली जाणारी आदित्य राणूबाईची पूजा, ४. संक्रान्त, ५. रथसप्तमी – रथाधिष्ठित सूर्यपूजा, ६. होळी, ७. वसंत पंचमी, ८. रंगपंचमी, ९. इळा आवस, १०. शाकंभरी देवीचे नवरात्र – पौषी पौर्णिमेस समाप्ती, ११. चैत्री तृतीया – गौर मांडणी, १२. अक्षय्यतृतीया, १३. कानबाईची पूजा.

**सूर्योपासनेची प्राचीन परंपरा –**

या विधी-व्रतांचा मागोवा घेण्यापूर्वी या काळातील मुख्य देवता 'सूर्य' हिचा सांस्कृतिक प्रवास पाहणे महत्त्वाचे ठरेल. तसेच, भूमी आणि सूर्य यांच्यातील नात्याबाबत लोकमनात आणि लोक परंपरात असलेल्या प्रतिमा, संकल्पना, पाहाव्या लागतील.

सूर्य या देवतेची उपासना प्राचीन काळापासून भारतात केली जाते. ऋग्वेदात सूर्याची अनेक सूक्ते आहेत. सूर्योपासना हे वैदिकांचे नित्यकर्म होते. पुराणातील सप्तमी व्रते सूर्याचीच आहेत. त्यातही माघ शुद्ध सप्तमी, रथसप्तमी अत्यंत महत्त्वाची. सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळे जमीन भाजून निघते. तिच्यातील सुफलनशक्ती आणि पाणी साठवून ठेवण्याची क्षमता त्यामुळे वाढते. याची जाण कृषिजीवी समाजाला होती.

**वेदकाळात कृषीचा विकास : नांगराचा उपयोग –**

ऋग्वेदाचा अंतकाळ आणि यजुर्वेदकाळ यात शेतीची प्रगती होऊ लागली. अर्थववेद काळात तिचा विकास झाला. वर्षाऋतूत पेरलेले धान्य हिवाळ्यात हाती येते. तर हिवाळ्यात पेरलेले यव उन्हाळ्यात हाती येतात असे सांगणारे संदर्भ ब्राह्मणग्रंथात मिळतात. शतपथ ब्राह्मणात नांगरणी पेरणी, कापणी, झोडपणी या शेतीच्या क्रियांचे वर्णन केलेले आहे.

'' हे राजा, हे राज्य तुला शेतीकरिता (ऋश्चै), सर्वांच्या हिताकरिता (क्षेमाय), पोषणाकरिता (पोषाय) दिले आहे. कारण अन्न म्हणजे कृषि (अन्नम् वै कृषिः)''

असे वचन शतपथ ब्राह्मणात आहे ( ७/२-२-६) गाईचे शेण महत्त्वाचे खत असल्याचे लोक जाणत होते. या शेणामुळे पृथ्वीला रस प्राप्त होतो असा संदर्भ मिळतो.

'तदस्या एवैनमेतत् पृथिव्ये रसेव समर्घयति । तस्मादा खुकरिषम् संभरति पुरुष्यं इति । पुष्टीः पशवः ।' अशी वचने शतपथ ब्राह्मणात आहेत. उपनिषदात आत्मा अन्नमय आहे. अन्नाची निंदा करू नये अशी वचने सापडतात. ऋग्वेदात यवाचा उल्लेख आहे परंतु तांदळाचा नाही. ब्राह्मणकाळात 'शस्यम्' चे तांदळाचे संदर्भ आहेत. अथर्ववेदात प्रथिरैन्याने नांगर शोधल्याचा उल्लेख आहे. पूर्व वैदिक काळातील स्त्रियांनीही शेतीत योगदान दिले. मात्र चक्र आणि नांगर यांचा वापर सुरू झाल्यापासून स्त्रियांचे शेती या व्यवसायातील महत्त्व कमी कमी होत गेले असावे असे वाटते. मुदगलानी या स्त्रीने स्वतःला जुंपून नांगर चालवला होता. लोपामुद्रेने अगस्ती ऋषींच्या हातात फावडे देऊन शेतात काम करण्यास प्रवृत्त केले होते. वैदिकादी गोपालक टोळ्या आणि द्रविडादी गणसत्ताक कृषिजीवी टोळ्या यांचा संकर होताना कृषि आणि पशुपालन हे दोनही व्यवसाय एकमेकांना पूरक झाले असावेत. बीजाच्या महत्त्वाची जाणीव लोकमानसात रुजली. 'लिंगपूजेत' बीजाच्या स्वयंभू महत्त्वाचे भान लोकांना नव्हते. परंतु सूर्यपूजेच्या रूपाने ते आले. बीज रुजण्यासाठी खोलात पडावे लागते. तेथे रुजावे लागते. सूर्याची उष्णता जमिनीत रुजते. किरणांच्या रूपाने सूर्य बीजरूपाने धरणीच्या गर्भाला चेतना देतो अशी श्रद्धा लोकमानसात निर्माण झाली.

**अपागर्भ सूर्य –**

सूर्य हा जलाचा फार मोठा साठा आहे. ही कल्पना फार प्राचीन आहे. ''आप : सूर्ये समाहितकाः'' (तैत्तिरीय अरण्यक, १.८.१) सूर्य हा धन्वन्तरी असून त्याचे बिंब हा त्याचा कलश आहे. सूर्य कलशातून बाहेर पडणाऱ्या जलात औषधीगुण असतात व त्याने रोग नष्ट होतात ही कल्पना फार प्राचीन आहे. सूर्याचा डोळा वर्षनशील जळाने परिपूर्ण आहे. [२]'सूर्यस्य चक्षू रजसैत्यावृत्तम्' (ऋ. १.१६४.१४) याचाच अर्थ असा की पृथ्वीवर अभिषिक्त होणारे वृष्टिजल हे सूर्यमंडलातून येते. या वृष्टिजलाने भूमी सुपीक होते. सूर्याला 'अपागर्भ' म्हटले आहे. (१.१६.४.५२)

सायनाचार्य याचा अर्थ 'वृष्ट्युदकांना गर्भवदुत्पादकम्' असा देतात. सूर्य आपल्या स्वनिष्ठ प्रभावाने पृथ्वीला फळवितो. तिच्या ठायी बीजारोपण करतो. तिला प्रसवोन्मुख करतो. सूर्य सरस्वान् आहे. तो 'स-रस' आहे. सूर्य आणि जल यांचा निकटचा संबंध वैदिक कल्पनात रुढ होता.

**नांगराचा उपयोग : पुरुषप्रधान जीवन व्यवस्था समाजात रुजू लागली –**

प्राथमिक कृषिजीवी समाज मातृसत्ताक होता. शेती हाताने, कुदळ फावडे आदींच्या साहाय्याने केली जाई. शेती स्त्रिया करीत. समूहाने एकत्र येऊन एकमेकींच्या शेताला त्या सुफलित करीत असाव्यात. वर्षनाचे एक महत्त्वाचे कारण सूर्य आहे. तो बीजस्वरूपी आहे याचे भान समाजाला आले असावे आणि सूर्यपूजा भूमीची सुफलनशक्ती वाढावी यासाठी केली जाऊ लागली असावी. पूर्व वैदिकांनी कृषिकला स्वीकारली. उत्तरोत्तर त्यात नांगराचा प्रभाव वाढला. पुरुष केन्द्री समाजव्यवस्था होऊ लागली. 'मला माझ्या आईचे नाव माहीत आहे, बापाचे नाही' असे सांगणाऱ्या सत्यकामाची परंपरा संपली. पित्याचे नाव आणि कोणत्या कुळात जन्म या बाबींना महत्त्व आले. 'दैवायत्तंकुले जन्मः मदायत्तंतु पौरुषम्' असे अभिमानाने सांगणारा कर्ण 'सूर्य पुत्र' मानला गेला. तेजस्विता आणि पौरुष यांच्यातील अनुबंध अधिक कडवा आणि स्वयंभू झाला.

मार्गशीर्ष ते वैशाख या काळातील स्त्रीव्रतांचे शोधन केल्यानंतर असे लक्षात येते की या व्रतात सूर्याची प्रत्यक्ष उपस्थिती आहे. भूमीवर्षन आणि सर्जन यांच्यातील अनुबंधातून आविष्कृत झालेली व्रते, सण, विधी, यांत 'भूमी' महत्त्वाची आहे. तिच्याबरोबर असलेला भुलोबा, भांगलोबा, वा शिव हा अध्याहृत आहे. पौष महिन्यात प्रत्येक रविवारी सूर्योदय होण्यापूर्वी स्त्रिया स्नान करतात. पाटावर सूर्याची आकृती काढून उपवास करतात. सूर्योदयानंतर केस विंचरीत नाहीत. रथसप्तमीला सूर्यपूजा करतात. संक्रान्तीलाही सूर्यपूजा केली जाते.

भूमीची सुफलनशक्ती वाढण्यासाठी वर्षनाइतकेच सूर्याच्या उष्णेतचे महत्त्व असते. किंबहुना वर्षनाचे सामर्थ्य सूर्यात असते. जमिनीवरचे पाणी तो किरणांच्या माध्यमातून स्वतःत गोळा करतो. ते पाणी सूर्यगोलकात गेल्यावर त्यात अमृताची शक्ती येते. मार्गशीर्ष ते पौष या काळातील महत्त्वाच्या व्रतांत सूर्यपूजा ही केन्द्रस्थानी

आहे. त्यांचा परामर्ष होताना त्याची सखोल चर्चा होईल. तत्पूर्वी सूर्याविषयीच्या विविध कल्पना जाणून घेणे महत्त्वाचे वाटते.

**सूर्याची उत्पत्ती –**

सूर्याला सविता, विवस्वान्, पूषा अशी अनेक नावे आहेत. अथर्ववेदात त्याला सात नावे असून ती सूर्याच्या सात किरणांची आहेत. महाभारतात सूर्याची बारा नावे आहेत. या नावांवरून सूर्यनमस्कार घातले जातात. सूर्याच्या उत्पत्तीविषयी भिन्नभिन्न प्रकारच्या कल्पना आढळतात.

१. तो इंद्राचा पुत्र आहे (ऋ. १०.१९०.३) पौराणिक साहित्यात तो कश्यप आणि आदितीचा कनिष्ठ पुत्र आहे. तो अवयवरहित जन्मला म्हणून मार्तंड ही संज्ञा त्याला मिळाली.

सूर्याचे रूपगुण वर्णन करताना सूर्यास आकाशाचा अलंकार म्हटले आहे. उषा ही त्याचा मार्ग मोकळा करून देते. त्याच्या रथाला सात घोडे असतात. सूर्याने द्युलोक सावरून धरला आहे. सूर्य हे देवाचे सुंदर मुख आहे. तो मित्र, वरुण, अग्नी[3] यांचा डोळा आहे. मराठीत एक म्हण आहे. 'जे न देखे रवि ते देखे कवी' रवि म्हणजे सूर्य तो विश्वदर्शन करणारा असतो. मनुष्याची बरीवाईट कृत्ये त्याला दिसतात. सूर्य धन्वंतरी आहे. तो मानवाच्या व्याधी दूर करतो. तो विश्वकर्ता, देवांचा पुरोहित आहे. तो स्वर्णनेत्र, स्वर्णहस्त, स्वर्णभुज (ऋ. १.१३५.६.७१) आहे. तो रक्तवेषधारी आहे. त्याचा रथ सोन्याचा असून दोन प्रकाशमान घोडे तो रथ ओढतात. तो पृथ्वी आणि आकाश यांना प्रकाशमय करतो.

या संदर्भात लोकपरंपरांच्या चिकित्सक अभ्यासक दुर्गा भागवत म्हणतात, [४] 'सूर्य दैवतकथा वेदात उपलब्ध नाहीत. त्याची बारा नावे व काही उल्लेख मिळतात. विस्तृत कथा मिळत नाही. मात्र उत्तर काळात सूर्याच्या अपंगपणाच्या अनेक दैवतकथा उपलब्ध आहेत. परंपरांचेही विश्लेषण सापडते.

**सूर्य अपाद –**

पुराणात काही कथा सापडतात पण त्या त्रोटक आहेत. त्या अशा –

१. सूर्याची भार्या संज्ञा ही विश्वकर्म्याची मुलगी. तिला सूर्याचे तेज असह्य झाले

म्हणून ती निघून गेली. सूर्य तिला शोधायला निघाला. ती त्याला घोडीच्या स्वरूपात दिसली. सूर्याने अश्वरूप घेऊन तिच्या नाकपुडीतून संभोग केला. त्यातून आश्विनीकुमार पुत्र झाले. (हरिवंश ब. ९)

२. त्वष्ट्याने सूर्याला रंध्याने घासून स्वच्छ केले. सुंदर केले पण पाय तेवढे घासायचे राहिले. त्यामुळे तो लंगडा राहिला. सूर्य लंगडा असल्याचा उल्लेख ऋग्वेदात मिळतो. (१.२४.८) (भविष्य पु. ब्राह्मपूर्व ७९.८४) त्यावरून वरील कथा तयार झाली असावी. संपूर्ण सूर्यपरिवार लंगडा आहे. शनी, अरुण, यम इ.

**सूर्यबिंबाचे संकेत –**

प्राचीन वाङ्मयात सूर्य हा एक पक्षी आहे. तो आकाशाच्या या सीमेपासून त्या सीमेपर्यंत उडतो ही कल्पना ऋग्वेदापासून ते पुराणापर्यंत आढळते. सूर्याचे किरण म्हणजे उडणारे पक्षी. याच कल्पनेतून पुढे सूर्यदेवता गायत्री ही पक्षिणी मानली गेली. मात्र ऋग्वेदात आणि नंतरच्या यज्ञीय परंपरेत सूर्याला वैश्विक अश्व मानले गेले. उषा पूर्वेकडून येताना सुंदर अश्व (सूर्य) घेऊन येते असे ऋग्वेदात म्हटले आहे. अश्व याचा अर्थ सर्वव्यापी. सर्वव्यापी अशा प्रकाशवृक्षाचे मूळ म्हणजे सूर्य. सूर्यबिंबात देव राहतात. ते मधाचे आगार आहे. सकाळी यज्ञात आहुती दिली तर देव किरणांतून यज्ञात येतात अशी कल्पना आहे. पुण्यशील मृतांचे आत्मे सूर्यात राहतात असे मानले जाते. त्याबाबत डॉ. स. अ. डांगे लिहितात, ‘नियमन करणाऱ्या सूर्याचा आविष्कार म्हणजे यम, तो प्राणांचे नियमन करतो. त्याचे पाश म्हणजे सूर्य किरणे. यम हा सत्यवानाचे प्राण या सूर्यपाशांनी ग्रहण करतो, पण सूर्याची शक्ती असलेली सावित्री त्याला सोडवते. सावित्री सूर्याच्या अर्जनकर्त्या रूपाची शक्ती होय. सूर्याची उपासना केल्यामुळे ती अश्वपतीची कन्या म्हणून भूमीवर आली असे महाभारत सांगते.

सर्व प्राणिमात्रांना सूर्यापासून चैतन्य मिळते. पर्जन्यवृष्टी करणारा तो. अग्नीला दिलेली आहुती त्याला मिळते. त्यामुळे तो प्रसन्न होऊन वृष्टी करतो व त्यातून अन्न मिळते. अन्नामुळे प्रजा निर्माण होते असे मनुस्मृती सांगते. रविवार हा सूर्याचा वार मानतात. नागर ब्राह्मणात वधू विवाहापूर्वी ७ दिवस सूर्यपूजा करते. राजस्थानात

सूर्याचे महत्त्व खूप. बाळंतीण प्रथम सूर्य पूजा करून मग विटाळ फिटतो. हिमालयाच्या पायथ्याशी मार्गशीर्ष पौषात सूर्यपूजा करतात.

**द्यावा पृथ्वीचा विवाह[५] कोल्ह्याने मोडला –**

ऋग्वेदाच्या कांही सूक्तांत पृथ्वी आकाश यांना पतिपत्नी मानले आहे. 'द्यावापृथ्वी' चा विवाह ठरला. संपूर्ण तयारी झाली. परंतु कोल्ह्याने चलाखी करून हा विवाह मोडला पण त्याबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त केला. कारण द्यावीपृथ्वी एक झाले असते तर सगळे जीव, निसर्ग त्यात चेमटून नष्ट झाले असते.

मानवाने प्रथम देवत्व कल्पिले ते स्त्रीरूपात – सर्जनाची गहन गूढ शक्ती धारण करणाऱ्या देवी रूपात. मातृदेवता ही मानवी संस्कृतीच्या इतिहासातील 'आद्यशक्ती' आहे. तसेच सूर्योपासना ही मानवाच्या सांस्कृतिक विकासास सुरुवात झाली तेव्हापासूनची आहे. केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील बहुतेक देशांतील लोक सूर्यपूजक होते.

**सूर्योपासना जगभर –**

असिरिया व बाबिलोन या प्राचीन देशांत सूर्योपासना होती. बाबिलोन येथे सूर्यमंदिर सापडले आहे. फिनिशियन (पणीन्) सूर्यपूजा करीत. इराणी लोक सूर्याला [६]मिथ्रास (मित्र) या नावाने ओळखत. या मिथ्राबरोबर रश्न आणि नर्शेफ हे पार्श्वचर असत. मिथ्र धर्मीय इराणी भारतात आले. आल्यावर रश्नची राणी झाली. भारतीय लोक धर्मात ती रानूबाई-रांदल, राणूबाई या नावाने पूजली जाते. अलेक्झांडरच्या स्वारीचे वेळी, मूळचे मिडायतले लोक इराणातून भारतात आले. ते सूर्य आणि अग्नी यांचे उपासक होते. त्यांना मग ब्राह्मण म्हणत. शककुशाणांच्या काळातही एक लाट भारतात आली. काश्मीरात पहिले ठाणे उभारले. नंतर पंजाबात मुलतान, पूर्वकिनाऱ्यावर कोणार्क, मध्यभारतात काल्पी येथे सूर्य मंदिरे बांधली. वराहमिहिर हा मगब्राह्मण होता. सूर्यमंदिराचे पुजारी हें मगब्राह्मण असत. तसा दंडक बृहत्संहितेत वराहमिहिराने घालून दिला आहे. सूर्यपूजेशी निगडित 'राज्ञीस्नापन' हे व्रत काश्मीरात पाळले जाते. भूमी ही सूर्यपत्नी आहे अशी समजूत तेथील स्त्रियांची आहे. चैत्र किंवा फाल्गुनातल्या कृष्णपंचमीपासून ते अष्टमीपर्यन्त ती रजस्वला असते. अष्टमीला भूमी सारवून तिथे फुले वाहतात.

यादव काळात सूर्योपासनेचा प्रसार महाराष्ट्रात झाला. सिरिया इजिप्त या देशात सूर्योपासना होती. जपानमध्ये सूर्योपासना होती. मात्र तेथील सूर्य स्त्रीरूपात आहे. बौद्ध धर्म जपानमध्ये स्थिर होण्यापूर्वी तेथे शिंतोधर्म होता. जपानच्या राजघराण्याचे कुलदैवत सवितादेवी होते. अरुणाचल आदिवासींमधील तागीन जनजाती जी [७]अरुणाचलाच्या अगदी वरच्या कोपऱ्यात राहते. त्यांच्यातील सर्वात महत्त्वाचा सण सिदोनी (Sidoni). हा उत्सव अलीकडे ठरवून २ ते ५ जानेवारी होतो. येथे दोनी म्हणजे सूर्य. ती आई-माता आहे आणि सी म्हणजे जमीन. सिदोनीला वेगळे व्हायचे होते. निसर्गाने त्यासाठी १० दिवसांचे व्रत सांगितले. निसर्गाची प्रार्थना सांगितली. लबाड 'तपेन' वटवाघळ याने दोनीला व्रत मोडायला लावले आणि त्यामुळे दोनीला निदोचे - आभाळाचे रूप प्राप्त झाले. या जमातीत 'न्योकुम' ही धरतीची पूजा केली जाते. या सणात सात वनस्पतींची पूजा केली जाते. पोलो म्हणजे चंद्र. तो पुरुष पिता असतो. तर दोनी - सूर्य ही आई. भारतातील ईशान्येकडील जनजातींची ठेवण ही खूपशी म्यानमार-ब्रह्मी लोकांसारखी आहे. त्या पलीकडे गेले की चीन, जपान दोन्ही देशांत बौद्धधर्म स्थिरावला आहे.

या ठिकाणी इ.स. ६०० ते ६४० या दरम्यान होऊन गेलेल्या कनोजच्या हर्षवर्धनाची आठवण येते. तो बौद्ध होता. तरीही गौरी, महेश्वर आणि सूर्य यांची उपसना करीत असे. अरुणाचलातील या जनजाती हिंदू नाहीत वा ख्रिश्चन नाहीत. परंतु त्यांची पूजा पद्धती भारतीय संस्कृतीशी मिळती आहे. धरतीच्या पूजेचे वेळी मिथुन प्राणी मारतात. ती मादी असेल तर तिचे दूध काढीत नाहीत. बळीसाठी मादी चालते.

**आपल्याकडची लावणी पीक वृद्धीसाठी –**

एकूण असे लक्षात येते की प्राथमिक कृषि व्यवस्थेच्या काळातील व्रते, विधी हे धरती आणि वृष्टी यांच्याशी निगडित होते. शेतीचा जसजसा विकास होऊ लागला, बीजाचे महत्त्व लक्षात आले. त्यानंतर व्रतांमध्ये सण... उत्सवामध्ये 'सूर्य' या देवतेला विशेष स्थान मिळाले. व्रतांमधील सामूहिकता, नृत्यात्मकता कमी होत गेली. या ठिकाणी दुर्गा भागवतांचे विधान आठवते' आसमामधील नागानृत्ये, दक्षिणेतील यक्षगान ही शिवपार्वती वा [८]प्रकृतीपुरुषाच्या लीलांची रूपकात्मक अनुकरणे असून

त्यांचा उद्देश या दैवी उपायांनी शेतीभातीची निर्मिती क्षमता कायम राखणे हेच आहे. अर्थात कालौघात हे प्रकार प्रगल्भ झाल्यामुळे त्यांना स्वतंत्र आस्तित्व आले. आपल्याकडच्या लावण्या या मूळ पिकांची वृद्धी होण्यासाठी केलेली अभिचार गीतेच व नृत्येच आहेत यात शंका नाही.''

**सूर्यपूजा कोणाच्यात ? –**

पशुपालन, शिकार हे ज्यांचे आदिम व्यवसाय होते त्यांच्यात सूर्योपासना असेल का ? पेरु देशात खूप सूर्य मंदिरे आहेत. रेड इंडियन सूर्योपासक होते. पहिली शिकार सूर्याला अर्पण केली जाई. मोहंजोदडोत स्वस्तिक, चक्र, किरणयुक्त वर्तुळ, डोळा आणि पक्षी ही प्रतीके आढळली. ती वेदांत सूर्याचे प्रतीक मानली आहेत. महाभारतात सूर्यपूजा आहे. युधिष्ठिर सूर्यपूजक होता. प्रा. र. रा. गोसावींच्या मते ग्रीक, शक, कुशाणांच्या स्वाऱ्या वायव्येकडून झाल्या. या काळात सूर्योपासनेला प्रेरणा मिळाली. मात्र वैदिक परंपरांतून चालत आलेल्या मूळ भारतीय सूर्योपासनेवर परकीय संस्कृतीतील सूर्योपासनेचा काही प्रभाव पडला नसेल असे म्हणता येणार नाही. कनिष्काच्या नाण्यावरील सूर्यदेवतेच्या पायांचा गुडघ्यापर्यन्तचा भाग बुटांनी झाकलेला आहे.

यावरून असे लक्षात येते की वैदिकांच्या दैनंदिन उपासनेतील सूर्यपूजा उत्तरोत्तर भारतभर पसरली. सौर संप्रदायही निर्माण झाला. ही सूर्यपूजा लोकपरंपरेने जमिनीची सुफलनशक्ती वाढावी यासाठी केल्या जाणाऱ्या व्रतांत सहजपणे स्वीकारली. ही देवता अशी आहे की जी वैदिकांच्या नित्यकर्माचा एक भाग होती. परकीय आक्रमणांतून शक, कुशाण, इराण, रोम येथून आलेल्या टोळ्याही सूर्योपासक होत्या. सूर्यपूजा भारतभर रुढ झाली. भारतातील लोकसंस्कृतीनेही तिचा सुरुवातीपासून स्वीकार केला. 'सूर्य' देवतेच्या या वेगळेपणामुळे, लोकदैवतांच्या प्रकरणात या देवतेच्या स्वरूपाची चर्चा न करता, 'सूर्य : भूमी आणि सर्जन ' या प्रकरणात ती विस्तृतपणे केली आहे.

**खंडोबाचा षड्रात्रोत्सव : सटीचे नवरात्र –**

सटीचे नवरात्र मराठवाड्यातील सर्व जातिजमातींच्या अनेक घरांतून कुळाचार म्हणून पाळले जाते. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून चंपाषष्ठीपर्यन्त हे नवरात्र बसते. हे

सटीचे नवरात्र म्हणजेच जेजुरीच्या खंडोबाचा षड्रात्रोत्सव. खंडोबाची मराठवाड्यातील महत्त्वाची ठाणी अशी. नळदुर्ग व अणदूर (धाराशीव), सातारे (औरंगाबाद), साडेगाव (औरंगाबाद), मालेगाव (नांदेड), पाली (बीड). हे दैवत धनगर, हटकर, गवळी, गुरव, मांग, ब्राह्मण, कुणबी आदी सर्व जातिजमातीत पूजिले जाते. खंडोबाचे मूळ नवरात्र सटीचे असले तरी चैत्र, पौष आणि माघ या तीन महिन्यांतील शुद्ध १२ ते वद्य १ असे प्रत्येकी ५ दिवस या दैवताची आराधना केली जाते. खंडोबा ही सकाम भक्तीची देवता असल्याने विविध तऱ्हेने नवस बोलले जात आणि आजही बोलले जातात. त्या नवसाच्या परिपूर्तीनंतर मुलगा वा मुलगी देवास वाहणे, दर्शनासाठी खेटे घालणे, कावडी (पाण्याच्या) घालणे, जागरण, तळी भरणे-उचलणे, दही भाताची पूजा बांधणे, लंगर तोडणे, देवाच्या नावाने 'वारी' (भीक) मागणे, वास्तू (देवळाची दीपमाळ वा ओवरी) उभारणे, बगाड गळ मानेस वा कमरेस टोचून लाकडाला टांगून घेऊन प्रदक्षिणा घालणे, पेटत्या विस्तवावरून चालणे इत्यादी आचार केले जातात. गेल्या काही वर्षांपासून मुरळी सोडण्यास शासनाने बंदी घातली आहे कारण या मुरळ्यांना नंतर वाममार्गास लावले जाते. पूजा बांधताना 'खंडोबाचा येळकोट' सदानंदाचा येळकोट' असा गजर केला जातो. खंडोबाचे विविधतेतून एकात्म झालेले रूप अभ्यासकांपुढे प्रश्नचिन्ह उभे करणारे आहे.

**इळा + कोट : येळकोट –**

हे नवरात्र आश्विन नवरात्राप्रमाणेच भूमीच्या सुफलनशक्तीच्या वाढीशी जोडलेले आहे. या षडरात्रोत्सवातही घट मांडले जातात. 'येळकोट'ची व्युत्पत्ती, इळा + कोट. इळा म्हणजे पृथ्वी, कोट म्हणजे पूर्णपात्र, भरपूर. पृथ्वी म्हणजेच इळा सुफलित होऊन जगरूपी कोठार अन्नधान्याने भरुन जाऊ दे हीं शुभकामना या षड्रात्रोत्सवामागे आहे असे वाटते. या संदर्भात रा. चिं. ढेरे यांच्या लोकदैवतांचे विश्व या ग्रंथातील 'महाराष्ट्राची श्रद्धा केंद्रे' या लेखात ते लिहतात, 'शिवशक्तीचा थोरला मुलगा [१]स्कंद कार्तिकेय. महाराष्ट्राचा लोकदेव खंडोबा तो स्कंदच अशी आपली समजूत आहे. जुन्या काळी स्कंदाचा उत्सव ज्या दिवशी होत असे, त्या दिवसाला मार्गशीर्ष शुक्ल षष्ठीला 'स्कंदषष्ठी' असे नाव होते. त्याच दिवशी खंडोबाचा उत्सव होतो. आज आपण तो दिवस 'चंपाषष्ठी' या नावाने ओळखतो.

स्कंदाला दक्षिणेत देवसेना व वल्ली अशा दोन बायका मानल्या आहेत. खंडोबाला म्हाळसा आणि बाणाई या दोन बायका आहेतच.''

मणी आणि मल्ल या दोन दैत्यांचा संहार करण्यासाठी शिवाने जो अवतार धारण केला तोच मल्हारी म्हणजे खंडोबा होय. अशी कथा 'मल्हारी माहात्म्य' या ग्रंथात आहे. 'येळकोट' च्या व्युत्पत्तीबद्दल रा. चिं. ढेरे लिहितात, ''मल्हारीचे सैन्य सात कोटी होते. सात या संख्येला कानडीत 'येळ'म्हणतात. हा देव मूळचा कर्नाटकताला असल्याने त्याच्या सात कोटी सैन्याचा जयजयकार 'येळकोट' या कानडी शब्दाने केला जातो. ''

खंडोबा ही वीर देवता आहे. घोड्यावर आरुढ होऊन हातात 'खंडा ' घेऊन असुरांमागे धावणारा देव महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेस रक्षणकर्ता वाटतो. खंडोबाचा 'वार' रविवार आहे. त्याच्या नावाने उधळला जाणारा 'भंडारा' म्हणजे पिवळी धम्मक हळद. मुरळी पिवळे वस्त्र परिधान करून कपाळाला भंडारा लावून विशिष्ट पद्धतीने गिरक्या घेत नाचते. मल्लारीचे मल्हारी होते आणि त्याला 'मार्तंड' ची जोड मिळते. 'हरी आणि विठ्ठल' एकरूप झाले तद्वत 'मल्हारीमार्तंड'एक झाले. आणि मार्तंड हे सूर्याचे नाव असल्याचे भारतीय संस्कृतिकोश - खंड दहा- सूर्योपासना या टिपणात नमूद केले आहे. प्रा. र. रा. गोसावी यांच्या मते ऋग्वेदात आदित्य संघातील आणि सौरसंघातील देवता ऐकमेकांच्या संघात विलीन झाल्याचे दिसून येते. दोनही संघात समान असणारे 'तेज' हे तत्त्व या मागील कारण असावे. कश्यप प्रजापतीची पत्नी अदिती हिच्या आठ पुत्रांपैकी 'मार्तंड' हा एक आहे.

**मल्हारी : विविध रूपे –**

खंडोबाला मल्हारी, मैराळ,मैलार, मार्तंड भैरव, मल्हारी मार्तंड, खंडेराय अशी अनेक नावे आहेत. या देवाला वांग्याचे, कांदा लसूण घालून केलेले भरीत, बाजरी वा कणकेचे रोडगे विशेष करून आवडतात. पुरणावरणाचा नैवेद्यही प्रिय आहे. खंडोबाला दवणा आणि भंडारा प्रिय आहे. याच्या चार हातांत खडग, त्रिशूल, डमरु व रक्त गळणाऱ्या मुंडक्यासह पानपत्र अशा चार वस्तू असतात. हे दैवत कर्नाटकातून महाराष्ट्रात आले असावे. या दैवताला प्रसन्न करून घेण्यासाठी अघोरी उपाय करण्याची प्रथा आहे. ही वीरांची देवता आहे. शेती करणाऱ्यांची,

पशुपालन करणाऱ्या धनगरांची, कोळी समाजाची ही देवता आहे. ही देवता शिवाचेच एकरूप आहे असे म्हटले जाते. जेजुरीचा खंडोबा शंकराचा ज्येष्ठ पुत्र कार्तिकेय ऊर्फ स्कंद याचे रूप आहे असे मानले जाते. स्कंधाचे अपभ्रंश रूप खंडोबा असे वि. का. राजवाडे म्हणतात. हा ११ देवांचा सेनापती होता. त्यामुळे तो 'वीरदेव' आहे. महाराष्ट्रातील खंडोबा तामिळनाडूतील सुब्रह्मण्याचा[१०] अवतार आहे असेही मानले जाते. खंडोबाच्या देवळात नंदी, घोडा, कुत्रा यांना महत्त्व असते. खंडोबाला तीन बायका आहेत. म्हाळसा ही प्रथम पत्नी. ती वाणी समाजाची आहे. बानू ऊर्फ बाणाई ही धनगर कन्या आहे तर पालाई ही गवळण आहे. या दैवताची भक्ती आंध्र, कर्नाटक, तामिळनाडूत काही प्रमाणावर चालते. खंडोबाची तांदाळा, शिवलिंग व चतुर्भुज मूर्ती या तीनही रूपांत पूजा होते.

वाघ्या व मुरळी –

या देवाच्या नावाने भीक मागतात. या भीक मागण्याला 'मल्लुखानाची गदा' असा पारिभाषिक शब्द आहे. हा शब्द मुस्लिम आहे. भक्त देवासमोर जातांना घोंगडीची कफनी, गळ्यात कवड्यांची माळ, हातात पोत घेऊन देवासमोर नाचत भंडारा उधळतात, कुत्र्याप्रमाणे भुंकतात. चांगभले – येळकोट – एळकोट मल्हार असा घोष करतात. विवाह, जावळ काढणे या निमित्ताने जागरण केले जाते. रात्री वाघ्या मुरळी नाचून गाणी म्हणतात.

वाघ्याच्या गळ्यात व्याघ्रचर्माची भंडाऱ्याने भरलेली पिशवी अडकवलेली असते, खांद्यावर घोंगडी टाकलेली असते हातात घोळ (लहान घंट्यांचा जोड) असतो. गाणी म्हणताना घोळ मुरळीच्या हातात असतो. ती पिवळ्या रंगाचे नऊवारी पातळ नेसते. कपाळाला हळद माखलेली असते. गाताना एका हाताने घोळ वाजवीत ती गिरक्या घेत विशिष्ट पद्धतीने नृत्य करते. वाघ्या तुणतुणे वाजवीत गाणी म्हणतो. दुसरा खंजिरीवर गाण्याला साथ देतो. अनेक घरांत हा कुळाचार नेमाने पार पाडतात.

देवाला वाहिलेले मूल गुरवाच्या द्वारे भंडारा उधळून, मुलाच्या गळ्यात भंडाऱ्याची पिशवी बांधून वाहिले जाते. महार, मांग, कुणबी आदी समाजात मुले, मुली वाहण्याची प्रथा होती. माझ्या परिचयाच्या व्यक्तीचे काका खंडोबाचे भक्त

होते. त्यांनी तोडलेल्या लंगराचा अत्यन्त जड अशा लोखंडी साखळीचा तुकडा त्यांच्या देवघरात पूजला जातो.

**महाप्रभू चैतन्य आणि इंदिरा [११]–**

मुरळीची प्रथा खूप जुनी आहे. १५१०-११ च्या सुमारास बंगालचे महाप्रभू चैतन्य दक्षिण यात्रेस निघाले असता जेजुरीस आले होते. आईबाप आपल्या मुली खंडोबाच्या पत्नी म्हणून अर्पण करतात हे ऐकल्यावर ते दुःखी झाले. त्यांनी आपल्या करुणामय मधुरवाणीने मुरळ्यांसमोर परमार्थाचा उद्देश विशद करून सांगितला. त्यातील अनेक जणींना पापमय जीवनाबद्दल पश्चाताप झाला. इंदिरानामक मुरळीने जेजुरी सोडली. खंडोबाची गोष्ट नावाचे चोपडे रेव्ह. जे.मरेमिचेल याने प्रसिद्ध केले आहे. त्यात मुरळी करण्याच्या वाईट प्रथेवर टीका केली आहे.

नाथांचे समकालीन [१२]शेख महंमद बाबा यांनी या प्रथेवर प्रखर हल्ला चढविला, ते लिहितात–

मुरळ्या कुलस्वामिच्या दासी । त्यासी रमता कंटाळेत ना अपेशी ।
मल्हारी न करीच काही त्यांशी । कां सत्त्वे सांडवला ?
कुळकन्येस बोल लाविला मल्हारीने । ऐसे विटंबिले त्याच्या देवपणे
तो पूजिल्या केवी तुटती बंधने । लक्ष चौऱ्यांशीची ॥

**लावणी आणि मुरळीची गाणी यातील साम्य : एक अंदाज –**

मुरळीची गाणी खूपशी लावणीच्या जवळ जाणारी आहेत.

वय सोळा कोवळी काया, हूडपणात घुंगरू पाया
लागे नाचाया, लागे नाचाया, लागे नाचाया
पोर बावरी झाली पाहा जेजुरीला जाया ॥
नव्या नव्या वाऱ्याने हिचे भारावले अंग
या अशा वयातच बदलू पाहे दंग
उतावीळ मल्हारीसंगे लगीन लावाया ॥ ....
बाणून करूनिया थाट
शिरी ग भरूनी दुधाचे माठ जी ॥

अशी अनेक मुरळी गीते जी लावणीचा बाज .. लावणीचे वळण दाखवणारी आहेत. या ठिकाणी एक बाब लक्षात येते की, 'गवळणी' चा बाज आणि ठेका मुरळी गीतांसारखा आहे. या लोकपरंपरांशी जोडलेल्या गाण्यांचा कलात्मक आविष्कार 'लावणी'त परिष्कृत झाला. या ठिकाणी दुर्गा भागवतांचे विधान आठवते, लावणी नृत्य हे मुळातले पेरणीपूर्वीचे नृत्य आहे. मुरळ्या मोकळ्या आकाशाखाली अंगणात नाचून 'जागरण' गाजवतात. भूमीची सुफलनशक्ती वाढावी, योग्य प्रमाणात वेळेवर पर्जन्यदृष्टी पडावी यासाठी स्त्रियांनी शेतात, जमिनीवर नृत्य करावे ही विधी-संबद्ध कल्पना वेदपूर्वकाळपासून प्रचलित आहे. खंडोबाचे नवरात्र जमिनीची सुफलता वाढावी यासाठी असते. 'महाराष्ट्र दैवत श्रीखंडोबा'[१३] या राजाराम हरी गायकवाड, बेनाडीकर यांच्या पुस्तकात श्री. ग. ह. खरे यांच्या 'महाराष्ट्राची चार दैवते' पुस्तकातील मत नोंदवले आहे. ते लिहितात, 'खंडोबाची नावे तपासली तर याच्या कल्पनेत शिव, त्याचे एकरूप भैरव आणि सूर्य या तीन देवांचे मिश्रण झाल्याचे प्रतीत होते.'

'मैलार' या खंडोबाच्या नावाबद्दल राजाराम हरी गायकवाड नोंदवतात, 'म' म्हणजे शिव - शुंभु, 'र' म्हणजे विष्णु आणि 'इला ' म्हणजे पृथ्वी (माती) तेव्हापासून त्याच्या मृण्मय मूर्तीला 'मैलार' म्हणतात. 'र' चा 'ळ' होऊन मैराळ म्हणतात.

श्री. बी. ए. गुप्ते लिहितात, 'मार्तंड हे सूर्याच्या अनेक नावांपैकी एक नाव आहे. सूर्य हा प्रचंड प्रकाशपुंज आहे.' त्यामुळे ज्या शिवाने खंडोबाला शक्ती दिली, आणि शिव ही विध्वंसक देवता आहे. त्या शिवाचा खंडोबा अवतार आहे असे समजून घेणे कठीण आहे. खंडोबा हा सार्थीपासून लोकांचे रक्षण करणारा आहे. त्यामुळे ही गोष्ट एक 'सूर्य चमत्कार' आहे असे सुचविण्यात आले आहे.

भारतीय संस्कृतीच्या इतिहासात अनेक निसर्ग देवता, पूर्व वैदिक देवता, लोकदेवता यांच्या समन्वयातून विविध देवतांची नवी रूपे 'सिद्ध ' झाली. या प्रक्रियेतून शिव, स्कंद सूर्य, इंद्र, विष्णु यांच्या प्रभावातून सिद्ध झालेली ही लोकदेवता महाराष्ट्रातील सर्व आर्थिक, सामाजिक स्तरांतून 'कुळाचार' केल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या देवतांत समाविष्ट झाली असावी असे वाटते.

खंडोबाच्या नवरात्रात सुपात साळीचे तणीस ठेवतात. कणसे काढल्यावर खाली जो भाग उरतो त्याला तणीस म्हणतात. त्यावर बाजरीचे दिवे लावतात. तळी भरताना सुपाने तीनदा पाखडल्याची कृती करायची. करताना 'सदानंदाचा येळकोट, चांगभले' असे म्हणायचे. नवरात्राप्रमाणे मातीत बियाणे पेरून घट मांडतात. काहीच्या घरी नवी लहान चौकोनी गादी मांडतात. ४ कोपरे व मधोमध भंडारा ठेवतात आणि येळकोट म्हणत उधळतात. खंडोबाचे घट बसल्याच्या पाचव्या दिवशी नागदिवे असतात. हे दिवे पुरणाचे वा बाजरीचे असतात. सुपात प्रत्येक पुरुषाच्या नावाने नियुक्त केलेला पदार्थ आणि त्यावर दिवा असे मांडतात. घरातील विळा घेऊन त्या दिव्यावर धरतात. हे दिवे शुद्ध तुपाचेच असावेत असा संकेत आहे. त्या विळ्यावर धरलेल्या काजळीला तुपाचे बोट लावून ते काजळ प्रत्येकाच्या डोळ्यांत घालतात. बाजरीच्या उकडदिव्यांना बोने म्हणतात. कांद्यावांग्याचे भरित आणि रोडगा हा नैवेद्य कुत्र्याला वाढतात. भूमीच्या सुफलनशक्तीशी संबंधित व्रते वा सणांच्या नैवेद्यात भाज्यांना, धान्याच्या राशींना विशेष महत्त्व असते. काही घराण्यांत विवाहानंतर प्रथम जेजुरीला जातात. पतीने पत्नीला किमान पाच पावले उचलून न्यायचे असते. 'बेलभंडार' वाहणे ही मुख्य भक्ती असते. हळदीच्या पुडीत खोबऱ्याच्या वाट्या घोळसून तो प्रसाद देतात. घटाजवळ अखंड नंदादीप असतोच. ताटात खोबऱ्याचे तुकडे, हळद, दिवे, कुंकू, अक्षता ठेवून घरातील सर्व जण ते ताट एकाचवेळी उचलतात. त्याला तळी भरणे म्हणतात. ती तीन वेळा उचलून खाली ठेवतात.

**मल्लूखान मल्हारी –**

मल्हारीसाठी मल्लूखान[१४] व अमजतखान ही दोन मुसलमानी नावे आली आहेत. मल्लुखान नाव बीड येथे मिळालेल्या १७ व्या शतकातील एका कोरीव लेखात आहे. जैनपंथातील काहींना मल्लारी म्हणजे तीर्थंकर मल्लीनाथ असे वाटते. जेजुरीच्या मंदिरातील बाहेरच्या कोनाड्यात मल्लीनाथाचा यक्ष कपर्द याची मूर्ती आहे. तिच्याखाली संवत् १३०३ (श. ११६८ इ.स. १२४६) चा उल्लेख असून धल्लक नावाच्या भक्ताने ती मूर्ती बसविल्याचा उल्लेख आहे.

खंडोबाच्या जवळ कुत्रे असते. घोडा-अश्व असतो. अश्व सूर्याचे प्रतीक, नंदी

शंकराला प्रिय, कुत्रे दत्ताला प्रिय. मानवी संस्कृतीच्या विकास - प्रक्रियेत अनेक लोकदैवतांचे एकत्रीकरण झाले. नवे दैवत त्यातून निर्माण झाले. तरीही उपासनेमागची मूळ भूमिका, विधी, अभिचार यातून व्यक्त होत राहिली.

खंडोबाच्या उपासनेत येळकोट, चांगभले, हेगडे, हाळ, बगाड, कोटंबा आदी अनेक शब्द द्रविड भाषेतील आहे. हा देव दक्षिणेतून महाराष्ट्रात आला असावा असे वाटते. खंडोबाची देवळे उत्तरेत नाहीत. जी थोडी फार आहेत ती पेशवे उत्तरेत गेल्यानंतरची आहेत. शिवाजी महाराज होळकर, पेशेव हे मार्तंडाचे उपासक होते.

**येळा आवस : मराठवाड्यात विशेष महत्त्व -**

मार्गशीर्ष अमावास्येस इळाआवस किंवा येळाअमावास्या असे म्हणतात. मराठवाड्याच्या लातूर, उस्मानाबाद, बीड परिसरात ही अमावास्या अत्यन्त श्रद्धेने पाळली जाते. शेतकऱ्याचे संपूर्ण कुटुंब या दिवशी दशम्या-धपाटे घेऊन शेतात जाते. तेथे जेवण करतात. अनेक कुटुंबांत स्वयंपाक शेतात जाऊन शिजविण्याची प्रथा आहे. ज्यांच्या घरी शेत नाही अशांना शेतात जेवणाचे आमंत्रण दिले जाते. आमंत्रण... आवतण चुलीला असते. या जेवणात दशम्या, धपाटे पदार्थ असतातच. दूध, किंचित साखर, तुपाचे मोहन घालून दशम्या करतात. ज्वारी वा बाजरीचे पीठ, डाळीचे पीठ, थोडे गव्हाचे पीठ एकत्र करून त्यांत लसूण, मीठ, मिरची, पालेभाज्या घालून धपाटे करतात. धपाटे हा प्रकार विशेष करून मराठवाड्यातलाच. धपाटे म्हणजे थालिपीठ नव्हे.

**आंबिलीचा मान -**

या दिवशी मान आंबिलीचा असतो. थोड्या ज्वारीचे पिठात लसूण, आद्रक, जिरे, मीठ, तिखट घालून शिजवितात. त्यात ताक घालून घुसळतात. ही आंबिल शेतीशी निगडित सर्व विधींमध्ये व सणांमध्ये महत्त्वाची असते. लक्ष्म्यांच्या पंच पक्वान्नात, पोळ्याच्या दिवशी आंबिल असतेच. मात्र इळा आवसेला मान आंबिलीचा असतो.

इळा आवसेला गाडग्याला चुना आणि काव लावून रंगवितात. त्यात ५ सुपाऱ्या, ५ खारका, ५ खोबऱ्याचे तुकडे, ५ हळकुंड घालून मडक्याच्या.... सुगड्याच्या

तोंडावर नागवेलीचे पान ठेवतात. खरिपाची सुगी नुकतीच झालेली असते. कापलेल्या धान्याच्या तणसांची... काड्यांची कोप तयार करतात, त्यात पाच दगडांना चुना लावून पांडव म्हणून मांडतात. कोपीच्या बाहेर पांडवांकडे तोंड करून कुंती आणि द्रौपदी यांचे दगड मांडतात. त्यांच्या मध्यात रंगवलेले गाडगे ठेवतात. नैवेद्यात कोंडोळी... मुटके (उकडलेले) असतात. यांनाच फळ असेही म्हणतात. बाजरी वा ज्वारीच्या पिठाचे दिवे लावतात. मात्र समोरील द्रोपदी व कुंतीसमोर हे दिवे आणि नैवेद्य ठेवत नाहीत. नैवेद्य ठेवला तरी दिवा मात्र चेतवून ठेवीत नाहीत. नैवेद्यात ज्वारी बाजरीचा खिचडा आणि घुगऱ्याही असतात. इळा आवसेला मांगाला व मांगिणीला बोलावून जेवू घालतात. त्यामुळे बरकत येते. भूमीत भरपूर धान्य येते अशी श्रद्धा आहे.

**द्रौपदी आणि कुंती कोपीबाहेर –**

शेताची पूजा त्या त्या भागातील ऋतुमानानुसार केली जाते. या पूजेत द्रौपदी, कुंतीचे दगड मांडतातच मात्र ते दगड कोपीबाहेर का मांडतात ? हे कोडे मनात अनेक प्रश्न निर्माण करते. शिवाय त्यांना विधिपूर्वक नैवेद्य, द्रोणात आंबिल वाहत नाहीत. समोर दिवाही लावत नाहीत .असे का ? वास्तविक पाहता ही पूजा भूमीची 'इळा' देवीची आहे. हजारो वर्षांच्या मानवी संस्कृतीच्या प्रवाहात, 'देवी' सर्वश्रेष्ठ देवता होती ती दुय्यम झाली. ती कुणा श्रेष्ठ देवाची पत्नी बनली. भूमीचा पती कधी आकाशाच्या रूपात तर कधी सूर्याच्या रूपात कल्पिला गेला. मात्र लोकमानसात 'पार्वती' आदिमाया, लक्ष्मी, गौरी या सर्व देवता 'भूमी' च्या रूपात रुजल्या. लक्ष्मी विष्णुची पत्नी, सरस्वती गणेशाची पत्नी म्हणून कल्पिल्या गेल्या तरी नवरात्रात त्यांची उपासना स्वतंत्रपणे होते. गौरी ही शिवाची पत्नी. तिचे आणि शंकराचे नाते लोककथांतून समान कल्पिले आहे. तिच्या पूजेतही शंकर महत्त्वाचा नसतो.

पाच पांडव शेताच्या पूजेत मांडतातच. पेरणीच्या वेळी, पेरण्या संपल्यानंतर ढवारा करतात तेव्हा पाच पांडव मांडतात. मात्र त्यावेळी कुंती आणि द्रौपदीचे दगड मांडीत नाहीत. इळा आवसेच्या मांडणीत ती भूमीची पूजा असूनही द्रौपदी, कुंती यांना पूजेत फारसे महत्त्व नाही. मात्र भूमीचे प्रतीक म्हणून त्या उपस्थित आहेत. भूमीची ओटी भरण्यासाठी आणलेले सामान द्रौपदीच्या समोर ठेवले जाते. मार्गशीष

पौर्णिमेला भूमी विधवा होते अशी कल्पना कर्नाटकात रूढ आहे. या पौर्णिमेला हौर्त्सुल हुन्नवे (विधवा पौर्णिमा) असे म्हणतात. तर चैत्री पौर्णिमेस सवाष्णीची पौर्णिमा म्हणतात. मार्गशीर्षात पानगळीला प्रारंभ होतो. चैत्रात नवी पालवी फुटू लागते. इळा आवस परभणी, औरंगाबाद भागात मोठ्या प्रमाणावर साजरी होत नाही. परभणी भागात तिला 'इखण आवस' म्हणतात. इखण म्हणजे विळा. शेतीच्या अवजारांची पूजा करतात. भूमीचीही पूजा करतात.

**तेलंगणातील धुरपता आणि इळाआवसेतील द्रौपदी –**

तेलंगण, आंध्रातील धुरपता आणि इळा आवसेच्या मांडणीतील दगडाला चुना फासून केलेली द्रौपदी यांत काही साम्य असेल का ?

गड चांदियाला जाता । धोंड्या धोंड्याला पूजिती

जोड नारळ फोडिती । धुरपता माय ॥

सर्वसाधारणपणे धर्माचे मुख्य असे दोन भाग असतात. एक तत्त्वज्ञानाचा तर दुसरा धर्मविधींचा, हिंदूधर्माची तत्त्वज्ञानाची चौकट भारतभर एकच दिसली तरी धर्मविधीमध्ये प्रांतानुपरत्वे वेगळेपणा आहे. येथील लोकजीवनात आलेल्या टोळ्या, आदिवासी येथे रुजतांना आपल्या वैशिष्ट्यांची भर घालीत गेले. जवळच्या प्रांतांचे लोकाचार एकमेकांत मिसळून गेले. इळाआवसेतली धुरपता ही तेलंगणातून मराठवाड्यात आली असावी. दक्षिण भारतात ज्या अष्टशक्ती पूजिल्या जातात त्यात ही एक आहे. [१५]डॉ. तारा परांजपे नोंदवतात की नांदेड जिल्ह्यातील पूर्वास्पृश्य जमातीचे लोक या देवीला मोठ्या संख्येने पूजतात. मात्र तेलंगणातील धुरपतामाय ही अत्यन्त विकाळ, दारूची भोक्ती आहे. महाराष्ट्रात येताना तिचे रूप द्रौपदीशी मिळते जुळते झाले असावे आणि जोडीला कुंती आली असावी असेही वाटते.

शेतात पूजेच्या वेळी मांडले जाणारे 'पाच पांडव' हा संकेतही आव्हान देणारा आहे.

सायंकाळी चार वाजता दहिभाताचा नैवेद्य दाखवतात. तिळाच्या कांड्याचा हेंडगा करून पेटवतात. तो हातात घेऊन शेताला प्रदक्षिणा घालतात. भोवतालच्या प्राणिमात्रांना बोलावतात. उदा. कोल्ह्यानो या अंबिल पिऊन जा असे म्हणतात.

**मातृसत्ताक व्यवस्था ते पुरुषसत्ताक व्यवस्था : काही दुवे –**

भारतीय एकात्मता अंगभूत आहे. रामानी उत्तर दक्षिणेला जोडले तर कृष्णाने पूर्व पश्चिमेला जोडले. संपूर्ण भारत विविध कला, भाषा-लिपी यांच्या माध्यमातून आजही आपल्या एकात्मतेचे चकित करणारे दर्शन घडवितो असे मांडणारे [१६]डॉ. राम मनोहर लोहिया पांचाली ऊर्फ द्रौपदीबद्दल लिहितात, 'तिच्यापेक्षा श्रेष्ठ अशी दुसरी हजरजबाबी ज्ञानी भारतीय स्त्री नाही' अर्जुनासह पाचही पांडव तिच्यापुढे फिके वाटतात. द्रौपदी ही अत्यन्त बुद्धिमान, हजरजबाबी स्त्री होती.

मातृसत्ताक जीवनपद्धतीचा विकास पाहता असे दिसते की, विवाहसंस्थेचा जो विकास झाला त्यात, मातृकुल संघातील सर्व स्त्रिया या त्या पिढीत असणाऱ्या सर्व स्त्रियांच्या पुत्रपुत्रिकांच्या माता मानल्या जात. त्यांचे पुत्र एकाच वेळी त्यांच्या कन्यांचे बंधू आणि हक्काचे पती असत. सर्व भगिनी हक्काच्या भार्या असत. यमयमीच्या कथेवरून हे आपल्या लक्षात येते. जमिनीवरचा हक्क मातेचा कुळातील महिलांना असे. ऋग्वेदातील एका कथेत बृहस्पतीने आपल्या बंधूची पत्नी ममता हिच्याकडे संभोग मागितला होता. ती गरोदर असल्याने नकार दिला. तेव्हा तिला तुझा पुत्र आंधळा होईल असा शाप दिला. मागणी करणारा व मागणीस नकार मिळताच शाप देणारा पुरुष आहे. आज जी पुरुषकेंद्री कुटुंबसंस्था आहे तिची घडण, मातृसत्ता तिचा जमिनीवरचा अधिकार, उत्पादनात स्त्रीचा असलेला सहभाग यांकडून पुरुषसत्तेच्या दडपणाखाली पुरुषसत्ताक समाजाकडे सुरू झाली. शेतीची मशागत (हातांनी) करण्यात नांगराचा वापर सुरू झाला. या समाजिक बदलांच्या काळात स्त्रीचे महत्त्व कमी व स्थान दुय्यम होत गेले असावे. शेतीच्या अवजारांना ग्रामीण भागात सणंग म्हणतात. नांगर हा पुरुषाच्या जननेंद्रियाचे प्रतीक आहे. स्त्रीलाही ग्रामीण भागात सणंग म्हणतात. ती जणु त्यांच्या मालकीची वस्तू. स्त्रीच्या दुय्यमतेच्या प्रवासातील हा एक टप्पा असावा. अत्यन्त बुद्धिमान स्त्री द्रौपदी, जी कृष्णा - सावळी आहे, ती स्पष्टवक्ती आहे, तिचे समाजातील महत्त्व कमी होत गेले असावे. सीता आणि सावित्री या पवित्र आणि सतीत्वाचा आदर्श असलेल्या स्त्रिया मानल्या जातात. उलट द्रौपदीने अर्जुनावर अधिक प्रेम केले या सबबीखाली ती प्रथम मृत होऊन पडली असे मानले जाते. कुंतीच्या कर्ण, धर्मराज,

अर्जुन, भीम या चारही पुत्रांचे पिता वेगवेगळे आहेत. या वाटचालीत भूमीच्या पूजेत पाच पांडव कोपीत बसवले गेले असावेत का ? त्यांच्या पुढ्यात दिवे लावले जाण्याची रीत आणि कुंती व द्रौपदी त्यांच्याकडे तोंड करून परंतु कोपीबाहेर मांडलेल्या या परंपरा निर्माण झाल्या असाव्यात का ? या सांस्कृतिक प्रवासात 'स्त्रीशूद्रादिक' ह्या शब्दातून स्त्रीचे सामाजिक मूल्य मांडले गेले असावे.

आंध्रातील धुरपदा अत्यन्त विक्राळ, दारूचे हंडेच्या हंडे रिचवणारी आणि मांसाहारी आहे.

आई की ग धुरपताची । बईठक अवघड
पाठीमागं बकरं पडं । हिच्या ग पूजेचं
माय माझी धुरपता । तुजे चालले की बिगारी
म्होरं दारूच्या घागरी, धुरपता माय

**चेटकीण आणि बुद्धिमान स्त्री –**

संथाळ आदिवासींच्यातील एक कथा या ठिकाणी आठवते. पुरुष स्त्रियांना ज्ञानाच्या बळावर सतत सतावीत. स्त्रिया कंटाळल्या. त्यांचा देव डोंगरदेव हा विशिष्ट रात्री पुरुषांना ज्ञान देई. स्त्रियांनी ज्ञान मिळवण्याचे ठरवले. ज्या दिवशी डोंगरदेव... मारंग बुरंग ज्ञान देतो त्या दिवशी स्त्रियांनी पुरुषांना प्रचंड दारू पाजली. ते दारूत धुत्त झाले की पुरुषांचे कपडे घालून त्या डोंगरदेवाकडे गेल्या. डोंगरदेव भोळा. त्याने ज्ञान पुरुषवेशातील स्त्रियांना दिले. तेव्हापासून स्त्रिया अधिक ज्ञानी व कुशल झाल्या. मग पुरुष परत डोंगरदेवाकडे गेले. देव त्यांना रागावला. म्हणाला तुमच्या चुकीमुळे तुमची ही स्थिती झाली. आता मी तुम्हाला हुशार, बुद्धिमान व कुशल स्त्रीला चेटकीण कसे ठरवायचे याची विद्या देतो. तेव्हापासून हजारो कुशल-हुशार, स्पष्टवक्त्या स्त्रियांना चेटकीण ठरवून समाजाने मारले. या अंधश्रद्ध प्रथेविरुद्ध विरसामुंडाने निकराने लढा दिला.

इळाआवसेतील द्रौपदी आणि कुंती या आव्हान देणाऱ्या देवता आहेत. लोकमानसात द्रौपदी इतकी रुजली आहे की विक्राळरूपाची धुरपता ही त्यांनी आपलीच मानली.

इळाआवसेला शेतातील सालदारांना विशेष करून मांग व्यक्तीला सन्मानाने जेवू घालतात. या दिवशी सालदारांनी वा मालकानी पत्नीसह रानात मुक्कामाला राहावे असाही रिवाज आहे.

सारे सण, 'अत्यन्त महत्त्वाचे क्षण ' साजरे करण्यात पुढाकार असतो स्त्रियांचा. स्वतःच्या अखत्यारींत काही गोष्टी त्या सहजपणे त्यात समाविष्ट करतात.पुरुषप्रधान संस्कृतीत 'सौभाग्य' पुरुषकेन्द्री झाले. सवाष्णी व्रतविधीत पुढे असतात. कोपीबाहेर मांडलेल्या द्रौपदी कुंतीपुढे दिवा लावला नाही तरी भूमीच्या ओटीचे सामान मात्र ठेवतात. ही चतुराई 'कर्मठ' स्त्रियांचीच.

**कर्नाटकातील करगा उत्सव –**

इळाआवसेतील किंवा एकूणच शेतीच्या पूजेत ५ दगडांना चुना लावून पाच पांडव म्हणून मांडले जाते व त्यांची पूजा केली जाते. इळाआवसेत द्रौपदी आणि कुंती यांचे दगडही मांडतात. या संदर्भात डॉ. डी. डी. कोसंबी[१७] यांच्या Myth and Reality या ग्रंथात गॉडेसेस ऑफ बर्थ अँड डेथ या परिच्छेदात कर्नाटकात अत्यन्त श्रद्धापूर्वक साजऱ्या होणाऱ्या 'करगा' उत्सवाची माहिती देताना डॉ. कोसंबींनी काही बाबी नोंदविल्या आहेत. १. तिगला समाजाचा हा सुफलीकरणाचा वार्षिक विधी असतो. हा समाज उत्तर अर्काट जिल्ह्यातून आला असून तो बागायती शेती करणारा समाज आहे. २. करगा हा 'कुंभ' असतो. या कुंभासमोर पूर्वी पशुबळी देत असत. अलीकडे एक पशुबळी देतात. बाकीच्या बळींचे प्रतीक म्हणून लिंबे कापली जातात आणि उकडलेले धान्य ज्याला महाराष्ट्रात घुगऱ्या म्हणतात ते समोर ठेवले जाते. शेवटच्या मिरवणुकीत मुख्य प्रतिनिधी जो तिगला पुजारी घराण्यातील असतो, तो डोक्यावर कुंभ घेऊन पुढे असतो. मात्र त्याने स्त्रीवेष परिधान केलेला असतो. त्याच्या पत्नीने त्या काळात त्याच्यापासून दूर, दृष्टीसही न पडता राहायचे असते. प्रत्येक तिगला घरातून एक प्रतिनिधी पुढे येतो आणि धारदार शस्त्राने स्वतःला जखम करून घेतो. मात्र त्यातून रक्त येता कामा नाही. ती एक सत्त्वपरीक्षाच असते. या उत्सवाच्या संदर्भात डॉ. कोसंबी मत नोंदवितात की हा उत्सव आर्यांचा नाही. परंतु गेल्या २०० वर्षांत या उत्सवाचे ब्राह्मणीकरण उन्नयन होऊन तो धर्मराज युधिष्ठिराच्या देवळाशी जोडला गेला आहे. या घटात मंत्रांनी

भारलेली सुवर्णमय शक्ती असून ती द्रौपदीच्या शक्तीचे प्रतीक असल्याचे मानले जाते. तिगला ही निम्नस्तरीय जात मानली जाते. डॉ. कोसंबींच्या मते मुळात हा उत्सव स्त्रियांचा होता. त्यांच्याकडून तो पुरुषांकडे आला असावा. हा उत्सव चैत्री पौर्णिमेनंतर नऊ दिवस चालतो. अलीकडे त्यात काही बदल झाले आहेत. पूर्वी 'करगा कुंभ' तिगला पुजारी हाताने बनवीत असे. अलीकडे तो कुंभार बनवतात. हा कुंभ शेवटच्या दिवशी तळ्यात विसर्जित करतात. मात्र त्यात ठेवलेली, द्रौपदीचे प्रतीक असलेली 'सुवर्णशक्ती' तिगला पुजारी श्रद्धापूर्वक घरी आणतो. पुढच्या वर्षी पुनश्च तिचे आवाहन करण्यासाठी.[१८] 'करगा' कुंभात द्रौपदीची सुवर्णरूपी शक्ती असते. त्या बरोबर पाच चुन्याने रंगवलेली मडकी पांडव म्हणून मांडतात. त्यात साधे व नारळाचे पाणी ठेवतात. या सर्व बाबी 'इळाआवसे' च्या संदर्भात महत्त्वाच्या वाटतात. 'करगा' उत्सव कर्नाटकात साजरा होतो. इळाआवस मराठवाड्यातील उस्मानाबाद, लातूर, बीड या जिल्ह्यांत विशेष करून साजरी होते. या भागात कर्नाटकातील लिंगायत समाज मोठ्या प्रमाणावर स्थिरावला आहे.

**पौषातील रविवारी सूर्यपूजन :**

**संपूर्ण मराठवाड्यातील स्त्रियांचे व्रत –**

मार्गशीर्ष, पौष महिन्यात बोरं, गाजर, आवळे, चिंचा यांचा मोसम असतो. रबीची पिके पोटऱ्यात येत असतात. या काळात शेताला ओलावा दवाच्या रूपाने मिळतो. या महिन्यात विवाह संस्कार करीत नाहीत. पायाचा दगड रोवण्यास हा महिना योग्य मानतात. या महिन्याला शून्य महिना म्हणतात. मराठवाड्यातील प्रत्येक घरातील स्त्री, सर्व जातिजमातीतील स्त्रिया या महिन्यातील दर रविवारी सूर्यपूजा करतात. खानदेशात रविवारी आदित्यराणूबाईची पूजा श्रावणात करतात. मराठवाड्यात मात्र हे व्रत, सर्व स्तरांतील स्त्रिया 'पुसातले रविवार करतात. स्त्रिया पहाटे उठून सूर्याचे पहिले किरण पृथ्वीवर येण्याआधीच नाहतात. सूर्याची रांगोळीची प्रतिमा पाटावर मांडतात. लिंगायत समाजात रांगोळीऐवजी भस्माचा वापर करतात. सूर्याशेजारी गंगा आणि गौरी काढतात. या गंगा व गौरी सूर्याशेजारी कशा हे एक कोडे आहे. सूर्याशेजारी उषा, प्रत्युषा, संज्ञा व छाया यांपैकी असाव्यात. पुराणानुसार राज्ञी व निक्षुंभा या सूर्यपत्नी आहेत. भारतीय लोकधर्मानुसार रण्णा सण्णा ही जोडनावे

येतात. (राज्ञी व संज्ञा या नावाचे द्योतक) परंतु पुसातल्या पूजेत मराठवाड्यात वेगवेगळ्या जातीत वेगवेगळी रीत दिसते. मराठा समाजात पाटावर चंदनाचा सूर्यनारायण काढतात. शेजारी नागवेलीच्या पानावर राणूबाई काढतात. ब्राह्मण समाजात रांगोळीने फक्त सूर्य काढतात. बहुजन समाज, मांग समाज यात सूर्याशेजारी रांगोळीचीच राणूबाई काढतात. सूर्य प्रतिमेस हळदी-कुंकू, खोबरे, खारीक पानसुपारी वाहतात. आदित्याराणूबाईची कथा ऐकण्यासाठी जवळपासच्या महिला एकत्र येतात. कहाणी ऐकल्यावर जेवण करतात. एकवेळ निरंकार करतात. काही जणी दिवसभर उपास करतात. सूर्यास्ताच्या वेळी खडीसाखर खाऊन पाणी पितात. काही स्त्रिया दिवसभर उभ्या राहतात. जमिनीवर बसत नाही. त्यादिवशी विळीवर चिरत नाहीत. रवीने ताक घुसळीत नाहीत. सूर्याच्यावर चंद्र चांदण्या काढतात. स्त्रिया दिवसभर केस विंचरीत नाहीत. तसे केले तर केस सूर्याच्या तोंडात जातात अशी श्रद्धा ग्रामीण भागातील स्त्रीमनाची आहे. मार्गशीर्षापासून आरंभ करून प्रत्येक रविवारी सौरव्रत करावे असे हेमाद्रीने सांगितले आहे. मराठवाड्यातील अनेक स्त्रिया हे सौरव्रत मार्गशीर्ष ते फाल्गुनापर्यंत करतात. पौषाला भाकडमासही म्हणतात.

**पौषातील महत्त्वाचा सण मकरसंक्रात –**

संक्रान्तीच्या आदल्या दिवसाला भोगी म्हणतात. महाराष्ट्रात संक्रान्त थाटात साजरी होते. संक्रान्तीपासून रथसप्तमीपर्यंत हळदीकुंकू समारंभ थाटात केला जातो. या दिवशी स्त्रिया सवाष्णींना वाण वाटतात.

सक्रान्तीच्या आदल्या दिवशी भोगीला १२ भाज्यांची, मिसळीची भाजी, राळ्याचा भात, बाजरीला तीळ लावून केलेली भाकरी असा बेत असतो. शेतात भाज्या भरपूर असतात. गाजर, वांगी, टमाटे,मेथी, तांदूळजा, पालक, अनेक भाज्या... या खास बेताचा नैवेद्य देवाला दाखवतात.

संक्रांतीला ५ सुगडी आणतात. त्यांना काव, चुना लावून रंगवतात. झाकणी एकच असते. या सुगड्यात तीळ, तांदूळ, टहाळ,उसाचे करवे इत्यादी टाकतात. त्या सुगड्यांवर खण टाकतात. त्यांची पूजा करतात. सुगडी घेऊन वाणवसा घेऊन देवळात जातात. तिथे सवाष्णींची हळदकुंकू लावून पूजा करतात. देवीला रुक्मिणीला वाणवसा लुटतात. त्यानंतर इतर सुवासिनींना सौभाग्यवाण देतात. बरोबरची सुगडी

अत्यन्त जपून न्यावी लागतात. सुगडे वेशीत फुटणे अशुभ मानले जाते. या परिसरात असे मानले जाते की महार स्त्रीच्या हातून वेशीत सुगडे फुटले म्हणून तिला हळदीकुंकू लावून वाण देत नाहीत आणि मांग स्त्रीला मात्र आवर्जून गाठले जाते व तिला वाण वंसले जाते. ही प्रथा मराठवाड्यात ऐकली. अर्थात ती सर्वत्रच असेल असे नाही. सुगड्यातील तांदूळ, टहाळ, बोरे इ. बीजरूपी[१९] सूर्याचे प्रतीक असावेत.

पेरणी, इळाआवस, ढवारा शेतीशी निगडित विधींत मांग समाजाच्या व्यक्तीला विशेष मान असतो. महाराष्ट्रात संक्रान्त सणास तिळगुळास विशेष महत्त्व असले तरी हा सण दक्षिणेत विशेष उत्साहाने आणि भूमीच्या सुफलतेशी जोडून साजरा होतो. आंध्रात ज्येष्ठी पौर्णिमेचा एरूवाक् हा सण शेतीच्या उद्‌घाटनाचा तर संक्रान्ती हा समारोपाचा असतो. या वेळी कापणी होऊन धान्य घरात आलेले असते. साळीचा दुसरा हंगाम संपलेला असतो. ज्या चांद्रमासात सूर्याचे मकरसंक्रमण होते तो पौष महिना. पहिले मकरसंक्रमण होते तेव्हा उत्तरायण सुरू होते. दुसरे कर्कसंक्रमण दक्षिणायनाचा आरंभ सूचित करते. महाराष्ट्रात संक्रान्तीला मुली मुगाची डाळ व तांदूळ एकत्र करून एकमेकींकडे जातात. प्रत्येकाच्या घरी पाट मांडलेला असतो. त्यावर ते मिश्रण मूठमूठ ठेवतात. तिळगुळ घेऊन वडील माणसांना अभिवादन करतात. राजस्थानात या दिवशी सकाळी सुस्नान होऊन देवीला जाऊन तिला वाणवसा देतात. राजस्थानात देवीसमोर वाणाच्या १३ वस्तू ठेवून पूजा केली जाते. नंतर त्या सवाष्णींना देतात. त्याला 'तेरुंडा' असे म्हणतात. महाराष्ट्रात विवाहनंतरच्या पहिल्या वर्षी नारळाचे वाण देतात. नंतर हळदीकुंकू, हिरव्या बांगड्यांचा चुडा अशा सौभाग्य वस्तू वाण म्हणून देण्याचा रिवाज आहे. आंध्रात संक्रान्तीला मुली शेणाचे गोळे करुन त्याला हळदीकुंकू वाहतात. त्याला फूल खोचतात. ते गोळे रांगोळीवर ठेवून भोवती फेर धरून नाचतात. त्याला गोब्बम्मा म्हणतात. संक्रान्तीच्या दुसऱ्या दिवशी शेतकरी गोठा साफ करतात. गुरांना सजवतात. नव्या धान्याची खिचडी खातात.

संक्रान्तीचे शेतीशी असलेले नाते महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात फारसे जाणवत नाही. जे जाणवते ते मिसळीची भाजी, खिचडी, तिळगुळाच्या तेलाच्या, भाकरी या अन्नप्रकारातून. या दिवशी ५ सुवासिनीस गहू, तीळ कापूस, उसाचे कांडे घालून

सुगडी देतात. या प्रथेतील सुगड मातीचे असून ते कुंभाकार असते आणि कुंभ हा सुफलतेचे प्रतीक आहे.

दक्षिणेत.... तामिळनाडूत यालाच पोंगल म्हणतात. भोगीला वर्षाऋतूचा देव इंद्र याची पूजा असते. संक्रान्तीला सूर्य पोंगल असे म्हणतात. दूधतांदूळ शिजवून 'पायसम् ' करतात. 'पोंगल पोगंल' असे ओरडून खिर शिजली का असे एकमेकांना विचारतात. एकमेकांना शुभेच्छा देतात. महाराष्ट्रात आम्ही 'तिळगूळ घ्या आणि गोड बोला' असे म्हणून शुभेच्छा देतो. प्रेम द्या प्रेम घ्या हे सांगणारा हा सण आहे . मकरसंक्रान्तीचे वाणवसा लुटणे, हळदीकुंकू समारंभ करणे रथसप्तमीपर्यन्त चालते. रथसप्तमीला रथात बसलेल्या सूर्याची पूजा केली जाते. रथसप्तमी महत्त्वाचे व्रत मानले जाते. मानवी जीवनाच्या विकासाचे पर्व सुरू झाले तेव्हापासून मानवी जीवनास सुखमय करणाऱ्या तीन देवतांची पूजा होते. वर्षनाची देवता इंद्र, प्रकाश देणारा सूर्य आणि सर्जनातून अन्नसमृद्धी देणारी भूमी या त्या तीन देवता. रथसप्तमीला व्रतस्थ राहून सूर्यपूजा केली तर आरोग्य लाभते असे लोकमानस मानते. बावचा नावाची शेतात सापडणारी वनस्पती वाटून ती डोक्याला लावून संक्रान्तीला नाहतात. महाराष्ट्रात सात अश्वांचा रथ् रांगोळीने काढून त्यात सूर्यनारायण बसले आहे असे दाखवितात. त्या प्रतिमेची पूजा करतात. या दिवशी गव्हल्याची खीर करतात या व्यतिरिक्त महाराष्ट्रात ती वेगळ्या रीतीने साजरी केली जात नाही. सूर्यपूजा इराणमधून शकहूणांकडून भारतात आली असे मानतात. श्रीकृष्ण पुत्र सांब[२०] याला कुष्टरोग होता. सूर्यपूजा करण्याचे त्यास सांगितले होते. सूर्यपूजा करण्यासाठी त्याने शाकद्वीपातून मग नावाचे ब्राह्मण आणविले होते. वराह मिहिर हा मग ब्राह्मण होता. रथसप्तमीला संक्रान्त सणाची समाप्ती होते.

### होळी : हुताशनी पौर्णिमा –

### फाल्गुनातील वसंतोत्सव –

फाल्गुन पौर्णिमेला हुताशनी पौर्णिमा म्हणतात. फाल्गुन हा दक्षिणेत शेवटचा महिना मानला जातो. चैत्रप्रतिपदा हा वर्षारंभाचा पहिला दिवस फाल्गुन कृष्ण प्रतिपदेस वसन्तोत्सवाला प्रारंभ होतो. पंचमीला रंगपंचमी असते. फाल्गुन महिन्यास

वसंतऋतुचा पहिला महिना आणि कामदेवाचा प्रिय मित्र मानले आहे. पौषानंतर येतो माघ आणि माघानंतर फाल्गुन. 'अश्वत्थाची पाने' या ग्रंथात डॉ. स. अ. डांगे नोंदवतात, 'मकरसंक्राती हल्ली जरी पौषात येत असली तरी पूर्वी ती माघ महिन्याच्या अमावास्येस पडत असे (कौषितकी ब्रा. १९.३) दुसऱ्या गणनेनुसार ती फाल्गुनात येई (तैत्तिरीय सं. ७.४.८.१.२) फाल्गुनातील पूर्णचंद्र, वर्षाचे मुख मानला जाई... घटात वाण देण्याची प्रथा सूचक अशी आहे. तेव्हा 'घटे अर्कः' म्हणजे 'सूर्याचे पृथ्वीच्या घटयोनीतील बीजारोपण' हे समीकरण निश्चित झाले. हा काळ वर्षातील अत्यन्त महत्त्वाचा काळ मानला जाई. हा काळ सूर्याचे बीज पृथ्वीत येण्याचा काळ. बीजारोपणाचा काळ. जमीन भाजली की तिच्यातली उर्वराशक्ती, सुफलनशक्ती वाढते अशी आजही शेतकऱ्यांची श्रद्धा आहे. (डॉ. स. अं. डांगेंनी 'होलाष्टकोपनिषद' या हस्तलिखिताचा परिचय करून देण्याच्या निमित्ताने लेख लिहिला होता.)

**धुळवडीमागील भूमिका –**

या हस्तलिखितात होळीच्या दुसऱ्या दिवशी चौरस्त्यावर जाऊन शिव्या देणे, विचित्र पोषाख केलेल्या माणसाला गाढवावर बसवून, त्याचे तोंड काळे करून धिंड काढणे असे प्रकार केले जातात असे लिहिले आहे. त्यामागे जमिनीच्या सुपीकतेला मारक ठरणाऱ्या दृष्ट देवतांना दूर सारण्याची कल्पना आहे. सूर्यबीज धारण करताना पृथ्वीची सुपीकता वाढावी हा हेतू आहे. हे होत असताना इडापिडा टळावी या भूमिकेतून शिव्या देणे, धिंड काढणे आदी प्रकार केले जातात. 'कुम्भ' राशीत सूर्य प्रवेश करतो तो काळ बीजरोपणाचा असून या तत्त्वाचा व्याप अश्वमेघापासून ते होलिका उत्सवापर्यन्त आहे असे डॉ. स. अं. डांगे[२१] आवर्जून नोंदवतात.

**होळीची राख आणि बीजातील सुफलता –**

होळी शेणाच्या गोवऱ्या, लाकडे यांची पेटविली जाते. होळीची राख अत्यन्त सुफल असते. होळीची राख टोपली भरुन आणायची आणि तिच्यात चांगली कणसे विविध प्रकारच्या भाज्या, भोपळे यांच्या बिया काढून घोळसायच्या आणि त्या मडक्यात घालून ठेवायच्या. उरलेली राख मातीत मिसळून आळी तयार करून ठेवायची. सुमारे दीड महिन्यांनी अक्षय्यतृतीयेस या बिया अंगणात, परसात टोचतात.

या बियांची आणि जमिनीची सुफलन शक्ती होळीच्या राखेमुळे वाढते अशी कल्पना ग्रामीण परिसरात आहे. आजही घरातील स्त्रिया अंगणात, परसात या बिया टोचतात. त्यातून भरपूर भाजीपाला येतो.

या ठिकाणी एक नोंद करावीशी वाटते. स्त्रिया आणि भाजीपाला यांचे अतूट नाते आहे. भूमीच्या सुफलनशक्तीच्या वाढीशी जोडलेल्या व्रतात भाज्यांचे, मिसळीच्या भाज्यांचे विशेष महत्त्व असते. हा उत्सव मराठवाड्यात अत्यन्त उत्साहाने साजरा होतो. होळी पौर्णिमा ते रंगपंचमी हे सहा दिवस वसंतोत्सवाचे असतात. होळीचा नैवेद्य पुरणपोळीचा असतो आणि नैवेद्य सायंकाळी दाखविला जातो. धुळवडीच्या दिवशी होळीच्या राखेने अंग घासल्यास उन्हाळा बाधत नाही असा समज ग्रामीण भागात रुढ आहे. या काळात महाराष्ट्रात 'वीर' नाचतात.

'नाच रे वीरा नाच नाच । होळीला गौऱ्या पाच पाच' असे म्हणत वीर नाचून गौऱ्या, लाकडे गोळा करतात. महाराष्ट्रात माघी पौर्णिमेस एरंडाचे झाड, ज्या जागी होळी पेटवायची असते त्याजागी रोवतात. 'वीर ' हा यक्षाचे प्रतीक असतो. यक्षोपासनेचा प्रभाव भारतभर आहे . यक्ष वृक्षावर राहतात असा समज रुढ आहे. होळीप्रमाणेच 'धुळवड' सामूहिकरीतीने खेळली जाते, 'धूलिवंदन' या नावाने त्याचे संस्कृतीकरण केले तरी प्रत्यक्षात प्राकृत पद्धतीने धुळवड खेळली जाते. होळीच्या सायंकाळी बोंबा मारणे, शिव्या देणे हे प्रकार धार्मिक परंपरेचा एक भाग म्हणून केले जातात.

**होळी भारतभर साजरी होते –**

अनेक परंपरांच्या मिश्रणातून संकरातून आजच्या होळीचे रूप सिद्ध झाले आहे. आदिम अवस्थेतील मानवाला 'अग्नी'चा शोध लागला आणि अनेक संकटांतून तो मार्ग काढू शकला जंगली क्रुर श्वापदांपासून, स्वतःचे रक्षण करण्यापासून ते थेट थंडी पाऊस या नैसर्गिक संकटापासून रक्षण करण्याचे काम अग्नीने केले. अग्नी हा अत्यन्त महत्त्वाचा मानला गेला. शतपथ ब्राह्मणात पृथ्वीला ग्रगर्भा' म्हटले आहे. ज्याप्रमाणे माता पुत्राला गर्भाशयात धारण करते. त्याप्रमाणे पृथ्वी अग्नीला आपल्या पोटात धारण करते. (श. ब्रा. ६-५-१-११) अग्नी आणि आदिम मातृदेवता पृथ्वी

यांचा समन्वय संस्कृतीच्या विकासात घातला गेला. कारण मानवाचे जगणे अग्नीमुळे सुखकर झाले. अग्नी सान्निध्यात अपत्य निर्मितीही चांगली होते हे आदिमानवाच्या लक्षात आले. भूमी सुफलित करायची तर स्त्री-पुरुष समागमाची कृती नक्कल म्हणून करावी. पुनःपुन्हा जाणीवपूर्वक केलेल्या या कृतीला मग विधी रूप येते. हे विधी प्रतीकात्म होतात. प्रत्यक्ष स्त्री-पुरुष संयोग झाला नाही तरी तद्वाचक[२२] शब्दं त्यानिमित्ताने उच्चारले जातात. कारण कृतीप्रमाणे त्या शब्दातही सामर्थ्य असते. जे भूमीच्या सुफलीकरणास साहाय्यभूत ठरते.

होळी वसंत ऋतूच्या आगमनाची नांदी असते. वसंतात सृष्टी विविधरंगी, फुलांच्या बहराने बहरून जाते. झाडे कोवळ्या पालवीने झुलू लागतात. जणु या पुनर्निर्मितीच्या काळासाठी, सुफलीकरणास पोषक ठरणाऱ्या शिव्या... अश्लील शिव्या लाभदायक असतात ही भूमिका होळी उत्सवाच्या... रंगोत्सवाच्या पाठी असते. अग्नीच्या साक्षीने होणाऱ्या या सुफलीकरण विधीची स्पष्टीकरणे डॉ. देवीप्रसाद चटोपाध्याय, डी. डी. कोसंबी, फ्रेजर मॅलिनोव्हस्की आदी पौर्वात्य व पाश्चिमात्य समाज - मानव शास्त्रज्ञांनी दिली आहेत.

होळी हा विधी प्रागैतिहास काळात स्त्रीने करावयाचा स्त्रीप्रधान विधी असल्याचे डॉ. डी. डी. कोसंबींनी आपल्या 'कल्चर अँड सिव्हिलायझेशन ऑफ एनशंट इंडिया' या ग्रंथात नोंदविले आहे आणि त्यात काही नवल नाही. शेतीचा शोध स्त्रीने लावला. शेतीशी निगडित विधींत स्त्रीप्रधानता आहेच.आदिम काळात या विधींचे पौरोहित्य स्त्रीकडे असे. आज पुरुषप्रधान समाजात या विधींचे पौरोहित्य पुरुषांकडे आले तरी अनेक विधींत पुरुष स्त्रीवेश धारण करून ते विधी करतो.


पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा बसताना कृष्णानेच राधारूप घेतले अशी स्पष्टीकरणात्मक कथा - मिथ् - निर्माण झाली. होळी उत्सवात उत्तरेत स्त्रिया उन्मुक्तपणे सहभागी होतात. या काळात गायली जाणारी गाणी विप्रलंभशृंगाराची असतात. राधा ही स्त्रीतत्त्वाची प्रतिनिधी असते तर श्रीकृष्ण पुरुषतत्त्वाचे प्रतिनिधित्व करतो. डॉ. तारा भवाळकर नोंदवितात. 'नितांत शृंगारिक, क्वचित् अश्लीलतेच्या पातळीवर पोहोचणारी ही गीते अदिम सुफलीकरण विधीतील आज अश्लाघ्य समजल्या जाणाऱ्या उच्चारांचा उत्तरकालीन आविष्कार आहेत.'

### चैत्र : चैत्रगौर –

चांद्र वर्षाचा पहिला महिना म्हणजे चैत्र या महिन्याच्या पौर्णिमेला वा आगे मागे चित्रा नक्षत्र लागते. त्यावरून या महिन्यास चैत्र हे नाव मिळाले आहे. या महिन्यापासून वसंत ऋतू सुरू होतो. शिशिर ऋतूत पर्णहीन झालेल्या झाडांना कोवळा मोहर फुटू लागतो. फुलझाडांचा बहर पूर्णत्वाला पोहोचतो. पृथ्वीचे 'गंधवती धरा' हे विशेषण सार्थ होते. चैत्र शुद्ध प्रतिपदेस संवत्सरास प्रारंभ होतो. या दिवसाला महाराष्ट्रात पाडवा म्हणतात. घराघरावर गुढ्या उभारतात. या दिवशी मराठवाड्यात महाराष्ट्रात कडुलिंबाची कोवळी पाने, गूळ, गोमूत्र, हरभऱ्याची डाळ यांचा घोळाणा करतात. तो प्रसाद म्हणून घरातील वडीलधारी व्यक्ती सर्वांना देते. प्रतिपदेला जो वार असेल तो शुभ मानला जातो. त्याला वर्षेश समजतात. याच दिवशी चंडिकेचे नवरात्र सुरू होते. गार पाणी भरलेले माठ पाणपोईत ठेवण्यास सुरुवात करतात. स्त्रियांचे महत्त्वाचे व्रत चैत्रगौर तृतीयेपासून सुरू होते. अशी श्रद्धा आहे की गौरी शंकरासह माहेरी येते. तिचे शंकरासह पूजन करतात. या दिवसापासून महिनाभर दोलोत्सव सुरू होतो. तृतीयेला गौरीला देव्हाऱ्यात झोक्यावर बसवितात व तिची पूजा करतात. चैत्र तृतीया ते अक्षय्यतृतीयेच्या दरम्यान सोयीनुसार घराघरांतून चैत्रातले हळदीकुंकू केले जाते. शक्यतो मंगळवारी, शुक्रवारी हा सोहळा सजवतात. कारण देवीचे मंगळवार आणि शुक्रवार मानले आहेत. या दिवशी सवाष्णी व कुमारिकांचा हळदीकुंकू , चंदनाचा हातावर लेप लावून, पाय धुऊन, अत्तर लावून सन्मान करतात. भिजवलेल्या हरभऱ्याची ओटी भरतात. कैरी घालून केलेली आंब्याची 'डाळ व पन्हे' देतात. गौरी या काळात माहेरी येते. गौरीची सजावट लक्ष्म्यांच्या, भाद्रपद गौरीच्या सजावटीप्रमाणे देखणी असते. विविध प्रकारची फळे, लाडू, अनारसे, करंजा, चकल्या आदी पुढ्यात सजवून मांडतात. कोकणात 'गौरीचे माहेर' नावाचे गाणे म्हणण्याची प्रथा आहे. गौर मैत्रिणीबरोबर खेळून, झोके घेऊन अक्षय्यतृतीयेला परत माहेरी जाते.

चैत्रात अंगणात एकेक कोपरा सारवून त्यावर नवनव्या रांगोळ्या घालण्याची प्रथा कोकणात अधिक आहे. त्याला चैत्रांगण म्हणतात. चैत्रांगणात गौरीची पावले, पंखा, सूर्य , चंद्र, तुळशी वृदांवन, एकमेकींचे हात धरून नाचणाऱ्या मुली इ. आकृत्या काढतात. या ठिकाणी डॉ.डी.डी. कोसंबींच्या 'मिथ अँड रिॲलिटी' या

ग्रंथात पान क्र. ६९ वर २.६ हे चित्र आहे . महेश्वरजवळील नावडा-टोलीजवळ भांड्याचा तुकडा मिळाला त्यावर सुमारे इ.स. पू. १६०० वर्षे रंगवलेले नृत्य करणाऱ्या मुलींचे हे चित्र आहे. त्यासंदर्भात डॉ. डी. डी. कोसंबी नोंदवतात '.... girls still dance hataga dance as shown here' कुमारी मुलींनी 'भूमीवर (हादगा) नृत्य केल्याने भूमी सुफलित होते, पाऊस येतो या पुरातन श्रद्धा स्त्रियांच्या व्रतांतून आपले अस्तित्व दाखवितात.




चैत्रांगणातील नृत्य करणाऱ्या मुलींचे चित्र भारतीय संस्कृतिकोश खंड ३ यात ४६४ पानावर आहे. त्यातील मुलींची हात धरण्याची पद्धत आणि त्या भांड्याच्या तुकड्यावरील नृत्य करणाऱ्या मुलींच्या चित्रात खूप साम्य आहे. जे पाहणाऱ्याला चकित करते. चैत्रात गौरीच्या हळदीकुंकवाच्या वेळी कुमारिकांची पूजा करण्याची पद्धत आजही आहे. संदर्भाचे हे अंधुक दुवे जोडणे हे एक आव्हानच आहे.



चैत्रांगणातील नृत्य करणाऱ्या मुली

**गणगौर .... राजस्थानातली –**

चैत्रगौर कर्नाटकातही मांडली जाते. महाराष्ट्राप्रमाणे आरास करतात. स्त्रियांची भिजविलेल्या हरभऱ्यांनी ओटी भरतात. राजस्थानात गणगौर सामूहिकपणे साजरी करतात. राजस्थानात होळी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी चैत्र मास सुरू हतो. या दिवशी म्हणजेच चैत्रकृष्ण प्रतिपदेच्यादिवशी (महाराष्ट्रातील फाल्गुन कृष्ण



'गणगौरी'चा मांडणा

प्रतिपदेस) गणगौर बसते. या दिवशी होळीच्या राखेचे १६ मुटके करतात, शेणाचे १६ मुटके करतात. भिंतीला १६ हळदीचे आणि १६ कुंकवाचे टिकल्या, ठिपके काढतात. या ठिपक्यांच्या खाली राख व शेणाचे १६ मुटके मांडतात. हे मुटके गौरीचे प्रतीक. पहिल्या दिवशी या गौरीची पूजा गव्हाच्या ओंब्यांनीच करतात. दुसऱ्या दिवशी हळदीने पूजा करतात. सातव्या दिवशी काजळाचे १६ ठिपके भिंतीवर काढतात. त्याच दिवशी २ कुंड्या वा मडकी चुना व कावेने रंगवून त्यात गहू, साळ, सरकी, ज्वारी, हरभरा, तूर, जवस आदि ७ प्रकारची धान्ये पेरतात. दुसऱ्या दिवशी ज्वारीच्या कणसाला पांढरा दोरा बांधून गौरीच्या मुटक्याजवळ ते कणीस ठेवतात. त्याला शंकर म्हणतात. दुसऱ्या कणसाला केसाचा गुंता आणि मोळी (लाल पिवळ्या रंगाच्या दोऱ्याला मोळी म्हणतात) बांधतात. ती पूजेत आवश्यकच असते. ती शुभकारक असते, तिला गौर म्हणतात. ७ व्या दिवशी पाटावर गहू टाकून त्यावर कुंड्या ठेवतात. त्यांची रोज पूजा होते. जवळच्या विहिरीवर जाऊन मिरवत कळशीने पाणी आणतात. ते कुंड्यात टाकतात. या गौरीला चुर्म्याचा नैवेद्य लागतो. अमावास्येच्या दुसऱ्या दिवशी शंकर गौरीला घ्यायला येतो. या दिवशी सर्व जणी सामूहिकपणे विहिरीवर जातात. दोन घागरीत पाणी आणतात. एक कळशी शिव तर दुसरी गौरी. त्यांचा विवाह लागतो. सात फेरे होतात. मग या कळशा कुंड्यांपाशी ठेवतात. तृतीयेला म्हणजेच महाराष्ट्रात ज्या दिवशी गौर माहेरी येते. त्या दिवशी, गणगौरीचे विसर्जन होते. पिठात गूळ घालून १६ फळ, त्रिकोणी अकाराचे छोटे छोटे मुटके तळतात. कंगवा, डबी अशी शृंगारसाधने या पिठाची करून ती तळतात. ती तळलेल्या डबीत ठेवतात. या डबीत ८ फळे ठेवतात. डबी बंद करतात. या दिवशी जेवणात हिरवी भाजी लागतेच. राजस्थानात, महाराष्ट्रातील खेड्यांत मेथी, हरभऱ्याची हिरवी भाजी वाळवून ठेवण्याची प्रथा आहे. मुलीच्या विवाहानंतर या व्रताचे उद्यापन

करतात. १८ सवाष्णींना जेवण देतात. प्रत्येकीची नारळाने ओटी भरतात. या पूजेत लिंबाचे... निंबाचे महत्त्व असते. पाण्याच्या घागरीत लिंबाच्या डहाळ्या ठेवतात. राजस्थानातील स्त्रियांच्या व्रतांत लिमडी मातेला लिंबाच्या झाडाला विशेष महत्त्व असते.

राजस्थानात गणगौरीची पूजा करताना खालील गीत उच्चारतात -

गौर गौर गोमती
ईसर पूजा पारबती
म्हे पूजां आलानिला
गौर का सोना का टिका
म्हाकं हे कुकूका टिका
टिका दे टमका दे रानी
वरत करे जो राजारानी

गौरी मागे 'गण' हे विशेषण वा शब्द येतो. महाराष्ट्रात गौरीगणपती एकदम येतात. या शब्दांतून सूचित होणारे संकेतही एका दिशेने जाणारे आहेत. महाराष्ट्रातही चैत्रगौरीच्या पूजेच्या वेळी वेळणीत वा कुंडीत धान्य पेरतात. अशाच प्रकारची गणगौर राजस्थानाप्रमाणे हरियाणातही पूजीली जाते. ही पूजा सामूहिकरीतीने साजरी करतात. मातीच्या गौरी व गौरा (शंकर) यांचे मिरवत, गाणी गात, पाण्यात - नदी, विहीर, तळे - विसर्जन करतात. गणगौर मध्य प्रदेशातील निमाड भागातही अत्यन्त थाटात साजरी होते.

**भारतातील चैत्रपाडवा -**

चैत्र पाडवा भारतातील अनेक प्रांतातून साजरा होतो. काश्मीरमध्ये चैत्राला चिथुर म्हणतात. पाडव्याला नवरोज किंवा नवरेह म्हणतात. या दिवशी शारदेच्या मंदिरात जाऊन सरस्वतीची पूजा करतात. हिंदू-शिख-मुस्लिम सर्व जण देवीस फुले वाहतात. आदल्या रात्री एका थाळीत, तांदूळ, मीठ, बदाम, दही, फुले, रुपया, आरसा, नव्या वर्षाचे पंचांग ठेवतात. नवरेहच्या पहाटे घरातील ,सून पहाटे

पहाटे उठून प्रत्येकला उठवते. प्रत्येक जण उठल्यावर या थाळीतील प्रत्येक वस्तू पाहतो. अन्न देवतेला प्रणाम करतो. आरसा पाहून हसतो. वर्ष हसतमुखाने जावे. वर्षाची सुरुवात धान्य लक्ष्मीचे प्रतीक असलेल्या गृहलक्ष्मीचे दर्शन घेऊन करावी हा हेतू या परंपरेमागे असावा. थाळीतील तांदळाचा 'मीठा पुलाव' साखरभात प्रसाद म्हणून करतात.

केरळमध्ये नव्या वर्षाच्या दिवसाला 'विषु'म्हणतात. प्रातःकाळी उठल्यावर चांगल्या वस्तूवर दृष्टी पडली तर वर्ष चांगले जाते ही कल्पना काश्मीरप्रमाणे केरळातही आहे. त्यामुळे आदल्या रात्री काशाच्या भांड्यात तांदूळ पसरून त्यावर कोन्ना नावाच्या झाडाच्या पिवळ्या फुलांची आरास करतात. त्यात सुवर्णाचे अलंकार चांदीचे रुपये, मोठी पिवळी काकडी, नारळ, धूत वस्त्र ठेवतात. दोन्ही बाजूंनी समया लावून ठेवतात. या सजावटीला 'विषुकणि' म्हणतात. उठल्यावर घरातील सर्व जण विषकणीचे दर्शन घेतात. वर्ष शुभते जावे हीच या मागची भावना असते.

आसाममध्ये वैशाख प्रतिपदेस वर्षाची सुरुवात होते. या दिवसाला खूप महत्त्व असते. या दिवसाला 'बहाग बिहू' किंवा 'रंगाली बिहू' म्हणतात. कडुलिबांची डहाळी आणून घरात टांगतात. एक महिना कडुलिबांच्या पानांची चटणी खातात. कडुलिंब आरोग्यास लाभदायक उन्हाळ्यात गोवर, कांजिण्या, ज्वर या सारखे विकार होतात आणि कडुलिंब हा रक्तशुद्धी करणारा. त्याच्या पाण्यात न्हायल्यास कातडीचे रोग पळतात. भारतीय सण खानपानाच्या रीतीतून सामाजिक आरोग्याशी कसे जोडलेले आहेत याची कल्पना येते. या काळात धान्यलक्ष्मी घरी येते.

बंगालमध्येही वैशाख प्रतिपदेपासून वर्ष सुरू होते. या दिवसापासून वहीची पूजा करून नवीन खाते उघडतात.

भारत हा विशाल देश आहे. त्या त्या भागातील भौगोलिक परिस्थितीनुसार वर्षाचा पहिला दिवस ठरविला गेला तरी, त्यामागे धान्यलक्ष्मीच्या आगमनाचा भूमीच्या 'सुफलीकरणाचाच सत्कार करण्याची भूमिका असते.

फाल्गुन, चैत्र, वैशाख हे प्रखर उन्हाचे महिने. या महिन्यांतील स्त्रियांची

व्रते,विधी, उत्सव भूमीच्या सुफलीकरणाच्या श्रद्धेतून निर्माण झाले आहे. मात्र या व्रतांत 'वर्षन' हे कारण नसून 'सूर्य' हे कारण आहे.

**अक्षय्य तृतीया : अक्षय्य आनंदाची ग्वाही –**

महिनाभरचे माहेरपण संपवून लेकुरवाळी गौर, अक्षय्य-तृतीयेस परत जाते, ती घराला 'अक्षय्य आनंदा 'चा, समृद्धीचा आशीर्वाद देऊन ! अक्षय्यतृतीयेला गौरीला पुरणावरणाचा नैवेद्य दाखवून, आंब्याची डाळ, पन्हे, टरबूज, खरबूज, काकडी यांच्या फोडी सवाष्णी व कुमारिकांना देऊन, निरोप देतात. घर धनधान्यांनी, मुलबाळांनी भरलेले राहवे यासाठी गौरीची पूजा केली जाते. अक्षय्यतृतीया हा साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त. या दिवशी मोठ्या प्रमाणावर विवाह होतात. महाराष्ट्र- मराठवाड्यातील शेतकरी पेरणीचा मुहूर्त या दिवशी प्रतीकात्मक रीतीने करतात. या दिवशी प्रारंभ केलेली कामे हमखास पूर्णत्वाला पोहोचतात अशी श्रद्धा आहे. घरात साठवून ठेवलेल्या भाजी पाल्यांच्या बिया होळीच्या राखेत घोळून, मडक्यात घालून ठेवतात. हे मडके अक्षय्य तृतीयेला मोकळे करून त्यातील बिया पेरतात. अंगणात टोचून लावतात. या बियांतील सुफलनशक्ती होळीच्या राखेमुळे वाढते. होळीची राख वेलींच्या आळ्यांतही मिसळतात. भोपळा, तोंडली, दोडकी, घोसाळी, पडवळ यांसारखे भाजीचे वेल या दिवशी लावतात. त्यांना भरपूर फळे येतात अशी श्रद्धा आहे. दक्षिणेत अक्षय्य तृतीयेला त्रेतायुगाचा आरंभ झाला असे मानतात. तर उत्तर भारतात हा दिवस सत्ययुगाचा आरंभदिन मानला जातो. बंगाल ओरिसात तीन आठवडे चंदनोत्सव साजरा करतात. चंदनयात्रा भरते. चंदनाचे पंखे, तेल, अत्तर ब्राह्मणाला दान देतात. महाराष्ट्रात पुरोहितांना माठ, आंबे, पन्हे, आंब्याची डाळ देतात. या दिवशी समुद्राच्या लाटा उंचउंच उचंबळतात असा समज गुजरातेत आहे. गुजरातेत काही गावांत समुद्रकिनारी[२३] प्रतीकात्मक गाव उभे करतात. त्यात जीवनोपयोगी धान्य, वस्तू, कापूस, साखर ठेवतात. तांब्याचे नाणे 'राजा' म्हणून आणि सुपारी 'दिवाण' म्हणून ठेवतात. दुसऱ्या दिवशी या गावाची परिस्थिती कशी आहे हे पाहण्यासाठी सारे गाव लोटते. त्यातून भविष्यकाळचे अंदाज बांधतात. उदा. धान्य लाटेत वाहून गेले. वा त्याला मुंग्या किडे लागले तर ते महाग होईल, कापूस ज्या दिशेने उडाला त्या दिशेने निर्यात चांगली होईल असे

आडाखे बांधतात. महाराष्ट्राप्रमाणे जलकुंभावर टरबूज ठेवून दक्षिणेसह पुरोहिताला दान देतात. या दिवशी पितरांना श्रद्धांजली वाहिली जाते. त्यांच्या नावे पुरोहितास दान दिले जाते. काहींच्या मते हा दिवस पूर्ण मुहूर्ताचा आहे. या दिवशी वा या काळात कृषिसंबंधीचे भविष्य जाणून घेण्याची प्रथा आहे. ही प्रथा कर्नाटकातून महाराष्ट्रात आली असावी. संचारी अवस्थेत भक्त हे भविष्य गुप्त भाषेत सांगतो. याला [२४]'हुईक' असे म्हणतात. उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील लोणजे गावी एक प्रथा आहे. फाल्गुन पौर्णिमेस देवीच्या मंदिराशेजारी १२ लहान लहान खड्डे खणतात. १२ प्रकारची धान्ये, रूईच्या पानात ठेवून पान गुंडाळून खड्ड्यात ठेवून, खड्डा बुजवतात. दुसऱ्या दिवशी ज्या धान्याला ओल येईल त्या धान्यास पूरक असा पाऊस पडेल अशी श्रद्धा या परिसरात आहे. अशा तऱ्हेचा कृषिविधी अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी येथेही करतात. रूईच्या पानाऐवजी धान्य छोट्या बोळक्यात ठेवतात.

**ऋतुचक्राशी जोडलेले उत्सव –**

भारतातील विधी, उत्सव हे ऋतुचक्राशी भूमीच्या सुफलनशक्तीच्या वाढीशी जोडलेले आहेत. भारतीय वर्ष गणनेत एकूण सहा ऋतू मानले आहेत. वसंत, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर, ग्रीष्म हे ते सहा ऋतू. आषाढ, श्रावण-वर्षा, भाद्रपद, आश्विन-शरद, कार्तिक, मार्गशीर्ष-हेमंत, पौष माघ-शिशिर, फाल्गुन चौत्र-वसंत, वैशाख ज्येष्ठ-ग्रीष्म, सर्वसाधारणपणे या पद्धतीने ऋतूंचा क्रम असतो. हेमंतात पाने पिवळी होऊन गळू लागतात. गव्हाची राने, सोनेरी होतात. शिशिरात पाने गळून झाडे पर्णविहीन होतात. थंडी पराकोटीला पोहोचते. महाशिवरात्रीपासून थंडी झपाट्याने कमी होते. दवाने ओलावलेल्या भूमीला वाढत्या उन्हाचा स्पर्श होताच तिच्यातील ऊर्जा जागते आणि झाडांना कोवळी पालवी फूटू लागते. जुई, मोगरा, शिरीष, बहावा आदी झाडे कळ्यांनी मोहरून जातात. वसंतात सृष्टीला, भूमीला लाभलेले यौवन, सृष्टीच्या मातृत्वाची ग्वाही देते. हा काळ जणु भूमी आणि सूर्य यांच्या समागमाचा. माघ शुद्ध पंचमीस वसंतपंचमी म्हणतात. तर फाल्गुन कृष्णपंचमी रंगपंचमी असते. फाग चैती हे गीतांचे प्रकार उत्तर भारतात रात्र रात्र जागून गायले जातात. वैशाखात उन्हे धारदार होतात. ज्येष्ठात उष्णता पराकोटीला पोहोचते. ज्येष्ठ पौर्णिमेपासून दक्षिणेकडून येणाऱ्या वाऱ्यांच्या चक्री

वावटळी धावू लागतात, आणि वर्षाऋतूची चाहूल देऊन जातात. ग्रीष्माच्या तलाखीने भूमी भाजली जाते. पण त्यातून तिची उर्वराशक्ती वाढते. आंध्रात ज्येष्ठी पौर्णिमेला शेतकरी नांगराची पूजा करून पेरणीच्या तयारीस सुरुवात करतात.

या लोकोत्सवांमध्ये काही सांस्कृतिक आणि राजकीय संघर्षाच्या खुणाही दिसतात. विष्णुच्या दशावतारांपैकी नृसिंह आणि परशुराम या दोहोंशी अक्षय्यतृतीयेचे नाते आहे. देव आणि दैत्य वा असुर यांच्यातील संघर्ष पुराणकथांतून नेहमीच रंगवला आहे. शंकराने असुरांना वर द्यायचा आणि विष्णुने त्यातून पळवाट काढून दैत्यांचा संहार करयाचा हा कल्पनाबंध अनेक कथांत आढळतो. खरे तर हा संघर्ष दोन प्रवृत्तींतील आहे. सण उत्सवांशी त्यांना जोडून आपण या कथा अमर करतो. उत्सवांचे मूळ नाते भूमीशी, तिच्यातून निर्माण होणाऱ्या धान्यलक्ष्मीशी, तिच्यातील सुफलनशक्ती वाढण्याशी असते.

**शाकंभरी : वनशंकरी –**

मोहंजोदारो हरप्पा उत्खननात सापडलेल्या शिला - प्रतिमांत एका नग्न स्त्रीची प्रतिमा आहे. तिचे पाय वरच्या बाजूला फताडलेले असून, तिच्या योनीतून झाड उगवलेले आहे. देवी माहात्म्यातील देवीचे हे शील्प असावे असे वाटते. मार्कंड्यपुराणातील देवी उद्‌गारते ‘हे देव हो, जीवनावश्यक अशी वनस्पती सृष्टी माझ्या देहातून, पर्जन्यकाळात निर्माण होईल. तिच्या साहाय्याने या विश्वाचे मी धारण-पोषण करीन, (आत्मदेह, समुद्‌भव) त्यामुळेच मला शाकंभरी हे नावं प्राप्त होईल. चेरोकी जमातीच्या कल्पनेनुसार पहिल्या स्त्रीने इव्हने वनस्पतींना जन्म दिला. मानवाप्रमाणे वनस्पतींनी जन्म देण्याचे यात्वात्मक सामर्थ्य स्त्रीत असते अशी प्राचीन मानवाची श्रद्धा होती. महाराष्ट्रात मराठवाड्यात शाकंभरीचे नवरात्र अनेक घरांतून मांडले जाते. पौष शुद्ध अष्टमीपासून शाकंभरीचे नवरात्र बसते. पौषी पौर्णिमेपर्यन्त असते. पौर्णिमेस रथोत्सव असतो. सर्व जाति जमातीचे लोक शाकंभरीची पूजा करतात. शाकंभरीचे देऊळ विजापूर जिल्ह्यातील बदामीजवळ आहे. स्कंदपुराण, देवीभागवत, पदम्‌पुराण यात शाकंभरीचे माहात्म्य रंगविले आहे. देवीच्या मंदिराजवळ १२० एकरांत हिरवेगार सोंदर्य आहे. देवीच्या कृपेने वाहणाऱ्या हरिद्रा तीर्थातून निघालेल्या ओढ्यांमुळे हे ‘तिलकवन’ रम्य बनले आहे. या स्थानाशी

संबंधित कथा अगस्तीमुनी आणि त्यांची पत्नी लोपामुद्रा यांच्याशी जोडली आहे. [२५]अगस्तीमुनी पत्नीसह प्रवास करताना सद्युम्न राजाजवळ आले. तो ध्यानमग्न असल्याने, मुनी आल्याची दखल त्याने घेतली नाही. मुनी रागावले व उन्मत्त हत्ती होशील असा शाप दिला. त्याने परमेश्वराजवळ करुणा भाकली. नंतर त्याला उःशाप मिळाला. लोपामुद्रा ही शेतीची कला जाणणारी होती. तर अगस्ती ऋषी आळशी होते. तिने त्यांना फावडे हातात देऊन शेतीत कामाला लावले अशी मिथक कथा आहे. अगस्तीमुनींनी विंध्यपर्वतास नमवल्याची अशीच कथा आहे. लोपामुद्रा व अगस्ती वनशंकरी शाकंभरीनिर्मित तिलकवनात येऊन राहिले. तेथे त्यांच्या नावाने तीर्थ आहे. तेथून ते हरिद्रातीर्थाजवळ गेले. या तीर्थातले पाणी स्वतः देवीने झाडांना घालून हा परिसर हिरवा केला अशी श्रद्धा आहे. शाकंभरीने पाताळातून पाणी आणून या तीर्थात टाकले अशी कथा आहे.

फार पूर्वी या परिसरात प्रचंड दुष्काळ पडला. त्यावेळी स्वतःच्या शरीरातून भाजीपाला निर्माण करून तिने लोकांना आधार दिला. अशी श्रद्धा आहे. या नवरात्राच्या उद्यापनच्या दिवशी साठ भाज्या करतात. हा कुळाचार आहे.

स्त्रीने जमिनीची मशागत करून पालेभाज्या, कंदमुळे, फळभाज्या यांचा शोध लावून अन्ननिर्मिती केली. शेतीचा शोध तिनेच लावला. भूमीला सुफळ करण्याचे विविध प्रयोग तिने केले. तिच्या व्रतांमध्ये शेण, राख यांना महत्त्व आहे. ज्यांचा उपयोग आज उत्तम खत म्हणून केला जातो. आजची शास्त्रीय भाषा तिला अवगत नसली तरी प्रत्यक्ष प्रयोगांतून तिने काही गोष्टी निश्चित केल्या. शेणाला 'शुभा' असे म्हणतात हे आपण मागेच पाहिले आहे.

स्त्रीच्या यात्वात्मक सृजनसामर्थ्यांशी हे व्रत निगडित आहे.

**कानबाई : लोकदेवता खानदेशची –**

कानबाई ही खानदेशातील सर्व जातिजमातींत लोकप्रिय असलेली धरणीच्या सुफलनशक्तीशी नाते असलेली लोकदेवता आहे. सुफलन प्रक्रियेशी निगडित लोकदेवतांत कानबाईच्या रोटविधीची माहिती दिली आहे. रानबाई-कानबाईचा वार्षिकोत्सव वैशाख महिन्यांतील अक्षय्य तृतीये नंतरच्या कोणत्याही शुक्रवारी वा मंगळवारी संपन्न होतो. खानदेशातील काही भागात चैत्र किंवा माघ महिन्यात केला

जातो. रोटविधी मात्र श्रावणातील नागपंचमीनंतरच्या कोणत्याही रविवारी साजरा करतात. तिरतची कानबाई हा नवसाविधी जातीची बंधन तोडून, पूर्ण गाव एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. मराठवाड्यात कानबाईचा विधी नाही. खानदेशातील काही घराणी मराठवाड्यात स्थायिक झाली आहेत. मात्र हा विधो करण्यासाठी ही मंडळी आपल्या मूळ गावी जातात. कोकणस्थ समाजात विवाहानंतर देवीच्या नावाने बोडण घातले जाते. त्याप्रमाणे खानदेश, जळगाव, नाशिक, धुळे या अहिराणी भाषा बोलल्या जाणाऱ्या भागात विवाहानंतर कानबाईचे रोट केले जातात.

तिरतच्या कानबाईजवळ प्रथम कानबाई-कन्हेर यांचा विवाह लागतो. नंतर ज्या घराने या उत्सवाची जबाबदारी घेतलेली असते त्या घरातील मुलामुलींची लग्ने लागतात. त्यानंतर आसपासच्या गावांतील लोक येथे येतात व सामुदायिक लग्ने लागतात. जातीचे बंधन नसते. एकेका दिवशी दोनशे अडीचशे विवाह लागतात. हा उत्सव सात दिवस तर काही ठिकाणी सव्वा महिना चालतो. या वार्षिकोत्सवात स्थापना, कानबाई -कन्हेर विवाह, गवरनी पूजा, भोजन, जागरण आणि विसर्जन हे विधी महत्त्वाचे मानतात. ही देवता माघ, चैत्र वैशाखात आणि मंगळवारी वा शुक्रवारी मांडतात. त्याचे उल्लेख गीतात येतात.

चैत्र वैशाखाना ऊन व माय, वैशाखाना ऊन
खडके तापून झाले लाल व माय; तापून झाले लाल

या उन्हाने कानबाईच्या पायाला फोड आले आहेत. ती अशा उन्हात धवया... शुभ्र घोड्यावर बसून येते.

म्हावना महिना म्हावना महिना, दिन मंगयावार व।
कानबाई मायनी बैठक दिनी, दिनी शुक्रवार व।

माघ महिन्यात रथ सप्तमी असते. कानबाईच्या स्थापनेसाठी राणादेवाच्या लग्नात वा तिरतवरून परणून आणलेला नारळ आवश्यकच असतो. या पूजेसाठी आवश्यक असणारा बिजोरा व फुले, दिवठाणी व चौरंग, कानबाईची प्रतिकृती,

चूल, केळी (मातीची कळशी) या वस्तू वाणी, माळी, सुतार, सोनार, कुंभार यांच्याकडून वाजतगाजत आणतात. बिजोरा हे फळ आवश्यक असते. हा उत्सव मुळात भूमीच्या सुफलन शक्तीशी जोडलेला आहे. 'लोकदेवता कानबाई' हा डॉ. प्रा. पुष्पलता करनकाळ यांचा ग्रंथ जिज्ञासूंनी मुळांतून पाहावा. 'सरस्वती शब्द कोश ' भाग १ मध्ये बिजोराचा अर्थ बिजवराशी विवाह असा होतो. आठ विवाह प्रकारांपैकी दैवविवाहात कन्येस पतीचे भाग्य निरंतर लाभावे म्हणून प्रथम प्रतीकात्मक देवा ब्राह्मणांशी लग्न लावले जाई. नंतरच नियोजित वराशी विवाह लावला जाई. या रुढीला अनुसरुन बिजवर ब्राह्मणाचे प्रतीक म्हणून या विधीत 'बिजोरा' फळ आवश्यक असते.

**दिवा : अग्नी सूर्यपूजेचे प्रतीक –**

हे फळ घेण्यासाठी वाजत, मिरवत माळ्याच्या मळ्यात जातात. त्या फळाची पूजा करून आंब्याच्या झाडाखाली गारगोटीच्या खड्यांत कापूस ठेवून ठिणगीच्या साहाय्याने दीपज्योत पेटवितात. आंब्याच्या, बीजोराच्या[२६] झाडाखालची काळी माती, बीजोरा व दीपज्योत वाजतगाजत घरी आणतात. दिवा, सव्वा महिना घरात तेवत ठेवतात. त्यासाठी फक्त एरंडेल तेलच वापरतात. दीपपूजा ही सूर्यपूजेचे, आग्निपूजेचे प्रतीक आहे. दुपारी नदी वा विहिरीवरून वाजत गाजत पाणी आणतात. कानबाईच्या विधीत 'सव्वा' चे महत्त्व असते. सव्वा हे 'वाढी' चे प्रतीक आहे. चौरंगावर सव्वा पावशेर गहू पसरवून त्यावर कानबाईचा मुखवटा मांडतात. भोवती सात मूठी तांदूळ वेगवेगळे ढीग करून ठेवतात. मुखवट्याशेजारी तांब्या ठेवतात. त्यात तांदूळ टाकतात व त्यावर परणून आणलेला नारळ ठेवतात. नारळ ठेवलेल्या कलशाला दागिने घालतात. नारळाच्या मध्यात नथ खोचतात. नारळावर लाल खण पांघरतात. कळशीच्या बाजूला कन्हेर या वनस्पतीची फांदी रोवतात. कलशासमोर बिजोरा हे फळ टांगते ठेवतात. रांगोळीने चौरंग सुशोभित करतात. १०८ प्रकारच्या फुलापानांची आरास करतात. विविध फळे, अंजीर,मनुका आदी सुकामेवा, काळे तीळ, काळी पोत, काळा हरभरा, टिकली, बांगडी या वस्तू पूजेत ठेवतात. चौरंगाभोवती आंब्याचे तोरण बांधतात.

**आवढिशी कानबाई ठुमकती –**

कानदेवीची गाणी खानदेशातील प्रत्येक स्त्रीच्या ओठावर असतात. अहिराणी भाषेतील अतिशय भावार्त गाणी कानबाईच्या नावाने गायिली जातात. खानदेशातील खेड्यांत अक्षय्य तृतीयेला मुली गौर मांडतात व गाणी म्हणतात. ही गाणी कानबाईची असतात.

आवढिसी कानबाई ठुमकती माय ठुमकती
आंबाना बागमा येई पडती,माय येई पडती ।
आमना कन्हेर साजिंदा,माय साजिंदा ।
परणी कन्हेर आवदा , माय आवंदा ।

कानबाईच्या जेवणात गंगेवरून आणलेल्या पाण्यात तांदूळ शिजवतात त्याला मोगरा म्हणतात. राजस्थानातही तांदळाचा भात शिजवतात त्याला 'मोगर' म्हणतात.

थोरो काई काई रूप बखाण रनुबाई ।
सारेठ देश सो आई ओ ॥

ही देवी सौराष्ट्रातून महाराष्ट्रात आली आहे. आणि म्हणूनच राजस्थान निमाड भागात गणगौर मांडली जाते. तिच्याशी हिचे साम्य आहे.

कानबाई-कन्हेर विवाहात कानबाई पृथ्वीचे तर कन्हेर तिच्या सहचराचे प्रतिनिधित्व करतो. हा सहचर काळानुरूप द्यौ, शिव, विष्णु, सूर्य, नाग, गज, अश्व यांच्या रूपात येतो. तर पृथ्वी गौरी, उमा, लक्ष्मी, सीता, कानबाई या रूपात येते. मराठवाड्यात लक्ष्म्या श्रद्धापूर्वक आणि कुळाचार म्हणून, पूर्ण घर त्या निमित्ताने एकत्र येऊन साजऱ्या करतात. खानदेशात धुळे, जळगाव, चाळीसगाव, मालेगाव, भागात कानबाईचा उत्सव विधिपूर्वक आणि कुळाचार म्हणून साजरा केला जातो.

**ठळकपणे जाणवलेल्या गोष्टी –**

भूमी आणि सूर्य यांच्या अनुबंधातून होणाऱ्या सर्जनाशी जोडलेले विधी, उत्सव

यांची सविस्तर चर्चा या प्रकरणात केली आहे. त्यातून काही गोष्टी ठळकपणे जाणवतात त्या अशा -

१. भूमी आणि वर्षन यांच्या अनुबंधातून निर्माण झालेल्या विधी, उत्सवांमध्ये सामूहिकता आहे. ही व्रते निसर्गाच्या सान्निध्यात साजरी केली जातात. नृत्यात्मक हालचाली, फेरावरची गाणी, विविध खेळ (उदा. तव्यावरची फुगडी, सूप नाचवणे इ.) झोके, जागरण यांच्याशी हे विधिउत्सव जोडलेले आहेत .ती सामूहिकता भूमी, सूर्य यांच्यातील अनुबंधाशी जोडलेल्या विधी, उत्सवांतून नाही. हे विधीउत्सव सौभाग्य अखंड राहवे या भावनेशी जोडलेले आहेत. एकत्र येऊन विधी करण्यावर भर दिलेला नाही. येळाआवस हा पूर्णतः शेतात करावयाचा सुफलता विधी आहे. त्यामुळे त्यात रानात जाऊन स्वयंपाक करणे, सायंकाळी पूर्ण शेतास हेंडगा पेटवून प्रदक्षिणा घालणे. पांडवांची विशिष्ट पद्धतीने मांडणी करणे यांना महत्त्व आहे. त्यामुळे भूमीची सुफलशक्ती वाढते ही श्रद्धा आहे.त्यात विधींना विशेष महत्त्व आहे आणि ते शेकडो वर्षांपासून नियमबद्धतेने पाळले जातात.


२. पौषातले रविवार, रथसप्तमी, चैत्र तृतीया - अक्षय्य तृतीया या उत्सवांतील सामूहिकता जाऊन ती व्यक्तिनिष्ठ व्रते झाली. त्यांतील नियम व्यक्तीने पाळावेत या भूमिकेवर विशेष भर दिला जाऊ लागला.


३. पुरुष बीज स्वरूप आहे. त्याचे वीर्य तेजाचे प्रतीक मानले जाऊ लागले. जीवन जगण्याच्या रीतीत पुरुषप्रधानता आली. स्त्री क्षेत्र स्वरूपा - स्थिर मानली गेली. अग्नी, तेज, पर्जन्य या सर्वांना तिने स्वतःत रिचवून घ्यावे. यातून सहनशीलता हा तिचा 'गुण' मानला गेला. तिचे अस्तित्व 'बीज' पेरणाऱ्याशी, तेज देणाऱ्याशी बांधले गेले. तो असेल तरच तिला असण्याचा अधिकार राहिला. सर्व व्रतांतील निसर्गाशी असलेला अनुबंध लोप पावून पतीच्या असण्याशी पर्यायाने स्त्रीच्या सौभाग्याशी जोडला गेला.

४. कालौघात कुमारी स्त्री 'सौभाग्यकांक्षिणी' झाली. एकूणच व्रते-वर्षन आणि सूर्य या दोनही प्रेरकांशी जोडलेल्या व्रतांना, कुमारिकांची असतील त्यांना, 'चांगला

पती मिळावा' या सौभाग्यकांक्षेची आणि विवाहितांची असतील त्यांना सौभाग्यरक्षणाची भूमिका दिली गेली. वर्षनाशी जोडलेले विधी, उत्सव मोकळ्या आभाळाखालचे असल्याने, त्यांत मुळातच नृत्य आणि सामूहिक स्वर यांचा यात्वात्मक संबंध असल्याने, पुरुषप्रधानतेतून आलेल्या ताठरपणाला त्यात फारसा अवकाश मिळाला नाही.

५. मात्र 'सूर्य' हे बीजरूपी वीर्याचे, पौरुषाचे प्रतीक असल्याने त्याच्याशी संबंधित विधि, उत्सवांत मात्र 'सैभाग्याकांक्षा' जी पतीच्या अस्तित्वाशी पूर्णपणे जोडलेली आहे. ती महत्त्वाची भूमिका झाली. पौषातील रविवार, संक्रांतीचा वाणवंसा, चैत्रगोरीचे हळदीकुंकू ही व्रते आज पूर्णपणे ती करणाऱ्या स्त्रीच्या सौभाग्याशी जोडलेली आहेत.





# भूमीच्या सुफलनशक्तीशी निगडित विधिव्रतांतील स्त्रीप्रधानता

*भारतीय एकात्मतेस लोकपरंपरांचे महत्त्वाचे योगदान, धार्मिक विधीत स्त्रीची भूमिका 'मम' म्हणण्याची, व्रते, स्त्रियांचीच : त्यांचे मूळ कृषिप्रधान व्यवस्थेत, वैदिक आर्यांचे पुरुषप्रधान विश्व , कृषिव्यवसाय स्वीकारला पण त्याला प्रतिष्ठा दिली नाही, टोळ्यांच्या संकराचा इतिहास : संस्कृती संगमाचा इतिहास , कुत्रे नव्हे माणसेच : टॉटेमिक समाज, वर्गीय समाजाची घडण, प्रतिलोम विवाह : शूद्र जातीत गणना, कौटिलीय अर्थशास्त्र आणि स्त्रीचे अधिकार, न स्त्री स्वातंत्र्यमर्हति , मानवाच्या कल्पनासृष्टीत त्याच्या अंत:सृष्टीचे प्रतिबिंब, आजची हिंदूसंस्कृती संमिश्र , ऋग्वेदात गौरविलेली अंभृणी देवता : एक अपवाद, वैदिक श्रद्धांच्या भूपृष्ठाखालची जमीन, योनिपूजा हीच विश्वजननीची पूजा, देवीपूजा आणि मातृसत्ताक समाज यातील आंतरिक अनुबंध, सिंधूसंस्कृती उत्खननानंतर हाती आलेले दुवे, यातु : महानुभावात्मक आणि समानोत्पत्तिक, पाऊस - स्त्री - भूमी : सुफलीकरण, कृषियातुविज्ञान : पुरातन परंपरा, कृषिमंत्रात स्त्रीला महत्त्व, वामाचार : मधुरा भक्ती, भारतातील मातृसत्ता, 'माता' पूजनीय पण स्त्री ?, मातेला अधिकार नाहीत, सुफलीकरण विधीत स्त्रीच महत्त्वाची , कालप्रवाहात स्त्री ओझे व देहस्विनी बनली , सांस्कृतिक एकात्मतेची वाहक आणि चेतक स्त्री , दुर्गापूजा : घट बसवणे, मर्म हरवले : औपचारिकता शिल्लक राहिली .*

---

## भारतीय एकात्मतेस लोकपरंपरांचे महत्त्वाचे योगदान –

भारतातील विविधतेच्या मुळाशी असलेले सांस्कृतिक एकात्मतेचे तत्त्व, लोकपरंपरांतून चालत आलेल्या सांस्कृतिक, भूमीच्या सुफलीकरणाशी संबंधित विधि उत्सवांतून, तत्संबंधी गीतांतून प्रतीत होत असते. गेल्या हजारो वर्षांपासून भारतात अनेक टोळ्या आल्या. त्या या भूमीत स्थिरावल्या. संघर्ष, स्वीकार,समन्वय, समरसता या चार सकारात्मक प्रक्रियांतून, सातत्याने

नवस्वीकृतीची प्रक्रिया (Aglomeration) सुरू आहे. यातूनच भारतीय संस्कृतीची अभिजातता आणि एकात्मता दृढ आली आहे.

या संस्कृतीला एकात्म करणाऱ्या साहित्य, शिल्प, संगीत, नृत्य आदी परंपरांबरोबरच, लोकपंपरांनीही फार मोठे योगदान दिले आहे. भारतीय जनतेने, अनंतकाळ प्रचलित राहणाऱ्या विधी, उत्सव, सण, कथा, कहाण्या लोकगीते, लोकनृत्याचे पदन्यास आदींच्या द्वारे भारतीय संस्कृतीच्या विकासाचा इतिहास नोंदवून ठेवला आहे. भूमीच्या सुफलनशक्तीशी निगडित विधिउत्सवांतून सतत जाणवणाऱ्या भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेचा शोध या प्रबंधातून घेण्याचा प्रयत्न केला आहे. मराठवाड्यातील लोकपरंपरा व महाराष्ट्रातील लोकपरंपरांचे, परप्रांतांतील या संदर्भातील लोकपरंपरांशी असलेले साम्य चकित करणारे आहे.

**धार्मिक विधीत स्त्रीची भूमिका 'मम' म्हणण्याची –**

व्रतवैकल्ये, विधी, उत्सव यांतच स्त्रियांचा सहभाग विशेष महत्त्वाचा असतो. होमहवनास महत्त्व असलेल्या धार्मिक विधीत मात्र पुरुष महत्त्वाचा असतो. स्त्रीची भूमिका पतीच्या हाताला हात लावून 'मम' म्हणण्यापुरती मर्यादित असते. स्त्री शेजारी असणे आवश्यक असले तरी, ती नसल्यास शेजारी सुपारी ठेवली तरी काम भागते. सुफलीकरणाशी संबंधित विधिउत्सवांत मात्र स्त्रियांचा सहभाग प्रत्यक्ष आणि महत्त्वाचा असतो. गुजरात-राजस्थानातील वा पंजाबातील हरियाली तीज असो वा कर्नाटक महाराष्ट्रातील हरितालिका-भाद्रपद तृतीया असो. या व्रतांत स्त्रियांचाच सहभाग असतो. तृतीया, षष्ठी या दिवसांना स्त्रियांच्या व्रतांत विशेष महत्त्व असल्याचे लक्षात येते. भूमीशी तिच्या सुफलनतेशी निगडित सणांत पुरुषांचा सहभाग नसतो. असल्यास नाममात्र असतो. या उत्सवांमधील 'स्त्रीप्रधानते' चा मागोवा आणि शोध या प्रकरणात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**व्रते, स्त्रियांचीच : त्यांचे मूळ कृषिप्रधान व्यवस्थेत –**

ज्येष्ठ आषाढातील वृक्षपूजा, श्रावण भाद्रपदातील नागपूजा, वारुळपूजा, जिवतीपूजा, गौरी –लक्ष्मीपूजा, आश्विन कार्तिकातील नवरात्र, दीपावली पूजा, मार्गशीर्ष पौषातील भूमीपूजा, सूर्यपूजा, माघ फाल्गुनातील रथसप्तमी, होळी,

रंगपंचमी, चैत्र वैशाखातील गौरीतृतीया- अक्षय्यतृतीया, या पूजा विधीत आणि उत्सवात स्त्रियांचाच सहभाग असतो. स्त्रियांची व्रते, पूजाविधी या संदर्भात अवनीन्द्रनाथ टागोर[१] नोंदवतात, 'The Desire of the male and the desire of the female - the Vedic rituals were of the men, the vratas of the women - that is all the difference between two.'

अवनीन्द्रनाथांच्या या मताबद्दल 'लोकायत'चे लेखक देवीप्रसाद चटोपाध्याय म्हणतात, २'The vratas he has rightly said, could not have been derived from the vedas, the two were aspects of two distinct cultures , so he has attributed the vratas to the Pre-Aryans.' या संर्भात स्पष्टीकरण देताना ते नोंदवितात की वैदिक आर्यांच्या प्रार्थना भरपूर धनसंपत्ती, धान्यसंपत्ती, दीर्घायुष्य, सुरक्षित आणि संकटरहित जीवन यांच्यासाठी असल्या तरी त्यात विशेष भर पशुसमृद्धीवर आहे आणि स्त्रियांच्या व्रतांत, पूजाविधीत कृषिलक्ष्मीवर, भरपूर धान्य भूमीतून निर्माण व्हावे यावर विशेष भर दिलेला आहे. धान्यराशींची पूजा, धान्याची रांगोळी, पूजाविधीत फुले, पत्री, दुर्वा यांचा अंतर्भाव त्यात असतो.

भारतात अनेक टोळ्यांची आक्रमणे होत गेली. त्यांतून दोन सांस्कृतिक धारा निर्माण झाल्या. एक वैदिकधारा आणि दुसरी लोकधारा. या दोनही सांस्कृतिक धारांनी परस्परांना योगदान दिले आहे. वैदिकधारा ही अधिक 'नागर' आहे. तर लोकधारेत सामान्य माणसाच्या जीवनप्रेरणा समाविष्ट झालेल्या दिसतात. देवीप्रसाद आपले मत नोंदवतात की वैदिक विचारसरणीचा प्रभाव भारतात स्थिर होण्यापूर्वी, भारतातील समाज हा कृषिजीवी होता आणि मातृप्रधान जीवन व्यवस्था होती. स्त्रियांचे कृषिव्यवसायात विशेष योगदान होते. किंबहुना भूमीच्या सुफलनाशी जोडलेल्या विधीत स्त्रियांना महत्त्व असे, त्यांच्याद्वारे ते केले जात असे जगभरचा इतिहास सांगतो.

**वैदिक आर्यांचे पुरुषप्रधान विश्व –**

वैदिक समाज पशुपालक होता. कालौघात त्यांना कृषीचे महत्त्व पटले. त्यांनी कृषिव्यवसायाचा स्वीकार केला. तरीही कृषिव्यवसायाला त्यांनी श्रेष्ठत्व दिले नाही.

स्त्रिया आणि कृषि यांच्यातील एकरूपता समाजमनात एवढी रुजली होती की वेदांतील कृषिविषयक ऋचांत कृषिदेवता या स्त्रीरूपी आहेत. ऋग्वेदाच्या चौथ्या मंडलात सीता या कृषिदेवतेस आवाहन केले आहे.

अर्वाची सुभगे भव सीते वन्दामहे त्वा ।
यथा नः सुभगासससि यथानः सुफलासासि ॥
इन्द्रः सीतां गृह्णातु तां पूषानु यच्छत ।
सां नः पयस्वती दुहमुत्तरामुत्तरां समाम् (४.५६.६.७)

(हे समृद्धीरूप सीतादेवी, तू आम्हाला विपुल धन आणि विपुल फलसंपत्ती देण्यासाठी उपस्थित राहा. इंद्र आणि पूषन् तुला मार्गदर्शन करोत. ही सीतादेवी जलसंपत्तीचा दुग्धाप्रमाणे वर्षाव करते.) या ऋचेत 'सीता' या देवीला कृषिविषयक मंत्र असल्याने आवाहन केले असले तरी 'इन्द्र आणि पूषन् तुला मार्गदर्शन करोत' असे या पुरुष देवतांना आवाहन केले आहे. कारण वैदिक आर्यांचे विचारविश्व पुरुषप्रधान आहे. पुरुषसूक्त हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. विराट विश्वपुरुषाचे वर्णन पुरुषवाचक आहे. उत्तरकालीन ऋचांमध्ये विश्वतत्त्व स्त्री - पुरुष लिंगभेदा पलीकडचे कल्पिले असले तरी, पुरुषसूक्तात ते पुल्लिंगी आहे. इतकेच नाही तर त्यांचे यात्वात्मक लैंगिकविधी व मंत्र पुरुषप्रधान आहेत. त्यांची प्रतिभासृष्टी गोविषयक कल्पनांनी बहरलेली दिसते. 'गविष्टी' हा युद्धवाचक शब्द मुळात गोविषयीची कामना या अर्थाचा आहे.

**कृषिव्यवसाय स्वीकारला पण त्याला प्रतिष्ठा दिली नाही -**

वैदिक आर्यांनी भारतात स्थिरावताना कृषिव्यवसायाचा स्वीकार केला. कारण नद्यांच्या काठाने राहणाऱ्या लोकांनी कृषिव्यवस्था समृद्ध केलेली होती. आर्य टोळ्या पशुपालन अवस्थेत असेपर्यंत शेतीशी संबंध न आल्याने तांदूळ हे महत्त्वाचे धान्य, तैलबीजे त्यांना अज्ञात होती. यज्ञाविधीमध्ये दूध, तूप, लोणी मध यांचाच विनियोग सांगितला आहे.

आजही भारतात अस्तित्वात असलेली, पशुपालनाशिवाय कोणताही व्यवसाय न करणारी तोडा या जमातीची संघटना पूर्णपणे पितृप्रधान आहे. पशुपालक

समाजाची नैसर्गिक प्रवृत्तीच पुरुषप्रधान संघटनेला अनुकूल असते. पशुपालक आर्यांचा मुख्य व्यवसाय पशुपालन असल्याने, भारतात स्थिर होताना कृषि व्यवसाय स्वीकारला तरी त्याबद्दलचा तिरस्कार बोधायन, मनु यांच्या वाङ्मयातून व्यक्त होतो. सूत्रकाळात गीतेने शेती हे वैश्यांचे स्वभावज कर्म असल्याचे सांगितले आहे. बौधायन धर्म सूत्रांत मात्र बोधायन म्हणतो -

३ वेदः कृषिविनाशाय कृषिर्वेद विनाशिनी ।

शक्तिमानुभयं कुर्यादशक्तस्तु कृषि त्यजेत ॥ (बो. ध.स. १.५.१०१)

शक्य असेल त्याने दोन्ही करावे. अन्यथा कृषिकर्म सोडावे. मनूचे मत-ब्राह्मण किंवा क्षत्रियाला वैश्याचे व्यवसाय करण्याची पाळी आली तर त्याने शेती वगळून अन्य व्यवसाय करावेत. शेती ही परावलंबी असून त्यात जीवहत्या होते. (१०-८३-८४) आर्यांची युद्ध करण्याची हत्यारे आधुनिक होती. येथील जित लोकांकडे त्यांनी हा व्यवसाय सोपविला होता. वाढत्या लोक- संख्येला अन्न पुरविण्याची शक्ती कृषि व्यवसायात होती. त्यासाठी श्रम लागत. ते श्रम 'जिंता' कडून दासपद्धतीद्वारे करवून घेतले जात.

भारताच्या एकात्म संस्कृतीतील 'एकात्मते' चा शोध घेताना ही एकात्मता कशी निर्माण झाली. कोणत्या परिस्थितीत झाली आणि त्यासाठी पुढाकार प्रथम कोणी घेतला याचा थोडक्यात आढावा घेणे महत्त्वाचे ठरते.

**टोळ्यांच्या संकराचा इतिहास : संस्कृति संगमाचा इतिहास –**

भारताचा इतिहास हा अनेक टोळ्यांच्या आक्रमणांचा, त्यातून झालेल्या संकराचा इतिहास आहे. या टोळ्या ज्या प्रदेशात गेल्या, तेथे आधीपासून राहणारा समाज आणि आक्रमण करणारा समाज यातून त्या त्या परिसरात छोटी छोटी राज्ये निर्माण झाली. ती गणराज्ये होती. हा आढावा घेताना एक गोष्ट लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. प्राचीन भारताच्या सांस्कृतिक जीवनाचे, वैदिक आर्य आणि लोकायतिक हे प्रमुख घटक होते. वैदिक आर्यांनी स्थानिक प्राकृत जनांच्या आचारविधींचा, त्या मागील श्रद्धांचा तिरस्कार उल्लेख केला तरीही त्यांच्या अनेक आचार विधींचा, त्यामागील श्रद्धांचा आपल्या धार्मिक व्यवहारात समावेश करून घेतला. 'शिश्नदेव' म्हणून लिंगपूजेचा तिरस्कार केला. परंतु अनार्यांचा रुद्र व शिव देवता शंकराच्या व

शिवलिंगाच्या रूपात स्वीकारली गेली. या संदर्भात महत्त्वाचे उदाहरण म्हणजे तंत्रसाधना होय.

तांत्रिकांचा वामाचार मूलतः लोकायतिकांचा सुफलीकरण विधी होता. या विधीचे अधिष्ठान धर्म कल्पना नसून यातुकल्पनाच असावी असे ज्येष्ठ अभ्यासकांचे मत आहे. कालौघात वैदिकांनी आपल्या धर्मसाधनेत तंत्रसाधनेचा समावेश करून घेतला. भारताचा इतिहास हा संस्कृती संगमाचा इतिहास आहे. तंत्रसाधनेप्रमाणे इतरही अनेकविधी वैदिक आर्यांच्या जीवनात प्रतिष्ठित झाले. या संदर्भात देवीप्रसाद चटोपाध्यायांनी बकदाल्भ्य आणि गाणारे कुत्रे यांचे समर्पक उदाहरण देऊन विस्तृत चर्चा केली आहे . बकदाल्भ्य हा ऋषिकुमार वेदाध्यनासाठी जात असताना त्याने एक चमत्कारिक दृश्य पाहिले. काही कुत्रे एका पांढऱ्या कुत्र्याभोवती जमा होऊन 'आम्हाला मंत्रगानाने अन्न प्राप्ती करून द्या. आम्ही भुकेले आहोत' अशी मागणी करीत होते. त्या पांढऱ्या कुत्र्याने दुसऱ्या दिवशी त्यांना एकत्र येण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी ब्राह्मण ज्याप्रमाणे विशिष्ट कृती करून मंत्रपठण करतात त्याप्रमाणे सर्वांनी हिंकार स्वर लावला. त्या मंत्रघोषालाच [४]उद्‌गीथ-अन्नप्राप्तीसाठी मंत्रगान म्हटले जाते. छांदोग्य उपनिषदात १.३.६ मध्ये उद्‌गीथ गानाने विपुल अन्न प्राप्ती होते असे सांगितले आहे. बकदालभ्य हा वेदविद्येचा त्याग करून चालला होता. त्याला मंत्रगानाचे माहात्म्य सांगण्याचा हेतू उपनिषदकारांचा असावा का? कारण त्याच्या संदर्भात 'स्वाध्यायं उद्वव्राज्य' असे वाक्य वापरले आहे. जैमिनीय उपनिषद ब्राह्मणात बकदाल्भ्य आणि इंद्राचा संघर्ष झाल्याचा उल्लेख आहे आणि पुढे छांदोग्य उपनिषदात बकदाल्भ्य नैमिषारण्यातील लोकांना अन्नप्राप्ती करून देण्यासाठी यज्ञात उद्‌गाता म्हणून गेल्याचा उल्लेख आहे.

### कुत्रे नव्हे माणसेच : टॉटेमिक समाज –

काही विद्वानांनी वरील कथेतून यज्ञसंस्था आणि ब्राह्मण पुरोहितांना येणारी मंत्रविद्या यांचे विडंबन केले आहे असे मानले. परंतु देवीप्रसाद या संदर्भात विश्लेषण करतात की हे [५]'कुत्रे' म्हणजे प्राथमिक अवस्थेतील माणसे आहेत. प्राथमिक अवस्थेतील माणसांची मंत्रगानाने अन्नप्राप्ती करून घेता येते अशी श्रद्धा होती. अशा

तऱ्हेची श्रद्धा आजही वन्य समाजात अस्तित्वात आहे. या श्रद्धेमागे दयाळू ईश्वराची कल्पना नसून मंत्रोच्चार आणि विशिष्ट कर्म यांतील परस्परानुबंधातून निर्माण होणाऱ्या यातुसमार्थ्याची कल्पना आहे. प्राचीन भारतातील मानवसमूह वनस्पती, पशुनामधारक होते. आजही ऋग्वेद संहितेतील उपलब्ध शाखांची नावे अश्वलायन,मंडुक, शाकल अशी आहेत. अथर्ववेद संहितेच्या काही शाखांची नावेही तैत्तिरीय (तित्तरपक्षी) श्वेताश्वतर (खेचर) मांडुक्य (बेडुक) अशी आहेत. ऋषींची नावेही काश्यप (कासव), कौशिक (घुबड), शुनक (कुत्रे) अशी आहेत. महाभारतात श्वान नावाच्या मानवसमूहाचा उल्लेख आहे. यावरून असे लक्षात येते की अतिप्राचीन मानवसमूहाची कुलनामे प्राणिसृष्टी आणि वनस्पती सृष्टीची होती. त्यामागचे रहस्य मानववंश शास्त्रज्ञांनी उलगडून दाखवले आहे. आजही कुललक्षण पूजा अस्तित्वात आहे. विदर्भातील गोंड, माडिया या आदिवासी जमातीत श्रद्धापूर्वक कुललक्षणाची पूजा केली जाते. कुळाचे संकटापासून रक्षण व्हावे, शेतीतून विपुल धान्य यावे यासाठी ही पूजा केली जाते. लोकायतिक, असुर चार्वाक यांचे विधी धर्मकल्पनेवर आधारित नसून ते यातुकल्पनेवर आधारलेले होते आणि वैदिक यज्ञाचे स्वरूपही यातुप्रधान होते. मॅकडोनल, ओल्डेनबर्ग या पंडितांनी वैदिक वाङ्‌मयातील टॉटेनिझमचे आस्तित्व मान्य केले आहे. टॉटेमिक समाजाचे जीवन सामूहिक होते. श्रेष्ठ कनिष्ठ ही स्थाने नव्हती. मॉरेट या समाजाचे वर्णन करतो..

[६]The True Totemic Society knows neither kings nor subjects. It is democratic and communistic all the members of the line is it on a footing of equality with respect to their totem.

प्राथमिक अवस्थेतील मानवसमाज याच, साम्यवादी तत्त्वावर अधिष्ठित झालेला होता. प्राचीन भारतातील अनेक लोकसमूह, वैदिक आर्य समाजातील अनेक गण याच प्रकारचे सामूहिक जीवन जगत होते. ऊन, अन्न, पाऊस आदी कामनांसाठी सामूहिक कृती. मंत्रगान केले जाई. या समूहांच्या संकरातून समाज सतत विकसत राहिला.

**वर्गीय समाजाची घडण –**

समाजाच्या विकासक्रमात अनेक लोकसमूह एकमेकांत मिसळून गेले. तसेच

एकात्म गणसमाजाचे विघटन होऊन नवा वर्गीय समाज निर्माण झाला. कारण उत्पादनात वाढ होत गेली. बौद्धिक आणि अध्यात्मिक कर्म व श्रम यात विभागणी झाली. एका वर्गाला आपल्या अधिपत्याखाली ठेवण्याच्या दृष्टीने दुसऱ्या वर्गाकडून नवी नवी साधने निर्माण केली गेली. त्यातून वर्गीय समाज घडत गेला. सामूहिक श्रमकर्माची आवश्यकता भासेनाशी झाली. त्यातून वर्गीय समाज घडत गेला. आणि या अर्थानेच भारताचा इतिहास हा संकराचा इतिहास आहे. एकात्म संस्कृतीचे एक कारण हा संकर आहे. या 'संकर' प्रक्रियेचे वर्णन, सामाजिक स्थित्यंतरांचे संकेत धर्मसूत्रात आलेल्या संकरित जातींच्या उल्लेखांमधून मिळतात. हे संकेत जाणून घेण्याअगोदर एक महत्त्वाची बाब, जी सर्वमान्य आहे ती लक्षात घेतली पाहिजे. गणसमाज मातृसत्ताक होता. कृषिप्रधान जीवनव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक स्त्री होती. कारण शेती, तिची मशागत करण्याच्या पद्धती, अन्न टिकवणे व शिजवणे या कृषिसंबंधित गोष्टींचा शोध स्त्रीने लावला होता. कृषि उत्पादनात ती प्रत्यक्ष सहभागी होत असल्याने आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या ती समाजाचा एक महत्त्वाचा घटक होती. गणसमाजाचे विघटन होऊन वर्गीय समाजाकडे तसेच मातृसत्ताक जीवन पद्धतीकडून पितृसत्ताक जीवनपद्धतीकडे वाटचाल सुरू झाली. या आर्थिक, समाजिक बदलाच्या स्थित्यंतरांच्या काळात, संकरातून विविध जातींची उत्पत्ती झाली.

**प्रतिलोम विवाह : शूद्र जातीत गणना –**

सर्व धर्मसूत्रांनी सांगितलेल्या एकेचाळीस संकरित जातींची यादी श्री. बॅनर्जी यांनी दिली आहे. त्यातील काही अशा –

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उदा. | जात | = | पुरुष | + | स्त्री |
| | रथकार | = | क्षत्रिय | + | ब्राह्मण |
| | चर्मकार | = | विदेहक | + | बाह्मण |
| | निषाद | = | वैश्य वा शूद्र | + | ब्राह्मण |
| | धीवर (मासेमार) | = | वैश्य | + | क्षेत्रीय |
| | कर्मकार | = | मगध | + | क्षत्रिय |
| | नाविक | = | अंबस्थ | + | ब्राह्मण |

ज्या संकरात[७] स्त्री श्रेष्ठ वर्णाची व पुरुष निम्न वर्णाचा या विवाहांना प्रतिलोम म्हटले जाते. ज्या संकरात पुरुष श्रेष्ठ वर्णाचा आणि माता निम्न वर्णाची त्याला अनुलोम म्हणतात. अनुलोम संकरात सर्वसाधारणपणे पुरुषाचा वर्ण संततीला मिळे. मात्र प्रतिलोम विवाहातून निर्माण झालेल्या जाती 'शूद्र' मानल्या गेल्या. आई श्रेष्ठ असली तरी आईची जात मुलाला मिळाली नाही. वरील सर्व संकरात माता श्रेष्ठवर्णाची आहे तर पुरुष निम्न वर्णाचा आहे. वरील सर्व जाती श्रेष्ठ नाहीत. त्या शूद्रात जमा होणाऱ्या आहेत.

भूमीची सुफलता वाढावी या हेतूशी जोडलेल्या विधिउत्सवांतील स्त्रीप्रधानतेचा शोध घेताना वरील विवेचन महत्त्वाचे ठरते. शेती हा व्यवसाय प्रामुख्याने वैश्य, शूद्रांचा होता. बहुजन समाजाचा होता. आजही महाराष्ट्रात कुणबी, माळी, आदी जाती शेती व्यवसायात आहे. वेगवेगळ्या आर्येतर समाजांना विविध जातीत विभागताना नेमके काय घडले असावे याचे विवेचन करताना 'समाज आणि धर्म : ऋग्वेद काळ ते पुराणकाळ ' या ग्रंथात श्री. जयंत गडकरी लिहितात, 'इतर आर्येतर समाजातील पुरोहितवर्ग आणि टोळी संघप्रमुखांना वरिष्ठ वर्णीयांत सामील करून घेण्याचे विधी ब्राह्मणांनी वापरले असावेत. आर्येतर समाजातील इतर सामान्य माणसांना वर्णचौकटीत समाविष्ट करून घेण्याचा प्रश्न, त्यांना शूद्र वर्णांतर्गत जातीत घेऊन सोडवला असावा हे स्पष्टपणे दिसून येते. समाजाच्या विकासाच्या प्रक्रियेत आपले श्रेष्ठत्व नष्ट होईल या भीतीतून शुद्धत्वाची ग्वाही देण्याकरिता या समाज समूहांना खालचा दर्जा देण्याकरिता 'संकर कल्पना' शोधून काढली असावी. ज्या पुरोहित वा टोळी संघप्रमुखांना वरिष्ठ वर्गात सामील करून घेतले त्यांना ब्राह्मणवर्गात समाविष्ट करून घेतले. गुजरातेत ८४ प्रकारच्या ब्राह्मण जाती आहेत. ब्राह्मणात पंच गौड व पंचद्रविड असे १० भेद आहेत. त्यांच्यात पूर्वी बेटी व्यवहार नव्हता.

जी स्त्री 'मातृदेवता' म्हणून पूजिली गेली, ज़ी जीवनपद्धतीची अधिष्ठात्री होती तिची गणना 'व्यवहार' करण्याच्या एका वस्तूत झाली असे लक्षात येते. या संदर्भात एक महत्त्वाची बाब अशी. स्त्री ही 'वाहक' असते. एक स्त्री शिकली तर ती पुढच्या पिढीला, सासरमाहेरच्या कुळांत आत्मसात केलेले शिक्षण सहजपणे देत असते. आणि म्हणून स्त्रिया ज्या ज्या वर्णात गेल्या तिथे त्यांनी त्यांच्या मनात

रूजलेले कृषिविषयक यातु श्रद्धांचे आदिबंध नेले. स्त्रीप्रधान जीवनव्यवस्था मुळापासून उखडून टाकण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न झाले असावेत असे अनेक अभ्यासकांना वाटते. आणि तरीही स्त्रियांनी कृषिसुफलनाशी निगडित श्रद्धा विधिव्रतांच्या माध्यमातून, धर्माशी त्यांचे नाते जोडून जतन केल्या. हे त्यांनी जाणीवपूर्वक केले असे मुळीच नाही. मुळात कृषिसुफलनाच्या विधींचे स्वरूप 'यातु' शी जोडलेले होते. धर्माचे मूळ 'यातु' वा जादूत आहे ही वस्तुस्थिती जगन्मान्य आहे. या विधिउत्सवांना स्त्रियांनी सहजपणाने धर्माधिष्ठित कर्माशी जोडून घेतले. ही बाब समजून घेणे महत्त्वाचे ठरते. मातृसत्ताक समाजव्यवस्थेकडून पितृसत्ताक समाजव्यवस्थेकडे जाण्याच्या वाटचलीतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**कौटिलीय अर्थशास्त्र आणि स्त्रीचे अधिकार –**

जाती, वर्ग यांत विभागलेल्या समाजाला - भारतातील समाजाला एक छत्राखाली आणण्याचा प्रयत्न प्रथम चाणक्याने केला. हे कार्य करताना कौटिल्याच्या गण आणि संघराज्यातील सामान्य कुटुंबांना नव्याने लागवडीखाली येणाऱ्या प्रदेशात, त्यांच्यात गट पाडून पाठवावे लागले. वेगवेगळ्या गण व संघ राज्यांतील कुटुंबे विखुरली गेली. परंतु एक संघटित असे राष्ट्र निर्माण झाले. नियम केले गेले. चाणक्याचा काळ मनूच्या पूर्वीचा आहे. चाणक्य[८] स्त्रियांच्या बाबतीत वैदिक हिंदू धर्मग्रंथांपेक्षा उदार आहे. सर्व समाजांना एकाच सांस्कृतिक छत्राखाली आणण्यासाठी त्याने नियम केले. या काळात कुंटुंबसंस्था स्थिर होत गेली. विवाहाचे आठ प्रकार कल्पिले गेले. पोटगी, स्त्रीधन, घटस्फोट या बाबतचे कायदे झाले. परदेशांत गेलेल्या, राजाचा अपराध केलेल्या , पत्नीच्या जिवावर उठलेल्या पतीचा त्याग करण्याची संमती कायद्याने दिली होती (३/३ २५ ते २९) या काळात उद्योगांचा विकास झाला. मातृसत्ताक जीवनपध्दतीत सूत काढणे, विणणे हे व्यवसाय स्त्रिया करीत. त्यात त्या वाकबगार होत्या. कौटिल्याच्या काळात लोकर, अंबाडी, कापूस, वृक्षाची साल, सण यापासून सूत काढण्याचे काम स्त्रियांना दिले जाई. विधवा, पंगू स्त्रिया, कन्यका, घर सोडलेल्या वा घरातून बाहेर काढलेल्या स्त्रिया, वेश्यांचा माता, देवसेवा बंद झालेल्या देवदासी, घराबाहेर न पडणाऱ्या उच्चवर्णीय स्त्रिया यांना हे काम देण्याची व्यवस्था सूत्राध्यक्ष करी. हे काम सदर

महिलांपर्यंत दासींकरवी पोहोचवावे असे लिहिले आहे. अधिकाऱ्याने स्त्रियांच्या तोंडाकडे पाहिल्यास कमी मजुरी दिल्यास त्याला दंड करण्याचे आदेश कौटिलीय अर्थशास्त्रात दिले आहेत. ही कला स्त्रियांनी गेल्या हजारो वर्षांपासून जपली आहे. 'वयन्ति ' म्हणजे सूत काढणारी स्त्री. या शब्दाला पुल्लिंग नाही. आजही हातमाग व्यवसायात स्त्रिया अधिक आहेत. दुर्वर्तनी स्त्रीपुरुषांना चाणक्याने दंड ठेवला परंतु पुरुषास स्त्रीपेक्षा दुप्पट दंड आहे. चाणक्याचे अर्थशास्त्र एका वर्गाच्या सोयीसाठी लिहिले गेले नाही. हा काळ इ.स. पू. तीसरे वा दुसरे शतक असावा. या काळातील भारतीय समाज एक छत्राखाली आला.

**न स्त्री स्वातंत्र्यमर्हति –**

या नंतरचा काळ मनुस्मृतीचा आहे. गणराज्यांच्या विघटनाबरोबरच मातृसत्ताक जीवन व्यवस्था मोडकळीस आली. तरीही स्त्रीचे आर्थिक व समाजिक स्थान पूर्णपणे दुय्यम झालेले नव्हते.त्यामुळे कौटिल्याने तिच्या अस्तित्वाचा विचार, तिच्या सामाजिक - कौटुंबिक आर्थिक प्रश्नांचा विचार माणुसकीच्या भूमिकेतून आणि समाजातील एक महत्त्वाचा घटक म्हणून केला. परंतु नागरीकरण, मालमत्ता हक्क, कुंटुबंव्यवस्थेचा विकासक्रम या वाटचालीत स्त्री - पवित्र्याच्या कल्पना तिच्या देहाभोवती केन्द्रित होऊन, अधिकाधिक कठोर झाल्या. तिची गणना 'शूद्रादिकांत' केले गेली. स्त्री मग कोणत्याही वर्णाची असो 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' हे सूत्र तिला लावले गेले.

**मानवाच्या कल्पनासृष्टीत त्याच्या अंतःसृष्टीचे प्रतिबिंब –**

भूमीच्या सुफलतेशी जोडलेल्या विधिउत्सवांतील स्त्रीप्रधानतेचा शोध घेताना भारतातील मातृदेवता आणि मातृसत्ताक जीवनपद्धतीचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरते. विश्वाच्या मुळाशी असलेल्या आदितत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न मानवाने आपल्या हजारो वर्षांच्या अनुभवातून, निरीक्षणातून केला. त्याच्या अदितत्त्वासंबंधीच्या कल्पनासृष्टीत त्याच्या अंतःसृष्टीचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. मानवी रूपातील जी दैवते मानवाने आदितत्त्वांसाठी कल्पिली त्यावरून मानवाच्या आत्मिक आणि सांस्कृतिक विकासाचा आलेख स्पष्ट होतो. दैवतविषयक कल्पनांचा उगम भौतिक वास्तवातून झालेला असतो. त्या दैवतांच्या साहाय्याने

सामाजिक परिवर्तनामागची कारण परंपरा जाणता येते. माणसाची अंतःसृष्टी स्वयंभू नसते. दैवत कल्पना वास्तवातून आकारलेल्या असतात. त्यामुळे दैवत परिवर्तनाचा इतिहास हा मानवाच्या सामाजिक परिवर्तनाचे संकेत देणारा असतो. असे म्हटले जाते की, 'Gods are born in the minds of men.' दैवत कल्पना, त्याच्याशी निगडित श्रद्धा,कर्मकांडे, तत्त्वचिंतन या सर्वांचा जन्म मानवाच्या भौतिक जीवनानुभवातून होत असतो. माणसाच्या सामाजिक संघटनेचा आधार आर्थिक जीवनात आढळतो. आर्थिक संघटनेचे स्वरूप पालटले की समाज संघटनेतही परिवर्तन होते. मानवी जीवनाचा पाया, त्याची भौतिक - आर्थिक संघटना आहे. या संघटनेत मूलभूत परिवर्तन होताच त्याच्या सामाजिक सांस्कृतिक धार्मिक कल्पना विश्वाला नवा आकार मिळतो.

त्या त्या लोकसमूहाचे दैवत विकल्पन आणी तत्त्व चिंतन यांचा त्या लोकजीवनाच्या सामाजिक - आर्थिक जीवनाशी अतूट असा आंतरिक संबंध असतो. मानवाची अंतःसृष्टी त्याच्या भौतिक जीवनाच्या संघटनेतून विकास पावत असते. या भूमिकतून भूमीच्या सुफलतेशी संबंधित उत्सवात स्त्रीप्रधानता का आहे याचा शोध घेता येईल. त्या दृष्टीने भारतातील मातृदेवतांची संकल्पना कोणत्या समाजिक संघटनेत आकारली, त्याचा आर्थिक आधार काय होता, वैदिक आर्यांचा या मातृदेवतांशी केव्हा व कसा संबंध आला, वैदिक आर्यांहून भिन्न अशा या दैवत विकल्पनाचा भारतीय समाजावर त्यांच्या जीवनचिंतनावर, कोणता परिणाम झाला, भारतीय संस्कृतीवर या दैवतविकल्पनाचा काय परिणाम झाला याचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

## आजची हिंदूसंस्कृती संमिश्र –

गेल्या दोन तीन हजार वर्षांपासून भारतातील वरिष्ठ वर्णीयांच्या जीवनावर वैदिक आर्यांच्या संस्कृतीचा आणि तत्त्वचिंतनाचा घनदाट प्रभाव आहे. असे असले तरी लोकं जीवनात आणि वरिष्ठ वर्णीयांच्या विधिउत्सवांत या अवैदिक मातृदेवंताचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आहे. आजची हिंदू संस्कृती वैदिक आर्यांची एकसंध अशी संस्कृती राहिलेली नाही. तत्त्वचिंतनावर वैदिक आर्यांचा प्रभाव असला तरी विविध आचारविचारांची, श्रद्धांची , कर्मकांडांची संमिश्र अशी

जीवनरहाटी, असे तिचे आजचे रूप आहे. भारतात अनेक टोळ्या आपापली दैवत विकल्पने, श्रद्धा, कर्मकांडे घेऊन आल्या. संघर्ष, स्वीकार, समन्वय, समरसता यांतून ही संमिश्र तरीही एकात्म जीवनरहाटी निर्माण झाली. म्हणूनच 'हिंदू' हा धर्म न राहता ती जगण्याची पद्धती झाली. त्यालाच आपण 'धर्म' ही संज्ञा देतो. यात वैदिक आर्यांची निसर्गपूजा, यातुप्रधान यज्ञयागादी कर्मकांडे, तांत्रिकाची वामाचारप्रधान स्त्रीसाधना, वेदान्त्यांचा ब्रह्मवाद, ऐहिक कामनापूर्तीसाठी आचारवयाची व्रतवैकल्ये, मंत्रतंत्र, ग्रामदेवता, स्थलदेवता, जलदेवता, वनस्पती वा शाकंभरी देवता, रोगनिवारण व बालकाचे पोषण करणाऱ्या देवता, अशा देवतांचे मंत्रतंत्रात्मकविधी, देवाला तृप्त करण्यासाठी पशुबळी वा मुले सोडण्याचे विधी आणि उपचार हे सारे हिंदू धर्माच्या विशाल छत्राखाली नांदतात. यातील बहुतेक विधी आर्यांच्या विचार विश्वाशी विसंगत असून ते आर्येतर समाजातून आले आहेत.

भारतातील सर्व शक्तिपीठे अवैदिक देवी उपासनेची केंद्रे आहेत. जगदंबा, यल्लमा, रेणुका आदी स्त्री देवतांची पूजा करताना पुजाऱ्यांना स्त्रीवेश धारण करावा लागतो. या उपासना वैदिकांच्या कक्षेबाहेरच्या आहेत .विशेष करून दक्षिणेतील धार्मिक सांस्कृतिक जीवनावर अवैदिक आर्येतर समाजातील आचारविधींचा प्रभाव आढळतो. स्त्रियांच्या आणि बहुजन समाजाच्या श्रद्धाविश्वात ग्रामदेवता, भूदेवता, रोगनिवारक देवता या मातृदेवतांना प्रमुख स्थान आहे.

घटस्थापना, नवरात्रोत्सव, सटीचे नवरात्र, गौरी गणपती, हरितालिका, चंपाषष्ठी ही व्रते- विधिउत्सव भूमीच्या सुफलीकरणाशी कसे निगडित आहेत याची चर्चा, वरील सणांचा परामर्ष घेताना विस्ताराने केली आहे.

### ऋग्वेदात गौरविलेली अंभृणी देवता[१] : एक अपवाद –

वैदिक आर्य भारतात आल्यावर त्यांचा येथील विविध टोळ्यांशी, त्यांच्या देवतांशी संबंध आला. आर्यांचे दैवत विकल्पन पुरुषप्रधान आहे. त्यात स्त्री देवतांना महत्त्वाचे स्थान नव्हते. भारतात आल्यावर यज्ञ विध्वंसक शिव, देवी या देवतांशी त्यांचा संपर्क आला. ऋग्वेदातील वन्य देव रूद्राशी शिवाचा संयोग करून 'शिव' ही देवता वैदिकांनी उन्नयित स्वरूपात स्वीकारली. मात्र या संदर्भात एक गोष्ट आश्चर्यचकित करणारी आहे. उत्तरकालीन वैदिक वाङ्मयात 'अंभृणी' या देवतेचा

गौरव ऋषींनी केला आहे. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात तिचे गौरवपूर्ण वर्णन आहे. ती स्वतःबद्दल म्हणते ''मी मित्रवरुणांना धारण करणारी आहे. इंद्र, अग्नी, अश्विनी देव यांची मी धात्री आहे. मी विश्वावर अधिसत्ता चालविणारी, सर्वांना धन देणारी, ज्ञानसंपन्न, यज्ञीय देवतात श्रेष्ठ मीच आहे' मात्र या संदर्भात डॉ. स. रा. गाडगीळ एक महत्त्वाची बाब लक्षात आणून देतात की, या अंभृणीची ऋग्वेदात स्तुती केली पण तिला एकदाही यज्ञीय आहुती दिलेली नाही. वैदिक आर्य आपल्या मूळ निवासस्थानाकडून भारताच्या दिशेने येत असताना मध्य आशियातील स्त्रीप्रधान संस्कृतीशी त्यांचा संबंध आला असावा किंवा भारतात आल्यानंतर ही आर्यपूर्वांची देवता त्यांनी आपल्या दैवत विकल्पनात समाविष्ट करून घेतली असावी. आर्य उत्तरेकडून आले. त्यावेळी पंजाबसिंध भागात कृषि संस्कृती अस्तित्वात होती. कृषि संस्कृती आणि मातृदेवता यांच्यातील संबंध पाहणे महत्त्वाचे ठरते. ऋग्वेदात भारतातील असुरांबद्दल उल्लेख आहेत. ते शिवपूजक आहेत असाही उल्लेख आहे आणि शिवपूजा लिंग स्वरूपात होते. जिथे लिंगपूजा तिथे योनिपूजा असतेच.

**वैदिक श्रद्धांच्या भूपृष्ठाखालची जमीन –**

गीतेच्या १६ व्या अध्यायात म्हटले आहे की, असुरांच्या मते ही सृष्टी, 'विश्वदेखील स्त्रीपुरुष संयोगातून निर्माण झाले आहे. तसेच कामोपभोग हे जीवन सर्वस्व मानून असुरांचे एकूण आचरण असते. रावण हा असुर होता. तो शिवपूजक होता. विष्णु ही देवता जी वैदिकांची आहे. तिची मंदिरे अवतारांच्या स्वरूपात, विठ्ठल, रामकृष्ण आदी या रूपात दिसतात. शिव मात्र लोकदेवतेच्या विविध रूपांत बहुजन समाजात पूजिला जातो. तंत्रग्रंथ उत्तरकालीन असले तरी तंत्रसाधना अतिप्राचीन आहे. या साधनेत स्त्रीपूजेला महत्त्व आहे. काही ग्रंथांत शिव आणि शक्ती यांच्या संयोगाचे , स्त्रीपुरुष यांच्या संयोगाची असलेले साधर्म्य तपशीलवार वर्णिले आहे. तसेच प्रकृती पुरुष यांच्या विश्वात्मक कामक्रीडेशी (Cosmiclust) सद्भाव साधण्यासाठी वामाचार विधी सांगितले आहेत. भारतातील अनेक देवीपीठांत देवीची योनिशिल्पाच्या रूपात पूजा होते. लिंग, योनिपूजा करणाऱ्या शैव, शाक्त संप्रदायाची मुळे आर्यपूर्व समाजात आहेत. या संदर्भात भारतीय तत्त्वज्ञानाचे थोर अभ्यासक [10]देवीप्रसाद चटोपाध्याय लिहितात, 'आपल्याला

अनुमान काढावे लागते की, वैदिक श्रद्धांची भूपृष्ठाखालची जमीन धार्मिक दृष्टिकोनातून तयार झालेली नव्हती तर मांत्रिकांच्या यातुप्रधान दृष्टिकोनातून तयार झालेली होती.'

**योनिपूजा हीच विश्वजननीची पूजा –**

आदिमानवाला निर्मिती-पुनर्निर्मिती या घटनांबद्दल गूढ आकर्षण होते. भूमी आणि स्त्री यांच्यातील सर्जनतेचे सामर्थ्य त्याने अनुभवलेले होते. दैनंदिन जगण्याला आवश्यक अशा गरजांची परिपूर्ती स्त्री आणि भूमी यांच्याकडूनच होते. हे लक्षात येताच त्याची ठाम समजूत झाली की या दोहोंत काही तरी अनाकलनीय जादू आहे. 'असुशक्ती' आहे. यातु सामर्थ्य आहे. या शक्तींद्वारे भूमीतून वनस्पतींचे सर्जन होते व स्त्री माणसाला जन्म देते. या साधर्म्यातून त्याने विश्वजननीची मातृदेवतेची कल्पना केली असावी. स्त्रीप्रमाणे विश्वाला जन्म देणाऱ्या जगन्मातेची योनी हे सर्जनाचे-निर्मितीचे केन्द्र कल्पून आदिमानवाने योनिपूजा[११] हीच विश्वजननीची पूजा हा संकेत निश्चित केला.

अंबुवाची उत्सव असामात अत्यन्त थाटात साजरा होतो. त्या ठिकाणी सतीची योनी गळून पडली असे मानले जाते. भारतात उपलब्ध झालेल्या योनिशिल्पांच्या आधारे निश्चित अनुमान काढता येते की, एकेकाळी सर्व केन्द्रांत देवीची उपासना होत असावी. भारतात वैदिक आर्य येण्यापूर्वी फार मोठ्या प्रमाणावर आद्यशक्तीची यात्वात्मक विधींनी पूजा केली जात असावी. निषाद, शबर या पारधजीवी जमातीतही देवीपूजा होती. मात्र वैदिक आर्यांना ती पूर्णपणे अज्ञात होती.

**देवीपूजा आणि मातृसत्ताक समाज यातील आंतरिक अनुबंध –**

मोहंजोदारो हरप्पाचे उत्खनन झाल्यानंतर भारतीय संस्कृतीचे अनेक दुवे हाती आले तो पर्यंत भारतातील मातृदेवतेची उपासना भारताबाहेरून आली असे मानले जाई. मध्य आशियातील मेसोपोटेमिया, इराक, सीरिया इ. देशांत अतिप्राचीन काळापासून ती होती. ज्या सामाजिक संघटनेत पुरुषप्रधानता असते तिथे मातृदेवतांचा विकास होणे शक्य नाही. हे मत सिंधू संस्कृतीच्या उत्खननापूर्वीच आर.पी. चंदा या मानववंशशास्त्रज्ञांनी व्यक्त केले होते. शाक्त कल्पनेनुसार विश्वाचे आदितत्त्व प्रकृती आहे. सर्जनाची इच्छा होताच तिने ब्रह्मा, विष्णु, महेश हे तीन

पुरुषदेव निर्माण केले. प्रारंभीच्या निर्मितीसाठी तिला पुरुषाची गरज वाटली नाही. नंतर तिने शिवाला प्रियकर म्हणून स्वीकारले, या दोहोंच्या शिवशक्ती संयोगातून विश्व निर्माण झाले. ती जगन्माता बनली. हीच कल्पना मध्य आशियातील मातृदेवतांच्या निर्मितीमागे आहे. प्रथमतः देवी एकटी असते. आत्मदेहापासून ती जोडीदार निर्माण करते. त्यांच्याशी संयोग करून विश्वनिर्मिती करते. मध्य आशियात इसिसहोरस (इजिप्त), अंस्टॅरॉथटॅमझ (फोएनिशिया), सिबिलॲटिस (आशिया मायनर), व्हीआझ्युअस (ग्रीस) अशा नावांनी जगन्मातापितरे ओळखली जातात. मध्य आशियातील मातृसंप्रदायात, भारतातील देवीउपासना, देवदासी संप्रदाय, स्त्रीमाहात्म्य, स्त्रीपुजारिणी ही देवीसंप्रदायाची वैशिष्ट्ये होती. या संदर्भात रामाप्रसाद चंदा यांनी १९१६ मध्ये असे अनुमान काढले की मध्य आशियातील देवीसंप्रदाय ज्या प्रमाणे मातृसत्ताक समाज व्यवस्थेत निर्माण झाला. तद्वत भारतातील देवीसंप्रदाय मातृप्रधान समाज व्यवस्थेत बहुधा निर्माण झाला असावा.

'The Shakta conception of Devi, as Adya Sakti, the promordial energy and Jagadamba, the mother of the Univerce also very probabaly are in a society where matrichate or motherkin was prevalent.'

मध्य आशियातील देवीसंप्रदाय आणि मातृसत्ताक समाजव्यवस्थेचा आंतरिक संबंध दाखविताना श्री. चंदानी, प्रो. पॅटॉन[१२] यांच्या विधानाचा आधार दिला आहे. अरबी वाळवंटातील ओॲसिस भागात मातृसत्ताक टोळ्या राहत. त्या संदर्भात प्रो. पॅटॉन म्हणतात -

There is a large body of evidence to show that the semites before their separation passed through a matriarchal stage of society. The tribe was a group of people inhabiting in the particular oasis in the Arabian desert. It was made up of mothers, their brorthers and children. Fathers were men of other tribes in other oasis, who contracted only temporary

unions with mothers. Descent was traced through the mother and she was the head of the clan in peace and war. In such a society the chief deity of the tribe must have been conceived as a counter part of the human matriarch '

या मातृसंस्कृतीचा विकास पुढे मेसापोटेमिया, आशिया मायनर इ, प्रदेशांत झाला. इजिप्तमध्ये मातृसत्ता अगदी अलीकडच्या काळापर्यंत होती. इजिप्तची राणी जगदंबेची पुजारीण असे. राज्याचा वारसा मातेकडून निश्चित केला जाई. धर्मकृत्याचे अधिकार तिच्याकडे असत. देवीसंप्रदाय आणि मातृसत्ताक जीवनपद्धती यातील आंतरिक अनुबंध अनेक विचारवंतांनी प्रगट केला आहे. स्टार बक म्हणतो,

"Female dieties have often enjoyed the highest place among the gods. This depends upon the nature of the social organisation and the respect in which women are held."

**सिंधू संस्कृती उत्खननानंतर हाती आलेले दुवे –**

सिंधू संस्कृतीच्या उत्खननात मातृसत्तेचे व देवी संप्रदायाचे विपुल पुरावे उपलब्ध झाले आणि मातृसत्ता व देवीसंप्रदाय आशिया मायनरमधून भारतात आले, हा सिध्दान्त निरर्थक ठरला. उत्तरकालीन तांत्रिकाची शिव आणि शक्ती ही दैवते आर्यपूर्व सिंधुसंस्कृतीत लिंग योनी या प्रतिमांच्या रूपात पूजिली जात.

सिंधू संस्कृतीच्या उत्खननात सापडलेली महत्त्वाची मुद्रा जिचा उल्लेख या प्रबंधात शाकंभरी उत्सवाच्या संदर्भात आलेला आहे,ती भूमातेचे प्रतीक असली पाहिजे. खाली डोके, वर फाकलेले पाय, अशा स्त्रीच्या जननेन्द्रियातून एक वनस्पती उगवल्याचे या मुद्रेवर दाखविले आहे. सर्व विश्वाचे पोषण करणारी वनस्पतीसृष्टी जगन्मातेच्या भूमीच्या देहातून निर्माण होते हे या प्रतिमेतून सुचवायचेआहे. मार्कंडेय पुराणात जगदंबा आपल्या देहाचे वर्णन याच स्वरूपात करते. 'आत्मदेह समुद्भव' सिंधू संस्कृतीत सापडलेली ही प्रतिमा शाकंभरी देवीचीच आहे असे देवीप्रसाद चटोपाध्याय नोंदवितात. ही मुद्रा वनस्पतीसृष्टीशी जगन्मातेचा असलेला संबंध दाखवून देते.

## यातु : महानुभावात्मक आणि समानोत्पत्तिक –

स्त्री आणि भूमी यांच्यातील साधर्म्यातून आदिमानवाचा यातुप्रधान धर्म निर्माण झाला. या दोहोंतील साधर्म्य आणि साहचर्य यांच्या निरीक्षणातून काही ठोकताळे त्याने बांधले. विश्वातील सर्व वस्तूंमध्ये 'असु' शक्ती असते. एक गूढ सामर्थ्य असते. ते सामूहिक मंत्रगान आणि विधियुक्त कर्मातून वाढविता येते. अशी आदिमानवाची श्रद्धा होती. आदिमानवाला वस्तू आणि व्यक्ती यातील भेद कळत नव्हता. या श्रद्धेतून अनेक विधी निर्माण झाले. उदा. पर्जन्यनृत्य केल्यास पाऊस पाडण्याचे सामर्थ्य माणसात येते. आदिमानवाची जीवनरीती यातुप्रधान होती. जादूविद्येचे तर्कशास्त्र अजब असते. संभवनीयता हे त्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. जादूविद्या दोन प्रकारची असते. एक सहानुभवात्मक (Sympathatic) दुसरी (Homeopathic) त्याला समानोत्पत्तिक म्हणता येईल. सहानुभावात्मक अभिचाराचे महत्त्वाचे तत्त्व असे आहे की वियुक्तावस्थेतही मूळ संबंध कायम राहतो. उदा. इस्त्राईल लोकात दूध तापवीत नसत. दूध तापवले तर गाईला भाजल्याचा त्रास होतो. मराठवाडा, महाराष्ट्रातही दुधाच्या कासंडीत धारा काढण्यापूर्वीच थोडेसे पाणी टाकतात. पाणी न घालता दूध तापवले तर जनावराची कास जळते अशी सर्वमान्य समजूत आहे. होमिओपॅथ यातुचे तत्त्व सारख्यातून सारखे निघते हे आहे. पावसाळ्यातली नृत्ये शेतातील डोलणाऱ्या पिकांची नक्कल करणारी असतात. या संदर्भात दुर्गाताई भागवत लिहितात, [१३] 'मराठीतले मुलाला उभे करून दोन्हीही बाजूला झुकवून म्हणावयाचे गाणे -'

वारा पाऊस चाले
शेती जोंधळा हाले.

मला अशाच जुन्या प्रथेचा अवशेष वाटतो. प्रथा गेली. शब्द व क्रिया राहिली व ती साध्या बालरंजनात समाविष्ट झाली. फुगडी झिम्म्याचे खेळही मूळचे असेच असले पाहिजेत यात संशय नाही.'

## पाऊस – स्त्री – भूमी : सुफलीकरण –

पाऊस पडवा यासाठी विवस्त्र स्त्रीच्या अंगावर लतावेली गुंडाळून तिच्या डोक्यावर सच्छिद्र जलकुंभ दिला जातो व तिची मिरवणूक काढतात. यातील

प्रतीकात्मकता सुस्पष्ट आहे. स्त्री ही भूमीरुप असून कुंभरूपी मेघांतून तिच्यावर जलवृष्टी होते. त्यातून तिच्या देहावर वनस्पती उगवल्या आहेत अशी या यातुविधीमागची कल्पना आहे. ही अनुकरणात्मक यातुविधीची कल्पना आहे. १८७४ मध्ये गोरखपूरला प्रचंड दुष्काळ पडला होता. त्यावेळी या यातुविधीचा अवलंब केल्याची नोंद आहे. गर्भवती स्त्रीला केळीच्या झाडाखाली आंघोळ घातल्यास तिला बाळंत होण्यास त्रास होत नाही. निपुत्रिक स्त्री उघड्यावर पावसात आकंठ भिजल्यास तिला गर्भधारणा होते अशी महाराष्ट्रात, भारतात समजूत आहे. बाणभट्टाच्या हर्षचरित्रातील राणी विलासवती पुत्रप्राप्तीसाठी यंत्रपूजा करून चौकात नग्न स्नान करते असा विधी आहे. तिने केलेले स्नान तंत्रसाधनेचा एक भाग आहे हे लक्षात घेतल्यास, देवी उपासक तांत्रिकाचा वामाचार विधी भूमीच्या वा स्त्रीच्या सुफलन विधीचा एक भाग आहे हे लक्षात येते. अशा तऱ्हेच्या श्रद्धा जगभर होत्या. विशेष करून आफ्रिका, दक्षिण अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, भारत येथील यातुश्रद्धांत खूप साम्य आहे.

[१४]Bushmen women and girls are careful to take shelter during a shower, for the rain from heaven which fertilises the earth would impregnate them also. Hottenlot women believe that it would be impossible for them to have any children unless they had first stood naked in a thunder shower.. Australian women likewise believe that they can be impregnated by the rain. A mongol princess conceived through the operation of hail storm.

या परिच्छेदातील मंगोल राजकन्या आणि राणी विलासवती एकाच परंपरेतील आहेत.

### कृषियातुविज्ञान : पुरातन परंपरा –

स्त्री आणि भूमी यांच्या साधर्म्यातून कृषियातुविज्ञान (Agri-magic) निर्माण झाले. मानवी संस्कृतीच्या इतिहासातील फार मोठा कालखंड कृषियातुविज्ञानाने व्यापलेला आहे. यातूनच मातृसत्ता, मातृदेवता, सुफलीकरण विधिउत्सवांतील स्त्रीप्रधानता यांच्यातील आंतरिक संबंधांवर प्रकाश टाकता येईल. आदिमानवाच्या

महत्त्वाच्या दोन गरजा होत्या. त्या म्हणजे अन्न आणि संतती. आज जग एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असताना शेती आणि यातुसाधना यांचा संबंध इतका निकटचा होता यावर जगाचा विश्वास बसणे कठीण आहे. परंतु हजारो वर्षांपूर्वी धान्य निर्मितीची प्रक्रिया मानवास अवगत नव्हती. जीवन जगण्यासाठी विपुल धान्य निर्माण होणे आवश्यक होते. अर्थातच त्याकाळात धान्यनिर्मितीची क्रिया मंत्रतंत्रावर अवलंबून असते अशी आदिमानवाची श्रद्धा होती. आजही वन्य समाजात या श्रद्धेला धार्मिक माहात्म्य आले आहे. डहाणू भागातील वारली समाजात पेरणीच्या वेळी सर्व गाव एकत्र जमते. पेरणी करावयाच्या भातावर-साळीवर देवाला बळी दिलेल्या कोम्बड्याचे रक्त शिंपडतात व नंतरच पेरणी करतात. पेरलेल्या साळीचे तांदूळ घरात येईपर्यंत मटन, कोंबडी अंडी जूनच्या पावसानंतर येणारी फळे घरातील प्रमुख पुरुष आणि त्याची पत्नी खात नाहीत. तसेच हे दोघे जुना तांदूळ खातात. नासिक भागातील ठाकर लोक पेरणीपूर्वी भूमीला कोम्बड्याचा बळी देतात. धान्य हाती आल्यावर प्रत्येक जण आपापल्या शेतातील भाताची एकेक पेंढी एकत्र करतात. त्यावर बळीचे रक्त शिंपडतात. सायंकाळी त्या पेंढ्यातील नव्या तांदळाचा भात शिजवून सर्व गाव एकत्र जेवण करते. वन्य जमातीत पेरणी कापणीच्या काळात जे यातुविधी केले जातात ते आजही केले जातात, त्यांना हजारो वर्षांची वेदपूर्वकाळापासूनची परंपरा आहे.

वैदिक आर्य भारतात आले आणि येथे स्थिर होताना त्यांनी कृषिविषयक मंत्रतंत्र विधी स्वीकारले. अथर्ववेद, तैत्तिरीय संहिता यात शेतीचे मंत्र आहेत. ऋग्वेदातही मंत्र आहेत. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात शेतीची व्यवस्था पाहणाऱ्या अधिकाऱ्यास सीताध्यक्ष म्हटले जाई. सूत्र वाङ्मयात तर शेतीच्या अनेक देवतांचा उल्लेख आहे. वैदिक आर्य मुळात गोपालक होते. मंत्रातंत्राची त्यांना गरज भासली नाही. भारतात आल्यावर त्यांनी कृषिव्यवसायाचा स्वीकार करून मंत्रतंत्रही उन्नयित स्वरूपात स्वीकारले. त्याची मीमांसा करताना थॉमसन[१५] लिहितो -

So long as they have pasture, cattle feed and breed of themselves but by comparison with cattle raising the works of tilling, sowing and reaping is now ardous and uncertain. It requires patience, foresight, faith. Accordingly agricultural

society is charactarised by the extensive development of magic.

**कृषिमंत्रात स्त्रीला महत्त्व –**

कृषिविषयक मंत्रात 'स्त्री'ला महत्त्व होते. या संदर्भात देवीप्रसाद चटोपाध्याय नोंदवतात -

If agriculture was the invention of women, then it is only logical that agricultural magic in its origin should belong exclusively to the province of women.

प्रागइतिहास काळात शिकारीचे काम पुरुषाकडे होते. गरोदरपण, मूल जन्माला घालणे, त्याचे भरणपोषण ही जबाबादारी निसर्गतः स्त्रीकडे असल्याने तिला स्थिर व्हावे लागले. आणि निरीक्षण, पोटातील भूक यांचा मेळ घालून तिने शाक, फळे, बी जमा करण्याचे काम स्वतःकडे घेतले त्यातूनच तिने वसाहतीत राहून शेतीचा हस्तव्यवसाय सांभाळण्यास सुरुवात केली. आणि शेती, शेतीशी निगडित व्यवसाय हे स्त्रीचे कार्यक्षेत्र झाले. जगातील सर्व देशांत शेतीसंबंधीच्या मंत्रतंत्र विधीत स्त्रीला महत्त्वाचे स्थान होते. ब्रिफॉने या क्षेत्रात मौलिक संशोधन केले आहे. उदा. हिदात्सा जमातीत धान्योत्सवामध्ये स्त्रिया शेतातील वनस्पतीचे तुरे काठीला बांधून नृत्य करीत घरी येतात. नंतर अंगावरील सर्व वस्त्रे उतरवून ठेवतात. चेइनीज जमातीत धान्याची विपुल निर्मिती व्हावी यासाठी स्त्रिया धान्यनृत्य करतात. सेरोलोनेमध्ये रारुबा जमातीत स्त्रिया शेतीच्या सुफलीकरणाच्या औषधी - मंतरलेले रसायन तयार करतात. बहुतेक देशांतले पर्जन्यविधीही स्त्रियांकडे असत. कॅनरी बेटांतील ग्वांची पर्जन्यविधीसाठी स्वतंत्र स्त्री पुरोहित असत. युरोपमधील चेटक्यांची परंपरा स्त्री मांत्रिकांतून आली आहे. भारतातील अनेक जमातीतील पर्जन्यविधी स्त्रियांच्या हातात असतात. मध्य प्रदेशात भारिया स्त्रिया कर्मानृत्ये गाण्यात प्रवीण असतात. त्यांच्या नाचगाण्यात जादू असते अशी श्रद्धा आहे. देवार या भटक्या जातीच्या स्त्रिया ढोलावर उभे राहून पालित्याचे नृत्य करतात. हा एक जादूटोण्याचा प्रकार आहे असे मानतात.

महाराष्ट्रात मुली स्वतःभोवती गिरक्या घेत 'इत्ता इत्ता पाणी - गोल गोल राणी'

असे म्हणत खेळतात. त्यातून पाणी कसे वाढते ते क्रियेद्वारे अभिनित करतात आणि हा खळ पावसाच्या सुरुवातीसच अदिक्याने खेळला जातो. झिम्मा, फुगडी, कोंबडा हे सारेच खेळ स्त्रियांचे आणि कृषिसंबंधीचे आहेत.

भारतातील देवी संप्रदायात'स्त्री' ला अत्यन्त महत्त्व आहे. महाराष्ट्रातील देवी उपासनेचे अवलोकन केल्यास स्त्रीमाहात्म्य लक्षात येते. नवरात्रात अष्टमीला स्त्रियांच्या अंगात येते. त्यांना प्रश्न, शकुन विचारतात. सप्तमातृकांची पूजा कर्नाटक, तामिळनाडू, आंध्राप्रमाणे महाराष्ट्रातही मोठ्या प्रमाणावर होते. मराठवाडा परिसरात योगेश्वरी, तुळजाभवानी, माहूरची रेणुका महत्त्वाची देवींची ठाणी आहेत. पृथ्वीची प्रतीके म्हणून अनंत अशा लौकिक ग्रामदेवता गावोगाव पूजिल्या जातात.

**वामाचार : मधुरा भक्ती –**

पुरुषप्रधान संस्कृतीने मातृसत्ताक संस्कृतीची जागा घेतली तेव्हा हळूहळू धार्मिक विधी पुरुषांकडे आले. परंतु स्त्रियांच्या या क्षेत्रात पाऊल टाकताना पुरुषांना 'स्त्री' होऊन यावे लागे. आशिया मायनरमधील सिबिल देवतेचे पुजारी पौरूषाचे खच्चीकरण करूनच पुजारी होऊ शकत. महाराष्ट्रात दक्षिण भारतात यल्लमाचे पुजारी चोळीलुगडे परिधान करून मळवट भरतात. माहूर तुळजापुरचे देवी भक्त 'भुत्या' केस वाढवून, चोळीलुगडे घालतात. सुरुवातीस जगभर पौरूषाचे खच्चीकरण करून देवीचे पुजारीपण दिले जाई. पुढे कालौघात स्त्रीवेष करून स्त्रीत्व प्राप्त होते असा समज रूढ झाला.

रामकृष्ण परमहंसांनीही स्त्रीवेश धारण करून देवीची उपासना केल्याचा उल्लेख त्यांच्या आत्मचरित्रात केला आहे. स्त्रीच्या भावात्म रूपात परमेश्वराची आळवणी करणारा संप्रदाय भारतातही होता. नाथपंथीय संस्कारांत वाढलेले कवी ज्ञानदेव परमेश्वराशी एकरूप होताना राधावृत्ती धारण करतात.

चंदनाची चोळी माझे अंगअंग जाळी
कान्हो वनमाळी वेगी भेटवा गा...
दर्पणी पाहता रूप न दिसे वो आपुले
बाप रखुमादेवीसमोर मज ऐसे केले...

या भक्तीच्या रूपाला 'मधुरा भक्ती' असे म्हटले जाते. प्राचीन काळी देवतांची उपासना, मंत्रतंत्र, मनुष्य व देव यांच्यातील मध्यस्थीचे व्यवहार स्त्रीकडेच होते. या आचारालाच तंत्रशास्त्रात वामाचार म्हणत. वामा म्हणजे स्त्री. 'वामा' होऊन आचार करणे. उपासकाने 'स्त्री' बनून उपासना करावी असा दंडकच होता. 'वामा भूत्वा यजेत् परम्' असा नियम आचारभेद मंत्राने सांगितला आहे. तंत्रोपासनेत स्त्रीमाहात्म्य आहेच. तंत्र साधनेतील स्त्रीमाहात्म्य आणि कृषिकर्मातील मंत्रतंत्रातील स्त्रीमाहात्म्य यांचे स्वरूप समान आहे. भूमीचे व स्त्रीचे सुफलीकरण हेच या दोही 'वामाचारां' मागचे रहस्य आहे. वामा म्हणजे स्त्री. स्त्रीप्रधान विधी म्हणजे वामाचार. वामाचार म्हणजे कामाचार. शेतीविषयक मंत्रतंत्रात स्त्रीपुरुष संयोगाला यात्वात्मक महत्त्व असते. वैदिकांनी अन्न, गोधन व संतती यासाठी यात्वात्मक यज्ञ केले. यज्ञविधींमध्ये उच्चारल्या जाणाऱ्या मंत्रांना 'कामवर्षा' हे नाव मिळाले. वैदिकांच्या यात्वात्मक विधीतही स्त्रीपुरुष संयोग विधींना महत्त्व होते. परंतु त्या विधीत पुरुषांना महत्त्व असे. तांत्रिकांच्या विधीत शेतीशी संबंधित विधींप्रमाणे स्त्रीला महत्त्व असे.

**भारतातील मातृसत्ता –**

ऱ्हेनफेल या संशोधकाच्या मते जगातील सर्वात आधिक प्रभावी मातृसत्ता भारतात होती व तेथून ती पश्चिम व मध्य आशियात गेली. हे त्यांचे मत विवादास्पद असले तरी प्राचीन वाङ्मयात स्त्रीराज्याचे उल्लेख येतात. अर्जुनाशी युद्ध करणारी प्रमिला ही एका स्त्रीराज्याची स्वामिनी होती. ह्युएनत्संगनेही 'पूर्वेकडील स्त्रीराज्य' आणि 'पश्चिमेकडील स्त्रीराज्य' असे उल्लेख केले आहेत . तिबेटमधील न्यू बँग टोळीत स्त्रीचे राज्य होते. स्कंदपुराणात पाच लाख खेड्यांचे मिळून बनलेल्या स्त्रीराज्याचा उल्लेख आहे. मॅगेस्थेनिसने पांड्य देशातील स्त्रीराज्याची माहिती दिली आहे. पांड्य देश म्हणजेच मलबार. याभागात अगदी अलीकडेपर्यंत मातृसत्ता होती. पुराण, रामायण, महाभारत यांत स्त्रीराज्यांचे उल्लेख आलेले आहेत.

भारतात आजही नायर आणि खासी जमातीत ही प्रथा आहे. माझ्या माहितीतल्या नायर कुटुंबातील विवाहपत्रिका आईच्या नावे काढली जाते. मात्र गेल्या ४०/५० वर्षांत या समाजातही पुरुषसत्ता वेगळ्या पद्धतीने वाढू लागली

आहे. सत्तेची सूत्रे भावाच्या वा मामाच्या हातात पूर्वीपासून होती. अलीकडे 'थरवाड' कमी होऊ लागली आहेत. पत्नी पतीच्या सोबत राहू लागली आहे. मात्र एक गोष्ट विचारात घेणे महत्त्वाचे ठरते. दक्षिणेत कर्नाटकी ब्राह्मण समाजात मामाशी भाचीचा विवाह परंपरने होतो. मुंजीच्या वेळी भाचा ब्रह्मचर्याची शपथ घेऊन संसार त्याग करू लागतो तेव्हा मामा त्याला अडवतो आणि मुलगी देण्याचे आश्वासन देतो. महाराष्ट्रात आत्याच्या घरी मुलगी देण्याची प्रथा आजही आहे. मातृसत्ताक जीवन पद्धतीचे हे अंधुक अवशेष आहेत.

माणसाचे अधिकार, त्याची कुटुंब व समाजविषयक कर्तव्ये त्याच्या वरील सामाजिक बंधने या सर्वांचे नियमन, स्त्रीकडून येणाऱ्या वारसा पद्धतीने होते तेव्हा त्या समाजपद्धतीला मातृसमाज पद्धती म्हणतात. या समाजात सण, उत्सवात पतीला विशेष मानाचे स्थान नसते. नायर कुटुंबाचे वैशिष्ट्य खालील शब्दात व्यक्त झाले आहे.

[१६]'The Nayar family, or Tarwad consists of a woman and her sons and daughters and so on. The son's children do not belong to that Tarwad but are affiliated to Tarwads of their wives. The property of a Tarwad is practically impartible and is looked after by the karnavan the mothers brother. Nayar women are entitled to keep more than one husband and this is only possible in a matriarcal residence where husbands are occasional visitors only..... the children have no tie with him"

काही संशोधक असे मानतात की, सिंधू संस्कृतीतील मातृसत्ताक समाज आर्यांच्या आक्रमणानंतर सरकत सरकत दक्षिणेकडे आले. आपली प्राथमिक शेती व्यवसाय करीत राहिले. हजारो वर्षांच्या आक्रमणानंतरही त्यांच्यावर वैदिक आर्यांच्या जीवनपद्धतीचा परिणाम झाला नाही.

मातृसत्ताक समाजाच्या जीवनव्यवस्थेत 'प्रकृतिप्रधान'ता होती. सांख्यांनी भौतिक दृष्टिकोनातून विश्वविकासाची मीमांसा करण्याचा भव्य आणि तर्कनिष्ठ प्रयत्न सांख्यदर्शनातून केला. प्रकृतिपुरुष विचाराला तत्त्वचिंतनाच्या पातळीवर आणून सोडले. प्रकृती हेच विश्वाचे आदिकारण असून विश्वाचा पसारा तिच्यापासून

निर्माण होतो. पुरुषाचे स्थान केवळ प्रकृतीला 'भेटणारा' एवढेच आहे. पिता हा निमित्तमात्र म्हणजे जन्मदाता, एवढेच मानले आहे. तांत्रिकांच्या मंत्रतंत्रादी आचारावर भर असलेल्या कर्मकांडांतून बाहेर पडून सांख्यांनी त्याला नैतिक अधिष्ठान दिले.

'माता' पूजनीय पण स्त्री ? –

एकूण भारतीय संस्कृतीत 'माता' पूजनीय असली तरी 'स्त्री' म्हणून तिला समाजात दुय्यम स्थान आहे. 'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति' 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियासि' यासारखी वचने वैदिक वाङ्मयात आढळतात. पण दुसऱ्या बाजूला [१७] 'स्त्रीशूद्रौनाधीयाताम्' स्त्री व शूद्रांनी अध्ययन करू नये हा नियम घालून दिला. किंबहुना 'स्त्रीशूद्र' असा द्वंद्व समाज रूढ करून दोघांना समान नियम लावले. मनू म्हणतो, 'स्त्रीशूद्राश्च सधर्माणः' बोधायनसूत्र सांगते, शूद्राच्या हत्येसाठी जे प्रायश्चित्त आहे तेच स्त्रीच्या हत्येसाठी आहे. स्त्रिया आणि शूद्रांनी विष्णु किंवा शिवलिंगास दुरून स्पर्श न करता वंदन करावे. या दोहोंनी स्पर्श केलेल्या लिंगाची वा मूर्तीची पूजा करणाऱ्याची कोटी कुले नरकात पडतील. त्यांना पूजेचे फळ हवे असल्यास ब्राह्मणाकडून पूजा करावी असे निर्णय सिंधू सांगतो. आणि पुराणे ही स्त्री शूद्रांसाठी दयाबुद्धीने तयार केली आहेत असे देवीभागवतात म्हटले आहे. स्त्रियांची निंदा एकूणच ग्रंथांतून विविधप्रकारे केली आहे. महाभारताच्या अनुशासन पर्वात म्हटले आहे 'क्षुरधारा विषं सर्पो वाह्निः इति एकतः स्त्रियः' वस्तऱ्याची धार, विष, साप आणि अग्नी हे सर्व एकत्रितपणे स्त्रीमध्ये आढळतात. कथा सरित् सागरातील अनेक सुभाषितांतून स्त्रीनिंदा आहे. उदा. स्त्रियांच्या ओठात अमृत पण ओटीत मात्र विषच असते. 'स्त्रियःश्चरित्रंपुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः ?' हे वचन प्रसिद्ध आहे. एका कवीने तर मृत्यूच्या चार दारांपैकी एक 'प्रमदाजनविश्वास' स्त्रियांवरील विश्वास हे सांगितले आहे (पूर्वोक्त भांडागार पृ. १६९ श्लोक ८९) एकूणच स्त्रिया अविश्वसनीय, गूढ, चंचल, घातक, कठोर, धूर्त, चरित्रहीन, भोगातुर, अधःपतनाचे कारण असतात अशी भूमिका वैदिक संस्कृत वाङ्मयात मांडलेली आढळते. 'आई' या पदाचा, नात्याचा गौरव केला तरी तिला (स्वामी विद्यानंद सरस्वती, वेदमीमांसा दिल्ली १९८४ पृ. २३०-२३३) अधिकार दिलेले नाहीत.

मातेला अधिकार नाहीत –

नारद स्मृतीत म्हटले आहे, वडीलांनी स्वतःच कन्यादान करावे व जिला वडील नसतील तर भावाने, वडिलांच्या पित्याने, वडिलांच्या कुळातील पुरुषाने अथवा मामाने करावे. या सर्वांपैकी कोणीच नसेल आणि मुलीची आई शरीराने वा मनाने स्वस्थ असेल तर तिने करावे. या वरून धर्मशास्त्रानी वरवर पाहता 'माता' या पदाचा केलेला गौरव किती वरकरणी आहे ते लक्षात येते. शास्त्रकारांना आईविषयी खरोखरच आदर असता तर वडिलांनंतर तिचा क्रम लावायला हवा होता. कौटिल्यानेही आईला स्वतंत्रपणे आर्थिक व्यवहार करण्याचा अधिकार नाही असे म्हटले आहे. याला अपवाद एकमेव [१८]वराहमिहिराचा आहे. त्याने मात्र बृहत्संहितेत या निंदकांची परखड हजेरी घेतली आहे. वराहमिहिराच्या काळाबद्दल इ.पू. ३ रे शतक की इ.स. ६ वे शतक हा वाद आहे. असे असले तरी त्या एकमेव विद्वानाने अत्यन्त कठोर शब्दात, तर्कशुद्ध पद्धतीने स्त्रियांचा कैवार घेतला आहे. आपल्या बृहत्संहिता ग्रंथात तो म्हणतो, 'स्त्रियांचा असा कोणता दोष आहे जो पुरुषांच्या आचरणात आढळत नाही. विकृत आचरण करणारा पुरुष कमी दोषी आणि स्त्री आधिक दोषी असे सांगण्यात आलेले नाही. पुरुष नियमांचे पालन करीत नाहीत. स्त्रिया मात्र करतात. म्हणून त्याच श्रेष्ठ आहेत. स्त्री ही पुरुषाची पत्नी असते वा माता असते. पुरुषाचा जन्म स्त्रीपासून झालेला असतो. स्त्रियांची निंदा करणाऱ्यांना सुख कसे लाभेल?' पण वराहमिहिरासारखे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके. स्त्री कितीही चांगली वागली तरी पुरुषाचे समाधान करू शकत नाही ही भावना कवी भवभूतीने 'उत्तररामचरित' या नाटकात पात्रांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडली आहे. तो म्हणतो, 'वाणी व स्त्रिया यांच्या शुद्धत्वावर ठपका ठेवताना लोक दुर्जनतेने वागतात, एवढेच नव्हे तर अतिदुर्जनतेने वागतात असे म्हटले पाहिजे.' हे अपवाद सोडले तर धर्माची एकूण भूमिका 'स्त्री' निंदकाची आहे.

सुफलीकरण विधीत स्त्रीच महत्त्वाची –

स्त्रीमध्ये सुफलीकरणाची अद्‌भुत शक्ती आहे. भूमीचे सुफलीकरण करण्यासाठी तिचा तिच्यातील यातुशक्तीचा उपयोग करून घ्यावा हे तर्कशास्त्र कृषिविधानात वापरले गेले. झाडाचे पहिले फळ सवत्स स्त्रीला देतात. ज्या स्त्रीला

मुले अधिक तिच्याकडून पेरणीस सुरुवात करायची ही प्रथा आजही शेतकरी समाजात आहे.

A fruitful woman makes plants fruitful, a barren woman makes them barren.

भूमी आणि स्त्री यांच्यातील साधर्म्य साहचर्यातून अनेक परंपरा निर्माण झाल्या आहेत. मूल जन्माला आले की आजही ते जमिनीवर ठेवतात. खेड्यात ही प्रथा आहे. संस्कृतमध्ये 'अपत्य संभव' या शब्दासाठी 'भूमिस्थ' असा शब्द आहे. बिफ्राँ म्हणतो -

The fecundity of the earth and the fecundity of women viewed as being one and the same quality.

**कालप्रवाहात स्त्री ओझे व देहस्विनी बनली –**

संस्कृतीच्या विकास क्रमात स्त्रीसत्ताक समाज व्यवस्था नाहीशी होऊन पुरुषकेन्द्री समाजव्यवस्था काही अपवाद वगळता सर्वत्र आली. केरळातील नायर समाज वरवर पाहता मातृसत्ताक राहिला तरी थरवाडातील सर्व महत्त्वाचे व्यवहार भाऊ पाहू लागला. पुरुषकेन्द्री समाज व्यवस्था आली, स्त्रीचा समाजिक दर्जा दुय्यम, बिनमहत्त्वाचा झाला, हुंडा पद्धतीमुळे ती कुटुंबातले 'ओझे' झाली, आर्थिकदृष्ट्या प्रत्यक्ष अर्थकारणातील सहभाग संपला. त्यातून अनेक कुप्रथा निर्माण झाल्या. उदा. राजस्थानात मुलगी झाली की तिला चांदीच्या बादलीत दूध ठेवून त्यात नवजात बालिकेला बुडवून ठार मारीत. तिचा देह मातेच्याच खाटेखाली पुरत. तिने पुढील जन्म मुलाचा घ्यावा ही अपेक्षा. अशा प्रकाराला 'दूधमुही' म्हणतात. राजस्थानात अशा मातेला मी भेटले आहे. तर तामिळनाडूत उसलामपट्टी जिल्ह्यातील कल्लार समाजात मुलगी जन्मताच तिला ठार मारण्याची प्रथा आहे. फक्त एक मुलगी जिवंत ठेवतात. आईने मुलगी ठार मारण्यास विरोध केला तर तिला नवरा टाकून देतो. मुलगा व्हावा म्हणून नाजूक अंगाला सुई टोचण्याचा विधी स्त्रियांना करवून घ्यावा लागतो. महाराष्ट्रातील लोककथांत बाई बाळंत झाली की 'तुला मुसळच झाले', 'तुला कुंचा झाला' असे सांगितल्याचे

संदर्भ सापडतात.

संस्कृतीच्या विकास क्रमात, 'आत्मदेहसमुद्भव' माझ्या देहातून वनस्पतीसृष्टी निर्माण करून संपूर्ण जगाचे मी पोषण करीन असे सांगणारी शाकंभरी - बनशंकरी - दुर्गा केवळ व्रतात विधिउत्सवात बंद झाली. 'मी मित्रवरुणांची धारणपोषण करणारी आहे.अग्नी, इंद्र, अश्विनी देव यांची धात्री मात्र आहे. सोमाला सामर्थ्य मीच देते... सर्व विश्वावर अधिसत्ता चालविणारी मीच आहे. सारे प्राणिमात्र माझ्या कृपेने जगतात. अन्नउदक चलनवलनाचे सामर्थ्य सर्व माझ्यामुळेच त्यांना मिळते.'असे सांगणारी ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात भेटणारी अंभृणी या साऱ्याच देवता, ज्यांचे स्वतंत्र अस्तित्व होते त्यांचे मनस्वीपण हरवले. त्यांचे प्रत्यक्षरूप स्त्रीत पाहिले गेले ती 'स्वयंपूर्णा', 'स्वयंसिध्दा', 'मनस्विनी' स्त्री केवळ 'देहस्विनी' उरली. वैदिकांपूर्वीच्या कृषिप्रधान जीवनव्यवस्थेतील मातृसत्ताक जीवन व्यवस्थेतील स्त्री उत्पादनात सहभागी होती. समाजाच्या सामाजिक,आर्थिक, कुलाच्या संघटनात ती केन्द्रबिंदू होती. तिचे महत्त्व मुलाला जन्म देणारी म्हणून इतपतच शिल्लक राहिले. तिचे अस्तित्व आणि भाग्य 'मुलग्याची'आई आणि 'जिवंत असलेल्या पतीची 'पत्नी' इथवर मर्यादित झाले.

**सांस्कृतिक एकात्मतेची वाहक आणि चेतक स्त्री –**


सुफलनविधी उत्सवांतील स्त्रीप्रधानता, देवीमाहात्म्य : मातृसत्ताक कृषिसंस्कृती यांतील अनुबंधातून आली आहे. हे निखळ सत्य आहे. आजची हिंदू संस्कृती अनेकविध टोळ्यांच्या सांस्कृतिक संकरातून निर्माण झाली असून या संस्कृतीच्या एकात्मतेचा गाभा या 'संकरात' आहे. संघर्ष, स्वीकार, समन्वय, समरसता या प्रक्रियेतून ही एकात्मता झाली असून त्याच्या वाहक आणि चेतक स्त्रिया आहेत. मातृसत्ताक समाज पद्धती, गणसत्ता व कृषिसंस्कृतीचे परिवर्तन होऊन समाजात वर्ग निर्माण झाले. विविध जातिजमातीत समाज विभागला जाताना, त्या जाती शूद्रात घालायच्या की वरिष्ठात घालायच्या हे अनुलोम-प्रतिलोम विवाहांतून ठरवले गेले. हा काळ मातृसत्तकेडून पुरुषसत्ताक पुरुषकेन्द्री व्यवस्थेकडे जाण्याचा काळ असल्याने वरिष्ठ वर्णाच्या स्त्रीने कनिष्ठ वर्णाच्या पुरुषाशी समागम... विवाह केल्याने निर्माण होणाऱ्या संततीवर शूद्र जातीचा शिक्का मारला गेला. पुरुष ज्या वर्णाचा असेल त्यावर संततीचा दर्जा ठरू लागला. वरिष्ठ

वर्णाच्या स्त्रियांनी कनिष्ठ वर्णाच्या पुरुषाशी विवाहसंबंध प्रस्थापित करणे हा गुन्हा झाला. या संदर्भातील विवेचन यापूर्वी केले आहे. स्त्रिया आणि कृषिविधान यांचे आंतरिक दृढ नाते असल्याने त्या, ज्या ज्या वर्णात गेल्या, त्या त्या ठिकाणी सुफलता विधींबद्दलचे 'आदिबंध' त्यांनी नेले. सुफलन विधींतील यातुश्रद्धा , विधी, सामूहिक कृतिशीलता, सामूहिक नृत्य आणि मंत्रगीते यांच्यात बदल होऊन त्यांचे रूपान्तर व्रते, उत्सव, सण यांत झाले. त्यांच्यातील स्त्रीप्रधानता मात्र कायम राहिली. गेल्या दोन हजार वर्षांपासून भारताच्या एकूण समाज जीवनावर वैदिक परंपरेचा प्रभाव दिसतो. परंतु या परंपरेने पूर्व वैदिक परंपरेत निर्माण झालेल्या कृषिसंबंधित यातुश्रद्धा, सण, विधी, व्रते, उत्सव यांच्या माध्यमातून स्वीकारल्या. धार्मिक अधिष्ठानात त्यांना महत्त्वाचे स्थान दिले. गौरीगणपती - मराठवाड्यातील लक्ष्म्या, हरतालिका, नवरात्र, घटस्थापना, भोंडला, भुलाबाई भराडीगौर आदी कुमारिकांचे खेळोत्सव, शाकंभरी नवरात्र, चंपाषष्ठी आदी व्रतांचा वैदिक धर्म संस्कृतीशी काहीही संबंध नाही हे सण हे सर्व विधी, उत्सव, वनस्पती सृष्टीच्या सुफलीकरणाचे आहेत.

**दुर्गापूजा : घट बसवणे –**

वरील सर्वच व्रते स्त्रीप्रधान आहेत. महाराष्ट्र मराठवाड्यातील श्रावण, भाद्रपदातील सर्व व्रतांचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यास त्यातील स्त्रीमाहात्म्य आणि त्यातील स्त्री आणि भूमी यांच्या सुफलीकरण विधीचे रहस्य सहजपणे लक्षात येते. दुर्गापूर येथील दुर्गापूजा पूर्वी 'पूर्ण घट' रूपानेच केली जाई. देवीप्रसाद चटोपाध्यायांनी त्या विधीचे सविस्तर वर्णन केले आहे. मातीच्या चौकोनी सपाट ओट्यावर पाच प्रकारची धान्ये पसरून त्यावर जलाने भरलेला मृत्तिका घट ठेवतात. घटाच्या मुखावर पाच प्रकारच्या वनस्पतींची पाने ठेवून त्यावर असोला नारळ ठेवतात. घटावर लहान मुलांची कुंकवाने आकृती काढतात. नारळाला कुंकू लावतात. हा पूर्ण घट ज्या मृत्तिकेवर ठेवतात त्यावर श्रीयंत्राची आकृती काढतात. या आकृतीला 'सर्वतो भद्र मंडलम्' असे नाव आहे. यापूर्वी स्त्री व्रतांची चर्चा करताना कोकणस्थ ब्राह्मणात बोडण भरतात. त्याची विस्तृत माहिती दिली आहे. बोडणाच्या परातीखाली वा समोर विशिष्ट प्रकारची रांगोळी काढतात. पारंपरिक

रांगोळ्या आणि स्त्री यांच्या अतूट नात्याबद्दलची चर्चाही यापूर्वी केली आहे. रांगोळी न येणारी स्त्री शोधून सापडणार नाही. रांगोळी हा शुभकारक यंत्राचाच एक भाग आहे.



तंत्रशास्त्राला अनुरूप काढलेली श्रीयंत्राची आकृती स्त्री योनीचे प्रतीक आहे. या संदर्भात देवीप्रसाद चटोपाध्याय[१९] लिहितात -

"We may easily see the significance of Purna Ghata, being placed on the sarvabhadra mandalam. Plants and fruits are brought into contact with the female reproductive organ. The same idea is repeated in the Purna Ghata itself. The vessel is the female womb, that this womb is with a baby is indicated by the picture of sindur puptali. It is thus an enactment of human reproduction .. But why this enactment of human reproduction? Obivously to ensure the multiplication of the

fruits, plants and leaves. That is why they are brought in contact with female reproductive organ."

मराठवाडा महाराष्ट्रात 'घट बसवणे' हा शब्द नवरात्रीसाठी वापरला जातो. सटीचे नवरात्र असो वा शाकंभरीचे, 'घट बसणे' हा विधी असतोच. या विधिउत्सवाची सविस्तर चर्चा या पूर्वी केली आहे. या व्रतात स्त्रीप्रधानता असल्यामुळे पत्री, फुले,फळे, धान्य, पाणी, माती, मातीचे घट, दुर्वांकुर, विविध प्रकारच्या भाज्या, अन्नप्रकार, रांगोळ्यांच्या विशिष्ट आकृती, धान्याची चौक मांडणी आदी बाबींना विशेष महत्त्व असते. वर्षनाशी संबंधित भूमीचे सुफलता विधी पाऊसकाळात आधिक्याने येतात. या सर्व विधीउत्सवांची सविस्तर चर्चा यापूर्वी केलेली आहे.

**मर्म हरवले : औपचारिकता शिल्लक राहिली –**


सुफलन विधिउत्सवांचे स्वरूपांतील स्त्रीप्रधानता राहिली मात्र त्यातील तिच्या 'स्त्रीत्वा' चा गौरव, तिचे सामाजिक आर्थिक संघटनेतील महत्त्व व सहभाग या बाबी नाहीशा झाल्या. सुफलन विधींमध्ये असलेल्या 'स्त्री' या व्यक्तीचा आत्मसन्मान होता. तिच्यातील गुणांना सामाजिक मान्यता होती. समाजाचा महत्त्वाचा घटक असलेली स्त्री, समाजाच्या आवश्यक अशा दैनंदिन गरजा-अन्न, वस्त्र निर्माण करणारी होती. आजही शेतीची मशागत स्त्रियाच प्रामुख्याने करतात. शंभर वर्षां पूर्वीपर्यंत ग्रामीण भागात डाळी-साळी तयार करणे, शेतीसाठी लागणाऱ्या बीजकरणासाठी शेतातील चांगली कणसे, फळे, भाजीपाला राखून त्यांपासून चांगले बीज तयार करणे. दळणकांडण करणे आणि अन्न शिजविणे या सर्व गोष्टी कुटुंबातील स्त्रियाच करीत. परंतु समाजात पुरुषप्रधान जीवन व्यवस्था आली, राज्यव्यवस्था आली, उत्पादनाच्या आणि युद्धाच्या साधनांचा विकास होऊ लागला आणि स्त्रियांचे समाजातील महत्त्व कमी झाले. त्या 'दास 'झाल्या. समाजाचा महत्त्वाचा घटक म्हणून त्यांचे उत्पादनात असलेले स्वयंभू महत्त्व संपले. त्यांचे कष्ट, श्रम कमी झाले नाहीत. त्यांच्या जोडीला समाजातील दुर्बल घटक म्हणून त्यांच्यावर होणारे अत्याचार मात्र वाढले.

भूमीच्या सुफलनाशी निगडित विधिव्रतामंधून असलेला स्त्रियांचा सहभाग सजग झाला, त्यामागील तिच्या कर्तृत्वाची, ती आणि भूमी यांच्यातील सकारात्मक अनुबंधाची जाणीव तिला झाली तर सामान्य भारतीय स्त्रीला आत्मभान येऊ शकते. या व्रतांचा ती नव्या संदर्भात आणि नव्या भूमिकेतून विचार करू शकते. त्यामुळे या व्रतात आलेली निर्ममता, औपचारिकता, कचकडीपणा नाहीसा होईल. आज ही व्रते 'रीत' म्हणून 'देवाचे केले नाही तर अरिष्ट कोसळेल' या भीतीतून केली जातात. या विधीत स्त्रीचे अहेवपण महत्त्वाचे झाले. त्यामुळे प्रत्यक्ष श्रम करणारी स्त्री या विधिउत्सवांपासून दूर ठेवली गेली.

या विधिउत्सवामंध्ये परिवर्तन घडविणाऱ्या, या व्रतातील सामूहिकता जागवून ती समाजोपयोगी करण्याचा प्रयत्न काही सुशिक्षित महिलांनी केला. उदा. संक्रान्तीच्या हळदीकुंकवाच्या वेळी वाटायचे वाण न वाटता ते पैसे विद्यार्थ्यांच्या पुस्तकांना देणे वगैरे, पण तो प्रयत्न वरवरचा होता. भूमीच्या सुफलनाशी जोडलेले विधिउत्सव भारतातील सर्व स्तरांतील स्त्रिया श्रद्धेने आचरतात. या विधिउत्सवांचा अभ्यास करून त्यांना स्त्रियांच्या सबलीकरणासाठी सकारात्मक रूप देता येते. तसा प्रयत्न सामूहिकपणे व्हायला हवा. लोकमान्य टिळकांनी गणेशचतुर्थीचे सकारात्मक रूप जनसामान्यांत रुजवले. त्या वळणाचा प्रयत्न होणे आवश्यक आहे.

ऱ्हेनफेलच्या मते सर्वात प्रभावी मातृसत्ता भारतातच होती. गेल्या ३/४ हजार वर्षांपासून तिला मुळापासून उखडण्याचा सतत प्रयत्न झाला. त्याचा आढावा यापूर्वी घेतला आहेच. असे असूनही भारतीय सामाजिक, सांस्कृतिक जीवनात तिच्या अस्तित्वाचे अवशेष विधिउत्सवांच्या माध्यमातून विशेष करून सुफलन विधिउत्सवांच्या माध्यमातून संकेत रूपाने टिकून आहेत. मातृसत्ताक जीवनव्यवस्था नष्ट करण्यासाठी तीन कठोर उपाय वापरले. बालविवाह, बहुपत्निकत्व आणि सतीची चाल. हे उपाय हजारो वर्षांपासून वापरले जात आहेत. त्यामुळे भारतीय स्त्रीत्वातील शक्ती निस्तेज झाली आहे. ते दुर्बळ, अंधश्रद्ध, तर्क विचार यांपासून दूर गेलेले, गतानुगतिक बनले आहे. स्त्रीतत्वाला आत्मभान देऊन

सचेत करायचे असेल तर या सुफलीकरणाशी निगडित विधिउत्सवांच्या, त्यामागील स्त्रीच्या समर्थ अस्तित्वाच्या खुणांचा शोध घ्यायला हवा' या विधिउत्सवांच्या गाभ्यातली स्त्रीच्या मानसिक, शारीरिक, कृषिप्रधान सामर्थ्याची ओळख समाजाला करून द्यायला हवी. त्यातून स्त्रियांच्यातील आत्मविश्वास जागा करता येऊ शकतो. आदिकाळात, त्यानंतरही त्यांनी बजावलेल्या समाज कुटुंबातील महत्त्वाच्या भूमिकेची ओळख करून देऊन समाजात त्यांच्याविषयी नवी दृष्टी निर्माण करता येऊ शकते. सुफलीकरण विधिउत्सवांतील 'स्त्रीप्रधानता' तत्कालीन समाजातील स्त्रीच्या आर्थिक, समाजिक संघटनातील समर्थ भूमिकेतून आलेली आहे. या भूमिकेचे स्वरूप सर्वसामान्य स्त्रीपर्यंत आणि समाजापर्यंत विसाव्या शतकातील 'सामाजिक न्यायाच्या' विचारमुशीतून नेऊन पोहोचविले तर एकविसाव्या शतकात प्रवेश करणारी भारतीय स्त्री सबल, सुजाण होऊ शकेल आणि भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेची वीण अधिक सधन आणि घट्ट होईल.





# समारोप

मराठवाड्यातील वा महाराष्ट्रातीलच नव्हे तर एकूण भारतातील भूमीच्या सुफलीकरणाशी जोडलेले विधी, उत्सव अत्यन्त पुरातन आहेत. त्यांच्या पृष्ठावरील जमीन, वैदिक जीवनधारणा भारतीय लोकमानसात स्थिर होण्यापूर्वीची आहे. भारतीयांच्या जगण्यात हे विधिउत्सव 'आदिबंध' रूपात गोंदले गेले आहेत.

लोकसंस्कृतीच्या हृदयातील स्पंदने जणु पं. वासुदेवशरण अग्रवालांशी संवाद करीत. ते म्हणतात की, 'लोक' हा भारतीय जीवनाचा महासमुद्र आहे. त्यात भूत, वर्तमान, भविष्य साठवलेले आहे. 'लोक' हे राष्ट्राचे अमर रूप आहे. अर्वाचीन मानवासाठी 'लोक' सर्वोच्च प्रजापती आहे. लोक, लोकधात्री भूमाता, आणि 'लोक'चे व्यक्त रूप मानव हेच आपल्या नव्या जीवनाचे अध्यात्मशास्त्र आहे. लोक, मानव आणि भूमी या त्रिपुटीत जीवनाचे कल्याणमय रूप आहे.

लोकसाहित्य - लोकसंस्कृती ही सतत प्रवाही असते. त्यामुळे ती नेहमीच नवनवोन्मेषशालिनी असते. त्याच्या अभ्यासाची पायाभरणी महाराष्ट्रात इतिहासाचार्य वि.का.राजवाडे, ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर आदींनी केली. चिकित्सक दृष्टी आणि योग्य दिशा देण्याचे काम दुर्गाबाई भागवतांनी केले. या शाखेला विविध अंगांनी समृद्ध करण्याचे काम रा.चिं. ढेरे, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. भाऊ मांडवकर, डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. तारा भवाळकर, डॉ. दा.गो. बोरसे, डॉ. तारा परांजपे, डॉ. मोरजे, यांनी केले. डॉ. पुष्पलता करनकाळ, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. व्यवहारे, डॉ. दिनकर कुलकर्णी आदी अनेक अभ्यासक ही परंपरा पुढे नेत आहेत.

लोकसाहित्याच्या अध्ययनाचा पाया इ.स. १८६८ मध्ये मेरी फ्रिअर या लेखिकेने 'ओल्ड डेक्कन डेज' या नावाने लोककथांचे संकलन करून घातला. १८८० मध्ये मिस् स्टोक्स हिने अयोध्या प्रान्तातील लोककथा प्रसिद्ध केल्या. भारतीय लोकजीवनाचा अभ्यास करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून १८८६ मध्ये बॉम्बे ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सोसयटीची स्थापना झाली.

आज जग २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहे. आज लोकसाहित्याचा अभ्यास एक स्वतंत्र अभ्यास-शाखा म्हणून होत आहे. लोकसाहित्याचा विविध अभ्यासशाखांशी जसे मानसशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, मानववंशशास्त्र आदींशी कोणता अनुबंध आहे याचा शोध घेतला जात आहे. लोकसाहित्य ही अभ्यासशाखा एकेरी , एकांगी न राहाता ती समृद्ध आणि संपृक्त होत आहे.

व्रतांमध्ये स्त्रियांचा सहभाग महत्त्वाचा असतो. व्रते ही स्त्रियांचीच असतात. वर्षाच्या बारा महिन्यांतील व्रते आज धर्माशी जोडलेली असली तरी त्यांची मुळे कोणत्या कामनेशी, भूमिकेशी गुंतलेली आहेत, त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रबंधाद्वारे केला आहे. आमची लोकभूमी समृद्ध आहे. ती जेवढी खणाल तेवढे मूलधन हाती लागते. त्यातून आजच्या जीवनाचे प्रेरणास्रोत हाती लागतात.

ही व्रते, विधी, तत्संबंधी उत्सव जमिनीच्या सुफलीकरणाशी निगडित आहेत. या विधी, व्रतोत्सवांचे मूलबंध भूमीची सुफलता वाढून मानवी जीवनास अत्यावश्यक अशा अन्नाची आणि श्रमासाठी आवश्यक अशा माणसांची समृद्धी वाढावी या कामनेशी जोडलेले आहेत. भूमी आणि अन्ननिर्मिती यांच्याशी निगडित परंपरा कृषिजीवनात खोलवर रुजलेल्या आहेत. त्या माणसाच्या जगण्याशी जोडलेल्या असल्याने मानवी विकासक्रमात वा कलौघात त्यांत फारसे बदल झाले नाहीत. काळानुरूप विधींचे व्रतांत उन्नयन झाले. त्यांच्या स्वरूपात बदल झाले. परंतु हजारो वर्षांपूर्वीचे मूलबंध कायम आहेत.

भूमी आणि स्त्री यांच्यांतील सर्जन-सामर्थ्याने भारावलेल्या आदिमानवाने त्यांच्यातील साधर्म्य मनात नोंदवले. त्यातूनच भूमीची सुफलनता वाढविण्यासाठीच्या विधिउत्सवांतून स्त्री- प्रधानता आली. आदिदेवता ही स्त्रीरूपी आहे. निर्मितीचे मूलस्थान मूलस्थान असणारी 'योनी' आदिमानवाने पूजनीय

मानली. जीवन प्रेरणा मानली. पुरुषाच्या सहभागाशिवाय 'योनी' ला चेतना मिळत नाही हे लक्षात येताच 'लिंग'पूजा सुरू झाली. लिंगयोनी-पूजा धर्माधिष्टित नव्हत्या. त्या 'विधि'स्वरूप होत्या. विश्वात अद्‌भुत शक्ती असून, ती रसमय आहे, ती प्रत्येक वस्तूत, व्यक्तीत असते, विशेषतः स्त्रीत अधिक्याने असते अशी आदिमानवाची धारणा होती. यातुशक्तीच्या साहाय्याने सृष्टीचे नियंत्रण करता येते, या श्रद्धेतून पाऊस पडावा, जमिनीतून भरपूर धान्य यावे, त्यावरची रोगराई दूर व्हावी, यासाठी त्याने 'विधी' निर्माण केले. हे विधी सर्जनक्षमता असलेल्या स्त्रीच्या माध्यमातून केले जात. त्यांचेच कालौघात व्रतांत रूपान्तर झाले.

शेतीचा शोध स्त्रीने लावला, आणि जो समाज शेतीवर अवलंबून असतो तो मातृप्रधान असतो, या बाबी जगन्मान्य आहेत. भारतातही मातृसत्ताक समाजव्यवस्था होती. याचे संकेत या विधिउत्सवांतून मिळतात. त्यांचा उहापोह प्रस्तुत प्रबंधात केला आहे.

सुफलीकरणाशी निगडित देवता या 'लोकदेवता' आहेत. त्या वृक्षरूपी, नदीरूपी, माती,दगड या रूपात पूजिल्या जातात. या लोकदेवतांचे मूलबंध शोधण्यासाठी लोकजीवनाचे रूप न्याहाळावे लागते. 'असु' म्हणजे जादू, वा यातुशक्ती. ती ज्यांच्यात अधिक्याने असते ते असुर. रावण, विश्वकर्मा, वरुण हे असुर होते. दलितांत धर्मा, भीम, नकुल, सहदेव, अर्जुन इत्यादी नावे ठेवली जातात. त्याच बरोबर वनात निसर्गाच्या सानिध्यात अधिक नैसर्गिक व अनौपचारिक जीवन जगणाऱ्या आदिवासींमध्ये रावण, बिभीषण इत्यादी नावे ठेवली जातात. वृक्षवेलींची नावे ही विपुल आढळतात.

भारतीय जीवनराहाटीत या समाजांचे असलेले महत्त्व आणि योगदान आदींचा अभ्यास सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून आज केला जात आहे. त्यासाठी 'लोकभूमी' च्या खोलात जाऊन शोध घेतला जात आहे.

स्त्री आणि शेती यांच्यातील प्राणभूत नाते सुफलन विधिउत्सवांतून सतत जाणवत असे. या नात्याचा शोध घ्यावा, या नात्याच्या बुडाशी असलेले तिच्या सबलत्वाचे संकेत शोधावेत आणि कालप्रवाहात 'निर्बल देहस्विनी' झालेल्या स्त्रीला, भारतीय जीवनरहाटीच्या मध्यवर्ती प्रवाहात आणून, तिला 'सबल

मनस्विनी' कसे करता येईल, तिच्यातील आत्मभान जागे करून तिला आत्मसिद्ध कसे करता येईल, याची दिशा शोधावी ही प्रेरणा या अभ्यासामागे होती.

भूमीच्या सुफलतेशी जोडलेल्या भारतभरच्या विधी, उत्सवांतून विलक्षण एकात्मता आहे. ती अंगभूत आहे. तिचे मूलबंध धर्माशी जोडलेले नाहीत तर माणसाच्या जगण्याशी, परंपरेने संचित केलेल्या जीवनरहाटीशी जोडलेले आहेत. भारतातील लोकमन माती, नद्या, हरितसृष्टी, निसर्गातील चढउतार यांच्याशी एकरूप झालेले आहेत. येथील माणसे

सर्वेपि सुखिनः सन्तु ।
सर्वे सन्तु निरामया ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु ।
मा कश्चित् दुःखभाग् भवेत ॥

ही भूमिका घेऊन जगणारी आहेत. 'सं' 'सर्वे' या शब्दातून व्यक्त होणारी 'समूहजीवना' ची भावना हीच 'राष्ट्र' संकल्पना नव्हे का ?

भारतातील विधी, उत्सव रूढार्थाने धार्मिक नाहीत. ते लोकपरंपरांशी जोडलेले आहेत. भारतातील 'धर्म' ही संकल्पना संस्कृतिवाचक आहे. Religion या अर्थाने ती नाही. प्राचीन काळापासून चालत आलेल्या जीवन धारणांशी ती जोडलेली आहे. 'रिलिजन' ही संकल्पना मात्र उपासनापद्धती, संप्रदाय, पंथ यांच्याशी निगडित आहे. 'हिंदू' हा शब्द जीवनरहाटी, जीवनपद्धती दर्शवितो. या जीवनरहाटीनुसार जगणाऱ्या विविध पंथांच्या संप्रदायांच्या लोकांच्या जीवनधारणा एकच आहेत. इतिहास असे दर्शवितो की शैव, वैष्णव, वारकरी, महानुभाव यांच्यात तीव्र मतभेद झाले, तरी ते सर्व एकाच जीवनधारेत, सांस्कृतिक परंपरेत, 'हिंदू' या संकल्पनेत समाविष्ट होतात. गेल्या शंभरवर्षांत ही संकल्पना अधिक विशाल होऊन 'भारतीय' या संकल्पनेत परिवर्तित झाली आहे.

लोकसंस्कृतीचा अभ्यास केवळ सजीव अवशेषांचा अभ्यास नाही किंवा मृत पारंपरिकबाबींची चिकित्सा नाही. या अभ्यासाला कार्यात्मक मूल्य आहे. त्यातून भविष्याला चेतना व प्रेरणा मिळते. आज धर्मभेद , भाषाभेद, जातिभेद, लिंगभेद अधिक टोकदार होऊन त्यांद्वारे, भारतीय समाजाचे विघटन होईल की काय असे

भय वाटू लागले आहे. या पार्श्वभूमीवर प्राचीन भारतीय समाज एकसंघ कसा राहिला याचा उलगडा लोकसंस्कृतीच्या अभ्यासातून होतो. प्रस्तुत शोधनिबंधात ही भूमिका घेऊन सुफलीकरणाशी निगडित विधिउत्सवांचा आणि तत्संबंधी गाण्यांचा अभ्यास मांडला आहे. भारतीय एकात्म सांस्कृतिक जीवनाच्या एका पैलूचा हा अभ्यास आहे. इतर पैलूंच्या अभ्यसातून भारतातील एकात्म लोकसंस्कृतीच्या मुळाशी असलेल्या प्रेरक तत्त्वांचा शोध घेऊन भविष्याच्या दिशा शोधता येतील. त्या दृष्टीने लोकसंस्कृतीचा, लोकसाहित्याचा अभ्यास केवळ महत्त्वाचा नाही तर आवश्यक आहे हे स्पष्ट होते.

# परिशिष्ट - १

## भुलईचे गीत

**शांताबाई गायकवाड (वय सुमारे ७५) यांचे कडून मिळालेले गीत –**

नागर पंचीमीच्या दिशी गोविंदा चारित होता गायी ऽऽ
गायी चारिता चारिता गेला टेकाजवळी
टेकात पाहतो तो अंडे हैती –
अंडे गोईंदान देखिले आला धावत पळत
माता मज अंडे तळून देई ....
अंडे मातानं फोडिले अंडे हैत नागिनीचे
गेली पाच उतरंडी काढल्या
चंदनचुली पेटविल्या श्रावन शेवया रांधिल्या ...
गोईंदा भोजन केला, सरसर गेला माडीवरी
घेतली खुंटीची दुशाल, गोईंदा निजला गती झाला ....
नागिन गेली टेकाजवळी, टेकात पाहती अंडे नाही
नेले असतानं गोईंदान, आली धावत येशीच्या येसकरा
गोईंदाचा वाडा कोनता? ....
तुझं गोईंदापासी काय? त्याची हरपली गाय
आली गोईंदाच्या वाड्याला ....
सरसर माडीवरी गेली, डाव्यापायाची गनगोळी (करंगळी)
तिनं कडाकडा डंकिली ....
माता त्याची हाक मारी, झोप कशी रे लागली
गायी नगरीच्या सुटल्या ....
माता गेली गोईंदा जवळी, ऊर दणाणा बडविती
केस कुरले तोडिती ....
अरे अरे गोपाळा बाळा, जावे भाभीला आनाया
गेला घोड्याच्या पागला ....
झिन मोत्याचा सजविला, गेला वेशीच्या बाहेरी

एक वन वलांडिले
दोन वन वलांडिले
तीन वन वलांडिले
चार वन वलांडिले
तवा पाचव्या वनाला दिसले भाभीचं माहेर
आव आव भोवोजी, सारीजण खुशाल ?
जल्दी करा जायांची
भाभी बसली न्हायाला कापी केशाच्या गळ्याला
काय सकुन नवल झाल ?
भाभी बसली कुकू लेयाला करंडा पालथा झाला
काय अपसकुन झाला?
भाभी बसली जोडवे लेयाला, जोडवे पायाचे गळाले
काय अपसकुन झाला ?
वटी भाभीची भरी तिची पालथी झाली वटी
काय अपसकुन झाला?
भाभी बसली घोड्यावरी गेले येशीच्या बाहेरी
एक वन वलांडिले,
दोन वन वलांडिले ·
तीन वन वलांडिले,
चार वन वलांडिले
पाचव्या वनाला धुप्पन कशाचं निघत ?
सरण कुणाचं जळत ? ....
तुमच्या गोईंदा भरताराचं ....
गेली धावत पळत केस कुरले तोडत
सरणी उडी टाकिली ....
गोईंदाची माता बोल काय गोपाळा नवल झाल
एका संग संग दोघ गेलं ....

# परिशिष्ट - २

## अ. अल्पना : आलिपना : रांगोळी

संस्कृत 'अलिंपन' या शब्दापासून 'अलिपना-अल्पना'. पण काही विद्वानांच्या मते हा शब्द आर्येतर असावा. बंगालातील वन्य जमातीत गावाभोवती वेशीची भिंत उभारुन त्यावर जी तांदुळाचे पीठ भिजवून नक्षी काढतात. त्याला 'ऐलपन' असे नाव होते. त्यावरून 'अलिपना' शब्द आला असावा. या रेखांकनामुळे गाव आणि शेत यांचे रक्षण होते. अशी समजूत होती. आजही अंगणातल्या रांगोळी रेखाटनामागे तीच श्रद्धा असते. ज्या व्रतांशी व विधींशी अलिपनेचा संबंध आहे ती अतिप्राचीन आहेत. आर्यपूर्व काळापासून प्रचलित आहेत. आलिपनेतील कमळ मोहंजोदाडो येथील कलाकृतीत दिसते असे गुरूसदय रॉय सांगतात. आर्यांच्या टोळ्या भारतात येण्यापूर्वी ऑस्ट्रिक वंशाचे लोक आले. त्यांनी ही कला भारतात आणली. आणि ते शेती करणारे होते. भारतातील परंपरागत धार्मिक लोककलांचा शेतीशी संबंध आहे. मग ती महाराष्ट्रातील लावणी असो वा कर्नाटकातील यक्षगान असो. रांगोळी प्रकारांतून सूर्य, चंद्र, मोर, कमळ, लक्ष्मीची पावले, हात, कुयरी इत्यादी बरोबरच नांगर, विळा, सूर्य, मापटे, यांच्या आकृती असतात.

## ब. ग्रीकमधील 'गॅमॉस' प्रथा

श्री. ॲलन डुंडेस (Alan Dundes) यांच्या The study of Folk lore या ग्रंथात लोकसाहित्याच्या ३४ अभ्यासकांचे निबंध संग्रहित केले आहेत. त्यातील लॉर्ड रॅग्लन यांच्या 'द हिरो ट्रॅडिशन' या लेखात पान क्र. १५४ वर खालील मजकूर नोंदविला आहे.

"Gamos is a Greek term, means a holy or sacred marriage in which usually one or both human actors represt gods. Often the marriage is consummated in a field & that by means of the principle of magic (like produces like), the fecundity inherent in the act of ritual coitus willensure agriculture ferfility"

भूमीच्या सुफलीकरणाशी संबंधित विधी मागील भूमिका जगभर सारखीच होती. तिफणीला नवरी करून नांगराला जोडणे, इळाआवसेला घरमालकाने वा सालदाराने पत्नीसह शेतात मुक्काम करणे हे विधी जमिनीच्या सुफलीकरणाशी जोडलेले आहेत. ग्रीक मधील 'गॅमॉस' प्रथा भारतीय सुफलीकरणविधींच्या जवळची आहे.

वरील उतारा प्रा. मंदा धर्मापुरीकर यांनी संदर्भासाहित कॅनडा येथील टोरँटो येथून पाठवला आहे.

# परिशिष्ट - ३

## तिफणीची आरती

(महाराष्ट्रात ही आरती म्हटली जाते)

आरती ओवाळू तिफणी नंदी तुझे दोन्ही हो ॥
दिवस पाहुनिया बुधवार कुनब्या काठी तोड हो
काठी तोडुनिया अवचित् कामठ्यावर नीट हो
कामठा पुजोनिया सुतारा धन्य तू कारागिरा हो
दोरा टाकुनिया दोघानं चौपट केली वाकसानं हो
तिफण टोचली अट्टकार दांडीचा झणकार हो
तिनी खूर हे तोडले तिफनिसी भिडविले हो
तिनी दाते हे सोनेरी त्याला पाहून बेरी हो
तिनी काय कांब्या पोटी मिळवावर कायचा चुळा हो
तिनी नयाचा सुमार ओढून चाळदोर हो
आरती ओवाळू तिफणी नंदी तुझे दोन्ही हो ॥
रुमनं मिळोनिया मणपोटी तिफणकऱ्याच्या मुठी हो
आगोला लावुनिया बिंड्यासी पुळे विठ्या त्यासी हो
आगोला लांबोरे दोरखंड सहा बैल कुरखंड हो
लोथा बांधुनिया तिफणीवर तिफणकऱ्याचा जोर हो
ओटी बांधोनिया अवचित् वर दोरीची गाठ हो
मांजरे लावोनिया जुवाशी मुसके लैलांशी हो
आरती ओवाळू तिफणी नंदी तुजे दोन्ही हो ॥

धारया घरोनिया पाहिल्यानं पुढे चाले ठाकून हो
तिफण जुतोनिया तिफन्यानं तासावर लावून हो
तास काढोनिया समोर वर सूर्याचे तेज हो
तिफण गेली हे सेत्यावर वरवर इचा देर हो
तिफण गेली हे सती एक डबरा इचा लेक हो
तिफण आहे हे अपार नांगर इचा भरतार हो
आगोल्या सुरल्याची आहे गाठ तिफण करी नीट हो
बैला मारू नको तू काठी तसा पडील आढी हो
उताऱ्या उतारतो जगजेठी धरतीच्या पोटी हो
आरती ओवाळू तिफणी नंदी तुझे दोन्ही हो ॥
पुडी आन्तिया रंगाची बैलाच्या शिंगाशी हो
मनके बांधुनिया कपाळाला चाळगोळ बांधा त्याला हो
झुला टाकोनी नंदीवर हो त्यावर राघो मोर हो
आरती ओवाळून तिफणी नंदी तुझे दोन्ही हो ॥
खोपडी आनोनी धांड्याची दुपटा लावा त्यासी हो
पांडव करोनिया कांबीचे हळदीकुंकवाचे हो
जग्र मांडोनि हो गवऱ्याचं वर मापुल दुधाचं हो
पांडव निघाले वनात सवंदळ खाली ठान हो
नंदी चालले झपाट्यानं कासरा धरा आवरुन हो
आरती ओवाळू तिफणी नंदी तुझे दोन्ही हो ॥
हरि भला महादेवा ॥

# परिशिष्ट - ४

## झडती


(पोळा सणात बैलांना म्हणावयाची गाणी)

**एक –**

आधी पडल्या कार्तिका रोहेनी । मंग पडला मृगाचा पानी
त्या पान्यानं वापली धिमानी (जमीन)
ती निघाली दोपानी । मंग झाली चौपानी
मंग झाली वो सायेपानी ? आठपानी
बारा आली दाहे पानी । फुला आली
बारा पानी । फळा आली सोळा पानी
वर्सामासा आला पोरा (पोळा)
धावत गेला कोष्ट्याचा घरा
ओल्या सुताचा विनला दोरा
त्याच्या बनविल्या कुचाट्या
भरल्या सभेमधी दे कुचाट्यांचा झाडा
मंग जा आपल्या घरा । एक नमन गौरा
पार्वतीपते हर बोला । हरहर महादेव

**दोन –**

लहानशी रिंगणी
पान पान काडे
बैल सिंगारले
महादेव गेले
महादेवावर होता येल
येलाले लागले बैल
बेलाले लागले बेलफूल
आकाशी लागल्या चंद्रज्योती
आधी कारवाट बैलाची आरती
मंग करा बैलाच्या पोळ्याची आरती



# संदर्भ-टीपा

**प्रकरण १ ले**

**भूमिका**

**प्रकरण २ रे**

**लोक परंपरा आणि सुफलीकरणविधी -**

१. वासुदेवशरण अग्रवाल : प्राचीन भारतीय लोकधर्म, पृ. ११८

२. इरावती कर्वे : हिंदू समाज, एक अन्वयार्थ, पृ. ६

३. प्रा. डॉ. स. अं. डांगे : अश्वत्थाची पाने, पृ. २७-२८

४. अवनीन्द्रनाथ टागोर : बंगाली व्रते : लोकायत : देवीप्रसाद चटोपाध्याय, पृ. ११३, पृ. ११६.

५. तत्रैव

६. डॉ. सरोजिनी बाबर : संपादिका, आदिवासींचे सण, उत्सव, पृ. ९

७. डॉ. स. रा. गाडगीळ : लोकायत, पृ. ३४

८. पं. महादेवशास्त्री जोशी : संपादक - भारतीय संस्कृतिकोश खंड २ रा, पृ. ४६३

९. प्र. रा. देशमुख : सिंधुसंस्कृती, ऋग्वेद व हिंदुसंस्कृती, पृ. १७०

प्रकरण ३ रे :

सुफलीकरणविधी आणि लोकदेवता –

१. देवीप्रसाद चटोपाध्याय : लोकायत, पृ. २६५

२. तत्रैव पृ. २६६

३. दुर्गा भागवत : भारतीय लोकसाहित्य की रूपरेखा, पृ. ४४

४. तत्रैव पृ. ४५

५. भावार्थ ''ज्या प्रमाणे प्राचीन काळात देवांनी सामूहिक भावनेने, सहभावाने आपापला कार्यभाग पूर्णत्वास नेला. त्याप्रमाणे तुम्ही एका विचाराचे व्हा. एक मनाचे व्हा, लोकहो, सामूहिकरित्या मार्गक्रमण करा. आपल्यां सर्वांचे उद्दिष्ट एक असो. आपल्या संघाच्या एकतेसाठी, आपली अंतःकरणे व मने एकजीव असोत.'' एकात्म राष्ट्रभावना भारतीय मनात हजारो वर्षांपासून आहे.

६. रा. चिं. ढेरे : लज्जागौरी पृ. ६५

७. तत्रैव पृ. ४९

८. तत्रैव पृ. १०७

९. शतपथ ब्राह्मण ७.२.१.११

१०. डॉ. डी.डी. कोसंबी I.S.I. # 22

११. डॉ. स. रा. गाडगीळ : लोकायत पृ. ८७

१२. भा.रं. कुलकर्णी : आजच्या हिंदु जीवनातील ध्रुववस्तीचे अवशेष पृ. २४७, २४८

१३. ॲने फेल्डहाऊस : वॉटर ॲण्ड वुमनहुड 'Religious Studies' या विषयाच्या, ॲरिझोन विद्यापीठात प्राध्यापिका)

१४. डॉ. प्रा. स. अं. डांगे : अश्वत्थाची पाने, पृ. ७३-७४

१५. प्र. रा. देशमुख : सिंधुसंस्कृती, ऋग्वेद आणि हिंदुसंस्कृती

१६. देवीप्रसाद चटोपाध्याय : लोकायत, गणपती – चॅप्टर III

प्रकरण ४ थे

पारंपरिक लोकोत्सव आणि कुमारिका –


१. दुर्गा भागवत : धर्म आणि लोकसाहित्य पृ. १०

२. विल ड्युरांट : भारतीय संस्कृती (अनुवाद : मा. पं. शिखरे) पृ. ११५

३. डॉ. प्रा. स.रा. गाडगीळ : भारतातील मातृदेवता-मातृसत्ता : लोकवाङ्मय दिवाळी अंक

४. रा.ना.दांडेकर : वैदिक देवतांचे अभिनव दर्शन

५. Frazer : Golden Bough

६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : वैदिक संस्कृतीचा विकास

७. रा. चिं. ढेरे : लज्जागौरी , पृ. ९०-१०४

८. श्री. पद्मनाभ मेनन : HISTORY OF KERALA, PART 1, P.P. 99-100

९. भारतीय संस्कृतिकोश : खंड २, 'कुमारिका', संपादक - पं. महादेवशास्त्री जोशी

१०. विल ड्युरांट : भारतीय संस्कृती, पृ. १२-१३

११. वि.का. राजवाडे : भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास, पृ. ८५

१२ भावार्थ : हे सरस्वती तुझ्या हातातील स्फटिकमण्यांच्या माळेवर तुझ्या सतेज गुलाबी नखांतून प्रतिबिंबित झालेल्या किरणांमुळे, मण्यांना डाळिंबाचे दाणे समजून चोच मारणारा पोपट निराश होत आहे. ते पाहून मंदपणे हसणाऱ्या हे बुद्धिदेवते माझे वंदन स्वीकार. कुमारिकांच्या व्रतात डाळिंबदाणे महत्त्वाचे असतात. सरस्वती कुमारिका आहे.

१३. भारतीय संस्कृतिकोश : संपादक पं. महादेवशास्त्री जोशी - खंड २ रा 'कुमारिका'

१४. डॉ. स.रा.गाडगीळ : लोकायत, पृ. २७-२८

१५. तत्रैव पृ. ३३

१६. दुर्गा भागवत : धर्म आणि लोकसाहित्य, पृ. ८०

१७. कै. वि.का.राजवाडे : भारत इतिहास संशोधक मंडळ - इतिवृत्त शके १८८५

१८. अनंत आबाजी देवधर : हादगा उर्फ बोंडला - भोंडला - टिपण (महाराष्ट्र लोकसाहित्यमाला भाग २२ -भोंडला भुलाबाई)

१९. डॉ. मधुकर वाकोडे : हनुमंताची निळी घोडी - टिपण (महाराष्ट्र लोकसाहित्यमाला भाग २२)

२०. साँझी - स्त्रिया आणि कारले यांच्यातील नाते. विवाहविधीत मुलाच्या आईस कारल्याच्या मांडवाखालून नेण्याचा विधी महत्त्वाचा मानतात. भुलाबाई भोंडल्यांच्या गाण्यात 'कारल्याचे बी पेरले ग सई' हे गाणे आहे. कारले सदाहरिततेचे, सुफलतेचे प्रतीक आहे. डांग, गुजराथ, माळवा परिसरातील आदिवासी कुमारिकाही 'साँझी ' व्रत करतात. त्यातील एक गाणे, ज्यात कारल्याचा संदर्भ आहे.

    संजा तू बडा बाप की बेटी
    तू खाए खाजा-रोटी
    तू पैरे माणिक-मोती
    संजा एवडो हो
    साथे बेवडो हो (पाण्याची घागर)
    थारा डावा हाथ करेलो हो
    थारा जीमण हाथ हो
    थारा चोटी लोहरिया हो !

**प्रकरण ५ वे**

**काही खेळगाण्यांचा शोध : भोंडला, भूलाबाई –**

१. 'मांड मांडणे' हा वाक्प्रचार मराठीत प्रचलित आहे. राजस्थानात सणाच्या निमित्ताने विशिष्ट प्रकारच्या शुभकारक आकृती, अंगणात, घरात चुनखडी आणि काव यांच्या सहाय्याने काढतात. 'मांड' साधारणपणे निसर्ग आणि जीवनाचे कलात्मक रेखाटन असते. याला

मांडणा म्हणतात. तो वर्तुळाकार वा चौकोनाधिष्टित असतो. शुभता, पावित्र्य यांचे ते प्रतीक असते. मध्यप्रदेश,उत्तरप्रदेश विशेष करून राजस्थान परिसरात मांड हा लोकगीत प्रकार परंपरेने गायला जातो. त्यातील स्वरांत भौगोलिक, प्राकृतिक, नैसर्गिक वातावरणाचे प्रतिबिंब पडलेले असते. भारतीय संगीतान्वे कालौघात, या निर्गाशी एकरूप असलेल्या पारंपारिक लोकगीत गायकीला 'राग' म्हणून स्वीकारले आहे.

मांड म्हणजे निश्चित मांडणी. गोमांतकाच्या सांस्कृतिक जीवनात 'मांड' या संकल्पनेला महत्त्व आहे. तेथील लोकजीवनाच्या भावाविष्कारासाची, कोणाच्याही मालकीची नसलेली, सांस्कृतिक कार्यासाठी वापरली जाणारी ती शुभकारक जागा असते. 'मंडल' या शब्दाशी साम्य. बंगालातील दुर्गापूजेचे वेळी काढण्यात येणाऱ्या पारंपारिक रांगोळीस 'भद्रमंडलम' म्हणतात.

२. उत्सव : भारतीय संस्कृतिकोश खंड १ पृ. ६३४-३५.

संसारग्रस्त मानवाला दैनंदिन चिंता, व्यथा, व्यवहारातून बाजूला काढून त्याच्या शरीराला, मनाला आनंदाचा अनुभव मिळवून देणे व सामाजिक सुखाचा अनुभव घडविणे हा उत्सवाचा हेतू असतो. ऋग्वेदात सामूहिक उत्सवांना 'समन' म्हणत. कवी वाल्मिकींनी अयोध्येचे वर्णन करताना 'समाजोत्सवशालिनी' या शब्दात तिचे वर्णन केले आहे.

३. व्रत : भारतीय संस्कृतिकोश खंड ९ पृ. १६४-६८.

अन्नं न निन्द्यात् । तद् व्रतम् । अन्नं बहु कुर्वीत । तद् व्रतम् ।
न कञ्चन वसतौ प्रत्याचक्षीत । तद् व्रतम् ॥ तै. उ. ३.७.१०)

अन्नाची निंदा करू नये. ते एक व्रत आहे. अन्न पुष्कळ निर्माण करावे. ते एक व्रत आहे. अतिथी आश्रय मागण्यास येईल त्याला रहाण्यास मनाई करू नये. त एक व्रत आहे.

नियोगादेव तत्कार्यं भर्तृणां व्दिजसत्तमाः ।
जपं दानं तपः सर्वमस्वतन्त्रा यतः स्त्रियः ॥

(लिंगपु. पूवार्ध ८४-१६)

स्त्रियांनी जप, दान, तप व इतर धर्मकार्ये आपल्या पतीच्या अनुज्ञेने करावीत. कारण स्त्रिया या अस्वतंत्र असतात.

४. पारव - एक रंग - राखाडी रंगावर हलकी निळीछटा

५. दुर्गाभागवत : धर्म आणि लोकसाहित्य, पृ. ७४ - ८५

६. ज्ञानेश्वरी : अध्याय १२ - ओवी क्र. १२०

७. लोकसाहित्याचे स्वरूप : डॉ. प्रभाकर मांडे पृ. २३७

८. रा. चिं. ढेरे : खंडोबा, पृ. ५५

९. वीर म्हणजे यक्ष. यक्षोपासना आजही ग्रामजीवनात लोकप्रिय डॉ. वासुदेवशरण अग्रवाल : पृ.थ्वीपुत्र - पृ. ३१९ ते ३४

१०. रा. चिं. ढेरे : लज्जागौरी, अंबुवाची पृ. ९६

११. भा.रं. कुलकर्णी : आजच्या हिंदूजीवनातील ध्रुववस्तीचे अवशेष. रण्णासण्णा या वेदकालीन देवींपैकी एक राणूबाई असावी.

१२. रा. चिं. ढेरे : लज्जागौरी, पृ. ५०-५१

१३. डॉ. मधुकर वाकोडे : लोकसाहित्य विशेषांक - प्रतिष्ठान पृ. ४९

१४. दुर्गा भागवत : धर्म आणि लोकसाहित्य, पृ. ७९,८०

१५. डॉ. मधुकर वाकोडे : भुलाबाई गीत प्रकार - स्वरूप आणि प्रेरणा हस्तलिखित टिपण.

**प्रकरण ६ वे**

**वर्षन, भूमी आणि सर्जन -**

१. भारतीय संस्कृतिकोश : संपादक पं. महादेवशास्त्री जोशी (नागपूजा)

२. डॉ. तारा भवाळकर : लोकसंचीत, पृ. १३२

३. तत्रैव पृ. १३३

४. श्रावण भाद्रपद : महाराष्ट्र लोकसाहित्यामाला भाग २९, संपादिका डॉ. सरोजिनी बाबर, टिपण : कुमुदिनी पवार पृ. १९

५. श्रावण भाद्रपद : टिपण : शरद जोगळेकर पृ. ३३-३८

६. भारतीय संस्कृतिकोश : संपादक पं. महादेवशास्त्री जोशी, खंड २ पृ. ४६२-६३

७. प्र. रा. देशमुख : सिंधू संस्कृती, ऋग्वेद व हिंदू संस्कृती पृ. २०४-६

८. आदिवासींचे सण उत्सव : संपादिका सरोजिनी बाबर : महाराष्ट्र राज्य लोकसाहित्यमाला, भाग २४ पृ. ७२-७३, टिपण : प्रा. दा. गो. बोरसे

९. आदिवासींचे सण उत्सव : संपादिका सरोजिनी बाबर : महाराष्ट्र राज्य लोकसाहित्यमाला, भाग २४ पृ.६४

१०. D.D. Kosambi : Myth and Reality, P. 57-72

११. प्र.रा. देशमुख : सिंधू संस्कृती, ऋग्वेद व हिंदूसंस्कृती पृ. २०४-६

१२. Debi Prasad Chattopadhyaya: LOKAYAT, P. 258-263

१३. Starbuck - Female deties have often enjoyed the highest place among the gods. This depends upon the nature of the social organisation and the respect in which women are held. Clan-life in which the mother is head of the group is likely to lift the 'mother goddess' in to a suprem position provided the nation has rise above the stage of magic.

१४. डॉ. पुष्पलता करनकाळ : लोकदेवता - कानबाई पृ. ८४

१५. डॉ. तारा भवाळकर : लोकसंचित पृ. १२४

१६. तत्रैव पृ. १२५

१७. रा.चिं. ढेरे : लोकदैवतांचे विश्व, पृ. २२-२४

१८. Debiprasad Chattopadhyaya - P. 235

१९. डॉ. तारा परांजपे : अनुबंध, पृ. ५६-५९

**प्रकरण ७ वे**

**भूमी, सूर्य आणि सर्जन –**

१. डॉ. तारा परांजपे : अनुबंध

२. प्रा. डॉ. स. अं. डांगे : अश्वत्थाची पाने, पृ. ४४,४५

३. भारतीय संस्कृतिकोश : संपादक पं. महदावेशास्त्री जोशी, खंड १०, पृ.१०९-११०.

४. दुर्गा भागवत : भारतीय लोकसाहित्य की रूपरेखा, पृ. ४४

५. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा, पृ. १७५

६. भारतीय संस्कृतिकोश : संपादक महादेवशास्त्री जोशी, खंड १०, पृ. ११५

७. श्री. प्रसाद मधुकर चिक्षे : ज्ञानप्रबोधिनी, पुणे स्वयंसेवी कार्यकर्ता, तीन वर्षे अरुणाचलात होते. त्यांचेकडून मिळालेली अनुभवाधारित माहिती.

८. दुर्गा भागवत : धर्म आणि लोकसाहित्य पृ. १५

९. रा. चिं. ढेरे : लोकदेवतांचे विश्व पृ. १९१

१०. तत्रैव पृ. ६८,६९,७, १९१

११. रा. चिं. ढेरे : लोकसंस्कृतीचे उपासक हा ग्रंथ मुळातून पहावा.

१२. शेख महंमद बाबा श्री.गोंदेकर यांच्या कवितांतून वाघ्यामुरळी प्रथे संबंधी निषेध स्वरूपाचे उल्लेख आहेत.

१३. राजाराम हरी गायकवाड यांचे 'महाराष्ट्र दैवत श्रीखंडोबा'' (बेनाडीकर) हे दुर्मिळ पुस्तक मुळातून पहावे.

१४. महाराष्ट्र संस्कृतिकोश खंड २, पृ. ६१३
खंडोबाचे मुसलमान भक्त त्याला मल्लूखान म्हणत. औरंगजेबाने खंडोबाला अजमतखान ( = पवित्रपुरुष) हे नाव दिले होते.

१५. डॉ. तारा परांजपे : अनुबंध पृ. ५७

१६. डॉ. राममनोहर लोहिया : ललितलेणी, पृ. ७०

१७. D. D. Kosambi ! Myth and Reality , P.73,74

१८. भारतीय संस्कृतिकोश, खंड २, पृ. ९९-१००

टीप : दक्षिणेत द्रौपदीस आद्यशक्ती मानतात. करगा म्हणजे कलश. या कलशात ती शक्ती प्रतिष्ठित असते. तिचा हा उत्सव. चैत्र सप्तमीस हा सुरु होतो. पूजा करणारे पुरुष दहा दिवस व्रतस्थ राहून स्त्रीवेश धारण करून पूजा करतात. त्रयोदशीस द्रौपदीस मोगरीच्या कळ्यांनी सजवतात. ती पाच पांडवांच्या भेटीसाठी मिरवणुकीने निघते. पाच उत्सवमूर्ती द्रौपदीचे स्वागत करण्यासाठी पुढे येतात. दक्षिणेत द्रौपदीसह पाच पांडवांची मंदिरे ठिकठिकाणी आहेत. महाबलीपुरम्‌ची मंदिरे स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना म्हणून प्रसिद्ध आहेत. हा उत्सव कर्नाटकातील सांस्कृतिक पर्व मानले जाते. ही आदिशक्ती द्रौपदी, महाराष्ट्रात येताना कोपीबाहेर (इळाआवसेत) ठेवली असेल का? करगा उत्सव सुफलताविधी आहे.

१९. प्रा. डॉ. स. अं. डांगे : अश्वत्थाची पाने, पृ. ८०

२०. भारतीय संस्कृतिकोशः संपादक पं. महादेवशास्त्री जोशी,
खंड १० पृ. १३-१५

२१. प्रा. डॉ. स. अं. डांगे : अश्वत्थाची पाने, पृ. ८०

२२. डॉ. तारा भवाळकर : लोकसंचित, पृ. १९७,९८

२३. तत्रैव : अक्षय्य तृतियेवरील महाराष्ट्र टाईम्स रविवार अंकात आलेला लेख.

२४. डॉ. पभाकर मांडे : लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, पृ. १६८-७०

२५. श्रीमहालक्ष्मी दिनदर्शिका - फेब्रुवारी १९९८ - मलपृष्ठावर बनशंकरी महात्म्य हे टिपण.

२६. डॉ. पुष्पलता करनकाळ : लोकदेवता कानबाई, हा ग्रंथ जिज्ञासूंनी मुळातून पाहावा.

**प्रकरण ८ वे**

**भूमीच्या सुफलनशक्तीशी निगडित विधिव्रतांतील स्त्रीप्रधानता -**

१. अवनीन्द्रनाथ टागोर : बंगाली व्रते, देवीप्रसाद चटोपाध्यायः लोकायत् पृ. ११५-११६

२. तत्रैव : देवीप्रसाद चटोपाध्यायः लोकायत् पृ. ११५-११६

३. भारतीय संस्कृतिकोश : संपादक पं. महादेवशास्त्री जोशी, खंड २, पृ. ६२-६५

४. देवीप्रसाद चटोपाध्याय : लोकायत पृ. ९६

५. तत्रैव : लोकायत, पृ. ८२-८४

६. डॉ. स. रा. गाडगीळ : लोकायत, पृ. ३२

७. जयंत गडकरी : समाज आणि धर्म, ऋग्वेदकाळ ते पुराणकाळ पृ. ८३-८८

८. तत्रैव पृ. १४२-४५

९. डॉ. स. रा. गाडगीळ : भारतातील मातृदेवता - मातृसत्ता (लोकवाङ्मय, दिवाळी अंक १९७६) पृ. १०७

१०. देवीप्रसाद चटोपाध्याय : भारतीय तत्त्वज्ञान - अनुवाद : सरला कारखानीस, पृ. ३५

११. रा. चिं. ढेरे : लज्जागौरी, पृ. ४०,४१

१२. डॉ. स.रा.गाडगीळ : भारतातील मातृदेवता - मातृसत्ता, (लोकवाङ्मय दिवाळी अंक १९७६) पृ. १०९

१३. दुर्गा भागवत : धर्म आणि लोकसाहित्य, पृ. ११

१४. डॉ. स. रा. गाडगीळ : भारतातील मातृदेवता - मातृसत्ता (लोकवाङ्मय दिवाळी अंक १९७६) पृ. ११०

१५. देवीप्रसाद चटोपाध्याय : लोकयत, पृ. २७२

१६. डॉ. स. रा. गाडगीळ : भारतातील मातृदेवता - मातृसत्ता (लोकवाङ्मय दिवाळी अंक १९७६) पृ. ११६


१७. आ. ह. साळुंकेः हिंदू संस्कृती आणि स्त्री, पृ. १२८ जिज्ञासूंनी हा ग्रंथ मुळातून पहावा.

१८. तत्रैव पृ. १४९

१९. देवीप्रसाद चटोपाध्याय : लोकायत, पृ. २९५

**प्रकरण ९ वे**

**समारोप**



# संदर्भ साहित्य


पृथ्वीपुत्र ............................................ अग्रवाल वासुदेवशरण

प्राचीन भारतीय लोकधर्म, १९६४............... अग्रवाल वासुदेवशरण

हिंदी साहित्य का बृहत् इतिहास, षोडषभग .... उपाध्याय कृष्णदेव

हिंदू समाज : एक अन्वयार्थ ....................... कर्वे इरावती

लोकजीवनातील ध्रुववस्तीतील अवशेष ......... कुलकर्णी भा. रं.

अहिराणी भाषा व संस्कृती ........................ कुलकर्णी भा. रं.

लोकायत ............................................. गाडगीळ स. रा.

शक्तिसौष्ठव ......................................... गोडसे द. ग.

साहित्याचे मूलधन ................................. चोरघडे वामन

मराठी छंदोरचना .................................... जोशी ना. ग.

वैदिक देवतांचे अभिनव दर्शन १९५१ .......... दांडेकर रा. ना.

साहित्याचे लेणे, १९५२........................... दांडेकर मालतीबाई

सिंधु संस्कृती, ऋग्वेद व हिंदू-संस्कृती .......... देशमुख प्र. न.

मराठवाड्यातील लोककथा ........................ पठाण यू. म.

गिरजा ................................................ बोरसे दा. गो.

समाज चिंतन ........................................ बेडेकर दि. के.

अनुबंध ............................................... परांजपे तारा

लोकसाहित्याचे अंतःप्रवाह ........................ मांडे प्रभाकर

लोकसाहित्याचे स्वरूप ............................ मांडे प्रभाकर

लोकसाहित्याची रूपरेखा ........................ भागवत दुर्गाबाई
धर्म आणि लोकसाहित्य ............................ भागवत दुर्गाबाई
भारतीय लोकसाहित्य की रूपरेखा ............. *भागवत दुर्गाबाई*
श्रावण भाद्रपद ....................................... बाबर सरोजिनी (सं.)
भोंडला भुलाबाई .................................. बाबर सरोजिनी (सं.)
जाई-मोगरा ........................................ बाबर सरोजिनी (सं.)
स्त्रियांचे खेळ आणि गाणी ........................ बाबर सरोजिनी (सं.)
आदिवासींचे सण उत्सव .......................... बाबर सरोजिनी (सं.)
दसरा दिवाळी ...................................... बाबर सरोजिनी (सं.)
Kalki .................................................... DR. Radhakrishnan
मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती ............. साळुंके आ. ह.
हिंदू संस्कृती आणि स्त्री .......................... साळुंके आ. ह.
भारतीय संस्कृति .................................. विल ड्युरांट
लोकसंचित ......................................... भवाळकर तारा
मराठी लोकसंस्कृतीचे उपासक ................ ढेरे रा.चिं.
लज्जागौरी ........................................... ढेरे रा.चिं.
लोकदैवतांचे विश्व ................................ ढेरे रा.चिं.
नागमंडल ............................................ ढेरे अरुणा
अश्वत्थाची पाने .................................... डांगे स. अं.
हिंदुधर्म आणि तत्त्वज्ञान .......................... डांगे स. अं.
भारतीय संस्कृती .................................. साने गुरूजी
स्त्री - जीवन ........................................ साने गुरूजी
ललित लेणी ......................................... लोहिया राममनोहर
भाषा आणि संस्कृती .............................. कालेलकर ना. गो.
भारतीय विवाह संस्थेचा इतिहास ............. राजवाडे वि. का.
खानदेशातील लोकदेवता कानबाई ............ करनकाळ पुष्पलता

जीवनदातासूर्य ...................................... हरिश अग्रवाल - (अनु. प्र.न. जोशी)

मराठी स्त्री - गीते .................................. व्यवहारे शरद

मराठी लोकगीत - स्वरूप-विशेष .............. व्यवहारे शरद

दासशूद्रांची गुलामगिरी ............................ पाटील शरद

समाज आणि धर्म-ऋग्वेदकाळ ते पुराणकाळ .. गडकरी जयंत

अडगुलं मडगुलं ..................................... खैरे विश्वनाथ

LOKAYAT ............................................. Deviprasad

Chattopadhyaya

Water and Womanhood ........................ Anne Feldhous

## वाङ्मय कोश

भारतीय संस्कतिकोश ............................ (सं.) पं. महादेवशास्त्री जोशी

महाराष्ट्र ज्ञानकोश ........................................ डॉ. केतकर श्रीधर व्यंकटेश

Encyclopaedia of Religion and Ethics ............................................. The standared Dictionary of Folklore



**डॉ.शैला द्वारकादास लोहिया (परांजपे)**
निवृत्त प्राचार्या,
महिला महाविद्यालय, अंबाजोगाई (जि.बीड)

**जन्म** : ६ एप्रिल १९४०

**शिक्षण** : संगीत विशारद (१९५२) गांधर्व महाविद्यालय,
एम.ए. (मराठी) - १९५६, एम.फिल.(मराठी) - १९९०
पीएच.डी.(मराठी) - १९९९, डॉ.बा.आं.मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**विशेष अभ्यासक्षेत्र** - लोकसाहित्य व लोकसंस्कृती.

Δ सामाजिक कार्याचा उभय कुटुंबापासून वारसा.
स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व सबलीकरणासाठी गेल्या पंचवीस वर्षांपासून कार्य.
'मानवलोक' या स्वयंसेवी संस्थेच्या संस्थापक-सदस्य.
'मनस्विनी' महिला प्रकल्पाच्या प्रमुख.

Δ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा यांत सहभाग या निमित्ताने कॅनडा, अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, नेदरलँड, चीन, थायलंड, नेपाळ या देशांना भेटी.

Δ **सदस्या** : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण प्रकल्प, सल्लागार महिला प्रकल्प.

Δ **प्रकाशित साहित्य** : स्वरांत, आभाळ पेलताना (कथासंग्रह)
वाहत्या वाऱ्यासंगे (ललित गद्य), देश-परदेश (प्रवासवर्णने),
भोंडला भुलाबाई (लोकसाहित्य) सात रंग सात सूर (बाल-वाङ्मय)
जगावेगळा संसार, इत्ता इत्ता पाणी,
बाबाचा परसाद (प्रौढ साक्षरांसाठी).

Δ सामाजिक कार्यासाठी अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

---

**गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद**